म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास.
सं. क्र. ६०८
१९४९

जागतिक इतिहासाचें अवलोकन :..

REFBK 0007631
REFBK-0007631

हरि लक्ष्मण नेहरू

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ५८ वें

जागतिक
इतिहासाचें ओझरतें दर्शन

(खंड १ ला)



लेखक
पं. जवाहरलाल नेहरू

अनुवादक
शिवराम गोविंद भावे



REFBK-0007631

जुलै, १९५१] [मूल्य ७॥ रुपये

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २



मूळ आवृत्तीची प्रस्तावना

हीं पत्रें केव्हां आणि कोठें प्रसिद्ध होणार आहेत, किंवा तीं मुळीं प्रसिद्ध होणारच आहेत कीं नाहींत हें मला कांहीं ठाऊक नाहीं. कारण, हिंदुस्थान हा आजकाल एक फार मोठा चमत्कारिक देश आहे आणि तेथें पुढच्या काळांत असुकच एक गोष्ट होईल असें भाकीत करणें कठिण आहे. परंतु सवड आहे तोंच, सभोंवार घडत असलेल्या प्रसंगांनीं माझ्याविरुद्ध आघाडी साधण्यापूर्वीच, या चार ओळी मी लिहून घेत आहें.

ऐतिहासिक विषयासंबंधीं ही जी पत्रमालिका मीं लिहिली आहे, ती लिहिण्याची आवश्यकता सांगावयाला हवी आणि तिच्या स्वरूपाबद्दल खुलासा करायला हवा. हीं पत्रें अखेरपर्यंत वाचण्याचे परिश्रम जे वाचक करतील, त्यांना ही आवश्यकता व हा खुलासा या पत्रामध्येंच सांपडण्याचा संभव आहे. विशेषतः यासाठीं अशा वाचकाला मी शेवटचें पत्र वाचायला सांगेन; आणि आपल्या या उफराट्या जगांत वाचायला सुरुवात शेवटून केली, तरी कांहीं मोठेंसें बिघडणार नाहीं.

या पत्रांची वाढ स्वाभाविकपणें झालेली आहे. त्याच्यासाठीं पूर्वरचित अशी योजना फारशी आंखलेली नव्हतीच; आणि त्यांचा विस्तार हा एवढा वाढेल अशी माझी केव्हांच कल्पना नव्हती. सुमारें सहा वर्षांपूर्वीं, माझी मुलगी दहा वर्षांची होती तेव्हां तिला म्हणून मीं बरींचशीं पत्रें लिहिलीं व त्यांमध्यें जगाच्या प्राथमिक अवस्थेचा वृत्तांत थोडक्यांत आणि समजायला सोप्या अशा स्वरूपांत लिहिला. हीं पूर्वीं लिहिलेलीं पहिलीं पत्रें नंतर पुढें पुस्तकाच्या स्वरूपांत प्रसिद्ध झालीं आणि त्यांचें स्वागत फार मोठ्या प्रेमानें व उत्साहानें करण्यांत आलें. ही पत्रमाला पुढें चालू ठेवण्याची कल्पना माझ्या मनात घोळत होती; परंतु राजकीय क्षेत्रांत चालू असलेल्या माझ्या कार्यांमुळें मी कामामध्यें इतका गुंतून गेलों होतों कीं ती कल्पना प्रत्यक्ष रूप धारण करूं शकली नाहीं. तुरुंगांत हवी होती ती संधि मला मिळाली व ती मीं हातची दवडली नाहीं; तिचा मीं चांगला उपयोग करून घेतला.

तुरुंगामधील जीवनांतही कांहीं अनुकूलता आहेत. मोकळा वेळ आणि कांहीं अंशीं निर्लेप बुद्धि या दोन्ही गोष्टी तुरुंगांतील जीवनांत मिळतात. परंतु तेथील अडचणी या तर उघडच आहेत. कैद्याच्या हाताशीं तेथें ग्रंथसंग्रहालयें किंवा संदर्भग्रंथ नसतात आणि अशा परिस्थितींत कांहीं लिहिण्याचा उद्योग करणें, आणि त्यांतही विशेषतः इतिहासाचें लेखन करणें हें अविचारी धाडस ठरतें. माझ्याकडे बरींचशीं पुस्तकें येत असत पण तीं कायम जवळ ठेवून घेतां येत नसत. तीं पुस्तकें यायचीं आणि जायचीं. तथापि, बारा वर्षांपूर्वीपासून माझे पुष्कळ देशबांधव व देशभगिनी यांच्याप्रमाणेंच व त्यांच्या समवेत हा तुरुंगाच्या यात्रा करण्याचा उद्योग जेव्हां मीं सुरू केला, तेव्हांपासून वाचलेल्या पुस्तकांमधून लिहून ठेवावयाची ही संवय मीं जडवून घेतली. अशी ही टिपणी-पुस्तकें बरींचशीं वाढलेलीं होतीं आणि लिहिण्याला जेव्हां मी लागलों, तेव्हां या टिपणी-पुस्तकांनीं वरील अडचणींतून मला सोडविलें. (या टिपणी-

पुस्तकाचा मला मोठाच आधार मिळाला.) या टिपणी-पुस्तकाखेरीज कांहीं इतर ग्रंथांचाही मला फार मोठा उपयोग झाला. अशा पुस्तकांत 'इतिहासाची रूपरेखा' (Outline of History) या एच्. जी. वेल्स् यांच्या पुस्तकाची मदत ही तर अत्यावश्यक अशीच होती. असें जरीं असलें, तरी चांगल्या संदर्भग्रंथांचा अभाव ही मोठीच वास्तविक अडचण होती आणि त्यामुळें या कथेंतील कांहीं भाग पुष्कळदां उडत उडत सांगण्याची पाळी येई; आणि कांहीं वेळीं तर विशिष्ट कालखंड डोळ्यां-आड करून गाळूनच टाकावे लागत.

हीं पत्रें विशिष्ट व्यक्तीला उद्देशून लिहिलेलीं, अगदीं वैयाक्तिक स्वरूपाचीं आहेत. त्यामुळें केवळ माझ्या मुलीच्यासाठींच लिहिलेल्या अशा पुष्कळ सलगीच्या छटा त्यांमध्यें आहेत. त्यांचें काय करावें हें कांहीं कळत नाहीं. कारण, त्या त्या ठिकाणांमधून या छटा काढून टाकायचें म्हटलें, तर तें फार मोठ्या परिश्रमाचें काम आहे. म्हणून या छटा आहेत तशाच मीं ठेवून दिल्या आहेत.

शारीरिक काम नसलें म्हणजे माणसाला अंतर्निरीक्षण करावेंसें वाटतें आणि त्याच्या मनःस्थितींत वेगवेगळे विचारप्रवाह सारखे बदलत राहतात. मला वाटतें, असे हे बदलते विचारप्रवाह या पत्रांमध्यें ठिकठिकाणीं फार आढळून येतील आणि त्यामधील विषयाची चर्चा, माडणी ही इतिहासकाराप्रमाणें निर्मम, केवळ वस्तुनिष्ठ आहे असें आढळणार नाहीं. मी स्वतःला इतिहासकार असें म्हणतच नाहीं. या पत्रां-मध्यें लहान वयाच्या वाचकांकरितां अगदीं प्राथमिक स्वरूपाचें लेखन आणि प्रौढ माणसांच्या विचारांची चर्चा अशी भेसळ झालेली दुर्दैवानें आढळेल. पुष्कळच वेळां त्याच त्याच गोष्टी लिहिलेल्या आहेत. वास्तविक पाहिलें तर या पत्रांमधील दोषांना अंतच नाहीं. हीं पत्रें म्हणजे भिन्न भिन्न ऐतिहासिक प्रसंगांचीं अगदीं वरवरचीं अंधुक चित्रें असून अगदीं बारीक अशा धाग्यानें तीं एकमेकांना जोडलेलीं आहेत. योगायोगानें हातीं येतील त्या पुस्तकांतून माझ्या कल्पना व प्रसंग यांची मीं उसनवारी केली आहे आणि त्यामध्यें पुष्कळ चुकांना अवसर मिळाला असण्याचा संभव आहे. एखाद्या तज्ज्ञ इतिहासकाराकडून हीं पत्रें दुरुस्त करून घ्यावींत असा माझा हेतु होता; परंतु तुरुंगाच्या बाहेर मिळालेल्या अगदींच थोड्या काळांत ही व्यवस्था करण्याला मला सवड सांपडली नाहीं.

या पत्रांमध्यें पुष्कळदां माझे विचार मीं थोडेसे चढाऊपणानें व्यक्त केलेले आहेत. तीं तीं माझीं मतें कायमच आहेत; परंतु पत्रें लिहीत असतांनाच ऐतिहासिक घटनांविषयींची माझी मनोभूमिका पालटत गेलेली आहे. आज जर हीं पत्रें पुन्हां लिहायला बसावें लागलें असतें, तर तीं मीं निराळ्या रीतीनें लिहिलीं असतीं किंवा निदान त्यां-मध्यें निराळ्याच गोष्टींवर भर दिला असता. परंतु लिहिलें आहे तें फाडून टाकून पुन्हां नवीनच लिहावयाला सुरुवात करणें माझ्याच्यानें होण्यासारखें नाहीं.

१ जानेवारी, १९३४ }

— जवाहरलाल नेहरू

अनुक्रमणिका

	पृष्ठ
वाढादिवसाचें पत्र - - - -	१
१. नव्या वर्षाची देणगी - - - -	६
२. इतिहासाचो शिकवण - . - -	९
३. इन्किलाब झिंदाबाद - - - -	१२
४. आशिया आणि यूरप - - - -	१५
५. प्राचीन संस्कृती आणि आमचा वारसा - - -	१७
६. हेलन लोक - - - - -	२१
७. ग्रीक नगर-राज्यें - - - -	२५
८. पश्चिम आशियांतील साम्राज्यें - - - -	२८
९. जुन्या परंपरेचें ओझें - - - -	३२
१०. प्राचीन हिंदुस्थानांतील ग्रामीण लोकराज्यें - - -	३६
११. चीनची एक हजार वर्षें - . . -	४१
१२. गतकालाची गुणगुण - - - -	४५
१३. संपत्ति जाते कोठें ? - - - -	४९
१४. ख्रिस्तपूर्व सहावें शतक आणि धर्म - - -	५४
१५. इराण आणि ग्रीस (यूनान) - - - -	६०
१६. एका काळचें वैभवशाली हेलास - - -	६६
१७. विख्यात जेता पण घमेंडखोर तरुण - - -	७०
१८. चंद्रगुप्त मौर्य आणि कौटिलीय अर्थशास्त्र - - -	७५
१९. तीन महिने - - - - -	८०
२०. आरबी समुद्र - - - - -	८२
२१. सुटीचा काळ आणि एक स्वप्नयात्रा - - -	८४
२२. मनुष्याची उपजीविकेची धडपड - - -	८७
२३. सिंहावलोकन - - - - -	९१
२४. ' देवानाम् प्रिय ' राजा अशोक - - - -	९४
२५. अशोकाच्या काळचें जग - - - -	९९
२६. चिन व हान घराणीं - - - -	१०३
२७. रोम विरुद्ध कार्थेज - - - -	१०७
२८. रोमचें लोकसत्ताक राज्य साम्राज्य बनतें - - -	११२
२९. दक्षिण हिंदुस्थानची उत्तर हिंदुस्थानवर मात - -	११८
३०. सरहद्दीवरील कुशानांचें साम्राज्य - . - -	१२३

पृष्ठ

३१. ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म - - - - १२७
३२. रोमचें साम्राज्य - - - - - १३३
३३. रोमन साम्राज्य दुभंगतें, आणि अखेरीस त्याची धुळधाण होते - १३८
३४. जागतिक राज्याची कल्पना - - - - १४३
३५. पार्थिया आणि सस्सन लोक - - - - १४७
३६. दक्षिण हिंदुस्थानच्या वसाहती - - - - १५०
३७. गुप्तांच्या अमलांतील हिंदु-साम्राज्यशाही - - - १५६
३८. हूण लोक हिंदुस्थानांत येतात - - - - १६१
३९. हिंदुस्थानचा परकी बाजारपेठांवरील ताबा - - १६३
४०. देशांच्या आणि संस्कृतींच्या भाग्याचे चढउतार - - १६५
४१. तंग राज्याच्या अमलाखालीं चीनचा उत्कर्ष होतो - - १७१
४२. चोसेन आणि दै निपॉन - - - - १७७
४३. हर्षवर्धन आणि ह्यूएन चँग - - - - १८४
४४. दक्षिणेंत कितीएक राजे, योद्धे आणि एक श्रेष्ठ पुरुष उदयाला येतात १९१
४५. मध्ययुगीन भारत - - - - १९७
४६. डौलदार अङ्कोर नगरी आणि श्रीविजय - - - २०१
४७. रोम अंधकारांत गडप होतें - - - - २०७
४८. इस्लामचा उदय - - - - - २१४
४९. आरबी लोक स्पेनपासून मंगोलियापर्यंतचा प्रदेश जिंकतात - २२०
५०. बगदाद आणि हरून-अल्-रशीद - - - २२६
५१. उत्तर हिंदुस्थानांत हर्षापासून महमुदापर्यंत - - - २३२
५२. यूरपांतील देशांचीं स्वरूपें निश्चित होतात - - - २३९
५३. सरंजामी पद्धति - - - - - २४६
५४. चीनमधून भटक्या टोळ्यांना पश्चिमेकडे पिटाळून देण्यांत येतें - २५३
५५. जपानमधील शोगूनांचें राज्य - - - - २५८
५६. मानवाची ज्ञानलालसा - - - - २६२
५७. ख्रिस्तानंतर पहिल्या एक हजार वर्षांच्या अखेरीस - - २६६
५८. आशिया व यूरप यांकडे आणखी एक दृष्टिक्षेप - - २७४
५९. अमेरिकेंतील मय-सुधारणा - - - - २८०
६०. मोहेंजोदारोकडे आणखी एक उडी - - - २८५
६१. कोर्डोंचा आणि ग्रॅनाडा - - - - २८८
६२. क्रूसेड किंवा ख्रिस्ती धर्मयुद्धें - - - - २९५
६३. ख्रिस्ती धर्मयुद्धांच्या काळांतील यूरप खंड - - - ३०२

पृष्ठ

६४. यूरपमधील शहरांचा उदय - - - - ३१०
६५. अफगाण लोक हिंदुस्थानवर स्वारी करतात - - - ३१८
६६. दिल्ली येथील गुलाम राजे - - - - ३२५
६७. चेंगीजखान आशिया आणि यूरप खंडाना हादरा देतो - - ३३०
६८. मोंगल लोक सर्व जगावर प्रभुत्व मिळवितात - - ३३९
६९. महान् प्रवासी मार्को पोलो - - - - ३४५
७०. रोमन धर्मपीठ लढाऊ बाणा स्वीकारतें - - - ३५१
७१. जोहुक्कुमी अमलाविरुद्ध झगडा - - - - ३५७
७२. मध्ययुगाचा अंत - - - - - ३६०

नकाशे

१. पाश्चिम आशिया खंड व आग्नेय यूरप खंड यांमधील सुधारणा - २४
२. चीन देशांतील सुधारणेचा प्रारंभ - - - ४२
३. ग्रीक लोक आणि इराणी लोक - - - ६४
४. अॅलेक्झांडरचें साम्राज्य - - - - ७३
५. अशोक २६८–२२६ खिस्तपूर्व - - - १०१
६. रोमच्या राज्याचें साम्राज्य बनतें - - - ११६
७. कुशान साम्राज्याच्या काळीं हिंदुस्थान - - - १२४
८. हिंदुस्थान देश वसाहती स्थापतो - - - १५३
९. तंग वंशाचें साम्राज्य - - - - १७४
१०. आरबी लोकांचे विजय - - - - २२३
११. नवव्या शतकांतील यूरप खंड - - - २४०
१२. इ. स. १००० च्या सुमारास आशिया खंड व यूरप खंड - २६८
१३. अमेरिकेंतील मय-सुधारणा - - - - २८२
१४. तेराव्या शतकांतील यूरप खंड - - - - ३०३
१५. चेंगीझखान – "परमेश्वराचा कोरडा" - - - ३३४

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
0639

वाढदिवसाचें पत्र

इंदिरा प्रियदर्शिनीस
तुझ्या १२ व्या वाढदिवसानिमित्त

सेंट्रल प्रिझन, नैनी
२६ ऑक्टोबर, १९३०*

दरवर्षीं वाढदिवसाच्या प्रसंगानें तुला भेटी आणि आशीर्वाद मिळत असतात. या नैनीच्या तुरुंगांतून आशीर्वाद काय, अगदीं भरपूर तुला मी पाठवूं शकेन. परंतु येथून बक्षीस मी तुला काय पाठविणार? येथून एखादा पदार्थ – खाण्यापिण्याजोगी – वापरण्या-ठेवण्याजोगी जड वस्तु – भेटीदाखल पाठविणें शक्यच नाहीं मला. तथापि अशी कांहीं एक भेट मी तुला खास पाठवूं शकेन, कीं जिला तुझ्यापर्यंत पोंचण्याला तुरुंगाच्या उंच भिंतीसुद्धां अटकाव करूं शकणार नाहींत. अर्थात् ही भेट विचारात्मक–भावनात्मक – आत्मिक स्वरूपाच्या वस्तूंचीच असूं शकणार. तूं अद्भुतरम्य अशा पऱ्यांच्या गोष्टी वाचल्या आहेस. त्या जशा कांहीं अदृश्य वस्तूंच्या भेटी देतात तशाच अदृश्य, मनोमय, अंतःकरणालाच फक्त समजणाऱ्या, दिसणाऱ्या, व्यक्त होणाऱ्या अशा वस्तूंचीच भेट मला येथून पाठवितां येण्यासारखी आहे.

पण कोणालाही उपदेशाचे घुटके पाजण्याची किंवा नीतीचीं व्याख्यानें झोडण्याची मला किती चीड आहे हें बाळ, तुला चांगलें ठाऊक आहे. असें कांहीं करण्याचा विचार एखादे वेळीं मनांत आला, कीं महापंडिताची – 'अत्यंत शहाण्या गृहस्थाची' – जी एक गोष्ट मीं पूर्वीं वाचली आहे ती माझ्या मनांत उभी राहते. ज्या पुस्तकांत ही गोष्ट आहे तें पुस्तक पुढेंमागें तुझ्याही वाचनांत येईलच. तेराशें वर्षांपूर्वीं चीन देशांतून एक महान् प्रवासी हिंदुस्थानांत आला. येथें येण्यांत त्याचा हेतु, ज्ञान आणि शहाणपण हीं संपादावीं एवढाच होता. त्याचें नांव ह्युएन चँग. प्रवासामध्यें त्याला उत्तरेकडचे पर्वत आणि वैराण प्रदेश ओलांडावे लागले; कित्येक संकटांना तोंड द्यावें लागलें; कित्येक अडचणींशीं झगडून त्यांचा परिहार करावा लागला; पण त्याची ज्ञानाची तहान इतकी मोठी होती, कीं या सर्वांची त्यानें कांहीं फिकीर केली नाहीं. येथें आल्यानंतर स्वतः ज्ञान संपादन करीत आणि

---

* इंदिरेचा वाढदिवस इसवी सनाप्रमाणें नवंबर १९ ला पडतो. परंतु या सालीं तो २६ ऑक्टोबरला पाळण्यांत आला. याचें कारण हिंदी संवताप्रमाणें या दिवशीं जन्मतिथि पडली.

दुसऱ्याला आपल्याजवळचें ज्ञान देत देत त्यानें पुष्कळ वर्षें या देशांत घालविलीं. त्या वेळीं पाटलिपुत्र म्हणून प्रसिद्ध असलेलें जें पाटणा शहर त्याच्या शेजारीं नालंदाचें महान् विद्यापीठ होतें. विशेषतः त्या ठिकाणीं त्यानें बराच काळ घालविला. तेथें ह्युएन चँगनें पुष्कळच विद्या संपादन केली आणि त्याला "धर्मशास्त्रपारंगत" या अर्थाची वाचक अशी 'आचार्य' ही पदवी देण्यांत आली – अर्थात् धर्मशास्त्र म्हणजे त्या काळीं बुद्धधर्म होय. नंतर त्यानें साऱ्या भरतखंडभर प्रवास केला. प्राचीन काळीं या महान् देशामध्यें सर्व ठिकाणीं राहणाऱ्या निरनिराळ्या लोकसमाजांचें त्यानें निरीक्षण केलें. व त्यांच्या रीतीभातींचा व स्वभावविशेषांचा अभ्यास केला. पुढें आपल्या प्रवासाबद्दलचा एक ग्रंथ त्यानें लिहिला – माझ्या मनांत एक गोष्ट उभी राहते म्हणून जें मीं लिहिलें ती गोष्ट आपल्या या ग्रंथांत ह्युएन चँगनें लिहिलेली आहे. बिहारमध्यें हल्लीं भागलपूर म्हणून शहर आहे. त्याच्या आसपास कोठें तरी पूर्वीं कर्णसुवर्ण नांवाची एक नगरी होती. त्या नगरींत दक्षिण हिंदुस्थानांतून कोणी एक गृहस्थ आला होता. त्याच्याविषयींची ती गोष्ट आहे. चँगनें असें लिहिलें आहे कीं, या मनुष्यानें आपल्या पोटाभोंवतीं तांब्याचे पत्रे बांधलेले असत आणि त्याच्या डोक्यावर एक पेटती मशाल असे. हातांत सोटा घेऊन मोठ्या अक्कडबाजपणानें आणि ऐटींत लांब लांब ढेंगा टाकीत या अशा विचित्र वेषांत तो सगळीकडे उन्मत्तपणें संचार करीत असे. आणि कोणीं जर त्याला या असल्या चमत्कारिक पेहरावाचें कारण विचारलें तर तो म्हणे, "माझ्या ठिकाणचें शहाणपण इतकें प्रचंड आहे कीं, जर पोटाभोंवतीं पत्र्याचें आवरण घातलें नाहीं तर तें शहाणपण पोटांत सामावून ठेवणें पोटाला शक्य होणार नाहीं; तर पोट फुटून तें शहाणपण बाहेर पडून जाईल अशी मला भीति वाटते; आणि माझ्या आजूबाजूंस राहणारे लोक इतके अज्ञानांधकारांत राहत आहेत, कीं त्यांच्या अज्ञानाची कींव येऊन त्यांना प्रकाश देण्यासाठीं मी मस्तकावर मशाल धारण करून हिंडतों."

आतां, शहाणपण पोटांत मावेनासें होऊन माझें पोट फुटण्याचें संकट उपस्थित होईल इतका मोठा शहाणपणाचा गड्डा मजजवळ नाहीं, याबद्दल मला खात्री आहे. त्यामुळें तांब्याचे पत्रे किंवा दुसरें कसलें चिलखत वापरण्याची मला आवश्यकता नाहीं. दुसरें असें, कीं जें कांहीं थोडेंफार शहाणपण माझ्या ठिकाणीं आहे तें कांहीं माझ्या पोटांत सांठविलेलें नाहीं हें खास. शरीराच्या कोणत्याही भागांत तें राहिलेलें असो, त्या ठिकाणीं आणखी पुष्कळ शहाणपणाला प्रवेश मिळण्याइतकी विपुल जागा आहे. आणि आतां जागा संपली, असें सांगण्याचा प्रसंग येण्याचा संभवच नाहीं. तेव्हां ज्या ठिकाणीं माझ्या स्वतःजवळचा शहाणपणाचा सांठाच इतका मर्यादित आहे, त्या ठिकाणीं कोणा मोठ्या ज्ञानी माणसाचा आव आणून लोकांना सदुपदेश करीत सुटणें हें मला कसें शोभेल? तेव्हां न्याय्य काय आणि अन्याय्य काय, काय करावें आणि काय करूं नये हें निश्चित करण्यासाठीं नीतिप्रवचनें झोडणें हा कांहीं खरा मार्ग नव्हे, असेंच माझें कायमचें मत बनलें आहे. त्यासाठीं परस्पर-संभाषण आणि संवाद यांचाच

खरा उपयोग आहे. कारण संवादांतूनच केव्हां तरी सत्याचा थोडासा तरी अंश बाहेर पडण्याचा संभव असतो. तुझ्याशीं अशीं संभाषणें करीत असतांना मला आनंद वाटत आला आहे आणि आपल्यामध्यें संवादही अनेक विषयांवर झालेले आहेत. परंतु आपल्याला दिसतें आहे हेंच जग किती विशाल आहे, आणि या जगाच्या पलीकडे दुसरीं चमत्कारमय आणि अज्ञात अशीं आणखी जगें कितीक आहेत ; त्यामुळें आपलीं संभाषणें किंवा संवाद कंटाळवाणे होण्याचा मुळींच संभव नाहीं, अथवा ह्युएन चँगनें आपल्या गोष्टींत वर्णन केलेल्या अत्यंत मूर्ख आणि गर्विष्ठ माणसाप्रमाणें, जगांत शिकण्या-सारखें होतें तें तें आपण सर्व शिकलों आहोंत, आतां आपलें ज्ञान परिपूर्ण झालें आहे, अशीही आपली समजूत होण्याचें कारण नाहीं. शिवाय, अशा तऱ्हेनें आपण पूर्ण ज्ञानी झालों असें वाटण्याचा आपल्या बाबतींत संभव नाहीं हेंच एकापरी बरें आहे. कारण अशा पूर्ण ज्ञानी माणसांना – अर्थात् अशीं कोणी माणसें खरोखरच असतील तर – आतां नवीन समजून घेण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं, या जाणिवेनें पुष्कळदां खेदच होण्याचा संभव असतो. नवीन गोष्टी शोधून काढण्यांत, नवीन गोष्टी समजून घेण्यांत जो आनंद आहे – अर्थात् ज्या कोणाची तशी इच्छा असेल त्याला या नवीन ज्ञानसंशोधनाच्या किंवा संपादनाच्या मार्गांत हवा तेवढा अचाट पराक्रम करण्याची संधि आहे – तो आनंदही अनुभवावयास मिळणें अशा पूर्ण ज्ञानी लोकांना सर्वतोपरि अशक्य असतें.

म्हणून मला नीतीवर कसलेंही प्रवचन झोडण्याची इच्छा नाहीं. तर मग मी करणार आहें तरी काय? संभाषणाचें काम कधीं पत्रानें का होऊं शकणार आहे? अगदीं संभाषणाचा भाव वठविल्यासारखें पत्र लिहिण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, तरी त्यांत बोलणें सगळें होणार तें केवळ एका बाजूनें. म्हणून माझ्या पत्रांत कांहीं भाग तुला उपदेशामृताच्या घुटक्यासारखा वाटला तरी ती एक कडू गोळी नाइलाज म्हणून गिळली पाहिजे अशी तूं समजूत करून घेऊं नकोस. तर जणुं कांहीं आपण परस्परांशीं बोलतोंच आहोंत, आणि बोलतां बोलतां तुझ्या विचारासाठीं म्हणून एखादा प्रश्न मीं तुझ्यापुढें मांडला आहे, अशा कल्पनेनें तूं माझ्या लिहिण्याकडे पाहा.

इतिहासामध्यें आपण राष्ट्राराष्ट्रांच्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाच्या कालखंडांचे वृत्तांत वाचतों, त्या त्या ठिकाणच्या व काळच्या महान् स्त्रीपुरुषांचीं चरित्रें व त्यांनीं केलेलीं श्रेष्ठ कृत्यें यांचा आपण अभ्यास करतों; मग कधीं कधीं स्वप्नांत किंवा जागे-पणींही विचारलहरींमध्यें जणुं कांहीं आपणच त्या प्राचीन काळांत गेलों आहों आणि त्या प्राचीन वीरपुरुषांप्रमाणें किंवा वीरस्त्रियांप्रमाणें आपणही मोठीं पराक्रमाचीं कामें करीत आहोंत, असें कल्पनासुख आपण अनुभवतों. आठवतें कां तुला, कीं अगदीं पहिल्यानें जेव्हां तूं जोन ऑफ आर्कची गोष्ट वाचलीस तेव्हां तुझें मन कसें भारल्या-सारखें झालें होतें आणि आपण पण एक प्रकारें तिच्यासारखेंच व्हावें अशी तुझ्या मनांत महत्त्वाकांक्षा कशी उत्पन्न झाली होती? सामान्य पुरुष किंवा स्त्रिया हीं कांहीं नेहमींच अशीं वीरवृत्तीचीं नसतात. त्यांचे विचार आपली रोजची मौठभाकर, आपलीं

मुलेंबाळें, आपल्या कुटुंबाचीं सुखदुःखें या किंवा अशाच गोष्टींवर खिळलेले असतात. पण केव्हां तरी एक काळ असा येतो, कीं सगळा समाजच्या समाज एखाद्या श्रेष्ठ कार्याच्या निष्ठेनें भारला जातो आणि मग अगदीं सामान्य, साध्यासुध्या अशा स्त्रिया आणि पुरुष सुद्धां वीर बनतात आणि मग त्या समाजाचा इतिहास अंतःकरण• खळबळून सोडणारा आणि क्रांतिकारक होतो. महान् नेत्यांच्या ठिकाणीं असेंच कांहीं असतें, कीं त्यामुळें सर्व समाजाला स्फूर्ति मिळते आणि त्यामधील सर्वांनाच महत्कार्यें करण्याची शक्ति येते.

ज्या वर्षीं तुझा जन्म झाला–१९१७–तें वर्ष इतिहासातील असेंच एक संस्मरणीय वर्ष आहे. त्या वर्षीं, गरीब, दलित, दीन, यांच्याविषयींच्या सहानुभूतीनें आणि प्रेमानें ज्याचें अंतःकरण ओथंबलेलें होतें अशा एका महान् नेत्यानें, इतिहासामध्यें कधींही विसरलें जाणार नाहीं असें एक उदात्त प्रकरण आपल्या समाजाकरवीं लिहविलें. ज्या महिन्यांत तुझा जन्म झाला त्याच महिन्यांत त्यानें – लेनिननें – तें मोठें क्रांतीचें कार्य सुरू केलें. आणि त्यामुळें आज राशिया व सायबेरिया यांचें सारेंच रूप पालटून गेलें आहे. तर आज इकडे आपल्या भारतवर्षांत दुसरा एक असाच महान् पुढारी कार्य करीत आहे. त्याच्याही अंतःकरणांत दुःखानें गांजलेल्यांबद्दल असेंच प्रेम ओथंबून राहिलें आहे आणि त्यांना साहाय्य करण्यासाठीं त्याच्या अंतःकरणाला सारखी तळमळ लागून राहिलेली आहे. आपल्या समाजानें पुन्हां पूर्ण स्वतंत्र व्हावें आणि भुकेनें मरणाऱ्या आणि गरीब, दीन, दलित अशा जनतेवरील दुःख व अन्याय यांचें दडपण नाहींसें व्हावें यासाठीं त्या आपल्या नेत्यानें आपल्या समाजाला एक प्रचंड पराक्रम आणि उदात्त त्याग करण्याची स्फूर्ति दिली आहे. आज बापूजी भले तुरुंगांत असोत, परंतु त्यांच्या संदेशाची जादू भारतवर्षांतील कोट्यवधि लोकांचीं अंतःकरणें नकळत भारून टाकीत आहे; आणि स्त्रीपुरुषच काय, परंतु लहान लहान बालकें सुद्धां जणुं आपल्याभोंवतींचें दुर्बलतेचें कवच फोडून आपलीं लहान लहान खुराडीं सोडून बाहेर येऊन भारतवर्षाच्या स्वातंत्र्याच्या लढाईंतील शिपाई होत आहेत. आज हिंदुस्थानांत आपण असा इतिहास घडवीत आहोंत; आपल्या डोळ्यांदेखत हें सारें घडत आहे. या सर्व भव्य इतिहास-नाटकांत आपल्यालाही थोडा भाग घ्यावयास सांपडत आहे, हें आपलें भाग्य आहे.

या प्रचंड चळवळीमध्यें आपली भूमिका कोणती असावी, त्यांत आपण कोणता भाग घ्यावा, कोणतें काम आपल्या वांट्यास येईल हें मला नाहीं सांगतां येणार. पण, कोणतें का काम येईना, एक गोष्ट आपण लक्षांत बाळगली पाहिजे ती ही, कीं जीमुळें आपल्या कार्याला कमीपणा येईल किंवा आपल्या समाजाच्या कीर्तीला – सन्मानाला – अब्रूला धक्का लागेल अशी कोणतीही कृति आपल्या हातून होतां कामा नये. आपल्यालाही भारतवर्षाचे शिपाई व्हायचें आहे ना? तर मग भारतवर्षाची अब्रू आपल्या हातांत आहे आणि ही अब्रू आपण एक पवित्र ठेव म्हणून संभाळली पाहिजे,

हें आपण नेहमीं ध्यानात ठेवलें पाहिजे. आपण काय करावें याबद्दल आपल्याला पुष्कळदां संशय उत्पन्न होईल. योग्य काय आणि अयोग्य काय याचा निर्णय करणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. तुला जेंव्हां असा संशय उत्पन्न होईल, तेंव्हां तुला एक कसोटी मी सांगून ठेवतों. तिचा तुला उपयोग होईल. कोणतीही गोष्ट तूं गुप्त रीतीनें करूं नको. किंवा जी गोष्ट दुसऱ्यापासून लपवून ठेवावीशी वाटते अशी कोणतीही गोष्ट करूं नको. कारण एखादी गोष्ट लपवावी अशी इच्छा होणें म्हणजे भीति वाटणें होय. पण भीति वाटणें ही फारच वाईट गोष्ट आहे. तुझ्यासारखीला तीं मुळींच शोभण्यासारखी नाहीं. तूं निर्भय-शूर राहा, मग बाकीचें सगळें कांहीं आपोआप सुरळीत होईल. तूं शूर वृत्तीनें वागलीस म्हणजे तुला कधीं कशाची भीति वाटणार नाहीं. आणि मग ज्याबद्दल लाज वाटावी असें तुझ्या हातून कांहीं घडणार नाहीं. बापूजींच्या नेतृत्वाखालीं आपला जो प्रचंड स्वातंत्र्याच्या संग्राम चालला आहे, त्यांत गुप्तता किंवा लपवाछपवी कांहीं नाहीं हें तुला ठाऊकच आहे. लपवावें असें आमच्याजवळ कांहीं नाहींच. आम्ही जें कांहीं करतों किंवा बोलतों, त्याचें भय वाटण्याचें आम्हांला कांहींच कारण नाहीं. आम्ही दिवसांढवळ्या पूर्ण प्रकाशांत-सूर्यदेवाच्या साक्षीनेंच जणुं-सारें कांहीं करीत आहोंत. याच रीतीनें आपल्या खाजगी जीवनांतही आपण सूर्याची मैत्री संपादन केली पाहिजे. जें करावयाचें तें सर्व प्रकाशांत केलें पाहिजे आणि कोणतीही गोष्ट गुप्तपणें किंवा लपूनछपून, चोरून करतां कामा नये. अर्थात् केवळ आपल्यापुरता खासगी म्हणून जीवनांत कांहीं भाग असणें शक्य आहे, किंबहुना असावाही; परंतु अशी खासगत गोष्ट गुप्त किंवा लपूनछपून केल्या जाणाऱ्या गोष्टींहून अगदीं निराळी आहे. अशी जर तूं वागलीस, तर बाळ, तूं तेजस्वी मुलगी होशील, आणि कसाही प्रसंग आला तरी तूं निर्भय, प्रशांत आणि निर्विकार राहूं शकशील.

हें पत्र केवढें तरी लांब झालें आहे. आणि तरी सुद्धां तुला सांगावेंसें वाटतें असें किती तरी शिल्लकच आहे अजून. पत्रामध्यें तें सगळें मावेल तरी कसें?

आज आपल्या देशामध्यें जें मोठें स्वातंत्र्ययुद्ध चालू आहे तें तुला प्रत्यक्ष तुझ्यासमोर पाहायला मिळत आहे हें तुझें भाग्य आहे हें वर मीं लिहिलेंच. तुझें आणखी एक मोठें भाग्य आहे, कीं तुला मोठी शूर आणि अत्यंत गोड, प्रेमळ स्वभावाची आई लाभली आहे. आणि जेंव्हां केंव्हां तुला एखाद्या प्रश्नाबद्दल संशय उत्पन्न होईल किंवा कोठली अडचण वाटेल, तेंव्हां तिच्याहून जास्त चांगली मदत इतर कोणाकडूनही तुला होणार नाहीं.

म्हणून आतां पुरें करतों. भारतवर्षाच्या सेवेसाठीं तूं एक शूर शिपाई व्हावीस, हीच माझी मनांतील एक इच्छा आहे बाळ!

अत्यंत प्रेमपूर्वक आशीर्वाद.

१

नव्या वर्षाची देणगी

नववर्षदिन (१ जानेवारी), १९३१

दोन वर्षांपूर्वी तूं मसूरीला राहत होतीस. आणि मी अलाहाबादला राहत होतों. त्या वेळीं मीं तुला लिहिलेलीं पत्रें तुला आठवतात का? तुला तीं पत्रें आवडलीं होतीं असें तेव्हां तूं म्हणाली होतीस. त्यामुळें पुष्कळदां माझ्या असें मनांत येई कीं, ती पत्रमालिका तशीच पुढें आणखी चालू ठेवली तर? त्यायोगें आपल्या या जगाविषयीं आणखी जास्त कांहीं तरी सांगण्याचा प्रयत्न मला करतां येईल. परंतु आतांपर्यंत त्य कामाला हात घालण्याची माझ्या मनाची तयारी होईना. जगताची भूतकालीन हकीकत, त्यामधील श्रेष्ठ स्त्रीपुरुष, त्यांचीं महान् कार्यें यांबद्दलचें चिंतन करणें ही मोठी मनोरंजक गोष्ट आहे. इतिहास वाचणें हें केव्हांही आनंददायक आहे. परंतु इतिहास घडविण्याला मदत करणें हें त्याहून किती तरी अधिक आनंददायक आणि मनोवेधक आहे. आजच्या घटकेला आपल्या देशांत इतिहास घडविला जात आहे हें तुला ठाऊकच आहे. हिंदुस्थानचा भूतकाल फारच मोठा आहे; कल्पना करता येणार नाहीं इतका तो दीर्घकालीन आहे; त्याचे पहिले पहिले भाग इतिहासकालाच्या पूर्वीच्या अज्ञानांधकारांत गडप झालेले आहेत. त्या इतिहासांत असे कांहीं थोडे खेददायक आणि दुःखमय भाग अवश्य आहेत, कीं ज्यामुळें आपल्याला मान खालीं घालावी लागावी किंवा आपलें मन खट्टू व्हावें; परंतु सामान्यतः आपला भूतकाल इतका चांगला वैभवशाली आणि तेजस्वी आहे, कीं त्याचा आपल्याला अभिमानच वाटावा आणि आपलें मन आनंदानें भरून जावें. तरी सुद्धां आजच्या घटकेला भूतकालाविषयीं विचार करीत बसण्याला आपल्याला रिकामा वेळ नाहीं. कारण आज आम्ही आमच्या भविष्यकाळाची घडण घडविण्यांत गुंतलों आहों; आमचा सर्व वेळ आणि कर्तृत्व हीं वर्तमानकालावर त्या दृष्टीनें परिणाम करण्यासाठीं सर्वतोपरि खर्च होत आहेत; आमचीं मनें सर्वस्वीं भविष्यकालच्या चित्रांनीं भारलेलीं आहेत.

येथें या नैनीच्या तुरुंगांत मनाला वाटेल तें वाचायला आणि लिहायला मला भरपूर वेळ आहे. परंतु लिहिण्या-वाचण्यावर माझें मन स्थिर होत नाहीं. तें येथून निसटून बाहेर भटकतें; आणि बाहेर जो मोठा संग्राम चालला आहे.त्याचेच सर्व विचार मनांत येऊं लागतात; लोक काय करीत आहेत, आपण बाहेर असतों तर काय काय केलें असतें, यांचींच चित्रें डोळ्यांपुढें येतात. वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांनीं माझें मन इतकें भरून गेलें आहे, कीं भूतकाळचा विचारच माझ्या मनांत येत नाहीं. परंतु हें माझें चुकतें आहे असें मात्र मधून मधून मला जरूर वाटतें. कारण बाहेरच्या कार्यांत मला जर कांहीं भाग घेतां येण्यासारखा नाहीं तर त्याबद्दल मीं व्यर्थ चिंता करीत कां बसावें?

पण पत्रें लिहिण्याचें आजवर मी टाळीत आलों याचें खरें कारण मात्र निराळेंच आहे. सांगूंच का तें तुला ? मात्र अगदीं गुपित आं ! केवळ तुलाच आणि अगदीं कानांत सांगेन. कारण खरें असें आहे, कीं बाईसाहेब, तुम्ही आतां झपाट्यानें मोठ्या होऊं लागलां आहांत ; आणि केवढ्या बडया पंडिता होऊं लागलां आहांत ! त्यामुळें मी शाळेंत आणि कॉलेजांत किंवा त्यानंतर जें कांहीं शिकलों तें तुम्हांला पुरेसें वाटेल कीं नाहीं कोणास ठाऊक ? निदान बहुतेक सारें तुम्हांला अगदीं शिळें – जुनाट वाटायचें ! फार कशाला, आणखी थोडे दिवस जाऊं द्या, म्हणजे तुम्हींच माझ्या शिक्षक व्हाल आणि कितीक नव्या गोष्टी मला शिकवूं लागाल. तुझ्या गेल्या वाढदिवसाच्या दिवशीं मीं तुला पत्र लिहिलें त्यांतच मीं तुला लिहिलें नव्हतें का, कीं ज्ञान मावत नाहींसें होऊन पोट फुटूं नये यासाठीं तांब्याचे पत्रे शरीराभोंवतीं बांधून फिरणाऱ्या त्या महान् ज्ञानी पुरुषाप्रमाणें मी मुळींसुद्धां नाहीं म्हणून ?

तूं मसूरीला होतीस त्या वेळीं मीं जगाच्या अगदीं पहिल्या पहिल्या काळाबद्दल लिहीत होतों ; हें लिहिणें मला अगदीं सोपें वाटे. कारण या काळाबद्दलचें आपलें सर्वांचेंच ज्ञान अगदींच अंधुक आणि ढोबळ आहे. परंतु हा अतिप्राचीन काळ सोडून आपण पुढें येऊं लागलों म्हणजे हळूहळू इतिहासकालाला सुरुवात होते ; आणि जगाच्या निरनिराळ्या भागांत मनुष्याच्या अगदीं नवीन प्रकारच्या विलक्षण विविध जीवनाला आरंभ होऊं लागतो. मनुष्याचा हा जीवनक्रम केव्हां केव्हां मोठा शहाणपणाचा झालेला दिसतो, तर केव्हां केव्हां त्यांत साराच मूर्खपणा आढळतो ; या त्याच्या अशा जीवनक्रमाचा मागोवा घेत पाहत जाणें—पहिल्यापासून शेवटपर्यंत क्रमाक्रमानें त्याचें नीट निरीक्षण करणें—हें कांहीं वाटतें तितकें सोपें काम नाहीं. म्हणून जागतिक इतिहासाची एक सुसंगत कथा तुला सांगावी अशी माझ्या मनांत पुष्कळ तीव्र इच्छा असली, तरी येथून तें कार्य करतां येईल असें कांहीं मला वाटत नाहीं. मुलामुलींनीं फक्त एखाद्या देशाच्याच इतिहासाचा अभ्यास करावयाचा ; आणि तो अभ्यास म्हणजे तरी काय, तर पुष्कळदां नुसत्या कांहीं तारखा व सन आणि थोड्या अवांतर गोष्टी यांची फक्त घोकंपट्टी करावयाची, या प्रकाराचा मला अगदीं तिटकारा आहे ; खरें म्हणजे साऱ्या जगाचा इतिहास ही सलग अशी एक गोष्ट आहे ; आणि जगाच्या बाकीच्या इतर भागांत काय काय घडलें हें जर तुम्हांला ठाऊक नसेल, तर एका विशिष्ट देशाच्या इतिहासाची सुद्धां तुम्हांला चांगलीशी समजूत करून घेतां येणार नाहीं. तूं तरी, एखाददुसऱ्या देशाच्या पलीकडे पाह्यचेंच नाहीं, अशा कोत्या दृष्टीनें इतिहासाचा अभ्यास करूं नयेस असें मला वाटतें ; तर साऱ्या जगाच्या इतिहासाचें तूं निरीक्षण करावेंस. आपली पुष्कळदां कल्पना असते तितका निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांत मोठा फरक खरोखर नसतो हें तूं नेहमीं लक्षांत बाळग. नकाशांत आणि भूगोलाच्या पुस्तकांत निरनिराळ्या देशांचे निरनिराळे रंग दाखविलेले असतात. परंतु नकाशांतील देशांचे रंग किंवा सरहद्दी यामुळें आपण आपली दिशाभूल करून

घेतां उपयोगी नाहीं. कारण निरनिराळ्या लोकांत कांहीं कांहीं फरक असतात हें जरी खरें असलें, तरी त्यांच्यामध्यें सारखेपणाच फार मोठ्या प्रमाणांत असतो हें लक्षांत ठेवणें अत्यंत आवश्यक आणि हिताचें आहे.

इतिहास जसा लिहावा असें मला वाटतें, तसा इतिहास मला येथून लिहितां येणार नाहीं. त्यासाठीं तुला मधून मधून निराळीं पुस्तकें वाचलीं पाहिजेत. परंतु मी तुला भूतकालासंबंधीं थोडें थोडें कांहीं कांहीं लिहीत जाईन. पूर्वीच्या काळांत वेळोवेळीं कोण कोण लोक होऊन गेले आणि जगताच्या रंगभूमीवर कोणीं कोणीं मोठ्या भूमिका केल्या हें थोडेंसें मला सांगतां येईल.

माझ्या पत्रांनीं तुझ्या मनाचें रंजन होईल कीं नाहीं किंवा त्यांमुळें तुझी जिज्ञासा जागृत होईल कीं नाहीं, हें मला सांगतां येणार नाहीं. खरें म्हणजे हीं पत्रें तुला केव्हां पाहायला मिळतील, का तुला तीं कधीं दिसणारच नाहींत, हेंही मला सांगतां येणार नाहीं. आपणां दोघांचें राहणें इतकें जवळ असावें, आणि तरीही आपल्यामधील अंतर इतकें प्रचंड असावें, हें किती चमत्कारिक आहे! मसूरीमध्यें तूं माझ्यापासून शेंकडों मैल दूर राहत होतीस. तरी सुद्धां तुला मी हवीं तितकीं पत्रें लिहूं शकत असें आणि तुला भेटायची इच्छा तीव्र झाली कीं तडक तुझ्याकडे मी निघून येत असें. आणि आज आपण राहतों कसे, तर यमुनेच्या एका बाजूला तूं आणि दुसऱ्या बाजूला मी – आणि दोघांमधील अंतर किती तरी थोडें. तरी पण नैनीच्या तुरुंगाच्या या उंच भिंती आपल्याला चांगल्याच दूर ठेवीत आहेत. येथून पंधरा दिवसांनीं फक्त एक पत्र मला लिहितां येणार आणि पंधरा दिवसांनीं एक बाहेरचें पत्र मला मिळणार; तशीच पंधरा दिवसांनीं एकदां भेट मिळणार; ती तरी किती वेळ, तर फक्त वीस मिनिटें. बाकी हीं बंधनेंही एका दृष्टीनें चांगलींच आहेत म्हणायचीं. कारण सहजासहजीं जी वस्तु आपल्याला मिळते तिची नीट किंमत आपल्याला सहसा समजत नाहीं; आणि प्रत्येकाच्या शिक्षणक्रमांत तुरुंगवासाचा कांहीं काळ असावा ही मोठीच इष्ट गोष्ट आहे, असें आतांशा मला वाटूं लागलें आहे. केवढी भाग्याची गोष्ट आहे, कीं आपल्या देशांत हजारों लोकांच्या शिक्षणक्रमांतील हाच भाग सध्यां चालू आहे.

हीं पत्रें तूं वाचशील तेव्हां तुला तीं आवडतील कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. तरी पण तीं लिहावयाचीं असें मीं ठरविलें आहे. त्यामुळें माझ्या मनाला तरी खास आनंद होईल. या पत्रामुळें तूं माझ्याजवळ आल्यासारखें वाटतें आणि जणुं कांहीं मी तुझ्याशींच गप्पागोष्टी करीत आहें, अशी माझी भावना होते. वारंवार मला तुझी आठवण येते; पण आज सारा दिवस तूं माझ्या मनापुढून हालतच नाहींस. आज वर्षाचा पहिला दिवस. मोठ्या पहांटे अंथरुणांत पडून पडूनच मी आकाशांतील तारकांकडे पाहत होतों. त्या वेळीं नुकतेंच संपलेलें तें महान् वर्ष, त्यामधील आमच्या आशा, अंतःकरणाची तगमग, आनंद आणि वर्षाच्या अवधींत करण्यांत आलेलीं तीं सर्व भव्य

आणि धीरोदात्त कृत्यें यांचा विचार माझ्या मनांत घोळत होता. स्वाभाविकच त्या क्षणीं, ज्यांनीं आपल्या जादूच्या स्पर्शानें आमच्या जीर्ण देशाला पुन्हां तारुण्य आणि नवचैतन्य दिलें, परंतु आज जे येरवड्याच्या तुरुंगाच्या कोठडींत बसलेले आहेत, त्या बापूजींचें स्मरण मला झालें. आपल्या दादुंची आणि दुसऱ्याही इतर मंडळींची मला आठवण झाली. तुझ्या आणि तुझ्या आईविषयींचे विचार तर माझ्या मनांत विशेषच घोळत राहिले. पुढें सकाळ होऊन बराच वेळ गेल्यावर बातमी आली, कीं तुझ्या आईला पकडून तुरुंगांत नेण्यांत आलें. मला ती नव्या वर्षाची सुरवंद देणगीच वाटली. पुष्कळ दिवसांपासून असें होणार ही अपेक्षाच होती. आज तुझ्या आईला आतां संपूर्ण समाधान आणि सुख झालें असेल याबद्दल मला मुळींच संदेह नाहीं.

पण तुला मात्र आतां विशेषच एकटें एकटें वाटणार. पंधरवड्यांतून एकदां आईची आणि एकदां माझी अशी तुला भेट घेतां येईल, आणि आमचे निरोप एकमेकांकडे नेतां-आणतां येतील. पण मला मात्र हातांत कागद आणि पेन घेऊन बसावें लागणार आणि तुझें चिंतन करीत राहावें लागणार. अर्थात् अशा वेळीं तूं अगदीं हळूच माझ्याजवळ येत जाशील आणि मग आपण खूप खूप बोलूं. मग आपण भूतकालीन इतिहासाचीं चित्रें मनश्चक्षूंपुढें रंगवूं आणि भूतकालापेक्षांही श्रेष्ठ असा भविष्यकाळ आपणांस कसा घालविता येईल याचा मार्ग आपण शोधून काढूं. म्हणून या नववर्षाच्या दिवशीं आपण प्रतिज्ञा करूं या, कीं हळूहळू हेंही वर्ष संपून जाईल त्या वेळीं तेजस्वी भविष्यकाळचें हें आपलें मनोराज्य आपण वर्तमानकाळाच्या अधिक जवळ आणूं आणि हिंदुस्थानच्या गत इतिहासाच्या ग्रंथांत एका नवीन देदीप्यमान् पानाची भर घालूं.

२

इतिहासाची शिकवण

५ जानेवारी, १९३१

काय बरं लिहूं मी तुला बाळ? कोठून सुरुवात करूं? पूर्व कालाचा विचार करूं लागलों कीं माझ्या मनापुढें असंख्य चित्रें गर्दी करूं लागतात. त्यांतील कांहीं चित्रें बाकीच्यांपेक्षां मनांत अधिक काळ घोळत राहतात. तीं माझीं मोठीं आवडतीं चित्रें आहेत. सहजच त्यांच्यामध्यें माझें मन अतिशय गुंतून जातें व नकळतच भूतकाळाचे प्रसंग आणि आज जें कांहीं घडत आहे तें, यांची मी तुलना करूं लागतों; आणि मीं कसें वागावें याबद्दल कांहीं मार्गदर्शक शिकवण त्यांतून मला मिळते का हें पाहूं लागतों. पण माणसाचें मन म्हणजे कशी एक अजब खिचडी आहे. त्याच्यामध्यें किती ते विचार खेचून भरलेले असतात, पण त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नसतो. आणि असंख्य

कल्पनाचित्रें तरी किती अस्ताव्यस्त पडलेलीं असतात ; एखाद्या चित्रशाळेमध्यें उगीच हवीं तशीं इकडे तिकडे चित्रें टाकून ठेवलेलीं चित्रें असावींतना, तशा चित्रशाळेसारखाच जणुं आपल्या मनाचा पसारा असतो. परंतु तसें पाहिलें तर हा कांहीं सगळाच आमचा दोष नव्हे. घडलेले प्रसंग सुसंगतवार क्रमानें जुळवून आपल्या मनामध्यें पुष्कळच चांगल्या रीतीनें सांठविणें आपल्यापैकीं बहुतेकांना स्वतंत्रीनें शक्य आहे. परंतु कांहीं कांहीं वेळां हे प्रसंगच अतिशय विलक्षण असतात आणि सर्वसामान्य इतिहासाच्या सुसंगत क्रमांत ते बसवितांच येत नाहींत.

मला वाटतें, मीं पूर्वी एकदां तुला इतिहासापासून आपण काय शिकावें हें लिहिलें आहे. हळूहळू का होईना पण जगाची प्रगतिच कशी होत आली आहे ; प्रथम अगदीं साधे प्राणी जगांत होते, ते जाऊन त्यांच्या जागीं अधिक गुंतागुंतीचीं शरीरें असलेलीं आणि अधिकाधिक प्रगत व कर्तृत्ववान् जीवसृष्टि कशी निर्माण होत गेली, त्यांत शेवटीं सर्वांहून अधिक श्रेष्ठ व सामर्थ्यवान् असा प्राणी म्हणजे मनुष्य कसा अस्तित्वांत आला, आपल्या बुद्धीच्या बळावर त्यानें इतर सर्व प्राणिमात्रावर प्रभुत्व कसें संपादन केलें, या गोष्टी मीं तुला लिहिल्या आहेत. रानटी अवस्थेंतून मनुष्य संस्कृति व सुधारणा यांनीं संपन्न कसा झाला हें दाखविणें हाच इतिहासाचा विषय होय असें मानण्यांत येतें. सहकार्याची किंवा एकमेकांच्या जोडीनें काम करण्याची कल्पना कशी वाढत आली आणि सर्वांच्या हितासाठीं एकमेकांनीं सहकार्यानें वागणें हेंच आपलें ध्येय असणें कसें आवश्यक आहे, हेंही कांहीं पत्रांत मीं तुला दाखविलें आहे. परंतु भिन्न भिन्न कालांतील इतिहासाच्या विशाल क्षेत्रांचें अवलोकन करीत असतां कधीं कधीं असा संदेह उत्पन्न होतो, कीं सहकार्याच्या या ध्येयाची म्हणण्याजोगी अशी खरीच कांहीं प्रगति झाली आहे का ? किंवा माणसामध्यें कांहीं विशेष मोठी सुधारणा झाली आहे का ? संस्कृति वाढली आहे का ? आज जगांत भरपूर काय आढळतें—तर परस्पर-सहकार्याचा अभाव ; एका देशानें अथवा समाजानें दुसऱ्या देशावर अथवा समाजावर जुलूम करणें किंवा एका माणसानें दुसऱ्याची पिळणूक करणें याच गोष्टी. कोट्यवधि वर्षांच्या प्रगतीनंतर आपण अद्यापिही जर इतके मागासलेले आणि अपूर्ण आहों, तर शहाण्या आणि न्यायी माणसासारखें वागूं लागण्याचें शिकावयाला आपल्याला याहूनही आणखी किती दीर्घ काळ लागावयाचा आहे ? आपल्याहूनही अधिक चांगले, अधिक सुसंपन्न आणि अधिक सुसंस्कृतही वाटावेत अशा कांहीं भूतकालीन कालखंडांचा इतिहास केव्हां केव्हां आपल्या वाचनांत येतो, तेव्हां तर आपलें जग पुढें जात आहे कीं मागें जात आहे याचाच आपल्याला संशय पडतो. आपल्या देशाच्या इतिहासांत तर हल्लींच्यापेक्षां एकूण एक बाबतींत अतिशय श्रेष्ठ असे पुष्कळच कालखंड भूतकालीं होऊन गेलेले आढळतात.

हिंदुस्थान, ईजिप्त, चीन, ग्रीस या किंवा इतरही पुष्कळ देशांमध्यें प्राचीन काळीं मोठे वैभवशाली कालखंड होऊन गेले आहेत आणि यांपैकीं पुष्कळ देश माघार खाऊन

मागें सांदीकोपऱ्यांत जाऊन पडले आहेत. असें असूनही आपण धीर सोडतां उपयोगी नाहीं. जग अत्यंत विशाल आहे आणि मधून मधून कांहीं काळ एखाद्या राष्ट्राचा उत्कर्ष झाला किंवा ऱ्हास झाला, तरी त्यानें सबंध विश्वाच्या जीवनांत कांहीं विशेषसा फरक होण्यासारखा नाहीं.

आजकाल जगामध्यें आंपली प्रचंड आधुनिक सुधारणा, व संपन्न आणि शास्त्रीय चमत्कार यांबद्दल पुष्कळ मंडळींना मोठा गर्व वाटत असतो. शास्त्रानें खरोखरच मोठे चमत्कार केले आहेत आणि जगांतील महान् श्रेष्ठ शास्त्रज्ञ सर्वतोपरि आपल्या आदरास पात्रच आहेत. याबद्दल जे फुशारकी मारतात ते स्वतः मात्र क्वाचितच कधीं खरे श्रेष्ठ असलेले आढळतात. तसेंच कितीएक बाबतींत माणसाला इतर प्राण्यांहून कांहीं विशेष मोठी प्रगति अद्यापही करतां आली नाहीं हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे. तसें पाहिलें तर कांहीं बाबतींत कांहीं कांहीं मनुष्येतर प्राणीच माणसापेक्षांही अधिक श्रेष्ठ आहेत अद्यापि. वरवर पाहतां हें विधान खुळचटपणाचें भासेल आणि ज्यांचें ज्ञान पुरेसें नाहीं तें हें ऐकून हंसतील. परंतु तूं स्वतः मेटरलिंकचा "मुंगी, वाळवी व मधमाशी यांचें जीवन" हा ग्रंथ वाचला आहेस आणि या कीटकांच्या जीवनांतील अत्यंत आश्चर्यकारक सामाजिक संघटनेची ओळख तुला पटली आहे. जगांतील प्राणिमात्रामध्यें अगदीं क्षुद्र कीटकें म्हणून या जीवांची आपण हेटाळणी करतों; परंतु या राईएवढ्या जीवांनीं मनुष्यापेक्षां किती तरी श्रेष्ठ दर्जाची परस्पर-सहकार्याची कला व सर्वांच्या हितासाठीं त्यागाची संवय आत्मसात् करून घेतली आहे. वाळवी आणि ती करीत असलेली आपल्या जोडीदारासाठींचा त्याग यांचा वृत्तांत मीं वाचला तेव्हांपासून या प्राण्याबद्दल माझ्या मनांत एक विशेष जिव्हाळा उत्पन्न झाला आहे. परस्पर-सहकार्य आणि सामाजिक हितासाठीं स्वार्थत्याग या गोष्टी जर सुसंस्कृतपणाच्या कसोट्या असतील, तर या बाबतींत वाळवी ही माणसाहून अधिक श्रेष्ठ आहे असें म्हणण्यास आपल्याला कांहीं हरकत नाहीं.

संस्कृतमध्यें एक श्लोक[1] आहे; त्याचा अर्थ असा आहे: कुटुंबाकरितां व्यक्तीचा त्याग करावा, समाजासाठीं कुटुंबाचा त्याग करावा, आणि आत्म्यासाठीं सर्व जगताचा त्याग करावा. आत्मा म्हणजे काय याचें ज्ञान आपल्यापैकीं क्वचितच कोणाला असेल किंवा त्याची माहिती क्वचितच कोणाला सांगतां येईल; आपल्यापैकीं प्रत्येकाची त्याबद्दलची भूमिका अगदीं वेगवेगळी असूं शकेल. परंतु या संस्कृत श्लोकांत जो उपदेश आहे, तो बर म्हटलेल्या परस्पर-सहकार्याबद्दल आणि सार्वत्रिक हितासाठीं करावयाच्या त्यागाबद्दलच आहे. हिंदुस्थानांतले आम्ही लोक खऱ्या श्रेष्ठपणाचा हा अत्यंत प्रभावशाली पंथ पार विसरून गेलों होतों. आणि म्हणूनच आपली अवनति झाली होती. पण या सद्गुणाची आतां आम्हांला पुन्हां पुसट पुसट ओळख होऊं

[1] त्यजेदेकं कुलस्यार्थे । ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् । ग्रामं जनपदस्यार्थे । आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥
— पंचतंत्र

लागली आहेसें दिसूं लागलें आहे आणि त्या योगानें सारा देश खडबडून गेला आहे. असंख्य स्त्री-पुरुष, मुलें-मुली हंसतमुखानें भारताच्या ध्येयसाधनाच्या मार्गावर पुढें पाऊल टाकीत आहेत. आणि त्या कामांत कष्टांची, व्यथेची किंवा हालांची रतिभरही पर्वा तीं करीत नाहींत. हें पाहिलें म्हणजे केवढा विस्मय व अभिमान वाटतो. त्यांच्या तोंडावर हास्य झळकावें हें किती स्वाभाविक आहे; कारण एका प्रचंड कार्याला हातभार लावण्याचा महदानंद त्यांना लाभत आहे. आणि त्यांच्यापैकीं जे भाग्यवान् आहेत त्यांना त्यागं करण्याची संधिही मिळत आहे. आज आपण भारताला दास्यमुक्त, स्वतंत्र करण्याठीं झटत आहोंत ही मोठीच गोष्ट आहे. परंतु सर्व मानवजातीच्या सुखाचें कार्य हें त्याहूनही मोठें आहे. आणि आमचा हा झगडा हाही अखिल मानवजातीचें दुःख व दैन्य नाहींसें करण्यासाठीं सर्व विश्वभर चाललेल्या झगड्याचाच एक भाग आहे, हीच आपली भावना असल्यामुळें जागतिक प्रगतीच्या कामीं आपलाही थोडाफार हातभार लागत आहे, याबद्दल आपल्याला आनंद होणें साहजिक आहे.

परंतु त्याच काळांत तूं तिकडे आनंदभवनांत, तुझी आई मलाक्का तुरुंगांत आणि मी येथें नैनीच्या तुरुंगांत अशीं आपण बसलों आहों, आणि एकमेकांची भेट होत नाहीं म्हणून कधीं कधीं अतिशय खिन्न होऊन जात आहों – खरें कीं नाहीं? पुण आपण तिघे जण पुन्हां एकत्र येऊन भेटूं त्या दिवसाचा विचार केला तर? मी तरी त्याकडेच दृष्टि लावून राहीन आणि त्या विचारांत माझें हृदय थोडें तरी हलकें होईल व माझा उत्साह थोडा तरी वाढेल.

३

इन्किलाब झिंदाबाद[1]

७ जानेवारी, १९३१

प्रियदर्शिनी[2]—दर्शनाला प्रिय तर खरीच, परंतु तें दर्शन अशक्य झालें असतांना त्याहूनही अधिक प्रिय! आज मी तुला पत्र लिहावयाला म्हणून जो बसलों तोंच दूर आभाळ गडगडल्यासारख्या कांहीं गर्जना माझ्या कानांवर आल्या. या गर्जना कसल्या याची पहिल्यानें मला नीटशी कल्पना करतां येईना; परंतु त्यांतील तो नाद मात्र माझ्या ओळखीचासा वाटला आणि माझ्या हृदयांतून त्याचा प्रतिध्वनीच उमटतो आहे असें मला वाटूं लागलें. हळूहळू या गर्जना जवळ जवळ येतातसें वाटूं लागलें. व त्यांचा आवाजही चढत चालला; पुढें लौकरच या गर्जना कसल्या याबद्दल कसलाच

१ इन्किलाब झिंदाबाद म्हणजे "क्रांति चिरायु होवो."
२ प्रियदर्शिनी हें इंदिरेचेंच दुसरें नांव.

संशय राहिला नाहीं. 'इन्किलाब झिंदाबाद, इन्किलाब झिंदाबाद' अशा त्या उत्साही आरोळ्यांनीं सारा तुरुंग दणाणून गेला. आणि आमच्या अंतःकरणांत आनंद उचंबळला. तुरुंगाच्याबाहेर आमच्यापासून इतक्या जवळ, आमच्या लढ्यामधील ही गर्जना करणारी मंडळी कोण होती, अलाहाबाद शहरांतलेच कोणी स्त्रीपुरुष ते होते कीं खेडेगांवांतले शेतकरी होते' हें मला माहीत नाहीं. आणि आज या गर्जना करण्याचें निमित्त काय होतें हेंही मला माहीत नाहीं. पण ते कोणी जरी असले तरी त्यांनीं आमचीं अंतःकरणें उत्साहानें भारलीं हें खरें. आम्ही कांहीं न बोलतांच त्यांच्या त्या अभिवादनाला मूक संदेश पाठविला, आणि मनानेंच त्यांना मूक आशीर्वाद चिंतिले.

आपण "इन्किलाब झिंदाबाद" अशी गर्जना कां करावी? क्रांति आणि बदल आम्हांला हवीशी कां वाटावी? साऱ्या भारतवर्षाला फार मोठा बदल आज हवा आहे, ही गोष्ट अगदीं निःसंशय आहे. परंतु आम्हांला जो मोठा बदल हवा आहे तो घडून आला आणि भारतवर्ष स्वतंत्र झाला, तरीही आम्हांला स्वस्थ बसून राहतां येणार नाहीं. जगांत जें जें कांहीं जिवंत आहे त्यामध्यें नित्य बदल होत राहिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. प्रत्येक दिवशीं, प्रत्येक क्षणीं सारी सृष्टि बदलत आहे; ज्यांच्यांत जीव उरला नाहीं अशा गोष्टींचीच वाढ फक्त बंद होते. व त्या स्थिर पडून राहूं लागतात. जिवंत पाणी हें वाहत असतें, आणि त्याला बांध घालून अडविण्याचा प्रयत्न तुम्हीं केलात, तर कोंडल्यामुळें त्याच्यावर नीळ आणि शेवाळ सांठतें. मनुष्याचें जीवन किंवा राष्ट्राचें जीवन यालाही हाच न्याय लागू आहे. आपली इच्छा असो वा नसो, आपल्याला म्हातारपण हें येणारच. लहान बालिकांच्या छोट्या मुली होतात; छोट्या मुलींच्या मोठ्या मुली, त्यांच्या प्रौढ स्त्रिया आणि त्यांच्या आजीबाई होतात. असे हे बदल होतात हें समजून, सोसूनच आपणांला जगांत राहणें भाग आहे. परंतु जग हें बदलत आहे ही गोष्ट मान्य करण्याची ज्यांची तयारी नाहीं, अशीही पुष्कळ मंडळी आहे. हे लोक आपलीं मनें, दारें-कपाटें लावून कुलुपें ठोकून बंद करून ठेवतात आणि कोणत्याही नवीन गोष्टीचा त्यामध्यें शिरकाव होऊं देत नाहींत. विचार करण्याची इतकी भीति त्यांना वाटते, कीं तितकी दुसऱ्या कशाचीही त्यांना भीति वाटत नाहीं. याचा परिणाम काय होतो? त्यांच्यासाठीं जगाची प्रगति थोडीच थांबते? त्यांची फिकीर न करतां जगाचें पुढचें पाऊल चालूच असतें; आणि हे लोक किंवा त्यांच्यासारखीच इतर मंडळी बदलत्या परिस्थितीबरोबर जुळतें होण्यासारखा आपल्या जीवनांत बदल करीत नाहींत; यामुळें जगांत मधून मधून मोठाले स्फोट होतात. म्हणूनच १४० वर्षांपूर्वीं झालेली फ्रेंच राज्यक्रांति किंवा तेरा वर्षांपूर्वीची रशियन राज्यक्रांति यांसारख्या क्रान्त्या होतात. अगदीं याच पद्धतीनें आपल्या देशांतही आज आपण एक प्रकारें क्रांतीच्या प्रवाहांत मध्यभागीं येऊन पोंचलों आहोंत. स्वातंत्र्य तर आम्हांला जरूर हवें आहे; परंतु त्याहूनही अधिक असें कांहीं आम्हांला हवें आहे. देशांत जागोजागीं जीं कुजलेल्या पाण्याचीं डबकीं झालेलीं आहेत तीं सगळीं उपसून

आम्हांला साफ करायचीं आहेत आणि ताजें जिवंत पाणी मोकळेपणें सगळीकडे खेळेल असें आम्हांला करावयाचें आहे. आमच्या देशांत सांचून राहिलेली सगळी घाण, सगळें दारिद्र्य, सगळीं दुःखें पार झाडून नाहींशीं केल्यावांचून आम्हांला समाधान होणार नाहीं. विचारशक्तीच्या कार्याला प्रतिबंध करणारीं आणि आमच्यापुढें जें प्रचंड कार्य उभें आहे त्यांत त्यांना आमच्याशीं सहकार्य न करूं देणारीं अशीं कुकल्पनांचीं जीं जळमटें आमच्यापैकीं कितीएक लोकाच्या मनांत सांचलीं आहेत, तीं पण सारीं झाडून टाकणें आम्हांला अवश्य आहे. हें काम फार मोठें आहे. आणि तें पुरें करायला कदाचित् थोडा कमीअधिक काळही लागणें शक्य आहे. पण निदान आपण त्याचा गाडा होईल तितका जरा जोरानें पुढें तर ढकलूं या. " इन्किलाब झिंदाबाद! "

जी क्रांति आपल्याला करावयाची आहे तिच्या प्रवेशद्वाराशीं आपण उभे आहों. भविष्यकाळ आम्हांला कशाकशाची जोड करून देणार आहे हें आज आपल्याला कांहीं सांगतां येणार नाहीं. परंतु वर्तमानकाळापुरतें पाहिलें तरी आमच्या प्रयत्नांचें आम्हांला मिळालेलें फळ चांगलें घसघशीत आहे. आजच्या भारतवर्षांतील स्त्रियाच पहा ना – स्वातंत्र्याच्या लढ्याच्या आघाडीवर त्या किती अभिमानानें पावलें टाकीत आहेत. त्यांच्या ठिकाणीं विनयही आहे आणि शौर्यही आहे. दृढनिश्चयी कणखरपणा आहे. देशकार्यामध्यें केवढ्या धडाडीनें पुढें धांव घेतली पाहिजे, याची जणुं शिकवणच त्या इतरांना देत आहेत. आणि आमचा तो पडदा? – ज्याच्यामागें आमच्या शूर आणि सुंदर स्त्रिया दडपून राहत असत, जो जणुं त्यांना आणि आमच्या देशालाही एक प्रकारचा शापच होता – कोठें गेला तो पडदा आज? आजच्या काळांत त्याची खरी जागा म्हणजे पदार्थसंग्रहालयांतील शिड्या; ज्यांच्यावर आपण गतकालांतील वस्तू नमुन्यासाठीं म्हणून सांठवून ठेवीत असतो अशा शिड्या; तेथें त्याची किती झपाट्यानें रवानगी होत आहे नव्हे आज?

तशींच मुलेंही पहा – मुलगे आणि मुली दोन्ही – त्यांच्या त्या वानरसेना, बालसभा, बालिकासभा बघा. या मुलांच्या आईबापांनीं म्हणजे पूर्वीच्या पिढीनें भलें गुलामासारखें किंवा दुर्बळासारखें वर्तन केलेलें असो, पण आमच्या चालू पिढींतील मुलें असली गुलामगिरी किंवा दुर्बळपणा यापुढें मुळींच सहन करणार नाहींत, याबद्दल शंका घेण्याची आतां कोणाला छाती होईल का?

अशा रीतीनें जगांतील बदलाचें चक्र चालू आहे. काल जे खालीं होते ते आज वर येत आहेत. जे वर होते ते खालीं जात आहेत. आमच्याही देशांत हें चक्र यापूर्वीच फिरूं लागायला हवें होतें. पण आतां आम्ही त्याला इतका जोराचा धक्का देऊन सुरू केलें आहे, कीं यापुढें मात्र त्याला कोणी थांबवूं शकणार नाहीं.

इन्किलाब झिंदाबाद !

४

आशिया आणि यूरप

८ जानेवारी, १९३१

जगांतील प्रत्येक वस्तु बदलत असते असें मीं मागच्या पत्रांत म्हटलें. इतिहास म्हणजे तरी काय, तर अशा या बदलाचा वृत्तांतच आणि जगांत आजवर घडून आलेले बदल जर थोडे असते, तर फारच थोडा इतिहास आपणांस लिहितां आला असता.

शाळेंत किंवा कॉलेजांत आपण जो इतिहास शिकतों त्यांत विशेषसा कांहीं अर्थ नसतो. इतरांचा काय अनुभव असेल तो असो, पण मला तरी शाळेंत फारच थोडें इतिहासाचें ज्ञान झालें हें मला चांगलें ठाऊक आहे. हिंदुस्थानचा इतिहास आणि इंग्लंडचा इतिहास यांसंबंधीं मी कांहीं थोडें शिकलों. पण तेंही अगदींच थोडें. आणि हिंदुस्थानचा म्हणून जो इतिहास मी शिकलों, तो पुष्कळशा प्रमाणांत चुकीचा किंवा विकृत आणि आमच्या देशाला जे हीन समजतात अशा लोकांनीं लिहिलेला असा होता. बाकीच्या देशांच्या इतिहासासंबंधींचें माझें ज्ञान मुळींच कांहीं नाहीं, इतकें म्हणण्यासारखें पुसट पुसट होतें. कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतर खरा इतिहास म्हणून ज्याला म्हणतां येईल असा थोडा इतिहास माझ्या वाचनांत आला. आणि सुदैवानें माझ्या तुरुंगाच्या वाऱ्यामुळें माझ्या ज्ञानामध्यें भर घालावयाला मला चांगली संधि मिळत आली आहे.

माझ्या पूर्वीच्या कांहीं पत्रांत मीं तुला हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति, द्रविड लोक आणि आर्यांचें हिंदुस्थानांत आगमन यांबद्दल लिहिलें आहे. आर्यांच्या पूर्वीच्या काळाबद्दल मीं तुला फारसें लिहिलें नाहीं; कारण मलाच त्यासंबंधींची फारशी माहिती नाहीं. पण अलीकडे कांहीं वर्षांत मात्र त्या काळासंबंधीं तुला सांगण्यासारखी एक गोष्ट घडलेली आहे. हिंदुस्थानांतील एका अति प्राचीन संस्कृतीचे अवशेष अलीकडे शोधून कांढण्यांत आलेले आहेत. हिंदुस्थानच्या वायव्य भागांत मोहेंजोदारो नांवाच्या ठिकाणीं हे अवशेष सांपडले आहेत. खोदून काढलेले हे अवशेष सुमारें ५००० वर्षांपूर्वीचे आहेत. त्यांमध्यें प्राचीन मिसर देशांतल्याप्रमाणें ममी म्हणजे मसाला भरून जशींच्या तशीं टिकवून ठेवलेलीं प्रेतेंही सांपडलीं आहेत. लक्षांत घे! हजारों वर्षांपूर्वीचा हा सारा प्रकार आहे; आर्य या देशांत येण्याच्यापूर्वी किती तरी आधींच्या काळचा. यूरप म्हणजे तर त्या वेळीं नुसतें अरण्य असेल.

आज यूरप बलवान् आहे; सत्ताधीश आहे. आपणच सर्वांत अधिक सुसंपन्न आणि सुसंस्कृत आहों असें या खंडांतील लोकांना वाटत असतें. आशिया खंड वत्यांतील लोकांना ते हीन लेखतात आणि इकडे येऊन या खंडांतील देशांमधून हाताला लागेल तें सगळें लुबाडून ते नेतात. काळ केवढा बदलला आहे पहा! आशिया व यूरप यांचें जरा आपण खोल निरीक्षण करूं या. उघडा नकाशा. त्या तिथें इवलेंसें तें यूरप खंड

प्रचंड आशिया खंडाला कसें चिकटून राहिल्यासारखें दिसतें आहे पहा. जणुं कांहीं आशिया खंडाच्या विस्ताराचाच हा छोटासा एक भाग असा भासतो आहे. इतिहास वाचल्यावर तुला कळून येईल, कीं अत्यंत दीर्घ कालपर्यंत – कितीएक युगेंच जणुं – आशिया खंडाचेंच जगांत सर्वत्र प्राबल्य होतें. या खंडांतील लोकांच्या लाटामागून लाटा जाऊन यूरप पादाक्रांत करीत आल्या आहेत. त्यांनीं यूरपची पुष्कळ नासधूस केली आणि त्यांनींच यूरपला सुसंस्कृतही केलें. आर्य, सिथियन, हूण, अरब, मोंगल, तुर्क हे सगळे आशिया खंडांतूनच कोठून तरी निघाले आणि साऱ्या आशिया खंडांत व यूरप खंडांत पसरले. टोळासारखी जणुं आशिया खंडांत त्यांची विपुल उत्पत्ति होत होती. अर्थात् फार दीर्घ कालपर्यंत यूरप म्हणजे आशिया खंडाची एक निव्वळ वसाहत होती आणि आजचे युरप खंडांतील पुष्कळसे समाज हे याच आशिया खंडांतून यूरपवर स्वारी करून गेलेल्या समाजांचेच वंशज आहेत.

आशिया खंड नकाशावर एखाद्या प्रचंड अस्ताव्यस्त राक्षसाप्रमाणें या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पसरलेलें दिसतें. यूरप खंड अगदींच छोटें आहे. परंतु आकारानें मोठें आहे म्हणून आशिया खंड श्रेष्ठ, आणि लहान म्हणून यूरप खंडाची कांहीं विशेष किंमतच नाहीं, असा कांहीं त्याचा अर्थ नव्हे. मनुष्याच्या काय किंवा देशाच्या काय श्रेष्ठत्वाची आकार ही अगदींच क्षुद्र कसोटी होय. आज आपण पाहतोंच आहों, कीं जगांतील सर्वांत लहान खंड यूरप खंड आहे. आणि तरी सुद्धां तें श्रेष्ठ आहे. या खंडांतील कितीएक देशांत इतिहासांत मोठे वैभवशाली कालखंड होऊन गेलेले आहेत, हेंही आपण पाहतों. त्या वेळीं या देशामध्यें मोठमोठे शास्त्रज्ञ निर्माण झालेले आहेत; जगांतील अज्ञात वस्तूंचे व प्रदेशांचे शोध लावून आणि नवीन नवीन शास्त्रीय संशोधन करून त्यांनीं मानवी सुसंपन्नतेंत प्रचंड वाढ केली आहे. आणि कोट्यवधि लोकांचें जीवन अधिक सोपें आणि सुखमय केलें आहे. त्यांच्यामध्यें मोठेमोठे ग्रंथकार, तत्त्वज्ञ, चित्रकार, शिल्पी, संगीतज्ञ आणि वीरपुरुषही निर्माण झालेले आहेत. तेव्हां यूरप खंडाचें श्रेष्ठत्व नाकबूल करणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे.

परंतु आशिया खंडाच्या श्रेष्ठत्वाची आठवण विसरणें हेंही तितकेंच मूर्खपणाचें आहे. यूरपच्या झगझगाटानें आपले डोळे दिपल्यासारखे होतात आणि पूर्वकाळाचा आपल्याला विसर पडल्यासारखा होतो. परंतु आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जगांत कोणाहीपेक्षां जास्त किंवा कोठल्याही ठिकाणच्यापेक्षां जास्त ज्यांच्या विचारांचा परिणाम झालेला आहे, असे महान् तत्त्वज्ञ, विचारक्षेत्रांतील नेते, म्हणजेच जगांतील सर्व प्रमुख धर्मांचे संस्थापक, हे जगाला आशिया खंडानें निर्माण करून दिलेले आहेत. जगांतील श्रेष्ठ धर्मांपैकीं सर्वांत प्राचीन असा हिंदु धर्म हा तर स्वाभाविकच हिंदुस्थानांतच निर्माण झाला, त्याचप्रमाणें याच धर्माचें पाठचें भावंड असा महान् बुद्धधर्म, जो आज चीन, जपान, ब्रह्मदेश, तिबेट, सीलोन यांमध्यें सर्वत्र प्रसार पावला आहे, तोही हिंदुस्थानांतच उगम पावलेला आहे. यहुदी लोकांचा धर्म आणि ख्रिती धर्म हेही खरोखर आशियांतील

धर्म आहेत, कारण त्यांचा उगम आशिया खंडाच्या पश्चिम किनाऱ्यावरील पॅलेस्टाइन-मध्यें झालेला आहे. पारशी लोकांचा झोरोआस्ट्रियानिझम्–झरथुष्ट्राचा धर्म–हा तर इराणांतलाच आहे; आणि इस्लाम धर्माचा प्रेषित महंमद पैगंबर याचा जन्म अरबस्तानांत मक्केंत झाला हेंही तुला ठाऊक आहे. कृष्ण, बुद्ध, झरथुष्ट्र, ख्रिस्त, महंमद, चीनचे महान् तत्त्वज्ञ कॉन्फ्यूशियन् व लौचे, अशा तऱ्हेनें आशियांतील या श्रेष्ठ विचारवंतांची यादी तूं लिहूं लागलीस तर पानेंच्या पानें तुला लिहीत बसावें लागेल. आणखीसुद्धां कितीक दृष्टीनें तरी पूर्वीच्या काळीं आपलें हें प्राचीन खंड किती श्रेष्ठ आणि किती जिवंत रसरसलेलें होतें हें मी तुला दाखवूं शकेन.

अर्थात् तो काळ किती बदलून गेलेला आहे! तथापि प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढें सुद्धां काळ आतां पुन्हां एकदां बदलूं लागला आहे. इतिहासांतील बदल हळूहळू होत असतात–शतकेंच्या शतकें त्यांमधें जात असतात. परंतु कधीं कधीं हे बदल अतिशयच वेगानें होऊं लागतात आणि जगताच्या संथ प्रगतींत एकदम स्फोटाचे धक्के बसत असतात. आमचें हें प्राचीन खंड आजपर्यंत दीर्घकालपर्यंत झोंपेंत गुंग होतें. परंतु आतां मात्र कालचक्र आशिया खंडांतही फार वेगानें फिरूं लागलेलें दिसत आहे आणि हें सारें खंड झोंपेंतून जागें होत आहे. साऱ्या जगाचे डोळे आशिया खंडाकडे लागले आहेंत. कारण भविष्यकाळांत आशिया अत्यंत महत्कार्य करणार आहे, याबद्दल प्रत्येकाची खात्री झालेली आहे.

५

प्राचीन संस्कृती आणि आमचा वारसा

९ जानेवारी, १९३१

भारत हें हिंदी वर्तमानपत्र आम्हांला मिळत असतें. त्यांतून बाहेरच्या जगाची कांहीं कांहीं वार्ता आठवड्यांतून दोनदां आम्हांला समजते. त्यामध्यें काल वाचलें, कीं मलाक्का तुरुंगांत तुझ्या आईच्या आजारीपणांतील व्यवस्था नीटशी होत नाहीं, आणखी तिला लखनौच्या तुरुंगांत पाठविण्यांत येणार आहे. हें वाचून मला कांहींसा संताप आला आणि काळजी वाटूं लागली. कदाचित् 'भारत'मध्यें ही जी अफवा म्हणून दिली आहे ती खरीही नसेल. परंतु असा कांहीं प्रकार असावा असा संशय सुद्धां मनाला त्रासदायकच होतो. स्वतःपुरत्या गैरसोयी किंवा दुःख सहन करणें हें पुष्कळच सोपें आहे. त्यामुळें उलटा माणसाचा फायदाच होतो. त्याच्या अभावीं मनुष्य अगदींच हळवा होण्याची भीति असते. परंतु आपल्या प्रिय माणसाला यातना सहन कराव्या

लागतात, ही गोष्ट सहन करणें तितकें सोपें नाहीं किंवा सुखाचें नाहीं; विशेषतः ह्या यातना दूर करावयासाठीं आपण कांहीं करूं शकत नाहीं अशा परिस्थितींत तर ही गोष्ट अधिकच कष्टकारक वाटते. आणि म्हणून 'भारत'मधील बातमी वाचून तुझ्या आईच्या प्रकृतीबद्दल जो संशय उत्पन्न झाला, त्यानें माझ्या मनांत फारच काळजी उत्पन्न झाली. मला ठाऊक आहे, ती मनानें फार धीराची आहे – जणुं सिंहीणच आहे. परंतु तिचें शरीर दुबळें आहे. आणि तें अधिकच दुबळें व्हावें हें कांहीं माझ्या मनाला पटत नाहीं. मनानें पुष्कळ आपण अगदीं बलभीम असलों, तरी शरीरिच जर नाहीं म्हणूं लागलें, तर कोणी झालें तरी काय करणार? आपल्याला जर कांहीं सत्कार्य करायचें असेल तर आपलें शरीर निरोगी, सुदृढ आणि निर्दोष असणें अत्यंत जरूर आहे. तुझ्या आईला लखनौला पाठविणार असले तर एका दृष्टीनें तें बरेंच होईल. तिथें हल्लींच्याहून तिची अधिक चांगली सोय होईल. त्यामुळें तिचें मनही अधिक प्रसन्न राहील आणि लखनौंत तिला कदाचित् बोलाचालायला कोणी तरी सोबतिणी भेटतील. मलाक्का तुरुंगांत मला वाटतें, ती अगदींच एकटी आहे. परंतु तेथें ती असतांना एकपरीनें बरें वाटे; वाटे, आम्ही एकमेकांच्या पुष्कळ जवळ आहों; फार फार तर चारपांच मैलांचें तेवढें अंतर. परंतु किती खुळी कल्पना आहे ही! दोन तुरुंगांच्या उंच भिंती जोंपर्यंत मध्यें उभ्या आहेत, तोंपर्यंत पांच मैल काय किंवा दीडशें मैल काय, दोन्ही एकच!

दादू अलाहाबादला परत आले असून त्यांची प्रकृति आतां बरी आहे हें ऐकून मात्र आज मला किती तरी बरें वाटलें. तुझ्या आईला भेटण्यासाठीं ते मलाक्का तुरुंगांत गेले होते हें ऐकूनही मला फार आनंद झाला. योगायोग असला, तर कोणीं सांगावें तुमची सर्वांची व माझी उद्यांच भेट होईल. कारण उद्यांचा माझा भेटीचा दिवस आहे. आणि तुरुंगांत तर **मुलाकातका दिन** म्हणजे मोठीच पर्वणी असते. दादूंची-माझी आज जवळजवळ दोन महिने भेट नाहीं. त्यांची पण उद्यां भेट होईल आणि स्वतःच्या. डोळ्यांनीं त्यांची प्रकृति सुधारलेली मला पाहायला मिळेल, अशी आशा मी करतों आहें. तुझी-माझी भेट होऊन तर आतां किती तरी मोठा लांबच्च लांब काळ, एक संबंध पंधरवडा होत आला. तूं भेटलीस म्हणजे मला तुझ्या किती तरी हकीकती समजतील, आणि तुझ्या आईच्या पण.

वाहवा! गतकालीन इतिहासाबद्दल तुला थोडें कांहीं लिहावें म्हणून मी बसलों आणि त्याऐवजीं काय या खुळचट गोष्टी लिहितों आहें मी पाहा! तेव्हां आज-कालच्या या गोष्टी घटकाभर विसरूं या आपण, आणि दोन ते तीन हजार वर्षांच्या मागें जाऊं या. माझ्या पूर्वीच्या कांहीं पत्रांत ईजिप्त आणि क्रीट बेटांतील नोसस शहर याबद्दल थोडें मीं तुला लिहिलें आहे. प्राचीन काळच्या मानवी सुधारणांचें बीज या देशांत, त्याचप्रमाणें आज इराक किंवा मेसापोटेमिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांत आणि चीन, हिंदुस्थान, ग्रीस या देशांत रुजलें हेंही मीं तुला सांगितलें आहे.

बाकीच्या देशांपेक्षां ग्रीसमध्यें, तसेंच पाहिलें तर हें बीज थोडें मागाहून रुजलें. तेव्हां कालाच्या दृष्टीनें पाहतां भारतीय सुधारणा ही ईजिप्त, चीन आणि इराक यांमधील सुधारणा-भगिनींशीं समकालीन ठरते. आणि प्राचीन म्हणून गणली जाणारी ग्रीक-सुधारणा ही सुद्धां यांची धाकटी बहीण ठरते. आज सर्व प्राचीन सुधारणांची काय अवस्था आहे? नोसस तर आज अस्तित्वांतच नाहीं. आजकाल नव्हे, तर जवळजवळ गेलीं ३००० वर्षें तें अस्तित्वांतून नाहींसें झालें आहे. त्याच्यामागून आलेल्या ग्रीक-सुधारणेच्या लोकांनीं तेथें जाऊन त्याचा नाश केला. ईजिप्तची संस्कृति हजारों वर्षें मोठ्या वैभवांत नांदली; पण तीही आज नाहींशी झाली आहे; ते प्रचंड पिरामिड, स्फिन्क्सचा स्त्रीमुखी सिंहाचा पुतळा, मोठमोठ्या देवालयांचे पडके अवशेष, ममी, या आणि अशा कांहीं वस्तूंशिवाय ईजिप्तच्या संस्कृतीची खूण म्हणून आज कांहीं शिल्लक नाहीं. अर्थात् ईजिप्त देश पृथ्वीवरून नाहींसा झाला असें नव्हे. तो देश आहे, त्यामध्यें पूर्वींप्रमाणेंच नाइल नदी वाहते आहे, इतर देशांतल्याप्रमाणेंच तेथेंही स्त्रीपुरुष नांदत आहेत. परंतु हे आधुनिक लोक आणि त्या देशांतील प्राचीन संस्कृति यांना सांधणारा असा कोणताच दुवा तेथें शिल्लक नाहीं.

नंतर इराक आणि इराण. किती साम्राज्यें या ठिकाणीं उदयास आलीं आणि एकामागून एक विस्मृतिसागरांत पार कोठच्या कोठें गडप झालीं! बॅबिलोनिया, असीरिया, खाल्डिया हीं त्यांतलीं अगदीं प्राचीनांतील प्राचीन साम्राज्यें, बॅबिलॉन व निनेवे हीं त्यांतील अगदीं प्राचीनांतील प्राचीन मोठीं शहरें. बायबलमधील जुन्या करारांत या काळच्या लोकांबद्दल जागोजागीं उल्लेख आहेत. या प्राचीन देशांत यांच्या-मागून दुसरीं साम्राज्यें उदयास येऊन भरभराटलीं आणि पुढें नष्टही झालीं. अरेबियन नाइट्समधील ती जादूची नगरी म्हणजे बगदाद शहर, हें याच देशामधलें. अर्थात् साम्राज्यें जशीं निर्माण होणार तशीं तीं नष्टही होणार; राजे किंवा महाराजे, कोणी कितीही मोठे बलिष्ठ आणि वैभवशाली झाले, तरी जगाच्या रंगभूमीवर ते कांहीं दिवसच काय ते नांदणार. परंतु संस्कृतीच्या ठिकाणीं त्यापेक्षां पुष्कळ दीर्घकाल टिकण्याचें सामर्थ्य असतें. असें असूनही ईजिप्तमधील प्राचीन संस्कृतीप्रमाणेंच इराक व इराण-मध्येंही प्राचीन संस्कृति अगदीं अजीबात नाहींशी झाली.

ग्रीस देश आपल्या काळीं फारच श्रेष्ठ पदवीला चढलेला होता, यांत तिळमात्र संशय नाहीं; आज सुद्धां त्याच्या वैभवाचीं वर्णनें वाचून माणसाचें मन चकित होतें. त्यामधील ते संगमरवरी पुतळ्यांचें सौंदर्य पाहून आजही आश्चर्यानें आणि आदरानें आपण मूढ होऊन जातों; तसेंच ग्रीसचें जें कांहीं वाङ्मय आपल्याला आज अर्धेमुर्धे उपलब्ध आहे, तें वाचूनसुद्धां मनाला त्यांतील सामर्थ्याबद्दल अचंबा वाटतो आणि मन त्या ग्रंथकारांबद्दल आदरानें नम्र होतें. आधुनिक यूरप हें कितीएक बाबतींत प्राचीन ग्रीसचें अपत्य आहे असें म्हणतात – आणि तें खरेंही आहे, इतका ग्रीक-आचार-विचारांचा यूरपवर खोलवर परिणाम झाला आहे. परंतु ज्या ऐश्वर्यामुळें – तेजामुळें ग्रीसला

ग्रीसपण प्राप्त झालें तें ऐश्वर्य आज कुठें आहे? ती प्राचीन संस्कृति नष्ट होऊन आज कितीक युगें लोटलीं आहेत, ग्रीसमध्यें आज निराळीच प्रवृत्ति, निराळेच रीतिरिवाज चालू आहेत आणि यूरपच्या आग्नेय कोपऱ्यांतला एक छोटासा देश, एवढीच आतां त्याची ओळख जगाला आहे.

ईजिप्त, नोसस, इराक आणि ग्रीस – सारीं विलयास गेलीं आहेत. बॅबिलॉन आणि निनेवेमधील संस्कृतीप्रमाणेंच त्यांच्यामधील संस्कृतीही आज अस्तित्वांत नाहींत. पण त्यांच्यासच तोडीच्या आणखी ज्या दोन संस्कृती होत्या, चीनची एक आणि भारतांतील एक, त्यांचें पुढें काय झालें? इतर देशांतल्याप्रमाणें याही देशांत साम्राज्यामागून साम्राज्यें होऊन गेलीं. त्यांच्यावर कितीक स्वाऱ्या झाल्या आणि तेथें प्रचंड प्रमाणावर नासधूस झाली. शेंकडों वर्षेंपर्यंत कांहीं कांहीं राजवंशांनीं येथें राज्यें केलीं; त्यांना उखडून दुसरेही राजवंश प्रस्थापित झाले. जगांत इतर ठिकाणीं घडले, त्याप्रमाणें चीन आणि हिंदुस्थानमध्यें हे सारे प्रकार घडले आहेत. परंतु हिंदुस्थान आणि चीन यांमध्यें संस्कृतीचा खराखरा अखंडपणा जसा टिकून राहिला आहे, तसा मात्र तो जगांत इतर कोठेंही टिकलेला नाहीं. नाना तऱ्हेचे बदल होत आले; पुष्कळ लढाया आणि स्वाऱ्या झाल्या; तथापि या दोन्ही देशांत त्यांच्या त्यांच्या प्राचीन संस्कृतीचा धागा केव्हांही तुटलेला नाहीं – तो अखंडपणें चालू आहे. हें खरें आहे, कीं त्यांच्या त्या प्राचीन वैभवाला पुष्कळच अवकळा आलेली आहे. त्यांची ती प्राचीन संस्कृति युगानुयुगें सांचत आलेल्या धुळीच्या ढिगांनीं – नव्हे, कोठें कोठें त्या धुळीच्या उकिरड्यांनीं – दडपून जाऊन दिसत नाहींशी झाली आहे. परंतु अजूनही त्या संस्कृती जीव धरून टिकून आहेत आणि आजचें हिंदी जीवनसुद्धां प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पायावरच आधारलेलें आहे. अर्थात् अलीकडे जगांत नवीन परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. आगचोटी व आगगाड्या आणि मोठाले कारखाने यांच्या उदयानें जगाचें सारें स्वरूपच पालटून टाकलेलें आहे. कोणीं सांगावें, त्यामुळें हिंदुस्थानचेंही सर्व स्वरूप बदलून जाईल. नव्हे, तसें होण्याचाच बराच मोठा संभव आहे. तशी थोडी सुरुवातही झालेली आहे. तरीसुद्धां इतिहासकालाच्या उदयापासून अनेक युगायुगांतून थेट आपल्यापर्यंत सतत वाहत आलेल्या भारतीय सुधारणेच्या व संस्कृतीच्या या प्रचंड प्रवाहाचा विचार मन गुंगवून टाकणारा आणि मोठें आश्चर्य उत्पन्न करणारा आहे. एका अर्थीं आपण आजचे भारतीय लोक गेलीं हजारों वर्षें अखंड चालत आलेल्या परंपरेचे वारसदार आहोंत. आपले जे पूर्वज प्राचीन काळीं वायव्य प्रांतामधील पर्वतांच्या रांगांतील घाट ओलांडून आधीं ब्रह्मावर्त, मग आर्यावर्त, नंतर भारतवर्ष आणि आतां हिंदुस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशाच्या सृष्टिदेवीच्या प्रसादानें पुलकित झालेल्या विशाल मैदानांत उतरले, त्यांच्यापर्यंत थेट आमचा वंशावळीचा धागा पोंचण्यासारखा आहे. पर्वतांचीं खिंडारें पायींच ओलांडून खालच्या अज्ञात प्रदेशाकडे हळूहळू येणारी त्यांची ती अखंड रांगच रांग तुझ्या डोळ्यांपुढें नाहीं उभी राहत? ते लोक शूर होते, पराक्रमाची आवड त्यांच्या चित्तांत

मुसमुसत होती; आणि यशापयशाची बिलकुल पर्वा न करतां आगेकूच करण्याची धमक त्यांच्या ठिकाणीं होती. मृत्यु आला तरी त्याचें त्यांना कांहीं वाटत नव्हतें, हंसत हंसत त्याचें स्वागत करायला ते तयार होते. परंतु संसाराची आवड मात्र त्यांना जरूर होती; आणि संसारसुखाचा उपभोग घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे निर्भयवृत्ति ठेवणें, अपयश अथवा हानि याबद्दल मुळींच मन खट्टू होऊं न देणें हाच आहे, हें त्यांनीं चांगलें ओळखलें होतें. त्यांना माहीत होतें, कीं जे निर्भय असतात त्यांच्यापासून अपयश आणि हानि हीं नेहमीं दूर दूरच राहत असतात. क्षणभर तें चित्र डोळ्यांपुढें आण. आपले ते प्राचीन पूर्वज पुढें पुढें मार्ग आक्रमण करीत असतां एकाएकीं जेव्हां समुद्राकडे धों धों, वेगानें वाहत जाणाऱ्या आणि दूरवर पसरलेल्या प्रांताची महाराणीच जणुं अशा दिमाखानें शोभणाऱ्या त्या महान् गंगादेवीच्या तीरावर आले असतील तेव्हां तिच्या दर्शनानें त्यांचीं हृदयें आनंदानें किती भरून गेलीं असतील! अशा तिच्यापुढें जर त्यांनीं डोकें लवविलें असेल, तिला नमस्कार केला असेल आणि आपल्या प्रौढ, संपन्न आणि स्वरमधुर भाषेंत तिचीं त्यांनीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं असतील, तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें असें काय आहे?

अशा या अनंत युगायुगांतील संस्कृतीच्या ठेव्याचा वारसाहक्क आजच्या घटकेला अद्यापिही आपण उपभोगीत आहों, ही मात्र जगांतील एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. अर्थात् यामुळें गर्वानें चढून जाण्याचें मात्र कारण नाहीं. कारण या सर्व प्राचीन काळांतील वारसा आपल्याकडे चालत आला आहे असें म्हटलें, म्हणजे त्यांत चांगल्या-बरोबर वाइटाचाही वारसा आलाच. आणि वारसाहक्कानें प्राप्त झालेल्या आमच्या या मिळकतींत वाइटाचा भाग फारच मोठा आहे; त्याचमुळें जगामध्यें आम्हांला हीन दशा प्राप्त झाली आहे; त्याचमुळें आमच्या या धनधान्यसंपन्न देशाला घोर दारिद्र्य प्राप्त झालें आहे; त्याचमुळें तो इतरांच्या हातचें खेळणें होऊन राहिला आहे. कांहीं हरकत नाहीं. या सर्व वाईट भागाला आपल्या देशांत मुळींच जागा राहूं द्यावयाची नाहीं, असाच आतां आपला निश्चय झालेला नाहीं का?

हेलन लोक

१० जानेवारी, १९३१

आज तुम्ही कोणीच भेटीला आलां नाहीं आणि बिचारा मुलाकातका दिन अगदींच सुना सुना गेला. माझी फार निराशा झाली. त्यांतल्या त्यांत आणखी दादूंची प्रकृति बरी नाहीं हें मुलाखत न होण्याचें कारण म्हणून सांगण्यांत आलें. त्यानें मन

अधिकच कष्टी झालें. अधिक कांहीं तपशील विचारावा तर कांहींच कळेना. पण शेवटीं जेव्हां पक्कें ठरलें, कीं आज आतां कांहीं भेट होणार नाहीं, तेव्हां चरख्यावर जाऊन बसलों आणि थोडेंसें सूत कांतलें. चरख्यावर सूत काढण्यानें आणि नवार विणण्यानें मनाला मोठी गोड शांति प्राप्त होते, असा माझा अनुभव आहे. तात्पर्य, मन संशय-चक्रांत सांपडेल, तेव्हां सूत कांता.

माझ्या मागच्या पत्रांत आपण यूरप आणि आशिया यांची तुलना केली. प्राचीन काळचा यूरप म्हणून ज्याला समजत असतात, त्या प्राचीन यूरपकडे आज थोडा वेळ आपण नजर टाकूं या. पुष्कळ काळपर्यंत भूमध्यसमुद्राच्या आजूबाजूच्या देशांचा मिळूनच जेवढा प्रदेश आहे त्यालाच फक्त यूरप खंड समजत असत. यूरपच्या उत्तरेकडील देशांची त्या काळची कांहीं हकीकत आपणांला उपलब्ध नाहीं. जर्मनी, आणि इंग्लंड, आणि फ्रान्स यांमध्यें रानटी आणि क्रूर लोकांची वसाहत आहे, अशीच त्या काळच्या भूमध्य-समुद्रावरच्या लोकांची समजूत होती. फार काय, पण पहिल्यांदां सुधारणा किंवा संस्कृति ही फक्त भूमध्य-समुद्राच्या पूर्व बाजूच्या भागांतच केंद्रित झालेली होती; असें मानण्यांत येतें. सुधारणेच्या मार्गावर पहिलें पाऊल टाकलें तें ईजिप्त व नोसस यांनीं टाकलें, हें तर तुला ठाऊक आहे. पैकीं ईजिप्त तर यूरपमध्यें नसून आफ्रिकेंत आहे. हळूहळू आर्य लोकांची लाट पश्चिमेकडे पसरूं लागली. त्यांनीं ग्रीसवर आणि आसपासच्या प्रदेशावर स्वारी केली. प्राचीन काळचे ग्रीक म्हणून ज्यांना आपण ओळखतों आणि मान देतों, ते हेच ग्रीक आर्य होत. परंतु त्यांच्या आचारविचारांत कालांतरानें बदल होत जाणें स्वाभाविकच होतें. आणि त्यामुळें हळूहळू आर्यांच्याच या दोन शाखा एकमेकींपासून अधिकाधिक भिन्न होत गेल्या. हिंदुस्थानांत आर्यांच्यावर हिंदुस्थानांतल्या तत्कालीन प्राचीन संस्कृतींचा पुष्कळच मोठा परिणाम झाला. उदाहरणार्थ, द्राविड संस्कृति व हल्लीं मोहेंजेदारोपाशीं जिचे अवशेष आपल्याला आढळतात ती संस्कृति, यांचा. आर्यांनीं आणि द्रविडांनीं परस्परांना दिलेंही पुष्कळ आणि परस्परांपासून घेतलेंही पुष्कळ; अशा रीतीनें दोघांनीं मिळून भारतांत एक संमिश्र संस्कृति निर्माण केली.

त्याच रीतीनें ग्रीक आर्यांच्यावर सुद्धां त्यांच्या काळीं ग्रीक देशामधील घरींदारीं जी नोससची प्राचीन वैभवशाली संस्कृति खेळत होती तिचाही पुष्कळ परिणाम झालेला असला पाहिजे. पण असा परिणाम झाला असला तरी त्यांनीं नोससचा आणि तेथील संस्कृतीच्या बाह्य चिह्नांचा पूर्ण नाश केला आणि त्या छिन्नविच्छिन्न संस्कृतीच्या पायावर त्यांनीं आपली संस्कृति उभी केली. प्राचीन काळचे भारतीय आणि ग्रीक आर्य दोघेही मोठे उग्र आणि जबरे लढवय्ये होते, हें आपण विसरतां उपयोगी नाहीं. तसेंच ते स्वतः अत्यंत चिकट आणि चिवट होते म्हणून त्यांच्याहून अधिक सुधारलेल्या आणि अधिक मृदु अशा ज्या ज्या लोकांशीं त्यांचा संबंध आला, त्यांना त्यांनीं एक तर आपल्यांत एकजीव तरी करून टाकलें किंवा नष्ट तरी करून टाकलें.

अशा रीतीनें ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी १००० वर्षें नोससचा नाश झाला. आणि या नव्या ग्रीकांनीं ग्रीस व त्याभोंवतालचीं बेटें यांवर आपली वसाहत थाटली. समुद्रावरून पुढें आशिया मायनरचा पश्चिम किनारा, दक्षिण इटली, सिसिली आणि थेट फ्रान्सचा दक्षिण भाग येथपर्यंत ते पोंचले. फ्रान्समधील मार्सेल्सची प्रस्थापना त्यांनीं केली. परंतु ते तेथें पोंचण्यापूर्वीच फिनीशियन लोकांनीं तेथें वसाहत केलेली असावी असा संभव वाटतो. फिनीशियन लोक हे आशिया मायनरमधील मोठे दर्यावर्दी लोक होत, हें तुला आठवतच असेल. व्यापारासाठीं हे लोक जगभर लांब लांब सफरी करीत असत. इंग्लंड देश ज्या वेळीं अगदीं रानटी अवस्थेंत होता आणि जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींतून तेथपर्यंत प्रवेश करणें ज्या काळीं मोठेंच संकटाचें असलें पाहिजे, त्या वेळीं इंग्लंडपर्यंत पोंचण्याचीं धमकसुद्धां त्यांनीं दाखविली होती.

ग्रीक-आर्यांच्या आगमनानंतर ग्रीसच्या मुख्य भूमीवर शहरें उदय पावलीं. उदारणार्थ, ॲथेन्स, स्पार्टा, थीब्स आणि कॅरिंथ या ग्रीक लोकांच्या पहिल्या काळच्या वृत्तांताचे दोन पवाडे विख्यात महाकाव्यांत ग्रथित करण्यांत आले आहेत. ईलियड आणि ओडेसी हीं तीं काव्यें. या सुमारास या ग्रीकाना हेलन लोक असें नांव पडलेलें होतें. या काव्यांची थोडीफार माहिती तुला आहे. आपल्याकडचीं महाकाव्यें – रामायण आणि महाभारत – यांच्यासारख्या स्वरूपाचींच हीं काव्यें आहेत. त्यांचा कर्ता होमर नांवाचा अंध कवि होता अशी समजूत आहे. ईलियडमध्यें पॅरिसनें हेलन या सुंदरीला पळवून आपल्या ट्रॉय नगरींत कसें नेलें आणि तिला परत मिळविण्यासाठीं ग्रीक राजे आणि सरदार यांनीं ट्रॉयला वेढा कसा घातला, याची कथा वर्णन केली आहे. ट्रॉयचा वेढा उठल्यानंतर ओडिसस उर्फ यूलिसिस यानें जें देशपर्यटण केलें, त्याची कथा ओडेसीमध्यें वर्णन केली आहे. ट्रॉयची छोटी नगरी आशिया मायनरमध्यें समुद्रकिनाऱ्यापासून आंत जवळच वसलेली होती. आज कांहीं ही नगरी अस्तित्वांत नाहीं. तिचा नाश होऊन कितीएक युगें लोटलीं, पण कविप्रतिभेनें तिला अमर करून ठेवलें आहे.

एकीकडे हे ग्रीक किंवा हेलन लोक झपाट्यानें वाढीस लागून मोठे होऊन अल्पकाळच टिकलेल्या परंतु मोठ्या वैभवशाली अशा आपल्या तारुण्याच्या बहरांत प्रवेश करीत होते, त्याच वेळीं दुसरीकडे आणखी एक सत्ता कोणाच्या लक्षांतही येणार नाहीं अशा रीतीनें उदय पावत होती, ही मोठी लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. याच सत्तेनें पुढें ग्रीसला जिंकलें आणि त्याची सत्ता उखडून तिच्या जागीं आपली सत्ता प्रस्थापित केली. रोमची प्रस्थापना याच सुमारास झाली असें म्हणतात. परंतु तेव्हांपासून कितीएक शतकेंपर्यंत जगाच्या रंगभूमीवर रोमकडून कांहीं विशेष काम व्हावयाचें नव्हतें. तथापि, ज्या नगरीचा यूरपीय जगतावर पुढें शतकानुशतकें पगडा बसावयचा होता, जिला सर्व जगताची सम्राज्ञी, आणि 'अमरपुरी' अशीं नांवें प्राप्त व्हावयाचीं होतीं, त्या रोम नगरीचा उदय ग्रीकांच्या ऐन भरभराटीच्या काळांतच झाला होता, ही गोष्ट


पाश्चिम आशियाखंड
व
आग्नेय युरोपखंड
द्वीपकल्पीय भूप्रदेश
हिंदुस्थान
इराण
तिबेट
पूर्व
पश्चिम
मध्य
दक्षिण
ब्रह्मदेश
सयाम
मलाया
द्वीपसमूह

नमूद करण्यासारखी आहे. रोमच्या स्थापनेबद्दलच्या गोष्टी मोठ्या अजब आहेत. त्याची संस्थापना करणारे रेमस आणि सेम्युलस म्हणे एका लांडगीनें पळवून नेऊन वाळगिले होते! ही गोष्ट बहुतेक तुला माहीत असेल.

रोमची स्थापना झाली त्या वेळीं किंवा त्याच्याआधीं कांहीं काळ प्राचीन काळच्या आणखी एका शहराची स्थापना झाली. तें म्हणजे कार्थेज. फिनीशियन लोकांनीं हें शहर आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर वसविलें. तें एक मोठें दर्यावर्दी सत्तेचें केंद्र म्हणून प्रसिद्धीस आलें आणि त्याच्यामध्यें आणि रोममध्यें अत्यंत कडु चुरस उत्पन्न होऊन अनेक लढाया झाल्या. शेवटीं रोमचा विजय झाला आणि त्यानें कार्थेज पार जमीनदोस्त करून टाकलें.

आजची हकीकत संपण्यापूर्वी आपण एकदां पॅलेस्टाइनवर नजर टाकूं या. पॅलेस्टाइन अर्थातच यूरपमध्यें नाहीं; आणि त्याला फारसें ऐतिहासिक महत्त्वही नाहीं. परंतु त्याचा इतिहास जुन्या करारांत दिला आहे, म्हणून त्याच्या प्राचीन इतिहासाचें कितीएक मंडळींना कौतुक वाटतें. हा इतिहास म्हणजे त्या भागांत राहणाऱ्या ज्यूंच्या कांहीं टोळ्या आणि त्यांच्या आपल्या मोठमोठ्या शेजारी सत्तांशीं, बॅबिलोनिया, ॲसीरिया आणि ईजिप्त यांच्याशीं झालेल्या कटकटी यांचा वृत्तांत आहे. हा वृत्तांत ज्यूंचा धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांचें एक अंग जर समजला गेला नसता, तर त्याची माहिती आज क्वचितच कोणाला असती.

नोससचा नाश करण्यांत आला, त्या वेळीं पॅलेस्टाइनमध्यें इझराएल विभागांत सॉल नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानंतर डेव्हिड (याचा उच्चार दाविद किंवा कोठें कोठें दाऊद असाही करतात) हा राजा झाला. त्याच्यामागून सालोमन; हा सालोमन मोठा ज्ञानी होता अशी त्याची ख्याति आहे. हीं नांवें मी येथें सांगतों यांचें कारण एवढेंच, कीं केव्हां केव्हां तुझ्या कानावर तीं आलेलीं असतील किंवा तूं कोठें कोठें तीं वाचलेलीं असतील.

ग्रीक नगर-राज्यें

११ जानेवारी, १९३१

माझ्या गेल्या पत्रांत मीं तुला ग्रीक म्हणजेच हेलन लोकांविषयीं थोडी माहिती सांगितली. हे लोक होते तरी कशा प्रकारचे याची थोडी चांगली कल्पना यावी, यासाठीं आणखी एकदां आपण त्यांच्याच इतिहासावर थोडी नजर टाकूं या. ज्या वस्तू किंवा जे लोक आपण प्रत्यक्ष पाहिलेले नसतात, अशांच्याबद्दल अगदीं यथातथ्य आणि

बिनचूक कल्पना करणें आपल्याला फार कठिण पडतें. आपली सभोंवतालची परिस्थिति आणि रोजचे व्यवहार यांची आपल्यावर इतकी छाप पडलेली असते, कीं त्याहून सर्वतोपरि निराळ्या अशा जगाची नीटशी कल्पनाच आपल्याला करतां येत नाहीं. आणि खरी गोष्ट अशी आहे, कीं प्राचीन जग – मग तें हिंदुस्थानांतलें असो कीं चीनमधलें असो, किंवा ग्रीसमधलें असो – हें हल्लींच्या जगाहून सर्वच दृष्टींनीं अगदींच निराळें होतें. तेव्हां त्या काळचे लोक कशा प्रकारचे असतील याबद्दल त्यांचेच जे कांहीं ग्रंथ, किंवा बांधकामें किंवा इतर अवशेष आपल्याला उपलब्ध आहेत, त्यावरून कांहीं तर्क करून पाहणें एवढेंच फक्त आपल्याला शक्य आहे.

ग्रीकांच्याविषयींची एक गोष्ट विशेष लक्षांत येण्यासारखी आहे. असें दिसतें, कीं या ग्रीक लोकांना मोठमोठ्या राज्यांचा किंवा साम्राज्यांचा लोभ नव्हता. त्यांना छोटीं छोटीं नगर-राज्यें च आवडत – म्हणजे काय, तर प्रत्येक शहर म्हणजे एक स्वतंत्र राज्यच ते मानीत. मध्यभागीं शहर व त्याच्या आजूबाजूचा शहराला अन्नाचा पुरवठा करणारा शेतींचा प्रदेश एवढ्याचें मिळून एक राज्य, अशीं त्यांचीं छोटीं छोटीं लोकसत्ताक राज्यें असत. लोकसत्ताक राज्य म्हणजे तेथें राजा नसावयाचा हें माहीतच आहे तुला. या ग्रीक नगरराज्यांमध्येंही राजा नसे; त्यांचा कारभार त्यामधील श्रीमंत नागारिक चालवीत. त्यामध्यें सामान्य मनुष्याला राज्यव्यवस्थेसंबंधीं कांहीं बोलण्या-करण्याचा हक्क जवळजवळ मुळींच नसे. त्यांच्यामध्यें गुलामांची पुष्कळच संख्या होती. या गुलामांना राज्यव्यवस्थेंत कांहींच अधिकार नव्हते. त्याचप्रमाणें स्त्रियांनाही असे कांहीं अधिकार नव्हते. तात्पर्य, या नगर-राज्यांतील लोकांपैकीं कांहीं थोड्या लोकांनाच फक्त नागरिकत्वाचे हक्क असत; आणि त्यांनाच सार्वजनिक प्रश्नाबाबत मत देतां येई. हे सर्व नागरिक मतदार सहज एका ठिकाणीं जमा होऊं शकत असत. त्यामुळें त्यांना कोणत्याही गोष्टीवर मत देणें अगदींच सोपें पडत असे. त्या ठिकाणीं एकाच राज्याच्या आधिपत्याखालीं भला मोठा भूप्रदेश नव्हता; तर प्रत्येक छोटें नगर-राज्य स्वतंत्र होतें यामुळेंच ही गोष्ट त्या ठिकाणीं शक्य होती. अशा रीतीनें सगळ्या हिंदुस्थानांतील मतदार – फार कशाला, फक्त बंगाल किंवा आग्रा यासारख्या एखाद्याच प्रांतांतील सुद्धां मतदार – सगळेच एकत्र जमा करावयाचे म्हटलें तर कसें काय होईल, याची तूं कल्पना कर. कांहीं करूं म्हटलें, तरी ती गोष्ट स्वभावतःच शक्य नाहीं. इतर देशांमध्यें पुढच्या काळांत हीच अडचण दत्त म्हणून उभी राहिली आणि म्हणूनच 'प्रातिनिधिक राज्यव्यवस्थे'चा तोडगा तिच्यावर शोधून काढण्यांत आला. प्रतिनिधिक राज्यव्यवस्था म्हणजे काय, तर देशांतील साऱ्या मतदारांनीं कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करण्यासाठीं एकत्र न येतां आपले प्रतिनिधि निवडावयाचे. या प्रतिनिधींनीं एकत्र जमून देशांतील सार्वजनिक बाबींची चर्चा करावयाची आणि समाजासाठीं कायदे करावयाचे. अशा रीतीनें प्रत्येक सामान्य मतदाराला आपल्या देशाच्या राज्यकारभारांत अप्रत्यक्ष रीतीनें भाग घेतां येतो, अशी समजूत आहे.

पण या प्रकाराचा ग्रीसशीं कांहीं संबंध नाहीं. ग्रीसनें या अडचणीवर निराळाच तोडगा शोधून काढला. छोट्याशा नगरराज्यांहून विस्तृत अशीं राज्येंच निर्माण करावयाचीं नाहींत असें तेथें ठरविण्यांत आलें. मीं तुला सांगितलेंच आहे, कीं ग्रीकांचा एकूण राज्यविस्तार कांहीं थोडा नव्हता. सारा ग्रीस देश, दक्षिण इटली, सिसिली, भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्याचे इतरही भाग येथपर्यंत हें राज्य पसरलेलें होतें. परंतु आपल्या ताब्यांतील या सर्व भिन्न भिन्न प्रदेशांवर एक साम्राज्य किंवा एक मध्यवर्ती राज्यसत्ता निर्माण करण्याचा ग्रीकांनीं प्रयत्नच केला नाहीं. तर जेथें जेथें ते गेले, तेथें तेथें त्यांनीं स्थानिक स्वतंत्र नगर-राज्येंच स्थापन केलीं.

हिंदुस्थानांतही प्राचीन काळीं कांहींशीं या ग्रीक नगर राज्यांसारखींच छोटीं छोटीं लोकराज्यें किंवा राजशाह्या होत्या असें तुला आढळून येईल. पण त्यांचें तें तसें स्वरूप म्हणावें असें फार काळ टिकलें नाहीं. लौकरच तीं जास्त जास्त विस्तृत अशा राजशाह्यांमध्यें समाविष्ट झालीं. तथापि, त्याहून पुष्कळ दीर्घकाळपर्यंत आमच्या ग्रामपंचायतींच्या हातीं मात्र अशा प्रकारची बरीच मोठी सत्ता टिकून राहिली होती. प्राचीन आर्यांचीही अगदीं पहिली ऊर्मि, जेथें जेथें जावें तेथें तेथें छोटीं नगरराज्यें प्रस्थापित करावयाचीं, अशीच बहुधा असावी. परंतु भौगोलिक परिस्थितीमुळें आणि स्थानिक प्राचीन संस्कृतीशीं आलेल्या संबंधामुळें त्यांनीं व्यापलेल्या पुष्कळशा प्रदेशांत हळूहळू पुढें त्यांना ही कल्पना सोडून द्यावी लागली असली पाहिजे. विशेषतः इराण-मध्यें मोठमोठीं राज्यें आणि साम्राज्यें उदयास आल्याचें आपणांस आढळतें; हिंदुस्थानांतही मोठमोठीं राज्यें प्रस्थापित होण्याकडेच कल आढळून येतो. परंतु फार दीर्घकाळपर्यंत, इतिहासामध्यें विख्यात अशा एका ग्रीक गृहस्थानें आपल्या कल्पनेप्रमाणें सारें जग जिंकण्याचा पहिला प्रयत्न केला तोंपर्यंत, ग्रीसमध्यें मात्र नगर-राज्येंच चालू होतीं. हा जग जिंकण्याचा प्रयत्न करणारा ग्रीक गृहस्थ म्हणते अलेक्झांडर-दी-ग्रेट अथवा शिकंदर बादशहा. त्याच्याबद्दल पुढें आपल्याला थोडेंफार बोलावयाचें आहे.

तात्पर्य काय, कीं आपलीं सर्व नगर-राज्यें एकत्र आणून त्यांचें एक मोठें मध्य-वर्ती सरकार, राजशाही किंवा लोकराज्य स्थापन करण्याचा मार्ग ग्रीकांनीं पत्करला नाहीं. आपलीं हीं नगर-राज्यें त्यांनीं निरनिराळीं आणि स्वतंत्र ठेवलीं. एवढेंच नव्हे, तर त्यांच्यामध्यें जवळजवळ नित्य परस्परांशीं प्रचंड स्पर्धा असे आणि त्यामधून वारंवार युद्धेंही उत्पन्न होत.

असें होतें तरी सुद्धां या सर्व नगरराज्यांना एकत्र बांधणारे असे अनेक दुवे होते. त्यांची भाषा एक होती; त्यांची संस्कृति एक होती आणि त्यांचा धर्म एक होता. त्यांच्या धर्मांत पुष्कळ देवदेवता होत्या आणि आपल्या प्राचीन भारतीय पुराण-कथांप्रमाणें त्यांच्यामध्येंही प्रगल्भ, रसाळ आणि सुंदर पुराणकथा होत्या. ग्रीक लोक सौंदर्योपासक होते. आजही त्यांच्या काळचे कांहीं संगमरवरी किंवा साध्या दगडाचे पुतळे उपलब्ध आहेत. आणि त्यांच्या ठिकाणचें सौंदर्य खरोखरच आश्चर्यानें मन मुग्ध

करून टाकणारें आहे. शरीर निरोगी आणि सुंदर असावें अशी त्यांना मोठी आवड होती. आणि त्यासाठीं अनेक खेळ आणि शर्यती यांची त्यांनीं योजना केली होती. ग्रीसमधील ऑलिंपिया नगरींत वेळोवेळीं हे खेळ फार मोठ्या प्रमाणावर करून दाखविण्यांत येत आणि साऱ्या ग्रीसमधील लोक ते पाहण्यासाठीं तेथें जमत. हल्लींसुद्धां ऑलिंपिक सामने म्हणून खेळ होत असतात हें तूं ऐकलें असशील. ऑलिंपियामधील प्राचीन ग्रीक सामन्यांवरूनच हें नांव घेतलेलें आहे आणि भिन्न भिन्न देशांतील खेळाडूंच्या सांघिक किंवा वैयक्तिक सामन्यांना उद्देशून या नांवाचा उपयोग केला जातो.

अशा रीतीनें हीं ग्रीक नगर-राज्यें स्वतंत्रपणें नांदत असत. सामन्यांच्या निमित्तानें तीं एकत्र येत; किंवा वारंवार त्यांच्यामध्यें परस्परांशीं लढायाही होत. परंतु बाहेरून जेव्हां परकीयांचें एक मोठें संकट प्राप्त झालें, तेव्हां मात्र हीं सर्व राज्यें एकत्र झालीं व त्या संकटाचा त्यांनीं प्रतिकार केला. हें संकट म्हणजे इराणची ग्रीसवर स्वारी. त्याबद्दलही पुढें आपल्याला थोडेंसें बोललें पाहिजे.

८

पश्चिम आशियांतील साम्राज्यें

१३ जानेवारी, १९३१

काल तुमची सर्वांची भेट झाली त्यामुळें फार बरें वाटलें. परंतु दादूंना पाहून मात्र मला धक्काच बसला! किती आजारी आणि अशक्त झाले आहेत ते! त्यांची चांगली काळजी घ्या बरं का. लौकरच ते पुन्हां चांगले धट्टेकट्टे आणि पाहिल्यासारखे हुशार झाले पाहिजेत. काल तुझ्याशीं धड बोलायलासुद्धां झालें नाहीं मला. एवढ्याशा छोट्या भेटींत मनुष्य काय काय करणार? ज्या भेटी व्हाव्याशा वाटतात पण होत नाहींत, जीं संभाषणें करावींशीं वाटतात परंतु करतां येत नाहींत, त्या साऱ्यांची भरपाई करण्यासाठीं तर हें पत्र लिहिण्याचें तंत्र मीं काढलें आहे. पण या पत्रांनीं का कोठें खऱ्या भेटींची आणि संभाषणांची उणीव भरून निघणार आहे? असें हें सोंग किती वेळ पुरें पडणार? परंतु अशा सोंगानें सुद्धां कांहीं कांहीं वेळां मनाचें समाधान होतें थोडें थोडें.

तेव्हां पुन्हां आपण प्राचीन लोकांकडे जाऊं या. नुकतेच आपण प्राचीन ग्रीकांकडे जाऊन आलों. त्याच काळांत इतर देशांची हालहवाल कशा प्रकारची होती? यूरपच्या त्या काळांत इतर देशांच्या भानगडींत पडण्याचें आपल्याला कांहीं कारण नाहीं. त्यांच्याबद्दल विशेष लक्षांत ठेवण्यासारखी फारशी माहितीच आपणांस नाहीं – निदान मला तरी नाहीं. बहुधा उत्तर यूरपचें हवामान एकसारखें बदलत

होतें आणि त्यामुळें तेथें नवी नवी परिस्थिति निर्माण होत होती. तुला आठवत असेल, कीं फार फार प्राचीन काळीं यूरपचा सर्व उत्तर भाग व आशियाचा सर्व उत्तर भाग यांमध्यें अतिशय थंडी होती. या काळाला हिमयुग म्हणत; आणि बर्फाचे प्रचंड खडक – हिमखंड – हळूहळू घसरत घसरत थेट मध्य यूरपपर्यंत येत. त्या वेळीं तेथें मनुष्याची वस्तीच बहुधा नसावी; आणि असलीच तर त्या काळच्या मनुष्याला मनुष्य म्हणण्यापेक्षां पशूच म्हणणें अधिक शोभलें असतें. तूं म्हणशील, त्या काळीं बर्फाचे खडक घसरत खालीं येत होते हें आज तुम्हांला कसें हो सांगतां येतें? त्या वेळीं तर कोणी ग्रंथकार नव्हते किंवा ग्रंथही नव्हते. तेव्हां त्याबद्दलचा त्या काळीं लिहून ठेवलेला असा कांहीं वृत्तांत थोडाच सांपडण्यासारखा आहे? परंतु सृष्टीच्या ग्रंथाशीं झालेली तुझी ओळख तूं सगळीच विसरून गेलेली नसशील, असें मला वाटतें. सृष्टीला सुद्धां आपला स्वतःचा इतिहास आपल्या खडकांवर आणि दगडांमध्यें लिहून ठेवण्याची कला अवगत आहे. एक प्रकारचें तिचें तें आत्मचरित्रच आहे. आतां हे घसरणारे बर्फाचे खडकच घ्या ना – आपल्या अस्तित्वाचीं अगदीं खास अशीं चिह्नें ते मागें ठेवीत असतात. एकदां हीं चिह्नें ओळखण्याची कला साधली म्हणजे पाहतां क्षणीं दिसून येऊं लागतें, कीं ही घसरत्या हिमखंडांची खूण आहे म्हणून. या चिह्नांचा अभ्यास करायला कांहीं फार दूरचा प्रवास करायला नको. हल्लींही हिमालयांत किंवा आल्प्स पर्वतावर किंवा इतरही ठिकाणीं असे घसरते हिमखंड आढळतात. तेथें गेलें म्हणजे झालें. आल्प्समधील माँट ब्लॉकच्या आसपासचे असले हिमखंड तूं स्वतः पाहिलेलेही आहेस; पण ते मागें ठेवीत असलेल्या या खास खुणांबद्दल तुला त्या वेळीं कोणीं सांगितलें नसावें. काश्मीरमध्यें किंवा हिमालयांत इतरही ठिकाणीं मोठे सुंदर घसरते हिमखंड आढळतात. आपल्याला अगदीं जवळांत जवळ म्हणजे गढवाल भागांतील पिंडर नदीच्या खोऱ्यांतील हिमौघ होय. आल्मोऱ्यापासून तेथें चालत जायला फक्त एक आठवडा लागतो. लहानपणीं एकदां मी तेथें गेलों होतों. तुझ्यापेक्षांही त्या वेळीं मी लहान होतों. परंतु मला त्याची अजून चांगली आठवण आहे. त्या वेळचें तें चित्र अजून जसेंच्या तसें माझ्या डोळ्यांपुढें उभें आहे.

पण प्राचीन काळचा इतिहास सोडून हा पहा मी घसरते हिमखंड आणि पिंडारी यांच्याकडे वाहवलों आहें. भेट आणि संभाषण यांचें सोंग आणण्याचा प्रयत्न करतों आहें ना मी, त्याचा हा परिणाम! जणुं कांहीं तूं माझ्याजवळच बसली आहेस आणि मी तुझ्याशींच बोलतों आहें अशी मला माझ्या मनाची समजूत करून द्यायची आहे. त्यामुळें मधून मधून हे हिमौघ किंवा अशाच कांहीं गोष्टी यांच्याकडे आपल्याला थोडा वेळ फेरफटके करावे लागणारच.

हिमयुगाचा मीं उल्लेख केला आणि त्यावरून आपण या हिमौघाच्या चर्चेंत शिरलों. मध्य यूरपपर्यंत आणि इंग्लंडपर्यंतही असे घसरते बर्फाचे ओघ येऊन पोंचले होते असें आपणांस म्हणतां येईल. कारण त्यांसंबंधींच्या त्या विशिष्ट खुणा या

प्रदेशांमधून सांपडतात. या खुणा प्राचीन खडकांमधून आहेत आणि त्यावरून असें मानावें लागतें, कीं त्या काळीं सबंध मध्य यूरपांत व उत्तर यूरपांत अत्यंत थंडी असली पाहिजे. पुढें पुढें तेथें उष्णता वाढली व हे हिमौघ वितळूं लागले. भूगर्भशास्त्रज्ञ — पृथ्वीच्या इतिहासाचा अभ्यास करणारे लोक — सांगतात, कीं प्रथमतः या ठिकाणीं अत्यंत थंडीचा कडाका होता आणि त्यापाठीमागून तेथें कांहीं काळ अत्यंत उष्णतेचा भडका उडाला. या उष्णतेच्या परिणामामुळें यूरपमध्यें दाट अरण्यें उत्पन्न झालीं.

आर्य लोक भ्रमण करीत करीत मध्य यूरपपर्यंतही पोंचले होते. पण या काळीं त्या ठिकाणीं आर्यांनीं विशेष डोळ्यांत भरण्याजोगे असे कांहींच पराक्रम केलेले आढळत नाहींत. तेव्हां त्यांच्याकडे क्षणभर आपण दुर्लक्ष करूं या. ग्रीस आणि भूमध्यसमुद्रावरचे लोक मध्य यूरप आणि उत्तर यूरपमधील या राहिवाशांना बर्बर म्हणजे रानटी म्हणून हीन लेखीत असत. पण रानटी म्हणून समजल्या जाणाऱ्या या लोकांचें जीवन जंगलांत व लहान लहान झोंपड्यांत राहिल्यामुळें आरोग्यसंपन्न होतें. तसाच त्यांच्या ठिकाणीं लढवय्येपणा आलेला होता. हळूहळू स्वतःला नकळतच दक्षिणेकडील अधिक सुधारलेल्या लोकांच्या राज्यसत्तांवर लोंढ्याप्रमाणें चालून जाऊन त्यांना उध्वस्त करण्याच्या भविष्यकाळांतील दिवसाची त्यांची तेथें तयारी होत होती. पण हा सारा प्रकार फारच पुढच्या काळांत घडलेला आहे. त्याची चर्चा आतांच कशाला ?

उत्तर यूरपबद्दलची आपली माहिती अगदींच तुटपुंजी आहे असें आपण म्हणतों. पण जगांतील इतर मोठमोठ्या खंडांविषयीं किंवा विशाल प्रदेशांविषयीं आपल्याला तिळमात्र सुद्धां माहिती नाहीं. अमेरिका खंड कोलंबसनें शोधून काढलें असें म्हणतात पण त्याचा अर्थ कोलंबस तेथें जाण्यापूर्वीं त्या ठिकाणीं सुधारलेल्या माणसांची वस्तीच नव्हती असें नव्हे, असें आतां आढळून येऊं लागलें आहे. परंतु प्राचीन ग्रीस किंवा तत्पूर्वीच्या ज्या काळांबद्दल आपण विचार करतों आहों, त्या काळच्या अमेरिकेसंबंधीं मात्र आज आपणांस कांहीं माहिती नाहीं, ही गोष्ट कांहीं म्हटलें तरी खरी आहे. ईजिप्त तेवढा वगळला, तर आफ्रिका खंडाबद्दलही आपल्याला अशीच कांहीं माहिती नाहीं. तशीच भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरील प्रदेशासंबंधीही.

या सुमारास आशिया खंडांत काय चाललें होतें हें आतां आपल्याला पहावयाचें आहे. या खंडांत संस्कृतीचीं तीन केंद्रें होतीं, हें तूं पाहिलें आहेस. मेसापोटेमिया, भारतवर्ष आणि चीन हीं तीं केंद्रें होत.

मेसापोटेमिया, इराण आणि आशिया मायनर या विभागांत त्या अत्यंत प्राचीन काळींसुद्धां साम्राज्यामागून साम्राज्यें आलीं आणि गेलीं. पहिलें असीरियाचें किंवा असुर-राज्य. नंतर मीडियन (म्हणजे अमदाई लोकांचें राज्य — यांतील पुरोहितवर्गाला मग म्हणत) व नंतर बॉबिलोनचें साम्राज्य. आणि त्यानंतर बऱ्याच पुढच्या काळांत इराणचें साम्राज्य. या साम्राज्यांचीं परस्परांशीं कशा प्रकारें युद्धें झालीं, कांहीं काळ शेजारीं

शेजारीं राहून तीं शांतपणें कशीं नांदलीं किंवा त्यांनीं एकमेकांचा कसा नाश केला, हें पाहत बसण्याची आपल्याला गरज नाहीं. ग्रीक नगर-राज्यें आणि पश्चिम आशियामधील हीं साम्राज्यें यांच्यामधील फरक मात्र तूं लक्षांत ठेवणें जरूर आहे. पश्चिम आशियांतल्या या देशांत अगदीं प्राचीन काळापासून मोठमोठीं राज्यें किंवा साम्राज्यें स्थापण्याचें जणुं वेडच होतें असें दिसतें. कदाचित् त्यांची संस्कृति निर्माण होऊन बराच काळ लोटलेला होता हें त्याचें कारण असावें, किंवा आणखी कांहीं निराळीं कारणें असावीं.

या काळचें एक नांव तुझ्या विशेष मनांत भरण्यासारखें आहे. तें म्हणजे क्रीसस. तुझ्या वाचनांत हें नांव आलें असेल. 'क्रीससप्रमाणें संपत्तिमान्' अशी इंग्रजी भाषेंत प्रख्यात म्हणच झालेली आहे. हा क्रीसस किती संपन्न होता, कसा गर्वानें चढलेला होता आणि पुढें त्याचें गर्वहरण कसें झालें, याच्या हकीकती तूं वाचलेल्या असतील. आशियाच्या पश्चिम किनाऱ्यावर आज जेथें आशिया मायनर आहे, तेथें पूर्वी लिडिया नांवाचा देश होता. त्याचा हा क्रीसस राजा होता. हा प्रदेश समुद्रकिनाऱ्यावर असल्यामुळें तेथें बहुधा पुष्कळ व्यापार होत असावा. क्रीससच्या काळींच सायरसच्या नेतृत्वाखालीं इराणचें साम्राज्य वाढीला लागून प्रबळ होऊं लागलें होतें. क्रीसस आणि सायरस यांच्यामध्यें वितुष्ट येऊन युद्ध झालें. त्यांत सायरसनें क्रीससचा पराभव केला. त्याच्या या पराजयाचा वृत्तांत ग्रीक इतिहासकार हिराडोटस यानें लिहून ठेवला आहे; आणि त्याच्या या दोऱ्याच्या काळांत क्रीससची सद्बुद्धि जागृत होऊन त्याला ज्ञान कसें प्राप्त झालें, याचें त्यानें वर्णन केलें आहे.

सायरसचें साम्राज्य प्रचंड असून पूर्वेकडे तें जवळजवळ हिंदुस्थानपर्यंत पसरलें होतें. परंतु त्याच्याच वंशांतील जो दारियस त्याचें साम्राज्य याहूनही अधिक विशाल होतें. सबंध ईजिप्त, मध्य आशियाचा कांहीं भाग आणि सिंधु नदीच्यालगतचा हिंदुस्थानचा प्रत्यक्ष कांहीं भाग त्याच्या साम्राज्यांत सामील होता. हिंदुस्थानच्या त्याच्या ताब्यांतील या प्रांतांतून खंडणी म्हणून सोन्याचा रवा फारच मोठ्या प्रमाणांत पाठविण्यांत येत असे असें म्हणतात. आज कांहीं अशी सोन्याची माती त्या प्रांतांत सांपडत नाहीं; बहुतेक हा सारा प्रदेश आज निव्वळ वालुकामय, ओसाड प्रदेश मात्र आहे. यावरून हवामानामध्यें केवढा बदल झाला असला पाहिजे हें दिसून येण्यासारखें आहे.

तूं जसजशी इतिहास वाचूं लागशील, प्राचीन काळच्या परिस्थितीची आधुनिक काळच्या परिस्थितीशीं तुलना करूं लागशील, तसतशी जी एक गोष्ट तुझ्या चित्ताची विशेष पकड घेईल, ती म्हणजे मध्य आशियामध्यें घडून आलेला बदल. याच देशांतून असंख्य टोळ्या आणि स्त्रीपुरुषसमुदाय बाहेर पडले आणि लांब लांबच्या खंडांपर्यंत जाऊन ते पसरले. याच प्रदेशांत प्राचीन काळचीं प्रचंड आणि प्रबल शहरें होतीं. हीं शहरें एवढीं प्रचंड, इतकीं संपन्न, आणि लोकसंख्येच्या दृष्टीनें एवढीं मोठीं होतीं, कीं त्यांच्यापुढें फक्त आजच्या यूरप खंडांतील मोठमोठ्या राजधान्यांचीच काय ती तुलना करतां येईल. आमचीं कलकत्ता आणि मुंबई शहरें हीं त्यांच्यापेक्षां किती तरी लहान! या साऱ्या

प्रदेशांत जिकडे तिकडे उद्यानें आणि सस्यश्यामल भूमि (गोड हिरवळ) पसरलेली होती आणि हवाही फार उष्णही नाहीं फार थंडही नाहीं अशी आणि मोठी सुखकारक होती. हें असें सर्व एकदां होतें. आणि आतां कितीएक शतकें हा प्रदेश साफ उजाड झाला आहे. तेथें कसलींही जीवनसाधनें उरलीं नाहींत. जणुं निर्मनुष्य वैराण मैदान असा तो प्रदेश बनला आहे. प्राचीन काळचीं त्यांमधील समरकंद, बुखारा, यांसारखीं कांहीं शहरें अजून कशींबशीं जीव धरून आहेत; पण त्यांच्या ठिकाणीं त्यांच्या पूर्ववैभवाचा रतिमात्र सुद्धां अंश उरलेला नाहीं. त्या वैभवाचीं आपल्या नांवानें स्मृति मात्र उत्पन्न करणारीं त्या शहरांचीं जणुं पिशाचेंच हीं शहरें आज झालीं आहेत !

परंतु हा सारा पुढचा इतिहास मी पुन्हां तुला सांगूं लागलों. ज्या प्राचीन काळचा आपण विचार करतों आहों, त्या काळीं समरकंद शहरही नव्हतें किंवा बुखारा शहरही नव्हतें. हें सगळें अजून पुढें व्हावयाचें होतें. अद्याप त्यावर भविष्यकाळचा पडदा पडलेला होता आणि मध्य आशियाचें वैभव व ऱ्हास घडून येण्याला अद्यापि पुष्कळच अवकाश होता.

९

जुन्या परंपरेचें ओझें

१४ जानेवारी, १९४२

तुरुंगामध्यें मला कांहीं कांहीं विचित्र संवयी जडल्या आहेत. त्यांतली एक संवय म्हणजे फार लौकर, अरुणोदयाच्यासुद्धां अगोदर निजून उठण्याची. एकीकडे अरुणोदय होऊं लागावा आणि दुसरीकडे चांदण्यांचें तेज मावळत जात असावें या दृश्यानें माझें मन मोहून गेलें आणि त्या मोहामुळें गेल्या उन्हाळ्यांत हा क्रम सुरू झाला. अरुणोदयाच्या पूर्वीचें चांदणें आणि तें विरत जाऊन त्याचें प्रातःकालच्या प्रकाशामध्यें होणारें परिवर्तन हें या संधिकालांतील मधुर दृश्य तूं कधीं पाहिलें आहेस का? अरुणोदय आणि चंद्रप्रकाश यांच्यामधील ही झटापट मी अनेकदां पाहत आलों आहें; त्यांत नेहमीं उषेचा जय व्हायचा हें ठरलेलें आहे. त्या वेळच्या त्या विलक्षण, कांहींशा उदासवाण्या आणि मंदधूसर प्रकाशांत, कांहीं काळपर्यंत हें चांदणें आहे कीं उगवत्या दिवसाचा तो प्रकाश आहे हेंच सांगणें कठिण पडतें. पण मग पाहतां पाहतां एकदम 'अरे, हा तर दिवसाचाच प्रकार' असें होऊन त्याबद्दल कांहींच शंका राहत नाहीं आणि लढाईंत पराजय झाल्यामुळें मंदतेज झालेला चंद्र रणक्षेत्रांतून माघार घेतो.

या संवयीप्रमाणें आजही मी लौकर उठलों होतों. आकाशांत तारका अजून

चमकत होत्या. उषःकालापूर्वी सर्व वातावरणामध्येंच कांहीं तरी अवर्णनीय असा भास होऊं लागतो. त्यावरूनच काय ती आतां लौकरच उजाडणार आहे असें मानायला जागा होती. वाचीत बसलों होतों मी त्या वेळीं. तींच पहांटेच्या त्या प्रशांततेचा, लांबून ऐकूं येणारे प्रतिक्षणीं वाढते आवाज आणि गर्दीची सळसळ यांमुळें भंग झाला. माझ्या लक्षांत आलें, कीं आज संक्रांतीचा दिवस. माघ-मेळ्याचा आरंभाचा आजचा पर्वणीचा दिवस. तेव्हां गंगा, यमुना आणि लोकांच्या समजुतीप्रमाणें अदृश्य अशी सरस्वती या तिघींचाही ज्या ठिकाणीं संगम होतो, त्या ठिकाणीं त्रिवेणी-संगमावर प्रातःस्नान करण्यासाठीं हे हजारों यात्रेकरू जात असले पाहिजेत. जातां जातां ते भजन करीत होते आणि मधून मधून 'गंगामाई की जय' असा गंगेचा जयघोष करीत होते. नैनीच्या तुरुंगाच्या भिंतीपलीकडूनसुद्धां त्यांचा आवाज माझ्या कानांवर येत होता. तो ऐकत असतां माझ्या मनांत विचार आला, कीं ज्या श्रद्धेमुळें आपलें सर्व दारिद्र्य, दुःख, दैन्य पार विसरून हे सारे असंख्य लोक या नदीच्या कांठीं जमा होतात, त्या श्रद्धेचें सामर्थ्य केवढें विशाल असलें पाहिजे! बरें, हा प्रकार कांहीं दहावीस वर्षांचा का आहे? आज कितीक शतकें, नव्हे, कितीक हजारों वर्षें दरसाल हे यात्रेकरू या त्रिवेणी-संगमावर येतच आहेत. मनुष्याच्या पिढ्यान् पिढ्या येवोत आणि जावोत; आज हें राज्य झालें; उद्यां हें साम्राज्य आलें; कांहीं काळ वैभवांत राहून तीं नष्ट होऊन त्यांची आठवणही बुजून गेली. तरीसुद्धां प्राचीन परंपरा मात्र चालूच आहे; आणि पिढ्यांमागून पिढ्या तिच्यापुढें वांकत आहेत. परंपरेमध्येंही पुष्कळदां चांगला अंश असतो. पण कधीं कधीं परंपरेचें हें ओझें फारच भयंकर अवघड होतें आणि प्रगति करणें आपल्याला कठिण होऊन बसतें. "आपल्याला आपल्या अगदीं दूरच्या अंधुक भूतकाळाशीं जोडणाऱ्या या परंपरेविषयीं अखंड सांखळीचा विचार मनांत आला म्हणजे मन भारल्यासारखें होतें. १२०० वर्षांपूर्वी लिहिलेले या माघमेळ्याचे वृत्तांत वाचले आणि त्याहीवेळीं मेळ्याची ही परंपरा एक अति प्राचीन परंपराच होऊन गेली होती, हा विचार मनांत आला म्हणजे एक प्रकारचे हर्षरोमांच उपस्थित होतात. परंतु ही सांखळी आपल्याला ज्या वेळीं प्रगतीचा मार्ग चोखाळावयाचा असतो अशा वेळीं सुद्धां आपल्याला चिकटून राहते, आणि आपल्या पकडींत ती आपल्याला जणुं बंदिवानच करून टाकीत असते. भूतकाळाशीं आपल्याला जोडणारे पुष्कळ दुवे आपल्याला राखून ठेवावे लागतील हें खरें; परंतु त्याबरोबर ज्या ज्या प्रसंगीं परंपरेमुळें आपल्या प्रगतीच्या मार्गांत आपल्याला अटकाव होऊं लागेल, त्या त्या प्रसंगीं तिचा बंदिवास सोडून आपल्याला बाहेर अवश्य यावें लागेल.

गेल्या तीन पत्रांत, आपण ३००० ते २५०० वर्षांपूर्वीच्या काळांत जगांत काय परिस्थिति होती, याचें चित्र डोळ्यांपुढें उभें करण्याचा प्रयत्न करीत होतों. त्यामध्यें प्रत्यक्ष तारीख किंवा सन यांचा मीं कांहींच उल्लेख केला नाहीं. मला हे तारीख-सनांचे

उल्लेख आठवत नाहींत, आणि तूंसुद्धां त्यांची विशेष फिकीर करून स्वतःला त्रास करून घ्यावा असें मला वाटत नाहीं. शिवाय, या प्राचीन काळीं केव्हां काय घडलें हें सनवार किंवा तारीखवार नेमकें सांगणेंही कठिण आहे. पुढच्या पुढच्या इतिहासांत भिन्न भिन्न हकीकतींचे परस्पर-क्रम नीट व्यवस्थितपणें ध्यानांत राहावे म्हणून अशा कांहीं तारखा सांगाव्या लागतील व कांहीं कांहीं तारखा-सन ध्यानांतही ठेवावे लागतील. परंतु सध्यां आपल्याला त्याची गरज नाहीं. आतां आपण फक्त प्राचीन जगाचें एक सर्वसामान्य चित्रच तेवढें पाहण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

आतांपर्यंत ग्रीस आणि भूमध्यसमुद्राच्या आसपासचे प्रदेश, ईजिप्त, आशियां मायनर आणि इराण यांचें ओझरतें दर्शन आपण घेतलें. आतां आपल्या स्वदेशाकडे परत येऊं या. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करण्यामध्यें एक मोठी अडचण आहे. या देशांतील प्राचीन आर्यांमध्यें, ज्यांनाच भारतीय आर्य म्हणून म्हणतात त्यांच्यामध्यें, इतिहास लिहून ठेवण्याकडे लक्षच नव्हतें. पूर्वीच्या कांहीं पत्रांमध्यें हे आर्य किती श्रेष्ठ पदवीला पोंचलेले होते हें आपण पाहिलेलें आहे. उदाहरणार्थ, त्यांचे ग्रंथच पहा – वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत आणि इतरही ग्रंथ. हे निर्माण करणारे लोक फार श्रेष्ठ दर्जाचेच लोक असले पाहिजेत. या ग्रंथांतून आणि दुसऱ्या कांहीं वस्तूंतून प्राचीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठीं पुष्कळ उपयुक्त साधनें सांपडतात हें खरें. आपल्या प्राचीन पूर्वजांची राहणी आणि चालीरीती, आचार आणि विचार यांबद्दल त्यांतून माहिती मिळते. परंतु हे ग्रंथ म्हणजे विनचूक इतिहास नव्हेत. ज्याला खराखुरा इतिहास म्हणतां येईल असा जो एकच ग्रंथ संस्कृत भाषेंत आहे, तो काश्मीरच्या इतिहासाबद्दल आहे. त्यांतही बऱ्याच अलीकडच्या काळचा इतिहास आहे. हा ग्रंथ म्हणजे कल्हण कवीनें लिहिलेला 'रजतरंगिणी' नांवाचा ग्रंथ. ही काश्मीरच्या राजांची बखरच आहे एक. इकडे मी हीं पत्रें लिहीत असतों, तर त्याच वेळीं येथें रणजित फूफा* संस्कृत भाषेंतील काश्मीरच्या या महान् इतिहासग्रंथाचें इंग्रजी भाषांतर करीत आहेत, हें वाचून तुला मोठी मौज वाटेल. अर्धें भाषांतर त्यांचें पुरें होत आलें आहे. फारच प्रचंड ग्रंथ आहे तो मुळांत. हें सगळें भाषांतर तयार झालें म्हणजे आपण सगळींच जणें तें अत्यंत उत्सुकतेनें वाचूं यांत कांहींच संशय नाहीं. कारण मुळांतून वाचण्याइतकें चांगलें संस्कृतचें ज्ञान आपल्यांत फारसें कोणालाच नाहीं. एक मोठा सुंदर ग्रंथ म्हणूनच केवळ हें भाषांतर वाचावेंसें वाटेल असें नव्हे; तर त्यामध्यें जुन्या काळचा पुष्कळ इतिहास लिहिला आहे म्हणून. तुला आतां माहीत झालेलें आहे, कीं आपल्या घराण्याची मूळ भूमि काश्मीर आहे म्हणून; त्यामुळें विशेषतः त्या काश्मीरच्या भूतकाळाचा वृत्तांत त्यांत आहे यासाठीं तो वाचण्याची उत्सुकता आपल्याला वाटेल.

आर्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला तेव्हां हा देश आधींच सुधारलेला – संस्कृतियुक्त

---

* श्री. रणजित एस्. पंडित, नेहरूंचे मेहुणे, हे या वेळीं याच तुरुंगांत त्यांच्याबरोबर होते.

असा – होता. इतकेंच काय, पण वायव्य हिंदुस्थानांत मोहेंजोदारोपाशीं जे अवशेष आतां सांपडले आहेत, त्यावरून आर्य या देशांत येण्यापूर्वीही पुष्कळ दीर्घकाळपर्यंत या देशांत एक श्रेष्ठ संस्कृति नांदत होती ही गोष्ट आतां निश्चित झाली आहे. परंतु तिच्यासंबंधीं अद्यापि आपणांला विशेष माहिती मिळालेली नाहीं. कदाचित् आमच्या पुराणवस्तुसंशोधकांनीं – जुन्या काळच्या अवशेषांचा खास अभ्यास करणारांना हें नांव आहे – त्या ठिकाणीं सांपडण्याजोगें जें जें आहे, तें सारें खणून काढल्यानंतर कांहीं वर्षांत आपल्याला यासंबंधीं पुष्कळ अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे.

पण ही प्राचीन संस्कृति क्षणभर बाजूला ठेवली, तरी द्रविड लोकांची मोठी संपन्न संस्कृति त्या काळीं दक्षिणेंत आणि बहुधा उत्तरेकडेही होती यांत आतां कांहींच शंका राहिलेली नाहीं. त्यांच्या भाषा संस्कृतांतून जन्म पावलेल्या नाहींत. त्या फार फार प्राचीन आहेत आणि त्यांमध्यें सुंदर वाङ्मय रचलेलें आहे. तामीळ, तेलगू, कानडी आणि मल्याळी या त्यांच्या प्रमुख भाषा. दक्षिण हिंदुस्थानांत आजही या भाषा चांगल्या नांदत्या आहेत. हिंदी राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानचे जे भाग पाडले आहेत, ते ब्रिटिश-राज्यसत्तेप्रमाणें उगीच कांहीं तरी पाडलेले नसून ते भाषेच्या पायावर पाडलेले आहेत हें तुला ठाऊक असेल. ही पद्धत किती तरी जास्त चांगली आहे. कारण त्यामुळें एक भाषा बोलणारे, सामान्यतः सारख्या चालीरीती असणारे एका प्रकारचे लोक एका प्रांतिक गटांत येतात. दक्षिणेंतील कॉंग्रेसचे प्रांत म्हणजे एक आंध्र देश, म्हणजे मद्रास इलाख्यांतील आंध्र प्रांत, यांत तेलगू भाषा आहे. दुसरा तामीळनाड अथवा तामीळप्रांत, यांत तामीळ भाषा आहे; तिसरा कर्नाटक हा मुंबई इलाख्याच्या दक्षिणेस असून त्याची भाषा कन्नड म्हणजेच कानडी आहे आणि चौथा केरळ; सामान्यतः मलबारचा भाग म्हणजेच केरळ असून त्याची भाषा मल्याळी आहे. भविष्यकाळीं जेव्हां हिंदुस्थानचे राजकीय विभाग पाडण्याचा प्रसंग येईल, तेव्हां भिन्न भिन्न प्रदेशांतील भाषांच्य दृष्टीनें फार विचार करावा लागेल यांत मुळींच संशय नाहीं.

याच ठिकाणीं हिंदुस्थानांतल्या भाषांसंबंधीं आणखी कांहीं थोडेंसें लिहून टाकलेलें बरें असें मला वाटतें. यूरपमध्यें आणि इतरत्रही कांहीं लोकांची अशी कल्पना आहे, कीं हिंदुस्थानांत शेंकडों भाषा आहेत. ही अगदीं सर्वस्वीं खुळचट कल्पना आहे. आणि जे कोणी असें म्हणतात, त्यांचें त्यामध्यें अज्ञान मात्र दिसून येतें. हिंदुस्थान हा देश इतका अवाढव्य आहे, कीं त्यांत एका भाषेची लिहिण्याचोलण्याची वेगळी वेगळी ढब स्थानभेदाप्रमाणें आढळून येणें अपरिहार्य आहे. तसेंच देशांत कांहीं डोंगरी टोळ्या आणि जागोजाग कांहीं छोट्या जमाती अशा आहेत, कीं ज्यांच्या स्वतःच्या खास भाषा आहेत. पण साऱ्या हिंदुस्थानचा विचार करीत असतां त्यांचें महत्त्व लक्षांत-सुद्धां घेण्यासारखें नाहीं. केवळ खानेसुमारीपुरतेंच काय तें त्यांचें महत्त्व आहे. मला वाटतें, मागें एका पत्रांत मीं तुला लिहिलें असावें, कीं हिंदुस्थानच्या खऱ्याखुऱ्या भाषांचीं दोन घराणीं आहेत : एक द्राविडांचें. त्यांच्याबद्दल नुकतेंच आपण बोलत होतों; आणि

उल्लेख आठवत नाहींत, आणि तूंसुद्धां त्यांची विशेष फिकीर करून स्वतःला त्रास करून घ्यावा असें मला वाटत नाहीं. शिवाय, या प्राचीन काळीं केव्हां काय घडलें हें सनवार किंवा तारीखवार नेमकें सांगणेंही कठिण आहे. पुढच्या पुढच्या इतिहासांत भिन्न भिन्न हकीकतींचे परस्पर-क्रम नीट व्यवस्थितपणें ध्यानांत राहावे म्हणून अशा कांहीं तारखा सांगाव्या लागतील व कांहीं कांहीं तारखा-सन ध्यानांतही ठेवावे लागतील. परंतु सध्यां आपल्याला त्याची गरज नाहीं. आतां आपण फक्त प्राचीन जगाचें एक सर्वसामान्य चित्रच तेवढें पाहण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

आतांपर्यंत ग्रीस आणि भूमध्यसमुद्राच्या आसपासचे प्रदेश, ईजिप्त, आशियां मायनर आणि इराण यांचें ओझरतें दर्शन आपण घेतलें. आतां आपल्या स्वदेशाकडे परत येऊं या. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करण्यामध्यें एक मोठी अडचण आहे. या देशांतील प्राचीन आर्यांमध्यें, ज्यांनाच भारतीय आर्य म्हणून म्हणतात त्यांच्यामध्यें, इतिहास लिहून ठेवण्याकडे लक्षच नव्हतें. पूर्वीच्या कांहीं पत्रांमध्यें हे आर्य किती श्रेष्ठ पदवीला पोंचलेले होते हें आपण पाहिलेलें आहे. उदाहरणार्थ, त्यांचे ग्रंथच पहा – वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत आणि इतरही ग्रंथ. हे निर्माण करणारे लोक फार श्रेष्ठ दर्जाचेच लोक असले पाहिजेत. या ग्रंथांतून आणि दुसऱ्या कांहीं वस्तूंतून प्राचीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठीं पुष्कळ उपयुक्त साधनें सांपडतात हें खरें. आपल्या प्राचीन पूर्वजांची राहणी आणि चालीरीती, आचार आणि विचार यांबद्दल त्यांतून माहिती मिळते. परंतु हे ग्रंथ म्हणजे बिनचूक इतिहास नव्हेत. ज्याला खराखुरा इतिहास म्हणतां येईल असा जो एकच ग्रंथ संस्कृत भाषेंत आहे, तो काश्मीरच्या इतिहासाबद्दल आहे. त्यांतही बऱ्याच अलीकडच्या काळचा इतिहास आहे. हा ग्रंथ म्हणजे कल्हण कवीनें लिहिलेला 'रजतरंगिणी' नांवाचा ग्रंथ. ही काश्मीरच्या राजांची बखरच आहे एक. इकडे मी हीं पत्रें लिहीत असतों, तर त्याच वेळीं येथें रणजित फूफा* संस्कृत भाषेंतील काश्मीरच्या या महान् इतिहासग्रंथाचें इंग्रजी भाषांतर करीत आहेत, हें वाचून तुला मोठी मौज वाटेल. अर्धें भाषांतर त्यांचें पुरें होत आलें आहे. फारच प्रचंड ग्रंथ आहे तो मुळांत. हें सगळें भाषांतर तयार झालें म्हणजे आपण सगळींच जणें तें अत्यंत उत्सुकतेनें वाचूं यांत कांहींच संशय नाहीं. कारण मुळांतून वाचण्याइतकें चांगलें संस्कृतचें ज्ञान आपल्यांत फारसें कोणालाच नाहीं. एक मोठा सुंदर ग्रंथ म्हणूनच केवळ हें भाषांतर वाचावेंसें वाटेल असें नव्हे; तर त्यामध्यें जुन्या काळचा पुष्कळ इतिहास लिहिला आहे म्हणून. तुला आतां माहीत झालेलें आहे, कीं आपल्या घराण्याची मूळ भूमि काश्मीर आहे म्हणून; त्यामुळें विशेषतः त्या काश्मीरच्या भूतकाळाचा वृत्तांत त्यांत आहे यासाठीं तो वाचण्याची उत्सुकता आपल्याला वाटेल.

आर्यानीं हिंदुस्थानांत प्रवेश केला तेव्हां हा देश आधींच सुधारलेला – संस्कृतियुक्त

---

* श्री. रणजित एस्. पंडित, नेहरूंचे मेहुणे, हे या वेळीं याच तुरुंगांत त्यांच्याबरोबर होते.

असा – होता. इतकेंच काय, पण वायव्य हिंदुस्थानांत मोहेंजोदारोपाशीं जे अवशेष आतां सांपडले आहेत, त्यावरून आर्य या देशांत येण्यापूर्वीही पुष्कळ दीर्घकाळपर्यंत या देशांत एक श्रेष्ठ संस्कृति नांदत होती ही गोष्ट आतां निश्चित झाली आहे. परंतु तिच्यासंबंधीं अद्यापि आपणांला विशेष माहिती मिळालेली नाहीं. कदाचित् आमच्या पुराणवस्तुसंशोधकांनीं – जुन्या काळच्या अवशेषांचा खास अभ्यास करणारांना हें नांव आहे – त्या ठिकाणीं सांपडण्याजोगें जें जें आहे, तें सारें खणून काढल्यानंतर कांहीं वर्षांत आपल्याला यासंबंधीं पुष्कळ अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे.

पण ही प्राँचीन संस्कृति क्षणभर बाजूला ठेवली, तरी द्रविड लोकांची मोठी संपन्न संस्कृति त्या काळीं दक्षिणेंत आणि बहुधा उत्तरेकडेही होती यांत आतां कांहींच शंका राहिलेली नाहीं. त्यांच्या भाषा संस्कृतांतून जन्म पावलेल्या नाहींत. त्या फार फार प्राचीन आहेत आणि त्यांमध्यें सुंदर वाङ्मय रचलेलें आहे. तामीळ, तेलगू, कानडी आणि मल्याळी या त्यांच्या प्रमुख भाषा. दक्षिण हिंदुस्थानांत आजही या भाषा चांगल्या नांदत्या आहेत. हिंदी राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानचे जे भाग पाडले आहेत, ते ब्रिटिश-राज्यसत्तेप्रमाणें उगीच कांहीं तरी पाडलेले नसून ते भाषेच्या पायावर पाडलेले आहेत हें तुला ठाऊक असेल. ही पद्धत किती तरी जास्त चांगली आहे. कारण त्यामुळें एक भाषा बोलणारे, सामान्यतः सारख्या चालीरीती असणारे एका प्रकारचे लोक एका प्रांतिक गटांत येतात. दक्षिणेंतील काँग्रेसचे प्रांत म्हणजे एक आंध्र देश, म्हणजे मद्रास इलाख्यांतील आंध्र प्रांत, यांत तेलगू भाषा आहे. दुसरा तामीळनाड अथवा तामीळप्रांत, यांत तामीळ भाषा आहे; तिसरा कर्नाटक हा मुंबई इलाख्याच्या दक्षिणेस असून त्याची भाषा कन्नड म्हणजेच कानडी आहे आणि चौथा केरळ; सामान्यतः मलबारचा भाग म्हणजेच केरळ असून त्याची भाषा मल्याळी आहे. भविष्यकाळीं जेव्हां हिंदुस्थानचे राजकीय विभाग पाडण्याचा प्रसंग येईल, तेव्हां भिन्न भिन्न प्रदेशांतील भाषांच्य दृष्टीनें फार विचार करावा लागेल यांत मुळींच संशय नाहीं.

याच ठिकाणीं हिंदुस्थानांतल्या भाषांसंबंधीं आणखी कांहीं थोडेंसें लिहून टाकलेलें बरें असें मला वाटतें. यूरपमध्यें आणि इतरत्रही कांहीं लोकांची अशी कल्पना आहे, कीं हिंदुस्थानांत शेंकडों भाषा आहेत. ही अगदीं सर्वस्वीं खुळचट कल्पना आहे. आणि जे कोणी असें म्हणतात, त्यांचें त्यामध्यें अज्ञान मात्र दिसून येतें. हिंदुस्थान हा देश इतका अवाढव्य आहे, कीं त्यांत एका भाषेची लिहिण्याबोलण्याची वेगळी वेगळी ढब स्थानभेदाप्रमाणें आढळून येणें अपरिहार्य आहे. तसेंच देशांत कांहीं डोंगरी टोळ्या आणि जागोजाग कांहीं छोट्या जमाती अशा आहेत, कीं ज्यांच्या स्वतःच्या खास भाषा आहेत. पण साऱ्या हिंदुस्थानचा विचार करीत असतां त्यांचें महत्त्व लक्षांत-सुद्धां घेण्यासारखें नाहीं. केवळ खानेसुमारीपुरतेंच काय तें त्यांचें महत्त्व आहे. मला वाटतें, मागें एका पत्रांत मीं तुला लिहिलें असावें, कीं हिंदुस्थानच्या खऱ्याखुऱ्या भाषांचीं दोन घराणीं आहेत : एक द्रविडांचें. त्यांच्याबद्दल नुकतेंच आपण बोलत होतों; आणि

दुसरें भारतीय आर्यांचें. भारतीय आर्यांची प्रमुख भाषा म्हणजे संस्कृत; आणि भारतीय आर्यांच्या इतर भाषा संस्कृतपासूनच निघालेल्या आहेत. हिंदी, बंगाली, गुजराथी आणि मराठी या त्या भाषा. यांचींच आणखीही थोडीं वेगळीं रूपें आहेत. उदाहरणार्थ, आसामांत आसामी आहे. ओरिसा किंवा उत्कल प्रांतांत उडिया आहे. उर्दू हीही हिंदीचेंच एक वेगळें रूप आहे. हिंदुस्थानी या शब्दानें उर्दू आणि हिंदी या दोन्ही भाषा दर्शविल्या जातात. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील प्रमुख भाषांची संख्या फक्त दहा भरते : हिंदुस्थानी, बंगाली, गुजराथी, मराठी, तामीळ, तेलगू, कानडी, मल्याळी, उडिया आणि आसामी. यांमध्यें आपली मातृभाषा जी हिंदुस्थानी ती पंजाब, संयुक्तप्रांत, बिहार, मध्यप्रांत, राजपुताना, दिल्ली आणि मध्य हिंदुस्थान यांच्यामध्यें म्हणजे साऱ्या उत्तर हिंदुस्थानांत बोलली जाते. केवढा अवाढव्य हा प्रदेश आहे! त्याची लोकसंख्या सुमारें १५ कोटी आहे. म्हणजे पहा, कीं १५ कोटी लोकांची आजच हिंदुस्थानी ही रोजची बोलण्या-लिहिण्याची भाषा आहे; अर्थात् तिच्यांत प्रांताप्रांतांत थोडे थोडे फरक आहेत हें खरें. तसेंच हिंदुस्थानांत इतरही बहुतेक प्रांतांत हिंदुस्थानी समजते हेंही तुला ठाऊक आहे. हिंदुस्थानची ती एकमेव राष्ट्रभाषा होण्याचा संभव आहे. याचा अर्थ असा नव्हे, कीं वर ज्या बाकीच्या प्रमुख भाषा म्हणून सांगितल्या त्या अजीबात नाहींशाच होतील किंवा व्हाव्यात म्हणून. प्रांतीय भाषा म्हणून त्या राहिल्याच पाहिजेत. कारण त्यांच्यामध्यें सुंदर वाङ्मयसंपत्ति आहे आणि कोणाही लोकांची चांगली प्रौढ वाढलेली भाषा त्यांच्यापासून हिरावून घेण्याचा केव्हांच कोणीं प्रयत्न करणें बरें नव्हे. कोणत्याही लोकांचें स्वतःची अधिकाधिक प्रगति करण्याचें एकमेव साधन म्हणजे त्यांची मातृभाषाच होय. याच भाषेंतून त्यांच्या नव्या पिढीचें, लहान बालकांचें शिक्षण होणें अपरिहार्य व स्वाभाविक आहे. हिंदुस्थानांत आज सगळ्याच गोष्टींमध्यें खालीं डोकें वर पाय अशी अवस्था झाली आहे; सगळेंच उलटें-पालटें झालें आहे. म्हणून आम्ही आपापसांमध्यें इंग्रजी भाषा वापरतों. मीं सुद्धां तुला इंग्रजींत पत्र लिहावें ही किती हास्यास्पद गोष्ट आहे; पण तरीही माझ्या हातून तसें घडतेंच आहे! लौकरच या संवयींतून आपण मुक्त होऊं, अशी मला आशा आहे.

१०

प्राचीन हिंदुस्थानांतील ग्रामीण लोकराज्यें

१५ जानेवारी, १९३१

अशा रीतीनें प्राचीन इतिहासाचें आपलें हें निरीक्षण नीटपणें पुढें कसें चालावयाचें कोण जाणे! कारण मुख्य सूत्र सोडून उगीच इकडे तिकडे भटक्या मारीत

राहण्याची मला खोड लागली आहे. गेल्याच पत्रांत पहा – अगदीं मुख्य विषयावर मी येऊन ठेपलों होतों, तोंच एकदम माझा मोर्चा हिंदुस्थानांतल्या भाषांकडे वळला.

तेव्हां पुन्हां एकदां आपण प्राचीन हिंदुस्थानकडे वळूं या. आज ज्याला अफगाणिस्तान म्हणतात तो प्रदेश त्या काळीं आणि त्यानंतर पुष्कळ काळपर्यंत हिंदुस्थानचाच एक विभाग होता हें तुला ठाऊक आहे. हिंदुस्थानच्या वायव्य भागाला त्या वेळीं गांधार म्हणत. उत्तरेकडच्या सर्व प्रदेशांत, सिंधु नद आणि गंगा नदी यांच्या आसपासच्या मैदानांमध्यें आर्यांच्या मोठमोठ्या वसाहती त्या काळीं होत्या – हिंदुस्थानांत वसाहत करावयास आलेले हे आर्य इराण व मेसापोटेमिया यांमधील मूळच्या त्याच्या वसाहतींतून निघूनच इकडे आलेले असावेत. त्या काळींसुद्धां त्या प्रदेशांत मोठमोठीं शहरें उदयास आलेलीं होतीं. त्यावरून हिंदुस्थानांतील या काळच्या वसाहतवाल्या आर्यांना शिल्पकलेचें व बांधकामाचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे. आर्यांच्या या वसाहतींमध्यें पुष्कळ अरण्यें होतीं आणि विशेषतः उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांच्या मध्यभागीं एक फारच मोठें अरण्य होतें. हें अरण्य ओलांडून दक्षिणेकडे वसाहत करण्यासाठीं सामुदायिक रीतीनें फारसे कोणी आर्य गेले असतील हें संभवत नाहीं. परंतु पुष्कळसे लोक व्यक्तिशः तेथील परिस्थिति समजावून घेण्यासाठीं, त्या ठिकाणीं व्यापारधंदा पाहण्यासाठीं, तसेंच आर्यसंस्कृति व आर्यपरंपरा यांचा प्रसार करण्यासाठीं दक्षिणेंत गेले असतील, हें खास. जुनी परंपरागत कथा अशी आहे, कीं दक्षिणेकडे जाणारा पहिला आर्य म्हणजे अगस्त्य ऋषि होय व त्यानेंच आर्यांचा धर्म संस्कृति यांचा संदेश दक्षिणेंत पोंचविला.

या सुमारास हिंदुस्थान व बाहेरचे देश यांच्यामध्यें पुष्कळ मोठ्या प्रमाणावर व्यापारधंदा भरभराटीला आला होता. दक्षिणेकडील मिरीं, सोनें आणि मोतीं यांमुळें समुद्राच्या पलीकडचे लोक तिकडे ओढले जात होते. तांदुळाचीही निर्गत बहुधा त्या काळीं होत होती. मलबारांतील सागवानही बाबिलोनियाच्या प्राचीन राजवाड्यांतून वापरलेलें आढळल्यांत आलें आहे.

हळूहळू आर्यांनीं आपली विशिष्ट प्रकारची ग्रामव्यवस्था हिंदुस्थानांत प्रस्थापित केली. मूळची द्रविड-ग्रामपद्धति आणि नवीन आर्यांच्या कल्पना यांच्या मिश्रणांतून ही नवी व्यवस्था निर्माण झाली होती. हीं ग्रामें जवळजवळ अगदीं स्वतंत्र सत्ताधीश अशीं असत आणि त्यांचा कारभार लोकनियुक्त पंचायतींच्यामार्फत चाले. बरींचशीं गांवें किंवा छोटीं छोटीं शहरें एका राजाच्या किंवा प्रमुखाच्या सत्तेखालीं एकत्र आलेलीं असत. हा राजा किंवा प्रमुख कधीं कधीं वंशपरंपरेनें गादीवर येत असे, तर कोठें कोठें त्याची निवडणूक होत असे. असे भिन्न ग्रामसंघ एकमेकांशीं सहकार्य करून रस्ते, धर्मशाळा, शेतीसाठीं कालवे – हीं किंवा अशीं सर्वांच्या मालकीचीं व सार्वजनिक उपयोगासाठींच असलेलीं अशीं बांधकामें करीत. राजा हा जरी राज्यांतील प्रमुख व्यक्ति म्हणून समजला जात असे, तरी त्याच्यावरही आर्यांचे कायदे आणि रूढी यांचें

बंधन असे आणि त्याची प्रजा त्याला पदच्युत करूं शके किंवा त्याला दंड करूं शके, असें दिसतें. त्यामुळें मन मानेल तसें वागण्याची सवड त्याला होती, असें आढळत नाहीं. माझ्या मागच्या पत्रांत " L'etat C'est Moi – राजा म्हणजेच राष्ट्र " या सिद्धांताचा उल्लेख केला, तशा प्रकारची पद्धति त्यांच्यामध्यें अस्तित्वांत नव्हती. अशा रीतीनें आर्यांच्या या वसाहतींत एक प्रकारची लोकशाही नांदत होती. म्हणजे काय, तर या आर्य वसाहतवाल्यांचें आपल्या राज्यकारभारावर कांहीं अंशीं प्रभुत्व चालत होतें.

हे भारतीय आर्य आणि ग्रीक आर्य यांच्यामध्यें तुलना करून पहा. त्यांच्यामध्यें जसे कांहीं फरक होते, तशाच पुष्कळ गोष्टी त्यांच्यांत सारख्याही होत्या. दोन्ही ठिकाणीं एक प्रकारची लोकशाही अस्तित्वांत होती. पण हें मात्र अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं ही लोकशाही फक्त आर्यांच्यापुरती मर्यादित होती. त्यांचे गुलाम किंवा ज्या लोकांना त्यांनीं खालच्या जातींत – वर्गांत – बसविलें होतें असे लोक, यांना कांहीं लोकशाही किंवा स्वातंत्र्य यांचा लाभ झालेला नव्हता. आज जे वर्णभेद आणि त्याच्या पोटीं उत्पन्न झालेले असंख्य जातिभेद आपण पाहतों, तसे त्या वेळीं अस्तित्वांत नव्हते. त्या काळीं भारतीय आर्यांनीं आपल्या समाजाचे चार विभाग किंवा वर्ण कल्पिलेले होते. एक ब्राह्मण किंवा ज्ञानी, उपाध्याय आणि ऋषि यांचा ; दुसरा क्षत्रिय किंवा राजे लोकांचा. तिसरा वैश्य म्हणजे व्यापारधंदा व द्रव्योत्पादन करणाऱ्यांचा आणि चौथा शूद्र म्हणजे कामगार आणि मजूर यांचा. हे विभाग अशा रीतीनें धंद्यांवर आधारलेले होते. जित मानववंशापासून आपला समाज अलिप्त ठेवण्याचा असा जो आर्यांचा हेतु नेहमीं असे, तो सुद्धां अंशतः ही वर्णव्यवस्था निर्माण होण्याच्या बुडाशीं असेल कदाचित्. आर्य हे इतके गर्विष्ठ आणि आढ्यतेखोर होते, कीं इतर मानववंशीयांना ते अगदींच हीन लेखीत आणि त्यांचा आपल्या वंशाच्या लोकांशीं संकर होऊं नये अशीच त्यांची मोठी खटपट असे. संस्कृतमधला वर्ण हा विभागवाचक शब्दच मुळीं रंगाचा वाचक आहे. त्यावरून हेंही दिसून येतें, कीं हिंदुस्थानांत वसाहत करावयास आलेल्या या आर्यांचा वर्ण तेथील मूळच्या रहिवाशांपेक्षां अधिक गोरा होता.

तेव्हां एक गोष्ट आपण चांगली लक्षांत बाळगावयाची, कीं एका बाजूला या आर्य लोकांनीं मजूरवर्गाला दडपून ठेवलें होतें व त्यांना आपल्या लोकशाही व्यवस्थेंत मुळींच वांटा दिलेला नव्हता, तर दुसऱ्या बाजूला ते आपल्या स्वतःपुरतें मात्र पूर्ण स्वातंत्र्य उपभोगीत होते. आपले राजे किंवा राज्यकर्ते यांनासुद्धां ते कोणतीही अयोग्य गोष्ट करूं देत नसत. कोणी राज्यकर्ता अयोग्य कर्म करूं लागलाच, तर त्याला ते काढून टाकीत असत. राजे हे सामान्यतः क्षत्रियच असत ; परंतु युद्धाच्या वेळीं किंवा संकटाच्या वेळीं आणि धोक्याच्या प्रसंगीं अंगीं तसें सामर्थ्य असेल तर शूद्र म्हणजे अगदीं खालच्या वर्गांतील व्यक्तीलाही राज्यपद प्राप्त होऊं शकत असे. पुढच्या पुढच्या काळांत आर्यांना उतरती कळा लागली. आणि त्यांची वर्ण व जातिव्यवस्था अगदींच लांकडाच्या

ओंडक्यासारखी निर्जीव आणि बिनलवचिक बनली. त्यांच्या जातिभेदांची संख्या इतकी मोठी झाली, कीं त्यामुळें देश अगदीं दुर्बळ बनला आणि त्याचा ऱ्हास झाला. त्यांची आपल्या प्राचीन काळच्या स्वातंत्र्यविषयक निष्ठेची जाणीव सुद्धां नष्ट झाली. कारण पूर्वीच्या काळीं असें म्हणत, कीं आर्य हा कधींही गुलाम होणार नाहीं. आणि आपल्या आर्य या नांवाला, कीर्तीला काळिमा लागण्यापेक्षां मरण पुरवलें, अशी प्रत्येकाची भावना होती.

आर्यांच्या या वसाहती, त्यांचीं खेडीं किंवा शहरें हीं आपोआप वाटेल तशीं वाढलीं नाहींत. त्यांची रचना मुद्दाम योजना आंखून करण्यांत येत असे आणि या योजलेल्या आराखड्यांत भूमितीचा पुष्कळच उपयोग केला जात असे, हें वाचून तुला मोठेंच कौतुक वाटेल. फार कशाला, वैदिक पूजेमध्येंसुद्धां त्या काळीं भूमितींतील आकृतींचा उपयोग करण्यांत येत असे. आजसुद्धां पुष्कळ हिंदू घरांतून निरनिराळ्या पूजाकर्मांच्या वेळीं तशा आकृत्यांचा उपयोग करीत असतात. घरें बांधणें किंवा शहरांची उभारणी करणें या कामीं भूमितीचा फारच निकट संबंध आहे, हें तर स्पष्टच आहे. प्राचीन आर्यांचें खेडेगांव म्हणजे पहिल्या-पहिल्यांदां एक प्रकारचा तटबंदी केलेला लष्करी तळच जणुं असे; कारण त्या काळीं नेहमीं हल्ला होण्याचें भय असे. परंतु पुढें शत्रूंच्या हल्ल्यांचें भय नाहींसें झालें तरी सुद्धां गांवाच्या रचनेचा नमुना जो पूर्वी होता तोच पुढें चालू राहिला. ही रचना चौकोनाच्या स्वरूपाची असे. चारी बाजूंना मोठाले तट असत आणि त्यांमध्यें चार मोठ्या वेशी आणि चार लहान वेशी असत. या तटभिंतींच्या आंत विशिष्ट क्रमानें रस्त्यांची व दारांची रचना असे. गांवाच्या मध्याला पंचायत-घर असे. त्यामध्यें गांवच्या वृद्ध लोकांच्या बैठकी होत असत. लहान गांवांत अशा पंचायत-घराऐवजीं एखादा मोठा वृक्ष असे. या जागीं दरवर्षीं गांवांतील सर्व स्वतंत्र नागरिकांनीं जमावयाचें आणि आपली पंचायत निवडावयाची, अशी पद्धति होती.

विद्यार्जन केलेले पुष्कळ लोक शहरांच्या किंवा खेड्यांच्या आसपासच्या जंगलांत जाऊन एकांतवासांत राहत. तेथें अत्यंत साधेपणानें जीवन घालवून शांतपणें अभ्यास किंवा इतर कार्य करावें, असा त्यांचा हेतु असे. परंतु हळूहळू त्यांच्याभोंवतीं शिष्यवर्ग जमा होऊं लागला आणि हे गुरू व त्यांचे शिष्य यांच्या या आगखी नव्या वसाहती निर्माण होऊं लागल्या. या वसाहती म्हणजे हल्लीं जशीं मोठमोठीं विद्यापीठांचीं शहरें असतात तशीं विद्यापीठेंच जणुं, असें आपणांस म्हणतां येईल. त्या ठिकाणीं नाना प्रकारच्या सुंदर सुंदर इमारती नसत ह खरें; परंतु ज्ञानार्जनाची इच्छा असणारे लोक फार लांबलांबून या विद्यार्जनाच्या ठिकाणीं येत असत.

आपल्या आनंदभवनाच्या समोरच भारद्वाज आश्रम आहे. तुला तो चांगला ठाऊक आहे. भारद्वाज हा रामायणाच्या काळचा एक अत्यंत ज्ञानी पुरुष होता आणि वनवासांत आल्यावर प्रत्यक्ष रामचंद्र त्याच्या भेटीला गेले होते, ही गोष्टही तुला बहुतेक ठाऊक असेल. त्याच्या आश्रमांत हजारों विद्यार्थी आणि शिष्य राहत होते

असें लिहिलेलें आहे. त्यावरून असें वाटतें, कीं भारद्वाज ऋषीच्या आधिपत्याखालीं तेथें एक चांगलें विद्यापीठच असावें. त्या काळीं हा आश्रम गंगेच्या कांठीं वसलेला होता. आज जरी तो गंगातीरापासून एक मैलावर दूर आहे, तरी त्या वेळीं तो गंगेच्या तीरावर असणें अगदीं संभवनीय आहे. आपल्या बागेंतली जमीन कितीक जागीं अतिशय वालुकामय आहे आणि त्या काळीं या ठिकाणीं गंगेच्या पात्राचा एखादा भाग असावा.

हा प्राचीन काळ म्हणजे भारतीय आर्यांच्या मोठ्या वैभवाचा काळ होता. दुर्दैवानें या काळचा कांहींच प्रत्यक्ष इतिहास आपल्याला उपलब्ध नाहीं; जी काय थोडीफार माहिती त्यासंबंधीं आपणांला मिळते, ती सगळी जे ग्रंथ इतिहासांचे नव्हत अशा ग्रंथांच्या आधारावरच मिळविलेली आहे. त्या काळीं जीं राजांचीं किंवा लोकांचीं राज्यें होऊन गेलीं त्यांत दक्षिण बिहारमधील मगध राज्य, उत्तर बिहारमधील विदेह राज्य, काशी अथवा बनारसचें राज्य, कोशल राज्य, ज्याची राजधानी अयोध्या (म्हणजे हल्लींचें फैजाबाद) नगरी होती, आणि गंगा व यमुनांच्या दुआबांतील पांचाल राज्य हीं प्रसिद्ध आहेत. पांचालांच्या राज्यांतच मथुरा आणि कान्यकुब्ज हीं प्रमुख शहरें होतीं. पुढील काळच्या इतिहासांत सुद्धां हीं शहरें प्रसिद्धीस आलेलीं आहेत. आजही तीं दोन्ही अस्तित्वांत आहेत – फक्त कान्यकुब्जाचें नांव कनोज असें झालें आहे. कानपूरजवळचें कनोज शहर तेंच हें. या प्राचीन काळीं उज्जयिनी नगरी पण अस्तित्वांत होती. आज मात्र तिला ग्वाल्हेर संस्थानांतील एका छोट्याशा शहराचें स्वरूप आलेलें आहे.

पाटण्याला त्या वेळीं पाटलिपुत्र म्हणत. त्याच्याच शेजारीं वैशाली ही नगरी होती. प्राचीन इतिहासांत अतिशय प्रसिद्धीस आलेल्या लिच्छवी वंशाची ही राजधानी होती. त्यांचें राज्य हें लोकसत्ताक राज्य होतें. त्याचा कारभार राज्यांतील प्रतिष्ठित गृहस्थांच्या हातीं असे. त्यांच्या प्रमुखस्थानीं निवडलेला अध्यक्ष असे व त्याला नायक म्हणत असत.

कालांतरानें पुढें मोठमोठीं शहरें व नगरें उदयास आलीं, व्यापार वाढला आणि कारागिरांच्या कलाकौशल्याला भरभराटीचे दिवस आले. शहरें हीं व्यापाराचीं मोठमोठीं केंद्रस्थानें बनलीं. जंगलांतले ते पूर्वीचे आश्रम, जेथें ब्राह्मण गुरू आणि त्यांचे शिष्य राहत असत, त्यांचेंही रूपांतर मोठमोठ्या विद्यापीठांच्या नगरांत झालें. या शिक्षणाच्या केंद्रामधून त्या काळीं माहीत असलेल्या प्रत्येक विषयाचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था असे. हे ब्राह्मण गुरू युद्धशास्त्राचेंसुद्धां शिक्षण देत. महाभारताभ्यें वाचलेलें तुला आठवतच असेल, कीं पांडवांचे महान् गुरु द्रोणाचार्य हे ब्राह्मणच होते आणि इतर अनेक विषयांबरोबर कौरव-पांडवांना ते युद्धकलेचेंही शिक्षण देत असत.

११

चीनचीं एक हजार वर्षें

१६ जानेवारी, १९३१

बाहेरच्या जगांतून जी बातमी आली आहे ती जशी अंतःकरणांत खळबळ उडविणारी आणि दुःख उत्पन्न करणारी आहे, तशीच अभिमान आणि आनंद यांनीं मन उचंबळून टाकणारी पण आहे. सोलापूरच्या मंडळींची अखेरची ही बातमी – ही दुःखकारक वार्ता बाहेर पडल्यावर साऱ्या देशभर काय काय प्रकार घडले, याचीं थोडीं थोडीं वर्णनें आम्हांला वाचावयाला मिळालीं. तिकडे आमची जवान मंडळी प्राणार्पण करीत असतांना आणि हजारों स्त्रीपुरुष पाशवी लाठीपुढें धैर्यानें तोंड देत असतांना येथें नुसतें कांहीं न करीत स्वस्थ बसून राहणें हें फारच त्रासदायक होतें. पण एकपरी हेंही आम्हांला एक चांगलें शिक्षणच आहे म्हणायचें. मला माहीत आहे, कीं केव्हां ना केव्हां तरी आपल्यापैकीं प्रत्येक स्त्री-पुरुषावर निर्वाणीची परीक्षा देण्याची संधि जरूर येणार आहे. दरम्यान आपले लोक कसे धीरानें दुःख सहन करायला पुढें येत आहेत, आणि शत्रु जों जों नवीं नवीं अस्त्रें वापरीत आहे आणि अधिकाधिक तडाखे देत आहे, तों तों आमच्या लोकांचें सामर्थ्य अधिकाधिक वाढून त्यांचा प्रतिकाराचा निश्चय अधिकाधिकच दृढ होत आहे, हें पाहून आपल्याही हृदयाचा उत्साह, या तुरुंगाच्या आंतही कायम राहतो हाही एक फायदाच आहे.

अशा एखाद्या बातमीनें चित्त वेधून गेलें म्हणजे इतर कशाचा विचार करणें कठिण होतें. परंतु नुसतें कल्पनाजाल विणीत राहिल्यानें कांहींच फायदा नाहीं; आणि कांहीं तरी उपयुक्त कार्य जर आपल्याला करावयाचें आहे, तर मनाला आवर घातलाच पाहिजे. तेव्हां पुन्हां एकदां आपण आपल्या प्राचीन काळाकडे परत जाऊं या आणि कांहीं काळ आपल्या वर्तमानकाळाच्या दुःखदायक भानगडींपासून थोडें दूर जाऊं या.

आज आपण प्राचीन काळांतील भारताचा पाठचा जोडीदारच असा जो चीन देश त्याचा विचार करूं या. चीनमध्यें किंवा पूर्व आशियांतील जपान, कोरिया, इंडोचायना, सयाम, बर्मा यांसारख्या देशांमध्यें आपला आर्यांशीं संबंध येत नाहीं. येथें आपल्याला मंगोलियन वंशाचे लोक आढळतात.

सुमारें पांच हजार वर्षांपूर्वीं चीन देशावर पश्चिमेकडून येणाऱ्या लोकांची पहिली स्वारी झाली. हल्ला करणाऱ्या या टोळ्याही मध्य आशियांतूनच आलेल्या होत्या आणि साधनसंपत्तीच्या बाबतींत त्यांची पुष्कळच सुधारणा झालेली होती. त्यांना शेतकीचें ज्ञान होतें आणि शेळ्यामेंढ्यांचे व गायींचे मोठाले कळप ते बाळगीत असत. ते चांगलीं घरें बांधीत आणि त्यांच्यामध्यें चांगली व्यवस्थित अशी समाजपद्धति निर्माण झालेली


चीन देश
सुधारणेच्या
प्रारंभीं
बंगाल मुलुख
ब्रह्मदेश
हिंदुस्थान
अ
ब
क
ड
इ
फ

होती. व्हांग हो किंवा पीत नदी[1] म्हणतात, तिच्या आसपास त्यांनीं वसाहत केली व आपलें राज्य स्थापिलें. पुष्कळ शतकेंपर्यंत ते चीनभर पसरत वाढत होते. आणि त्यांच्यांतील कलाकौशल्याची चांगली वाढ होत होती. हे चिनी लोक बहुतांशीं शेतीच करून राहणारे लोक होते आणि त्यांचे राजे म्हणजे माझ्या पूर्वीच्या कांहीं पत्रांतून ज्यांचा कुलपती म्हणून मीं उल्लेख केला आहे, असे जमीनदार असत. वसाहतीची सुरुवात होऊन ६-७ शें वर्षें होऊन गेल्यानंतर म्हणजे आजपासून सुमारें ४००० वर्षांपूर्वी याओ नांवाच्या एका सद्गृहस्थानें आपल्याला बादशहा म्हणवून घ्यावयास सुरुवात केली असें दिसून येतें. परंतु केवळ अशी पदवी धारण केल्यामुळें त्याच्या ठिकाणीं ईजिप्त किंवा मेसापोटेमियामधील सम्राटाप्रमाणें सामर्थ्य किंवा सत्ता प्राप्त झाली असें नव्हे. तर त्याची स्थिति कुलपतीं (टोळीचा नायक) हून कांहींच निराळी झाली नाहीं. चिनी लोकही अद्यापि शेतीच करणारे राहिले होते आणि त्यांच्यामध्यें सर्वांना एकत्र आणणारी अशी एखादी मध्यवर्ती सत्ताही स्थापन झालेली नव्हती.

प्रथम प्रथम हे कुलपती लोकांकडून निवडले जात असत; परंतु पुढें पुढें ते आनुवंशिक कसे होत गेले हेंही मीं तुला सांगितलें आहे. चीनमध्येंही हाच प्रकार घडून आलेला आढळतो. स्वतःला बादशहा म्हणवून घेणाऱ्या याओच्या पाठीमागून त्याचा मुलगा कांहीं सत्ताधीश झाला नाहीं; तर त्या काळीं सर्वांत अधिक सामर्थ्यवान् असा समजला जाणारा दुसराच एक मनुष्य स्वतः याओनें अधिकारावर नियुक्त केला. पण लौकरच हे सम्राट् सुद्धां वंशपरंपरागत झाले आणि त्यांच्या या शिया घराण्यानें पुढें ४०० वर्षेंपर्यंत चीनमध्यें राज्य चालविलें असें सांगतात. शिया घराण्यापैकीं शेवटचा राजा हा अतिशय क्रूर होता. म्हणून लोकांनीं राज्यक्रांति करून त्याला उलथून टाकलें. त्यानंतर शँग उर्फ यिन नांवाच्या घराण्याच्या हातीं सत्ता गेली व सुमारें ६५० वर्षेंपर्यंत त्या घराण्याच्या हातीं ती राहिली.

दोनतीन छोट्या छोट्या वाक्यांच्या एका लहानशा परिच्छेदांत चीनचा एक हजाराहून अधिक वर्षांचा इतिहास मीं अशा रीतीनें कसा उडवून टाकला आहे पहा. एवढ्या मोठ्या विशाल काळाचा इतिहास आणि त्याची आम्ही ही दशा करून टाकतों हें किती विचित्र आहे, नाहीं? परंतु माझ्या छोट्याशा परिच्छेदामुळें या १००० किंवा १२०० वर्षांची लांबी कांहीं प्रत्यक्षांत कमी होऊं शकत नाहीं, हा विचार तूं कर. रोजच्या व्यवहारांत आपला संबंध फक्त दिवस, महिने आणि वर्षे यांच्या गणतीशींच येत असतो. शंभर वर्षें म्हणजे काय याची नीटशी स्पष्ट कल्पना करणेंसुद्धां तुला कठिण पडेल. तेरा वर्षें आतांशीं कुठें तुला झालीं आहेत, तोंच आपण केवढी मोठी झालों असें तुला वाटतें आहे. एकेका वर्षानें तुला आपण अधिकाधिकच

---

[1] उत्तर चीनमध्यें नदीला हो म्हणतात. दक्षिण चीनमध्यें कियांग म्हणतात. तेव्हां व्हांग हो म्हणजे व्हांग नदी; यांगचे कियांग म्हणजे यांगचे नदी.

मोठी झालेंसें वाटणार आहे, तेथें इतिहासांतील एखाद्या हजार वर्षांच्या कालखंडाची कल्पना मनामध्यें आणून उभी करणें हें तुला कसें शक्य होणार? खरोखरच हा फार मोठा काळ आहे. एवढ्या अवधींत पिढ्यांमागून पिढ्या येतात आणि जातात; छोट्या छोट्या शहरांचीं मोठमोठीं नगरें बनतात आणि तीं मोडकळीस येऊन धुळीसही मिळून जातात; आणि त्यांच्या जागीं नवीं नवीं शहरें उभीं होतात. गेल्याच एक हजार वर्षांचा इतिहास क्षणभर मनांत आण; म्हणजे एक हजार वर्षें म्हणजे केवढा दीर्घकाळ आहे याची कदाचित् कांहींशी कल्पना येईल तुला. जगामध्यें गेल्या हजार वर्षांमध्यें जे अनेक बदल घडून आले, ते खरोखर किती परमावधीचे आश्चर्यकारक आहेत.

चीनचा इतिहास – त्याच्यांतील ती संस्कृतीची दीर्घकालीन परंपरा, आणि पांच-पांचशें, आठआठशें किंवा त्याहूनही अधिक काळ सत्ता भोगणारीं तीं राजघराणीं – सारेंच मोठें नवलाईचें प्रकरण आहे.

ज्या ११०० वर्षांची वासलात मीं अशा रीतीनें एका परिच्छेदांत लावून टाकली, त्या दीर्घकालांत चीनची वाढ आणि प्रगति किती मंदगतीनें झाली, हें आतां थोडेंसें पहा. हळूहळू कुलपतींची पद्धति मागें पडली आणि एक मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित होऊं लागली. सुसंघटित असें राज्ययंत्रही निर्माण झालें. या एवढ्या प्राचीन काळींसुद्धां चीनमध्यें लिहिण्याची कला अवगत होती. पण चिनी लोकांची लेखनपद्धति – लिपि – आपल्याहून किंवा इंग्लिश किंवा फ्रेंच पद्धतीहून फारच निराळी आहे. त्यांच्या लिपींत वर्णमाला नाहीं. चिह्नें आणि चित्रें यांवर ती लिपि रचलेली आहे.

६४० वर्षें राज्यावर राहिल्यानंतर क्रांति होऊन शँग घराणें पदच्युत झालें आणि चौ नांवाच्या नव्याच एका घराण्याच्या हातीं राज्यसत्ता झाली. या घराण्याचें राज्य ८६७ वर्षें चाललें. चौ घराण्याच्या काळांतच चीनमध्यें सुसंघटित असें राज्ययंत्र अस्तित्वांत आलें. याच घराण्याच्या काळांत चीनचे दोन महान् तत्त्वज्ञ, कॉन्फ्यूशियस आणि लौ चे हे उदयास आले. या दोघांबद्दल पुढें आपणांला आणखी कांहीं बोलावें लागणार आहे.

शँग घराण्याला राज्यसत्तेवरून जेव्हां हांकलण्यांत आलें, तेव्हां त्या राज्यांतील कि चे नांवाच्या एका मोठ्या अधिकाऱ्यानें चौ राजांची नोकरी करण्याऐवजीं देशत्यागाचा स्वीकार केला. त्यासाठीं सुमारें ५००० अनुयायांसह त्यानें चीन देश सोडला व तो कोरियांत निघून गेला. या देशाला त्यानें प्रभातकालीन शांतीचा प्रदेश – चोसन – असें नांव दिलें. कोरिया किंवा चोसन हा देश चीनच्या पूर्व दिशेला आहे. त्यामुळें कि चेचा प्रवास पूर्व दिशेला उदयास येणाऱ्या सूर्याच्या सन्मुख असा झाला. कदाचित् त्याला वाटलें असेल, कीं पूर्वेच्या अतिशय शेवटच्या टोंकाच्या देशांत आपण पोंचलों, म्हणून त्यानें हें असें नांव दिलें असेल. अशा रीतीनें ख्रिस्ती सनाच्या पूर्वी ११०० वर्षें कि चेचें आगमन कोरियांत झालें. तेव्हांपासून त्या देशाच्या इतिहासास सुरुवात झाली. कि चेनें आपल्याबरोबर या नव्या देशात चिनी कला व कारागिरी, शिल्पकला, वास्तुशास्त्र, शेती

आणि रेशीम तयार करण्याची कला याही गोष्टी आणल्या. कि चेच्या मागून आणखीही कांहीं लोक चीनमधून निघून तेथें आले. कि चेच्या वंशांतील राजांनीं चोसनवर ९०० वर्षांहून अधिक कालपर्यंत राज्य केलें.

अर्थात् चोसन हा कांहीं पूर्वेकडील अगदीं शेवटचा देश वास्तविक नव्हता. आपण पाहतोंच, कीं त्याच्याही पूर्वेला जपान आहे. परंतु कि चे कोरियांत आला त्या वेळीं जपानमध्यें काय अवस्था होती याची आपल्याला कांहींच माहिती नाहीं. जपानचा इतिहास चीनच्याइतका प्राचीन तर नाहींच, पण कोरियाइतका सुद्धां तो जुना नाहीं. जपानी लोकच म्हणतात, कीं जपानचा पहिला सम्राट् जिम्मू टेन्नो या नांवाचा असून खिस्तापूर्वीं ६०० ते ७०० वर्षांच्या सुमाराला तो राज्य करीत होता. जपानमध्यें सूर्याला एक देवता – स्त्री – मानतात. या सूर्यदेवतेपासून आपल्या या बादशहाचा वंश निर्माण झाला अशी जपानी लोकांची समजूत आहे. हल्लींच्या जपानच्या बादशहाचा जन्म थेट या जिम्मू टेन्नोच्याच वंशामध्यें झालेला आहे व अशा रीतीनें तोही एक प्रकारें सूर्यांचाच वंशज आहे, अशीही जपानी लोकांची निष्ठा आहे.

तुला माहीतच आहे, कीं आपल्या देशांतही रजपूत लोक अशाच प्रकारें आपले वंशवृक्ष सूर्य किंवा चंद्र यांच्यापर्यंत मागें नेतात. सूर्यवंशी म्हणजे सूर्यापासून झालेलें व चंद्रवंशी म्हणजेच चंद्रापासून झालेलें, अशीं त्यांचीं दोन मुख्य घराणीं आहेत. उदेपूरचे महाराजे हे सूर्यवंशी घराण्याचे प्रमुख असून मागें फार लांबपर्यंत ते आपली वंशावळ सांगतात. हे रजपूत लोक म्हणजे मोठे बहादूर लोक असून त्यांचें शौर्य आणि धीरोदात्तपणा यांच्या कथांना अंतच नाहीं.

१२

गतकालाची गुणगुण

१७ जानेवारी, १९३१

आतांपर्यंत आपण सामान्यतः २५०० वर्षांपूर्वीच्या सुमारास जगाची जी अवस्था बहुधा असावी, तिचें थोडेंसें निरीक्षण केलें. आपलें हें निरीक्षण अगदींच तोटकें आणि मर्यादित स्वरूपाचें झालें आहे. त्यांतसुद्धां ज्या देशांची पुष्कळशी सुधारणा झालेली होती किंवा ज्यांचा कांहीं तरी स्पष्टसा इतिहास आपल्याला माहीत आहे. अशाच देशांचा फक्त आपण विचार केला. ईजिप्तमध्यें तर ज्या संस्कृतींतून पिरामिड किंवा स्फिन्स्कचा पुतळा आणि अशाच इतर – ज्यांची यादीसुद्धां येथें देणें आपल्याला शक्य नाहीं अशा – गोष्टी निर्माण झाल्या त्या संस्कृतींचा नुसता नामनिर्देशच तेवढा आपण करूं शकलों. ज्या काळाचा आपण विचार करतों आहों त्या सुमारास, इतक्या प्राचीन

काळींच, या संस्कृतींच्या वैभवाचा दिवस वर येऊन उताराला सुद्धां लागला होता. नोससच्याही अंताचा काळ या सुमारास अगदीं जवळ येऊन ठेपला होता. चीनमध्यें केवढ्या मोठ्या दीर्घ काळच्या इतिहासाचा आपण शोध घेतला. त्या काळांत चीनमध्यें साम्राज्यसत्ता कशी उदयास आली, लेखनकला, रेशीम व त्यासारख्या कितीक सुंदर वस्तू निर्माण करण्याच्या कला तेथें कशा निर्माण झाल्या, हेंही आपण पाहिलें. कोरिया व जपान यांचें ओझरतें दर्शन आपण घेतलें. हिंदुस्थानमध्यें सिंधु नदीच्या खोऱ्यांत मोहेंजोदारोपाशीं जे अवशेष खणून काढण्यांत आले आहेत, त्यांवरून दिसून येणाऱ्या संस्कृतीचा अगदींच ओझरता उल्लेख मात्र आपण केला. त्यानंतर द्रविड-संस्कृति व त्या लोकांचा परदेशांशीं होणारा व्यापार यांबद्दल थोडा उल्लेख करून आपण आर्यांचा थोडा इतिहास पाहिला. त्यांत आर्यांनीं निर्माण केलेले उपनिषदें व वेद यांसारखे ग्रंथ व रामायण-महाभारत यांसारखीं महाकाव्यें यांचा आपण उल्लेख केला; तसेंच साऱ्या उत्तर हिंदुस्थानभर आर्यांच्या वसाहती कशा पसरल्या, दक्षिणेकडेही त्यांनीं प्रवेश कसा केला, प्राचीन द्रविडांशीं त्यांचा संबंध कसा आला आणि कांहीं अंशीं द्रविड परंतु बहुतांशीं आर्य अशी एक मिश्र सामाजिक व्यवस्था व संस्कृति त्यांनीं या देशांत कशी निर्माण केली, हें थोडेंसें आपण पाहत गेलों. विशेषतः लोकशाहीच्या पायावर आधारलेलीं अशीं त्यांचीं गांवराज्यें कशीं निर्माण झालीं, त्यांतून मोठमोठालीं शहरें व नगरें कशीं निर्माण झालीं व अरण्यांतील आश्रमांतून विश्वविद्यापीठें कशीं उदयास आलीं, याचें आपण निरीक्षण केलें. मेसापोटेमिया व इराण यांच्यामध्यें साम्राज्यांमागून साम्राज्यें उदयास येऊन लय पावलीं या गोष्टीचा अगदीं थोडक्यांत उल्लेख मात्र आपण केला; त्यांतच पुढच्या काळांत दारियसचें साम्राज्य थेट हिंदुस्थानांत सिंधु नदापर्यंत कसें पसरलें होतें हें विशेषतः आपण पाहिलें. पॅलेस्टाइनमध्यें आपण हिब्रू किंवा ज्यू लोकांचें ओझरतें दर्शन घेतलें. वास्तविक जगाच्या एका एवढ्याशा कोपऱ्यांत राहणारे हे लोक, परंतु जगाचें फार मोठें लक्ष त्यांनीं वेधून घेतलेलें आहे. त्यांचे राजे डेविड व सालोमन यांच्यापेक्षां श्रेष्ठ असे राजे जगांत पुष्कळ होऊन गेले. परंतु अशांची जगाला आठवण राहिली नाहीं आणि यांची मात्र आठवण चांगली राहिली आहे. याचें कारण एवढेंच, कीं या इतिहासाचा व राजांचा उल्लेख बायबलमध्यें करण्यांत आलेला आहे. ग्रीसमध्यें त्यापूर्वीच्या नोससच्या नष्ट केलेल्या संस्कृतीच्या थडग्यावर नवी आर्यांची संस्कृति कशी रुजली आणि फुलली, तेथें मग नगरराज्यें स्थापन झालीं व भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर ग्रीकांच्या वसाहती कशा झाल्या, हाही इतिहास आपण पाहिला. रोम शहर त्या वेळीं अजून वैभवाला चढलेलें नव्हतें आणि त्याचें अत्यंत कडवें प्रतिस्पर्धी शहर जें कार्थेज, तें नुकतेंच इतिहासाच्या क्षितिजावर डोकें वर काढूं लागलें होतें.

या सर्व घटनांचें अगदींच ओझरतें दर्शन आपण घेतलें. यामध्यें ज्यांचा उल्लेख केला नाहीं, अशा देशांसंबंधींही कांहीं कांहीं माहिती मी तुला सांगूं शकलों असतों.

उदाहरणार्थ, उत्तर यूरपमधील देश व आग्नेय आशियातील देश. या प्राचीन काळीं सुद्धां दक्षिण हिंदुस्थानांतील दर्यावर्दी लोक बंगालच्या उपसागराच्यापलीकडे मलाया द्वीपकल्प व त्याच्या दक्षिणेचीं बेटें येथपर्यंत जाण्याचें धाडसी काम यशस्वीपणें करीत असत. परंतु काय सांगायचें आणि काय नाहीं याची कांहीं तरी एक मर्यादा आंखून घेऊन आपण ती संभाळलीच पाहिजे. नाहीं तर आपलें गाडें पुढें म्हणून कधीं जाणारच नाहीं.

आपण ज्या देशांचा विचार केला ते देश प्राचीन काळच्या एका जगाचे विभाग होत, असें आज मानण्याची वहिवाट आहे. परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं त्या काळीं दूरदूरच्या देशांमध्यें दळणवळणाचीं म्हणण्याजोगीं साधनेंच नव्हतीं. व्यापारासाठीं अथवा अन्य हेतूनें धाडसी दर्यावर्दी लोक समुद्र ओलांडून या देशांहून त्या देशांत जात असत किंवा कांहीं लोक जमिनीवरूनही लांबलांबचे प्रवास करीत असत हें खरें; परंतु या कामांत धोका फार असल्यामुळें असे प्रवास फारच क्वचित् होत. भूगोलाचें वर्णन त्या काळीं जवळजवळ मुळींच ठाऊक नव्हतें. पृथ्वी वाटोळी नसून सपाट आहे, असें मानीत असत. अशा स्थितींत अगदीं जवळजवळच्या देशांखेरीज निरानिराळ्या देशांची कोणाला कांहींच माहिती नसे. उदाहरणार्थ, ग्रीसमधील लोकांना चीन अगर हिंदुस्थान यांची जवळजवळ कांहीं माहिती नव्हती; तर चिनी किंवा हिंदी लोकांना भूमध्यसमुद्रालगतच्या देशांविषयीं क्वचितच कांहीं माहिती असावयाची.

प्राचीन हिंदुस्थानचा एखादा नकाशा मिळाला, तर तो एकदां चांगला पहा. प्राचीन ग्रंथकारानीं केलेलीं जगाचीं कांहीं कांहीं वर्णनें वाचून किंवा त्यांनीं रेखाटलेले नकाशे पाहून मोठी गंमत वाटते. त्या नकाशांत दिलेले कितीएक देशांचे आकार मोठेच विचित्र आणि कांहींच्या बाहींच आढळतात. जुन्या काळच्या जगाचे आधुनिक काळीं तयार केलेले नकाशे त्यापेक्षां पुष्कळच अधिक उपयुक्त असतात; आणि या काळचा इतिहास वाचीत असतांना अशा नकाशांचा तूं वेळोवेळीं उपयोग करीत जावास असें मला वाटतें. नकाशाचा फार उपयोग होतो. त्याच्यावांचून इतिहासाची खरी कल्पना येणें अशक्य आहे. खरें म्हणजे इतिहासाचा अभ्यास करावयाचा, तर मिळतील तितके नकाशे व जुन्या इमारती आणि बांधकामें, मोडतोड झालेलीं ठिकाणें व अशाच आजवर टिकून राहिलेल्या अवशेषांचीं मिळतील तितकीं चित्रें माणसानें मिळविलीं पाहिजेत. इतिहासाच्या निर्जीव सांगाड्यामध्यें अशा चित्रांमुळें एक प्रकारें जिवंतपणा व भरीवपणा उत्पन्न होतो. इतिहासापासून आपल्याला खरोखरच कांहीं बोध मिळावयाचा असेल, तर इतिहासांतील सर्व प्रसंगांचीं चित्रें आपल्या डोळ्यांपुढें एका मागोमाग इतकीं प्रत्यक्ष उठून उभीं राहिलीं पाहिजेत, कीं वाचीत असतांना जणुं कांहीं त्याच क्षणीं ते ते प्रसंग प्रत्यक्ष आपल्यापुढेंच घडत आहेत असा भास होत असावा. अत्यंत चित्तवेधक नाटकाप्रमाणें त्यांनीं आपल्या मनाची पक्की पकड घेतली पाहिजे. मग केव्हां तें हास्यरसपर नाटक असेल, केव्हां शोकरसपूर्ण असेल; त्यांतील रंगभूमि म्हणजे हें सारें जग आणि पात्रें म्हणजे प्राचीन काळांतील श्रेष्ठ स्त्री-पुरुष.

इतिहासाच्या या चित्रपटाचें स्वरूप चांगल्या रीतीनें डोळ्यांत भरावयाला चित्रें आणि नकाशे यांचा बराच उपयोग होतो. प्रत्येक मुलाला किंवा मुलीला अशीं चित्रें व नकाशे सहज मिळण्याची सोय असली पाहिजे. परंतु चित्रांपेक्षांही प्राचीन इतिहासांतील निरनिराळे अवशेष व मोडतोड झालेलीं ठिकाणें प्रत्यक्ष पहायला मिळणें हें त्याहून केव्हांही चांगलें. अर्थात् या गोष्टी साऱ्या जगभर पसरलेल्या असतात. त्या सगळ्याच आपल्याला पहायला मिळणें शक्य नाहीं. परंतु डोळे उघडे ठेवले, तर आपल्यापैकीं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं तरी अवशेष पहायला मिळणें शक्य आहे. मोठमोठ्या पदार्थ-संग्रहालयांतून असे कांहीं छोटे छोटे अवशेष व संस्मरणीय वस्तू संग्रहीत केलेल्या असतात. हिंदुस्थानमध्यें पूर्वीच्या इतिहासाचे असे विपुल अवशेष आहेत; परंतु त्यांत अगदीं प्राचीन काळांतील अवशेष फारच थोडे आहेत. मोहेंजोदारो आणि हरप्पा हीं दोनच ठिकाणें काय तीं अशा अति प्राचीन काळच्या अवशेषांचीं दाखविण्याजोगीं उदाहरणें सध्यां तरी आहेत. असें असेल, कीं पूर्वीच्या काळच्या पुष्कळशा इमारती येथील उष्ण हवेंत मोडून धुळीस मिळून गेल्या असतील. परंतु याहूनही खरा संभव असा आहे, कीं अशा पुष्कळ इमारती जमिनीखालीं गाडून गेलेल्या अशा अद्यापही शाबूत असाव्या. फक्त त्यांचें उत्खनन होणें जरुरीचें आहे. त्या जसजशा आपण खणून काढूं आणि जुने शिलालेख आणि निरनिराळ्या संस्मरणीय वस्तू जसजशा आपल्याला उपलब्ध होत जातील, तसतशीं आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासग्रंथांचीं अधिकाधिक पानें आपल्याला वाचावयाला मिळतील. दगड, विटा व चुना यांच्यावर लिहिलेल्या इतिहासांतल्या त्या वृत्तांतामध्यें प्राचीन, अति प्राचीन अशा काळीं आपले पूर्वज काय करीत होते, याचीं वर्णनें आपणांस वाचावयास मिळतील.

तूं दिल्लीस गेलेली आहेस. हल्लींच्या दिल्ली शहराच्या आसपासचे जुन्या शहराचे मोडतोड झालेले कांहीं भाग व कांहीं जुन्या इमारती तूं पाहिल्या आहेस. पुन्हां जेव्हां तेथें जाऊन पाहशील तेव्हां प्राचीन काळचा विचार मनांत आण, म्हणजे या इमारती व हे अवशेष तुला भूतकाळांत ओढून नेतील आणि कोणत्याही ग्रंथांतल्या इतिहासापेक्षां अधिक चांगला इतिहास ते तुला सांगतील. थेट महाभारताच्या काळापासून दिल्लीमध्यें किंवा त्याच्या आसपास लोक राहत आलेले आहेत; वेळोवेळीं त्यांनीं तेथील नगरीला वेगवेगळीं नांवें दिलेलीं आहेत. इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, तुघलखाबाद, शहाजहानाबाद, हीं चार नांवें तेवढीं आतां आठवतात मला. सगळीं कांहीं आठवत नाहींत. परंतु परंपरा मात्र अशी आहे, कीं दिल्ली शहर सात वेळां सात निरनिराळ्या ठिकाणीं वसवावें लागलेलें आहे. कारण यमुनेचें वेळोवेळीं आकस्मिकपणें बदलणारें पात्र. आज आपण पाहतों तें रेझीना किंवा नवी दिल्ली, हें या देशाच्या सध्यांच्या राज्यकर्त्यांच्या हुकुमावरून बांधलेलें आठवें शहर होय. दिल्लीमध्यें साम्राज्यामागून साम्राज्यें वैभवाला चढत आलीं आहेत आणि नष्ट झालेलीं आहेत.

आपल्या देशांतील प्राचीनांतील प्राचीन शहर जें वाराणशी (बनारस) किंवा

काशी, तेथें जा आणि ती नगरी काय गुणगुणते, तें नीट कान देऊन ऐक. 'कितीक साम्राज्यें गेलीं, तरी मी उभीच आहें; बुद्धदेव आपला नव्या धर्माचा संदेश घेऊन माझ्याच ठिकाणीं आले; शांति आणि समाधान प्राप्त करून घेण्यासाठीं आजपर्यंत कोट्यवधि लोकांनीं माझा आसरा घेतला' हेंच ती तुला सांगेल, नव्हे ? वाराणशी क्षेत्र जुनाट आहे, पांढरे केस झालेल्या म्हाताऱ्यासारखें जखवड आहे, मोडकें-तोडकें आहे, घाणीचें आगर आहे, हें सगळें खरें; तथापि त्याच्यामध्येंही एक प्रकारचा जिवंतपणा आहे, युगानुयुगाचें सामर्थ्य जणुं त्यामध्यें एकवटलेलें आहे; असें हें वाराणशीचें क्षेत्र आहे. काशीचें सौंदर्य आणि अलौकिकत्व सदैव लोभनीय आहे; कारण तिच्या विस्तारामध्यें आपल्याला प्रत्यक्ष प्राचीन हिंदुस्थानचें दर्शन घ्यावयाला मिळतें आणि तिच्या नदीच्या मंद निनादांत प्राचीन, अति प्राचीन काळाचे आवाज आपल्याला ऐकूं येतात.

इतकें लांब नको असेल, तर आपल्या अलाहाबाद किंवा प्रयागमधील अशोकाच्या स्तंभाकडे जा. त्याच्यावर तो अशोकाच्या आज्ञेवरून कोरलेला लेख वाच. म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीच्या अशोकाचाच आवाज जणुं प्रत्यक्ष आपल्या कानीं येतो आहे, असें तुझ्या प्रत्ययाला येईल.

१३

संपत्ति जाते कोठें ?

१८ जानेवारी, १९३१

तूं मसूरीस असतांना तुला मीं जीं पत्रें पाठविलीं त्यांमध्यें मनुष्याची जसजशी सुधारणा होऊं लागली तसतसे त्यांत भिन्न भिन्न वर्ग कसे पडत गेले, हें दाखविण्याचा प्रयत्न मीं केला होता. अगदीं पहिल्या पहिल्या काळांतील माणसाला अन्न मिळविण्यासाठीं साऱ्या आयुष्यभर फार कष्ट पडत. दिवसानुदिवस शिकार तरी करायची किंवा फळेंमुळें शोधीत बसावयाचें; अशा रीतीनें अन्नासाठीं एकसारखें रानोमाळ भटकत राहावयाचें, असें त्या काळीं माणसांना करावें लागे. हळूहळू मग त्यांच्यामध्यें टोळ्या निर्माण झाल्या. वस्तुतः मोठमोठीं कुटुंबें म्हणजेच एकेक टोळी होई; ही सर्व मंडळी एकत्र राहायची व एकत्र शिकार करायची; कारण एकेकट्यानें राहण्यापेक्षां यांत धोका कमी. यानंतर एक फार मोठा बदल घडून आला. शेतकीचा शोध लागला व त्यामुळें फारच प्रचंड घडामोड झाली. सदासर्वकाळ शिकार करून राहण्यापेक्षां शेतीच्या मार्गानें शेतावरच राहून अन्न उत्पन्न करणें हें माणसांना जास्त सोपें

वाटूं लागलें. नांगरटी करायची, पेरणी-कापणी करायची म्हणजे शेतावरच राहिलें पाहिजे हें ओघानेंच आलें. पहिल्याप्रमाणें माणसांना आतां मन मानेल तसें भटकतां येईनासें झालें; शेताशेजारींच वसती करणें त्यांना भाग पडलें. अशामुळें खेडीं आणि शहरें निर्माण झालीं.

शेतकीबरोबर आणखीही कित्येक बदल घडून आले. शेतात जें अन्न निर्माण होत असे, तें कांहीं ताबडतोब खाऊन फस्त करणें शक्य नव्हतें. रोजच्या गरजेपेक्षां पुष्कळच अधिक खाद्य-पदार्थ शेतींतून निर्माण होत व तो वाढावा सांठवून ठेवण्याची आवश्यकता असे. शिकारीच्या काळांतल्यापेक्षां आतां जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचें होऊं लागलें; काम करणारांचे निरनिराळे वर्ग होऊं लागले. कोणी प्रत्यक्ष शेतांत काम करीत; कोणी बाहेरचें काम करीत; कोणी देखरेखीचें आणि संघटनेचें काम करीत. हे जे देखरेख करणारे आणि संयोजक लोक होते, ते हळूहळू अधिक प्रबळ झाले आणि त्यांच्यांतूनच पुढें मुखी, कुलपती, सत्ताधारी राजे आणि रजवाडे निर्माण झाले. त्यांच्या हातांत सामर्थ्य आणि सत्ता असे; त्यामुळें प्रत्यक्ष गरजेहून अधिक निर्माण झालेल्या खाद्य-पदार्थांपैकीं बराचसा मोठा हिस्सा ते आपल्या स्वतःकरितां राखून ठेवीत. अशा रीतीनें ते अधिकाधिक श्रीमंत होऊं लागले, तर जे लोक प्रत्यक्ष शेतांत काम करीत असत त्यांना फक्त जेमतेम पोटापुरतेंच मिळूं लागलें. पुढें असा एक काळ आला, कीं हे देखरेख करणारे आणि व्यवस्थापक अतिशय आळशी किंवा नालायक बनले; आपले हे उद्योग नीट व्यवस्थित चालविण्याचें कामसुद्धां त्यांना करतां येईनासें झालें. ते करायचे नाहींत कांहीं; परंतु कामकऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या खाद्य-पदार्थांपैकीं भला मोठा हिस्सा मात्र स्वतःला घेण्यास कधीं चुकावयाचे नाहींत; एवढेंच नव्हे, तर ते असेंही मानूं लागले, कीं आपण स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यांनीं केलेल्या श्रमावर अशा रीतीनें जगण्याचा आपल्याला पुरेपूर हक्कच आहे.

अशा रीतीनें शेतीच्या उदयामुळें जीवनांत फारच प्रचंड फरक झाला हें तुला दिसून येईल. खाद्य-पदार्थ निर्माण करण्याचीं साधनें – पद्धति – सुधारलीं; पहिल्याहून हें काम सुलभ झालें. शेतीनें जसें हें केलें, तसाच समाजाचा सर्व पायाच तिनें बदलून टाकला. माणसाला त्यामुळें अधिक फुरसतीचा वेळ मिळूं लागला. निरनिराळे वर्ग निर्माण झाले. प्रत्येकालाच कांहीं खाद्य-पदार्थ निर्माण करण्यांत गुंतून राहावें लागत नाहींसें झालें; कांहीं लोकांना दुसरीं कामें करण्याला सवड मिळूं लागली. हरएक प्रकारचे हस्तव्यवसाय, कारागिरी सुरू झाली आणि त्यांतून निरनिराळे धंदे उत्पन्न झाले. तथापि, समाजांतील सत्ता मात्र मुख्यतः व्यवस्थापकांचा जो वर्ग होता त्याच्याकडेच राहिली.

पुढच्या काळच्या इतिहासांत सुद्धां खाद्य-पदार्थ किंवा इतर उपयुक्त वस्तू निर्माण करण्याच्या नव्या नव्या पद्धतींनीं किती मोठाले बदल समाजात घडवून आणले, हें तुला पुढें दिसून येईल. पुढें पुढें आतांइतकीच दुसऱ्या कितीएक वस्तूंची गरज

६६३७
५१

मनुष्याला भासूं लागली. त्यामुळें उत्पादनपद्धतींत मोठमोठाले फरक होऊं लागले. असा कोणताही मोठा फरक उत्पादनपद्धतींत झाला, कीं त्याचा परिणाम म्हणजे समाजपद्धतींतही तितकाच मोठा बदल व्हावयाचा. एक उदाहरण देतों तुला : वाफेचा उपयोग जेव्हां कारखान्यांचीं यंत्रें, आगगाड्या आणि बोटी चालविण्यासाठीं होऊं लागला, तेव्हां वस्तू उत्पन्न करण्याची पद्धति आणि त्यांच्या वांटणीची पद्धति यांच्यामध्यें फार मोठा बदल घडून आला. कारागीर किंवा कसची लोक हातानें किंवा आपल्या साध्या साध्या हत्यारांनीं करूं शकत, त्यापेक्षां वाफेवर चालणारे कारखाने किती तरी पटीनें वस्तू जलद निर्माण करूं लागले. मोठें यंत्र म्हणजे असें एकेक प्रचंड हत्यारच होतें. बरें, इकडे आगगाड्या आणि आगबोटी खाद्य-पदार्थ आणि कारखान्यांतून तयार झालेला माल दूरदूरच्या देशात जलद नेऊं लागल्या. यामुळें साऱ्या जगांत केवढी घडामोड झाली असेल, केवढा बदल झाला असेल, याची तुला सहज कल्पना करतां येईल.

खाद्य-पदार्थ आणि इतर वस्तू अधिकाधिक जलद उत्पन्न करण्याच्या नव्या नव्या पद्धती इतिहासांत वेळोवेळीं शोधून काढण्यांत आलेल्या आहेत. त्यावरून तुझी स्वाभाविक अशी समजूत होईल, कीं जसजशा अधिक अधिक चांगल्या उत्पादनाच्या पद्धती निर्माण होतील, तसतशा पुष्कळच अधिकाधिक वस्तू निर्माण होतील; त्यामुळें जगांतील संपत्ति वाढेल आणि प्रत्येक माणसाला पहिल्यापेक्षां अधिकाधिक प्राप्ति होऊं लागेल. एक पक्षीं तुझी समजूत बरोबर आहे; तर दुसऱ्या पक्षीं चुकीची आहे. जगांत उत्पादनाच्या चांगल्या पद्धती आल्यामुळें जगांतील संपत्ति खरोखरच वाढली आहे. पण कोणत्या जगाची? आमच्या देशामध्यें तर अजूनही दारिद्र्य आणि दैन्य प्रचंड प्रमाणांत आहे, हें कोणालाही सहज दिसण्यासारखें आहे. पण इंग्लंड एवढा सुसंपन्न देश आहे ना! तेथें सुद्धां हीच दशा आहे. कां? कोठें जात असेल ही संपत्ति? मोठी नवलाची गोष्ट आहे नव्हे, कीं एकसारखी जास्त जास्त संपत्ति निर्माण होत आहे आणि तरी सुद्धां गरीब ते गरीबच राहिले आहेत! कांहीं कांहीं देशांत त्यांची स्थिति थोडी थोडी सुधारली आहे खरी. परंतु नवीन निर्माण झालेल्या संपत्तीचें प्रमाण पाहिलें, तर ही सुधारणा म्हणजे कांहींच नव्हे. तथापि थोडा विचार केला तरी पुष्कळ अंशीं ही सर्व संपत्ति कोणाकडे जाते, हें आपल्याला सहज समजून येण्यासारखें आहे. ज्यांचा नेहमींचा धंदा व्यवस्थापकाचा किंवा संघटकाचा आहे, ते लोक जगांतील प्रत्येक चांगल्या वस्तूचा भला मोठा हिस्सा आपल्याच हातीं पडावा यासाठीं दक्ष असतात आणि त्यांच्याचकडे ही सारी संपत्ति जाते. त्यांतही विशेष चमत्कार असा, कीं जे लोक प्रत्यक्ष कष्ट करणें तर दूरच राहूं द्या, पण नांवाला म्हणून काम करण्याचें नुसतें नाटकसुद्धां केल्यासारखें करीत नाहींत आणि तरीही दुसऱ्याच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या संपत्तीचा अधिकांत अधिक हिस्सा मात्र स्वतःकडे घेतात, अशा लोकांचे वर्गच आजकाल समाजांत निर्माण झालेले आहेत. आणखी कदाचित् तुला खरें सुद्धां वाटणार नाहीं, कीं समाजांत अशा

वाटूं लागलें. नांगरटी करायची, पेरणी-कापणी करायची म्हणजे शेतावरच राहिलें पाहिजे हें ओघानेंच आलें. पहिल्याप्रमाणें माणसांना आतां मन मानेल तसें भटकतां येईनासें झालें; शेताशेजारींच वसती करणें त्यांना भाग पडलें. अशामुळें खेडीं आणि शहरें निर्माण झालीं.

शेतकीबरोबर आणखीही कित्येक बदल घडूंन आले. शेतात जें अन्न निर्माण होत असे, तें कांहीं ताबडतोब खाऊन फस्त करणें शक्य नव्हतें. रोजच्या गरजेपेक्षां पुष्कळच अधिक खाद्य-पदार्थ शेतींतून निर्माण होत व तो वाढावा सांठवून ठेवण्याची आवश्यकता असे. शिकारीच्या काळांतल्यापेक्षां आतां जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचें होऊं लागलें; काम करणारांचे निरनिराळे वर्ग होऊं लागले. कोणी प्रत्यक्ष शेतांत काम करीत; कोणी बाहेरचें काम करीत; कोणी देखरेखीचें आणि संघटनेचें काम करीत. हे जे देखरेख करणारे आणि संयोजक लोक होते, ते हळूहळू अधिक प्रबळ झाले आणि त्यांच्यांतूनच पुढें मुखी, कुलपती, सत्ताधारी राजे आणि रजवाडे निर्माण झाले. त्यांच्या हातांत सामर्थ्य आणि सत्ता असे; त्यामुळें प्रत्यक्ष गरजेहून अधिक निर्माण झालेल्या खाद्य-पदार्थांपैकीं बराचसा मोठा हिस्सा ते आपल्या स्वतःकरितां राखून ठेवीत. अशा रीतीनें ते अधिकाधिक श्रीमंत होऊं लागले, तर जे लोक प्रत्यक्ष शेतांत काम करीत असत त्यांना फक्त जेमतेम पोटापुरतेंच मिळूं लागलें. पुढें असा एक काळ आला, कीं हे देखरेख करणारे आणि व्यवस्थापक अतिशय आळशी किंवा नालायक बनले; आपले हे उद्योग नीट व्यवस्थित चालविण्याचें कामसुद्धां त्यांना करतां येईनासें झालें. ते करायचे नाहींत कांहीं; परंतु कामकऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या खाद्य-पदार्थांपैकीं भला मोठा हिस्सा मात्र स्वतःला घेण्यास कधीं चुकावयाचे नाहींत; एवढेंच नव्हे, तर ते असेंही मानूं लागले, कीं आपण स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यांनीं केलेल्या श्रमावर अशा रीतीनें जगण्याचा आपल्याला पुरेपूर हक्कच आहे.

अशा रीतीनें शेतीच्या उदयामुळें जीवनांत फारच प्रचंड फरक झाला हें तुला दिसून येईल. खाद्य-पदार्थ निर्माण करण्याचीं साधनें – पद्धति – सुधारलीं; पहिल्याहून हें काम सुलभ झालें. शेतीनें जसें हें केलें, तसाच समाजाचा सर्व पायाच तिनें बदलून टाकला. माणसाला त्यामुळें अधिक फुरसतीचा वेळ मिळूं लागला. निरनिराळे वर्ग निर्माण झाले. प्रत्येकालाच कांहीं खाद्य-पदार्थ निर्माण करण्यांत गुंतून राहावें लागत नाहींसें झालें; कांहीं लोकांना दुसरीं कामें करण्याला सवड मिळूं लागली. हरएक प्रकारचे हस्तव्यवसाय, कारागिरी सुरू झाली आणि त्यांतून निरनिराळे धंदे उत्पन्न झाले. तथापि, समाजांतील सत्ता मात्र मुख्यतः व्यवस्थापकांचा जो वर्ग होता त्याच्याकडेच राहिली.

पुढच्या काळच्या इतिहासांत सुद्धां खाद्य-पदार्थ किंवा इतर उपयुक्त वस्तू निर्माण करण्याच्या नव्या नव्या पद्धतींनीं किती मोठाले बदल समाजात घडवून आणले, हें तुला पुढें दिसून येईल. पुढें पुढें आतांइतकीच दुसऱ्या कितीएक वस्तूंची गरज

0639
५१

मनुष्याला भासूं लागली. त्यामुळें उत्पादनपद्धतींत मोठमोठाले फरक होऊं लागले. असा कोणताही मोठा फरक उत्पादनपद्धतींत झाला, कीं त्याचा परिणाम म्हणजे समाजपद्धतींतही तितकाच मोठा बदल व्हावयाचा. एक उदाहरण देतों तुला : वाफेचा उपयोग जेव्हां कारखान्यांचीं यंत्रें, आगगाड्या आणि बोटी चालविण्यासाठीं होऊं लागला, तेव्हां वस्तू उत्पन्न करण्याची पद्धति आणि त्यांच्या वांटणीची पद्धति यांच्यामध्यें फार मोठा बदल घडून आला. कारागीर किंवा कसबी लोक हातानें किंवा आपल्या साध्या साध्या हत्यारांनीं करूं शकत, त्यापेक्षां वाफेवर चालणारे कारखाने किती तरी पटीनें वस्तू जलद निर्माण करूं लागले. मोठें यंत्र म्हणजे असें एकेक प्रचंड हत्यारच होतें. बरें, इकडे आगगाड्या आणि आगबोटी खाद्य-पदार्थ आणि कारखान्यांतून तयार झालेला माल दूरदूरच्या देशात जलद नेऊं लागल्या. यामुळें साऱ्या जगांत केवढी घडामोड झाली असेल, केवढा बदल झाला असेल, याची तुला सहज कल्पना करतां येईल.

खाद्य-पदार्थ आणि इतर वस्तू अधिकाधिक जलद उत्पन्न करण्याच्या नव्या नव्या पद्धती इतिहासांत वेळोवेळीं शोधून काढण्यांत आलेल्या आहेत. त्यावरून तुझी स्वाभाविक अशी समजूत होईल, कीं जसजशा अधिक अधिक चांगल्या उत्पादनाच्या पद्धती निर्माण होतील, तसतशा पुष्कळच अधिकाधिक वस्तू निर्माण होतील; त्यामुळें जगांतील संपत्ति वाढेल आणि प्रत्येक माणसाला पहिल्यापेक्षां अधिकाधिक प्राप्ति होऊं लागेल. एक पक्षीं तुझी समजूत बरोबर आहे; तर दुसऱ्या पक्षीं चुकीची आहे. जगांत उत्पादनाच्या चांगल्या पद्धती आल्यामुळें जगांतील संपत्ति खरोखरच वाढली आहे. पण कोणत्या जगाची? आमच्या देशामध्यें तर अजूनही दारिद्र्य आणि दैन्य प्रचंड प्रमाणांत आहे, हें कोणालाही सहज दिसण्यासारखें आहे. पण इंग्लंड एवढा सुसंपन्न देश आहे ना! तेथें सुद्धां हीच दशा आहे. कां? कोठें जात असेल ही संपत्ति? मोठी नवलाची गोष्ट आहे नव्हे, कीं एकसारखी जास्त जास्त संपत्ति निर्माण होत आहे आणि तरी सुद्धां गरीब ते गरीबच राहिले आहेत! कांहीं कांहीं देशांत त्यांची स्थिति थोडी थोडी सुधारली आहे खरी. परंतु नवीन निर्माण झालेल्या संपत्तीचें प्रमाण पाहिलें, तर ही सुधारणा म्हणजे कांहींच नव्हे. तथापि थोडा विचार केला तरी पुष्कळ अंशीं ही सर्व संपत्ति कोणाकडे जाते, हें आपल्याला सहज समजून येण्यासारखें आहे. ज्यांचा नेहमींचा धंदा व्यवस्थापकाचा किंवा संघटकाचा आहे, ते लोक जगांतील प्रत्येक चांगल्या वस्तूचा भला मोठा हिस्सा आपल्याच हातीं पडावा यासाठीं दक्ष असतात आणि त्यांच्याचकडे ही सारी संपत्ति जाते. त्यांतही विशेष चमत्कार असा, कीं जे लोक प्रत्यक्ष कष्ट करणें तर दूरच राहूं द्या, पण नांवाला म्हणून काम करण्याचें नुसतें नाटकसुद्धां केल्यासारखें करीत नाहींत आणि तरीही दुसऱ्याच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या संपत्तीचा अधिकांत अधिक हिस्सा मात्र स्वतःकडे घेतात, अशा लोकांचे वर्गच आजकाल समाजांत निर्माण झालेले आहेत. आणखी कदाचित् तुला खरें सुद्धां वाटणार नाहीं, कीं समाजांत अशा

लोकांचींच केवढी मानमान्यता असते आणि कितीएक मूर्ख लोकांची अशी श्रद्धा असते, कीं स्वतःच्या उपजीविकेकरितां कांहीं काम करावें लागणें हें मोठें कमीपणाचें आहे; त्यांत मानहानि आहे. अशा प्रकारें 'आधीं कळस मग पाया रे' अशी उलटीपालटी अवस्था झाली आहे जगाची आजकाल. त्यामुळें शेत कसणारा शेतकरी आणि कारखान्यांत काम करणारा कामगार हे जरी जगांतील सारें अन्न आणि सारी संपत्ति निर्माण करीत असले तरी ते स्वतः मात्र गरीबच राहतात, यांत काय नवल? आज आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या गोष्टी बोलत असतों; पण त्या स्वातंत्र्यानें ही उलटी बांगडी जर सरळ व्हायची नसेल, आणि जो प्रत्यक्ष श्रम करतो त्याला त्याच्या श्रमाचें सारें फळ मिळायचें नसेल, तर काय उपयोग आहे अशा स्वातंत्र्याचा? काय किंमत आहे त्याची? राज्यशास्त्र, राज्यकारभार, अर्थशास्त्र, आणि देशांतील संपत्तीच्या विभागणीचें शास्त्र, इत्यादि विषयांवर केवढाले भले मोठे ग्रंथ लिहिले गेले आहेत व जात आहेत. विद्वान् प्राध्यापकांची या विषयांवर प्रवचनें चालू आहेत. पण ही सर्व मोठी खोल चर्चा आणि संशोधन इकडे चालू आहे, तर तिकडे जो काम करतो तो हालच काढतो आहे! दोनशें वर्षांपूर्वी व्हाल्टेअर नांवाचा एक प्रख्यात फ्रेंच गृहस्थ होऊन गेला. राजकारणी मुत्सद्दी आणि त्यांच्याच जातीचे लोक यांविषयीं त्यानें लिहिलें आहे, "जे लोक जमिनीची मेहनत-मशागत करून दुसऱ्या लोकांना जगण्याचीं साधनें निर्माण करून देतात, त्यांना उपासमारीनें मृत्युपंथाला घालविण्याची कला आपल्या सुंदर राजनीतीच्या योगें या राज्यकार्यधुरंधरांनीं शोधून काढलेली आहे."

परंतु मुळींच प्रगति झाली नाहीं, असा मात्र याचा अर्थ नव्हे. रानटी अवस्थेंतूनही मनुष्य हळूहळू सुधारतच गेला आणि भयाण अशा आजूबाजूच्या सृष्टीवरही त्यानें क्रमाक्रमानें आक्रमण केलें. अरण्यें त्यानें तोडून टाकलीं, घरें बांधलीं, शेती करण्यास सुरुवात केली. कांहीं अंशीं माणसानें आतां सृष्टीला जिंकून आपल्या कबजात आणलें आहे अशी एक लोकांची समजूत आहे. परंतु हें सारें भोंगळ बोलणें आहे; तें तितकेंसें वस्तुस्थितीला धरून नाहीं. असें म्हटलें असतां अधिक चांगलें, कीं माणसाला आतां सृष्टीचें पुष्कळच चांगलें ज्ञान होऊं लागलें आहे, आणि जसजसें त्याचें सृष्टीविषयक ज्ञान वाढत गेलें, तसतसें सृष्टीशीं अधिकाधिक सहकार्य संपादन करून आपल्या कामासाठीं तिचा उपयोग करून घेण्यांत त्याला यश आलें आहे. जुन्या काळीं माणसांना निसर्ग व निसर्गांतील निरनिराळ्या घटना यांची भीति वाटे. त्यांचा अर्थ समजून घेण्याऐवजीं त्यांची पूजाअर्चा करण्याचा, त्यांना शांत करण्यासाठीं आहुती अर्पण करण्याचा ते प्रयत्न करीत; सृष्टि म्हणजे कोणी एक रानटी हिंस्र पशु आहे, त्याला शांत ठेवलें पाहिजे, चुचकारलें पाहिजे असें त्यांना वाटे. उदाहरणार्थ, मेघनाद, विद्युत्, सांथीचे रोग यांचें त्यांना अतिशय भय वाटे व त्यांच्यापुढें दानधर्म करून, नैवेद्य अर्पण करून ते शांत होतील असें त्यांना वाटे. सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण म्हणजे एक फार मोठी आपत्ति आहे, असें कितीक साध्या-भोळ्या लोकांना अजूनही वाटतें. निसर्ग-

क्रमांतील ही एक अगदीं साधी स्वाभाविक घटना आहे हें नीट समजून न घेतां हे लोक त्यासाठीं केवढी धावाधाव करतात, उपास करतात, स्नानें करतात ; कशासाठीं, तर सूर्य किंवा चंद्र यांना संकटांतून सोडविण्यासाठीं ! पण चंद्र आणि सूर्य स्वतःची काळजी घ्यायला पुरेसे समर्थ आहेत कीं. आपण त्यांच्याबद्दल चिंता करीत बसण्याचें कांहीं कारण नाहीं.

अशा रीतीनें सुधारणा आणि संस्कृति यांची उत्पत्ति व वाढ यांबद्दल आतांपर्यंत आपण थोडें बोललों. लोक भटकण्याचें सोडून शहरांत किंवा खेड्यांत राहूं लागले, तेव्हांपासून सुधारणा व संस्कृति यांची सुरुवात झाली हें आपण पाहिलें. खाद्य-पदार्थ जसजसे अधिकाधिक निर्माण होऊं लागले, तसतसा शिकार किंवा खाणेंपिणें यांहून इतर गोष्टींचा विचार करण्यास माणसाला फुरसत मिळूं लागली. विचाराबरोबरच कलाकौशल्य आणि संस्कृति यांचीही सामान्यतः वाढ होण्यास सुरुवात झाली. पुढें लोकसंख्या वाढली, तसें लोकांना अधिकाधिक जवळजवळ राहणें भाग पडूं लागलें. माणसांच्या नित्य परस्परांशीं गांठीभेटी होऊं लागल्या, त्यांचे एकमेकांशीं व्यवहार सुरू झाले. माणसांनीं एकमेकांशेजारीं राहावयाचें म्हटलें कीं त्यांनीं एकमेकांकडील एकमेकांना संभाळून घेणें हें आवश्यकच झालें. आपला सोबती किंवा शेजारी याला ज्यापासून दुःख होईल तें न केलें पाहिजे, अशी प्रत्येकाच्या वागण्यांत आवश्यकता उत्पन्न झाली ; नाहीं तर सामाजिक जीवन शक्यच होणार नाहीं. उदाहरणार्थ, कुटुंबाचीच गोष्ट घ्या. कुटुंब म्हणजे तरी एक अत्यंत लहान असा समाजच आहे ; आणि त्यामधील मंडळी एकमेकांना संभाळून घेतील तरच त्यांत चांगलें सुख नांदेल. कुटुंबांतील मंडळींत स्वाभाविकच एक प्रेमाचें बंधन असतें ; त्यामुळें एकमेकांबद्दल सद्भाव असणें कुटुंबांत फारसें कठिण नाहीं. तरी सुद्धां कुटुंबामध्येंही आपण दुसऱ्याबद्दल सद्भाव बाळगण्याचें विसरतो आणि वाटतें तितके मोठे सुधारलेले किंवा सुसंस्कृत आपण नाहीं, हें उघड होतें. कुटुंबापेक्षां अधिकाधिक मोठे मनुष्यसंघ जरी घेतले – उदाहरणार्थ, शेजारी-शेजारी, एका शहरांतले लोक, एका देशांतले लोक, किंवा भिन्न भिन्न देशांतील लोक घ्या – तरी त्या सर्वांनाही हाच न्याय लागू आहे. तात्पर्य, लोकसंख्या वाढली तसें सामाजिक जीवन वाढलें आणि त्याचा परिणाम आत्मसंयमन आणि परक्यांबद्दल सद्भाव यांचीही वाढ होण्यांत झाला. संस्कृति आणि सुधारणा यांची व्याख्या करणें कठिण आहे आणि त्या भानगडींत मी पडतही नाहीं. परंतु संस्कृतीमध्यें ज्या कित्येक गोष्टींचा समावेश होतो, त्यांत आत्मसंयम आणि दुसऱ्यांबद्दलचा सद्भाव या गोष्टी मात्र आहेतच आहेत. माणसाच्या अंगीं जर असें आत्मनियंत्रण नसेल किंवा दुसऱ्यांबद्दल सद्भाव नसेल, तर तो मनुष्य असंस्कृत आहे असें आपणांस खात्रीनें म्हणतां येईल.

१४

खिस्तपूर्व सहावें शतक आणि धर्म

२० जानेवारी, १९३१

चला, इतिहासाच्या या प्रचंड लांबीच्या प्रवासाला पुन्हां एकदां आपण लागूं या. आतांशा कोठें आपल्या या प्रवासांतील एका मोठ्याशा खुणेच्या दगडाशीं आपण येऊन पोंचलों आहों. हा काळ सुमारें पंचवीसशें वर्षांपूर्वीचा आहे. अथवा दुसऱ्या प्रकारें बोलायचें तर खिस्ताच्या पूर्वी सुमारें सहा शतकांचा हा काळ आहे. अमुक एक निश्चित घटना या सुमारास अमक्या विशिष्ट वर्षी घडली असें काहीं म्हणावयाचें नाहीं मला. तर एका विशिष्ट कालखंडाची एक कालमर्यादा मी तुला सांगतों आहें. याच काळाच्या सुमारास चीन आणि हिंदुस्थानपासून तों इराण आणि ग्रीसपर्यंत पुष्कळच अत्यंत श्रेष्ठ पुरुष, महान् विचारवंत, धर्मसंस्थापक निरनिराळ्या देशांत होऊन गेलेले आढळतात. हे सगळेजण अगदीं एकाच काळीं झाले असें नव्हे. परंतु खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या अगदीं जवळ आगें मागें ते उदयास आलेले असल्यानें हा काळ विशेष लक्ष देण्यासारखा असा भासतो. विचारांची एक प्रकारची लाटच साऱ्या जगभर त्या काळीं उसळली असली पाहिजे असें भासतें. चालू परिस्थितीबद्दल असंतोष आणि त्याहून कांहीं तरी श्रेष्ठतर अशा जीवनाची उत्कंठा, यांनीं त्या काळांत सगळीकडे खळबळ माजली असली पाहिजे. कारण लक्षांत ठेव, कीं जगांतील सर्व श्रेष्ठ धर्मोपदेशकांचा आहे त्याहून कांहीं तरी श्रेष्ठतर असें संपादन करण्याचा, आपल्या लोकांच्या जीवनांत बदल करण्याचा, त्यांना सुधारण्याचा, त्यांचें दुःख नाहींसें करण्याचाच प्रयत्न नेहमीं होत आलेला आहे. ते सारेजण क्रांतिकारकच होते ; आणि आपापल्या काळच्या दोषांवर हल्ला करण्यास ते मुळींच भीत नव्हते. पूर्वीची परंपरा जर चुकीची ठरूं लागली असेल, पुढच्या प्रगतीला ती जेव्हां आडकाठी होऊन राहत असेल, त्या वेळीं निर्भयपणें ते तिच्यावर हल्ला करीत व ती नाहींशी करीत. याहूनही विशेष म्हणजे आदर्श जीवनाचा एक नमुनाच ते आपल्या स्वतःच्या जीवनामध्यें निर्माण करीत. आणि पुढच्या पिढ्यान् पिढ्यांतील असंख्य जीवांना ध्येयभूत होऊन तो आदर्श त्यांना उत्साह देऊं लागे.

खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या आसपासच्या श्रेष्ठ पुरुषांमध्यें आपल्या हिंदुस्थानांत बुद्ध आणि महावीर हे झाले. चीनमध्यें कॉन्फ्यूशिअस (कांङ् फू चे) आणि लौ चे ; इराणमध्यें झरतुष्ट्र किंवा झोरोआस्टर व ग्रीसमधील सॅमॉन बेटांत पॅथागोरास हे महापुरुष उदयास आले. तुझ्या कानावर हीं नांवें आलेलीं असतील. अर्थात् वेगवेगळ्या प्रसंगांमुळें व कारणांमुळें. शाळेंत जाणाऱ्या सामान्य मुलांमुलींना वाटत असतें, कीं पॅथागोरास हा कुडाला तुंबड्या लावून रिकामटेकडे उद्योग करीत बसणारा कोणी तरी रिकामा न्हावी असावा आणि म्हणूनच भूमितीमध्यें त्यानें शोधून काढलेल्या सिद्धांताची घोकंपट्टी करण्याचें

आपल्या कपाळीं आलें असावें ! काटकोन त्रिकोणाच्या तिन्ही बाजूंवरील चौकोनासंबंधींचा तो त्याच्या नांवावर मोडला जाणारा सिद्धांत युक्लिडच्या किंवा इतरही भूमितीच्या सर्व पुस्तकात दिलेला असतो. परंतु पॅयथागोरासनें भूमितिशास्त्रांत कांहीं नवे सिद्धांत शोधून काढले एवढ्यावरच त्याचें महत्त्व संपत नाहीं; तर तो एक महान् विचारवंत तत्त्वज्ञ होता असें मानलें जातें. त्याच्याबद्दल आपल्याला फारशी माहिती नाहीं. आणि कोणी कोणी मानतात, कीं या नांवाचा मनुष्य कोणी मुळीं झालाच नाहीं.

इराणमधील झोरोआस्टर (झरतुष्ट्राचा काळ बहुधा इसवी सनापूर्वी आठवें शतक हा असावा) हा झोरोऑस्ट्रियन धर्माचा संस्थापक होय असें समजतात. परंतु त्याला या धर्माचा संस्थापक म्हणणें कितपत बरोबर आहे, याबद्दल मला शंका आहे. इराणमधील जुना धर्म व जुनी विचारपरंपरा यांना त्यानें नवें वळण लावलें, असें म्हटलें तर अधिक बरें दिसेल. हा धर्म आज किती तरी दीर्घकाळपर्यंत इराणमध्यें अस्तित्वांतच नाहीं. पुष्कळ काळापूर्वी पारशी लोक हिंदुस्थानांत आले, तेव्हां त्यांनीं हा धर्म आपल्याबरोबर आणला व तेव्हांपासून ते त्याचें येथेंच पालन करीत आहेत.

चीनमध्यें या काळांत दोन श्रेष्ठ पुरुष झाले : कॉन्फ्यूशियस व लौ चे. कॉन्फ्यूशियसचें नांव खरें म्हटलें म्हणजे कांङ् फू चे असें लिहिणें अधिक प्रशस्त आहे. या दोघांपैकीं कोणालाही खरोखर सर्वसामान्य अर्थानें धर्मसंस्थापक म्हणतां येणार नाहीं. मनुष्यानें काय करावें आणि काय करूं नये यांबद्दल व्यवहाराचे कांहीं नीतिनियम त्यांनीं घालून दिले, परंतु त्यांच्या मृत्यूनंतर लोकांनीं त्यांच्या स्मरणार्थ मंदिरें उभारलीं आणि हिंदू लोक वेदांना किंवा ख्रिस्ती लोक बायबलला मान देतात, तसा मान त्यांच्या ग्रंथांना चीनमध्यें मिळूं लागला. कॉन्फ्यूशियसच्या शिकवणीचा एक परिणाम असा झाला आहे, कीं चिनी लोक हे साऱ्या जगांतील जास्तींत जास्त सभ्य, जास्तींत जास्त शिष्टाचारसंपन्न आणि जास्तींत जास्त सुसंस्कृत असे झाले आहेत.

हिंदुस्थानांत या काळांत महावीर आणि बुद्ध हे महापुरुष झाले. आज जो जैन धर्म म्हणून अस्तित्वांत आहे त्याची स्थापना महावीरानें केली. ह्याचें खरें नांव 'वर्धमान' असें होतें. आणि महावीर ही श्रेष्ठत्वनिदर्शक पदवी त्यास देण्यांत आलेली होती. जैनांची वस्ती आज पश्चिम हिंदुस्थानांत व काठेवाडांत आहे ; आणि अलीकडे पुष्कळदां त्यांचा हिंदूंत समावेश केला जातो. काठेवाडामध्यें आणि राजपुतान्यांतील अबूच्या पहाडांत त्यांचीं सुंदर मंदिरें आहेत. जैनांची अहिंसेवर परम निष्ठा आहे, आणि कोणत्याही जीवमात्राला यत्किंचितही इजा देण्याच्या ते विरुद्ध असतात. याच संबंधांत पॅयथागोरास हाही अगदीं पक्का शाकाहारी होता, व आपले शिष्य व चेले यांनींही शाकाहारी असले पाहिजे अशी त्याची कडक शिस्त असे, हें वाचून तुला मोठीच गंमत वाटेल.

त्यानंतर आपण गौतम बुद्धाकडे येऊं. तुला ठाऊक आहे चांगलें, कीं तो क्षत्रिय होता, राजपुत्र होता, आणि सिद्धार्थ असें त्याचें नांव होतें. त्याच्या आईचें नांव

महाराणी माया असें होतें. नवचंद्राप्रमाणें सर्वांची जिच्या ठायीं उल्हासयुक्त भक्ति होती, पृथ्वीप्रमाणें जी सामर्थ्यवान् आणि दृढनिश्चयी होती, आणि कमलाप्रमाणें जिचें अंतःकरण शुद्ध होतें अशी माया महाराणी – असें तिचें जुन्या बखरकारांनीं वर्णन केलें आहे. बुद्धाच्या मातापित्यांनीं त्याला अत्यंत सुखांत आणि ऐश्वर्यांत वाढविलें आणि दुःख किंवा दैन्य हीं त्याच्या दृष्टीसही पडूं नयेत अशी व्यवस्था ठेवली. परंतु ही व्यवस्था पुरी यशस्वी झाली नाहीं. आणि लोककथा अशी चालत आलेली आहे, कीं दारिद्र्य, दुःख आणि मृत्यु यांचीं दृश्यें अचेर त्याच्या दृष्टीस पडलींच आणि त्यांचा त्याच्यावर अतिशय परिणाम झाला. राजवाड्यामध्यें चोहों बाजूंना नाचत असलेल्या ऐश्वर्यांतही त्याच्या मनाला शांति वाटेनाशी झाली; त्याचें आपल्या सुंदर तरुण स्त्रीवर प्रेम होतें, परंतु तिच्या सहवासांतसुद्धां त्याच्या मनाला मानवी दुःखाचा विसर पडेना. नित्य हाच एक विचार त्याच्या चित्तांत सारखा वाढूं लागला आणि मानवी दुःखांच्या परिहाराचा उपाय शोधून काढण्याची इच्छा त्याच्या अंतःकरणांत बळावत चालली. शेवटीं त्याच्या मनावरील हा ताण त्याला असह्य झाला आणि रात्रीच्या प्रशांत समयीं त्यानें राजप्रासाद व आपलीं प्रिय माणसें यांचा त्याग केला व त्याच्या अंतःकरणांत ज्या प्रश्नांचें काहूर माजलें होतें, त्यांचीं उत्तरें शोधून काढण्यासाठीं सर्व बंधनें तोडून एकाकी असा तो पृथ्वीच्या विशाल पाठीवर बाहेर पडला." या उत्तरांचा शोध करण्यांत त्यानें अत्यंत दीर्घकाल घालविला व अनंत कष्ट भोगले. असें म्हणतात, कीं पुढें पुष्कळ वर्षांनीं गयेमध्यें एका पिंपळाच्या झाडाखालीं बसला असतांना त्याच्या ठिकाणीं 'सम्यक् ज्ञान' स्फुरण पावलें आणि तेव्हांपासून त्याला 'बुद्ध' हें नांव प्राप्त झालें, आणि ज्या झाडाखालीं तो बसला होता त्या वृक्षाला बोधिवृक्ष – ज्ञानाचा वृक्ष – असें नांव मिळालें. प्राचीन काशी क्षेत्राच्या सावलीलाच असलेल्या, त्या काळीं ज्याचें नांव इसीपत्तन म्हणजेच ऋषिपत्तन असें होतें, त्या हल्लींच्या सारनाथ या गांवीं मृगयावनांत बुद्धानें आपल्या उपदेशाला सुरुवात केली. त्यानें सज्जीवनाचा मार्ग लोकांना दाखविला. देवांना यज्ञामध्यें ज्या अनेक वस्तू अर्पण करण्याचा प्रघात होता, त्याचा त्यानें निषेध केला आणि त्याऐवजीं आपल्या ठिकाणचा क्रोध, द्वेष, मत्सर आणि कुविचार यांचें हवन आपण केलें पाहिजे, असें तो सांगूं लागला.

बुद्धाच्या जन्मकाळीं हिंदुस्थानमध्यें प्राचीन वैदिक धर्म प्रचलित होता. परंतु त्यामध्यें पुष्कळ बदल होऊन त्याची प्रथमारंभींची श्रेष्ठ अवस्था या सुमारास केव्हांच नष्ट झाली होती. ब्राह्मणांनीं त्यामध्यें नाना प्रकारचें कर्मकांड, पूजाअर्चा आणि अंधश्रद्धा यांचें स्तोम माजविलें होतें. कारण उघडच आहे, कीं पूजेअर्चेचें बंड वाढलें कीं भिक्षुकांचें चांगलेंच फावतें. तशींच जातिबंधनें अधिकाधिक कडक होत चाललीं होतीं, आणि सामान्य लोकांना शकुन, मंत्र, चेटकें, जादूटोणा यांच्या भीतीनें ग्रासलेलें होतें. उपाध्याय-वर्गांनीं या साधनांच्या साहाय्यानें लोकांवर वर्चस्व मिळविलें होतें व क्षत्रियाच्या सत्तेलाही ते खो देऊं लागले. होते. त्यामुळें क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्या-

मध्यें त्या काळीं स्पर्धा निर्माण झाली होती. अशा वेळीं बुद्ध हा बहुजनसमाजाचा महान् समाजसुधारक पुढारी सामान्य जनतेला लाधला आणि उपाध्याय-वर्गाचा हा जुलूम व वैदिक धर्मामध्यें शिरलेले हे दोष यांवर त्यानें हल्ला चढविला. लोकांनीं पूजाअर्चा करण्यापेक्षां किंवा कर्मकांडापेक्षां सदाचारानें जीवन कंठावें, सत्कृत्यें करावीं, या गोष्टींवर त्यानें अधिक भर दिला. त्याच्या उपदेशाची दीक्षा घेतलेले भिक्षू आणि भिक्षुणी यांचे बौद्ध-संघ त्यानें स्थापन केले.

कांहीं काळपर्यंत हिंदुस्थानांत बुद्धधर्माचा म्हणण्यासारखा प्रसार झाला नाहीं. पुढच्या काळांत हिंदुस्थानांत या धर्माचा कसा प्रसार झाला व एक स्वतंत्र धर्म या नात्यानें पुढें येथें त्याचें स्थान नाहींसेंही कसें झालें हें आपण नंतर पाहूं. तिकडे लंकेपासून चीनपर्यंत बुद्धधर्माचा विजयी प्रसार झाला; तरी इकडे हिंदुस्थानांत मात्र— जेथें त्याचा जन्म झाला तेथेंच—त्याला ब्राह्मणधर्मांत अथवा हिंदुधर्मांत पूर्ण गडप करून टाकण्यांत आलें. तथापि ब्राह्मणधर्मावर त्याचा फारच मोठा परिणाम झाला. त्यामुळें ब्राह्मणधर्मामधील कर्मकांड व अंधश्रद्धा कांहीं अंशानें तरी नाहींशीं झालीं.

जगांतील जास्तींत जास्त लोकांचा धर्म आज बुद्धधर्म आहे. असेच अनुयायांची अत्यंत मोठी संख्या असलेले दुसरे धर्म म्हणजे ख्रिस्तो धर्म, इस्लाम धर्म व हिंदुधर्म हे होत. याशिवाय हिब्रू (ज्यू) लोकांचा धर्म, शीखांचा धर्म, पारशांचा धर्म हे आणि असेच कांहीं धर्म आहेत. धर्म आणि त्यांचे संस्थापक यांनां जगाच्या इतिहासांत पुष्कळ महत्त्वाचें कार्य केलेलें आहे. आणि इतिहासाचें कशाही प्रकारचें निरीक्षण केलें, तरी त्यांत त्यांना विसरून चालणार नाहीं. पण त्यांच्याबद्दल लिहिणें मला मात्र थोडें अवघड पडतें. आजपर्यंत जगामध्यें ज्या ज्या कोणी अत्यंत श्रेष्ठ व लोकोत्तर, उदारचरित व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्या-मध्येंच सर्व मोठमोठ्या धर्मांचे संस्थापक हेही येतात यामध्यें बिलकुल कांहींही संशय नाहीं. परंतु त्यांचे शिष्य व त्यांच्या जागेवर आलेले त्यानंतरचे लोक हे मात्र पुष्कळदां अशा प्रकारचे समर्थ किंवा सज्जन मुळींच निघालेले नाहींत. धर्माचा उदय मनुष्याला अधिकाधिक चांगला, अधिकाधिक उन्नत, अधिकाधिक उदार करण्याकरितां म्हणून व्हावा. परंतु त्यानें उलट लोकांना पशुकोटीस न्यावें, असेंच पुष्कळदां इतिहासांत घडलेलें आढळून येतें! लोकांना ज्ञान प्राप्त करून देण्याऐवजीं धर्मांनीं त्यांना पुष्कळदां अज्ञानांधकारांतच दडपून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकांचीं मनें विशाल करण्याऐवजीं त्यांनीं तीं पुष्कळदां आकुंचित आणि इतरांबद्दल असहिष्णु केलेलीं आहेत. धर्माच्या नांवानें पुष्कळ श्रेष्ठ आणि उज्ज्वल कार्यें करण्यांत आलेलीं आहेत आणि धर्माच्याच नांवानें लाखों, कोट्यवधि माणसें मारण्यांतही आलेलीं आहेत, व शक्य त्या सर्व प्रकारचे गुन्हे करण्यांत आलेले आहेत.

तेव्हां अशा धर्माबद्दल आपलें धोरण काय असावें? कित्येक लोकांच्या मनांत धर्म म्हटला, कीं धर्माच्या अंगभूत परलोकाची कल्पना असते. मग त्याला स्वर्ग म्हणा, नंदनवन म्हणा, नाहीं तर आणखी कांहीं नांव द्या. धार्मिक राहावयाचें किंवा कांहीं विशिष्ट

व्रतवैकल्यें करावयाचीं तीं ते या स्वर्गांत जावयाला मिळावें याच आशेनें करतात. हें पाहिलें म्हणजे लाडू, जिलबी किंवा मिठाईच्या बक्षिसाच्या आशेनें कोणतेंही काम करणाऱ्या लहान मुलाची मला आठवण होते. एखाद्या मुलाच्या मनापुढें सदासर्वकाळ लाडू-जिलबीचाच विचार राहत असेल, तर त्या मुलाचें शिक्षण कांहीं नीटपणें झालेलें नाहीं असेंच तूं म्हणशील, खरें कीं नाहीं ? आणि जर कोणी मुलगे किंवा मुली चांगलीं गोष्ट करावयाची झाली तर ती केवळ लाडू-जिलबीच्या खाऊच्या आशेनें करावयाची असें करतील, तर तुला कांहीं तीं मुलें पसंत पडणार नाहींत. मुलांची ही कथा; तर मग चांगलीं मोठीं शिकलींसवरलेलीं माणसें जर अशींच विचार करूं लागलीं किंवा अशींच वागूं लागलीं तर त्यांना काय म्हणूं आपण ? कारण, कांहीं म्हटलें तरी लाडू-जिलबीच्या खाऊची कल्पना आणि स्वर्गाची कल्पना यांत तत्त्वतः कांहीं सुद्धां फरक नाहीं. आपण सगळींच माणसें थोड्याफार प्रमाणांत स्वार्थी असतों. तरीपण आम्ही आपल्या मुलांना मात्र अशी शिकवण देण्याचा प्रयत्न करीत असतों, कीं त्यांनीं शक्य तितकें निःस्वार्थी व्हावें; निदान आपलें ध्येय तरी सर्वस्वीं स्वार्थरहित असावें, म्हणजे तें साध्य करीत असतांना त्याप्रमाणें स्वार्थरहित वागण्याचा प्रयत्न तरी आपण करीत राहूं.

आपण जें कांहीं करतों त्याचें फळ मिळवावें, अनुभवावें अशी आपली सगळ्यांचीच इच्छा असते. ही स्वाभाविक प्रवृत्ति आहे. परंतु आपलें ध्येय काय असावें ? साऱ्या जीवनांत आपण काय केवळ आपलाच विचार करीत राह्यचें, कीं समाजहित, आपल्या देशाचें हित किंवा अखिल मानवसमाजाचें हित अशा कांहीं तरी जास्त विशाल कल्याणाचा विचार करावयाचा ? तसें पाहिलें, तर या अधिक विशाल कल्याणामध्यें आपल्या वैयक्तिक कल्याणाचा अंतर्भाव होणारच आहे कीं ! मला वाटतें, कांहीं दिवसांपूर्वीं एका पत्रांत मीं तुला एक संस्कृत श्लोक सांगितला होता. त्यांत असें सांगितलें होतें, कीं कुटुंबासाठीं व्यक्तीचा त्याग करावा, समाजासाठीं कुटुंबाचा त्याग करावा, आणि देशासाठीं समाजाचा त्याग करावा. आज आणखी एका संस्कृत श्लोकाचें भाषांतर मुद्दाम तुझ्याकरितां मी देतों. भागवतामधला श्लोक आहे हा. त्यांत म्हटलें आहे कीं, "अष्टसिद्धींनीं युक्त अशी परमानंदाची अवस्था मला नको; पुनर्जन्मांतून सुटका मला नको; दुःखतप्त लोकांचें दुःखच मला प्राप्त होवो; त्यांच्याशीं समरस होऊन त्यांचें दुःखविमोचन करावयास मला सांपडो." *

जगांत एक धार्मिक मनुष्य एक मत सागतो, तर दुसरा दुसरेंच सांगतो. आणि बहुतेक प्रसंगीं एक दुसऱ्याला मूर्ख तरी समजतो किंवा लुच्चा तरी मानतो. त्यांच्यापैकीं खरा कोण ? ते ज्या गोष्टीबद्दल बोलत असतात त्या पाहायला सांपडत नाहींत; पुराव्यानें सिद्ध करतां येत नाहींत. तेव्हां त्यांच्या वादाचा निकाल करणें कठिणच आहे.

---

*या बाबतींत भागवतांतील पुढील दोन श्लोक लक्षांत घेण्यासारखे आहेत :

(१) को नु स्यादुपायोऽत्र येनाहं दुःखितात्मनाम् । अन्तःप्रविश्य भूतानां भवेयं दुःखभाक् सदा ॥

(२) न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् । प्राणिनां दुःखतप्तानां कामये दुःखनाशनम् ॥

परंतु अशा गोष्टींबद्दल त्यांनीं इतक्या निश्चयपूर्वक विधानें करावीं आणि त्याबद्दल एकमेकांचीं डोकीं फोडावीं हें मात्र धृष्टपणाचें वाटतें. आपल्यापैकीं बहुतेक मंडळी संकुचित विचाराची असतात आणि फारशी ज्ञानीही नसतात. तेव्हां मलाच सारें सत्याचें दर्शन झालें आहे असें म्हणून तें आपल्या शेजाऱ्यांवर लादण्याचा प्रयत्न करण्याचा आपल्याला कांहीं अधिकार आहे काय? आपलें म्हणणें कदाचित् खरें असेल. कदाचित् आपल्या शेजाऱ्याचेंही म्हणणें खरें असेल. झाडावरचें एखादें फूलच फक्त तुम्हांला दिसेल, तर तें फूल म्हणजेच झाड असें कांहीं तुम्हांला म्हणतां येणार नाहीं. दुसऱ्या एखाद्याला फक्त पानच दिसलें, आणखी एकाला खोडच दिसलें; प्रत्येकाला झाडाचा फक्त एखादा भागच दिसला, आणि त्यापैकीं प्रत्येक जण म्हणूं लागला, कीं फूल म्हणजेच झाड, पान म्हणजेच झाड, खोड म्हणजेच झाड; आणि असें म्हणून आणखी वर त्यासाठीं जो तो झगडा करायला लागला, तर तें किती मूर्खपणाचें आहे!

मला तर बुवा परलोकाबद्दल कांहीं आस्था वाटत नाहीं. या जगांत काम काय करावें, हाच एक विचार माझ्या मनांत भरून राहिलेला आहे आणि या जगांतला माझा मार्ग मला नीट समजला, तर माझें समाधान आहे. या जगांतलें माझें कर्तव्य मला चांगलें समजलें असेल, तर दुसऱ्या कोणत्या जगाची मला मुळींच भानगड नको आहे.

तूं मोठी झालीस म्हणजे तुला अनेक प्रकारचे लोक भेटतील. कोणी धर्मनिष्ठ असतील, कोणी धर्मविरोधक असतील, तर कोणाला या संबंधानें कांहीं विचारच नसेल. मोठमोठीं धर्ममंदिरें आणि धर्मसंस्था जगांत आहेत. त्यांच्याजवळ प्रचंड संपत्ति आहे आणि सत्ताही आहे. कधीं कधीं त्यांचा उपयोग चांगल्यासाठीं होतो, तर कधीं कधीं वाइटासाठीं होतो हेंही तुला दिसेल. अत्यंत सज्जन आणि उदारचरित अशीं धार्मिक प्रवृत्तीचीं माणसें तुला आढळतील, तर धर्माच्या पांघरुणाखालीं लोकांना लुबाडणारे व फसविणारे लुच्चे व लफंगे बदमाष लोकही तुला आढळतील. या सर्व गोष्टींचा विचार करून तुला आपलें स्वतःचें मत बनवावें लागेल. इतरांकडून मनुष्याला पुष्कळच शिकतां येतें खरें; पण प्रत्येक महत्त्वाची गोष्ट माणसाला स्वतःच शोधून काढावी लागते, किंवा अनुभवून पारखावी लागते. कांहीं गोष्टी अशा आहेत, कीं त्यांबद्दलचें होय-नाहीं हें ज्याचें त्यानेंच ठरवावें लागतें.

अर्थात् कोणतेंही मत बनविण्याची एव्हांच घाई करूं नको. कोणत्याही मोठ्या किंवा मर्माच्या गोष्टीसंबंधीं एखादा निर्णय करण्यापूर्वी असा निर्णय करण्याच्या पद्धतीचें माणसानें चांगलें शिक्षण घेतलें पाहिजे. ज्यानें त्यानें स्वतंत्र विचार करावा आणि स्वतःचें मत स्वतः बनवावें हें खरें आहे. परंतु तसें करण्याचें सामर्थ्य अंगीं आलेलें असलें पाहिजे. पाळण्यांतल्या पोराला कांहीं कोणी कोठल्या गोष्टीचा निर्णय करायला सांगणार नाहीं. आणि जगांत अशीं पुष्कळ माणसें आहेत, कीं वयानें जरी तीं पुष्कळ मोठीं झालीं असलीं, तरी बुद्धीच्या बाबतींत तीं जवळजवळ पाळण्यांतल्या मुलाइतकींच मोठीं असतात!

नेहमींपेक्षां बरेंच लांब पत्र आज मीं तुला लिहिलें आहे. कदाचित् तुला तें कंटाळवाणेंही वाटेल. पण या विषयाबद्दल एकदां थोडेंसें माझें मत सांगायचेंच होतें मला. आज तुला त्यांतलें कांहीं समजलें नाहीं, तरी कांहीं हरकत नाहीं. लौकरच तें तुला समजूं लागेल.

१५

इराण आणि ग्रीस (यूनान)

२१ जानेवारी, १९३१

आज तुझें पत्र आलें. तुझ्या आईचें आणि तुझें ठीक चाललें आहे हें पाहून बरें वाटलें. परंतु दादूंच्या पाठीमागचा हा तापाचा त्रास एकदां लौकर नाहींसा व्हायला हवा. साऱ्या जन्मभर त्यांना इतकी कांहीं दगदग करावी लागली आहे आणि तरी या वयांत सुद्धां त्यांना शांति आणि विश्रांति मिळत नाहीं.

एकूण तुझें म्हणणें काय, कीं पुस्तकालयांतलीं पुष्कळशीं पुस्तकें तूं वाचलीं आहेस आणि आतां आणखी कांहीं पुस्तकांचीं नांवें मीं तुला सुचवायला हवीं. पण काय काय वाचलेंस हें कोठें तूं मला लिहिलें आहेस? पुस्तकें वाचायची संवय चांगली खरी, पण भराभर आणि माराभर पुस्तकें वाचणाराबद्दल मला आपली जरा शंकाच वाटते. हे लोक हीं पुस्तकें नीटपणें वाचीत नसले पाहिजेत असा मला संशय येतो; उगीच आपलें वरवर चाळीत चाळीत वाचीत असतील; आज वाचायचें आणि उद्यां विसरायचें! एखादें पुस्तक चांगलें वाचण्याजोगें आहे म्हटलें, तर मग तें नीट काळजीपूर्वक आणि खोल विचारपूर्वक वाचण्यासारखेंच असलें पाहिजे. पण जगांत मुळींच वाचूं नयेत अशींच खंडीभर पुस्तकें आहेत. आणि खरीं चांगलीं पुस्तकें निवडून काढण्याचें काम सोपें नाहीं तितकें. तूं म्हणशील, "मी तर सगळीं आपल्या घरच्याच पुस्तकसंग्रहांतील पुस्तकें वाचतें, आणि घरचीं हीं सगळीं पुस्तकें चांगलीं असलींच पाहिजेत; नाहीं तर आपल्या घरीं तीं कशाला आणलीं असतीं?" ठीक, ठीक, वाचा बुवा; आणि येथून नैनी तुरुंगांतून मला ज्या कांहीं सूचना करतां येतील त्याही मी करीत जाईन. पुष्कळदां मी विचार करीत असतों, कीं तुझ्या शरीराची आणि बुद्धीची किती झपाट्यानें वाढ होत आहे. या काळांत मी तुझ्याजवळ असतों, तर किती चांगलें झालें असतें! तुला म्हणून हीं जीं पत्रें मीं लिहीत असतों, तीं तुझ्या हातीं पडण्याचा जेव्हां योग येईल, तेव्हां त्यांच्या मानानें तुझें ज्ञान किती तरी अधिक वाढलेलें असेल. हरकत नाहीं. तोंपर्यंत चांदला[१] तीं वाचतां येऊं लागतील; तूं नाहीं तर ती, कोणी तरी त्यांचा परामर्श – आस्वाद – घ्यायला उभें राहीलच ना!

[१] इंदिरेची छोटी आतेबहीण, चंद्रलेखा पंडित.

तेव्हां पुन्हां एकदां आपण ग्रीस आणि इराण यांच्याकडे जाऊं या आणि थोडा वेळ त्यांच्यामधील युद्धांचा विचार करूं या. एका पत्रांत आपण ग्रीक नगर-राज्यें आणि ग्रीक लोक ज्याला दरायस म्हणत त्याच्या (दाराच्या) अमलाखालील इराणचें प्रचंड साम्राज्य यांच्याबद्दल चर्चा केली आहे. दरायसचें हें साम्राज्य नुसतें विस्तारानेंच मोठें होतें असें नव्हे, तर संघटनेच्या दृष्टीनेंही तें श्रेष्ठ होतें. आशिया मायनरपासून सिंधु नदापर्यंत तें पसरलेलें होतें. ईजिप्त आणि त्याचप्रमाणें आशिया मायनरमधील कांहीं ग्रीक नगरें यांचाही त्यामध्यें समावेश होत होता. या एवढ्या विशाल साम्राज्याच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत चांगले रस्ते बांधलेले होते आणि त्यावरून त्या साम्राज्यशाहीचें टपाल नियमितपणें येत-जात असे. कोणत्या ना कोणत्या तरी सबबीवर ग्रीकांच्या नगर-राज्यांवर स्वारी करावी, असें या दरायसनें ठरविलें. त्यांच्या या परस्परांमधील युद्धांत इतिहासांतील कांहीं प्रसिद्ध लढाया घडून आल्या.

या लढायांचे वृत्तांत आपल्याला जे आज वाचायला सांपडतात, ते हिरॉडेटस नांवाच्या ग्रीक इतिहासकारानें लिहिलेले आहेत. ज्या प्रसंगांचा वृत्तांत त्यानें लिहिला आहे, ते घडून आल्यानंतरच्या अगदीं नजिकच्या काळांतच हिरॉडेटसचा जन्म झाला होता. त्याची वृत्ति ग्रीकांवियीं पक्षपाती आहे हें खरें आहे; परंतु त्यानें लिहिलेले वृत्तांत अत्यंत चित्तवेधक आहेत,आणि माझ्या पत्रांत अधून मधून त्याच्या इतिहासांतले कांहीं उतारे तुझ्यासाठीं मी देणार आहें.

इराणची ग्रीसवरील पहिली स्वारी यशस्वी झाली नाहीं. कारण चालून जात असतांना वाटेंतच रोगराईमुळें आणि अन्नाच्या कमरतेमुळें इराणी सैन्याचा फार नाश झाला. त्या सैन्याला ग्रीसपर्यंत न पोंचतांच परतावें लागलें. नंतर इराणची दुसरी स्वारी ख्रिस्तपूर्व ४९० या वर्षीं झाली. त्या वेळीं जमिनीच्या मार्गानें जाण्याचें सोडून समुद्रमार्गानें अथेन्सजवळील मॅराथॉन नांवाच्या ठिकाणीं इराणी लोकांनीं आपलें सैन्य उतरविलें. इराणच्या साम्राज्याचा लौकिक फारच मोठा असल्यामुळें अथेन्समधील लोक हें सैन्य उतरलेलें पाहून भयभीत झाले. या भीतीमुळें अथीनियन लोकांनीं आपले जुने शत्रू जे स्पार्टाचे लोक, त्यांचा व आपला तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला. आणि या आपल्या दोघांच्याही समान शत्रूविरुद्ध आम्हांस मदत करा, अशी त्यांनीं स्पार्टाच्या लोकांना विनंति केली. परंतु स्पार्टाचे लोक येऊन पोंचण्यापूर्वीच इराणी सैन्याचा पराभव करण्यांत अथेन्सच्या लोकांना यश आलें. हीच ती ख्रिस्तपूर्व ४९० सालीं झालेली प्रसिद्ध मॅराथॉनची लढाई.

एका लहानशा ग्रीक नगर-राज्यानें एका मोठ्या साम्राज्याच्या सैन्याचा पराभव करावा, ही गोष्ट मोठी चमत्कारिक भासते. पण वाटते तितकी ही गोष्ट आश्चर्य करण्याजोगी नाहीं. ग्रीक लोक हे आपल्या स्वतःच्या घरीं आणि स्वतःच्या घरासाठीं लढत होते; तर इराणी सैन्य हें आपल्या घरादारापासून अगदींच दूर आलेलें होतें. तसेंच इराणी सैन्य एकजिनसी नव्हतें. त्यांत इराणच्या साम्राज्यांतील नाना प्रदेशांतील

शिपायांची भरती झालेली होती. ते लढत होते ते केवळ त्या कामासाठीं त्यांना पगार मिळत होता म्हणून ; ग्रीसला जिंकण्यामध्यें कांहीं त्यांचा जीव एवढा गुंतला नव्हता. उलट पक्षीं अथीनियन लोक आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढत होते. मरूं पण स्वातंत्र्य गमावणार नाहीं, अशी त्यांच्या मनांत ईर्ष्या होती ; आणि कोणत्याही ध्येयासाठीं मरायला जे लोक तयार होतात, त्यांचा कांचेतच कधीं पराभव होतो.

तात्पर्य, दरायसचा मॅराथॉन येथें पराभव झाला. पुढें इराणमध्यें तो मरण पावल्यानंतर त्याच्यामागून क्सक्सींझ हा बादशहा झाला. ग्रीस देश जिंकावा ही महत्त्वाकांक्षा क्सक्सींझलाही होतीच. आणि म्हणून त्यानें स्वारीची तयारी केली. आतां यापुढें याबद्दलची हिरॉडेटसनें जी अत्यंत चित्तवेधक कथा लिहिली आहे, ती मी तुला सांगणार आहें. या क्सक्सींझचा आर्टाबेनस नांवाचा एक चुलता होता. ग्रीसमध्यें जाण्यांत इराणी सैन्याला धोका आहे असें त्याचें मत होतें आणि म्हणून ग्रीसशीं युद्ध न करण्याबद्दल आपल्या पुतण्याचें मन वळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. क्सक्सींझनें आपल्या चुलत्याला जें उत्तर दिलें, तें हिरॉडेटसच्या शब्दांत पुढीलप्रमाणें आहे :—

"तुम्ही म्हणतां त्यांत पुष्कळच तथ्य आहे. परंतु जेथें तेथें संकटाचीच शंका घेऊन डरावयाचें, धोका म्हणून केव्हां पत्करावयाचाच नाहीं, असें करून चालणार नाहीं. एकसारखें माझें कसें होईल याच्याबद्दल रडव्या कल्पना करीत दुःखापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां आशावादी होऊन हंसतमुखानें जगांतील अर्धेअधिक दुःख सहन करण्यांतच अधिक पुरुषार्थ आहे. कोणी कांहीं सूचना केली, कीं तिच्यावर हल्ला करावयाचा आणि स्वतः मात्र कांहींच बिनचूक मार्ग दाखवावयाचा नाहीं, असें जर तुम्ही करूं म्हणालां, तर ज्यांना तुम्ही विरोध करतां त्यांच्याप्रमाणेंच तुमच्याही कपाळीं अपेशच येणार. भविष्यकाळांतील यशापयशाचीं दोन्ही पारडीं आज सारखीं आहेत. कोणतें पारडें कोणत्या बाजूला झुकेल हें कोणाला सांगतां येईल काय ? मुळींच नाहीं. परंतु ज्यांची कांहीं तरी धडपड करण्याची तयारी आहे, कार्य करण्याची ज्यांना हिंमत आहे, त्यांना सामान्यतः यश मिळतें ; जे भित्रे असतात आणि सदैव हें चांगलें कीं तें चांगलें याचा नुसता विचारच करीत बसतात, अशांच्या वांट्याला यश केव्हांच येत नाहीं. आज इराणचें सामर्थ्य केवढें वाढलें आहे पाहा ; माझ्या पूर्वजांचे विचार जर तुमच्यासारखे असते ; अथवा त्यांचे तसे विचार नसले तरी त्यांचे सल्लागार जर तुमच्यासारखे असते, तर आपलें राज्य एवढें मोठें झालेलें तुम्हांला पाहायला मिळालें नसतें. त्यांनीं धोक्याची पर्वा केली नाहीं, धैर्यानें धोके पत्करले, यामुळेंच आज आम्ही या पदवीला पोंचलों आहों. महत्कार्यें हीं नेहमीं महान् संकटांमधून जाऊनच साधतां येतात."

एवढा लांब उतारा देण्याचें कारण, त्यावरून या इराणी राजाच्याबद्दल जितकी चांगली कल्पना येते, तितकी दुसऱ्या कोणत्याही वर्णनावरून येणार नाहीं. घडलें मात्र

असें, कीं आर्टाबेनसचा सल्लाच शेवटीं खरा ठरला आणि ग्रीसमध्यें इराणी सैन्याचा पराभव झाला. क्सक्सींझचा जरी पराभव झाला, तरी त्याच्या शब्दांतील सत्याचें नागें आजच्या घटकेलाही जसेंच्या तसें खणखणणारें असून आपल्याला सगळ्यांनाच त्यातून चांगला धडा घेण्याजोगा आहे. आज आपण फार मोठें कार्य यशस्वी करण्याच्या खटापटींत आहोंत, आणि आपलें ध्येय गांठीपर्यंत आपल्याला पुष्कळ मोठमोठ्या संकटांतून जावें लागणार आहे, ही खूणगांठ आपण त्यावरून बांधली पाहिजे.

बादशहा – शहेनशहा क्सक्सींझ यानें आपलें विशाल सैन्य आशिया मायनरमधून पार नेलें आणि डार्डानेल्सची खाडी – हिलाच पूर्वी हेलस्पांट हें नांव होतें – ओलांडून त्यानें यूरपमध्यें प्रवेश केला. ग्रीक योद्धयांनीं प्राचीन काळीं ज्या ठिकाणीं हेलनकरितां युद्ध केलें, त्या ट्रॉय शहराच्या मोडक्या अवशेषांना जातां जातां क्सक्सींझनें भेट दिली असें म्हणतात. हेलस्पांट सामुद्रधुनीवर सैन्याला पार होण्यासाठीं एक प्रचंड पूल उभारण्यांत आला होता; आणि सैन्य त्यावरून पार होत असतां जवळच एका टेकडीच्या माथ्यावर, संगमरवरी सिंहासनावर बसून क्सक्सींझ तें पाहत होता. या प्रसंगाचें वर्णन करतांना हिरॉडेटसनें लिहिलें आहे :—

" आणि अशा रीतीनें सारी हेलस्पांट सामुद्रधुनी आपल्या जहाजांनीं व्यापलेली बघून आणि 'अविडासचीं सारीं विशाल मैदानें आपल्या सैनिकांनीं भरून गेलेलीं पाहून क्सक्सींझ म्हणाला, कीं 'आज मी मोठा सुखी झालों.' आणि असें बोलून तो रडूं लागला. म्हणून आर्टाबेनसनें त्याच्याकडे पाहिलें. याच आर्टाबेनसनें प्रथम हेलासवर स्वारी करून न जाण्याचा सल्ला क्सक्सींझला मोठ्या धैर्यानें दिला होता. त्यानें जेव्हां क्सक्सींझला रडतांना पाहिलें तेव्हां त्याला त्यानें विचारलें, 'राजा, आतां तूं जें कांहीं करीत आहेस तें आणि यापूर्वी एक क्षणच जें कांहीं तूं केलेंस तें, ह्या गोष्टी एकमेकींहून किती तरी भिन्न आहेत बरें! त्या क्षणीं तूं म्हणालास, आज मी सुखी मनुष्य आहें; आणि या क्षणीं तूं अश्रुपात करीत आहेस, हें कसें काय?' क्सक्सींझनें उत्तर दिलें, 'बरोबर आहे तुमचें म्हणणें; कारण मीं जेव्हां जास्त खोल विचार केला तेव्हां मनुष्याचें एकंदर आयुष्य किती अल्प आहे, आणि माझ्यापुढील या प्रचंड सेना-समुदायापैकीं आजपासून शंभर वर्षांनीं कोणीही जिवंत असूं शकणार नाहीं, या गोष्टी लक्षांत येऊन माझें मन दयार्द्र झालें.' "

अशा रीतीनें त्या पुलाच्या साहाय्यानें जमिनीवरूनच तें मोठें थोरलें सैन्य पुढें सरकलें आणि त्याच्याच बरोबरीनें जहाजांचा प्रचंड समुदायही समुद्रावरून जाऊं लागला. परंतु समुद्रानें ग्रीकांची बाजू घेतली व मोठें तुफान होऊन हीं बहुतेक सारीं जहाजें नष्ट होऊन गेलीं. हेलन लोक म्हणजेच ग्रीक लोक या प्रचंड सैन्यापुढें भयभीत होऊन गेले होते; त्यामुळें आपल्यांतील सारीं भांडणें विसरून या स्वारीला तोंड देण्यासाठीं ते सारे एक झाले होते. इराणी सैन्याच्या दाबापुढें त्यांनीं माघार घेण्यास सुरुवात केली आणि थर्मापिलीच्या खिंडीपाशीं त्या सैन्याला रोखून धरण्याचा त्यांनीं


हिंदुस्थान
पर्शिया
मेसोपोटेमिया
सिरिया
अरबस्थान
नैर्ऋत्य आशिया खंड
ग्रीक लोक
मिडीया
बाबिलन
असिरिया
युफ्रेटीस
टायग्रीस
अरबस्थान
इजिप्त
तांबडा समुद्र
पश्चिमेकडील साम्राज्ये

प्रयत्न केला. ही खिंड म्हणजे एक अत्यंत अरुंद असा मार्ग असून तिच्या एका बाजूला उभा पर्वत आणि दुसऱ्या बाजूला खोल समुद्र आहे. त्यामुळें केवढेंही मोठें सैन्य आलें तरी त्याला अगदीं थोडीं माणसेंसुद्धां येथें अडवून धरूं शकतात व मागच्या सैन्याचें संरक्षण करूं शकतात. या ठिकाणीं लिओनिअसच्या हाताखालीं ३०० स्पार्टन लोक देऊन त्यांनीं या खिंडीचा मार्ग मरेपर्यंत रोखून धरावा हें काम त्यांच्यावर सोंपविण्यांत आलें. त्या अत्यंत आणीबाणीच्या दिवशीं शौर्याची शर्थ करून आपल्या देशाची मोठीच सेवा त्या वीरांनीं केली. मॅराथॉनच्या लढाईनंतर दहा वर्षांनंतरचा हा प्रसंग. वर दुसरीकडे ग्रीक सैन्य माघार घेत होतें, अशा वेळीं इराणी सैन्याचा लोंढा या तुकडीनें अडवून धरला ; त्या अरुंद खिंडींत त्यांच्यापैकीं एक मनुष्य पडला, कीं तत्क्षणीं त्या जागेवर दुसरा वीर उभा राहत होता. इराणी सैन्याला एक हातभरही पुढें जातां येत नव्हतें. लिओनिअस आणि त्याचे ३०० वीरभाई हे सर्वच्या सर्व थर्मापिलींत धारातीर्थीं पडेपर्यंत त्यांना पुढें जाण्याला मार्ग मिळाला नाहीं. २४१० वर्षांपूर्वी, ख्रिस्तपूर्व ४९० या वर्षीं हा प्रसंग घडून आला. तथापि, या वीरांच्या त्या दुर्दम्य धैर्याचा विचार मनांत येतांच आजही हृदय थरारून जातें. आजही कोणी प्रवासी थर्मापिलीच्या खिंडींत गेला, तर तेथील दगडाधोंड्यांमध्येंच जणुं कोरलेला असा लिओनिअस आणि त्याचे साथीदार यांचा पुढील संदेश पाण्यानें भरलेल्या डोळ्यांनीं त्याला वाचावयास मिळेल :

जाशीं येथुनि तूं तरी वद गड्या, स्पार्टासि हें जाउन
आम्ही राहतसों इथेंच शिरसा आज्ञा तिची वंदुन

मृत्यूवरही जें विजय मिळावितें तें धैर्य खरोखरच अद्‌भुत होय ! त्यामुळें लिओनिअस आणि थर्मापिली हीं जगांत चिरंजीव झालीं असून त्यांचें स्मरण झालें असतांना आपणां हिंदुस्थानच्या दूरच्या लोकांचेंही अंतःकरण थरारून जातें. तर मग ज्या आपल्याच लोकांनीं, आपल्या पूर्वजांनीं, हिंदुस्थानच्याच स्त्रियांनीं आणि पुरुषांनीं आपल्या दीर्घकालीन इतिहासाच्या थेट सुरुवातीपासून हंसतमुखानें मृत्यूची एवढीसुद्धां कदर केली नाहीं, अपमान किंवा गुलामगिरी यांहून मृत्यु ज्यांना अधिक पसंत पडला, आणि जुलमापुढें मान वांकविण्यापेक्षां मोडून जाण्यालाच जे तयार झाले, अशांच्याबद्दल आपण किती पोवाडे गावे आणि आपल्याला किती अभिमान वाटावा ! उदाहरणार्थ – चितोड, त्याची ती अनुपमेय कथा, रजपूत स्त्री-पुरुषांची आश्चर्यकारक मर्दुमकी या गोष्टींचा विचार करा ! तसेंच आजच्या काळींही पाहा ! आजही आपले भाई, अगदीं आपल्या अंगांत जें रक्त खेळत आहे तसलेंच रक्त अंगीं खेळणारे लोक, हिंदी स्वातंत्र्यासाठीं मृत्यूशीं सामना करतांना रतिमात्रही कचरत नाहींत, हें आपण पाहतोंच आहों.

थर्मापिलीशीं इराणी सैन्याला कांहीं काळ अटकाव झाला. पण फारसा दीर्घकाळपर्यंत हा अटकाव टिकून राहूं शकला नाहीं. इराणी सैन्याच्या दाबापुढें ग्रीकांनीं

माघार घेतली आणि कांहीं नगर-राज्यें त्या सैन्यापुढें शरणही आलीं. अभिमानी अथीनियन लोकांनीं मात्र शत्रूंनीं आपलें नगर मोडून तोडून टाकलें तरी हरकत नाहीं, परंतु शरण जावयाचें नाहीं असा निर्धार केला. आणि त्या नगरींतील सर्वच्या सर्व जनता निघून जाऊन बहुतांशीं जहाजांवर जाऊन राहिली. इराणी सैन्य त्या निर्जन शहरांत शिरलें व त्यांनीं तें जाळून टाकलें. अथीनियन आरमाराचा मात्र अजूनही पराभव झाला नव्हता; त्यामुळें सालामीसच्याजवळ आणखी एक तुंबळ युद्ध झालें. त्यामध्यें इराणी जहाजांचा नाश झाला आणि या विपत्तीमुळें क्सक्सींझ संपूर्ण निरुत्साह होऊन इराणला परत गेला.

यापुढेंही कांहीं काळ इराणचें मोठें साम्राज्य टिकून राहिलें; परंतु मॅराथॉन व सालामीस येथील लढाया म्हणजे त्याच्या ऱ्हासाचीं पूर्वचिह्नेंच होतीं. हा ऱ्हास कसकसा घडला हें पुढें आपण पाहणार आहों. त्या ऱ्हासाच्या काळीं जे प्रत्यक्ष हजर होते, त्यांना तें एवढें थोरलें प्रचंड साम्राज्य हादरून पडतांना पाहून मोठाच विस्मय वाटला असेल. या गोष्टीचा पुष्कळ विचार करून हिरॉडेटसनें एकू तात्पर्य काढलें आहे. तो म्हणतो, कोणत्याही देशाच्या इतिहासाचे तीन टप्पे असतात: पहिला टप्पा यश. त्यानंतर यशाचा परिणाम म्हणूनच उन्मत्तपणा आणि अन्याय; आणि शेवटीं यांचा परिणाम म्हणून अवनति, ऱ्हास.

१६

एका काळचें वैभवशाली हेलास

२३ जानेवारी, १९३१

हेलन किंवा ग्रीक लोकांनीं इराणी लोकांवर हे जे विजय मिळविले, त्याचे दोन परिणाम झाले: एक इराणच्या साम्राज्याला हळूहळू उतरती कळा लागून तें दुर्बळ होत गेलें आणि दुसरें म्हणजे ग्रीकांच्या इतिहासांतील अत्यंत तेजस्वी कालखंडास सुरुवात झाली. राष्ट्रांच्या आयुष्याच्या मानानें पाहतां हें तेज किंवा वैभव अल्पकालीनच ठरलें. सर्व मिळून पुरीं दोनशें वर्षें सुद्धां तें टिकलें नाहीं. इराणचें साम्राज्य किंवा त्यापूर्वीचीं इतर साम्राज्यें यांच्या वैभवामध्यें दूरवर प्रचंड पसरलेल्या साम्राज्यांचें विशालत्व होतें. तशा प्रकारचें विस्तारवैभवही ग्रीकांच्या ऐश्वर्यामध्यें नव्हतें. यानंतरच्या काळांत कांहीं थोडा वेळ ॲलेक्झांडर उदयास येऊन त्यानें पुष्कळसे प्रदेश जिंकून जगाचे डोळे दिपवून टाकले हें खरें; परंतु त्याच्याबद्दल आज आपण विचार करीत नाहीं आहों. इराणी युद्धें आणि ॲलेक्झांडरचा उदय यांच्या दरम्यानचा जो काळ, म्हणजे थर्मापिली, सालामीस येथील लढायांनंतरचा १५० वर्षांचा काळ, त्याच्या-

बद्दल आपण आज बोलतों आहों. इराणी स्वाऱ्यांच्या संकटानें ग्रीक लोकाची एकी झालेली होती. परंतु हें संकट दूर होतांच पुन्हां त्यांचे गट वेगवेगळे पडले आणि त्यांचे परस्परांशीं तंटे सुरू झाले. विशेषतः ॲथेन्स आणि स्पार्टा या दोन नगर-राज्यांमध्यें फारच तीव्र वैर होतें. परंतु त्यांच्या या तंट्यांशीं आपल्याला कांहीं करावयाचें नाहीं. तसें त्यांना कांहीं विशेष सांगण्यासारखें स्वतःचें म्हणून महत्त्व नाहीं. त्या काळीं ग्रीसला जें इतर अनेक दृष्टींनीं श्रेष्ठत्व प्राप्त झालें होतें, त्यामुळें या तंट्यांची आपल्याला आठवण तरी राहते. या काळच्या ग्रीसमधील अगदीं थोडे ग्रंथ, व थोडे पुतळे आणि कांहीं थोडे मोडकेतोडके अवशेष आज आपल्याला उपलब्ध आहेत. पण जें आहे तें पाहूनही आपलें अंतःकरण आदरानें भरून येतें आणि हेलासमधील लोकांच्या विविध प्रकारच्या श्रेष्ठत्वाबद्दल आपल्याला कौतुक वाटतें. इतके सुंदर पुतळे आणि इतकीं सुंदर चांधकामें तयार करणाऱ्या मंडळींचे हात किती प्रचंड कसबी असले पाहिजेत आणि मन किती विशाल आणि संपन्न असलें पाहिजे ! फिडिआस हा त्या काळचा एक प्रसिद्ध शिल्पकार होता. दुसरेही असेच पुष्कळ प्रसिद्ध शिल्पकार होते. त्या काळचीं ग्रीकांचीं करुणरसपर आणि हास्यरसपर नाटकें आजही अत्यंत श्रेष्ठ नाटकांमध्यें मोडतात. सोफॉक्लीस, ईस्किलस, यूरिपिडस, आरिस्टोफेनीस, पिंडार, मीनांदर आणि सॅफो, इत्यादि त्याच्या नाटककारांचीं नांवें आज तूं नुसतीं ऐकून मात्र ठेवायचीं. अर्थात् मोठी झालीस म्हणजे त्यांचीं नाटकें तूं वाचशीलच आणि मग त्या काळचें ग्रीसचें वैभव केवढें श्रेष्ठ असलें पाहिजे, याची कांहींशी कल्पना तुला येईल.

ग्रीक इतिहासांतला हा काळ म्हणजे कोणत्याहि देशाचा इतिहास आपण खरोखर कशा पद्धतीनें वाचला पाहिजे, हें दाखविणारी एक धोक्याची सूचनाच आहे. त्या वेळच्या ग्रीक नगर-राज्यांमधील क्षुद्र लढाया आणि इतर अशाच क्षुद्र गोष्टी याच फक्त आपण पाहूं गेलों तर या नगर-राज्यांबद्दल आपणांला खरी कल्पना कितीशी येईल? त्यांची खरी माहिती आपल्याला करून घ्यावयाची असेल, तर आपण त्यांच्या मनोव्यापारांत प्रवेश केला पाहिजे व त्यांचे विचार-विकार कोणते होते, त्यांच्या क्रिया कोणत्या प्रकारें घडत होत्या, याचें खरें संपूर्ण आकलन केलें पाहिजे. अशा मनोव्यापारांच्या इतिहासाला, वैचारिक इतिहासालाच, खरी किंमत आहे; आणि त्या वैचारिक कारणांच्या भावामुळेंच आधुनिक यूरप कितीएक प्रकारांनीं प्राचीन ग्रीक संस्कृतीचेंच एक बालक असल्याचें दिसून येत आहे.

राष्ट्रांच्या आयुष्यांत असे वैभवाचे काळ येतात आणि नाहींसे होतात, ही मोठी विचित्र आणि अंतःकरण गुंगवून टाकणारी घटना आहे. अशा काळीं प्रत्येक वस्तूलाच जणुं थोडा वेळ तेज चढल्यासारखें होतें आणि त्या काळीं त्या देशांत राहणाऱ्या सर्वच स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं सौंदर्य, सामर्थ्य निर्माण होतें. लोक जणुं भारल्यासारखे होतात. आपल्या देशांत सुद्धां अशीं वैभवाचीं युगें येऊन गेलेलीं आहेत. त्यातील अत्यंत प्राचीन युग म्हणजे ज्या काळीं वेद, उपनिषदें अशांसारखे ग्रंथ निर्माण झाले तें युग.

दुर्दैवानें या काळाचा नीटसा लिहिलेला वृत्तांत कांहींच उपलब्ध नाहीं आपल्याला; त्या काळचे कितीएक ग्रंथ किंवा बांधकामें नष्टच झालीं असतील आणि कितीएक अजून संशोधन न झाल्यामुळें तशींच कोठें तरी गडप होऊन राहिलेलीं असतील. परंतु जें कांहीं थोडें उपलब्ध आहे, तेवढ्यावरून सुद्धां प्राचीन काळच्या त्या भारतीयांची बुद्धि व मन यांचें सामर्थ्य केवढें प्रचंड असलें पाहिजे हें दिसून येतें. यापुढील हिंदी इतिहासातही अशीं पुष्कळ युगें होऊन गेलेलीं असून निरनिराळ्या काळांतून आपण हा अमा प्रवास करीत असतांना वाटेंत मधून मधून तींही आपल्याला आढळतील.

या काळांत अथेन्स शहराचें राज्य हें त्यांतल्या त्यांत विशेषच प्रसिद्धीला आलें. त्या वेळचा तेथील पुढारी मोठा श्रेष्ठ मुत्सद्दी व राजकारणधुरंधर होता. त्याचें नांव पेरिक्लीस. अथेन्समध्यें सुमारें तीस वर्षें त्याचा अधिकार चालत होता. त्याच्या काळांत अथेन्स हें अत्यंत भव्य शहर बनलें; हरएक प्रकारच्या सुंदर बांधकामांनीं तें फुलून गेलें; मोठमोठे कलावंत आणि प्रज्ञावंत लोक तेथें उदयास आले. आजही पेरिक्लीसचें अथेन्स म्हणून तें शहर ओळखलें जातें आणि त्या काळालाही पेरिक्लीसचें युग असें आपण म्हणतों.

आपला दोस्त, इतिहासकार हिरॉडिटस या काळच्या सुमारास अथेन्समध्यें राहत होता. कोणत्याही घटनेमधून एकादें विशेष तात्पर्य किंवा नीतिबोध हुडकण्याच्या त्याच्या नित्याच्या संवयीप्रमाणें अथेन्सच्या विकासाचा चांगला विचार करून त्यांतूनही त्यानें एक तात्पर्य शोधून काढलें आहे. आपल्या इतिहासांत तो लिहितो :—

"अथेन्सचें सामर्थ्य वाढलें; हा एक पुरावाच आहे—आणि असा पुरावा इतरही सर्व ठिकाणीं सांपडेल—कीं स्वातंत्र्य ही चांगली गोष्ट आहे. अथीनियन लोकांवर जेव्हां अनियंत्रित सुलतानी सत्ता चालू होती, त्या वेळीं त्यांच्यामध्यें आपल्या आजूबाजूच्या लोकांपेक्षां श्रेष्ठ युद्धसामर्थ्य नव्हतें. परंतु त्यांनीं जेव्हां या सुलतानशाहींतून आपली सुटका करून घेतली तेव्हां बाकीच्या सर्वांच्यावर त्यांची कडी झाली. यावरून एवढेंच दिसतें, कीं गुलाम असतांना ते स्वतःच्या प्रेरणेनें कांहींएक करीत नव्हते; मालकाकरितां म्हणून ते हातपाय हालवीत होते. पण स्वतंत्र झाल्यावर प्रत्येक व्यक्तीनें आपण होऊन स्वतःच्या प्रयत्नांची व पराक्रमाची शिकस्त केली."

या काळच्या श्रेष्ठ लोकांपैकीं कांहींचा उल्लेख आतांपर्यंत मीं केला आहे. पण त्या काळच्या सर्वश्रेष्ठ मंडळींपैकीं एकाचें नांव अजून मीं तुला सांगितलेलें नाहीं. त्याचें नांव सॉक्रेटीस. हा तत्त्वज्ञ होता आणि नित्य त्याचा सत्याचा शोध चालू होता. जगांत त्याला खऱ्या ज्ञानावांचून दुसऱ्या कशाची किंमत नव्हती; मिळविण्यासारखी अशी त्याला काय ती तेवढी एकच गोष्ट होती. आपल्या मित्रांशीं आणि परिचितांशीं तो नेहमीं वादविवाद करीत असे. हेतु असा, कीं त्या वादांतून जें सत्य असेल तें कदाचित् निष्पन्न होण्याचा संभव. त्याचे पुष्कळ शिष्य किंवा चेले होते. प्लेटो हा त्यांपैकीं सर्वश्रेष्ठ. प्लेटोनें लिहिलेले पुष्कळ ग्रंथ आज आपल्याला उपलब्ध आहेत आणि त्यांवरूनच त्याचा गुरु जो सॉक्रेटीस याच्याबद्दल आपल्याला पुष्कळशी माहिती मिळते. राज्यकर्त्यांना

केव्हांही असे सर्व गोष्टींचें खरें स्वरूप शोधून काढणारे लोक आवडत नाहींतसें दिसतें. सत्याचा शोध त्यांना रुचत नाहीं. पेरिक्लीसच्या काळानंतर थोड्याच दिवसांनीं अथीनियन सरकारला सॉक्रेटीसचें कार्य पसंत पडेनासें झालें. त्यांनीं त्याची चौकशी केली व त्याला देहांताची शिक्षा फर्माविली. त्यांनीं त्याला सांगितलें, कीं लोकांबरोबर वादविवाद करण्याचें जर तूं सोडून देशील आणि पहिल्यापेक्षां निराळ्या रीतीनें वागूं लागशील, तर तुला सोडून देण्यांत येईल. पण सॉक्रेटीसनें तसें करण्याचें नाकारलें आणि त्याला जें स्वतःचें कर्तव्य वाटत होतें तें सोडून देण्यापेक्षां मृत्युदायक विषाचा पेलाच त्यानें पसंत केला. अगदीं मृत्यूच्या क्षणीं आपल्यावर आरोप करणारे लोक आणि त्याचा खटला चालविणारे न्यायाधीश व अथीनियन जनता यांना उद्देशून तो म्हणाला :—

" मीं माझा सत्याचा शोध सोडून द्यावा या शर्तीवर तुम्ही मला दोषमुक्त करून सोडून द्यावयास तयार आहां, असें तुमचें म्हणणें असेल, तर त्यावर माझें म्हणणें असें आहे : तुमच्या या सूचनेबद्दल मी तुमचा ऋणी आहें ; परंतु तुमची आज्ञा मान्य करण्यापेक्षां ज्यानें मला या सत्यसंशोधनाच्या कार्याला प्रवृत्त केलें, त्या परमेश्वराचीच आज्ञा मी मान्य करीन आणि या शरीरांत शक्ति आणि जिवात जीव आहे तोंपर्यंत तत्त्वज्ञानाचा माझा उद्योग मी सोडणार नाहीं. जो जो कोणी मला भेटेल त्याच्याशीं संभाषण करण्याची माझी पद्धति मी चालूच ठेवणार आणि प्रत्येकाला मी विचारणार, कीं ज्ञान आणि सत्य व तुमच्या आत्म्याची उन्नति यांची तुम्ही कांहींच फिकीर करीत नाहीं आणि तुमचें सारें मन संपत्ति व मानसन्मान यांवरच फक्त खिळून राहतें, याची तुम्हाला लाज कशी वाटत नाहीं? मनुष्य मरतो म्हणजे काय होतें हें मला ठाऊक नाहीं. कदाचित् ती एक हितकारकही गोष्ट असेल—आणि मला त्याची भीति पण वाटत नाहीं. पण आपलें कर्तव्याचें स्थान सोडून पळून जाणें ही मात्र वाईट—अहित-कारक—गोष्ट आहे हें मला पक्कें माहीत आहे. आणि जी गोष्ट वाईट आहे हें मला माहीत आहे, तिचा स्वीकार करण्याऐवजीं जी कदाचित् चांगली असण्याचा संभव आहे ती गोष्ट स्वींकारणेंच मला युक्त वाटतें."

जिवंतपणीं तर सॉक्रेटीसानें सत्य आणि ज्ञान याच्या कार्याला साहाय्य केलेंच ; परंतु आपल्या मृत्यूच्या योगानें त्यानें या कार्याची त्याहूनही अधिक चांगली सेवा केली.

आजकाल निरनिराळ्या प्रश्नांवरील—समाजवाद, भांडवलशाही या व अशा कित्येक विषयावरील—वादविवाद तूं वाचीत असशील किंवा ऐकत असशील. जगांत अन्याय व दुःख यांचें फारच मोठें प्रमाण आहे. पुष्कळांना त्याबद्दल फार असमाधान वाटतें. आणि हें बदलून टाकण्याचा अशी मंडळी प्रयत्न करतात. याच रीतीनें राज्य-व्यवस्था कशी असावी याबद्दल विचार करून राज्यव्यवस्थेंतील पुष्कळ प्रश्नांबद्दल प्लेटोनें लेखन केलें आहे. त्यावरून त्या काळींसुद्धां सर्वत्र अधिकाधिक सुख नांदावें यासाठीं समाजाची आणि राज्याची व्यवस्था कशी असावी, याबद्दलचे विचार त्या काळचे लोकही करीतच होते असें दिसतें.

प्लेटोचें उतारवय झालें त्या सुमारास पुढें ज्याचें नांव विशेषच प्रसिद्धीला आलें, असा एक ग्रीक गृहस्थ उदयास येत होता. त्याचें नांव ॲरिस्टॉट्ल्; तो ॲलेक्झांडर दी ग्रेटचा खाजगी शिक्षक होता. आणि ॲलेक्झांडरनें त्याला त्याच्या काळांत पुष्कळ साहाय्य केलें. सॉक्रेटीस किंवा प्लेटो यांच्याप्रमाणें ॲरिस्टॉट्ल् तत्त्वसंशोधनाच्या भानगडींत पडला नाहीं. निसर्गाचें निरीक्षण करून निसर्गाच्या व्यवहाराचे नियम समजून घ्यावे ही त्याला अधिक आवड होती. यालाच **निसर्गज्ञान** म्हणतात किंवा अलीकडे नुसतें शास्त्र – विज्ञान – म्हणतात. म्हणजे ॲरिस्टॉट्ल् हा अगदीं प्राचीन काळचा एक वैज्ञानिक होता.

त्यानंतर आपण आतां ॲरिस्टॉट्ल्चा शिष्य ॲलेक्झांडर याच्याकडे येऊन त्याच्या अत्यंत वेगवान् कारकीर्दीचें अवलोकन केलें पाहिजे. पण आतां तें उद्या. आज आतां पुष्कळ लिहून झालें.

आज वसंत पंचमी. वसंत ऋतूच्या आगमनाचा अग्रदूत असा हा हिंवाळा किती हां हां म्हणतां संपून गेला. आणि हवेंतील गार बोंचकपणाही नाहींसा झाला आहे. पक्ष्यांचे थवे अधिकाधिक येऊं लागले आहेत. आणि साऱ्या दिवसभर आतां त्यांच्या गाण्याचा रंग चालू झाला आहे. या दिवसाचा आणखी एक विशेष म्हणजे बरोबर पंधरा वर्षांपूर्वी याच दिवशीं दिल्ली शहरांत तुझी आई व मी विवाहबंधनानें एकजीव झालों.

१७

विख्यात जेता पण घमेंडखोर तरुण

२४ जानेवारी, १९३१

माझ्या मागच्या पत्रांत आणि त्याच्याआधींही मीं ॲलेक्झांडर दी ग्रेटचा – शिकंदरचा – उल्लेख केला आहे. तो ग्रीक होता असें मीं म्हटलें आहेसें वाटतें. परंतु तसें म्हणणें तितकेंसें बरोबर नाहीं. ग्रीसच्या उत्तरेच्या लगत असलेल्या मॅसिडोनिया या देशांतील तो रहिवासी असल्यानें त्याला खरोखर मॅसिडोनियनच म्हटलें पाहिजे. हे मॅसिडोनियन लोक पुष्कळ बाबतींत ग्रीकांसारखेच होते. ग्रीकांच्या भाऊबंद घराण्यांतल्यासारखेच ते होते असें म्हटलें तरी चालेल. ॲलेक्झांडरचा बाप फिलिप हा मॅसिडोनियाचा राजा होय. तो चांगला कर्तबगार राजा असून त्यानें आपलें राज्य मोठें प्रबळ केलें होतें आणि अत्यंत प्रभावशाली व कुशल सैन्य उभारलें होतें. ॲलेक्झांडरला दी ग्रेट, म्हणजे श्रेष्ठ – महान् – म्हणतात व इतिहासांत त्याची प्रसिद्धि फार मोठी आहे. परंतु त्यानें जें कांहीं करून दाखविलें त्यापैकीं फार मोठा भाग,

त्याच्यापूर्वी त्याच्या बापानें जें पुष्कळ कार्य काळजीपूर्वक उभारून ठेवलें होतें, त्याच्या जोरावरच त्याला साधतां आला. ॲलेक्झांडर खरोखर श्रेष्ठ पुरुष होता कीं नाहीं ही संशयास्पद गोष्ट आहे. मला तरी तो कोणी आदर्श पुरुष किंवा विभूति वाटत नाहीं. परंतु अगदीं थोडक्या आयुष्यांत दोन खंडांत आपल्या नांवाचा दरारा बसविण्यांत त्याला यश मिळालें हें खरें; आणि इतिहासामध्यें पाहिला जगज्जेता असें त्यास समजतात. ग्रीसपासून दूरवर मध्य आशिया खंडांत शिकंदर म्हणून अजूनही लोकांना त्याची आठवण आहे. आणि खरोखर तो श्रेष्ठ पुरुष असो वा नसो, इतिहासांत तरी त्याच्या नांवाभोंवतीं कीर्तीचें मोठेंच तेजोवलय उभारण्यांत आलें आहे. कितीएक शहरांना त्याचें नांव देण्यांत आलेलें आहे. त्यांपैकीं पुष्कळ आजकालही अस्तित्वांत आहेत. त्यांतलें पूर्वीच्या काळचें सर्वांत मोठें शहर म्हणजे ईजिप्तमधील अलेक्झांड्रिया हें होय.

ॲलेक्झांडर राजा झाला तेव्हां तो अवघा वीस वर्षांचा होता. श्रेष्ठत्व संपादण्याच्या महत्त्वाकांक्षेनें त्याचें सारें मन भारून गेलेलें होतें. त्यामुळें त्याच्या बापानें त्याच्यासाठीं आपल्यामागें तयार करून ठेवलेलें नामी शेलकें सैन्य घेऊन आपल्या देशाचा जुना शत्रु जो इराण त्याच्यावर स्वारी करण्यासाठीं तो उतावीळ होऊन गेला होता. ग्रीक लोकांना फिलिपही आवडत नव्हता किंवा ॲलेक्झांडरही आवडत नव्हता. परंतु त्या दोघांच्या सामर्थ्यापुढें ते कांहींसे दबून गेले होते. आणि म्हणून इराणवर स्वारी करणाऱ्या ग्रीक सैन्याचें प्रमुख सेनापतिपद धारण करणारे म्हणून त्या दोघानाही एकामागून एक त्यांनीं मान्यता दिली. अशा रीतीनें उदयास येत असलेल्या नव्या सत्तेपुढें ग्रीकांनीं मान लवविली. एका ग्रीक राज्यानें, थीब्सनें शिकंदरचें आधिपत्य न मानून त्याच्याविरुद्ध बंड केलें, तेव्हां त्यानें अत्यंत क्रूरपणें आणि निर्दयपणें त्याच्यावर मोठाच तडाखा मारला. त्या विख्यात शहराचा त्यानें नाश केला, त्यांतील इमारती धुळीस मिळविल्या; त्यांतील असंख्य लोकांची त्यानें कत्तल केली आणि कितीकांना गुलाम करून विकून टाकलें! अशा रानटीपणानें वागून साऱ्या ग्रीसला त्यानें भयभीत करून टाकलें. परंतु त्याच्या जीवनांतील या किंवा इतर अशांच रानटीपणाच्या उदाहरणांनीं त्याच्याबद्दल आपल्या मनांत आदर कांहीं उत्पन्न होत नाहीं. तर उलट, आपलें मन त्याच्याविरुद्धच होतें आणि त्याच्याविषयीं आपल्याला तिटकाराच वाटूं लागतो.

क्सक्झींझच्या पाठीमागून इराणचा तिसरा राजा दारियस हा झाला होता. त्याचा थोड्याच काळांत ॲलेक्झांडरनें पराभव केला. त्यापाठोपाठ इराणच्या राज्याच्या अमलाखालील ईजिप्त देशही त्यानें सहजासहजीं जिंकून घेतला. त्यानंतर तो पुन्हां इराणवर चालून गेला व दारियसचा त्यानें दुसऱ्यांदां पराभव केला. शहेनशहा दारियसचा महान् राजवाडा ॲलेक्झांडरनें नष्ट करून टाकला. अशा रीतीनें अथेन्स जाळल्याचा सूड आपण घेतला असें तो म्हणे.

फारसी भाषेमध्यें सुमारें १००० वर्षांपूर्वी फिर्दोसी नांवाच्या कवीनें लिहिलेला

एक जुना ग्रंथ आहे. या ग्रंथाला 'शहानामा' म्हणतात. त्यामध्यें इराणच्या राजाची बखर लिहिलेली आहे. ॲलेक्झांडर आणि दारियस यांच्यामधील लढायांची या ग्रंथांत मोठीं कल्पनाप्रचुर वर्णनें आहेत. त्यांत लिहिलेलें आहे, कीं दारियसचा जेव्हां पराभव झाला, तेव्हां त्यानें हिंदुस्थानांतून मदत आणविण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानच्या वायव्य भागांत त्या वेळीं पुरु किंवा पोरस या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्याकडे त्यानें 'वायुवेगानें जाणारा एक उंट (सांडणीस्वार) पाठविला.' परंतु पोरस राजा त्याला कांहींच मदत करूं शकला नाहीं. लौकरच त्यालाच स्वतः ॲलेक्झांडरच्या हल्ल्याला तोंड द्यावें लागलें. फिर्दौसीच्या या शहानामा नांवाच्या ग्रंथांत इराणचे राजेरजवाडे हिंदी तरवारी व जंबिये वापरीत असत अशाबद्दल जागोजाग उल्लेख येतात, तें पाहून मोठें कौतुक वाटतें. त्यावरून असें दिसून येतें, कीं ॲलेक्झांडरच्या काळींसुद्धां हिंदुस्थानांत पाणीदार पोलादाच्या तरवारी तयार होत असत आणि परदेशामध्यें सुद्धां त्यांची चहा होत असे.

इराणमधून ॲलेक्झांडरनें दूरवर पुढेंही आक्रमण केलें. सध्यां ज्या भागांत हिरात, काबूल, समरकंद हीं शहरें आहेत, त्या प्रदेशांतून कूच करीत करीत तो थेट सिंधु नदीच्या उत्तरेच्या खोऱ्यापर्यंत येऊन ठेपला. या ठिकाणीं त्याला विरोध करावयाला उभा राहिलेला अगदीं पहिला सामनेवाला ॲलेक्झांडरला भेटला. हा एक हिंदी राजा होता. ग्रीक इतिहासकार त्याचें नांव पोरस असें ग्रीक पद्धतीचें देतात. यासारखेंच कांहीं त्याचें नांव असेल, परंतु आपल्याला तें नक्की ठाऊक नाहीं. असें म्हणतात, कीं पोरस फार शौर्यानें लढला आणि त्याचा पराभव करण्यास ॲलेक्झांडरला फार सायास पडले. पोरस चांगला उंचनिंच आणि उमदा वीर होता आणि त्याच्या शौर्यावर ॲलेक्झांडर इतका मोहित होऊन गेला, कीं ॲलेक्झांडरनें त्याचा पराभव केल्यानंतरही आपण काबीज केलेलें राज्य त्यानें पोरसच्या ताब्यांत ठेवलें. मात्र आतां पोरस राजा न राहतां सत्रप किंवा ग्रीक लोकांचा मुख्य अमलदार (गव्हर्नर) या नात्यानें त्या राज्यांत राहूं लागला.

ॲलेक्झांडरनें हिंदुस्थानांत प्रवेश खैबर खिंडींतून रावळपिंडीच्या जरा उत्तरेस असलेल्या तक्षशिलेच्या मार्गानें केला. या प्राचीन शहराचे पडके अवशेष आजही आपल्याला पाहायला सांपडतात. पोरसचा पराभव केल्यानंतर ॲलेक्झांडरनें दक्षिणेस गंगेकडे चालून जाण्याचा विचार केला असावा. परंतु प्रत्यक्ष त्यानें तसें केलें नाहीं आणि सिंधु नदाच्या खोऱ्यापुरतेंच भ्रमण करून तो परत फिरला. हिंदुस्थानच्या अगदीं मध्यभागापर्यंत तो चालून येता तर काय काय घडलें असतें, हा विचार मोठा कुतूहलजनक आहे. त्याला असेच सारखे विजय मिळत राहिले असते, का आमच्या हिंदी फौजानीं त्याचा पराभव केला असता? पोरससारख्या सरहद्दीवरच्या एका राजानें सुद्धां त्याला इतकें भरपूर सळो कीं पळो करून सोडलें होतें, कीं त्यावरून मध्यभागांतील मोठमोठ्या राजांनीं त्याला यशस्वी रीतीनें रोखून धरलें असतें असेंच वाटतें. परंतु पुढें जावें असें ॲलेक्झांडरच्या मनांत असो किंवा नसो, त्या प्रश्नाचा


अलेक्झांडरचें साम्राज्य
मॅसिडोनिया
नेपचर
थ्रेस
हेलेस्पाँट
गाधार
समरकंद
आक्झस
पुरुराज
हुमा
इरावती
पारिपॉलिस
मेसोपोटेमिया
कॉबिलान
जाहिरिया
माथनर
मॉरिडोनिया
अलेक्झांड्रिया
पटिरा

निर्णय त्याच्या शिपायांनींच केला. ते थकले होते आणि इतक्या दिवसांच्या भटकण्यानें त्यांना अगदीं कंटाळा आला होता. कदाचित् हिंदी शिपायांची लढाईंतील शक्ति पाहूनही त्यांच्या मनावर परिणाम झाला असेल आणि उगीच नसता पराभव कशाला अंगावर ओढून घ्या, असेंही त्यांना वाटलें असेल. कांहींही कारण असो; ॲलेक्झांडरच्या सैन्यानें परत जाण्याचा हट्ट धरला आणि ॲलेक्झांडरला त्याचें म्हणणें मान्य करण्यावांचून मार्ग राहिला नाहीं. परंतु त्याचा परत जाते वेळचा हा प्रवास फारच हानिकारक झाला; अन्नपाण्यावांचून त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. यानंतर लौकरच ख्रिस्तपूर्व ३२३ या वर्षीं बॅबिलॉन येथें ॲलेक्झांडरचा अंत झाला. इराणच्या स्वारीवर निघाल्यानंतर आपला मायदेश जो मॅसिडोनिया त्याचें त्याला पुन्हां दर्शन झालें नाहीं.

अशा रीतीनें अवघ्या तेहतिसाव्या वर्षीं ॲलेक्झांडरचा अंत झाला. या एवढ्या छोट्या आमदानींत या 'ग्रेट' म्हणजे महान् पुरुषानें केलें तरी काय? तर त्यानें डोळे दिपवून टाकण्यासारख्या कांहीं लढाया जिंकल्या. तो फार मोठा सेनापति होता यांत मुळींच संशय नाहीं. परंतु तो मोठा गर्विष्ठ आणि घमेंडखोर गृहस्थ होता. पुष्कळदां त्याचें वागणें क्रूरपणाचें आणि अत्याचारी असे. आपण जणुं परमेश्वरच आहों, असें तो स्वतःला समजे. रागाच्या भरांत किंवा क्षणिक लहरींत त्यानें आपल्या कितीएक उत्तमोत्तम मित्रांना ठार केलें व श्रीमंत, गरीब अशा सर्व रहिवाशांसह बाहरेंच्या शहरें नष्ट केलीं. त्याच्यामागें त्याची स्मृति राहील असें एकही भरीव कार्य त्यानें केलें नाहीं. राज्यांत चांगलेसे रस्ते बांधण्यासारखें साधेंसें कार्यसुद्धां त्याच्या हातून घडलें नाहीं. आकाशांतून एखादा तारा तुटून खालीं यावा त्याप्रमाणें तो आला आणि गेला आणि मागें त्याच्या नांवाहून अधिक कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या घराण्यांतील लोकांनीं एकमेकांना ठार केलें, आणि त्याच्या महान् साम्राज्याचे तुकडे तुकडे झाले. त्याला जगज्जेता म्हणतात आणि असें सांगतात, कीं आतां जगांत जिंकायला कांहीं राहिलें नाहीं यासाठीं एकदां तो रडत बसला! परंतु वायव्येकडील एक एवढासा कोपरा सोडला तर बाकीचा सारा हिंदुस्थान देश त्यानें मुळींच जिंकला नव्हता; चीन देशाचें त्या वेळीं एक फार महत्त्वाचें राज्य होतें. त्यांच्या तर जवळपाससुद्धां ॲलेक्झांडर फिरकला नव्हता.

त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याच्या त्याच्या सेनापतींमध्यें वांटण्या झाल्या. त्यांत ईजिप्त देश टॉलेमीच्या वाट्याला आला. टॉलेमीनें तेथें मोठें प्रबळ राज्य स्थापन केलें व आपल्या राजवंशाची प्रस्थापना केली. या घराण्याची राजधानी जें अलेक्झांड्रिया हें शहर तें त्या काळांत शास्त्रें व तत्त्वज्ञान यांकरितां फार प्रसिद्ध होतें. आणि ईजिप्त देशही चांगला सामर्थ्यवान् देश म्हणून विख्यात होता. इराण, मेसापोटेमिया आणि आशिया मायनरचा कांहीं भाग हा प्रदेश ॲलेक्झांडरचा दुसरा एक सेनापति सेल्युकस याच्या वांट्याला आला. ॲलेक्झांडरनें काबीज केलेला हिंदुस्थानचा वायव्येकडील भागही याच्याच वांट्यास आला. परंतु हिंदुस्थानचा कांहींही भाग त्याला हातांत

ठेवतां आला नाहीं. कारण अॅलेक्झांडरच्या मृत्यूनंतर येथील ग्रीक सैन्य हुसकावून लावण्यांत आलें.

अॅलेक्झांडर हिंदुस्थानांत खिस्तपूर्व ३२६ या वर्षी आला. त्याचें येणें म्हणजे नुसती एक स्वारी मात्र झाली. तिचा हिंदुस्थानवर कायमचा कांहीं परिणाम झाला नाहीं. कांहीं लोकांची अशी समजूत आहे, कीं या स्वारीमुळें हिंदुस्थान व ग्रीस यांच्यामधील दळणवळण सुरू होण्यास मदत झाली. परंतु खरी गोष्ट अशी आहे, कीं अॅलेक्झांडरच्या उदयापूर्वीच पूर्व आणि पश्चिम यांच्यामध्यें एक चांगला वाहता रस्ता होता. आणि हिंदुस्थानचा इराणशींच नव्हे, तर प्रत्यक्ष ग्रीसशींही नित्य संबंध चालू होता. हा संबंध अॅलेक्झांडरच्या स्वारीपासून वाढला असेल; आणि तेव्हांपासून हिंदी आणि ग्रीक या दोन्ही संस्कृतींचा मिलाफही अधिक झाला असेल, असें मात्र म्हणतां येईल.

अॅलेक्झांडरची स्वारी व त्याचा मृत्यु यातून हिंदुस्थानांत एका प्रचंड साम्राज्याची प्रस्थापना झाली. पण हिंदुस्थानच्या इतिहासांतील तो एक अत्यंत श्रेष्ठत्वाचा काळ आहे, म्हणून त्यावर थोडा जास्त वेळ खर्च केला पाहिजे.

चंद्रगुप्त मौर्य आणि कौटिलीय अर्थशास्त्र

२५ जानेवारी, १९३१

आपल्या एका पत्रांत मीं मगधाचा उल्लेख केला आहे. हल्लींचा जो बिहार प्रांत आहे, त्यावर पसरलेलें हें एक प्राचीन राज्य होतें. हल्लीं ज्याला पाटणा हें नांव आहे तें मूळचें पाटलीपुत्र शहर या राज्याची राजधानी होतें. ज्या काळचा आपण विचार करीत आहों, त्या काळीं मगधावर नंदवंशांतील एका शाखेच्या राजाचें राज्य होतें. अॅलेक्झांडरनें हिंदुस्थानच्या वायव्य भागावर स्वारी केली त्या वेळीं एक नंद राजाच पाटलिपुत्रांत राज्य करीत होता. चंद्रगुप्त नांवाचा एक तरुण त्या वेळीं त्या राज्यामध्यें होता. तो या राजाचा नातेवाईक असावा असें दिसतें. तसेंच हा चंद्रगुप्त फारच कुशाग्र बुद्धीचा, उत्साही, आणि महत्त्वाकांक्षी मनुष्य असावा असें दिसतें. परंतु नंद राजाला हा एवढा बुद्धिमान् मनुष्य धोक्याचा वाटला असेल म्हणून म्हणा, किंवा इतर कांहीं कारणानें त्याची त्याच्यावर गैरमर्जी झाल्यामुळें म्हणा, राजानें त्याला आपल्या देशांतून हद्दपार केलें होतें. चंद्रगुप्त हा तक्षशिलेच्या बाजूला गेला. अॅलेक्झांडर व ग्रीक यांच्यासंबंधींच्या वार्तांमुळें कुतूहल होऊन कदाचित् तो तिकडे वळला असावा. त्याच्याबरोबर अत्यंत कर्तबगार असा एक ब्राह्मण होता. त्याचें नांव विष्णुगुप्त अथवा चाणक्य. चंद्रगुप्त आणि चाणक्य हे दोघेही दैवाला दोष लावीत बसणारे कोणी

दळुबाई शेळपट लोक नव्हते. कसलेंही संकट आलें, तरी त्याची त्यांना यत्किंचितही डर नव्हती. त्यांच्या डोक्यांत महत्त्वाकांक्षा भरलेली होती आणि कित्येक योजना भविष्यकाळांत घडवून आणण्याचीं स्वप्नें त्यांच्या डोळ्यासमोर नाचत होतीं. आणि स्वस्थ न बसतां विजय मिळविण्यासाठीं धडपड करण्याला ते उत्सुक झालेले होते. असेंही असेल, कीं ॲलेक्झांडरच्या विजयानें चंद्रगुप्ताचे डोळे दिपून गेले असतील व आपणही त्याचेंच अनुकरण करावें असें त्याला वाटूं लागलें असेल. या कामीं चाणक्य हा चंद्रगुप्ताला अत्यंत आदर्श असा मित्र आणि सल्लागार लाधला होता. ते दोघेही डोळे उघडे ठेवून तक्षशिलेमध्यें घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे नजर रोखून योग्य संधीचीच जणुं वाट पाहत होते.

ही संधि त्यांना लौकरच मिळाली. ॲलेक्झांडरच्या मृत्यूची बातमी तक्षशिलेंत येताक्षणींच चंद्रगुप्तानें जाणलें, कीं हीच वेळ हालचाल करण्याला योग्य आहे. त्यानें आजूबाजूच्या लोकाना उठविलें. आणि त्यांच्या मदतीनें त्यानें ॲलेक्झांडरनें त्या भागांत ठेवलेल्या सैन्यावर हल्ला करून तें पार हाकलून लावलें. तक्षशिलेचा ताबा घेऊन चंद्रगुप्त आणि त्याचे दोस्त दक्षिणेकडे पाटलिपुत्रावर चालून गेले व नंद राजाचा त्यांनीं पराभव केला. हा प्रकार खिस्तपूर्व ३२१ या वर्षीं म्हणजे ॲलेक्झांडरच्या स्वारीनंतर पांच वर्षें सुद्धां लोटलीं नाहींत तोंच घडला. याच वेळेपासून मौर्य कुळाच्या राज्याला सुरुवात झाली. चंद्रगुप्ताला मौर्य कां म्हणत, याचें नीटसें कारण उमगत नाहीं. कांहींची कल्पना अशी आहे, कीं त्याच्या आईचें नांव मुरा असें होतें म्हणून हें नांव पडलें, तर कांहींच्या मतें त्याच्या आईचा बाप नंद राजांच्या मोरांचा रक्षक होता, तेव्हां संस्कृतमधील मयूर या शब्दावरून हें नांव पडलें असावें. नांवाची ही पूर्वपीठिका कांहींही असली, तरी त्याला चंद्रगुप्त मौर्य म्हणत ही गोष्ट निश्चित आहे; पुढें कित्येक शतकांनंतर चंद्रगुप्त नांवाचा आणखी एक मोठा राजा हिंदुस्थानांत झाला. त्याच्याहून हा निराळा होता हें दाखविण्यासाठींही मौर्य हें उपपद त्याच्या नांवापुढें मुद्दाम लादण्यांत येऊं लागलें असेल.

साऱ्या भारतावर राज्य करणाऱ्या मोठमोठ्या राजाचीं – चक्रवर्ती राजांचीं वर्णनें महाभारतामध्यें किंवा प्राचीन कथांतून आपण वाचतों. परंतु या काळचें चांगलेंसें ज्ञान आपल्याला मिळत नाहीं; आणि ज्याला भारत किंवा भारतवर्ष म्हणत, तो देश तरी कोठपासून कोठपर्यंत होता याची सुद्धां नीटशी कल्पना आपल्याला येत नाहीं. आपल्याला आज ज्या कथा उपलब्ध आहेत, त्यांमध्यें या राजांच्या सामर्थ्याबद्दल अतिशयोक्ति केली गेली असण्याचाही संभव आहे. तें कसेंही असो; परंतु हिंदुस्थानमध्यें विशाल विस्तार पावलेलें आणि अत्यंत प्रबळ असें इतिहासांतील पहिलें स्पष्ट नजरेंत भरणारें साम्राज्य म्हणजे चंद्रगुप्त मौर्याचेंच साम्राज्य होय. हें राज्य फारच सुधारलेलें आणि सामर्थ्यवान् होतें, हें दिसेलच पुढें आपल्याला. ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे, कीं अशा तऱ्हेचें राज्य आणि राज्यव्यवस्था हीं कांहीं अकस्मात् एका दिवसांत

उत्पन्न होणारीं नाहींत. त्याच्याआधीं किती तरी काळपर्यंत अनेक घटना घडत आलेल्या असणें आवश्यक आहे; विशेषतः लहान लहान राज्यें एकमेकांशी संलग्न होऊन त्यांचें एक राज्य होत जाण्याची क्रिया बराच काळ होत आली असली पाहिजे. आणि राज्य-व्यवस्थेचें तंत्र अधिकाधिक सुधारण्याची क्रियाही हळूहळू पुष्कळ काळपर्यंत चालत आली असली पाहिजे.

आशिया मायनरपासून हिंदुस्थानपर्यंतचा प्रदेश शिकंदरच्या ज्या सेनापतींच्या वांटणीला आलेला होता, त्या सेल्युकसनें चंद्रगुप्ताच्या अमदानींत मोठ्या सैन्यानिशीं सिंधु नद ओलांडून हिंदुस्थानवर हल्ला केला. परंतु या अविवेकाचें प्रायश्चित्त त्याला चांगलेंच भोगावें लागलें. चंद्रगुप्तानें त्याचा प्रचंड पराभव केला आणि आल्या वाटेनें त्याला परत जावें लागलें. नवीन कांहीं प्रांत तर त्याला मिळाला नाहींच; उलट गाधार म्हणजेच अफगाणिस्तानमधील काबूल आणि हिरातपर्यंतचा भाग त्याला चंद्रगुप्ताला द्यावा लागला. तसेंच चंद्रगुप्तानें त्याच्या मुलीशीं विवाहही केला. चंद्रगुप्ताचें साम्राज्य आतां उत्तर हिंदुस्थानचा सर्वच्या सर्व प्रांत आणि अफगाणिस्तानचा कांहीं भाग एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर काबूलपासून बंगालपर्यंत आणि आरबी समुद्रापासून तों बंगालच्या उपसागरापर्यंत पसरलें. दक्षिण हिंदुस्थान तेवढें त्याच्या ताब्यांत नव्हतें. या प्रचंड साम्राज्याची राजधानी पाटलिपुत्र हें शहर होतें.

सेल्युकसनें चंद्रगुप्ताच्या दरबारांत आपल्यातर्फे प्रतिनिधि म्हणून मेगॅस्थेनीस नांवाचा वकील पाठविला होता. त्या काळची मोठी चित्तवेधक हकीकत मेगॅस्थेनीसनें लिहून ठेवलेली आहे. परंतु याहूनही अधिक चित्तवेधक व कुतूहल उत्पन्न करणारा आणखी एक वृत्तांत आपल्याला उपलब्ध आहे. त्यामध्यें चंद्रगुप्ताच्या राज्याबद्दल अत्यंत संपूर्ण व तपशीलवार माहिती दिलेली आहे. हा वृत्तांत म्हणजे 'कौटिल्याचें अर्थशास्त्र' हा ग्रंथ होय. अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचें शास्त्र आणि हा कौटिल्य म्हणजे दुसरा कोणी नसून आपल्या ओळखीचा विष्णुगुप्त किंवा चाणक्य हाच होय.

या अर्थशास्त्रग्रंथांत इतके विपुल विषय आहेत आणि इतक्या विविध गोष्टींची त्यामध्यें चर्चा केलेली आहे, कीं त्याबद्दल थोडक्यांत तुला कांहीं फारसें सांगतां येणार नाहीं मला. त्याच्यामध्यें चर्चा केलेल्या विषयांत राजांचीं कर्तव्यें, त्यांचे मंत्री व सल्लागार यांचीं कर्तव्यें, मंत्रिमंडळाच्या बैठकी, राज्याचीं निरनिराळीं खातीं, व्यापार आणि उद्योगधंदे, शहराचे व खेडेगांवांचे कारभार, कायदा आणि न्यायालयें, सामाजिक रूढी, स्त्रियांचे हक्क, वृद्ध आणि अशक्त यांचें पालनपोषण, लग्न आणि घटस्फोट, कराची आकारणी, सैन्य आणि आरमार, युद्ध आणि तह, राजकारणी मुत्सद्यांचे डावपेंच व कर्तव्यें, शेती, सूत काढणें आणि कापड विणणें, कारागीर लोक, प्रवासाचे परवाने, एवढेच नव्हे, तर तुरुंगसुद्धां, असे इतके असंख्य विषय आहेत, कीं अशी ही यादी मला आणखी किती तरी लांबवर वाढविता येईल. परंतु कौटिल्याच्या ग्रंथातील प्रकरणांच्या मथळ्यांनींच कांहीं हें सारें पत्र मला भरून टाकायचें नाहीं!

या ग्रंथावरून असें दिसतें, कीं राज्यारोहणाच्या वेळीं राजाला राज्याधिकार लोकांच्या हातून मिळत असे. त्या अधिकाराचा स्वीकार करतांना राजाला लोकांची सेवा करण्याबद्दल प्रतिज्ञा करावी लागे, कीं "मीं जर तुमच्यावर जुलूम केला, तर मला स्वर्गप्राप्ति न होवो आणि माझा संसार व माझी संपत्ति यांचा नाश होवो." या ग्रंथात राजाचा रोजचा व्यवहार व दिनचर्या यांबद्दलची माहिती आढळत. तातडीच्या कामासाठीं वाटेल त्या वेळीं त्यानें तयार असलें पाहिजे. त्याच्या मर्जीस्तु येईल तोंपर्यंत कामाचा खोळंबा व्हायचा, किंवा काम होणें न होणें हें त्याच्या लहरीवर अवलंबून राहायचें हें चालत नसे. "राजा जर उत्साही, कर्तव्यतत्पर असेल, तर प्रजाही तितकीच कर्तव्यतत्पर राहते," "लोकांच्या सुखांत, लोकांच्या कल्याणांत राजाचें सुख आहे, त्याला जें आवडतें तें चांगलें असें त्यानें मानतां कामा नये; तर प्रजेला जें जें आवडतें तेंच चांगलें, असेंच त्यानें मानलें पाहिजे." आजकाल आपल्या जगांतून राजे नाहींसे होत आहेत – आतां फारच थोडे राजे शिल्लक राहिले आहेत आणि लौकरच तेही जातील. परंतु प्राचीन हिंदुस्थानांत राजपदाचें ध्येय प्रजेची सेवा हें होतें हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. राजाला कांहीं दैवी अधिकार असतात असें इकडे मानलें जात नव्हतें किंवा त्यांना एकतंत्री सत्ताही नव्हती. राजाकडून अधर्माचरण झालें तर त्याला काढून टाकण्याचा व त्याच्या जागीं दुसरा राजा बसविण्याचा प्रजेला हक्क होता. अर्थात् हें ध्येय होतें; असा धर्मशास्त्रार्थ होता. परंतु प्रत्यक्षांत पुष्कळ राजे असे झाले, कीं त्यांच्या हातून या धर्माचें पालन झालें नाहीं आणि त्यांनीं आपल्या मूर्खपणामुळें आपल्या देशावर आणि प्रजेवर दुर्भाग्याची संक्रांत आणली.

'आर्य कधींही गुलामगिरी पत्करणार नाहीं'* या प्राचीन तत्त्वाचा पुरस्कार अर्थशास्त्रांतही आहे. परदेशांतून आणलेले किंवा या देशांतल्या लोकांपैकींही कांहीं लोक गुलाम म्हणून आर्यांजवळ होते असें दिसतें. पण आर्यांपुरतें पाहिलें तर त्यांच्यापैकीं कोणी कधीं गुलाम होऊं नये याबद्दल मात्र दक्षता घेतली जात असे.

मौर्यांची राजधानी पाटलिपुत्र हें नगर होतें. गंगेच्या कांठावर नऊ मैल लांब पसरलेलें हें शहर अत्यंत ऐश्वर्यसंपन्न व भव्य होतें. त्याच्या चौसष्ट मुख्य वेशी होत्या आणि छोट्या वेशी तर शेंकडों होत्या. घरें मुख्यतः लांकडाचीं बांधलेलीं होतीं. त्यामुळें आगीचें भय फार असे. त्यासाठीं काळजीपूर्वक संरक्षक योजना आधींपासून करून ठेविलेल्या होत्या. मुख्य मुख्य रस्त्यांवर हजारों भांडीं नेहमीं पाण्यानें भरून ठेवलेलीं असत. तसेंच प्रत्येक घरमालकानें आगीच्या वेळीं उपयोगीं पडावीं म्हणून पाण्यानें भरलेलीं भांडीं, शिड्या, आकड्या, आणि इतर अशाच जरुरीच्या सर्व वस्तू तयार ठेवल्याच पाहिजेत असा दंडक होता.

कौटिल्यानें नमूद केलेला एक नियम वाचून तुला मोठें कौतुक वाटेल. जो कोणी रस्त्यांत घाण टाकील त्याला दंडाची शिक्षा असे. जो कोणी रस्त्यांत चिखल

* न त्वेवाऽऽर्यस्य दासभावः।

अथवा पाणी सांचूं देईल त्यालाही शिक्षा असे. हे नियम जर प्रत्यक्ष अमलांत असतील, तर पाटलिपुत्र आणि इतरही शहरें मोठीं उमदीं, स्वच्छ आणि निरोगी असलीं पाहिजेत. आमच्या नगरपालिकांनीं असे कांहीं नियम केले तर किती चांगलें होईल !

पाटालिपुत्रामध्यें शहराच्या व्यवस्थेकरितां एक नगर-मंडळ होतें. या मंडळाची निवड लोक करीत असत. त्यांमध्यें तीस समासद असत व पांचपांचाचें एक अशी त्याचीं सहा पोटमंडळें केलेलीं असत. त्या पोटमंडळांकडे शहरांतील उद्योगधंदे आणि हस्तव्यवसाय, प्रवासी व यात्रेकरूंसाठीं करावयाच्या सोयी, कराच्या दृष्टीनें जन्म आणि मृत्यूंची नोंद, कारखाने, या आणि अशा इतर बाबींचा कारभार सोंपविलेला असे; आणि सगळें मंडळ मिळून शहराचें आरोग्य, जमाबंदी, पाणीपुरवठा, उद्यानें आणि सार्वजनिक इमारती यांची व्यवस्था पाहात असे.

न्यायदानाकरितां पंचायती असत आणि त्यांच्या निकालांचे फेरविचार करण्यासाठीं वरिष्ठ न्यायकचेऱ्या असत. दुष्काळासाठीं विशेष उपाय योजण्यांत येत आणि सर्व सरकारी कोठारांमध्यें तिम्मा माल नेहमीं दुष्काळासाठीं म्हणून शिल्लक राखून ठेवण्यांत येत असे.

२२०० वर्षांपूर्वीं चंद्रगुप्त व चाणक्य यांनीं सुसंघटितपणें प्रस्थापित केलेलें मौर्यांचें साम्राज्य हें अशा प्रकारचें होतें. कौटिल्य व मेगॅस्थेनीस यांनीं लिहिलेल्या गोष्टींपैकीं कांहीं थोड्याच फक्त मीं तुला सांगितल्या आहेत. त्यावरून त्या वेळच्या उत्तर हिंदुस्थानची ढोबळ अशी कल्पना तुला येईल. पाटलिपुत्र राजधानी आणि साम्राज्यांतील इतर मोठीं नगरें व हजारों खेडीं हीं या काळीं यशस्वी व उत्साही जीवनानें नुसतीं गजबजून गेलीं असलीं पाहिजेत असें दिसतें. साम्राज्याच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत मोठमोठे रस्ते होते. मुख्य राजपत्र (राजपथ) किंवा राजरस्ता पाटलिपुत्रांतून वायव्य सरहद्दीपर्यंत गेलेला होता, कितीएक कालवे तयार करण्यांत आले होते, आणि मुद्दाम एक खास पाणीपुरवठा-खातें त्यांची व्यवस्था पाहण्याकरितां निर्माण करण्यांत आलेलें होतें: तसेंच बंदरें, तरी, पूल, आणि या ठिकाणाहून त्या ठिकाणीं ये-जा करण्याला असंख्य नावा आणि जहाजें यांची व्यवस्था पाहण्यासाठीं एक आरमार-खातेंही उघडलेलें होतें. जहाजें समुद्र ओलांडून थेट ब्रह्मदेश आणि चीन येथपर्यंतही जात असत.

अशा या साम्राज्यावर चंद्रगुप्तानें चोवीस वर्षें राज्य केलें. तो ख्रिस्तपूर्व २९६ सालीं मरण पावला. मौर्यांच्या साम्राज्याची पुढची हकीकत आपण आतां पुढच्या पत्रांत सांगूं.

१९
तीन महिने

एस्. एस्. क्रॅकोव्हिया
२१ एप्रिल, १९३१

तुला मागचें पत्र लिहिल्याला आज किती दिवस होऊन गेले. जवळजवळ तीन महिने झाले म्हणायचे. पण या तीन महिन्यात केवढें दुःख, किती अडचणी, किती मानसिक ताण अनुभवावा लागला! हिंदुस्थानांत या तीन महिन्यांत केवढी घडामोड झाली. आणि तशीच आपल्या कुटुंबांतही. हिंदुस्थानमध्यें काहीं काळ सत्याग्रहाची, कायदेभंगाची मोहीम तूर्त बंद ठेवली आहे. परंतु आमच्यापुढें जे प्रश्न उभे आहेत त्यांचा निकाल करणें फार अवघड आहे. आणि इकडे आपल्या कुटुंबाचा तर अत्यंत प्रिय आधारच तुटून पडला आहे. त्यांच्यापासून आपल्याला स्फूर्ति मिळत होती, सामर्थ्य प्राप्त होत होतें; त्यांच्याच काळजीच्या सांवलीखालीं आम्ही वाढलों आणि आपल्या मातृभूमीसाठीं – भारतासाठीं – आपापल्या शक्तीप्रमाणें काम करण्यास आम्ही त्यांच्याच-पासून शिकलों. नैनी तुरुंगांतला तो दिवस मला किती चांगला आठवतो आहे! तो २६ जानेवारीचा दिवस होता. आणि रोजच्याप्रमाणें मी प्राचीन कालाबद्दल तुझ्यासाठीं कांहीं लिहावें म्हणून बसलों होतों. आदल्याच दिवशीं मीं चंद्रगुप्त व त्यानें प्रस्थापित केलेलें मौर्यांचें साम्राज्य यांबद्दल लिहिलें होतें. आणि चंद्रगुप्त मौर्याच्या पाठीमागून झालेले लोक – उदाहरणार्थ, महात्मा अशोक, ज्याला देवांचा प्रिय म्हणत, जो हिंदी इतिहासाच्या आकाशांत एखाद्या ताऱ्याप्रमाणें चमकला आणि जो आपल्यामागें अमर कीर्ति ठेवून गेला – त्यांच्याबद्दल पुढें लिहिण्याचें तुला वचनही मीं दिलें होतें. अशोकाचा विचार मनांत येऊन मी जरा बसलों होतों, तों माझें मन तेथून निघून भ्रमण करीत करीत मी हातांत पेन आणि कागद घेऊन तुला लिहावयाला बसलों होतों, त्या दिवसाशीं येऊन ठेपलें. आम्हांला हा दिवस फार महत्त्वाचा दिवस आहे. कारण एक वर्षांपूर्वी हाच दिवस सर्व हिंदुस्थानभर शहरोंशहरीं आणि खेडोंपाडीं आम्ही स्वातंत्र्य-दिन – पूर्ण स्वराज्य-दिन – म्हणून पाळला होता, आणि आम्हीं लाखोंनीं त्या दिवशीं जमून पूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा केली होती; त्याला आज वर्ष झालें होतें. या वर्षांत केवढी झटापट झाली होती, किती हाल सोसावे लागले होते, किती विजय प्राप्त झालेला होता! आणि आजही पुन्हां हिंदुस्थानांत हा महत्त्वाचा दिवस पाळला जाणार होता. नैनी तुरुंगाच्या त्या सहा नंबरच्या बराकींत मी बसलों होतों तरी माझ्या डोळ्यांपुढें साऱ्या देशभर त्या दिवशीं होणाऱ्या त्या जाहीर सभा, त्या मिरवणुका, ते लाठीहल्ले, ती पकडापकड यांचेंच चित्र उभें राहिलें होतें. त्या विचारानें मला आनंद होत होता, अभिमान वाटत होता, आणि हळहळही वाटत होती. तोंच

एकाएकीं माझा ध्यानभंग झाला. बाहेरच्या जगांतून मला असा निरोप आला, कीं दादू फार आजारी आहेत आणि त्यांच्याकडे जाण्यासाठीं म्हणून तुरुंगांतून मला ताबडतोब सोडून द्यावयाचें आहे. काळजीनें माझें अंतःकरण भरून गेलें. त्या साऱ्या कविकल्पनेच्या भराऱ्या संपल्या. तुला लिहायला घेतलेलें तें पत्र मीं तसेंच दूर ठेवून दिलें आणि नैनी तुरुंगांतून निघून मी आनंदभवनाच्या मार्गाला लागलों.

दादू आपल्याला सोडून जाण्यापूर्वी दहा दिवस मला त्यांच्या सान्निध्यांत काढण्यास सांपडले. दहा दिवस आणि रात्री त्यांचें तें दुखणें, तळमळणें आणि यमदूताबरोबर चाललेली नेटाची लढाई आम्ही पाहत होतों. स्वतःच्या जीवनांत त्यांनीं कितीएक लढाया केल्या आणि कितीएक विजयही मिळविले. हार घेणें हें त्यांच्या चित्ताला कधीं माहीतच नव्हतें! आणि आज प्रत्यक्ष मृत्यूशीं समोरांसमोर झुंजत असतांना माघार घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. ही त्यांची शेवटची झटापट पाहत असतां त्यांच्यावर आपलें इतकें प्रेम असूनही आपल्याला त्यांना कसलीच मदत करतां येत नाहीं, या विचारानें माझ्या मनाची तळमळ होत होती. फार पूर्वी एडगर ॲलन पोच्या गोष्टींत वाचलेलीं कांहीं वाक्यें माझ्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं. त्यानें लिहिलें होतें, "माणूस स्वतः होऊन देवदूतांच्याही पुढें मान वांकविणार नाहीं किंवा मृत्यूपुढें सुद्धां भरपूर झगडा केल्याविना सर्वस्वीं हार जाणार नाहीं; तसें जर त्याच्या हातून घडत असेल, तर त्याचें कारण केवळ एकच आहे. तें म्हणजे त्याची जात्याच बलहीन असलेली इच्छाशक्ति लुळी पडते हें होय."

फेब्रुवारीच्या सहा तारखेस पहांटेच्या सुमारास दादू आम्हांला सोडून गेले. त्यांना अत्यंत प्रिय अशा निशाणांत त्यांचा देह गुंडाळून लखनौहून आनंदभवनांत आम्ही घेऊन आलों. प्रहरभराच्या आंत त्यांची मूठभर राख झाली आणि गंगेनें तो मौल्यवान् ठेवा सागराकडे वाहून नेला.

लाखों लोकांना त्यांच्या मृत्यूमुळें दुःख झालें आहे; मग आम्ही त्यांचीं मुलें, त्यांच्याच मांसांतून, त्यांच्याच हाडांतून जन्मास आलेलीं आम्ही मुलें, आमची अवस्था काय सांगावी! आणि नवें आनंदभवन–आमच्यासारखेंच तेंही त्यांचें एक अपत्यच आहे; त्यांनींच इतक्या प्रेमानें आणि काळजीनें त्याला जन्मास घातलें आहे; त्याचें पुढें काय? आज तें किती सुनें सुनें, निर्मनुष्य झालें आहे. त्यांतील प्राणच जणुं निघून गेला आहे! त्याच्यामधील व्हरांड्यामधून इकडे तिकडे हिंडत असतां त्याला निर्माण करणाऱ्या त्यांचीच मूर्ति सदैव जणुं आमच्या मनापुढें उभी राहते आणि त्यांच्या शांतीचा भंग तर आमच्या पदरवामुळें होणार नाहीं ना, अशीच जणुं भीति वाटून आम्ही पाऊल मुळींच न वाजवतां तेथें चालत असतों.

त्यांच्यासाठीं आम्ही दुःखानें तळमळतों. पावलोंपावलीं त्यांच्यावांचून आम्हांला चुकल्याचुकल्यासारखें होतें. दिवस भराभर निघून जात आहेत, तरी दुःख कांहींसुद्धां

कमी होत नाहीं किंवा त्यांचा अभाव सहन होत नाहीं. परंतु खरा विचार केला, तर आमच्या मनाची अशी स्थिति व्हावी हें त्यांना कांहीं आवडलें नसतें. दुःखाच्या आम्हीं इतकें आहारीं जाणें त्यांना पटलें नसतें. त्यांनीं ज्याप्रमाणें आपल्या आयुष्यांत अडचणींशीं झगडा केला त्याप्रमाणें आम्हींही दुःखाशीं झगडा करावा आणि त्यावर मात करावी अशीच त्यांची इच्छा असती. त्यांचें अपुरें राहिलेलें काम आम्हीं पुढें चालू ठेवण्यानेंच त्यांना आनंद झाला असता. कामाचे डोंगर पुढें पडले असतांना, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या कार्यांत आमच्या सेवेची गरज असतांना आम्हांला स्वस्थ राहून कसें चालेल? किंवा व्यर्थ दुःख कसें करीत बसतां येईल? हें कार्य करीत असतांनाच त्यांना मृत्यु आला; त्याच कार्यासाठीं आम्हीं आपलें आयुष्य घालविलें पाहिजे आणि जरूर तर मेलेंही पाहिजे. कशीं झालीं तरी आम्ही त्यांचींच मुलें आहोंत आणि त्यांच्या अंगचें तेज, सामर्थ्य आणि निश्चय यांचा कांहीं तरी अंश आमच्या अंगीं आहेच.

हें मी लिहीत असतांना माझ्या दृष्टीसमोर अगाध आरबी समुद्राचें निळें पाणी दूरवर पसरलेलें आहे आणि इकडच्या बाजूला खूप खूप लांब हिंदुस्थानचा किनारा चालतो आहेसें दिसतें आहे. माझ्या पुढचा हा प्रचंड आणि जणुं अमर्याद असा विस्तार पाहिला म्हणजे नैनी तुरुंगांतील ती छोटीशी बराक, तेथल्या त्या उंच उंच भिंती–जिथें बसून मीं पूर्वीचीं पत्रें तुला लिहिलीं–यांची मला आठवण येते; दोहोंमध्यें किती फरक! येथें क्षितिजाची रेषा–जेथें समुद्र आकाशाशीं भिडलेला दिसतो आहे–कशी सरळ स्वच्छ दिसते आहे; तर तेथें तुरुंगात कैद्यापुढचें क्षितिज म्हणजे त्याच्याभोंवतींच्या उंच भिंतींचें वरचें टोंक! आज तुरुंगांतून पुष्कळसे लोक आम्ही बाहेर आलों आहों व बाहेरच्या मोकळ्या हवेंत वावरतों आहों. परंतु अजून आमचे कित्येक सहकारी तुरुंगांतच आहेत; आणि तेथील त्या अरुंद खोल्यांतून समुद्र, पृथ्वी किंवा क्षितिज यांचें दर्शन होणें त्यांना बंद आहे. तसेंच प्रत्यक्ष हिंदुस्थानही अजून कैदीच आहे, त्याचें स्वातंत्र्य अजून यायचेंच आहे. आणि हिंदुस्थान स्वतंत्र नसताना आम्ही तुरुंगाच्या बाहेर आहों या गोष्टीला कितीशी किंमत आहे?

२०

आरबी समुद्र

क्रॅकोव्हिया जहाज,

२२ एप्रिल, १९३१

मुंबईहून कोलंबोपर्यंत आम्ही या क्रॅकोव्हिया जहाजांतून प्रवास करतों आहों, हा किती विचित्र योगायोग आहे! चार वर्षांपूर्वी हीच क्रॅकोव्हिया बोट व्हेनिस बंदरांत

केव्हा येते याची मी किती वाट पाहत बसलों होतों, तें मला चांगलें आठवतें आहे. त्या बोटीवर दादू होते. आणि तुला स्वित्झर्लंडमध्यें बेक्स येथें शाळेंतच ठेवून त्यांना भेटण्यासाठीं मी व्हेनिसला आलों होतों. पुन्हां कांहीं महिन्यांनीं दादू याच बोटीनें यूरपमधून परत मायदेशीं आले तेव्हा त्याची-माझी मुंबईस या बोटीवर भेट झाली. त्या वेळीं त्यांच्याबरोबर प्रवास क्करीत असलेले लोक आजही या बोटीवर आमच्या-बरोबर आहेत. ते दादूंच्या किती तरी तऱ्हेतऱ्हेच्या हकीकती सांगत असतात.

गेल्या तीन महिन्यांत झालेल्या घडामोडींबद्दल काल तुला मी लिहीत होतों. त्या गेल्या कांहीं आठवड्यांत एक अशी गोष्ट घडली आहे, कीं तिचें स्मरण तूं सतत ठेवावेंस अशी माझी इच्छा आहे; सारा हिंदुस्थान ती पुष्कळ काळपर्यंत विसरूं शकणार नाहीं. अजून महिनासुद्धां झाला नाहीं. कानपुरामध्यें हिंदुस्थानचा एक सच्चा उमदा शिपाई मृत्युमुखीं पडला. त्याचें नांव गणेश शंकर विद्यार्थी. दुसऱ्यांना मृत्यूपासून वांचवीत असतां त्यांचा खून करण्यांत आला. गणेशजी माझे अत्यंत प्रिय मित्र होते. माझे अत्यंत उदार, निःस्वार्थी आणि उमदे सहकारी होते. त्यांच्याबरोबर खाद्याला खांदा लावून काम करण्यात मला मोठा अभिमान वाटत होता. गेल्या महिन्यांत कानपूरमध्यें जेव्हां वेडाची लाट उसळली आणि हिंदी मनुष्यच हिंदी माणसाचे प्राण घेऊं लागला, तेव्हां गणेशजींनीं त्या मारामारींत उडी घेतली; आपल्याच कोणाही देशबांधवाला ठार करण्याच्या हेतूनें नव्हे, तर त्याला मृत्यूपासून वांचविण्यासाठीं. शेंकडों प्राण त्यांनीं वांचविले. स्वतःचे प्राण मात्र त्यांना वांचवितां आले नाहींत. आणि ते वांचविण्याची त्यांनीं फिकीरही केली नाहीं. ज्याना वांचविण्याची ते धडपड करीत होते, त्यांच्याच हातून त्यांना मृत्यु आला. त्यांच्या मृत्यूमुळें कानपूर आणि आपला प्रांत यांचा एक ताराच गमावला आहे. आणि आम्ही आमच्या एका प्रिय आणि सुजाण मित्राला मुकलों आहों. परंतु त्यांचा मृत्यु किती तेजस्वी, किती वैभवशाली! गर्दीतील माथेफिरूपणाला त्यांनीं यत्किंचितही न क्कचरतां आणि अविचलित, शांत वृत्तीनें तोंड दिलें, आणि स्वतः धोक्यामध्यें व प्रत्यक्ष मृत्यूच्या खाईत असतांनाही इतरांच्या जीवांची, ते कसे वांचवावे याचीच, फक्त चिंता त्यांनीं केली.

तीन महिन्यांतील घडामोड! तीन महिने म्हणजे काल-समुद्रांमधील एक बिंदु, राष्ट्राच्या जीवितांतील एक पळ मात्र. तीनच आठवड्यांपूर्वी मी सिंधमधील सिंधु नदीच्या खोऱ्यामधील मोहेंजोदारो येथें सांपडलेले अवशेष पाहावयास गेलों होतों. माझ्या डोळ्यांपुढें जमिनींतून वर येत असलेलें एक प्रचंड नगरच मीं पाहिलें; नगर म्हणजे असें तसें नव्हे, तर त्यांतील घरें चांगलीं पक्क्या विटांचीं आणि रस्ते चांगले मोठे रुंद; आणि किती वर्षांपूर्वीचें बांधकाम हें सारें, तर म्हणतात, कीं ५००० वर्षांपूर्वीचें. त्या प्राचीन शहरांत हातीं लागलेले सुंदर दागदागिने आणि मातीचीं भांडीं मीं पाहिलीं. आणि माझ्या डोळ्यांपुढें जणुं कल्पनाचित्र थोडा वेळ उभें राहिलें, कीं त्या प्राचीन शहराच्या

मोठ्या रस्त्यांतून आणि गल्ल्यांतून छान छान पोशाख केलेल्या स्त्री-पुरुषांची ये-जा चालली आहे. मुलें–मुलेंच तीं–रस्त्यामध्यें खेळत आहेत. बाजार नानातऱ्हेच्या विकाऊ वस्तूंनीं फुलले आहेत, लोक माल विकीत आहेत, विकत घेत आहेत आणि देवळांमधून घंटा निनादत आहेत.

गेलीं ५००० वर्षें हिंदुस्थाननें आपला संसारशकट चालविला आहे–आणि कितीएक बदल होत आलेले आहेत. आणि म्हणून कधीं कधीं माझ्या मनांत असा विचार येतो, कीं आमची ही इतकी प्राचीन असूनही इतकी नवतरणी आणि सुंदर अशी माता आपल्या मुलांची धांवपळ आणि उतावीळपणा व आज आहेत तर उद्यां नाहींत अशीं त्यांचीं क्षणजीवी सुखदुःखें, यांकडे पाहून मनांतल्या मनांत हंसत असेल, नाहीं?

२१

सुटीचा काळ आणि एक स्वप्नयात्रा

२६ मार्च, १९३२

नैनी तुरुंगांत मीं तुला प्राचीन इतिहासासंबंधीं शेवटचें पत्र लिहिलें, त्याला आज चौदा महिने झाले. त्यानंतर तीन महिन्यांनीं त्याच पत्रमालिकेंत आणखी दोन पत्रें मीं आरबी समुद्रावर लिहिलीं. आपण त्या वेळीं क्रॅकोव्हिया बोटींतून वेगानें लंकेकडे चाललों होतों. मी लिहीत असतांना त्या ठिकाणीं तो प्रचंड सागर माझ्यापुढें लांबवर पसरला होता. आणि त्याच्याकडे किती डोळे भरून पाहिलें तरी तृप्तीच होत नव्हती. नंतर लंका आली; तेथें एक महिनाभर आपण गोड विश्रांतीची मौज उपभोगली आणि आपलीं दुःखें व काळज्या विसरून जाण्याचा प्रयत्न केला. तें अतिशय सुंदर बेट आपण या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हिंडून सारें पालथें घातलें. तेथलें सृष्टीचें तें अपार देणें आणि अतुलनीय रमणीयता पाहून आपण मोहून गेलों. कँडी, नुवर एलिया आणि प्राचीन वैभवाचे निदर्शक असे अवशेष आणि चिह्नें जिच्यामध्यें भरपूर आहेत अशी अनुरुद्धपूर नगरी, अशा त्या आपण पाहिलेल्या अनेक स्थळांची आठवण झाली म्हणजे किती आनंद होतो! पण या सगळ्यांत उष्ण कटिबंधांतील तीं गार अरण्यें, त्यांतील ती गर्द वन्य संपत्ति, जणुं कांहीं हजारों डोळेच तुमच्याकडे लागले आहेत असा भास ज्यामुळें व्हावा अशीं ताजींतवानीं पानें, फुलें-फळें यांचा विचार मनांत आला, म्हणजे तर मन आनंदानें उड्या मारूं लागतें. तेथलीं तीं सुपारीचीं, पातळ शेलाटी, सरळ रेखीव झाडें, असंख्य नारळीचीं झाडें, तालवृक्षांच्या झालरीनें शोभिवंत झालेला तो किनारा आणि त्या ठिकाणीं एका बाजूनें बेटावरील तो पाचूसारखा

हिरवा रंग; आणि दुसऱ्या बाजूनें समुद्र व आकाश यांच्यामधील नीलिमा यांचा होणारा संगम; किनाऱ्यावरील भूमीशीं खेळणारें आणि तुषारांनीं चमकणारें समुद्राचें पाणी आणि तालवृक्षांच्या पानांमधून सळसळ करीत जाणारा वारा, साऱ्याच गोष्टी किती लोभनीय वाटतात!

तुझी तर ती या उष्ण प्रदेशाला पहिलीच भेट होती; मी पूर्वी एकदां येथें थोडे दिवस राहिलों होतों; परंतु ती आठवण माझी जवळजवळ बुजून गेलेली होती; त्यामुळें मला सुद्धां आज आपण कांहीं नवाच अनुभव घेत आहों असें वाटलें. या उष्ण प्रदेशांचें मला फारसें आकर्षण वाटत नसे; कारण उष्ण हवेची मला भीति वाटे. समुद्र, पर्वत आणि सर्वांत अधिक म्हणजे तें बर्फ आणि वाहते बर्फखंड यांचेंच मला विशेष वेड आहे. तथापि सीलोनमध्यें आपण जो अगदीं थोडासाच मुक्काम केला, तेवढ्यांतही या उष्ण प्रदेशामधील विशेष मोहकता आणि जादू यांचा थोडाफार अनुभव मला येऊन गेला आणि मी मनांत थोड्याशा अतृप्तीच्या बोंचणीनें म्हणालों, कीं पुन्हां एकदा केव्हां तरी इकडे येऊन या प्रांताची मौज जास्त मोकळेपणीं अनुभवलीच पाहिजे.

सीलोनमधील आपला सुटीचा—विश्रांतीचा—महिना हां हां म्हणतां संपून गेला आणि तो छोटासा समुद्राचा पट्टा ओलांडून आपण हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकावर आलों. आपण कन्याकुमारीला जाऊन आलों तें आठवतें का तुला? या ठिकाणीं म्हणे ती कुमारी देवी राहते व या दिशेचें संरक्षण करीत असते. पाश्चात्य लोक आमचीं नांवें वेडींवांकडीं करण्यांत आणि त्यांच्यामधील सगळ्या अर्थांचा अनर्थ करण्यांत मोठे वाकबगार आहेत. त्यांनीं या कन्याकुमारीचें रूपांतर केप कामोरीन असें केलें आहे. त्या ठिकाणीं आपण अगदीं यथार्थत्वानें हिंदमातेच्या पायाशीं बसलों होतों; एका बाजूनें आरबी समुद्र व एका बाजूनें बंगालचा उपसागर तेथें येऊन एकमेकांना मिळाले होते; ते दोघेही जणुं भारतमातेच्या पायाशीं बसून तिची पूजाच करीत आहेत अशी कल्पना मनांत येऊन आपल्याला त्या वेळीं किती मौज वाटली! त्या ठिकाणची शांतता अत्यंत आश्चर्यकारक होती आणि एकदम माझें मन हजारों मैल भरारी मारून ज्या ठिकाणीं हिमालयाच्या शिखरावर बर्फाचा चिरकालीन शाश्वत मुकुट आहे व जिथेंही अशीच अथांग शांतता आहे, त्या भारताच्या दुसऱ्या टोंकाकडे गेलें. पण या दोन प्रशांत टोंकांच्या मध्यें मात्र दैन्य आणि दारिद्र्य यांना पारावार नाहींसा झालेला आहे.

कन्याकुमारीपासून मग आपण उत्तरेला निघालों. त्रावणकोर व कोचीनमधून प्रवास केला. तसाच मलबारच्या किनाऱ्यावरील खाड्यांमधून पण. किती सुंदर होत्या त्या खाड्या! आणि आपली होडी गर्द छाया असलेल्या त्या दोन्ही किनाऱ्यांच्या मधून त्या चंद्रप्रकाशांत सरसर चालली असतांना आपण जणुं स्वप्नांतच जल-प्रवास करीत आहों असा भास झाला. नंतर म्हैसूर आणि हैद्राबाद करून आपण मुंबईस आलों आणि अलेरीस अलाहाबादला पोंचलों. जून माहिन्यांत आलों आपण परत. आज नऊ महिने झाले त्या गोष्टीला.

परंतु आजकाल हिंदुस्थानांतले सर्वच रस्ते केव्हा ना केव्हां तरी एकाच मुक्कामाला जाऊन पोंचतात. सगळ्या प्रवासांचा शेवट, मग ते खरेखुरे प्रवास असोत वा स्वप्नमय प्रवास असोत, तुरुंगांत होतो आणि म्हणून हा मी इथें पुन्हां आमच्या जुन्या ओळखीच्या भिंतींच्या आड आलों आहें; आतां तुझ्या आठवणी करीत बसायला आणि तुला पत्रें लिहायला वेळच वेळ; मग तीं पत्रें तुला कधीं पोंचोत ना न पोंचोत! पुन्हां झगडा चालू झाला आहे. आणि आतां आमचे लोक, स्त्रिया, पुरुष, मुलगे आणि मुली सगळे जण स्वातंत्र्ययुद्धांत धडाडीनें सामील होत आहेत आणि या देशाला लागलेला दारिद्र्याचा शाप धुऊन काढण्यासाठीं झटत आहेत. परंतु स्वातंत्र्यदेवीला प्रसन्न करणें ही मोठीच कठिण गोष्ट आहे. आपल्या भक्तांकडून पूर्वीच्याप्रमाणें आजही ती नरबलींची मागणी करीत आहे; आत्मत्यागाची अपेक्षा करीत आहे.

आज माझे तुरुंगांतले तीन महिने पुरे होतात. आज डिसेंबर २६; या दिवशीं तीन महिन्यांपूर्वीं मला सहाव्या वेळीं अटक झाली. इतके दिवसपर्यंत मी तुला पत्रें लिहायला सुरुवात करूं शकलों नाहीं. परंतु चालू काळच्या विचारांनीं मन भरून गेलेलें असतें, अशा वेळीं दूरच्या काळाचा विचार करणें कधीं कधीं किती कठिण होतें हें तुला ठाऊक आहे. तुरुंगामधल्या वातावरणाशीं स्थिरस्थावर होण्याला आणि बाहेरच्या घडामोडींबद्दलची चिंता करण्याचें सोडून देण्याला मला थोडाबहुत अधिक काळ लागतो. नियमानें तुला लिहिण्याचा यापुढें मी प्रयत्न करीन. पण या वेळीं मी निराळ्याच तुरुंगांत आहें; हा बदल मला कांहीं पसंत नाहीं आणि त्यामुळें माझ्या कामांत थोडा व्यत्यय येतो. पूर्वीपेक्षांही इथें माझें क्षितिज अधिक उंच गेलें आहे. माझ्यासमोरची जी भिंत आहे, ती निदान उंचीच्या बाबतींत तरी चीनमधल्या त्या प्रचंड भिंतीशीं कांहींशी बरोबर करूं शकेल. ती जवळजवळ २५ फूट उंच आहे आणि सूर्यप्रकाश रोज सकाळीं आमच्यापर्यंत येऊन पोंचेपावेतों सूर्याला बाहेरच्याहून दीड तास अधिक प्रवास करावा लागतो.

कांहीं हरकत नाहीं. कांहीं काळ आमचें क्षितिज जरी आकुंचित झालें असलें, तरी सुद्धां तो महान् नीलसागर, तीं निर्जन मैदानें, ते पर्वत आणि त्यांमधून तूं, मी आणि तुझी आई यानीं दहा महिन्यांपूर्वीं केलेला तो स्वप्नांतल्यासारखा वाटणारा प्रवास – येथें बसलों असतां आपण खरोखरच केला का अशीच शंका वाटूं लागते – यांचें स्मरण करून समाधान करून घ्यायला तर येथें कशाची हरकत नाहीं?

२२

मनुष्याची उपजीविकेची धडपड

२८ मार्च, १९३२

पुन्हां आपण जागतिक इतिहासाचा ताणा पकडूं या आणि प्राचीन काळाचें थोडेंसें ओझरतें दर्शन मिळविण्याचा प्रयत्न करूं या. ताण्याची गुंतागुंत झालेली आहे; तो नीट मोकळा करायला कठिण आहे आणि सगळाच्या सगळा एकदम पाहायलाही कठिण आहे. पुष्कळदां काय होतें, कीं त्यांतल्या एकाद्या लहान भागांत आपण गुंगून जातों आणि वाजवीपेक्षांही जास्त महत्त्व त्याला देऊं लागतों. आपल्यापैकीं बहुतेक साऱ्या लोकांना असें वाटतें, कीं आपल्या स्वतःच्या देशाचा इतिहास, मग तो कोणताही का देश असेना, हा इतर सर्व देशांपेक्षां अधिक तेजस्वी आहे आणि त्याचाच अभ्यास करणें हें अधिक उपयुक्त आहे. पूर्वी एकदां याबद्दल मीं तुला धोक्याची सूचना दिली आहे. आणि पुन्हां मला तीच सूचना तुला द्यायची आहे. कारण मनुष्य या सांपळ्यांत सांपडणें हें फार सोपें आहे. तुझ्या बाबतींत हें असें घडूं नये म्हणून तर हीं पत्रें तुझ्यासाठीं लिहावयाला मीं सुरुवात केली आणि तरी सुद्धां मी स्वतःच ती चूक करतों आहें, असा संशय मला वाटतो आहे. पण माझें स्वतःचें शिक्षणच जर अयोग्य प्रकारचें झालेलें आहे, आणि मला सगळाच उलटाच्या सुलटा इतिहास जेथें शिकविण्यांत आलेला आहे, तेथें मी तरी काय करणार? ही उणीव भरून काढण्याचा आणि हा दोष सुधारण्याचा प्रयत्न तुरुंगवासाच्या एकांतांत अधिक अभ्यास करून मी करतों आहें. परंतु निरनिराळ्या व्यक्तींचीं आणि प्रसंगांचीं जीं चित्रें माझ्या बालपणापासून आणि प्रौढ विद्यार्थीदशेपासून माझ्या मनांतील चित्रशाळेंत मीं टांगलेलीं आहेत, तीं तेथून काढून टाकण्याचें मला जमत नाहीं. आधींच माझें इतिहासाचें ज्ञान अपुरें आहे; इतिहासाविषयींचा दृष्टिकोन पुष्कळसा संकुचित आहे; आणि या चित्रांची छायाही त्या दृष्टिकोनाला बाधल्यावांचून राहत नाहीं. तेव्हा मी जें कांहीं लिहीन, त्यांत माझ्याकडून चुका होण्याचा संभव आहे. कितीक बिनमहत्त्वाच्या क्षुल्लक गोष्टींचे उल्लेख मी करीन, तर पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टींबद्दल लिहिण्याचें मला भान राहणार नाहीं. परंतु हीं पत्रें म्हणजे कांहीं एखादा इतिहासाचा ग्रंथ नव्हे. तुझ्या-माझ्यामध्यें आज हें १००० मैलांचें अंतर आणि या भल्या मोठ्या भिंती उभ्या आहेत. त्या जर नसत्या तर जशा आपण एकमेकांशीं एकत्र बसून गुजगोष्टी केल्या असत्या, तशा प्रकारच्या गुजगोष्टीच हीं पत्रें आहेत. निदान तीं तशीं आहेत अशी माझी आपली गोड कल्पना आहे.

इतिहास-ग्रंथांत ज्यांच्याविषयींच सगळीं पानेंच्या पानें भरून गेलेलीं असतात, अशा पुष्कळ पुरुषांविषयीं तुला लिहिल्यावांचून माझें चालत नाहीं. पुष्कळदां व्यक्ती

म्हणूनही त्यांचें जीवन पाहण्यासारखें असतें आणि त्यांच्या त्याच्या काळाची यथार्थ कल्पना आणून देण्यालाही आपल्याला त्यांचा उपयोग होतो. परंतु इतिहास म्हणजे कांहीं राजे-महाराजे किंवा अशींच इतर मोठमोठीं माणसें यांच्याच कामांचा केवळ वृत्तांत नव्हे ; तसें असेल तर इतिहासाचा हा कारखाना आतां बंदच करून टाकावयास हवा. कारण जगाच्या रंगभूमीवर नाचायला राजे-महाराजांना आतां फारसा अवकाश राहिलेला नाहीं. परंतु जे स्त्री-पुरुष खरे श्रेष्ठ असतात, त्यांच्या अंगचें पाणी चमकून दिसण्याला सिंहासनें, मुकुट, जडजवाहीर किंवा पदव्या यांची कांहीं जरूर लागत नसते. राजेरजवाडेच फक्त खरोखरच असे असतात, कीं वरचें राजपद किंवा सरंजाम यांवांचून आंत त्याच्यापाशीं कांहींच नसतें ; आंतला तो सारा उजाडपणा लपविण्या-साठीं त्यांना पट्टे-दुपट्टे आणि अधिकारवस्त्रें यांच्या झुली अंगावर चढवाव्या लागतात! दुःखाची गोष्ट मात्र ही, कीं आपल्यापैकीं पुष्कळांची त्यामुळें फसगत होते; या बाहेरच्या प्रदर्शनानें त्यांना मोह पडतो. आणि जो मनुष्य राजपदावर आहे त्याच्या ठिकाणीं खरोखरच राजत्व – राजा होण्याची पात्रता – राजाचे अंगीं असावे ते गुण आहेत, असें मानण्याची चूक ते करतात. एका इंग्रज कवीनें म्हटलें आहे :

मुकुट मस्तकीं, नामें राजा, एकही न गुण अन्य
राजतेजयुत अशाहि पुरुषा गणिति तयांची धन्य !

खऱ्या इतिहासांत इकडच्या तिकडच्या चार व्यक्तींचा विचार करून चालणार नाहीं. तर ज्या लोकांचें मिळून राष्ट्र बनतें, जे श्रम करतात आणि आपल्या श्रमानें जीवितांतील आवश्यक आणि चैनीच्या वस्तू निर्माण करतात, ज्यांच्या जीवनाचा हजारों प्रकारांनीं परस्परांच्या जीवितावर परिणाम होत असतो, अशा लोकांबद्दल इतिहासांत विचार केला पाहिजे. मानवजातीचा इतिहास अशा रीतीनें लिहिला, तर ती एक अत्यंत मनोवेधक कथा होईल. आज युगानुयुगें मानवाचा निसर्ग आणि निसर्गशक्तींशीं जो झगडा चालत आलेला आहे त्याचा तो वृत्तांत होईल. सुरुवातीला रानटी पशू व अरण्यें यांच्याविरुद्ध त्याला सामना करावा लागला ; असेच इतर पुष्कळ झगडे करतां करतां अगदीं सरते शेवटीं सगळ्यांत कठिण असा झगडा आपल्या स्वतःच्याच जाती-पैकीं जे लोक त्याला आपल्या स्वार्थासाठीं दडपून टाकून नागविण्याचा प्रयत्न करीत होते त्यांच्याविरुद्ध माणसाला करावा लागला आहे. जगण्यासाठीं अन्न, राहायला निवारा, आणि थंड हवेमध्यें कपडे अशांसारख्या कांहीं वस्तू माणसाला अत्यावश्यक आहेत ; आणि म्हणूनच ज्याच्या ताब्यात या वस्तू होत्या ते लोक मानवजातीवर आपलें प्रभुत्व गाजवीत आले आहेत. राज्यकर्ते किंवा पुढारी यांना अधिकार का प्राप्त झाला?– तर मनुष्याच्या उपजीविकेसाठीं आवश्यक असलेल्या वस्तूंपैकीं कोणत्या ना कोणत्या वस्तूवर त्यांची मालकी होती म्हणून, किंवा अशी एखादी वस्तु त्यांच्या ताब्यांत होती म्हणून. या मालकी हक्कामुळें लोकांना अशा वस्तूंवांचून भुकें मारून आपल्याला शरण आणण्याचें सामर्थ्यच त्यांना प्राप्त झालें होतें. त्यामुळेंच कांहीं लोकांनीं मुळींच कांहीं

श्रम न करतां संपत्ति मिळवावी, आणि असंख्य जनसमुदायानें जवळजवळ काहींच न मिळवतां श्रम मात्र करावे, आणि दिसायला केवळ मूठभर लोकांनीं आपणांहून किती तरी पटीनें प्रचंड अशा लोकसमुदायाची नागवणूक करावी, हें विचित्र दृश्य आपणास पाहावयास मिळूं लागलें.

मनुष्य अगदीं प्रथम रानटी, एकाकी राहून शिकारीवर उपजीविका करणारा असा होता; हळूहळू कुटुंबें अस्तित्वांत आलीं; पुष्कळशीं कुटुंबें एकमेकांशीं सहकार्य करूं लागून खेडेगांव निर्माण झालें; निरनिराळ्या खेडेगांवांतील कामकरी, व्यापारी आणि कारागीर एकत्र होऊन कारागिरांचे संघ उत्पन्न झाले. हळूहळू समाज म्हणून एक विशिष्ट संघटना वाढीस लागली. सुरुवातीला मनुष्य एकटा एक, आपल्यापुरता पाहणारा, अरण्यवासी होता. कसल्याच प्रकारचें सामाजिक जीवन अस्तित्वांत नव्हतें. त्यानंतरचा पहिला संघटित सामाजिक घटक म्हणजे कुटुंब, त्यानंतर खेडेगांव व नंतर खेडेगांवांचा संघ. असे हे सामाजिक घटक निर्माण होण्याचें कारण तरी काय? जगण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या धडपडींतून ही वाढ होणें अपरिहार्य होतें; हें परस्पर-सहकार्य होणें अपरिहार्य होतें. समान शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठीं अथवा त्यावर हल्ला करण्यासाठीं, एकेकट्यानें आपापलें संरक्षण करण्यापेक्षां त्या सर्वांनीं एकत्र येऊन सहकार्य करणें हें किती तरी पटींनीं अधिक परिणामकारक होतें. श्रमाच्या बाबतींत हें सहकार्य याहूनही अधिक उपयुक्त होतें. एकेकट्यानें काम करण्यापेक्षां पुष्कळांनीं एकत्र येऊन काम करण्यानें अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तू किती तरी अधिक प्रमाणांत निर्माण करणें शक्य होतें. कामामध्यें हें परस्पर-सहकार्य होऊं लागलें कीं विशिष्ट प्रकारचा आर्थिक घटक संघटित होत जाणें हें ओघानें आलेंच; एकटा एक राहून जंगलांत शिकार करीत राहणारा मनुष्य जाऊन त्याच्या जागीं मनुष्य-संघ अशी संस्था मग निर्माण होणारच. तेव्हां उपजीविकेसाठीं माणसाला जो नित्य झगडा करावा लागतो आहे त्याच्या दडपणानेंच हा प्राथमिक आर्थिक घटक वाढत वाढत शेवटीं समाजांत किंवा समाजसंस्थेंत बहुधा त्याची परिणति झाली असली पाहिजे असेंच म्हणणें प्राप्त आहे. इतिहासाच्या विस्तीर्ण पटावर सुरुवातीपासून थेट आतांपर्यंत ही वाढ होत आलेली आपल्याला दिसून येते. अर्थात् असें होत असतांना अखंड झगडे व दुःख यांच्या परंपरेंतूनच पुढें पुढें पाऊल पडत आलेलें दिसेल. तर केव्हां केव्हां या चक्राची गति उलटून माघार आलेलीही आढळेल. परंतु अशी ही वाढ होत आली आहे याचा अर्थ जगाची फार मोठी प्रगति झालेली आहे किंवा होतें त्यापेक्षां त्यांत पुष्कळ सुख वाढलें आहे असें मात्र समजूं नकोस. पहिल्यापेक्षां आतां कांहीं थोडें बरें आहे म्हणूं या आपण. परंतु पूर्णत्वापासून आज जग किती तरी दूरच आहे आणि जिकडे तिकडे दुःखाला आजही कांहीं कमी नाहीं.

या आर्थिक आणि सामाजिक संस्था जसजशा वाढत जातात, तसतसें मानवी जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचें होत जातें. व्यापार आणि दळणवळण हीं वाढतात.

फुकट कोणी कोणाला देत नाहींसे होऊन देवघेव सुरू होते; त्याच्यामागोमाग पैसा उत्पन्न होतो आणि सर्व प्रकारच्या व्यवहारांत प्रचंड बदल होऊन जातो. सोन्याचीं अथवा चांदीचीं नाणीं किंमतीऐवजीं देतां येऊं लागल्यानें देवघेव सुलभ होऊन व्यापाराची जलद प्रगति होते. पुढें पुढें पुष्कळ प्रसंगीं माणसें नाणींही वापरत नाहींशीं होतात; त्यांऐवजीं कांहीं प्रतीकेंच – खूणवजा वस्तू – मात्र वापरलीं जाऊं लागतात. एखाद्या कागदावर पैसे देण्याचें वचन लिहून दिलें म्हणजे सुद्धां तें पुरेसें होऊं लागतें. अशा रीतीनें बँकांच्या नोटा आणि हुंड्या (चेक) अस्तित्वांत आल्या. याचाच अर्थ पतीवर व्यवहार होऊं लागला. पतीचा उपयोग होऊं लागला म्हणजे विशाल प्रमाणावरील व्यापारी उलाढाली आणि उद्योगधंदे व दळणवळण यांना आणखी पुन्हां भरती येते. तुला ठाऊकच आहे, कीं आजकाल बँकेच्या नोटा व चेक यांचाच व्यवहारांत वारंवार उपयोग होत असतो आणि जाणते लोक आपल्याबरोबर सोन्याचांदीचे बटवे बाळगीत नाहींत.

अशा रीतीनें अगदीं अज्ञात अशा प्राचीन काळापासून आजपर्यंतचा इतिहास आपण पाहत आलों, तर लोक हळूहळू अधिकाधिक उत्पादन कसे करूं लागले, निरनिराळ्या धंद्यांत निरनिराळे लोक कसे वाकबगारी मिळवूं लागले, एकमेकांशीं आपापल्या वस्तूंची देवघेव कशी करूं लागले, आणि अशा रीतीनें व्यापार कसा वाढला हें प्रगतीचें चित्र आपल्यापुढें उभें राहतें. आपण असेंही पाहतों, कीं हळूहळू दळणवळणाचे मार्गही अधिकाधिक चांगले होत गेले; वाफेचें एंजिन निघाल्यानंतर तर त्यांमध्यें गेल्या शंभर वर्षांत फारच मोठी प्रगति झाली. उत्पादन जसजसें वाढतें तसतशी जगांतील संपत्ति वाढते; आणि कांहीं लोकांना तरी अधिकाधिक फुरसतीचा वेळ मिळूं लागतो. आणि अशा रीतीनें जिला सुधारणा म्हणून म्हणतात तिची वाढ होते.

हें असें सगळें घडून आलें म्हणजे केवढें हें आमचें ज्ञानयुक्त आणि प्रगतिमय युग, आधुनिक सुसंपन्नतेचे केवढाले हे चमत्कार, केवढें अद्‌भुत आमचें विज्ञान आणि केवढ्या महान् आमच्या विद्या व संस्कृती असा गर्व लोक वाहूं लागतात. पण इकडे गरीब गरीबच राहतात, त्यांचें दुःख आणि दैन्यही तसेंच कायम राहतें; मोठमोठीं राष्ट्रें एकमेकांशीं लढाया करूं लागतात आणि कोट्यवधि माणसें कापून काढतात; आमच्या घरीं-दारीं जर आम्हांला स्वातंत्र्य नसेल, तर या खऱ्या सुसंपन्नतेचा आणि संस्कृतीचा आम्हांस काय उपयोग? पण आतां मात्र आम्ही जागे झालों असून कंबर कसून हें सगळें नाहींसें करायला सिद्ध झालों आहों.

आपण या मोठ्या धामधुमीच्या काळामध्यें हजर आहों; हा जो संग्राम चालू आहे त्यानें केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर साऱ्या जगांत प्रचंड बदल घडवून आणण्याचें कार्य चालू होणार आहे; त्यामध्यें आपल्यालाही प्रत्येकाला भाग घेण्याला मिळतो आहे, ही केवढी भाग्याची गोष्ट आहे! तूं मोठी दैववान् मुलगी आहेस. रशियांत नवयुग निर्माण करणाऱ्या क्रांतीच्या वर्षीं आणि त्या क्रांतीच्याच महिन्यांत

तुझा जन्म झाला. आज अशीच एक क्रांति तुझ्या स्वतःच्या देशांत तुझ्या डोळ्यांसमोर घडत आहे आणि लौकरच त्या क्रांतीच्या कार्यांत तूंही स्वतः भाग घेऊं लागशील. आज साऱ्या जगभर मोठी धामधूम आणि घडामोड चालू आहे. इकडे अतिपूर्वेकडे जपाननें चीनच्या गळ्याला हात घातला आहे; पश्चिमेकडे, नव्हे साऱ्या जगभरच, जुनी समाजव्यवस्था हादरली आहे, कोलमडून पडण्याच्या बेतांत आहे. निरनिराळे देश निःशस्त्रीकरणाच्या गप्पा मारताहेत, परंतु एकमेकांकडे संशयी नजरेनें पाहून नखशिखान्त सशस्त्र होत आहेत. दीर्घकाळपर्यंत जगावर प्रभुत्व गाजवीत आलेल्या भांडवलशाहीची ही शेवटची घटका आहे; भांडवलशाहीच्या अस्तकाळचा हा संधिप्रकाश आहे; ती नष्ट होणार यांत मुळींच संशय नाहीं. आणि असा तिचा नाश झाला, म्हणजे तिच्याबरोबर आणखी किती तरी वाईट गोष्टी पण निघून जातील.

२३

सिंहावलोकन

२९ मार्च, १९३२

प्राचीन युगांतून प्रवास करीत आपण कोठपर्यंत येऊन पोंचलों बरें? ईजिप्त, हिंदुस्थान, चीन आणि नोसस यांमधील प्राचीन काळाबद्दल कांहीं कांहीं आपलें बोलून झालें आहे. जिच्यामध्यें पिरामिडसारखीं बांधकामें होऊं शकलीं, अशी ईजिप्तमधील प्राचीन आणि अत्यंत आश्चर्यकारक संस्कृति हळूहळू कशी ऱ्हास पावली, तिच्यांतील सामर्थ्य कसें नष्ट झालें, आणि बाहेरच्या खाणाखुणा आणि देखावा पहिल्यासारखा राहिला तरी तिच्यांत जिवंतपणा कसा राहिला नाहीं, हें आपण पाहिलें ग्रीसच्या मुख्य भूमीमधीलच एका वंशाच्या लोकांनीं आपल्याच बांधवांचें नोसस बेट व त्यामधील संस्कृति नष्ट करून टाकली, हें आपण पाहिलें. हिंदुस्थानांत आणि चीनमध्यें अगदीं अंधुक अंधुक आणि इतिहासकालाच्या सुरुवाती-सुरुवातीचा जो प्राचीनतम काळ तेथपर्यंत आपण नजर टाकली. प्रत्यक्ष पुरावा किंवा तत्कालीन वृत्तांत यांच्या अभावीं त्या काळचें फारसें स्पष्ट ज्ञान आपल्याला झालें नाहीं. परंतु इतक्या प्राचीन काळींसुद्धां या देशांतील लोकांची संस्कृति किती संपन्न आणि भव्य होती, याची जाणीव आपणांस होऊं शकली आणि या दोन्ही देशांत हजारों वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचा धागा प्राचीन काळ आणि आधुनिक काळ यांचा संबंध अद्यापिही कसा अबाधित ठेवीत वाहतो आहे ही गोष्ट पाहून आपण चकित झालों. मेसापोटेमियामध्यें साम्राज्यांमागून साम्राज्यें थोडा थोडा काळ कशीं भरभराटलीं व जगांतील सर्व साम्राज्यांच्या परंपरेप्रमाणें विलयासही कशीं गेलीं, याचेंही अगदीं ओझरतें दर्शन आपण घेतलें.

हिंदुस्थानांत बुद्ध आणि महावीर, चीनमध्यें कॉन्फ्यूशियस व लौ चे, इराणमध्यें झोरोआस्टर (झरतुष्ट्र) आणि ग्रीसमध्यें पायथागोरास अशांसारखे ख्रिस्ताच्यापूर्वी ५।६ शतकें निरानिराळ्या देशांत जे कितीएक महान् व विचारवंत लोक होऊन गेले, त्यांच्याबद्दलही आपण थोडेंसें बोललों. बुद्धानें हिंदुस्थानांतली तत्कालीन भिक्षुकशाही व वैदिक धर्मांतील कर्मकांड यांवर हल्ला चढविला हें आपण पाहिलें. कारण हरएक प्रकारची अंधश्रद्धा व पूजाअर्चा यांच्या जोरावर लोक बनविले जात आहेत, फसविले जात आहेत, असें त्याच्या अनुभवास आलें. जातिसंस्थेवरही त्यानें हल्ला केला आणि समतेचा उपदेश केला.

त्यानंतर आपण पुन्हां पश्चिमेकडे ज्या ठिकाणीं यूरप आणि आशिया एकमेकांशीं मिळतात, त्या ठिकाणीं परत गेलों; आणि ग्रीस व इराण यांच्या इतिहासांतील उलाढालींचा विचार केला. तेथें इराणमध्यें बादशहांचा बादशहा, शहेनशहा, म्हणून गाजलेल्या दारियस याच्या अमलाखालीं एक प्रचंड साम्राज्य उदयास येऊन तें थेट हिंदुस्थान-सिंधपर्यंत कसें पसरलें, हें आपण पाहिलें. या साम्राज्यानें छोट्याशा ग्रीसला गिळून टाकण्याचा प्रयत्न केला, परंतु तो एवढासा चिमुरडा देश उलटून लढाईचें तोंड द्यायला उभा राहिला, एवढेंच नव्हे, तर त्यानें आपलें राज्य चांगलेंच सांभाळलें. हें पाहून हे साम्राज्यवाले लोक हतबुद्ध होऊन गेले. यानंतर ग्रीक इतिहासांतील तो अत्यंत तेजस्वी परंतु अल्प असा काळ आला. त्याबद्दल मीं तुला थोडेंसें लिहिलें आहे. याच काळांत तेथें प्रतिभावान् व श्रेष्ठ लोकांची मोठीच संख्या उदयास आली; व त्यांनीं सौंदर्यसंपन्न असें वाङ्मय व कला यांना जन्म दिला.

ग्रीसचें हें सुवर्ण-युग फार काळ टिकलें नाहीं. मॅसिडोनियाचा ॲलेक्झांडर यानें लांबलांबपर्यंतचे अनेक देश जिंकून ग्रीसची कीर्ति चहूंकडे पसरविली; परंतु त्याच्या उदयापासूनच ग्रीक संस्कृतीचा हळूहळू ऱ्हास होण्याला सुरुवात झाली. ॲलेक्झांडरनें इराणचें साम्राज्य नष्ट करून टाकलें व विजेता म्हणून हिंदुस्थानची सरहद्द ओलांडूनही तो आंत आला. तो फार मोठा सेनापति होता हें निःसंशय. परंतु लोकांत परपरेनें त्याच्याबद्दल असंख्य दंतकथा प्रचलित झाल्या असून त्याच्या लायकीपेक्षां फारच मोठी कीर्ति त्याला मिळाली आहे. सॉक्रेटीस किंवा प्लेटो, किंवा फिडियास, किंवा सोफॉक्लीस किंवा ग्रीसमधील इतर श्रेष्ठ पुरुष यांचीं नांवें फक्त चांगल्या बहुश्रुत माणसानांच काय तीं माहीत असतात. पण ॲलेक्झांडरचें नांव माहीत नाहीं, असा एक तरी मनुष्य कोणी असेल का?

ॲलेक्झांडरनें तसें पाहिलें तर केलें असें फार थोडें. इराणचें साम्राज्य जीर्ण होऊन आधींच डळमळूं लागलें होतें आणि तें फारसें त्यापुढें टिकून राहण्याचा संभव नव्हता. हिंदुस्थानांतील ॲलेक्झांडरची स्वारी म्हणजे एक नुसता धांवता हल्लाच केवळ आला आणि त्याचा विशेषसा कांहींच परिणाम झाला नाहीं किंवा त्याला इतिहासांत विशेष असें कांहींच महत्त्व प्राप्त झालें नाहीं. ॲलेक्झांडर आणखी कांहीं

काळ जगतां, तर कदाचित् त्यानें याहून अधिक भरीव असें कांहीं करून दाखविलेंही असतें. पण तो अल्पवयांतच वारला. आणि त्याच्या साम्राज्याचे ताबडतोब तुकडे तुकडे झाले. तथापि त्याचें साम्राज्य जरी टिकलें नाहीं, तरी त्याची कीर्ति मात्र अजून टिकून आहे.

ॲलेक्झांडरच्या पूर्वेकडील स्वारीचा एक मोठा परिणाम हा झाला, कीं त्यामुळें पूर्व व पश्चिम यांमधील दळणवळण पुन्हां जोरानें चालू झालें. पुष्कळ ग्रीक लोक पूर्वेकडे आले आणि तेथल्याच प्राचीन शहरांत राहूं लागले; किंवा त्यांनीं आपल्या नवीन वसाहती त्या भागांत स्थापन केल्या. ॲलेक्झांडरच्या पूर्वीसुद्धां पूर्व आणि पश्चिम यांच्यामध्यें दळणवळण होतेंच; नव्हतें असें नाहीं. परंतु त्यानंतर तें पुष्कळ वाढलें.

ॲलेक्झांडरच्या स्वारीचा आणखी एक परिणाम झाला म्हणतात. तो खराच तसा झाला असेल, तर ग्रीक लोकांचें तें मोठेंच दुर्भाग्य समजलें पाहिजे. अशी एक कल्पना सुचविण्यांत आली आहे, कीं ॲलेक्झांडरच्या शिपायांनीं आपल्याबरोबर मेसापोटेमियांतील दलदलीच्या प्रदेशांतून ग्रीसच्या खोलगट भागामध्यें मलेरियाचे जंतू नेले; त्यामुळें मलेरियाचा प्रसार होऊन सारे ग्रीक लोक (ग्रीक वंश) दुर्बल आणि निःसत्त्व होऊन गेले. ग्रीसला उतरती कळा लागण्याचें हें कारण होय असें सांगण्यांत येतें; पण अजून ही नुसती कल्पनाच आहे; तिच्यांत सत्य कितपत आहे हें कुणालाच सांगतां येत नाहीं.

ॲलेक्झांडरचें साम्राज्य फारच थोडा काळ टिकून नष्ट झालें आणि त्यांतून पुष्कळ छोटीं छोटीं साम्राज्यें उदयास आलीं. टॉलेमीचें ईजिप्तमधील साम्राज्य आणि पश्चिम आशियामधील सेल्युकसचें साम्राज्य हीं दोन्ही त्याच्यापैकींच. टॉलेमी व सेल्युकस हे दोघेही ॲलेक्झांडरच्या हाताखालचे सेनापती होते. सेल्युकसनें हिंदुस्थानवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला; परंतु हिंदुस्थान आपल्याला चांगलाच नेटानें प्रतिकार करूं शकतो हें प्रत्ययाला येऊन त्याची सारी आशा लयाला गेली. त्या सुमारास चंद्रगुप्त मौर्यानें सर्व उत्तर हिंदुस्थान व मध्य हिंदुस्थान यांमध्यें एक चांगलें सामर्थ्यवान् राज्य स्थापन केलेलें होतें. चंद्रगुप्त, त्याचा सुप्रसिद्ध ब्राह्मण मंत्री चाणक्य, आणि त्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ यांबद्दल यामागच्या पत्रांत मीं बरेंच तुला लिहिलें आहे. २२०० वर्षांपूर्वीच्या हिंदुस्थानांतील तत्कालीन परिस्थितीचें फार चांगलें चित्र या ग्रंथात सुदैवानें आपल्याला पाहावयास सांपडतें.

सिंहावलोकन संपलें. आतां यापुढच्या पत्रांत याच्या पुढच्या काळचें मौर्यांचें साम्राज्य आणि राजा अशोक, यांबद्दल आपण लिहूं. कबूल आहे, कीं हें आतां लिहूं असें वचन नैनी तुरुंगांत २५ जानेवारी १९३१ च्या पत्रांतच मीं दिलें होतें; त्याला आतां चौदा महिने होऊन गेले आणि अद्यापि तें वचन पुरें व्हायचेंच आहे.

२४

'देवानाम् प्रिय' राजा अशोक

३० मार्च, १९३२

मला वाटतें, राजेरजवाड्याच्या विरुद्ध लिहिण्याची मला जरा अधिक हौस आहे. या लोकांमध्यें कौतुक करण्यासारखें किंवा आदर वाटण्यासारखें मला फारसें कांहीं आढळत नाहीं. परंतु आतां मात्र आपण अशा एका पुरुषापाशीं आलों आहों, कीं तो राजा आणि सम्राट् असून सुद्धां फार श्रेष्ठ व आदरणीय पुरुष होता. त्याचें नांव अशोक. चंद्रगुप्त मौर्याचा हा नातू. एच्. जी. वेल्सच्या कांहीं अद्भुतरम्य कथा तूं वाचल्या असशील. त्यानेंच लिहिलेल्या Outline of History या ग्रंथांत अशोकाबद्दल म्हटलें आहे, कीं "इतिहास-ग्रंथांच्या पानापानांतून हजारों, लाखों राजांच्या नांवांची मारे गर्दी उसळलेली असते; कुणी राजे, कुणी महाराजे, कुणी राजाधिराजे, कुणी राजर्षि, कुणी नृपकुलावतंस; किती त्या त्यांच्या मोठमोठ्या पदव्या सांगाव्या? पण त्या साऱ्यांमध्यें कुणाचें नांव जर खरेंखुरें ताऱ्याप्रमाणें चमकून दिसत असेल, तर तें एकट्या एक अशोकाचेंच असें म्हणतां येईल. व्होल्गापासून जपानपर्यंत त्याला आजपर्यंत सर्वत्र फार मानतात. चीन व तिबेट यांमध्यें आणि खुद्द हिंदुस्थानामध्यें आज त्याचें तत्त्वज्ञान मान्य नसलें, तरी तेथेंही त्याच्या मोठेपणाची परंपरा अद्यापि अखंड चालू आहे. कॉन्स्टंटाइन किंवा शार्लमेन हे फार मोठे बादशहा समजले जातात; पण त्यांचीं नांवें जगांत आज नुसतीं ऐकून माहीत असणारे जेवढे लोक असतील, त्यांच्यापेक्षां किती तरी अधिकपट लोक अशोकाची स्मृति अंतःकरणांत भक्तियुक्त रीतीनें जतन करणारे असे आज जगामध्यें आहेत."

ही फारच मोठी स्तुति आहे हें खरें आहे. परंतु ती सर्वथा योग्यच आहे; आणि या काळच्या हिंदी इतिहासाबद्दल कोणाही हिंदी माणसाला विशेष आनंद वाटणें स्वाभाविक आहे.

ख्रिस्ती शक सुरू होण्यापूर्वी ३०० वर्षांच्या सुमारास चंद्रगुप्त मरण पावला. त्याच्यामागून त्याचा मुलगा बिंदुसार हा गादीवर आला. परंतु त्याच्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दीत कोठें कांहीं विशेष घडामोड झाल्याचें दिसत नाहीं. ग्रीकांच्या राज्याशीं त्यानें संबंध मात्र चालू ठेवला होता आणि त्याच्या दरबारांत ईजिप्तचा टॉलेमी व पश्चिम आशियांतील सेल्युकसचा मुलगा अँटिओकस यांचे वकील असत. बाहेरच्या जगाशीं व्यापारही चालू होता आणि असें सांगतात, कीं ईजिप्तमधील लोक हिंदुस्थानांतल्या निळीचा उपयोग आपलें कापड रंगविण्याकडे त्या वेळीं करीत असत; तसेंच त्यांच्या ममीजच्या (टिकवून ठेवलेल्या प्रेतांच्या) भोंवतीं गुंडाळण्यासाठीं हिंदी मलमलीच्या कापडाचाच ते उपयोग करीत. बिहारमध्यें कांहीं प्राचीन अवशेष सांपडले

आहेत. त्यांवरून असें दिसतें, कीं त्या भागांत मौर्यांच्या आधींच्या काळीं सुद्धां कांहीं तरी प्रकारची कांच तयार होत असावी.

चंद्रगुप्ताच्या दरबारांत वकील म्हणून आलेल्या मेगॅस्थेनिस नांवाच्या महान् पुरुषानें या काळच्या भारतीयांबद्दल लिहिलेल्या कांहीं गोष्टी वाचून तुला मोठी गंमत वाटेल. त्यानें लिहिलें आहे, कीं हिंदी लोकांना छानछोकी आणि सौंदर्य यांची फार आवड असे आणि विशेष म्हणजे आपण आहों त्यापेक्षां अधिक उंच दिसावें अशा प्रकारचीं पादत्राणें ते वापरीत असत. म्हणजे उंच टाचांचे बूट हा कांहीं अगदींच आधुनिक शोध नाहीं असें म्हटलें पाहिजे.

बिंदुसाराच्या मागून खिस्तपूर्व २६८ या वर्षी अशोक गादीवर आला. त्या वेळींही त्यांचें साम्राज्य फार प्रचंड होतें; सारा उत्तर व मध्य हिंदुस्थान व्यापून तें थेट मध्य आशियापर्यंत जाऊन भिडलें होतें. आग्नेयीकडील व दक्षिणेकडील उरलेला प्रदेशही आपल्या साम्राज्यांत सामील करण्याच्या इच्छेनेंच बहुधा, आपल्या अमलाच्या नवव्या वर्षी त्यानें कलिंग प्रांत जिंकण्यास सुरुवात केली. कालिंग देश हा हिंदुस्थानच्या पूर्वकिनाऱ्याकडील महानदी, गोदावरी, आणि कृष्णा या नद्यांमधील प्रदेश होय. कालिंगांतील लोक अत्यंत शौर्यानें लढले. परंतु त्यांचीं फार माणसें कापलीं गेलीं व शेवटीं त्यांचा पराभव झाला. ही लढाई व त्यातील मनुष्यवध यांचा अशोकाच्या मनावर इतका परिणाम झाला, कीं त्याला युद्धें आणि त्यांतून निष्पन्न होणाऱ्या सर्व घटना यांचा तिटकारा येऊन गेला. आतां यापुढें युद्ध म्हणून करावयाचें नाहीं असा त्याचा निश्चय झाला. त्या वेळीं दक्षिणेकडील एक छोटासा पट्टा सोडला, तर सारा हिंदुस्थान त्याच्या ताब्यांत होता; आणि उरलेला एवढासा तुकडा काबीज करून अखिल हिंदुस्थान आपला करणें त्याला कांहींच अवघड नव्हतें. परंतु तो नादच त्यानें सोडून दिला. विजय मिळाला असतांनाही ज्यानें युद्धकार्य पुढें चालू ठेवण्याचें सोडून दिलें, असा हा एकच एक लढाऊ राजा होय असें एच्. जी. वेल्सनें लिहिलें आहे.

मोठी भाग्याची गोष्ट ही आहे, कीं अशोकाला स्वतः याबद्दल काय वाटत होतें याबद्दल आणि त्याने काय केलें याबद्दल त्यानें स्वतःच जें कांहीं लिहिलें आहे, तें आपल्याला आज उपलब्ध आहे. दगडांवर आणि धातूंवर कोरलेलीं त्याचीं अनेक आज्ञापत्रें सांपडलीं आहेत. आणि त्यांमधून आपल्या प्रजेला व त्यापुढील पिढ्यांना दिलेले त्याचे संदेश आपल्याला आज वाचावयास मिळत आहेत. अलाहाबादच्या किल्ल्यांत असा एक अशोकाचा स्तंभ आहे हें तुला माहीतच आहे. दुसरे असे पुष्कळ स्तंभ आपल्या प्रांतांत आहेत.

युद्धें आणि देश जिंकणें या पायीं होणाऱ्या मनुष्यवधामुळें आपल्याला किती शिसारी आली आणि केवढा पश्चात्ताप वाटला, हें या लेखांतून अशोकानें लिहिलें आहे. तो म्हणतो, "खरा जय फक्त एकच आहे—तो म्हणजे आपल्या आत्म्यावरील विजय आणि धर्माचा मनुष्याच्या अंतःकरणावरील विजय होय." परंतु असें कशाला?

त्यांतील कांहीं लेखांचें भाषांतरच मी तुझ्यासाठीं देतों. वाचायलाही ते मोठे मौजेचे लेख आहेत ; आणि त्यांमुळें अशोकाचा तुला जास्त निकट परिचय होईल.

एक लेख असा आहे : "राज्याभिषेक झाल्याला आठ वर्षें झालीं ; त्या वेळीं पूज्यपाद महाराजाधिराजांनीं कलिंग देश जिंकला. दीड लक्ष लोक तेथून कैद करून आणण्यांत आले आणि दीड लक्ष लोक प्रत्यक्ष ठार करण्यांत आले. याहून किती तरी पट लोक तसेच मरण पावले.

"कलिंग देश आपल्या राज्यांत समाविष्ट केल्याच्या क्षणापासूनच पूज्यपाद महाराजांनीं सद्धर्माच्या रक्षणाचें कार्य सुरू केलें ; तेव्हांपासूनच या धर्माबद्दल त्यांना भक्ति निर्माण झाली व त्या धर्माचा उपदेश लोकांच्या अंतःकरणांवर ठसविण्यासाठीं प्रचार करण्यास त्यांनीं सुरुवात केली. अशा प्रकारें कलिंग देश काबीज केल्याबद्दल महाराजांच्या चित्तांत अनुताप उत्पन्न झाला. कारण पूर्वी न जिंकलेला असा देश जिंकावयाचा म्हणजे त्यापायीं लोकांना ठार करावें लागतें, कितीक लोक त्यामुळें इतर रीतीनेंही मरण पावतात, आणि कितीकांना कैदी करून न्यावें लागतें. हा प्रकार महाराजांना अतिशय दुःखकारक आणि अनुतापकारक वाटतो."

कलिंगामध्यें जेवढे लोक मारले गेले किंवा कैद केले गेले, त्याच्या एक-हजारांश किंवा एक-लक्षांशसुद्धां लोक मारले जाणें किंवा कैद केले जाणें ही गोष्ट अशोकाला यापुढें तिळभर सहन होणार नाहीं, असें या लेखांत पुढें म्हटलें आहे. त्यानंतर पुढें असा मजकूर आहे :

"त्याखेरीज, जरी कोणीं आपला कांहीं अपराध केला, तरी तो सुद्धां पूज्यपाद महाराजांनीं जितका म्हणून सहन करणें शक्य आहे, तितका सहन केला पाहिजे. आपल्या राज्यातील जंगली लोकांकडेसुद्धां महाराज दयार्द्र दृष्टीनेंच बघतात आणि त्यांचे विचार शुद्ध व्हावेत अशासाठीं खटपट करतात. असें जर त्यांनीं न केलें, तर महाराजांना फारच पश्चात्ताप होईल. कारण महाराजांची अशी इच्छा आहे, कीं सर्व जीवमात्रांना सुरक्षितपणा, आत्मनिग्रह, चित्तशांति आणि आनंद हीं मिळणें आवश्यक आहे."

पुढें अशोकानें असें लिहिलें आहे, कीं सदाचार आणि ईश्वरभक्ति यांवर आधारलेल्या सद्धर्माचा मनुष्यांच्या चित्तावर विजय होणें हा खरा विजय होय. आणि आपल्या राज्यांतच नव्हे, तर दूरदूरच्या राज्यांतही हा विजय आपण मिळविला आहे, असें तो सांगतो.

या लेखामधून धर्म म्हणून ज्याचा पुनः पुनः उल्लेख करण्यांत आला आहे, तो बुद्धधर्म होय. अशोक हा अत्यंत कडवा बुद्धधर्मीय झाला होता व त्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं त्यानें आपली पराकाष्ठा केली. पण त्यासाठीं त्यानें कोणावर सक्ती केली नाहीं किंवा जुलूम केला नाहीं. लोकांचीं हृदयें जिंकूनच केवळ त्यानें नव्या धर्माला अनुयायी मिळविण्याचा यत्न केला. जगामध्यें धार्मिक लोक हे अशोकाइतके सहिष्णु

असलेले क्वचित्–फारच क्वचित् आढळतील. आपापल्या धर्माला परधर्मांतील अनुयायी मिळविण्यासाठीं बळजोरी, दंगेधोपे, अत्याचार आणि फसवणूक यांचा उपयोग करावयाला असे धार्मिक लोक यत्किंचित् मागेंपुढें पाहत नाहींत, असेंच नेहमीं आढळून येईल. सारा इतिहासच धार्मिक जुलूम आणि धार्मिक युद्धें यांनीं भरून गेलेला आढळून येतो; आणि इतर कोणाच्याही नांवानें झाला नसेल, इतका रक्तपात एका परमेश्वराच्या नांवानें झालेला आहे. अशा स्थितींत एका श्रेष्ठ हिंदपुत्रानें, स्वतः अतिशय तीव्र धर्मनिष्ठ असतांना आणि एका समर्थ साम्राज्याचें आधिपत्य स्वतःकडे असतांनाही, लोकांना आपल्या विचाराकडे–मताकडे–वळवून घेण्याच्या कामीं कोणत्या प्रकारचें आचरण केलें, हें खरोखरच मोठें लक्षांत घेण्यासारखें आहे. धर्म आणि श्रद्धा या गोष्टी तरवार किंवा बंदूक यांच्या जोरावर कोणाच्याही घशाखालीं उतरवितां येतील, असें मानण्याचा मूर्खपणा लोकांनीं करावा हें किती विस्मयकारक आहे!

म्हणून अशोकानें (लेखांमध्यें त्याला 'देवानाम् प्रिय' देवांचा आवडता असें म्हटलें आहे) पाश्चिम आशिया, यूरप व आफ्रिका यांमधील राज्यांमध्यें या कार्यासाठीं आपले दूत व वकील पाठविले. तुझ्या लक्षांत असेल, कीं सिलोनमध्यें तर त्यानें प्रत्यक्ष आपला भाऊ महेंद्र व बहीण संघमित्रा यांना पाठविलें होतें. त्यांनीं जातांना आपल्याबरोबर गयेमधील पवित्र अश्वत्थ वृक्षाची एक शाखा नेली होती म्हणतात. अनुरुद्धपुरांतील मंदिरामध्यें आपण जो अश्वत्थ वृक्ष पाहिला, तो आठवतो का तुला? त्यांनीं त्या प्राचीन काळीं नेलेल्या शाखेंतूनच हा वृक्ष निर्माण झाला, असें लोक सांगतात.

हिंदुस्थानांत बुद्धधर्माचा प्रसार अत्यंत त्वरेनें झाला. अशोकाच्या दृष्टीनें धर्म म्हणज कांहीं निव्वळ पोकळ जपजाप्य, पूजाअर्चा आणि इतर संस्कार आणि कर्मकांड या गोष्टी नव्हत्या; तर सत्कार्य आणि समाजोन्नति यांना तो धर्म मानीत होता. त्यामुळें साऱ्या देशभर सार्वजनिक उद्यानें, रुग्णालयें, विहिरी आणि रस्ते निर्माण झाले. चार महान् विद्यापीठें उत्कर्ष पावलीं. एक उत्तरेकडे पेशावरनजिक तक्षशिला येथें; दुसरें मथुरा येथें (इंग्लिश लोक खुळ्यासारखें याचें स्पेलिंग Muttra असें करतात); मध्य हिंदुस्थान येथें उज्जयिनीस तिसरें; आणि बिहारमध्यें पाटण्याजवळ नालंदा येथें चौथें. या ठिकाणीं हिंदुस्थानांतलेच तेवढे विद्यार्थी येत असें नव्हे, तर त्यांच्या कीर्तीनें आकर्षित होऊन चीन, पश्चिम आशिया यांसारख्या दूरदूरच्या देशांतूनही तेथें विद्यार्थी येत. आणि हे विद्यार्थी परत जातांना बुद्धाच्या उपदेशाचा संदेश आपल्याबरोबर आपल्या घरीं घेऊन जात. साऱ्या देशभर मोठमोठे मठ स्थापन झाले. त्यांना विहार म्हणत. पाटलिपुत्राच्या म्हणजेच पाटण्याच्या आसपास या विहारांची संख्या बहुधा इतकी मोठी असली पाहिजे, कीं त्यामुळेंच त्या प्रदेशाचेंच नांव विहार असें पडून गेलें; आज त्याचेंच रूपांतर बिहार असें झालें आहे. परंतु नेहमींच्या परंपरेप्रमाणें याही मठांतील

शिक्षा व साधना यांच्यामुळें उत्पन्न होणारी स्फूर्तीची शक्ति लौकरच नाहींशी झाली आणि विशिष्ट कर्मकांड व पूजाअर्चांचा कोरडा घोष माजविण्यार्चीं स्थानेंच मात्र ते बनून गेले.

जीवरक्षणाबद्दलची अशोकाची तळमळ केवळ माणसापाशींच थांबली नाहीं, तर ती प्राणिमात्रापर्यंत जाऊन पोंचली होती. त्याच्या राज्यांत पशूंसाठीं म्हणून खास रुग्णालयें बांधण्यांत आलीं होतीं; आणि पशुयज्ञ कायद्यानें बंद करण्यात आला होता. या दोन्ही बाबतींत तो आमच्या काळाच्याही बराच पुढें गेलेला होता. तथापि, पशुयज्ञ अजूनही या देशांत थोड्या प्रमाणांत अस्तित्वांत आहे; आणि पशूंच्या रोगराईवर उपचार करण्याची व्यवस्था जवळजवळ मुळींच शिल्लक राहिलेली नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे.

बुद्धधर्माचा प्रसार आणि स्वतः अशोकाचें उदाहरण यांमुळें शाकाहार अधिकाधिक लोकप्रिय झाला. त्या काळापर्यंत हिंदुस्थानांत क्षत्रिय आणि ब्राह्मणसुद्धां मांसभक्षण करीत असत आणि दारू किंवा इतर मादक पेयें घेत असत. या वेळेपासून मांसभक्षण व मद्यपान पुष्कळच कमी झालें.

अशा रीतीनें अशोकानें अडतीस वर्षें राज्य करून शांततेनें लोकहित साधण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला. राज्याच्या (सार्वजनिक) कामासाठीं तो सदैव तयार असे. तो म्हणतो, "मी जेवत असो किंवा अंतःपुरात असो, शयनागारांत असो किंवा एकांतस्थळीं असो, रथामधून मी कोठें जात असो किंवा राजवाड्याच्या आसपासच्या उद्यानामध्यें विहार करीत असो, मी कोठेंही असलों, किंवा वेळ कोणतीही असली, तरी प्रत्येक ठिकाणीं आणि प्रत्येक वेळीं सरकारी वार्ताहरांनीं लोकव्यवहाराबद्दलची मला सदैव माहिती देत राहिलेंच पाहिजे." कसलीही अडचण उत्पन्न झाली, कीं त्याची वर्दी तात्काळ दिलीच पाहिजे. मग "मी कोठेंही असो आणि वेळ कोणतीही असो." कारण तो म्हणतो, "लोकहितार्थ मला काम केलेंच पाहिजे."

ख्रिस्तपूर्व २२६ या वर्षीं अशोक मरण पावला. मृत्यूपूर्वीं कांहीं काळ त्यानें बुद्धभिक्षूची दीक्षा घेतली होती.

मौर्यांच्या काळचे प्राचीन अवशेष आपल्याला हल्लीं फारच थोडे आढळून येतात. जे कांहीं अवशेष आढळून येतात, ते हिंदुस्थानांतील आर्यसंस्कृतीचे प्राचीनांतले प्राचीन असे उपलब्ध अवशेष आहेत. (अर्थात् मोहेंजोदारो येथील भग्नावशेषांचा विचार हें लिहितांना आपण थोडा बाजूला ठेवला पाहिजे.) उदाहरणार्थ, काशीजवळ सारनाथ येथें टोंकावर सिंहाचे पुतळे असलेला तो अशोकाचा स्तभ आपल्याला पाहावयास सांपडतो. अशोकाची राजधानी जी महान् पाटलिपुत्र नगरी, तिच्यापैकीं आज कांहींही अंश शिल्लक उरलेला नाहीं. सुमारें १५०० वर्षांपूर्वीं म्हणजे अशोकाच्या नंतर ६०० वर्षांनीं फाहिआन नांवाचा एक चिनी प्रवासी या शहरामध्यें येऊन गेल्याचा उल्लेख आढळतो. त्या काळीं मात्र हें शहर चागलें सुसंपन्न आणि भरभराटींत होतें. परंतु त्या

वेळीं सुद्धा अशोकाचा शिलाप्रासाद मोडून तोडून पडलेलाच होता. तथापि, त्या मोडक्या-तोडक्या राजवाड्याचेंसुद्धां फाहिआनला इतकें आश्चर्य वाटलें, कीं ही मानवी कृति नसली पाहिजे असें त्याबद्दल त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिलें आहे.

भरभक्कम शिलांचा तो अशोकाचा राजप्रासाद आतां पार नाहींसा झाला आहे. एवढीसुद्धां कोठें त्याची खूण शिल्लक नाहीं! परंतु अशोकाची स्मृति मात्र साऱ्या आशिया खंडांत आजही जिवंत आहे; आणि त्याच्या लेखांमधील भाषा आजही आम्हांला चांगली कळूं शकते व त्याच्या विचारांचेंही आम्ही आदरानें ग्रहण करूं शकतों. एवढेंच नव्हे, तर आपल्याला त्यांतून शिकण्यासारखेंही पुष्कळ आहे. आतां हें पत्र फारच लांबलें. तुला कदाचित् त्यामुळें कंटाळा सुद्धां येईल. तेव्हां अशोकाच्या लेखांतून आणखी एक उतारा देऊन पत्र पुरें करतों. तो म्हणतो :

" कोणत्या ना कोणत्या कारणासाठीं सर्वच धर्मपंथ आदरणीय असतात. दुसऱ्या धर्माबद्दल अशा रीतीनें आदर बाळगण्याच्या योगानें मनुष्य आपल्या पंथाची उन्नति साधतो आणि त्याच वेळीं इतरांच्या पंथालाही उन्नत करण्याला त्याचें साहाय्य होतें. "

6

२५

अशोकाच्या काळचें जग

३१ मार्च, १९३२

अशोक दूरदूरच्या देशांत आपले वकील व धर्मप्रचारक-मंडळें पाठवीत असे व त्याच्या काळीं हिंदुस्थान आणि हे देश यांच्यामध्यें अखंड दळणवळण व व्यापार चालू असे, हें आपण पाहिलें. परंतु हें दळणवळण व व्यापार यांसंबंधीं जेव्हां मी लिहितों, त्या वेळीं त्यांत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, कीं आजच्या काळीं ज्या प्रकारचें दळणवळण व व्यापार आहे त्यांसारख्या कांहीं यापूर्वीच्या काळच्या गोष्टी असणें शक्य नाहीं. आज व्यापाऱ्यांना किंवा इतरांनाही आगगाड्या, आगबोटी व विमानें यांच्यांतून वाटेल तिकडे जाणें हें फारच सोपें होऊन गेलेलें आहे. पण त्या अतिप्राचीन काळीं कोणचाही प्रवास म्हटला कीं त्याला फार दिवस लागावयाचे. जे कोणी तितकेच धडधाकट, काटक आणि धाडसी असतील तेच फक्त अशा प्रवासाला जाण्याचा विचार करूं शकत. त्यामुळें त्या काळचा व्यापार आणि आजचा व्यापार यांमध्यें तुलनाच करणें शक्य नाहीं.

अशोकानें ज्यांचा 'दूरदूरचे देश' म्हणून उल्लेख केला आहे, ते देश कोणते? त्याच्या काळीं जगाचें एकंदर स्वरूप किंवा कल्पना तरी काय होती? ईजिप्त किंवा भूमध्यसमुद्रालगतच्या किनाऱ्याचा भाग हे प्रदेश सोडले, तर त्या काळच्या

आफ्रिका खंडाबद्दल आपल्याला कांहींच माहिती नाहीं. उत्तर, मध्य किंवा पूर्व यूरपबद्दल आपल्याला फारच थोडी माहिती मिळते; तशीच उत्तर व मध्य आशिया-बद्दलही. अमेरिकेबद्दलही एवढीसुद्धां माहिती नाहीं; परंतु कितीक मंडळींची अशी कल्पना आहे, कीं दक्षिण व उत्तर या दोन्ही अमेरिकन खंडांत अत्यंत समृद्ध व पुढारलेल्या अशा संस्कृती अगदीं प्राचीन काळापासून नांदत असल्या पाहिजेत. तथापि पुष्कळच पुढच्या काळांत, इतिहासकालानंतर किती तरी शतकांनीं, ख्रिस्तानंतर पंधराव्या शतकांत, कोलंबसानें अमेरिकेचा 'शोध' लावला असें म्हटलें जातें. परंतु त्याचा सुमारास दक्षिण अमेरिकेंतील पेरू देशांत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत एक चांगली उच्च संस्कृति नांदत होती, हें आज आपल्याला ठाऊक आहे. त्यावरून असें म्हणतां येईल, कीं ख्रिस्ताच्या पूर्वीं तीन शतकें हिंदुस्थानांत जेव्हां अशोकाचें राज्य होतें, त्या वेळीं अमेरिकेंत चांगलें सुसंस्कृत लोक राहत असावे आणि त्यांच्यामध्यें चागली सुसंघटित समाजव्यवस्थाही स्थापन झालेली असावी. परंतु त्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा असा आज आपल्यापाशीं कांहीं नाहीं, आणि व्यर्थ नुसते तर्क करीत बसण्यापासून काहीं उपयोग नाहीं. ज्या देशाबद्दल आपण कांहीं वाचतों किंवा ऐकतों त्याच देशांत फक्त सुधारलेले लोक राहत आहेत अशी पुष्कळदां आपली समजूत होत असते; ती तितकीशी बरोबर नाहीं, एवढें दाखविण्यासाठींच फक्त या तर्कांचा मीं उल्लेख केला. पुष्कळ काळपर्यंत यूरपीय लोकांची तर कल्पना अशी असे, कीं प्राचीन इतिहास म्हणजे फक्त ग्रीक, रोमन व ज्यू लोक यांचाच इतिहास. त्यांच्या जुन्या समजुतीप्रमाणें बाकीचें सगळें जग म्हणजे त्या काळीं निर्जन अरण्य मात्र होतें. पुढें मग त्यांच्यामधीलच विद्वानांनीं आणि पुराण-वस्तुसंशोधकांनीं हिंदुस्थान आणि चीन आणि इतरही देश याच्याबद्दल लिहिण्यास सुरुवात केली. त्या वेळीं आपलें पूर्वींचें ज्ञान किती कोतें आहे हें त्यांना आढळून आलें. म्हणून आपणही नेहमीं सावध असलें पाहिजे; आणि आज जें आपलें कांहीं मर्यादित ज्ञान आहे त्यांत आपल्या या जगांत जें जें कांहीं घडलें त्या सर्वांचा समावेश झालेला आहे, अशी आपण आपली समजूत करून घेतां कामा नये.

हें लक्षांत ठेवून सामान्यतः सध्यांपुरतें आपणाला असें म्हणतां येईल, कीं अशोकाच्या काळीं म्हणजे ख्रिस्ताच्या पूर्वी तिसऱ्या शतकांत प्राचीन सुधारलेलें जग म्हणजे यूरप आणि आफ्रिका यांमधील मुख्यतः भूमध्यसमुद्रालगतचे देश, पश्चिम आशिया, चीन आणि हिंदुस्थान एवढे प्रदेश होत. त्या काळीं चीनच्या पश्चिमेकडील देशांशीं, नव्हे, खुद्द पश्चिम आशियाशीं सुद्धां, थोड्याफार अंशीं संबंध तुटून गेला होता. आणि पश्चिमेकडील देशांत चीन किंवा कॅथे यांच्याबद्दल कांहींच्या बाहीच चमत्कारिक कल्पना पसरलेल्या होत्या. चीन आणि पश्चिमेकडील प्रदेश यांच्यामधील दुवा त्या वेळीं हिंदुस्थान असावा असें दिसतें.

आपण पाहिलेंच आहे, कीं ॲलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्या सेनापतींनीं त्याचें साम्राज्य आपसांत वांटून घेतलें. यांत तीन हिस्से प्रमुख होते : एक सेल्युकसच्या



अमलाखालील पाश्चिम आशिया, इराण व मेसापोटेमिया हा भाग ; दुसरा टॉलेमीच्या नियंत्रणाखालील ईजिप्त देश; आणि अँटिगॉनसच्या अमलाखालील मॉसिडोनियाचा भाग हा तिसरा. यांपैकीं पहिलीं दोन राज्यें पुष्कळ काळपर्यंत टिकलीं. सेल्युकस हा हिंदुस्थानचा शेजारी होता; आणि हिंदुस्थानचा कांहीं भाग आपल्या साम्राज्याला जोडण्याचा लोभही त्याला सुटला होता, हें तुला आठवतच असेल. परंतु त्याला चंद्रगुप्त हा आपल्याहूनही प्रबळ असा प्रतिस्पर्धी भेटला. त्यानें सेल्युकसला हांकलून लावलें. एवढेंच नव्हे, तर आजच्या अफगाणिस्तानपैकीं कांहीं भागही आपल्याला देण्यास त्यानें सेल्युकसला भाग पाडलें.

मॅसिडोनियाच्या राज्याला मात्र यांच्याइतकें दैव फारसें अनुकूल नव्हतें. त्याच्यावर उत्तरेकडून गॉल व इतर लोकांकडून हल्ले झाले आणि सगळ्या राज्यापैकीं थोडासा भागच मात्र या हल्ल्याला तोंड देऊन टिकून राहूं शकला; त्याचेंच तेवढें स्वातंत्र्य कायम

राहिलें. हा भाग म्हणजे आशिया मायनरमधील पेर्गामम हा प्रांत; याच ठिकाणीं सध्यां तुर्कस्तान देश वसलेला आहे. सुरुवातीला हें एक छोटेंसेंच ग्रीक राज्य होतें. तरी पण शंभर वर्षांहून अधिक काळपर्यंत तेथें ग्रीक संस्कृति व कला यांची चांगलीच जोपासना व वाढ झाली, आणि तेथें सुंदर इमारती बांधल्या गेल्या. थोड्याफार प्रमाणांत समुद्रापलीकडील अलेक्झांड्रियाच्या वैभवाशीं स्पर्धा करण्याइतकें वैभव या राज्याला प्राप्त झालें होतें.

ईजिप्तमधील टॉलेमीच्या राज्याची राजधानी म्हणजे अलेक्झांड्रिया हें शहर. हें शहर फार श्रेष्ठ झालें; प्राचीन जगांत मोठेंच प्रसिद्धीला आलें. या सुमारास अथेन्सचें वैभव व कीर्ति फारच खालावली होती; ग्रीक लोकांचें संस्कृतीचें केंद्रस्थान म्हणून जें अथेन्सचें मानाचें स्थान तें हळूहळू अलेक्झांड्रियाला प्राप्त झालें. तेथील तें प्रचंड ग्रंथसंग्रहालय आणि पदार्थसंग्रहालय यांच्या आकर्षणामुळें तेथें दूरदूरच्या देशांतून पुष्कळच विद्यार्थी येत; आणि तेथें तत्त्वज्ञान, गणित, धर्म आणि त्या प्राचीन काळच्या लोकांच्या मनांत खळबळत असलेले अनेक प्रश्न यांबद्दलच्या चर्चा ते करीत. तुम्हां शाळेंत जाणाऱ्या सर्व मुलांमुलींना युक्लिडचें नांव माहीत झालेलें असतें. हा युक्लिड अशोकाचा समकालीन असून या अलेक्झांड्रिया शहराचाच रहिवासी होता.

टॉलेमीचे लोक हे खरोखरच ग्रीक लोक होते, हें तुला ठाऊक आहे. परंतु त्यांनीं ईजिप्शियन लोकांच्या पुष्कळ रीतीभाती उचलल्या. ईजिप्तचे कितीएक प्राचीन देवसुद्धां त्यांनीं आपल्यामध्यें समाविष्ट केले. महाभारतामध्यें जसे वैदिक वाङ्मयांतील देव आपल्याला आढळतात, तसेंच होमरच्या महाकाव्यामध्यें पण ज्युपिटर, अपोलो आणि ग्रीकांच्या इतर प्राचीन देवदेवता पुनः पुनः येताना आढळतात. पण या सर्व देवतांचा टॉलेमियन लोकांमध्यें लोप तरी झाला किंवा आपलें नामरूप बदलून त्यांना त्यांच्यामध्यें राहावें लागलें. प्राचीन ईजिप्तमधील देवदेवता—उदाहरणार्थ, इसिस, ओसिरिस आणि होरस—आणि ग्रीसच्या प्राचीन देवदेवता यांची सरमेसळ झाली, गहजत झाली; एकमेकांचा एकमेकांमध्यें अंतर्भावही झाला; आणि त्यांमधून लोकांपुढें पूजनासाठीं नवेच देव पुढें आले. आपण कोणापुढें डोकें वांकवितों किंवा कोणाची पूजा करतों किंवा त्याचें नांव काय, याची त्या लोकांना कोठें मोठीशी फिकीर होती? पूजा करायला कांहीं तरी पुढें असलें म्हणजे त्यांना पुरें होतें! या नव्या देवांपैकीं सगळ्यांत अधिक प्रसिद्धीस आलेल्या देवाचें नांव सेरॅपिस हें होय.

अलेक्झांड्रिया शहर हें व्यापाराचेंही फार मोठें केंद्र होतें आणि जगामधील सुसंस्कृत अशा इतर सर्व देशांतून तेथें व्यापारी येत असत. अलेक्झांड्रियामध्यें हिंदी व्यापाऱ्यांची एक वसाहतच होती म्हणतात. तसेंच अलेक्झांड्रियांतील व्यापाऱ्यांचीही एक वसाहत दक्षिण हिंदुस्थानांत मलबारच्या किनाऱ्यावर होती, हेंही आतां सिद्ध झालें आहे.

ईजिप्तपासून जवळच समुद्राच्या पलीकडे रोमचें शहर व राज्य होतें. या

सुमारासही तें पुष्कळ श्रेष्ठ दर्जाला पोंचलें होतें; आणि याहूनही पुष्कळ श्रेष्ठ, समर्थ असें होण्याचीं बीजें त्यांत एव्हांना निर्माण झालीं होतीं. त्याच्या समोरच्या बाजूला रोमचें प्रतिस्पर्धी व शत्रु असलेलें असें कार्थेजचें राज्य होतें. प्राचीन जगताची नीटशी कल्पना करून द्यावयाची, म्हणजे आपल्याला या दोहोंचा वृत्तांत थोडासा विस्तारपूर्वक पाहिला पाहिजे.

पश्चिमेकडील रोमचें श्रेष्ठत्व जसें वाढत होतें, तसेंच या सुमारास इकडे पूर्वेकडे चीनचें महत्त्व वाढत होतें; आणि अशोकाच्या काळच्या जगाचें संपूर्ण आणि यथायोग्य चित्र डोळ्यांपुढें यावयाचें, तर चीनचाही आपल्याला विचार केला पाहिजे.

२६

चिन व हान घराणीं

३ एप्रिल, १९३२

गेल्या वर्षी नैनीच्या तुरुंगांतून तुला मीं पत्रें लिहिलीं. त्यामध्यें चीनच्या सुरुवातीच्या काळचा वृत्तांत थोडासा मीं तुला लिहिला होता. व्हांग नदीवर झालेल्या प्राथमिक वसाहती, अगदीं प्राचीन काळचे शिया, शँग उर्फ यिन आणि चौ हे राजवंश, यांबद्दल आणि या राजवंशांच्या मोठमोठ्या दीर्घकालीन राजवटींमध्यें एक मध्यवर्ती राज्यसत्ता चीनमध्यें कशी वाढत गेली, याबद्दल उल्लेख मीं केला होता. त्यानंतर एक बराच मोठा कालखंड असा गेला, कीं राज्य अजून नावाला जरी चौ घराण्याचेंच चालू होतें, तथापि राज्यसत्तेचें केंद्रीकरण होण्याची क्रिया मात्र थांबली होती आणि देशांत गैरव्यवस्था माजूं लागली होती. या काळांत एका एका स्थानिक विभागांतील छोटे छोटे राज्यकर्ते हे जवळजवळ स्वतंत्रच झाले आणि एकमेकांशीं भांडूं लागले. ही खेदकारक अवस्था शेंकडों वर्षांपर्यंत चालूच राहिली. चीनमध्यें जणुं कांहीं प्रत्येक गोष्ट हजार हजार वर्षें चालू राहावयाची असा नियमच दिसतो. शेवटीं एकदां या स्थानिक राज्यकर्त्यांपैकीं चिन प्रांताच्या सरदारानें अत्यंत निःसत्त्व झालेल्या चौ राजवंशाला हुसकून लावलें. या सरदाराच्या घराण्यालाच चिन राजवंश हें नांव प्राप्त झालें आणि या चिनपासूनच चीन देशाचें नांव निर्माण झालेलें आहे.

चिन घराण्याच्या अमलाला चीनमध्यें अशा रीतीनें ख्रिस्तपूर्व २५५ या वर्षीं सुरुवात झाली. याच्यापूर्वी तेरा वर्षें अशोकाची कारकीर्द सुरू झाली होती. तेव्हां अशा रीतीनें आपण चीनमधील अशोकाच्या समकालीन लोकाचाच विचार करीत आहों. चिन घराण्यातील पहिल्या तीन राजांच्या कारकीर्दी फारच अल्पकालीन झाल्या. त्यानंतर ख्रिस्तपूर्व २४६ या वर्षीं त्यांच्यापैकीं चौथा राजा गादीवर

आला. हा मनुष्य आपल्यापरी एक मोठा विशेष प्रकारचा मनुष्य होता. त्याचें मूळचें नांव वांग चेंग हें होतें. परंतु पुढें त्यानें तें बदलून 'शी व्हांग टी' असें नांव धारण केलें. या नांवाचा अर्थ 'पहिला बादशहा' असा आहे आणि याच नांवानें सामान्यतः लोक त्याला ओळखीत आले आहेत. आपल्या स्वतःबद्दल व स्वतःच्या काळाबद्दल त्याला विशेष अभिमान असला पाहिजे, असें दिसतें; आणि भूतकाळाबद्दल त्याला मुळींच आदर नव्हता. फार काय, पण लोकांनीं भूतकाळ अजीबात विसरून जावा आणि इतिहासाची सुरुवात पाहिल्या बादशहाच्या काळापासून म्हणजे स्वतःच्या राज्यापासून झाली असें मानावें, अशी त्याची इच्छा होती. त्याच्याआधीं एकामागून एक अशा पुष्कळ बादशहांची दोन हजार वर्षांहून अधिक काळपर्यंत चालत आलेली दीर्घ परंपरा देशांत होऊन गेलेली होती, या गोष्टीची त्याला कांहींच किंमत नव्हती. त्यांची स्मृतीसुद्धां साऱ्या देशांतून त्याच्या मनांतून पार पुसून टाकावयाची होती. या प्राचीन बादशहांचीच काय, पण स्वतःपूर्वी होऊन गेलेल्या सगळ्या श्रेष्ठ पुरुषांची स्मृतीसुद्धां नाहींशी व्हावी, असा त्याचा प्रयत्न होता. म्हणून राजेसाहेबांचा हुकूम जारी झाला, कीं भूतकालचा वृत्तात ग्रथित करणारे सर्व ग्रंथ, विशेषतः इतिहासाचे ग्रंथ आणि कॉन्फ्यूशियसचे घरोघरीं पूजिले जाणारे महान् ग्रंथ, हे सर्व पार जाळून नष्ट करून टाकावयाचे. वैद्यकशास्त्रासंबंधीं पुस्तकें आणि कांहीं शास्त्रीय पुस्तकें यांच्यापुरता काय तो थोडा त्यानें अपवाद केला होता. त्याच्या आज्ञेंत म्हटलें होतें:—

"आधुनिक काळाचें कमीपण दाखविण्याकरितां म्हणून जे कोणी भूतकाळाचा उपयोग करतील, त्यांना आणि त्यांच्या नातेवाइकांना ठार करण्यांत येईल."

आणि हें आपलें म्हणणें त्यानें प्रत्यक्ष खरें करून दाखविलें. आपले ग्रंथ दडवून ठेवण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला अशा शेंकडों विद्वान् लोकांना जिवंत पुरण्यांत आलें. तेव्हां हा पहिला बादशहा केवढा सज्जन, दयार्द्र अंतःकरणाचा आणि गोड स्वभावाचा असला पाहिजे, नाहीं? तथापि हिंदुस्थानच्या प्राचीन काळची अवास्तव स्तुति करतांना मीं कोणाला पाहिलें, म्हणजे नेहमीं मला या पहिल्या बादशहाची आठवण येते आणि त्यानें जें केलें तें कांहीं अगदींच चुकलें नसावें, असें मला वाटूं लागतें. आमच्यांतल्या कांहीं लोकांची नजर सदासर्वकाळ भूतकाळाकडे वळलेली असते; त्या काळच्या मोठेपणाचेच पवाडे ते सर्वदा गात असतात आणि त्यांतून आपल्याला कांहीं प्रेरणा मिळावी अशी ते सदैव धडपड करीत असतात. भूतकाळांत आपल्याला महत्कार्यें करण्याची स्फूर्ति देण्यासारखें खरोखर कांहीं असेल, तर तशी स्फूर्ति त्यापासून जरूर घ्यावी. परंतु कोणाही व्यक्तीनें अथवा देशानें वेळीं-अवेळीं एकसारखें भूतकाळाकडेच डोळे लावून बसावें, हें कांहीं मला हितकारक वाटत नाहीं. कोणी तरी म्हटलें आहे, कीं मनुष्यानें मागच्या चालीनें चालावें किंवा नित्य मागच्या बाजूलाच पाहावें अशी गरज असती, तर त्याचे डोळे त्याच्या मागच्याच बाजूला आले असते. तेव्हां आपण आपल्या भूतकालीन इतिहासाचा जरूर अभ्यास करावा; त्याच्यामध्यें प्रशंसनीय

असें जें कांहीं असेल त्याची प्रशंसा करावी; परंतु आपली दृष्टि मात्र नेहमीं पुढच्या काळावर असली पाहिजे आणि पायही पुढच्या दिशेनें चालत राहिले पाहिजेत.

शी व्हांग टीनें जुने ग्रंथ जाळून नष्ट केले, किंवा ते ग्रंथ वाचणारांना जाळून किंवा पुरून टाकलें, हें त्याचें करणें अगदीं रानटीपणाचें होय, यांत कांहींच संशय नाहीं. याचा एक परिणाम असा झाला, कीं त्यानें जें जें कांहीं करून ठेवलें त्या सगळ्याचा त्याच्याबरोबरच अंत झाला. तो आपल्याला पहिला बादशहा म्हणवीत होता; आणि आपल्यापाठीमागून दुसरा, तिसरा, चौथा अशा बादशहांची अनंत काळपर्यंत परंपरा चालावी, असा त्याचा हेतु होता. परंतु झालें असें, कीं चिन घराण्याची आमदानी ही चीनमधील सर्व राजघराण्यांपेक्षां अतिशय अल्पकालीन ठरली. मीं मागें सांगितलेंच तुला, कीं यांतलीं कित्येक घराणीं शतकानुशतकें राज्य करून गेलीं. चिन घराण्याच्या पूर्वीच्याच घराण्याचें राज्य तर ८६७ वर्षेंपर्यंत चाललें. परंतु हें महान् चिन घराणें मात्र उदयास आलें, उत्कर्षाला चढलें, आणि एक मोठें समर्थ साम्राज्य संघटित करून त्यावर त्यानें अमलही चालविला, तें ऱ्हास पावूं लागलें आणि नष्ट झालें वगैरे हा सगळा कारभार अवघ्या पन्नास वर्षांत आटपून गेला! शी व्हांग टीच्या मनांतून आपण महान् समर्थ अशा सम्राटांच्या एका दीर्घकालीन परंपरेचा जनक व्हावें असें होतें. परंतु तो मेल्यानंतर तीनच वर्षांनीं, ख्रिस्तपूर्व २०९ या वर्षीं त्याचें घराणें नष्ट झालें आणि त्यानें केलेले सर्व सायास व्यर्थ होऊन ताबडतोब कॉन्फ्यूशिअसचे पुरून ठेवलेले ग्रंथ भराभर उकरून बाहेर काढण्यांत आले आणि पुन्हां त्यांना पहिल्याइतकेंच मानाचें स्थान प्राप्त झालें.

राज्यकर्ता या दृष्टीनें शी व्हांग टी हा चीनच्या राज्यकर्त्यांमध्यें अत्यंत बलिष्ठ राज्यकर्ता होऊन गेला. असंख्य स्थानिक सरदार-दरकदारांनीं, राज्याधिकाऱ्यांनीं आपण स्वतंत्र राजे आहोंत, असें जें बंड माजविलें होतें तें त्यानें पार मोडून काढलें आणि सरंजामशाही नष्ट करून एक प्रबळ मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित केली. सबंध चीन देश आणि पलीकडील आनाम (आतां व्हाएटनाम) प्रांतसुद्धां त्यानें काबीज केला. चीनमधील प्रचंड भिंत बांधविण्यास त्यानेंच सुरुवात केली. हें फार खर्चाचें काम होतें. परंतु परकीय शत्रूपासून संरक्षण करण्यासाठीं कायमचें मोठें सैन्य ठेवून त्याचा नित्य खर्च चालविण्यापेक्षां अशी भिंत बांधण्याचा खर्चच बरा, असें चिनी लोकांना वाटलें. या भिंतीमुळेंच शत्रूपासून पुरेसें संरक्षण होईल, असें त्यांना वाटत होतें. परंतु मोठमोठ्या स्वाऱ्यांना कांहीं ही भिंत प्रतिबंध करूं शकली नाहीं. छोट्या छोट्या हल्ल्यानाच फार तर अटकाव करण्याला तिचा उपयोग झाला. पण यावरून एक गोष्ट दिसते, कीं चिनी लोक हे शांतताप्रिय लोक होते; आणि स्वतः सामर्थ्यवान् असूनही लष्करी विजय आणि ऐश्वर्य यांची त्यांना आवड नव्हती.

शी व्हांग टी – पहिला बादशहा – मेल्यानंतर त्याच्यापाठीमागून त्याच्या घराण्यांतला कोणी गादीवर आलाच नाहीं, असें म्हटलें तरीसुद्धां चालेल. पण त्याच्या काळापासून चीनच्या एकराष्ट्रीयत्वाची परंपरा मात्र कायमची सुरू झाली.

यानंतर आणखी एक घराणें चीनच्या रंगभूमीवर आलें. तें म्हणजे हान घराणें. या घराण्याचेंच राज्य ४०० वर्षें चांगलें भरभराटलें. आणि विशेष म्हणजे त्यामध्यें एका स्त्रीनें राज्यपद उपभोगलें. या वंशांतला सहावा राजा वू टी हा होता. हाही चीनच्या इतिहासांत एक अतिशय बलाढ्य व सुप्रसिद्ध राज्यकर्ता होऊन गेला. पन्नासाहूनही अधिक वर्षें त्यानें राज्य केलें. उत्तरेकडील तार्तार लोक चीनवर नेहमीं स्वाऱ्या करीत असत. त्यांचा यानें पराभव केला. पूर्वेकडे कोरियापासून तों पश्चिमेकडे थेट कॅस्पियन समुद्रापर्यंत या बादशहाचा अमल अबाधितपणें चालू होता; आणि मध्य आशियांतील अर्धवट स्वतंत्र टोळ्या त्यालाच आपला अधिराजा मानीत. आशियाचा नकाशा नीट पाहिलास, तर ख्रिस्तपूर्व पहिल्या आणि दुसऱ्या शतकांत चीनचें सामर्थ्य किती प्रचंड असलें पाहिजे आणि या बादशहाचें राज्य किती अफाट प्रदेशावर पसरलेलें होतें, याची तुला कल्पना येईल. याच काळांतील रोमन साम्राज्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल किती तरी पवाडे लिहिलेले आपण पाहतों. रोमच्या श्रेष्ठत्वाच्या तेजाखालीं सर्व जगाचें तेज लुप्त होऊन गेलें होतें, अशी माणसाची पुष्कळदां समजूत होऊन जाते. "जगताची स्वामिनी" असें नांव रोमनगरीला देण्यात आलें होतें. परंतु रोम हें त्या काळीं पुष्कळच मोठें राज्य होतें आणि तें आणखी वाढत होतें हें खरें असलें, तरी चीनचें साम्राज्य त्यापेक्षां विस्तारानें किती तरी प्रमाणांत अफाट आणि पुष्कळच श्रेष्ठ असें होतें.

या वू टीच्या अमदानींतच बहुधा रोम आणि चीन यांचे परस्परांशीं संबंध जडले. आज आपण ज्यांना इराण आणि मेसापोटेमिया म्हणतों त्या प्रदेशांत त्या काळीं पार्थियन लोकांची वसाहत होती; त्यांच्यामार्फत या दोन देशांमध्यें व्यापार-उदीम होत असे. पुढें रोम आणि पार्थिया यांच्यामध्यें युद्ध झालें तेव्हां हा व्यापार बंद झाला. म्हणून रोमनें समुद्राच्या मार्गानें व्यापार सुरू करण्याचा प्रयत्न केला आणि एक रोमन जहाज प्रत्यक्ष चीनपर्यंत आलेंही. पण ही ख्रिस्तानंतर दुसऱ्या शतकांतील गोष्ट. सध्यां अजून आपण ख्रिस्तपूर्वकाळांतच वावरत आहोंत.

हान घराण्याच्या आमदानींतच चीनमध्यें बुद्धधर्माचा प्रवेश झाला. ख्रिस्ताच्या पूर्वीच चीनमध्यें बुद्धधर्माचें वळण थोडें थोडें पडूं लागलें होतें, परंतु त्याचा प्रसार मात्र पुढें पुष्कळ काळानंतर झाला. त्याबद्दल अशी एक दंतकथा आहे, कीं तत्कालीन एका बादशहाला एक आश्चर्यकारक स्वप्न पडलें; त्यांत त्याला १६ फूट उंचीचा एक मनुष्य दिसला; त्याच्या मस्तकाभोंवतीं तेजोवलय होतें; हें दर्शन त्याला पश्चिमेच्या दिशेस झालें; म्हणून जागें झाल्यानंतर त्या बाजूला त्यानें शोधार्थ दूत पाठविले. हे दूत एक बुद्धाची मूर्ति व त्याचे ग्रंथ घेऊन परत आले. आणि तेव्हांपासून बुद्धधर्माचा प्रचार सुरू झाला. बुद्धधर्मांबरोबर हिंदी कलेचेंही वर्चस्व चीनमध्यें सुरू झालें; आणि चीन-मधून कोरियापर्यंत आणि तेथून जपानमध्येंही तें पसरलें.

हान घराण्याच्या आमदानींतील आणखी दोन घटना लक्षांत ठेवण्यासारख्या

आहेत : एक म्हणजे त्या वेळींच लांकडी ठशावरून छापण्याच्या कलेचा शोध लागला; परंतु त्यानंतर पुढें सुमारें १००० वर्षेंपर्यंत या शोधाचा प्रत्यक्षांत फारसा उपयोग करण्यांत आला नाहीं; पण उपयोग करण्यांत येऊं लागला तो काळ पाहिला, तरी छपाईच्या बाबतींत चीननें युरोपवर ५०० वर्षांची आघाडी मारलेली दिसते.

दुसरी विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे सरकारी अमलदारांसाठीं-नोकरांसाठीं-एका परीक्षेच्या पद्धतीची झालेली संस्थापना. मुलांमुलींना परीक्षांची कांहीं आवड नसते; आणि माझ्या मतानें यांत त्यांची कांहीं फारशी चूक नाहीं. पण त्या काळच्या मानानें पाहतां सरकारी अमलदारांची निवड करण्याची ही चिनी व्यवस्था विशेष महत्त्वाची समजली पाहिजे. इतर देशांत अलीकडच्या काळापर्यंत अमलदारांची नेमणूक व्हायची ती म्हणजे मुख्यतः वशिलेबाजीनें; नाहीं तर एखाद्या विशिष्ट जातीला किंवा वर्गाला ही मिरास दिलेली असावयाची. चीनमध्यें परीक्षा पास होईल त्याला नेमणूक मिळावयाची. मग तो कोणीही असो: ही काहीं मोठी आदर्श व्यवस्था आहे असें नव्हे. कारण परीक्षा द्यायची कशाबद्दल? तर कॉन्फ्यूशियसच्या ग्रंथांबद्दल. आणि एखादा मनुष्य ही परीक्षा चांगली पास झाला असें धरलें, तरी तेवढ्यानें म्हणजे तो मोठा चांगला सरकारी अमलदार होईल असें कांहीं नव्हे. परंतु वशिलेबाजी किंवा जातीची मिरासदारी, अशांसारख्या व्यवस्थेपेक्षां ही व्यवस्था किती तरी पटीनें चांगली म्हटली पाहिजे. सुमारें २००० वर्षेंपर्यंत चीनमध्यें ही व्यवस्था चालू राहिली. आतां अलीकडे नुकतीच ती रद्द करण्यात आलेली आहे.

२७

रोम विरुद्ध कार्थेज

५ एप्रिल, १९३२

अतिपूर्वेकडून आतां आपण पश्चिमेकडे जाऊं आणि रोमच्या वाढीचें चित्र रेखाटूं. ख्रिस्तपूर्व आठव्या शतकांत रोम नगरीची प्रस्थापना झाली असें म्हणतात. हे अति-प्राचीन रोमन लोक बहुतेक आर्यवंशाचेच होते. टायबर नदीच्या आसपासच्या सात टेंकड्यांवर ते अधून मधून वसाहत करून राहिले होते. या वसाहतींतून पुढें रोम नगरी निर्माण झाली. आणि या नगर-राज्याचा विस्तार व सामर्थ्य वाढत वाढत इटलीचें थेंट दक्षिणेचें सिसिली बेटाच्या समोरचें जें मेसिनाचें टोंक तेथपर्यंत तें जाऊन पोंचलें.

ग्रीकांचीं नगर-राज्यें तुझ्या आठवणींत असतील. जेथें जेथें हे ग्रीक गेले, तेथें तेथें त्यांनीं आपली नगर-राज्याची कल्पना आपल्याबरोबर नेली. त्यामुळें साऱ्या भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर ग्रीक वसाहती व ग्रीक नगर-राज्यें बारीक बारीक

ठिपक्यांसारखीं पसरून गेलीं. परंतु आतां रोममध्यें आपल्यापुढें अगदींच वेगळा प्रकार दिसून येतो. सुरुवातीला रोमचें स्वरूपही या ग्रीक नगर-राज्यांहून फारसें निराळें नव्हतें. परंतु आसपासच्या टोळ्यांचा पराभव करीत करीत तें लौकरच विस्तार पावलें. अशा रीतीनें रोमन राज्याचा प्रांत वाढत जाऊन इटलीचा बहुतेक भाग त्यामध्यें समाविष्ट झाला. एवढ्या मोठ्या प्रदेशाचें एक नगर-राज्य होणें शक्यच नव्हतें. या सगळ्याचा कारभार रोममधून होई आणि खुद्द रोममध्यें तर एक कांहीं वेगळीच राज्यव्यस्थेची तऱ्हा होती. तिच्यामध्यें कोणी मोठा बादशहा नव्हता, किंवा राजाही नव्हता; परंतु आधुनिक पद्धतीप्रमाणें तें लोकसत्ताक राज्यही नव्हतें. तथापि त्याला एक प्रकारचें लोकराज्यच म्हटलें पाहिजे. मात्र त्यामध्यें जमीनदार-वर्गापैकीं थोड्याशा श्रीमान् घराण्यांचें विशेष वर्चस्व असे. राज्यकारभार सीनेट नांवाच्या सभेनें करावयाचा असा संकेत होता; दोन लोकनियुक्त 'कॉन्सल्स' म्हणून असत, ते त्या सीनेटची नेमणूक करीत असत. पुष्कळ काळपर्यंत वरिष्ठ वर्गीय लोकच फक्त सीनेटचे सभासद होऊं शकत. रोमन प्रजेचे दोन वर्ग केलेले होते. एक पॅट्रिशियन म्हणजे श्रीमान्, वरिष्ठ वर्गीय व सामान्यतः जमीन-मालक लोक; आणि दुसरे प्लीबियन म्हणजे बाकीची सामान्य जनता. रोमच्या राज्याचा किंवा लोक-राज्याचा म्हणा, कित्येक शतकांचा इतिहास म्हणजे या दोन वर्गांतील आपसांतील झगड्यांचाच वृत्तांत होय. पॅट्रिशियन लोकांच्या हातात सारी सत्ता असायची. सत्तेबरोबर संपत्ति आलीच; आणि प्लीबियन किंवा प्लीच लोक म्हणजे केवळ जी-हुकूमवाले. त्यांना कसलीही सत्ता नाहीं किंवा संपत्ति नाहीं. प्लीबियन लोकांनीं सत्तेसाठीं पुष्कळ झगडा केला आणि हळूहळू त्यांच्या तोंडांवर कांहीं कांहीं तुकडे पण पडत गेले. या त्याच्या दीर्घकालीन झगड्यांमध्यें प्लीच लोकांनीं एक प्रकारच्या असहकारितेचा अवलंब केला होता, हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. सगळ्यांनीं मिळून रोम शहर सोडलें व जवळच एक नवीन शहर वसविलें. यामुळें पॅट्रिशियन लोक फार भयभीत झाले; त्यांची फार तारांबळ उडाली. प्लीबियन लोकांशिवाय त्यांचा कोणताच व्यवहार चालण्यासारखा नव्हता. म्हणून त्यानीं प्लीबांशीं तडजोड केली, आणि त्यांना कांहीं थोडेसे अधिकार दिले. हळूहळू प्लीबियन लोकांना मोठ्या अधिकाराच्या जागा मिळूं लागल्या व सीनेटचे सभासदही होणें त्यांना शक्य झालें.

आपण विचार करतों तो नेहमीं या पॅट्रिशियन व प्लीबियन यांच्यामधील तंट्यांचा. त्यामुळें यावांचून कोणाचा कांहीं या काळच्या इतिहासांत संबंधच नव्हता, अशी पुष्कळदां आपली समजूत होऊन जाते. परंतु या दोन वर्गांखेरीज रोममध्यें अत्यंत प्रचंड संख्येचा असा तिसरा एक वर्ग होता. तो म्हणजे गुलामांचा. यांना तर कसल्याच प्रकारचे हक्क नव्हते. नागरिक म्हणून त्यांना समजतच नसत; मतदानाचा हक्क त्यांना नव्हता. हे गुलाम म्हणजे गायो किंवा कुत्रे यांच्याप्रमाणें त्यांच्या मालकांची निव्वळ खाजगी मालमत्ताच असत. त्यांची खरेदी-विक्री होत असे आणि मालक

आपल्या लहरीला येईल ती शिक्षा त्यांना करूं शकत असत. कांहीं कांहीं शर्तींवर त्यांना स्वतंत्रही होतां येत असे. अशा स्वतंत्र झालेल्या गुलामांचा आणखी एक चौथा वर्ग रोमन समाजांत असे. यांना फ्रीड मेन किंवा मुक्त मानव असें म्हणत. प्राचीन काळीं पश्चिमेकडे गुलामांना फार मोठी मागणी होती. त्यामुळें गुलामांच्या प्रचंड बाजारपेठाच निर्माण झाल्या आणि स्त्रीपुरुषांना आणि मुलांना सुद्धां गुलाम म्हणून पकडून आणण्यासाठीं व विकण्यासाठीं लोक बाहेरदेशांवर स्वाऱ्या करून जाऊं लागले. प्राचीन ग्रीस व रोम यांना आणि प्राचीन इजिप्तलासुद्धां जें वैभव आणि राजैश्वर्य प्राप्त झालें, तें अत्यंत विस्तृत प्रमाणावर पसरलेल्या या गुलामगिरीच्या पायावरच उभारलेलें होतें.

ही गुलामगिरीची पद्धत त्या काळीं हिंदुस्थानांतही अशीच प्रचारांत होती का? बहुतांशीं नसावी. चीनमध्येंही ती नव्हती. याचा अर्थ प्राचीन काळीं चीनमध्यें किंवा हिंदुस्थानांत कसल्याच प्रकारची गुलामगिरी नव्हती असें नव्हे. पण जी होती ती थोड्याफार प्रमाणांत घरगुती गरजांपुरतीच होती. कांहीं घरगुती नोकरांना गुलाम म्हणून समजलें जात असे. इतर बाहेरच्या कामासही मजूर म्हणून—जमिनीवर किंवा इतर ठिकाणींही मोठ्या टोळ्यांनीं काम करणारे कामकरी म्हणून—असे गुलाम हिंदुस्थान किंवा चीनमध्यें होते, असें दिसत नाहीं. म्हणून गुलामगिरीचे जे मनुष्याला अत्यंत हीन दशेला पोंचविणारे प्रकार, त्यांपासून हे दोन्ही देश मुक्त राहिले.

जसजशी इकडे रोमच्या राज्याची वाढ होऊं लागली, तसतसा पॅट्रिशियन-वर्गाला फायदा होऊं लागला; त्यांची संपत्ति पुष्कळ वाढली व त्याची हरतऱ्हेची भरभराट झाली. प्लीबियन-वर्ग मात्र या सर्व घडामोडींत गरीबचा गरीबच राहिला आणि पॅट्रिशियन लोक त्याच्या डोक्यावर नाचतच राहिले; तसेंच हे पॅट्रिशियन व प्लीबियन दोघे मिळून गुलामांच्या डोक्यावर नाचत राहिले.

रोमची ही वाढ होत होती तेव्हां त्याची राज्यव्यवस्था कशा प्रकारची होती? वर सांगितलेंच मीं तुला, कीं राज्यकारभार प्रत्यक्ष हांकला जाई सीनेटकडून आणि या सीनेटची नेमणूक दोन लोकनियुक्त कॉन्सल्सकडून होत असे. या कॉन्सल्सची निवडणूक कोणाकडून होत असे? त्यासाठीं नागरिक हे मतदार असत. सुरुवातीला रोम हें जेव्हां एक छोटें नगर-राज्य होतें, तेव्हां सारेच नागरिक रोममध्यें किंवा जवळपासच राहत असत. त्यामुळें सर्वांनीं मिळून एकत्र येऊन मतदान करणें त्यांना तेव्हां अवघड नव्हतें. पण पुढें रोमचें राज्य मोठें वाढलें, पुष्कळ नागरिक रोमपासून फार दूर राहूं लागले व त्यांना मतदान करणें तितकें सोपें राहिलें नाहीं. हल्लीं ज्याला प्रातिनिधिक राज्यव्यवस्था म्हणून आपण म्हणतों, तशा प्रकारची व्यवस्था त्या वेळीं तेथें व्यवहारांत नव्हती किंवा कल्पनेंतही तिची मांडणी झालेली नव्हती. हल्लींची पद्धति तुला ठाऊक आहे. निरनिराळे स्थानिक गट किंवा मतदार-संघ आपापला प्रतिनिधि राष्ट्रीय कायदे-मंडळासाठीं (कोठें त्याला ॲसेंब्ली म्हणतात, कोठें पार्लमेंट, कोठें काँग्रेस) निवडतात;

आणि अशा रीतीनें या थोड्याशा लोकानियुक्त प्रतिनिधींची ही सभा म्हणजेच एक प्रकारें सर्व राष्ट्र, असें समजलें जातें. ही कल्पना प्राचीन रोमन लोकांना सुचली नसावी. म्हणून लांबलांबच्या मतदारांना रोममध्यें येऊन मत देणें हें सर्वस्वीं अशक्य होत गेलें, तरी सुद्धां त्यांनीं आपली रोममध्यें मतदान करून कॉन्सलची निवणूक करण्याचीच पद्धति चालू ठेवली. दूरचे मतदार मत द्यायला येऊं शकत नसत; एवढेंच नव्हे, पण रोममध्यें काय चाललें आहे याची सुद्धां त्यांना कल्पना नसे. त्या वेळीं वर्तमानपत्रें नव्हतीं किंवा पत्रकें काढण्याची सोय नव्हती; किंवा छापील ग्रंथही नव्हते. त्यामुळें मतदानाचा हा हक्क रोमपासून दूर राहणारांना असून नसल्यासारखाच होता. मतदानाचा हक्क कायद्यानें त्यांना होता; पण मधल्या अंतरानें त्यांचा हा हक्क काढून घेतला होता.

तेव्हां खुद्द रोममध्यें राहणाऱ्या लोकांनाच काय तो निवडणुकींत खरा भाग घेतां येई व महत्त्वाच्या प्रश्नावर मतदान करतां येई, हें तुझ्या लक्षांत येईल. उघड मैदानावर हें मतदान होत असे. दोन वेगवेगळीं मैदानें करावयाचीं व त्यांत वेगवेगळ्या बाजूंच्या मतदारांनीं जावयाचें अशी पद्धत होती. या मतदारांत पुष्कळ गरीब प्लीबियन लोकही असत. मोठ्या अधिकाराची अपेक्षा करणारे श्रीमंत पॅट्रिशियन लोक या गरीब लोकाना त्यांनीं आपल्याला मत द्यावें म्हणून लांच देत. अशामुळें आधुनिक काळच्या निवडणुकींत जे लांचलुचपतीचे व लफंगेगिरीचे बरेच प्रकार चालतात, ते प्रकार रोमन निवडणुकांतही पुष्कळ प्रमाणांत चालत असत.

इकडे इटलींत रोमचें राज्य वाढत होतें, तर तिकडे उत्तर आफ्रिकेंत कार्थेजच्या राज्याचेंही सामर्थ्य वाढत होतें. कार्थेजियन लोक हे फिनीशियन लोकांचे वंशज; त्याची दर्यावर्दीपणाची व व्यापाराची परंपराही कार्थेजियन लोकांमध्यें कायम होती. त्यांचेंही एक प्रकारचें लोकराज्यच होतें; परंतु रोमपेक्षांही पुष्कळ अधिक प्रमाणांत तें श्रीमतांचें लोकराज्य होतें. मात्र हें एक लोकसत्ताक नगर-राज्य होतें व त्यामध्यें गुलामांची संख्या प्रचंड होती.

अगदीं सुरुवातीच्या काळांत रोम आणि कार्थेज यांच्या दरम्यान दक्षिण इटली व मेसिना यामधील ग्रीक वसाहती होत्या. परंतु तेथून ग्रीकांना हांकलून लावण्यासाठीं रोम व कार्थेज या दोन्ही राज्यांनीं एक होऊन जो प्रयत्न केला, त्यांत त्यांना यश आलें व सिसिलीचें बेट कार्थेजला देण्यांत येऊन इटलीच्या बुटाच्या अगदीं टोंकापर्यंत रोमचें राज्य झालें. परंतु रोम व कार्थेज यांच्यामधील ही मैत्री व हा दोस्तीचा करार फार काळ टिकला नाहीं. लौकरच त्या दोहोंमध्यें लहान लहान झगडे होऊं लागले व दोघांत अत्यंत तीव्र स्पर्धा उत्पन्न झाली. भूमध्यसमुद्रासारखा लहानसा समुद्र, त्या अरुंद अशा समुद्राच्या दोन्ही बाजूंना एकमेकांकडे तोंड करून उभ्या राहिलेल्या या दोन्ही राज्यांना वाढीला किंवा वावरण्याला अपुरा पडूं लागला. दोन्ही राज्यें महत्त्वाकांक्षी होतीं. रोम चांगलेंच

वाढीला लागलें होतें आणि तारुण्यसुलभ अशी महत्त्वाकांक्षा व आत्मविश्वास त्याच्या ठिकाणीं होता. सुरुवातीसुरुवातीला कार्थेज रोमच्या राज्याला कोठलें तरी एक उपटसुंभ राज्य म्हणून कमी लेखीत असे. आपल्या दर्यावर्दी सामर्थ्याबद्दल त्याला अभिमान होता. मधले मधले शांततेचे कांहीं दिवस सोडले, तर या दोन राज्यांत शंभराहूनही अधिक वर्षेपर्यंत सतत युद्ध चालू होतें. रानटी पशूंसारखें त्यांचें हें युद्ध चाले आणि असंख्य लोकांना त्यामुळें दैन्यभार सहन करावा लागे. मुख्यतः तीन युद्धें त्यांच्यामध्यें झालीं. या युद्धांना प्यूनिक युद्धें म्हणतात. पहिलें प्यूनिक युद्ध ख्रिस्तपूर्व २६४ पासून २४१ पर्यंत तेवीस वर्षें चाललें व त्यांत शेवटीं रोमचा जय झाला. त्यानंतर बावीस वर्षांनीं दुसरें प्यूनिक युद्ध सुरू झालें. त्या वेळीं या युद्धावर कार्थेजनें इतिहासप्रसिद्ध हॅनिबॉल हा सेनापति पाठविला. पंधरा वर्षें हॅनिबॉलनें रोमला नको-नकोसें केलें व रोमन लोकांची ताराबळ केली. त्यानें रोमच्या सैन्याचा पराभव केला व त्यांची खूप कत्तल केली; त्यांतल्या त्यांत ख्रिस्तपूर्व २१६ व्या वर्षीं कॅनाच्या लढाईंत त्यानें रोमच्या सैन्याचा फारच मोठा नाश केला. विशेष म्हणजे कार्थेजकडून कांहींही मदत मिळणें बंद झालें असतांना त्यानें हा पराक्रम केला. रोमचें साऱ्या समुद्रावर वर्चस्व दृढ झालें होतें आणि त्यामुळें हॅनिबॉलचा कार्थेजशीं संबंधच तुटला होता. वारंवार पराभव होत होते आणि नाश होत होता, आणि हॅनिबॉलचें संकट एकसारखें दत्त म्हणून पुढें उभें होतें. तरीही रोमन लोकांनीं माघार घेतली नाहीं, आणि आपल्या कट्टया शत्रूंशीं ते लढतच राहिले. हॅनिबॉलशीं उघड मैदानांत सामना देण्याची त्यांची छाती नव्हती. यामुळें ते अशी लढाई करण्याचें टाळीत आणि त्याचें दळणवळण तोडून त्याला जगणें अशक्य व्हावें अशी खटपट करीत. अशा रीतीनें उघड लढाई टाळण्याचें कसब ज्याला विशेष पसंत होतें असा रोमचा सेनापति फेबियस या नांवाचा होता. तो कोणी मोठा श्रेष्ठ पुरुष होता किंवा संस्मरणीय पुरुष होता म्हणून कांहीं त्याचा मीं उल्लेख केलेला नाहीं; तर त्याच्या नांवावरून इंग्रजी भाषेंत एका विशेष शब्दाचा जन्म झाला आहे, म्हणूनच केवळ त्याचा उल्लेख मीं केलेला आहे. हा शब्द म्हणजे फेबियन हा होय. ज्यामध्यें प्रत्यक्ष निर्णायक युद्ध केलें जात नाहीं, त्या हालचालींना फेबियन युद्धशास्त्र किंवा व्यूहरचना म्हणतात. शत्रूला प्रत्यक्ष तोंड देण्याचें टाळावयाचें; आणीबाणीचा प्रसंग, शत्रूशीं प्रत्यक्ष झटापटीचा प्रसंग येऊं द्यावयाचा नाहीं आणि हळूहळू चिवटपणानें शत्रूला दमवून दमवून आपला हेतु साधावयाचा, असें हें धोरण आहे. इंग्लंडमध्यें एक फेबियन सोसायटी नांवाची संस्था आहे. या संस्थेला समाजवादाचें ध्येय मान्य आहे; परंतु कोणतेही सामाजिक बदल अत्यंत वेगानें किंवा एकदम करण्यावर त्यांचा विश्वास नाहीं.

हॅनिबॉलनें इटलीचा फार मोठा प्रदेश निर्जन व वैराण करून टाकला. परंतु रोमच्या दीर्घ प्रयत्नाला व चिकाटीला शेवटीं यश आलें. ख्रिस्तपूर्व २०२ सालीं झामा येथील लढाईंत हॅनिबॉलचा पराभव झाला; तेथून तो ठिकठिकाणीं पळत सुटला;

पण अखंड द्वेषानें जळणाऱ्या रोमन लोकांनीं त्याची पाठ म्हणून सोडली नाहीं. अखेरीस विष घेऊन त्यानें प्राणत्याग केला.

यामुळें कार्थेजचें बळ फारच कमी झालें. आतां रोमशीं स्पर्धा करण्याची ताकदच त्याला राहिली नाहीं. तेव्हां त्यापुढें अर्धशतकपर्यंत रोम व कार्थेज यांच्यामध्यें शांतता राहिली. परंतु एवढ्यावर रोमचें मात्र समाधान झालेलें नव्हतें. त्यानें पुन्हां कार्थेजवर तिसरें प्यूनिक युद्ध लादलेंच. त्यांत कार्थेजची फारच प्रचंड मनुष्यहानि झाली आणि कार्थेजच्या राज्याचा पूर्ण नाश झाला. एवढेंच नव्हे, तर भूमध्यसमुद्राची स्वामिनी म्हणून जी कार्थेज नगरी मोठ्या अभिमानानें विलसत होती, ती नाहींशी करून तेथें प्रत्यक्ष नांगर फिरविण्यांत आले.

२८

रोमचें लोकसत्ताक राज्य साम्राज्य बनतें

९ एप्रिल, इ.१९३२

कार्थेजचा शेवटच्या युद्धांत पराभव झाला आणि त्याचा पूर्ण नाश झाला. त्यानंतर पश्चिमेकडील जगांत रोमचेंच सर्वत्र अबाधित वर्चस्व चालू झालें. त्याला कोणीच प्रतिस्पर्धी म्हणून राहिला नाहीं. त्याच्याआधींच रोमनें ग्रीक राज्यें पादाक्रांत केलीं होतीं. आतां त्यानें कार्थेजच्या स्वामित्वाखालील सर्व मुलुखाचा ताबा घेतला. अशा रीतीनें दुसऱ्या प्यूनिक युद्धानंतर स्पेन देश रोमच्या कबजांत आला. परंतु एवढ्यानें कांहीं सारा यूरप रोमच्या ताब्यांत आला नाहीं. सर्वच्या सर्व उत्तर यूरप आणि मध्य यूरप हे प्रदेश रोमच्या राज्यापासून अगदीं स्वतंत्र होते. आणि रोमचें राज्य अद्यापि फक्त भूमध्यसमुद्रालगतच्या प्रदेशांवरच चालू होतें.

या विजयाचा व देश काबीज करण्याचा परिणाम म्हणजे रोममध्यें संपत्ति आणि चैनबाजी याची वाढ झाली; काबीज केलेल्या देशांतून सोनें आणि गुलाम यांचा नुसता लोंढाच्या लोंढा रोममध्यें वाहूं लागला. पण हें सगळें गेलें कोणाच्या हातीं? मागें सांगितलेंच मीं तुला, कीं रोममध्यें कारभार सगळा सीनेटच्या हातीं असे. आणि या सीनेटमध्यें श्रीमंत वरिष्ठ वर्गीय घरण्यांमधीलच सगळी मंडळी असत. रोमचें लोकसत्ताक राज्य व लोकजीवन यांची सर्व नाडी खरोखर या श्रीमंत लोकांच्या हातांत असे. आणि जसजसें रोमचें सामर्थ्य आणि विस्तार हीं वाढत गेलीं, तसतशीं या लोकांची श्रीमंतीही वाढत गेली. म्हणजे काय, कीं आधींच श्रीमंत होते ते अधिक श्रीमंत झाले; आणि मुळांत जे गरीब होते ते गरीबच राहिले, किंवा तसें पाहिलें तर अधिकच गरीब झाले. गुलामांची संख्या वाढली आणि एका बाजूला ऐश्वर्योपभोग

व दुसऱ्या बाजूला दैन्यावस्था यांची बरोबरीनेंच वाढ होत गेली. असें झालें कीं त्यांच्यापाठोपाठ अशांतता-खवदव ही यायचीच. मनुष्याची अडचणी व दुःख सहन करण्याची शक्ति एवढी मोठी आहे, कीं मन त्यामुळें चकित होतें. परंतु या सहनशीलतेलाही कांहीं मर्यादा आहेच; आणि या मर्यादेच्या बाहेर सहन करावें लागलें कीं स्फोट हे होणारच.

श्रीमंत लोकांनीं खेळ आणि शर्यती व चढाओढी यांच्या योगानें लोकांच्या मनाला विरंगुळा पाडण्याचा प्रयत्न केला. क्रीडांगणें मुद्दाम तयार केलीं गेलीं होतीं. त्यांमध्यें तरवारीचे खेळ खेळणारे लोक एकमेकांशीं लढत आणि एकमेकांना ठार करीत. कशासाठीं, तर केवळ प्रेक्षकांची करमणूक व्हावी म्हणून. किती तरी गुलाम व लष्करी कैदी अशा रीतीनें मारले जात आणि यालाच त्या काळचे लोक Sport, क्रीडानैपुण्य म्हणतसें दिसतें.

परंतु तरी सुद्धां रोममध्यें गडबड अधिक वाढतच गेली. निवडणुकांचे वेळीं बंडें आणि कत्तली होऊं लागल्या. लांचलुचपत आणि वशिलेबाजी वाढत गेली. अगदीं गरीब व दडपले गेलेले जे गुलाम त्यांनीं सुद्धां स्पार्टेकस नांवाच्या तरवारीचे खेळ करणाऱ्या पहिलवानाच्या नेतृत्वाखालीं बंड उभारलें. परंतु त्यांचा अगदीं निर्दयपणें चक्काचूर करण्यांत आला. रोममधील ॲपियन रस्त्यावर त्याच्यापैकीं सहा हजार लोकांना सुळावर देण्यांत आलें असें म्हणतात.

महत्त्वाकांक्षी, साहसी लोक आणि सेनापती यांचें प्रस्थ हळूहळू वाढूं लागलें. आणि सीनेटपेक्षांही यांचेंच खूड अधिक जड होऊं लागलें. यादवी सुरू झाली, आपापसांत स्पर्धा असणाऱ्या भिन्न भिन्न विरोधी गटांतील सेनापतींच्या परस्परांशीं लढाया होऊं लागल्या. प्रदेश सारा उजाड होऊं लागला. पूर्वेस पार्थियामध्यें – म्हणजे मेसापोटेमियामध्यें हल्लींचा इराक – ख्रिस्तपूर्व ५३ या वर्षीं कऱ्हा येथील लढाईंत रोमन सैन्याचा प्रचंड पराभव झाला. पार्थियन लोकांनीं आपल्याविरुद्ध आलेलें सारेंच रोमन सैन्य नष्ट करून टाकलें.

रोमचे जे असंख्य सेनापती होऊन गेले त्यांमध्यें दोघे जण विशेष नजरेंत भरण्यासारखे आहेत: एक पॉंपी व दुसरा ज्यूलिअस सीझर. ज्यूलिअस सीझरनें फ्रान्स (त्या वेळीं त्याला गॉल म्हणत) व ब्रिटन हे देश काबीज केले होते, हें तुला माहीत आहे. पॉंपीचा मोर्चा पूर्वेकडे वळला होता व तिकडे त्याला मोठे विजय मिळाले. पण या दोघांमध्यें अत्यंत कटु स्पर्धा होती. दोघेही महत्त्वाकांक्षी होते आणि आपल्यावांचून दुसरा कोणी सत्ताधारी झालेला त्यांपैकीं एकालाही सहन होण्यासारखा नव्हता. ते दोघेही सीनेटची सत्ता संपूर्ण मान्य असल्यासारखें दाखवीत. परंतु त्यांच्यापुढें बिचाऱ्या सीनेटला कांहींच महत्त्व उरलें नव्हतें. पुढें सीझरनें पॉंपीचा पराभव केला व अशा रीतीनें साऱ्या रोमन राज्यांत तोच एक प्रमुख मनुष्य झाला. परंतु रोमचें राज्य होतें प्रजासत्ताक. त्यामुळें सर्वच बाबतींत त्याला आपला अप्रतिहत अधिकार, वरचष्मा चालविणें

शक्य नव्हतें. त्यासाठीं त्याला राजा किंवा बादशहा म्हणून नियुक्त करावें, असे प्रयत्न करण्यांत आले. त्याच्याही मनांतून अशीच इच्छा होती मोठी प्रबळ; परंतु रोम-मधील फार दिवसांपासून चालत आलेल्या प्रजासत्तेच्या परंपरेमुळें तो जरा कांकूं करीत होता. आणि अखेरीस ही परंपराच त्याच्याहीपेक्षां अधिक बलिष्ठ ठरली. ब्रूटस् व इतर मंडळींनीं तो राज्यसभामंदिराच्या पायऱ्या चढत असतांना पायरीवरच तरवार भोंसकून त्याला ठार केलें. शेक्स्पियरचें ज्यूलिअस सीझर हें नाटक तूं वाचलें असशीलच. त्यांत हा प्रसंग चितारलेला आहे.

ख्रिस्तपूर्व ४४ या वर्षीं ज्यूलिअस सीझरचा खून झाला. परंतु तो मेल्यानें प्रजा-सत्ताक राज्य मात्र कांहीं टिकाव धरूं शकलें नाहीं. सीझरच्या पुतण्याचा मुलगा—ज्याला त्यानें दत्तक घेतलें होतें—ऑक्टेव्हियन नांवाचा होता. त्यानें व सीझरचा मित्र मार्क अँटनी यानें सीझरच्या मृत्यूचा सूड घेतला. आणि त्यामधून रोममध्यें राजपद परत प्रस्थापित झालें. ऑक्टेव्हियन हा राज्याचा प्रमुख शासनकर्ता—प्रिन्सेप झाला व प्रजासत्ताक राज्य नष्ट झालें. सीनेट तेवढी चालू राहिली; परंतु तिच्या हातांत खरी सत्ता अशी कांहींच राहिली नाहीं.

ऑक्टेव्हियन जेव्हां प्रिन्सेप म्हणजे प्रमुख शासनकर्ता झाला, तेव्हां त्यानें आपल्याला ऑगस्टस सीझर असें नांव घेतलें. यापुढें सीझर ही एक पदवीच झाली व तिचा अर्थ बादशहा असा होऊन गेला. कैसर आणि झार हे शब्द याच सीझर शब्दा-पासून निघालेले आहेत. कैसर हा शब्द हिंदुस्थानमध्यें सुद्धां फार दिवसांपासून प्रचलित झालेला आहे. उदाहरणार्थ, कैसर-ई-रूम, कैसर-ई-हिंद हे शब्द पहा. इंग्लंडचा पांचवा जॉर्ज राजा कैसर-ई-हिंद ही पदवी लावून घेण्यांत मोठें भूषणच आज मानीत असतो. जर्मन कैसर आतां नाहींसा झाला आहे. तीच गत ऑस्ट्रियाच्या कैसरची झाली आहे. तुर्कस्तानचा कैसरही आतां संपला आहे. आणि तसाच रशियाचा झार पण. अशा स्थितींत ज्या ज्यूलिअस सीझरनें रोमच्या वतीनें ब्रिटन देश पादाक्रांत केला होता, त्याचेंच नांव पदवी म्हणून लावणारा आजच्या काळीं फक्त त्या इंग्लंडचाच राजा तेवढा बाकी असावा, ही घटना किती विचित्र, किती विचार करण्याजोगी आहे!

अशा रीतीनें ज्यूलिअस सीझरचें नांव हें साम्राज्यशाही ऐश्वर्याचें निदर्शक होऊन राहिलें आहे. ग्रीकमध्यें फार्सेलसच्या लढाईंत पाँपीनें त्याचा पराभव केला असता, तर काय परिणाम झाला असता बरें? बहुतकरून मग पाँपी हाच प्रिन्सेप म्हणजे बादशहा झाला असता. मग पाँपी या शब्दाचाच अर्थ बादशहा असा झाला असता. मग विल्हेल्म दुसरा याला आम्ही जर्मन पाँपी असें म्हटलें असतें. आणि खुद्द पांचवा जॉर्ज हाही बहुधा पाँपी-ई-हिंद झाला असता.

लोकसत्ताक राज्यांतून साम्राज्यांचा उदय होत होता; अशा या काळीं, रोम-मधील या संधिकाळाच्या वेळेला, ईजिप्तमध्यें पुढें इतिहासात सौंदर्यासाठीं जी विख्यात होऊन राहिली अशी एक स्त्री राहत होती. तिचें नांव 'क्लिओपाट्रा.' हिची कीर्ति

कांहीं मोठीशी नाव घेण्याजोगी नाहीं हें खरें; परंतु आपल्या सौंदर्याच्या बळावर ज्यांनीं जागतिक इतिहासात पुष्कळ घडामोडी केल्या म्हणून म्हणतात, अशा थोड्याशा स्त्रियांपैकीं एक ही स्त्री होती. ज्यूलिअस सीझर ईजिप्तमध्यें गेला होता, तेव्हां हिचें अगदींच पोरवय होतें. पुढें तिचा मार्क अँटनीशीं फार स्नेह जमला. परंतु त्यामुळें त्याचा कांहीं फायदा झाला तर नाहींच; पण उलट एका मोठ्या आरमारी युद्धाच्या ऐन भरांत ती आपलीं सारीं जहाजें घेऊन आयत्या वेळीं त्याला सोडून गेली. असा त्याचा तिनें विश्वासघात केला. पुष्कळ काळापूर्वी पास्कल या प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकारानें लिहिलें आहे, "परंतु क्लिओपाट्राचें नाक थोडेंसें लहान म्हणजे नकटें असतें, तर सर्व जगाचें स्वरूप कांहीं वेगळेंच झालें असतें!"

यामध्यें थोडीशी अतिशयोक्ति आहे. क्लिआपाट्राचें नाक थोडेंसें वेगळ्या प्रकारचें असतें, तर तेवढ्यानें जगांत कांहीं मोठा बदल खास झाला नसता. परंतु ईजिप्तला जाऊन आल्यानंतर आपण राजे आहों, सम्राट् आहों, किंवा देवाचा अंश असलेले राज्यकर्ते आहों, अशी कल्पना सीझरच्या मनांत उत्पन्न झाली असावी, असा मात्र पुष्कळसा संभव आहे. ईजिप्तमध्यें कांहीं प्रजासत्ताक राज्य नव्हतें. तेथें राजेशाहीच होती. आणि राजा नुसता सर्वसत्ताधीश होता, एवढेंच नव्हे, तर त्याला लोक जवळजवळ देवच मानीत. ईजिप्तमध्यें ही कल्पना प्राचीन काळापासून होती आणि टॉलेमीच्या वंशांतील ग्रीक लोकांनीं सुद्धां, अॅलेक्झांडरच्या मृत्यूनंतर ईजिप्तचें राज्य स्वतःच्या कबजांत आल्यानंतर ईजिप्शियन लोकांच्या बहुतेक साऱ्या रूढी व विचारपरंपरा स्वीकारल्या होत्या. क्लिओपाट्राही या टॉलेमीच्या कुळांतीलच होती. म्हणजे खरोखर ती एक ग्रीक किंवा मॅसिडोनियन राज्यकर्त्री होती.

क्लिओपाट्राचा त्या कामीं प्रत्यक्ष हात असो किंवा नसो, परंतु राजा म्हणजे देव ही ईजिप्तमधील कल्पना वाट चालत चालत रोममध्यें आली आणि तेथें तिला आसरा मिळाला हें खरें. ज्यूलिअसच्या काळीं तर लोकसत्ताक राज्य भरभराटींत होतें. पण त्या काळीं सुद्धां सीझरचे पुतळे उभे करून त्यांची पूजा करण्याचा प्रघात सुरू झाला होताच. नंतर रोमन बादशहांच्या बाबतींत हा एक नित्याचा क्रम कसा झाला आहे, हें आपल्याला पुढें दिसेलच.

रोमच्या इतिहासांतील एका मोठ्याच उलाढालीच्या काळाशीं – प्रजासत्ताक राज्याच्या अंतकाळाशीं – आपण येऊन ठेपलों आहों. ऑक्टेव्हियन, ऑगस्टस सीझर ही पदवी धारण करून राजा किंवा प्रिन्सेप झाला, तें साल ख्रिस्तपूर्व २७ हें. त्याच्या पुढची रोमची व रोमच्या बादशहांची हकिगत अजून बरीच पाहायची आहे आपल्याला. परंतु त्याआधीं रोमन प्रजासत्ताक राज्याच्या शेवटच्या दिवसांत रोमन राज्यांचा विस्तार कसा कसा होता हें थोडेंसें आपण पाहूं या. रोमचें राज्य साऱ्या इटली देशावर होतें हें तर कांहीं सांगायलाच नको. तसेंच पश्चिमेकडील स्पेन व गॉल (फ्रान्स) हे देशही या राज्यामध्यें होते. पूर्वेकडे ग्रीस देश व आशिया मायनरचा प्रदेश हेही या


रोमच्या राज्याचें
साम्राज्य बनतें
गॉल
डान्यूब
स्पेन
डाल्मेशिया
रोम
करार
पेरगामम
ग्रीस
कार्थेज
ईजिप्त
रोम व कार्थेज :
५०० खि. पू.
आगस्टसच्या मृत्यूचे वेळीं
रोमन साम्राज्य

राज्यांत सामील होते. आशिया मायनरच्या या प्रदेशाला पूर्वी परगॅमम म्हणत व रोमच्या पूर्वी तेथें ग्रीकांचें राज्य होतें, हें मीं मागें एकदां सांगितलेलें तुझ्या ध्यानात असेलच. उत्तर आफ्रिकेंत ईजिप्तचें राज्य हें मित्रराज्य आणि मांडलिक राज्य असें समजलें जाई. कार्थेज आणि भूमध्यसमुद्राच्या लगतचे इतरही कांहीं देशांचे भाग रोमच्या राज्याखालीं होते. अशा रीतीनें रोमच्या राज्याची उत्तरेकडील सरहद्द ऱ्हाइन नदीच्या निटोप्यानें होती. त्यापलीकडील सर्व जर्मन व रशियन लोक आणि उत्तर व मध्य युरोपांतील लोक हे रोमच्या राज्याच्या बाहेर होते. त्याचप्रमाणें मेसापोटेमियाच्या पूर्वेकडीलही कोणी रोमच्या साम्राज्यांत सामील नव्हते.

रोमचें राज्य त्या काळांत फार मोठ्या पदाला चढलें होतें यांत कांहीं वाद नाहीं. परंतु इतर देशांच्या इतिहासाचें ज्यांना ज्ञान नाहीं अशा पुष्कळ यूरपीयन लोकांची अशी कल्पना आहे, कीं रोमचा तत्कालीन सर्व जगावर ताबा होता, प्रभुत्व होतें. पण खरोखर अशी वस्तुस्थिति नव्हती. तुझ्या लक्षांत असेल, कीं अगदीं याच काळांत चीनमध्यें महान् हान घराण्याचें राज्य चालू होतें. याचाच अर्थ असा, कीं आशियाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत, थेट कास्पियन समुद्रापर्यंत त्यांचें अधिराज्य चालू होतें. मेसापोटेमियांत (इराक) कऱ्हाच्या लढाईंत पार्थियन लोकांनीं रोमन लोकांचा चांगला प्रचंड पराभव केला, त्या वेळीं या मंगोलियन लोकाचीही पार्थियन लोकाना मदत मिळाली असण्याचा संभव आहे.

परंतु रोमचा इतिहास–विशेषतः रोमन प्रजासत्ताक राज्याचा इतिहास–हा प्रत्येक यूरपीयन माणसाला फार प्रिय आणि आपलासा वाटतो. प्राचीन रोमन राज्य हें आधुनिक यूरपीय राज्याचें एका प्रकारें पूर्वजच आहे, असें त्यांना वाटत असतें. आणि कांहीं अंशानें तें खरेंही आहे. म्हणून तर इंग्लंडमधील शाळांतील मुलांना आधुनिक इतिहास येवो अगर न येवो, पण ग्रीक आणि रोमन इतिहास त्यांना माहीत असलाच पाहिजे अशी त्यांच्यावर सक्ती होते. माझ्यावर सुद्धां मूळ लॅटिन भाषेमधून ज्यूलिअस सीझरच्या गॉलवरील स्वारीचा वृत्तांत वाचण्याची सक्ती करण्यांत कशी आली होती, हें मला चांगलें आठवतें. सीझर हा केवळ एक योद्धाच होता असें मात्र नव्हे; तर तो एक चांगला गुणी आणि डौलदार ग्रंथकारही होता. त्याचा De Bello Gallico, गॉलचें युद्ध हा ग्रंथ यूरपमधील हजारों शाळांमधून आजही वाचला जातो.

अशोकाच्या काळच्या जगाची पाहणी करण्याचें काम आपण थोड्या वेळापूर्वी सुरू केलें. तें पुरें तर आपण केलेंच, पण चीन व यूरपमध्यें त्या काळाच्याही पुष्कळ पुढें येऊन आपण पोंचलों आहों. ख्रिस्ती शकाच्या अगदीं दाराशीं येऊन आपण आतां पोंचलों आहों. म्हणून आतां परत हिंदुस्थानांत जाऊन तेथल्या लोकांची हकीकत आपणांला या काळापर्यंत आणून पोंचविली पाहिजे. कारण तिकडे अशोकाच्या मृत्यूनंतर पुष्कळच मोठमोठ्या घडामोडी झालेल्या आहेत व दक्षिणेकडे व उत्तरेकडे नवीं साम्राज्यें उदयास आलेलीं आहेत.

सगळ्या जगाच्या इतिहासाची एकच अशी तुला कल्पना यावी, असा प्रयत्न मीं केला आहे. परंतु एक गोष्ट तुला लक्षांत ठेवणें जरूर आहे, कीं या प्राचीन काळीं दूरदूरच्या देशांचे एकमेकांशीं संबंध अगदींच मर्यादित स्वरूपाचे होते. रोमची इतर पुष्कळ दृष्टींनीं प्रगति झाली होती, तेंरी भूगोलशास्त्र किंवा नकाशे यांचें तेथें जवळ-जवळ कांहींच ज्ञान नव्हतें आणि तें ज्ञान मिळविण्याचाही कोणी विशेष प्रयत्न करीत नव्हते. त्या काळचे मोठमोठे सेनापती किंवा रोमन सीनेट (लोकसभे) मधील शहाणे लोक यांच्यापेक्षां आज शाळेंतल्या मुलांमुलींना भूगोलाचें किती तरी ज्ञान असतें. आणि तरी सुद्धां या रोमन सेनापतींना व सीनेटमधील लोकांना आपण साऱ्या जगाचे अधिपति आहों असें वाटत असे. त्यांना जसें आपण जगाचे स्वामी आहों असें वाटे, तसें त्याच वेळीं, हजारों मैल पलीकडे, चीनमधील राज्यकर्त्यांनाही असेंच वाटे, कीं आपणच अखिल जगाचे.अधिराजे आहों!

२९

दक्षिण हिंदुस्थानची उत्तर हिंदुस्थानवर मात

१० एप्रिल, १९३२

अतिपूर्वेकडे चीनमध्यें आणि पश्चिमेकडे रोममध्यें पुष्कळ वेळपर्यंत प्रवास करून आपण आतां हिंदुस्थानांत परत आलों आहों.

अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्यांचें साम्राज्य फार काळ टिकलें नाहीं. कांहीं वर्षांतच तें विरून गेलें. उत्तरेकडील प्रांत साम्राज्यांतून एकेक फुटून गेले आणि दक्षिणेकडे नवीनच एक सत्ता निर्माण झाली; ही आंध्राची सत्ता होय. त्या मावळत्या साम्राज्यावर अशोकाच्या वंशजांनीं पुढें पन्नास-एक वर्षेंपर्यंत राज्य केलें; परंतु शेवटीं त्यांचाच एक प्रमुख सेनापति ब्राह्मणवर्णीय पुष्यमित्र यानें जबरदस्तीनें त्यांना राज्यावरून उडवून लाविलें. त्यानंतर त्यानें स्वतःलाच राज्याभिषेक करून घेतला व त्यामुळें त्याच्या काळीं कांहीं काळ ब्राह्मणधर्माला पुनर्जीवन प्राप्त झालें. बुद्ध भिक्षूंचा छळही कांहीं अंशीं होऊं लागला. परंतु इतिहासाचा अभ्यास करतांना तुला आढळून येईल, कीं ब्राह्मण-धर्मानें बुद्धधर्मावर जो हल्ला केला, तो आडमुठेपणानें न करतां मोठ्या कौशल्यानें आणि हिकमतीनें – कोणाला नीट समजणारसुद्धां नाहीं अशा रीतीनें – केला. त्यांचा छळ करावयाचा असा त्यांनीं फारसा दडपेगिरीचा प्रयत्नच केला नाहीं. कांहीं थोडाफार छळ अर्थातच झाला. पण तो राजकीय स्वरूपाचा होता. धार्मिक स्वरूपाचा नव्हे. बुद्धधर्मीयांचे जे मोठमोठे संघ होते ते फारच प्रबळ होते. आणि त्यांच्या राजकीय सामर्थ्याबद्दल राजे लोकांना पुष्कळदां भय वाटे. यासाठीं त्यांचें हें सामर्थ्य कमी

करण्याचा प्रयत्न असे राजे करीत. परंतु शेवटीं ब्राह्मणधर्मानें बुद्धधर्माला त्याच्या या जन्मभूमींतून जवळजवळ जें पार नाहींसें करून टाकलें, तें कांहीं अंशीं त्याचा-आपला एकजीव करून आणि त्यांतील कांहीं तत्त्वें आत्मसात् करून; म्हणजेच आपल्या घरांतच त्याला थोडीफार जागा देऊन, त्याला आपलासाच करून!

अशा तऱ्हेनें जो ब्राह्मणधर्म पुन्हां प्रस्थापित झाला, तो कांहीं अगदीं जसाच्या तसा पहिलाच ब्राह्मणधर्म नव्हता किंवा बुद्धधर्मानें जें जें कांहीं केलें त्या सगळ्याचाच कांहीं त्यांत अभाव किंवा विच्छेद नव्हता. ब्राह्मणधर्माचे प्राचीन काळचे नेते हे फारच हुशार आणि चतुर लोक होते; आणि नवीन नवीन गोष्टी आत्मसात् करण्याचें, आपल्यामध्यें मिसळून घेण्याचें कौशल्य त्यांना फार पहिल्यापासून साधलेलें होतें. आर्य लोक प्रथम हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं द्राविड लोकांची संस्कृति व आचारविचार यांपैकीं पुष्कळ भागाचा आपल्यांत समावेश करून घेतला; त्यांच्या पहिल्यापासूनच्या इतिहासांत, जाणून किंवा अजाणतां असो, पण त्यांचा नेहमींचाच हा परिपाठ चालत आलेला आहे. बुद्धधर्माच्या बाबतींतही त्यांनीं असेंच केलें. हिंदू लोकांच्या धर्मांत अवतारांची मोठी मालिका आहे, देवदेवतांचें प्रचंड भांडार आहे; त्यामध्येंच एका अवताराची जागा त्यांनीं बुद्धाला देऊन टाकली. लोकसमाजाला बुद्ध हा एक पूजेचा आणि भक्तीचा विषय त्यांनीं करून ठेविला. पण त्यानें जो विशेष धर्मसंदेश म्हणून सांगितलेला होता, तो मात्र हळूच बाजूस सारून कांहीं लहानसहान फरकांनिशीं ब्राह्मणधर्माचा किंवा हिंदु धर्माच्या आचारविचारांचा पूर्वींचाच ओघ पुन्हां आपला जसाच्या तसा संथपणें अखंड वाहूं लागला. पण ही फार पुढच्या काळचा गोष्ट आपण बोलतों आहों. कारण बुद्धधर्माच्या ब्राह्मणीकरणाची क्रिया पूर्ण होण्याला बराच दीर्घ काळ लागलेला आहे; अशोकाच्या मृत्यूनंतर कितीक शतकांपर्यंत हिंदुस्थानांत बुद्धधर्मांचेंच वर्चस्व चालू राहिलेलें होतें.

अशोकानंतर मगधामध्यें एकापाठोपाठ एक जे राजे किंवा वंश झाले, त्यांच्याबद्दल विशेष विचार करण्याचें आपल्याला कारण नाहीं. परंतु त्या काळीं सुद्धां बुद्धधर्मीय संस्कृतीचें तें एक फार मोठें केंद्र मात्र अवश्य होतें.

दरम्यान उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे दोन्ही बाजूंस पुष्कळ महत्त्वाच्या घटना घडत होत्या. उत्तरेकडून मध्य आशियांतील बख्त्यार, शक, सीथियन, तुर्क, कुशान या लोकांच्या वारंवार स्वाऱ्या होत होत्या. मला वाटतें, मागें एकदां तुला मीं लिहिलें आहे, कीं हा मध्य आशियाचा प्रदेश म्हणजे भटकणाऱ्या मनुष्यांच्या झुंडीच्या झुंडी निर्माण होण्याची जागाच आहे; जणुं पुनः पुनः अशा लोकांचे प्रचंड थवेच्या थवे येथून बाहेर पडले व ते सर्व आशिया खंडभर व यूरपमध्येंही पसरले, असें इतिहासांत आढळून येतें. ख्रिस्तपूर्व २०० या वर्षाच्या सुमारास अशा लोकांच्या कितीएक स्वाऱ्या हिंदुस्थानवर झाल्या. पण एक लक्षांत ठेवलें पाहिजे : या स्वाऱ्या निव्वळ विजय मिळवावयाचा आणि लूट मारून निघून जावयाचें या धोरणानें झालेल्या नव्हत्या. तर

त्यांमध्यें येथें येऊन वसाहत करण्याचा उद्देश होता. मध्य आशियांतील या बहुतेक टोळ्या गुरेंढोरें बरोबर घेऊन भटकणाऱ्या, घरदार नसलेल्या, अशा होत्या. आणि जसजशी त्यांची संख्या वाढूं लागली, तसतसा ते ज्या देशांत भटकत असत तो प्रदेश त्यांना अपुरा पडूं लागला. तेव्हां तेथून दुसरीकडे जाऊन नवीन प्रदेश शोधून काढणें त्यांना भाग पडलें. परंतु त्याच्या देशत्यागाला एक त्याहूनही अधिक प्रबळ कारण झालें; तें म्हणजे त्याच्यापाठीमागून येणाऱ्या टोळ्यांचें दडपण. एखादी नवीन मोठी टोळी किंवा वंश येऊन इतरांना जबरदस्तीनें हांकलून लावी. मग अशांना आपल्यापरी दुसऱ्या देशांवर हल्ला करावा लागे. अशा रीतीनें हिंदुस्थानवर स्वारी करावयाला म्हणून जे लोक येत, ते पुष्कळदां आपापल्या देशांतून पळून जाऊन कोठें तरी आश्रयार्थ भटकणारे असेच लोक असत. चीनच्या साम्राज्यामध्यें सुद्धां जेव्हां राज्यसत्ता चांगली प्रबळ असे (उदाहरणार्थ, हान घराण्याच्या कारकीर्दीतल्याप्रमाणें) त्या वेळीं तेथूनही अशा भटकत्या टोळ्यांना हांकून देण्यांत येत असे आणि त्यांना दुसरीकडे कोठें तरी राहण्याला आसरा शोधणें प्राप्त होई.

दुसरें एक तूं असें लक्षांत ठेवलें पाहिजेस, कीं मध्य आशियांतील या भटक्या टोळ्यांना हिंदुस्थान देश म्हणजे कोणी आपला सर्वस्वीं शत्रु आहे असें कांहीं वाटत नसे. त्यांना इतिहासांत रानटी लोक असें नांव दिलें जातें, आणि त्या काळच्या हिंदुस्थानच्या मानानें ते तितकेसे सुधारलेले नव्हते हें खरेंही आहे. परंतु त्यांच्यापैकीं बहुतेक लोक अत्यंत भाविक बुद्धधर्मीय असत आणि हिंदुस्थान म्हणजे आपल्या धर्माची जन्मभूमि अशा दृष्टीनें एक प्रकारच्या आपुलकीनें ते हिंदुस्थानकडे पाहात असत.

प्रत्यक्ष पुष्यमित्राच्या काळीं सुद्धां वायव्येकडून बाक्ट्रियाच्या मीनांदरनें हिंदुस्थानवर स्वारी केली होती. हा मीनांदर स्वतः निष्ठावंत बुद्धधर्मीय होता. बाक्ट्रिया म्हणजे बख्त्यारांचा देश. हा हिंदुस्थानची सरहद्द ओलांडल्याबरोबरचा पलीकडचा प्रदेश. एका काळीं हा प्रदेश सेल्युकसच्या साम्राज्याचाच एक भाग होता. परंतु पुढें तो स्वतंत्र झाला होता. मीनांदरचा हल्ला परतवून लावण्यांत आला खरा; परंतु सिंध प्रांत आणि काबूल हे त्यानें काबीज केलेच.

यानंतर शकांची स्वारी आली. त्यांची संख्या फारच प्रचंड होती आणि हिंदुस्थानच्या साऱ्या उत्तर आणि पश्चिम भागावर हे लोक पसरले होते. या ठिकाणीं त्यांनीं वाढविलेल्या वनचराईच्या रानांतून आणखी एका मोठ्या टोळीनें त्यांना हुसकून काढलें. ही टोळी कुशान उर्फ ह्येश्वांग लोकांची होय. त्यांनीं बाक्ट्रिआ आणि पार्थिया हे देश व्यापून हळूहळू उत्तर हिंदुस्थानांतही पाय रोवला. विशेषतः, पंजाब, राजपुताना व काठियावाड हे प्रदेश त्यांनीं आपलेसे केले. हिंदुस्थानांत आल्यावर हे लोक पुष्कळ सुधारले आणि त्यांची भटकण्याची प्रवृत्ति सुटून गेली.

हिंदुस्थानच्या कांहीं कांहीं भागांत या बख्त्यार व तुर्क लोकांचीं राज्यें होतीं, तरी त्यांच्यामुळें भारतीय आर्यांच्या समाजव्यवस्थेंत म्हणण्यासारखा कांहीं बदल झाला

नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हे परकी राज्यकर्ते स्वतः बुद्धधर्मीय होते, त्यामुळें बुद्धधर्माचे आचार व धर्मसंस्थेची व्यवस्था व तंत्रच ते पाळीत. आणि ही बुद्धधर्माची संघटना स्वतःच मुळांत भारतीय आर्यांच्या लोकशाहीप्रधान ग्रामसंघाच्या कल्पनेच्या पायावरच आधारलेली होती. त्यामुळें या राज्यकर्त्यांच्या अमदानींत सुद्धां हिंदुस्थानचें स्वरूप म्हणजे वरच्या बाजूला एक मध्यवर्ती सत्ता आणि तिच्या नेतृत्वाखालीं एकत्र येऊन राहणारे सर्वत्र विखुरलेले स्वतंत्र ग्रामीण समाज किंवा ग्रामराज्यें, अशा प्रकारचेंच शिल्लक राहिलें. त्या काळांतही तक्षशिला आणि मथुरा हीं दोन्हीं बुद्धधर्माच्या अध्ययनाचीं स्थानें पाहिल्याइतकींच महत्त्वाचीं राहिलीं आणि चीन व पश्चिम आशिया यांतून सुद्धां विद्यार्थी तेथें येत राहिले.

परंतु वायव्येकडून वारंवार होणाऱ्या या स्वाऱ्या होतच राहिल्या. मगधांचें राज्ययंत्रही हळूहळू खिळखिळें होऊन मोडकळीस आलें. याचा एक परिणाम मात्र जरूर झाला : हिंदुस्थानांतील दक्षिणेकडील राज्यें हींच प्राचीन भारतीय आर्यपरंपरा अधिकच्या अर्थानें सांभाळणारीं अशीं ठरूं लागलीं. पुढें एक हजार वर्षांनंतर मुसलमानांची हिंदुस्थानवर स्वारी झाली तेव्हां सुद्धां याच प्रकाराची पुनरावृत्ति झालेली तुला आढळून येईल. आजसुद्धां उत्तरेकडील या स्वाऱ्या व त्यामुळें आलेले परकीयांशीं संबंध व व्यवहार यामुळें उत्तर हिंदुस्थानवर जितका परिणाम झालेला आढळेल, तितका दक्षिण हिंदुस्थानवर झालेला आढळणार नाहीं. आपण उत्तरेकडे राहणारे जे लोक आहोंत त्यांपैकीं बहुतेक जण एक प्रकारच्या संमिश्र संस्कृतींत वाढलेले आहोंत; हिंदु व मुसलमान संस्कृतींचा मिलाफ आणि त्यांत पश्चिमेकडील संस्कृतीचा थोडासा शिंतोडा, असें हें मिश्रण आहे. प्रत्यक्ष आमची भाषा सुद्धां, मग तिला तुम्ही हिंदी, उर्दू किंवा हिंदुस्थानी, कांहीं म्हणा, एक संमिश्र भाषा आहे. पण दक्षिण हिंदुस्थानचे लोक मात्र अद्याप बहुतांशीं हिंदु संस्कृतीचे आणि सनातन प्रवृत्तीचे आहेत, हें तूं स्वतःच पाहिलें आहेस. कितीक शतकांपर्यंत प्राचीन आर्यपरंपरेचें संरक्षण करून ती जिवंत ठेवण्याची धडपड त्यांनीं केली आणि अशी एक कडक समाजसंघटना केली, कीं तिच्यामध्यें आजसुद्धां अढळणारी असहिष्णुता बघून मन स्तिमित होऊन जातें. उंच तटांच्या आश्रयानें राहणें हें मोठें भयावह आहे. कांहीं प्रसंगीं बाह्य संकटांपासून हे तट आपल्याला बचावूं शकतील, किंवा आपल्याला नको असलेल्या परक्याला आंत येण्याला प्रतिबंधही करूं शकतील. परंतु त्यामुळें आपण स्वतःच एक प्रकारचे कैदी आणि गुलाम होऊन जातों! शुद्धता आणि संसर्गदोषराहितता म्हणून म्हणतात, ती त्यामुळें आपणांस मिळत असेलही; परंतु त्यासाठीं किंमत द्यावी लागते आपल्या स्वातंत्र्याची. त्यांतही सगळ्यांत अधिक भयंकर तट म्हणजे आपल्या बुद्धीभोंवतीं उंच वाढणारे तट. या तटांच्यामुळें वाईट अशी जुनी परंपरा सुद्धां, ती प्राचीन आहे एवढ्या कारणासाठीं, आपल्याला बाहेर टाकणें अशक्य होतें आणि नवीन विचार, तो नवीन आहे एवढ्याच कारणामुळें आंत घेण्याला प्रतिबंध होतो!

परंतु हजार वर्षांहून अधिक काळपर्यंत भारतीय आर्यांची परंपरा केवळ धार्मिक क्षेत्रांतच नव्हे, तर कला व राज्यव्यवस्था याच्या क्षेत्रांतही कायम राखून दक्षिण हिंदुस्थाननें फार महत्त्वाची व उपयुक्त कामगिरी केली हें खास. प्राचीन हिंदी कलेचे नमुने पाहायला हवे असले, तर आज आपल्याला दक्षिण हिंदुस्थानकडेच जावें लागतें आणि राज्यव्यवस्थेच्या बाबतींत तर खुद्द ग्रीक वकील मेगॅस्थिनीसनेंच लिहिलेला पुरावा आढळतो, कीं दक्षिणेकडील राजावर लोक-सभांचें नेहमीं नियंत्रण असे.

मगध राज्याचा ऱ्हास होऊं लागला तसतसे केवळ विद्वान् लोक नव्हे, तर कलावंत, बांधकाम करणारे, स्थापत्यशास्त्रज्ञ, शिल्पी, कारागीर आणि छोटे छोटे उद्योगधंदे करणारे लोक हे सुद्धां दक्षिणेकडे गेले. दक्षिण हिंदुस्थान व यूरप यांच्यामध्यें या काळीं फार मोठा व्यापार भरभराटीस आला होता. इकडून मोतीं, हस्तिदंत, सोनें, तांदूळ, मिरीं, मोर, आणि माकडेंसुद्धां बॅबिलॉन, ईजिप्त, ग्रीक यांमध्यें आणि पुढें पुढें रोममध्यें सुद्धां पाठविण्यांत येत असत. मलबारांतील सागवानी लांकूड तर याही पूर्वीपासून खाल्डिया व बॅबिलोनिया यांमध्यें पाठविलें जात असे. हा सर्व व्यापारी माल, निदान त्यापैकीं फार मोठा भाग, हिंदी जहाजांमधून वाहिला जात असे आणि या जहाजांवरील सर्व दर्यावर्दी द्रविड लोक असत. तेव्हां प्राचीन काळच्या जगांत दक्षिण हिंदुस्थानची केवढी पुढारलेली अवस्था होती, हें यावरून तुला दिसेल. दक्षिणेकडे रोमन नाणीं पुष्कळच प्रमाणांत सांपडलीं आहेत. तसेंच मलबारच्या किनाऱ्यावर अलेक्झाड्रियांतील लोकांची वसाहत होती, तर अलेक्झांड्रियामध्यें हिंदी वसाहती होत्या हें वर मीं तुला सांगितलेंच आहे.

अशोकाच्या मृत्यूनंतर लौकरच दक्षिणेंतील आंध्रांचें राज्य स्वतंत्र झालें. सध्यांही आंध्र हा मद्रासच्या उत्तरेकडे हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरचा काँग्रेसचा एक स्वतंत्र प्रांत आहे हें तुला ठाऊकच आहे. आंध्र देशाची भाषा तेलगू आहे. अशोकानंतर आंध्रांची सत्ता फारच वेगानें वाढली आणि अखेरीस तिनें बंगालच्या उपसागरापासून आरंबी समुद्रापर्यंतचा दक्षिण हिंदुस्थानचा सर्व भाग व्यापला.

दक्षिण हिंदुस्थानांतून बाहेरच्या देशांमध्यें वसाहती करण्यासाठीं मोठमोठ्या मोहिमा काढण्यांत आलेल्या आहेत. परंतु त्यांबद्दल आपण पुढें बोलूं.

हिंदुस्थानावर स्वारी करून आलेले व येथेंच उत्तरेकडे स्थायिक झालेले शक, सीथियन आणि इतर लोक याचा मीं उल्लेख केला आहे. पुढें ते हिंदुस्थानांतच पूर्ण मिसळून गेले. आणि म्हणून आम्ही उत्तर हिंदुस्थानचे लोक जितक्या अर्थानें आर्यांचे वंशज आहों, तितक्याच अर्थानें या लोकांचेही वंशज आहोंत. विशेषतः, शूर आणि उमद्या बांध्याचे रजपूत लोक आणि काठेवाडांतील रहिवासी हे तर मुख्यतः त्यांचेच वंशज आहेत.

३०

सरहद्दीवरील कुशानांचें साम्राज्य

११ एप्रिल, १९३२

शक आणि तुर्क लोकांनीं हिंदुस्थानवर वारंवार हल्ले केले, हें मीं तुला गेल्या पत्रांत सांगितलें. तसेंच दक्षिणेमध्यें आंध्रांचें प्रबल राज्य उदयास येऊन त्याचा विस्तार इकडे बंगालच्या उपसागरापासून तिकडे आरबी समुद्रापर्यंत कसा पसरला, हेंही त्याच पत्रांत मीं तुला सांगितलें. या शकांना कुशानांनीं पुढें हिंदुस्थानकडे लोटलें. नंतर कांहीं काळानें तेही स्वतः या रंगभूमीवर येऊन दाखल झाले. त्यांनीं ख्रिस्तापूर्वी पहिल्या शतकांत हिंदुस्थानच्या सरहद्दीवर आपलें राज्य स्थापिलें आणि या राज्याचें पुढें एक मोठें साम्राज्य बनलें. कुशानांच्या या साम्राज्याचा विस्तार दक्षिणेस बनारस व विंध्य पर्वत, उत्तरेस काशगर, यारकंद आणि खूतानपर्यंत आणि पश्चिमेस इराण व पार्शिया यांच्या सरहद्दीपर्यंत वाढला होता. अशा रीतीनें उत्तर हिंदुस्थानचा संयुक्त प्रांत, पंजाब व काश्मीर हा सारा भाग आणि मध्य आशियापैकीं बराचसा भाग कुशान राजांच्या अमलाखालीं होता. इकडे दक्षिणेंत आंध्रांचें साम्राज्य ज्या काळीं भरभराटीला आलें होतें, त्याच काळांत हें कुशानांचें साम्राज्य सुमारें २०० वर्षें टिकून राहिलें. कुशानांची राजधानी प्रथम काबूल हीच होतीसें दिसतें. परंतु पुढें ती बदलून पेशावर येथें आणण्यांत आली. या शहराचें नांव त्या वेळीं पुरुषपुर असें होतें व येथेंच त्यांची राजधानी पुढें अखेरपर्यंत राहिली.

या कुशानांच्या साम्राज्याचा इतिहास पुष्कळ दृष्टींनीं लक्षांत घेण्यासारखा आहे. हें बुद्धधर्मीय साम्राज्य होतें. त्यापैकीं विख्यात राज्यकर्ता सम्राट् कनिष्क याची या धर्मावर विशेष निष्ठा होती. पेशावरांतील राजधानीपासून जवळच तक्षशिला नगरी वसलेली होती; आणि येथें फार प्राचीन काळापासून बुद्ध संस्कृतीचें मोठें केंद्रच होतें. हे कुशान लोक मंगोलियन किंवा त्यांचेच भाईबंद होते, हें मागें मला वाटतें मीं तुला सांगितलेंच आहे. त्यामुळें स्वाभाविकच या कुशानांच्या राजधानीपासून त्यांच्या मूळ मंगोलियन भूमीपर्यंत ये-जा चालू असली पाहिजे; आणि त्यांतून बुद्ध-संस्कृति व बुद्ध-विद्या चीन आणि मंगोलियापर्यंत जाऊन पोंचल्या असल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें यामुळें पाश्चिम आशियांतील प्रदेशांचाही बुद्धांच्या विचारपरंपरेशीं अत्यंत निकट संबंध आला असला पाहिजे. तेथें जी मूळची ग्रीकांची व आशियांतील स्थानिक संस्कृति होती, तिचें भारतीय बुद्ध-संस्कृतीशीं अशा रीतीनें या काळीं मिश्रण झालें.

अशा रीतीनें चीन आणि पाश्चिम आशिया यांच्यावर हिंदुस्थानचा परिणाम घडून आला. परंतु तसाच हिंदुस्थानवरही त्यांचा परिणाम झाला. कुशानांचें साम्राज्य हें एखाद्या राक्षसाप्रमाणें – पश्चिमेच्या बाजूला ग्रीक व रोमन लोकांचें साम्राज्य, पूर्वेच्या



बाजूला ग्रीस व चीन साम्राज्य आणि दक्षिणेच्या बाजूला दक्षिण हिंदुस्थानचा प्रांत यांमध्यें असलेल्या साऱ्या आशियाच्या प्रदेशावर जेठा मारून पसरलें होतें. एका बाजूनें अर्धवट हिंदी आणि अर्धवट रोमन, तर दुसऱ्या बाजूनें अर्धवट हिंदी व अर्धवट चिनी असें या महाराक्षसाचें रूप होतें. अथवा एका बाजूनें हिंदुस्थान आणि रोम व दुसऱ्या बाजूनें हिंदुस्थान आणि चीन या दोहोंच्यामधली एक प्रकारची ही धर्मशाळा किंवा टप्प्याची जागा होती म्हटलें तरी चालेल.

अशा रीतीनें मध्यवर्ती स्थान प्राप्त झालेलें असल्यामुळें हिंदुस्थान आणि रोम यांचे अत्यंत निकट संबंध येण्याला त्या राज्याचा उपयोग झालेला असला पाहिजे, हें तुझ्याही लक्षांत येईल. ज्यूलिअस सीझर हयात होता तो रोमन प्रजासत्ताक राज्याचा शेवटचा काळ आणि त्यानंतरचा रोमन साम्राज्याचा २०० वर्षांचा काळ हाच या कुशान साम्राज्याचाही काळ होय. कुशानांच्या महान् सम्राटांचा वकील ऑगस्टस सीझरच्या दरबारीं होता असें म्हणतात. दोन्ही देशांत खुष्कीच्या मार्गानें आणि जलमार्गानें व्यापार भरभराटीस आला होता. हिंदुस्थानांतून रोमकडे जाणाऱ्या पदार्थांत अत्तरें, मसाल्याचे जिन्नस, रेशमाचे कपडे व कापड, जरतारी माल, किनखाब, मलमल, जरींचें

कापड आणि हिरेमाणकादि जवाहिरं हे पदार्थ असत. प्लिनी नांवाच्या रोमन ग्रंथकारानें तर रोममधून हिंदुस्थानकडे सोनें नुसतें धुऊन नेलें जात आहे, अशी खास तक्रार केलेली आहे. हिंदुस्थानच्या या चैनीच्या पदार्थांच्या पायीं रोमचे सालीना दहा कोटी सेस्टर्स खर्ची पडतात असें त्यानें म्हटलें आहे. 'यांची किंमत सुमारें दीड कोटी रुपये किंवा दहा लाख पौंड होईल.

या काळांत बुद्ध-भिक्षूंच्या मठांत आणि बौद्ध संघाच्या सभांमध्यें मोठे वाद-विवाद आणि चर्चा चालत असत. दक्षिणेकडून आणि पश्चिमेकडून नवे नवे विचार किंवा जुनेच विचार पण नव्या पोशाखांत येऊं लागले होते आणि त्यांच्यामुळें बुद्धांच्या साध्यासुध्या विचारपरंपरेंत हळूहळू बदल होऊं लागला होता. असा बदल होतां होतां शेवटीं बुद्धधर्मीयांचे दोन वेगवेगळे पंथ पडले. एक महायान (म्हणजे मोठें वाहन) आणि दुसरा हीनयान (म्हणजे छोटें वाहन). या नवनव्या कल्पना किंवा जुन्या कल्पनांवर बसविलेले नवनवे अर्थ यांमुळें धर्म आणि जीवन यांबद्दलची दृष्टीच हळूहळू बदलत गेली आणि या कल्पनांचें कला आणि शिल्प यांमध्यें व्यक्त होणारें स्वरूपही असेंच पालटत गेलें. हे बदल कसकसे होत गेले, हें सांगणें तितकें सोपें नाहीं. बुद्धांच्या विचारपरंपरेला धक्का देऊन तिला दुसऱ्या एका दिशेला वळविण्याचें कार्य मुख्यतः दोन संस्कृतींच्या परिणामामुळें – दाबामुळें – घडलें असलें पाहिजे. एक ब्राह्मण-संस्कृति व दुसरी हेलनिक म्हणजेच ग्रीक-संस्कृति. या दोन्ही भिन्न संस्कृतींचा परिणाम मात्र एकच झाला.

मी तुला वेळोवेळीं सांगत आलों आहें, कीं बुद्धधर्म हें जातिभेद, भिक्षुकशाही आणि कर्मकांड यांच्या विरुद्ध केलेलें एक बंड होतें. गौतम बुद्धाला मूर्तिपूजा मान्य नव्हती. आपल्याला लोकांनीं देव मानावें आणि आपली पूजाअर्चा करावी असें त्याचें केव्हांच म्हणणें नव्हतें. तो आपल्याला फक्त बुद्ध – म्हणजे ज्याला ज्ञान झालेलें आहे असा – एवढेंच म्हणत असे.

अशी त्याच्या विचाराची मांडणी असल्यामुळें तिला अनुसरून बुद्धाच्या प्रतिमा तयार केल्या नव्हत्या; एवढेंच नव्हे, तर त्या काळच्या शिल्पकार्यांत सर्वच प्रकारच्या मूर्ती किंवा प्रतिमा टाळण्यांत येत असत. परंतु ब्राह्मणधर्मीयांच्या मनांतून हिंदु धर्म व बुद्धधर्म यांच्यामधील अंतर नाहींसें करावयाचें होतें; म्हणून बुद्धाच्या विचार-परंपरेंत आपल्या कल्पना व आपल्या धर्माचीं प्रतीकें घुसविण्याचा ते नित्य प्रयत्न करीत असत. बरें, ग्रीक आणि रोमन या जगांतील कारागीर घेतले, तरी त्यांनाही देवांच्या प्रतिमा करण्याची संवय होतीच. त्यामुळें हळूहळू बुद्धधर्मीय मंदिरांत मूर्ती – प्रतिमा – यांचा शिरकाव झाला. प्रथम प्रथम या मूर्ती बुद्धाच्या नव्हत्या, तर बोधिसत्त्वांच्या होत्या; बुद्धधर्माच्या परंपरेप्रमाणें हे बोधिसत्त्व म्हणजे बुद्धाचेच पूर्वीचे अवतार होत. परंतु ही पद्धत वाढतां वाढतां खुद्द बुद्धापर्यंत येऊन थडकली आणि त्याच्याही प्रतिमा करण्यांत येऊं लागल्या व त्यांचें पूजनही होऊं लागलें !

हे बदल महायान पंथाला मान्य होते. महायान पंथ ब्राह्मण-विचारपद्धतीला अधिक जवळ होता. कुशान सम्राटांनीं हा महायान पंथ स्वीकारला आणि त्याचा प्रसार करण्याचें कार्य केलें; परंतु याचा अर्थ ते हीनयान पंथाचा किंवा इतर धर्मांचा-सुद्धां द्वेष करीत असत, असें मात्र मुळींच नव्हे. कनिष्कानें तर झरथुष्ट्राच्या धर्मालाही प्रोत्साहन दिल्याचें सांगतात.

महायान पंथ आणि हीनयान पंथ यांच्यांत श्रेष्ठ कोणता आणि कनिष्ठ कोणता यांबद्दलचे जे मोठमोठे वादविवाद विद्वानांच्यामध्यें होत, ते मोठे वाचण्यासारखे आहेत. या कामासाठीं बौद्ध संघाच्या प्रचंड सभा होत असत. कनिष्कानें काश्मीरमध्यें सर्व संघांचें मिळून एक असें संमेलन भरविलें होतें. या प्रश्नाबद्दलच्या चर्चा व वाद कितीएक शतकें होत राहिले. त्यांत महायानांचें वर्चस्व उत्तर हिंदुस्थानांत वाढलें आणि हीनयानांचें दक्षिण हिंदुस्थानांत वाढलें; परंतु अखेरीस हिंदु धर्मानें दोघांनाही आपल्यांत पचवून टाकलें. आज बुद्धधर्माचा महायान पंथ चीन, जपान व तिबेट यांमध्यें प्रचलित आहे आणि हीनयान पंथ सिलोन आणि ब्रह्मदेश यांमध्यें आहे.

कला हें कोणत्याही समाजाच्या मनाचें खरेंखुरें प्रतिबिंब आहे; त्यामुळें बुद्धधर्माचा पहिला साधेपणा जाऊन त्याच्या जागीं जसजसा विविध प्रकारचा कृत्रिम सायासांनीं साधलेला प्रतीकवाद आला, तसतशी हिंदी कलाही अधिकाधिक संमिश्र, गुंतागुंतीची आणि अलंकारपूर्ण होऊं लागली. विशेषतः, वायव्येकडील गांधार प्रदेशांतील महायान पंथीयांच्या शिल्पकलेंत तर अलंकार आणि मूर्तींचा सफाईदार कोरीवपणा यांचा फार मोठा भर उसळला. प्रत्यक्ष हीनयान पंथीयांच्या शिल्पकलेलासुद्धां या नव्या प्रवृत्तीपासून स्वतःला सर्वस्वीं अलिप्त ठेवतां आलें नाहीं; हळूहळू त्यांच्यामधील मूळच्या पद्धतींतील साधेपणा आणि संयम यांचा लोप झाला आणि तेही भरदार नक्षीकाम आणि प्रतिमानिर्मिति करूं लागले.

या काळच्या शिल्पाचे नमुने आजही आपल्याला उपलब्ध आहेत. अजंठ्याच्या लेण्यांमधील कांहीं कांहीं सुंदर भिंतींवरील चित्रांचे नमुने हे त्यांत सर्वांत जास्त लक्षांत घेण्यासारखे मनोवेधक आहेत.

आतां आपण या कुशानांची रजा घेऊं या. पण एक गोष्ट लक्षांत ठेव : कुशान लोक हे शकांप्रमाणें किंवा इतर तुर्की लोकांप्रमाणें परकी म्हणून हिंदुस्थानांत आले नाहींत किंवा हिंदुस्थानांत परकीयांनीं जेते म्हणून जेत्यांवर राज्य करावें तसें राज्यही त्यांनीं केलें नाहीं. त्यांच्यामध्यें आणि हिंदुस्थानच्या लोकांमध्यें समान धर्मांचें बंधन तर होतेंच; परंतु त्याशिवाय त्यांनीं हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचे सिद्धांतही स्वीकारले होते. अशा प्रकारें आर्यांच्या जीवनपद्धतीशीं ते पुष्कळ अंशांनीं समरस झाल्यामुळेंच उत्तर हिंदुस्थानांत जवळजवळ ३०० वर्षेंपर्यंत त्यांना राज्य करतां आलें.

३१

ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म

१२ एप्रिल, १९३२

हिंदुस्थानांतील वायव्य भागातील कुशानांचें साम्राज्य आणि चीनमधील हान घराणें यांच्या विचारामध्यें आपण इतिहासांतील एका फार मोठ्या युगप्रवर्तक घडामोडी-पासून बरेच पुढें आलों आहों. म्हणून आतां आपल्याला थोडें मागें गेलें पाहिजे. आतांपर्यंत सर्व काळ आपण ख्रिस्तापूर्वीचें अमुक शतक अशा रीतीनें सांगत होतों. आतां यापुढें ख्रिस्तानंतरच्या काळांत आपण प्रवेश करीत आहों. ही कालगणना ख्रिस्तापासून म्हणजे त्याच्या जन्माची जी तारीख मानतात तेथपासून सुरू झालेली आहे, हें तिच्या नांवावरूनच दिसून येतें. खरें पाहिलें असतां या तारखेच्या पूर्वी चार वर्षें ख्रिस्ताचा जन्म झाला असावा. पण त्यानें कांहीं असा म्हणण्यासारखा फरक होत नाहीं. ख्रिस्तानंतरच्या काळाची गणना करतांना वर्षांच्या आंकड्यापाठीमागें ए. डी. म्हणजे ॲनो डॉमिनी या शब्दांचीं आद्याक्षरें जोडण्याचा प्रघात आहे. त्याचा अर्थ प्रभूच्या शकाचें वर्ष असा आहे. हा सगळीकडे पसरलेला प्रघात स्वीकारण्याला कांहींच हरकत नाहीं. पण त्याऐवजीं ए. सी. अशीं अक्षरें वापरणें मला अधिक शास्त्रीय वाटतें. कारण ख्रिस्तपूर्वकाळ दर्शविण्यासाठीं जशीं आपण बी. सी. म्हणजे Before Christ या शब्दांचीं वाचक अक्षरें वापरतों, तशींच ख्रिस्तानंतर म्हणजे ए. सी. After Christ अशीं अक्षरें वापरणें अधिक युक्त आहे. म्हणून मी तसें करणार आहें.

ख्रिस्ताचा, अथवा जीझसचा (कारण तेंच त्याचें खरें नांव आहे) वृत्तांत बायबलच्या नव्या करारांत दिला आहे. तुला तो थोडाफार ठाऊक आहे. त्यामध्यें गॉस्पेल्स या प्रकरणामध्यें जी हकीगत दिली आहे, तिच्यांत त्याच्या लहानपणची हकीगत फारशी नाहींच. नॅझरेथ येथें त्याचा जन्म झाला; गॉलिलीमध्यें तो धर्मप्रवचनें करूं लागला; आणि तीस वर्षांचा होऊन गेल्यानंतर तो जेरुसलेममध्यें आला. लौकरच त्याच्यावर खटला करण्यांत आला आणि रोमन गव्हर्नर पॉंटिअस पायलेट यानें त्याला शिक्षा केली. धर्मप्रवचनें सुरू करण्यापूर्वीं जीझस काय करीत असे व तो कोठें कोठें गेला होता याबद्दल कांहीं नीटशी कल्पना येत नाहीं. सर्व मध्य आशियाभर, काश्मीरमध्यें, लडाखमध्यें, तिबेटमध्यें आणि त्याहूनही पलीकडे उत्तरेकडे दूरवरच्या देशांत अद्यापिही अशी श्रद्धा आहे, कीं जीझस म्हणजेच ईसा हा आपल्या देशांत येऊन गेलेला होता. कित्येकांची श्रद्धा तो हिंदुस्थानांत येऊन गेला होता अशीही आहे. निश्चित असें या बाबतींत कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं; आणि एवढें खरें, कीं ख्रिस्ताच्या जीवनाचा ज्यांनीं अभ्यास केला आहे, अशा बहुतेक अधिकारी व्यक्तींचें मत जीझस हिंदुस्थानांत किंवा मध्य आशियांत आलेला नव्हता असेंच आहे. पण तो

इकडे आलेला असणें यामध्यें इतकें असंभवनीय असें कांहींच नाहीं. त्या काळीं हिंदुस्थानच्या मोठमोठ्या विश्वविद्यालयांमध्यें, विशेषतः तक्षशिलेमध्यें, दूरदूर देशचे जिज्ञासु विद्यार्थी मुद्दाम येत असत; त्याप्रमाणें जीझसही विद्यार्जनाच्या लालसेनें इकडे आला असणें पुष्कळ संभर्वनीय आहे. जीझसचा धर्मोपदेश हा पुष्कळच बाबतींत गौतम बुद्धाच्या धर्मोपदेशाशीं इतका जुळतो आहे, कीं त्याला बुद्धधर्माची चांगली माहिती असलीच पाहिजे असें दिसतें. अर्थात् बुद्धधर्माचें ज्ञान इतरही देशांत पसरलेलें होतें; आणि हिंदुस्थानांत न येतांही जीझसला त्याची माहिती मिळाली असणें शक्य आहे.

शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीला माहीत आहे, कीं धर्मापासून तंटे आणि तीव्र झगडे जगामध्यें निर्माण झालेले आहेत. तथापि, जागतिक धर्म निर्माण कसे झाले आणि त्यांच्यांत सारखेपणा आणि भिन्नपणा कोणता कोणता आहे, हें पाहणें चांगलें मनोरंजक आहे. सर्व धर्मांच्या दृष्टिकोणामध्यें आणि शिकवणीमध्यें किती तरी साम्य आहे. त्यामुळें बारीक तपशिलाच्या आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींबद्दल लोक इतके मूर्खासारखे तंटे करतात हें पाहून मोठेंच चमत्कारिक वाटतें मनुष्याला. पण होतें काय, कीं धर्मप्रस्थापनेच्या वेळची पहिली जी शिकवण असते, तिच्यामध्यें पुढें पुढें भर पडत जाते; तिची पुष्कळ ओढाताणही होते; आणि अखेरीस मूळ शिकवणीचा मागमूसही लागेनासा होतो; आणि धर्मसंस्थापकाच्या स्थानावर कोणी तरी संकुचित बुद्धीचा आणि परमतासहिष्णु धर्मवेडा आलेला असतो. पुष्कळांना धर्माचा उपयोग राजकारण व साम्राज्यशाही यांच्या दासीसारखा झालेला आढळून येतो. प्राचीन रोमन लोकांचें धोरणच मुळीं यांच्या म्हणण्याप्रमाणें जनतेच्या हितासाठीं–परंतु खरें म्हटलें असतां जनतेला लुटण्यासाठीं–धर्मश्रद्धा मुद्दाम निर्माण करावी असें होतें. कारण लोकांत धर्मश्रद्धा असली म्हणजे त्याना दडपून ठेवणें अधिक सोपें जातें. रोममधील वरिष्ठ वर्गीयांची स्वतःपुरती तत्त्वज्ञानाच्या चर्चेंत शिरावयास हरकत नव्हती; परंतु त्यांच्या स्वतःच्या बाबतींत जी गोष्ट हिताची अशी त्यांना वाटत होती, ती जनतेच्या हिताची आहे असें त्यांस वाटत नव्हतें! पुढच्या काळांत इटलींमध्यें मॅकिआव्हेली नांवाचा प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. त्यानें राजकारणावर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, "राज्याला धर्माची जरूर आहे आणि स्वतः राज्यकर्त्याला धर्म जरी खोटा वाटला, तरी त्याला पाठिंबा देणें हें राज्यकर्त्याचें कर्तव्य आहे." अगदीं अलीकडच्या काळांतसुद्धां धर्माच्या पांघरुणाखालीं साम्राज्यशाहीचा प्रसार झाल्याचीं असंख्य उदाहरणें सांपडतात. तेव्हां धर्म म्हणजे जनतेला घातलेली अफू आहे, असें जें मार्क्स् म्हणतो यांत कांहींच आश्चर्यकारक नाहीं.

जीझस हा ज्यू होता. हे लोक पूर्वीपासून अगदीं आजपर्यंत मोठे विशेष उद्योगी प्रवृत्तीचे आणि अतिशय चिवट आहेत; मोठे जीव धरून राहणारे लोक आहेत. डेविड आणि सालोमन यांच्या अमदानींत कांहीं थोडा काळ त्यांना वैभवाचा गेला.

परंतु पुढें त्याना वाईट दिवस आले. त्यांचें पूर्वीच्या काळचें वैभवसुद्धां वास्तविक तितकेंसें मोठें होतें असें नव्हे. परंतु त्यांच्या कल्पनासृष्टींत त्याचें फारच भव्य स्वरूप करून दाखविण्यांत आलेलें आहे. प्राचीन काळचें तें आपलें सुवर्णयुगच होय अशी त्यांची समजूत आहे. नेमल्या वेळीं असें तें सुवर्णयुग पृथ्वीवर पुन्हां अवतरेल आणि ज्यू लोक पुन्हां श्रेष्ठत्वाला चढतील व सामर्थ्यवान् होतील असें ते मानतात. आपल्या पडत्या काळांत साऱ्या रोमन साम्राज्यभर ते इकडे तिकडे पसरले गेले. पण तरी सुद्धां आपले ऐश्वर्याचे दिवस पुन्हां येणार आहेत व तो काळ आपला प्रभु (Messiah) पुन्हां प्रवर्तित करणार आहे, या श्रद्धेच्या जोरावर ते टिकून राहिले आहेत. या ज्यूंना घर नाहीं, दार नाहीं, स्वतःचा म्हणायला प्रदेश नाहीं, अशा स्थितींत दिवस काढावे लागले; त्यांना कल्पनातीत त्रास व छळ सहन करावा लागला, कित्येकदां त्यांचे खून झाले; तरीही दोन हजारांहूनही अधिक वर्षेंपर्यंत त्यांनीं आपलें वैशिष्ट्य व निराळेपणा कायम ठेविला आहे आणि एकत्वाची भावना सांभाळून ते जिवंत राहिले आहेत, हें जगांतलें एक मोठें आश्चर्यच आहे.

आपला प्रभु पुन्हा येणार आहे अशी ज्यूंची श्रद्धा होती. त्यामुळें जीझसबद्दल त्यांना मोठी आशा वाटत होती. परंतु लौकरच त्यांची निराशा झाली. आपल्या काळची लोकस्थिति व सामाजिक व्यवहार यांविरुद्ध बंडाची कांहीं चमत्कारिक भाषा जीझस बोलूं लागला. त्याचा विरोध विशेषेंकरून श्रीमंतांना आणि ज्या लोकानीं धर्माला फक्त कांहीं उत्सव आणि संस्कार यांमध्यें म्हणजेच निव्वळ कर्मकांडांत बुडवून टाकलें होतें अशा भोंदू लोकांना होता. लोकांना तो तुम्हांला संपत्ति आणि वैभव मी प्राप्त करून देतों असें मुळींच सांगेना ; तर उलट, तुमच्याजवळ जें कांहीं आहे त्याचाच त्याग करा असें तो त्यांना सांगूं लागला. आणि हें करून मोबदल्यांत मिळणार काय, तर स्वर्गाचें राज्य यासारखी गूढ आणि अस्पष्ट, संशयित वस्तु! त्याच्या भाषणांत पुष्कळ दंतकथा आणि दृष्टांत असत ; तथापि हें निःसंशय, कीं तो जात्याच क्रांतिकारक होता; तत्कालीन परिस्थिति त्याला बिलकुल सहन होत नव्हती आणि ती बदलून टाकण्याचा त्यानें चंग बांधला होता. परंतु ज्यू लोकांना तर हें नको होतें ; त्यामुळें पुष्कळसे ज्यू त्याच्या विरुद्ध झाले आणि त्यांनीं त्याला रोमन अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलें.

धर्माच्या बाबतींत पाहिलें तर रोमन लोकांची वृत्ति असहिष्णु नव्हती, म्हणून रोमन साम्राज्यांत सर्व धर्मांना नांदूं दिलें जात होतें आणि कुणीं जरी कुठल्या एखाद्या देवाची निंदा केली किंवा अपमान केला, तरी त्याला कांहीं शिक्षा होत नसे. त्यांचा एक बादशहा टायबेरियन हा तर म्हणे, " देवांचा जर अपमान होत असेल, तर त्याबद्दल काय करावयाचें तें त्यांचें त्यांनीं पाहावें. " यामुळें ज्याच्यापुढें जीझसला खटल्यासाठीं उभें केलें त्या पॉंटिअस पायलेट या रोमन गव्हर्नराला त्याच्यावरच्या धार्मिक आरोपाच्या प्रकरणाची मोठीशी कांहीं फिकीर वाटली नसती. परंतु जीझसला ज्यू लोक

इकडे आलेला असणें यामध्यें इतकें असंभवनीय असें कांहींच नाहीं. त्या काळीं हिंदुस्थानच्या मोठमोठ्या विश्वविद्यालयांमध्यें, विशेषतः तक्षशिलेमध्यें, दूरदूर देशचे जिज्ञासु विद्यार्थी मुद्दाम येत असत; त्याप्रमाणें जीझसही विद्यार्जनाच्या लालसेनें इकडे आला असणें पुष्कळ संभवनीय आहे. जीझसचा धर्मोपदेश हा पुष्कळच बाबतींत गौतम बुद्धाच्या धर्मोपदेशाशीं इतका जुळता आहे, कीं त्याला बुद्धधर्माची चांगली माहिती असलीच पाहिजे असें दिसतें. अर्थात् बुद्धधर्माचें ज्ञान इतरही देशांत पसरलेलें होतें; आणि हिंदुस्थानांत न येतांही जीझसला त्याची माहिती मिळाली असणें शक्य आहे.

शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीला माहीत आहे, कीं धर्मापासून तंटे आणि तीव्र झगडे जगामध्यें निर्माण झालेले आहेत. तथापि, जागतिक धर्म निर्माण कसे झाले आणि त्यांच्यांत सारखेपणा आणि भिन्नपणा कोणता कोणता आहे, हें पाहणें चांगलें मनोरंजक आहे. सर्व धर्मांच्या दृष्टिकोणामध्यें आणि शिकवणीमध्यें किती तरी साम्य आहे. त्यामुळें बारीक तपशिलाच्या आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींबद्दल लोक इतके मूर्खासारखे तंटे करतात हें पाहून मोठेंच चमत्कारिक वाटतें मनुष्याला. पण होतें काय, कीं धर्मप्रस्थापनेच्या वेळची पहिली जी शिकवण असते, तिच्यामध्यें पुढें पुढें भर पडत जाते; तिची पुष्कळ ओढाताणही होते; आणि अखेरीस मूळ शिकवणीचा मागमूसही लागेनासा होतो; आणि धर्मसंस्थापकाच्या स्थानावर कोणी तरी संकुचित बुद्धीचा आणि परमतासहिष्णु धर्मवेडा आलेला असतो. पुष्कळांना धर्माचा उपयोग राजकारण व साम्राज्यशाही यांच्या दासीसारखा झालेला आढळून येतो. प्राचीन रोमन लोकांचें धोरणच मुळीं यांच्या म्हणण्याप्रमाणें जनतेच्या हितासाठीं–परंतु खरें म्हटलें असतां जनतेला लुटण्यासाठीं–धर्मश्रद्धा मुद्दाम निर्माण करावी असें होतें. कारण लोकांत धर्मश्रद्धा असली म्हणजे त्यांना दडपून ठेवणें अधिक सोपें जातें. रोममधील वरिष्ठ वर्गीयांची स्वतःपुरती तत्त्वज्ञानाच्या चर्चेंत शिरावयास हरकत नव्हती; परंतु त्यांच्या स्वतःच्या बाबतींत जी गोष्ट हिताची अशी त्यांना वाटत होती, ती जनतेच्या हिताची आहे असें त्यांस वाटत नव्हतें! पुढच्या काळांत इटलीमध्यें मॅकिआव्हेली नांवाचा प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. त्यानें राजकारणावर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, "राज्याला धर्माची जरूर आहे आणि स्वतः राज्यकर्त्याला धर्म जरी खोटा वाटला, तरी त्याला पाठिंबा देणें हें राज्यकर्त्याचें कर्तव्य आहे." अगदीं अलीकडच्या काळांतसुद्धां धर्माच्या पांघरुणाखालीं साम्राज्यशाहीचा प्रसार झाल्याचीं असंख्य उदाहरणें सांपडतात. तेव्हां धर्म म्हणजे जनतेला घातलेली अफू आहे, असें जें मार्क्स म्हणतो यांत कांहींच आश्चर्यकारक नाहीं.

जीझस हा ज्यू होता. हे लोक पूर्वीपासून अगदीं आजपर्यंत मोठे विशेष उद्योगी प्रवृत्तीचे आणि अतिशय चिवट आहेत; मोठे जीव धरून राहणारे लोक आहेत. डेविड आणि सालोमन यांच्या अमदानींत कांहीं थोडा काळ त्यांना वैभवाचा गेला.

परंतु पुढें त्याना वाईट दिवस आले. त्यांचें पूर्वीच्या काळचें वैभवसुद्धां वास्तविक तितकेंसें मोठें होतें असें नव्हे. परंतु त्यांच्या कल्पनासृष्टींत त्याचें फारच भव्य स्वरूप करून दाखविण्यांत आलेलें आहे. प्राचीन काळचें तें आपलें सुवर्णयुगच होय अशी त्यांची समजूत आहे. नेमल्या वेळीं असें तें सुवर्णयुग पृथ्वीवर पुन्हां अवतरेल आणि ज्यू लोक पुन्हां श्रेष्ठत्वाला चढतील व सामर्थ्यवान् होतील असें ते मानतात. आपल्या पडत्या काळांत साऱ्या रोमन साम्राज्यभर ते इकडे तिकडे पसरले गेले. पण तरी सुद्धां आपले ऐश्वर्याचे दिवस पुन्हां येणार आहेत व तो काळ आपला प्रभु (Messiah) पुन्हां प्रवर्तित करणार आहे, या श्रद्धेच्या जोरावर ते टिकून राहिले आहेत. या ज्यूंना घर नाहीं, दार नाहीं, स्वतःचा म्हणायला प्रदेश नाहीं, अशा स्थितींत दिवस काढावे लागले; त्यांना कल्पनातीत त्रास व छळ सहन करावा लागला, कित्येकदां त्यांचे खून झाले; तरीही दोन हजारांहूनही अधिक वर्षेंपर्यंत त्यांनीं आपलें वैशिष्ट्य व निराळेपणा कायम ठेविला आहे आणि एकत्वाची भावना सांभाळून ते जिवंत राहिले आहेत, हें जगांतलें एक मोठें आश्चर्यच आहे.

आपला प्रभु पुन्हा येणार आहे अशी ज्यूंची श्रद्धा होती. त्यामुळें जीझसबद्दल त्यांना मोठी आशा वाटत होती. परंतु लौकरच त्यांची निराशा झाली. आपल्या काळची लोकस्थिति व सामाजिक व्यवहार यांविरुद्ध बंडाची कांहीं चमत्कारिक भाषा जीझस बोलूं लागला. त्याचा विरोध विशेषेंकरून श्रीमंतांना आणि ज्या लोकांनीं धर्माला फक्त कांहीं उत्सव आणि संस्कार यांमध्यें म्हणजेच निव्वळ कर्मकांडांत बुडवून टाकलें होतें अशा भोंदू लोकांना होता. लोकांना तो तुम्हांला संपत्ति आणि वैभव मी प्राप्त करून देतों असें मुळींच सांगेना ; तर उलट, तुमच्याजवळ जें कांहीं आहे त्याचाच त्याग करा असें तो त्यांना सांगूं लागला. आणि हें करून मोबदल्यांत मिळणार काय, तर स्वर्गाचें राज्य यासारखी गूढ आणि अस्पष्ट, संशयित वस्तु! त्याच्या भाषणांत पुष्कळ दंतकथा आणि दृष्टांत असत ; तथापि हें निःसंशय, कीं तो जात्याच क्रांतिकारक होता; तत्कालीन परिस्थिति त्याला बिलकुल सहन होत नव्हती आणि ती बदलून टाकण्याचा त्यानें चंग बांधला होता. परंतु ज्यू लोकांना तर हें नको होतें; त्यामुळें पुष्कळसे ज्यू त्याच्या विरुद्ध झाले आणि त्यांनीं त्याला रोमन अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलें.

धर्माच्या बाबतींत पाहिलें तर रोमन लोकांची वृत्ति असहिष्णु नव्हती, म्हणून रोमन साम्राज्यांत सर्व धर्मांना नांदूं दिलें जात होतें आणि कुणीं जरी कुठल्या एखाद्या देवाची निंदा केली किंवा अपमान केला, तरी त्याला कांहीं शिक्षा होत नसे. त्यांचा एक बादशहा टायबेरियन हा तर म्हणे, " देवांचा जर अपमान होत असेल, तर त्याबद्दल काय करावयाचें तें त्यांचें त्यांनीं पाहावें. " यामुळें ज्याच्यापुढें जीझसला खटल्यासाठीं उभें केलें त्या पॉंटिअस पायलेट या रोमन गव्हर्नराला त्याच्यावरच्या धार्मिक आरोपाच्या प्रकरणाची मोठीशी कांहीं फिकीर वाटली नसती. परंतु जीझसला ज्यू लोक

सामाजिक बंडखोर मानीत, तसाच राजकीय बंडखोर पण तो आहे अशींही समजूत होती. असा बंडखोर म्हणूनच त्याच्यावर खटला झाला आणि चौकशीअंतीं गोलगोथा येथें त्याला क्रूसावर चढविण्यांत आलें. त्याच्या प्राणांतिक यातनांच्या समयाला त्याच्या शिष्यानीं सुद्धां त्याला सोडलें, त्याचें गुरुत्व नाकारलें, त्याच्या पंथाचा त्याग केला; त्याचें त्याला इतकें वाईट वाटलें, कीं मरणाच्या अगोदर "देवा, परमेश्वरा, मला असा तूं सोडून कां बरें गेलास?" असा अंतःकरण पिळवटून टाकणारा उद्गार त्यानें काढला.

मृत्यूच्या वेळीं जीझस वयानें फारच लहान होता. नुकतींच त्यालां तीस वर्षें होऊन गेलेलीं होतीं. गॉस्पेल्समध्यें त्याच्या मरणाची अत्यंत करुण कथा दिलेली आहे. ती वाचतांना आपलें अंतःकरण भरून येतें. पुढच्या काळांत ख्रिस्ती धर्माचा पुष्कळच प्रसार झालेला आहे. आणि लाखों लोक जीझसच्या नांवाला फार मान देतात. परंतु त्याच्या शिकवणीप्रमाणें वागतात मात्र क्वचितच कोणी! तथापि हें विसरतां उपयोगी नाहीं, कीं त्याला क्रूसावर चढविलें या गोष्टीची पॅलेस्टाइनच्या बाहेर त्याच्या काळीं फारशी कोणाला माहिती नव्हती. रोमच्या लोकांना तर त्याच्याबद्दल कांहींच ठाऊक नव्हतें आणि प्रत्यक्ष पॉंटिअस पायलेटला सुद्धां या प्रसंगाचें विशेष असें कांहींच महत्त्व वाटलें नसेल; रोज पुढें येणाऱ्या खटल्यांपैकीं एक खटला, ह्याहून निराळी अशी त्याबद्दल त्याची कांहींच भावना झाली नसेल.

जीझसचे निकटचे अनुयायी व शिष्य यांनीं मिऊन जाऊन जीझसच्या शिकवणीचा त्याग केला; त्याचा पंथच ते मानीत नाहींसे झाले. परंतु त्याच्या मृत्यूनंतर लौकरच पॉल नांवाच्या नवीनच एका गृहस्थानें आपल्या मतानें ख्रिस्ताचें म्हणून जें कांहीं तत्त्वज्ञान होतें, त्याचा प्रचार करण्यास सुरुवात केली. यानें स्वतः जीझसला पाहिलेलेंही नव्हतें. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे, कीं पॉलनें ज्या ख्रिस्ती धर्माचा प्रचार केला तो जीझसच्या शिकवणीहून फार निराळा होता. पॉल हा मोठा समर्थ आणि विद्वान् मनुष्य होता. परंतु जीझसप्रमाणें तो सामाजिक बंडखोर नव्हता. मात्र पॉलला त्याच्या प्रयत्नांत यश प्राप्त झालें आणि ख्रिस्ती धर्माचा हळूहळू प्रसार होऊं लागला. रोमन लोकांनीं या प्रचाराला प्रथम फारसें महत्त्व दिलें नाहीं. त्यांना वाटे, कीं हे ख्रिस्ती लोक म्हणजे ज्यूमधलाच पोटपंथ आहेत; परंतु ख्रिस्ती लोकांनीं लौकरच चढाईचें धोरण सुरू केलें. इतर सर्वच धर्मांशीं त्यांचें शत्रुत्व होतें. आणि सम्राटाच्या प्रतिमेचें पूजन करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. रोमन लोकांना या मनःप्रवृत्तीचा अर्थच समजेना. त्यांना ही अगदींच संकुचित प्रवृत्ति वाटे. म्हणून हे ख्रिस्ती लोक म्हणजे केवळ माथेफिरू असून असंस्कृत, तंटेबाज आणि मानवी प्रगतीचे विरोधकही ते आहेत असें त्यांना भासूं लागलें. निव्वळ एक धर्म म्हणून ख्रिस्ती धर्माला त्यांनीं मुळींच विरोध केला नसता. परंतु ख्रिस्ती लोक रोमन बादशहाच्या प्रतिमेला मान देण्याचें नाकारीत हा त्यांना राजकीय द्रोह वाटे व या अपराधाला

त्यांनीं देहान्ताची शिक्षा ठरविली. तसेंच रोमन लोकांचे शक्तीच्या कसरतीचे जे खेळ असत, त्यांच्या विरुद्धही ख्रिस्ती लोक तीव्र टीका करीत असत. अशा कारणांमुळें यापुढें ख्रिस्ती लोकांचा छळ होऊं लागला; त्यांच्या मिळकती जप्त होऊं लागल्या आणि त्यांना सिंहाच्या तोंडाबर टाकण्यांत येऊं लागलें. या ख्रिस्ती हुतात्म्यांच्या कथा तूं वाचलेल्या असशील आणि त्याबद्दलचे चित्रपटही तूं पाहिले असशील. परंतु मनुष्य जेव्हां आपल्या कार्यासाठीं मरायला तयार होतो, एवढेंच नव्हे, तर त्या मरणांत तो आपणांला मोठा विजयच प्राप्त झाला असें मानूं लागतो, त्या वेळीं त्याला किंवा तो ज्या कार्याचा पाईक असतो त्या कार्याला दडपून टाकणें अशक्य होतें. अर्थात् रोमन साम्राज्यालाही ख्रिस्ती लोकांना दडपून टाकण्यांत असेंच सर्वस्वीं अपयश आलें. एवढेंच नव्हे, तर या झगड्यांत शेवटीं ख्रिस्ती धर्मच विजय पावून पुढें आला; आणि ख्रिस्तानंतर चौथ्या शतकाच्या सुरुवातीलाच एक रोमन बादशहाच स्वतः ख्रिस्ती झाला व ख्रिस्ती धर्म हा रोमन साम्राज्याचा अधिकृत धर्म झाला. हा बादशहा म्हणजे कॉन्स्टांटिनोपल शहराची प्रस्थापना करणारा कॉन्स्टन्टाइन हा होय. त्याच्याबद्दल पुढें आपल्याला आणखी पुष्कळ बोलायचें आहे.

ख्रिस्ती धर्म वाढत गेला तसे जीझसच्या देवत्वाविषयीं तीव्र वाद सुरू झालें. तुला आठवतच असेल मीं मागें सांगितलेलें, कीं स्वतः गौतम बुद्धही आपल्या ठिकाणीं देवत्व किंवा दैवी शक्ति आहे असें मानीत नसे; परंतु पुढें लोक त्याला देव मानूं लागले व अवतार म्हणून त्याचें पूजन करूं लागले. त्याचप्रमाणें जीझसही स्वतःच्या ठिकाणीं देवत्व किंवा दैवी अंश आहे असें मुळींच म्हणत नव्हता. मी देवपुत्र आहें आणि मानवयोनिज आहें, असें जरी तो वारंवार सांगत आलेला असला, तरी त्यांत आपल्या अंगीं कांहीं दैवी किंवा अतिमानुष शक्ति किंवा अंश आहे असें प्रतिपादण्याचा त्याचा हेतु होता असें दिसत नाहीं. परंतु आपल्यामधील श्रेष्ठ पुरुषांना देव बनविण्याची माणसांना मोठी खोड जडलेली आहे. त्यांना देव म्हणून प्रस्थापित करावयाचें आणि त्यांच्या शिकवणीप्रमाणें वागण्याचें मात्र टाकून द्यावयाचें, हा माणसांचा क्रम आहे. यानंतर सहाशें वर्षांनीं महंमद पैगंबरानें आणखी एक मोठा धर्म प्रवर्तित केला; परंतु आपल्या पूर्वीच्या अनेक तशा उदाहरणांनीं तो शहाणा झालेला असल्यामुळेंच बहुधा त्यानें पुनः पुनः व स्पष्टपणें सांगितलेलें आहे, कीं आपण केवळ मनुष्य आहों, दैवी नाहीं.

अशा रीतीनें ख्रिस्ताची शिकवण काय होती हें नीट समजून घेऊन ती प्रत्यक्ष आचरण्याचें सोडून देऊन ख्रिस्ताचें देवत्व आणि ख्रिस्ती धर्मांतील त्रयीची कल्पना यांबद्दल वादविवाद आणि झगडे करण्यांतच ख्रिस्ती लोकांचा काळ जाऊं लागला. आपल्यांतील निरनिराळ्या मतांना ते एकमेक पाखंडी म्हणूं लागले, एकमेकांचा छळ करूं लागले आणि एकमेकांचीं डोकीं उडवूं लागले. एका शब्दामध्यें एक जोडाक्षर कसें असावें याबद्दल एका काळीं निरनिराळ्या ख्रिस्ती धर्मपंथांत प्रचंड वाद होऊन

त्याचा अंत सशस्त्र झगड्यामध्यें झाला! एक पंथ म्हणे, कीं प्रार्थनेमध्यें वापरावयाचा तो शब्द Homo-ousion असा असावा; तर दुसऱ्याचें म्हणणें तो Homoi-ousion असा असावा. या फरकाचा संबंध जीझसच्या देवत्वाशीं होता. या जोडाक्षराच्या निंमित्तानें एक भयंकर लढाई झाली आणि किती तरी लोक प्राणाला मुकले.

ख्रिस्ती धर्म ज्या वेळीं इंग्लंडमध्यें किंवा पश्चिम यूरपमध्यें आला सुद्धा नव्हता आणि प्रत्यक्ष रोममध्यें सुद्धां तिरस्कृत आणि कायद्यानें निषिद्ध असा एक पंथ एवढेंच केवळ ज्या वेळीं त्याचें स्वरूप होतें, त्याच्या पुष्कळच पूर्वी ख्रिस्ती धर्माचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला होता हें पाहिल्यावर तुला फार नवल वाटेल. जीझसच्या मृत्यूनंतर शंभर-एक वर्षांच्या आतच ख्रिस्ती धर्मप्रचारक समुद्रमार्गानें दक्षिण हिंदुस्थानांत आले. त्यांना येथें अतिशय सभ्यपणें वागविण्यांत आलें आणि त्यांच्या नवीन धर्माचा प्रचारही त्यांना करूं देण्यांत आला. पुष्कळ लोकांना त्यांनीं आपल्या धर्मांत मिळवून घेतलें आणि या धर्मांतील लोकांचे वंशज आजच्या काळापर्यंत कधीं बऱ्या, कधीं वाईट अशा अवस्थेंत या भागांत राहत आले आहेत. आज युरोपांत जे पंथ अस्तित्वांत नाहींत अशा कांहीं प्राचीन ख्रिस्ती पंथाचेच हे बहुतेक सगळे अनुयायी आहेत. या पंथांपैकीं कांहींचें मुख्य पीठ हल्लीं आशिया मायनरमध्यें आहे.

राजकीय दृष्ट्या आजकाल ख्रिस्ती धर्म हाच अत्यंत मोठी सत्ता उपभोगणारा धर्म आहे; कारण जिकडे तिकडे प्रभुत्व गाजविणाऱ्या यूरपीय लोकांचा तो धर्म आहे. परंतु एका बाजूला अनत्याचार आणि अहिंसा यांची शिकवण देणारा आणि तत्कालीन समाजव्यवस्थेविरुद्ध बंड उभारणारा जात्याच बंडखोर असा जो जीझस, त्याचा विचार केला, आणि आज आपण त्याचे अनुयायी आहोंत म्हणून कंठशोष करून सांगणारे लोक, त्यांचा साम्राज्यवाद, त्यांचीं शस्त्रास्त्रें, त्यांचीं युद्धें आणि त्यांची द्रव्यपूजा यांच्या जोडीला त्यांचें तें चित्र ठेवून पाहिलें, म्हणजे किती चमत्कारिक वाटतें! त्याचें तें पर्वतावरील प्रवचन आणि आधुनिक यूरपांतील आणि अमेरिकेंतील ख्रिस्ती धर्म, दोहोंमध्यें कांहीं तिळमात्र तरी साम्य असावयाचें होतें; त्यांच्यामधील तें भिन्नत्व पाहून मन मूढ होऊन जातें. अशा स्थितींत पश्चिमेंतील ख्रिस्ताच्या अनुयायी म्हटल्या जाणाऱ्या लोकांपेक्षां ख्रिस्ताच्या शिकवणीला बापू हेच किती तरी अधिक जवळ आहेत असें जर पुष्कळांना वाटलें, तर त्यांत कांहींच आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं.

३२

रोमचें साम्राज्य

२३ एप्रिल, १९३२

आज पुष्कळ दिवस मीं तुला कांहीं लिहिलें नाहीं बाळ. अलाहाबादकडून आलेल्या बातम्यांमुळें माझें मन थरारून गेलें आहे आणि क्षुब्धही झालें आहे. विशेषतः तुझ्या आजीच्या—आपल्या डोल अम्माच्या—बातमीनें माझ्या मनाला फारच त्रास झाला आहे. इकडे तुरुंगांतच का होईना, पण तसें पाहिलें तर सुखासमाधानांत मीं असावें आणि तिकडे माझ्या नाजुक आणि अशक्त अशा आईला पोलिसांच्या लाठीशीं सामना द्यावा लागून त्या लाठीचा मारही खायला लागावा, यानें मला कांहींतें आंतल्या आंत गुदमरल्यासारखें झालें आहे. परंतु मन असें भडकून देऊन आपल्या कथालेखनांत खंड पडूं देणें बरें नाहीं.

तेव्हां पुन्हां आपण रोमकडे परतूं या. संस्कृत ग्रंथांत हें नांव रोमक असें दिलेलें आढळतें. रोमन प्रजासत्ताक राज्याचा अंत आणि रोमन साम्राज्याचा उदय यांसंबंधीं आपण बोलत होतों तें तुला आठवत असेल. ज्यूलियस सीझरचा दत्तक मुलगा ऑक्टेव्हियन हा या साम्राज्याचा पहिला राजा. त्यानें नांव मात्र ऑगस्टस सीझर असें धारण केलें होतें. तो आपल्याला राजा असें म्हणवीत नसे. कारण राजा ही पदवी त्याला तितकीशी मोठी वाटली नाहीं हें एक, आणि प्रजासत्ताक राज्याची बाहेरची ती सजावट शक्य तों कायम राखून काम करण्याची त्याची इच्छा होती हें दुसरें. म्हणून तो आपल्याला इंपेरेटॉर म्हणजे सेनापति असें म्हणवी. अशा रीतीनें इंपेरेटॉर ही राज्यांतील सर्वांत श्रेष्ठ पदवी समजण्यांत येऊं लागली. आणि इंग्रजीमधला एम्परर हा शब्द या मूळ शब्दापासूनच निघालेला आहे, हें कदाचित् तुला ठाऊक असेलही. अशा रीतीनें रोमन साम्राज्याच्या पहिल्या पहिल्या दिवसांत दोन शब्द अस्तित्वांत आले; आणि त्या शब्दांबद्दल जगामधील राजे लोकांना इतका लोभ वाटूं लागला, कीं बहुतेक सारे लोक ते आपल्या नावांशीं जोडण्याचा प्रयत्न करीत आले. हे शब्द म्हणजे एम्परर आणि सीझर. सीझरपासूनच पुढें कायसर व झार हे शब्द निघाले. प्रथम प्रथम अशी कल्पना होती, कीं साऱ्या जगात एका वेळीं एकच बादशहा असावयाचा आणि त्यालाच सर्व जगाचा अधिपति मानावयाचें. रोम नगरीला सर्व जगाची स्वामिनी म्हणत; आणि साऱ्या जगावर रोमचें अधिराज्य चालतें अशी पश्चिमेकडील लोकांची समजूत होती. अर्थात् ही समजूत चुकीची आहे. तिच्यावरून त्या लोकांचें भूगोलाचें आणि इतिहासाचें अज्ञान मात्र दिसून येतें. रोमन साम्राज्य हें मुख्यतः भूमध्यसमुद्राच्या आसपासच्या देशांचें बनविलें असून पूर्वेकडे मेसापोटेमियाच्या पलीकडे त्याचा विस्तार केव्हांच गेलेला नव्हता. त्याच्याहून मोठीं, जास्त प्रबळ आणि अधिक

सुसंस्कृत अशीं साम्राज्यें चीनमध्यें आणि हिंदुस्थानांत एकामागून एक किती तरी झालीं. तरी पण पश्चिमेपुरताच विचार केला, तर रोमन साम्राज्य हेंच काय तें एक तिकडचें साम्राज्य होतें आणि त्या दृष्टीनें प्राचीन काळच्या तेथल्या लोकांच्या दृष्टीनें तेंच जगाचें साम्राज्य होतें. त्याची छाप व प्रतिष्ठा फारच प्रचंड होती.

रोमच्या साम्राज्याच्या बाबतींत सर्वांत लक्षांत राहण्यासारखी गोष्ट असेल तर त्याच्या पाठीमागची ही कल्पना, कीं आपल्या साम्राज्याचें प्रभुत्व साऱ्या जगावर आहे; साऱ्या जगाचें प्रमुखत्व, नेतृत्व आपल्या साम्राज्याकडे आहे. रोमच्या साम्राज्याचा पाडाव झाला, त्या वेळीं सुद्धां या कल्पनेच्या जोरावर त्याचें पुष्कळ काळ संरक्षण झालें आणि त्याचें सामर्थ्य टिकून राहिलें. पुढें या कल्पनेचा खुद्द रोममध्यें अगदींच मागमूसही राहिला नाहीं, तरी सुद्धां ती कल्पना मात्र नष्ट झाली नाहीं. साम्राज्य नाहींसें झालें, भूतकाळांत विलीन झालें; तरी पण ही जगाच्या प्रभुत्वाची कल्पना शिल्लकच राहिली; इतकी ती दृढमूल झालेली होती.

रोमचें साम्राज्य आणि त्यामागून आलेलीं राज्यें यांची हकीगत लिहिणें मला जरा अडचणीचें व कठिण झालें आहे. त्या इतिहासांतील कोणती गोष्ट निवडून तुला सांगावी हेंच मनांत निश्चित करणें तितकें सोपें नाहीं. आणि शिवाय मुख्यतः तुरुंगामध्यें जीं कांहीं जुनींपुराणीं पुस्तकें मीं वाचलीं, त्यांतून माझ्या मनांत अनेक प्रसंगांच्या चित्रांची नुसती खिचडी होऊन गेली आहे. आणि विचारांची सगळी गुंतागुंत झाली आहे. रोमच्या इतिहासावरचें एक सुप्रसिद्ध पुस्तक अलीकडे मीं वाचलें, तें खरोखर मी तुरुंगांत जर आलों नसतों तर केव्हांच वाचलें नसतें. बहुतेक तो ग्रंथ एवढा मोठा आहे, कीं बाहेरच्या हरएक प्रकारच्या कामाच्या गडबडींत एवढा मोठा ग्रंथ या टोंकापासून त्या टोंकापर्यंत वाचायला वेळच मिळणें अशक्य आहे. या ग्रंथाचें नांव 'रोमन साम्राज्याचा ऱ्हास व अंत'—The Decline and Fall of the Roman Empire असें असून तो गिबन नांवाच्या इंग्रज ग्रंथकारानें लिहिलेला आहे. त्यानें हा ग्रंथ स्वित्झर्लंडमध्यें लॅक लेमानच्या किनाऱ्यावर लिहिला. ह्या गोष्टीला आतां फार काळ होऊन गेला. सुमारें दीडशें वर्षें झालीं त्याला. परंतु आज सुद्धां वाचायला तो ग्रंथ अत्यंत मनोरंजक आहे आणि कांहींशा अलंकारप्रचुर परंतु नादमधुर अशा भाषेंत लिहिलेला हा इतिहास कोठल्याही कादंबरीपेक्षां मला अधिक मनोवेधक वाटला. लखनौ डिस्ट्रिक्ट जेलमध्यें हा ग्रंथ मीं वाचला. त्याला आतां दहा वर्षें होत आलीं. त्या वेळीं एक महिनाभर सारा वेळ गिबनला बरोबर घेऊन मी राहत होतों आणि तो आपल्या भाषेच्या सामर्थ्यानें प्राचीन काळचीं जीं चित्रें निर्माण करतो त्यामध्यें दंग होऊन बुडून जात होतों. पण तो ग्रंथ अगदीं पुरा वाचून होण्यापूर्वीच एकाएकीं माझी तुरुंगांतून सुटका झाली. त्यासरशीं मंत्राचा प्रभाव जणुं संपला, आणि प्राचीन रोम व कॉन्स्टांटिनोपलकडे जायला वेळ मिळणें कठिण होऊं लागलें; किंबहुना, तिकडे मनाचा कल जाऊन उरलेलीं शंभर-एक पानें वाचून टाकणेंही मग शक्य झालें नाहीं.

पण या गोष्टीला झालीं आतां दहा वर्षें. अर्थात् त्या वेळीं वाचलेलें बहुतेक सारें मी आतां विसरून गेलों आहें. तरी पण जें आठवणींत राहिलें आहे तेंही इतकें आहे, कीं तेवढ्यानेंच माझ्या मनाचा सगळा गोंधळ उडतो आहे आणि तसा तुझ्या मनांतही गोंधळ उत्पन्न करावा अशी अर्थातच माझी इच्छा नाहीं.

तेव्हां प्राचीन काळापासून वेळोवेळीं रोमच्या साम्राज्याची – किंवा निरनिराळ्या रोमन साम्राज्यांची म्हणा – घडामोड कशी होत आली, हें थोडेंसें प्रथम आपण पाहूं या. मग वाटल्यास या प्रकारें आपल्यापुढें आलेल्या चित्रांत कोठें कोठें थोडे रंग भरण्याची खटपट करता येईल आपल्याला.

रोमन साम्राज्याची सुरुवात ख्रिस्ती शक सुरू होण्याच्या सुमारास ऑगस्टस सीझरपासून होते. सुरुवातीला कांहीं काळ रोमन बादशहा सीनेटला कांहींसा मान देतांना आढळतात. परंतु लौकरच प्रजासत्ताक राज्याच्या छटा नाहींशा होऊन जातात आणि बादशहा हा सर्वसत्ताधीश सर्वस्वीं एकतंत्री राज्यकर्ता बनतो; नव्हे, जवळ-जवळ त्याला परमेश्वरच्च मानलें जाऊं लागतें. मेल्यानंतर तर त्याला पूर्ण देवपद प्राप्त होऊं लागलें. त्या काळचे सर्व ग्रंथकार पहिल्या पहिल्या सर्व बादशहांच्या अंगीं, विशेषतः ऑगस्टसच्या अंगीं, एकूण एक सद्गुणांची संपत्ति एकवटलेली होती असें लिहितांना आढळतात. ऑगस्टसचें युग म्हणजेच सुवर्ण-युग असें ते म्हणतात; या काळीं सर्व सद्गुणांचा उत्कर्ष झालेला होता, सज्जनांना जीवनांत साफल्य प्राप्त होत होतें, आणि दुर्जनांना दंड म्हणजे शिक्षा केली जात होती. सर्व एकतंत्री देशांतील ही नेहमींचीच पद्धत आहे; आणि राजाची स्तुति केली म्हणजे द्रव्यप्राप्ति होते, पुष्कळ फायदा होतो हें उघड आहे. व्हर्जिल, ओव्हिड, होरेस अशांसारखे लॅटिन भाषेंतील कांहीं प्रख्यात ग्रंथकार या काळच्या सुमाराचेच आहेत. शाळेमध्यें त्यांचे ग्रंथ आपण मंडळी वाचीत असतों. प्रजासत्ताक राज्याच्या शेवटच्या शेवटच्या काळात रोमन राज्या-मध्यें जी यादवी माजली आणि एकसारखे लोकांना जे हाल सोसावे लागले ते संपून त्यांच्यामागून जो शांततेचा आणि विश्रांतीचा काळ आला, व्यापाराची व कांहीं प्रमाणांत संस्कृतीची भरभराट होण्याला जी सवड मिळाली, त्यामुळें लोकांना एक प्रकारें हायसें वाटलें; त्यामुळें ही स्तुतीची प्रवृत्ति वाढली असेल, असाही बराच संभव आहे.

पण ही जी संस्कृति म्हणून म्हटलें तिचें स्वरूप तरी काय होतें! हीही श्रीमंतांचीच संस्कृति होती आणि हे श्रीमंत लोकसुद्धां प्राचीन ग्रीसमधील श्रीमंतांप्रमाणें कुशाग्र बुद्धीचे आणि कलाप्रिय नव्हते, तर अगदींच सामान्य आणि मंदबुद्धि लोकांचा हा एक असंघटित जमाव होता आणि सुखोपभोग घ्यावयाचा एकच धंदा त्यांना माहीत होता. त्यांच्या ऐषआरामासाठीं जगांतून सर्व ठिकाणांहून निरनिराळ्या तऱ्हेचे खाद्य-पदार्थ आणि चैनीच्या वस्तू येत असत आणि जिकडे तिकडे त्यांचा झोकनोक आणि दिमाख चमकून उठत असे. अशा लोकांची जात जगांत आजही कांहीं अगदींच नष्ट झालेली नाहीं. जिकडे तिकडे मोठा डामडौल आणि रोषणाई असावयाची. मोठमोठ्या

मिरवणुकी निघावयाच्या ; क्रीडांगणांत अनेक प्रकारचे खेळ चालावयाचे आणि पहिलवानांना मृत्युमुखीं दिलें जावयाचें ! परंतु या सर्व डामडौलांच्या मागें सामान्य जनतेचें दुःखच दडलेलें होतें. कराचें फार मोठें ओझें असे आणि तें बहुतेक सारें सामान्य जनतेच्याच डोक्यावर लादलें जाई; आणि कामाचा, श्रमाचा बोजा तर जे असंख्य गुलाम होते त्यांच्यावरच पडे. फार कशाला, आपल्यामधील रोगचिकित्सा व शुश्रूषा यांचें काम, तत्त्वचिकित्सेचें व ज्ञानसंपादनाचें काम, आणि विचारप्रवर्तनाचें काम या गोष्टीसुद्धां हे बडे लोक आपल्या गुलामावरच सोंपवीत. ज्या जगाचे ते आपल्याला स्वामी समजत, त्या जगाचें एकंदर स्वरूप तरी काय आहे हें पाहण्याचा किंवा शिक्षणाचा एवढासासुद्धां प्रयत्न ते क्वचितच करीत.

बादशहांमागून बादशहा पुष्कळ झाले. त्यांमध्यें कांहीं चांगले होते, तर कांहीं वाईट होते. हळूहळू सर्व सत्ता सैन्याच्या हातांत येत गेली, आणि बादशहा बनविण्याचें किंवा नाहींसें करण्याचें सामर्थ्य लष्करशाहीला प्राप्त झालें. अर्थातच मग असें झालें, कीं ज्यानें त्यानें लष्करशाहीची कृपा संपादन करण्याची धडपड करायची. आणि लोकांना पिळून काढून जो पैसा मिळेल, किंवा जिंकलेल्या प्रदेशांतून जी लूट आणतां येईल ती सारी सैन्यालाच देण्याच्या कामांत लावावयाची. उत्पन्नाचें एक मोठें साधन म्हणजे गुलामांचा व्यापार हें असे. त्यामुळें रोमन सैन्यें पूर्वेकडे अगदीं पद्धतशीर गुलामांची शिकार करण्यासाठीं म्हणून चालून जात असत. सैन्याबरोबर जागच्या जागीं गुलाम खरेदी करण्यासाठीं गुलामांचे व्यापारी पण जात असत. प्राचीन लोकांनीं पवित्र मानलेलें डेलॉसचें बेट हें गुलामांच्या बाजारपेठेचें मोठेंच ठिकाण बनलें. तेथें एकेक दिवशीं दहा-दहा हजार गुलामाची खरेदी-विक्री होई. रोमच्या कोलोझियम नांवाच्या अतिप्रचंड अर्ध-वर्तुळाकृति क्रीडागणामध्यें लोकप्रिय रोमन बादशहा एकेका वेळीं बाराबाराशें तरवारबहादरांचे खेळ करवून दाखवीत. हे सर्व गुलाम असत आणि बादशहा व त्याचे लोक यांच्या क्रीडा-कौतुकासाठीं त्यांचा जीव घेतला जायचा असे.

रोमन साम्राज्याच्या काळांत रोमन लोकांची संस्कृति ही अशा प्रकारची होती. आणि तरीसुद्धां आमचा दोस्त गिबन काय लिहितो पहा : "जगामध्यें मनुष्यजाति जास्तींत जास्त सुखी आणि संपन्न जेव्हां होती असा काळ निश्चितपणें दाखवा, असें जर आपण म्हटलें, तर डॉमिशियनच्या मृत्यूपासून कोमोडसच्या राज्यारोहणाच्या काळापर्यंतच्या जो काळ त्याकडेच कोणीही अगदीं निःसंशयपणें बोट दाखवील." हा काळ म्हणजे इसवी सन ९६ पासून १८० या सालापर्यंतच्या चौऱ्यायशीं वर्षांचा काळ आहे. गिबन हा कितीही विद्वान् ग्रंथकार असला तरी या बाबतींत मला तरी वाटतें, कीं बहुतेक साऱ्या लोकांचें मत त्याच्या मताशीं जुळणार नाहीं. तो मनुष्यजाति असा शब्दप्रयोग करतो ; परंतु त्याच्या मनांतला अर्थ भूमध्यसमुद्राच्या आसपासच्या जगांतील मनुष्यजाति एवढाच असला पाहिजे ; कारण हिंदुस्थान, चीन किंवा प्राचीन ईजिप्त यांबद्दल त्याला जवळजवळ कांहींच माहिती असण्याचा संभव नाहीं.

तथापि रोमबद्दलचा माझा हा अभिप्राय कदाचित् थोडा फाजिल कडक झाला असण्याचा संभव आहे. रोमन साम्राज्यातल्या लोकांना कांहीं अंशीं तो शांततेचा काळ लाभला. त्यामुळें मागच्या मानानें हा नवा काळ त्याना खरोखरच सुखकर वाटला असेल. सरहद्दीच्या आंतबाहेर वारंवार लढाया होतच होत्या, तरीही खुद्द साम्राज्याच्या अंतर्भागात, निदान पहिल्या पहिल्या काळीं तरी ज्याला Pax Roman म्हणतात तो रोमन लोकांचा शांततेचा काळच होता. थोडीशी सुरक्षितता होती आणि त्यामुळें व्यापार वाढूं शकत होता. रोमच्या नागरिकत्वाचें क्षेत्र आतां सगळ्या रोमन जगाला मोकळें झालें होतें. परंतु हें मात्र विसरूं नकोस, कीं या नागरिकत्वाशीं बिचाऱ्या गुलामाचा कांहीं संबंध नव्हता! तसेंच सारी सत्ता बादशहाच्या हातीं केंद्रीभूत झाली असून नागरिकांनाही विशेष म्हणण्यासारखे हक्क नव्हते, हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. राजकारणविषयक कसल्याही प्रकारची चर्चा करणें म्हणजे इंपेरेटरचा, बादशहाचा, द्रोह करण्यासारखें समजलें जात असे. वरच्या वर्गाच्या लोकांना मात्र एक प्रकारचा सर्वसाधारण असा काय्दा आणि सर्वांना सारखी राज्यव्यवस्था लागू होती. त्यापूर्वीच्या काळीं अनियंत्रित राज्यकारभारामुळें ज्यांचें नुकसान होत असे, अशा लोकांना यांत आपल्याला फारच मोठा फायदा झाला, असें ह्यरेंच वाटलें असेल.

हळूहळूं रोमन लोक अतिशयच आळशी बनले आणि स्वतःच्या सैन्यात जाऊन लढण्यालाही निकामी झाले. खेडेगांवांमधील शेतकरी लोक आपल्या डोक्यावर लादल्या गेलेल्या कराच्या ओझ्याखालीं अधिकाधिक दरिद्री झाले; शहरांतल्या लोकांचीही तीच अवस्था झाली. परंतु शहरातल्या लोकांना खूष ठेवण्याचा बादशहाचा प्रयत्न असे; हेतु असा, कीं त्यांनीं कांहीं गडबड उत्पन्न करूं नये. यासाठीं रोममधील लोकांना फुकट अन्न वांटण्यांत येई आणि क्रीडांगणांत त्यांना फुकट खेळ दाखविण्यांत येत. अशा रीतीनें त्यांना संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न होई; परंतु हे फुकट अन्नसुद्धां फक्त कांहीं थोड्या ठिकाणींच काय तें वांटतां येई; आणि त्यासाठींही ईजिप्तसारख्या परकी देशांतील गुलाम जनतेला दुःख व दैन्य भोगावें लागे. कारण त्यांनाच कांहीं किंमत न देता रोमला पीठ पुरवावें लागे.

रोमचे लोक सैन्यांत सामील होण्याची टाळाटाळ करूं लागले, तेव्हां साम्राज्याच्या बाहेरच्या लोकांना—यांना रोमचे लोक बर्बर (Barbarians) म्हणत—सैन्यांत दाखल करून घ्यावें लागलें. अशा रीतीनें रोमन सैन्यें हीं रोमचे जे शत्रू होते त्या बर्बर म्हणजे रोमन लोक ज्यांस असंस्कृत समजत अशा किंवा अशांशीं संबंध अथवा सख्य असणाऱ्या लोकांनींच पुष्कळ अंशीं भरून गेलीं. सरहद्दीवर या बर्बर लोकांच्या टोळ्या नेहमीं रोमन लोकांना आंत रेटण्याचा किंवा त्यांचा बाहेरचा मार्ग बंद करण्याचा प्रयत्न करीतच असत. रोमचें सामर्थ्य जसजसें कमी होत गेलें, तसतसे हे बर्बर लोक अधिकाधिक प्रबळ आणि अधिकाधिक निर्भय होऊं लागल्याचें दिसून येतें. अशी ही पूर्वेकडून संकटाची विशेष धास्ती होती. आणि ही सरहद्द रोमपासून फार लांब

असल्यामुळें तिचें संरक्षण करणें तितकें सोपें नव्हतें. ऑगस्टस सीझरच्या नंतर कॉन्स्टंटाइन नांवाच्या बादशहानें यासाठीं एक नवीनच उपक्रम केला व त्याचे फार दूरवर परिणाम झाले. त्यानें आपल्या साम्राज्याची राजधानीच पश्चिमेकडून पूर्वेकडे बदलली. काळा समुद्र व भूमध्यसमुद्र यांना जोडणारी जी बॉस्फरसची सामुद्रधुनी, तिच्या तीरावर एक बायझांटियम नांवाचें प्राचीन शहर होतें त्याच्याशेजारींच त्यानें एक नवीन शहर वसविलें व त्याला आपल्याच नांवावरून कॉन्स्टांटिनोपल असें नांव दिलें. हेंच कॉन्स्टांटिनोपल शहर – ज्यालाच नवीन रोम असेंही म्हणत – रोमच्या साम्राज्याची राजधानी झालें. आजकालही आशियामध्यें कित्येक जागीं कॉन्स्टांटिनोपललाच – कुस्तुंबियालाच – लोक रूम म्हणजेच रोम म्हणून समजतात.

३३

रोमन साम्राज्य दुभंगतें, आणि अखेरीस त्याची धुळधाण होते

२४ एप्रिल, १९३२

रोमन साम्राज्याची आपली पाहणी आपण आज आणखी पुढें चालवूं या. आपण पाहिलेंच, कीं ख्रिस्ती शकाच्या सुरुवातीलाच इ. स. ३२६ या वर्षीं कॉन्स्टंटाइन बादशहानें पूर्वीच्या बायझांटियम शहराच्या जवळ बॉस्फरसच्या सामुद्रधुनीवर कॉन्स्टांटिनोपल हें शहर वसविलें आणि साम्राज्याची राजधानी जुन्या रोममधून काढून त्यानें इतकी दूर या नव्या रोममध्यें आणून स्थापन केली. जरा नकाशा पहा. हें कॉन्स्टांटिनोपल शहर यूरप खंडाच्या अगदीं टोंकावर प्रचंड आशिया खंडाकडे तोंड करून उभें राहिलेलें तुला आढळेल. या दोन खंडांना जोडणारा एक प्रकारचा दुवाचं हें शहर आहे. आणि समुद्रावरून येणारे निरानिराळ्या दिशांचे पुष्कळ मोठमोठे खुष्कीचे आणि समुद्रांवरील वाहतुकीचे व्यापारी मार्ग या शहरांतून जात असत. शहरासाठीं काय किंवा राजधानीसाठीं काय, ही जागा फारच सुंदर आहे. कॉन्स्टन्टाइननें निवड खरोखरच चांगली केली; परंतु त्याला किंवा त्याच्या वंशजांना ही राजधानी बदलल्याचे फार दुर्घट परिणाम भोगावे लागले. कारण पूर्वी जसें जुनें रोम शहर हें आशिया मायनर व इतर पूर्वेकडील देश यांपासून फारच दूर पडलें होतें, तसेंच आतांही पूर्वेकडील राजधानी गॉल किंवा ब्रिटन यांसारख्या देशांपासून फार दूर गेल्याप्रमाणें झाली.

या अडचणीचा परिहार करण्यासाठीं कांहीं काळ जोडीनें दोन बादशहांचा अमल चालू करण्यांत आला. एक जण रोममध्यें बसून राज्य करी आणि दुसरा कॉन्स्टान्टिनोपलमध्यें. यामुळें साम्राज्याची जवळजवळ प्रत्यक्ष वांटणीच झाल्यासारखी झाली.

एक पूर्वेंकडचें साम्राज्य आणि एक पश्चिमेकडील साम्राज्य. रोम ज्या विभागाची राजधानी होतें, त्या पश्चिमेकडील साम्राज्यावर हा खरोखर एक मोठाच आघात होता. आणि या आघातानंतर या बाजूचें साम्राज्य फार काळ जिवंत राहूं शकलें नाहीं. ज्यांना या भागांतील लोक रानटी, बर्बर म्हणून म्हणत, त्यांच्यापुढें रोमन लोकांना टिकाव धरवला नाहीं. प्रथमतः जर्मन टोळ्यांपैकीं गॉथ लोकांनीं येऊन रोमची लूटमार केली. त्यांच्यामागून व्हँडाल लोक आले; त्यांच्यामागून हूण आले; आणि पश्चिमेकडील रोमन साम्राज्य कोलमडून पडलें. हूण शब्द पुष्कळ ठिकाणीं वापरलेला तुझ्या आढळांत आलेला असेल. जर्मन लोक हे फार निर्दय आणि रानटी आहेत असें दर्शविण्यासाठीं इंग्रज लोक हा शब्द जर्मनांना गेल्या लढाईंत नेहमीं लावीत असत. खरी गोष्ट अशी आहे, कीं लढाईच्या दिवसांत सगळ्याच जणांचीं निदान बहुतेक सगळ्या जणांचीं डोकीं फिरलेलीं असतात, आणि लढाई सुरू होण्याच्या आधींच्या काळीं जी कांहीं सुसंस्कृति अंगीं बाणलेली असते आणि ज्या भल्या चालीरीती शिकलेल्या असतात त्या साऱ्या पार विसरून जाऊन लढाईंत लोक क्रूरपणें आणि रानटी पद्धतीनें वागत असतात. जर्मन लोकांचें असेंच वर्तन झालें; आणि इंग्रज व फ्रेंच लोकांचेंही तशाच प्रकारचें झालें. दोघांमध्यें काळें-गोरें निवडण्यासारखें कांहींच नव्हतें.

हूण ही एक आतां फार भयंकर शिवीच होऊन बसली आहे. तीच गत व्हँडाल शब्दाची झालेली आहे. संभव आहे, कीं हे हूण आणि व्हँडाल लोक बरेच क्रूर आणि रानवट असतील आणि त्यांनीं नासधूस बरीच केली असेल; परंतु आपण विसरून चालणार नाहीं, कीं त्यांच्याबद्दलची हकीकत जी आपण वाचतों ती सगळी त्यांचे शत्रू जे रोमन लोक त्यांनीं लिहिलेली आहे आणि त्यांनीं ती अगदीं निःपक्षपातीपणानें लिहिली असेल असें मानणें कठिण आहे. एवढी गोष्ट खरी, कीं या गॉथ लोकांनीं, व्हँडालांनीं आणि हूणांनीं रोमचें पश्चिमेकडील साम्राज्य पत्त्याच्या बंगल्यासारखें उडवून लावलें. या लोकांना इतका सहज जय मिळाला याचें एक कारण बहुतेक असें असण्याचा संभव आहे, कीं रोमन साम्राज्यामध्यें रोमन शेतकरी अतिशयच हीन दशेला पोंचले होते; अवजड करांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले होते आणि कर्जात बुडून गेले होते. इतके, कीं कोठचेंही नवीन राज्य किंवा व्यवस्था आली तरी त्यांना तें बरें वाटलें असेल, त्यांचें त्यांनीं स्वागतच केलें असेल. उदाहरणार्थ, आजही गरीब बिचारा हिंदी शेतकरी दारिद्र्यानें आणि दैन्यानें इतका गांजला आहे, कीं याहून दुसरी म्हणाल ती राज्यव्यवस्था तो मान्य करील.

अशा रीतीनें पश्चिमेकडील साम्राज्य गडगडलें. त्यानंतर कांहीं शतकांनीं पुन्हां एकदां नवीनच स्वरूपांत त्याचा उदय व्हायचा होता. पूर्वेंकडील रोमन साम्राज्याला सुद्धां या हूणांच्या आणि इतराच्या हल्ल्यांना तोंड देतां देतां प्रयास पडले; तरी पण तें साम्राज्य टिकून राहूं शकलें. केवळ या हल्ल्यांनाच तोंड देऊन तें जगलें असें नव्हे,

तर दुसऱ्या बाजूलाही कित्येक शतकेंपर्यंत प्रथम अरबांशीं आणि नंतर तुर्कांशीं त्या साम्राज्याला लढत राहावें लागलें आणि त्यांतही त्यानें टिकाव धरला. शेवटीं इ. स. १४५३ मध्यें त्याचा अंत झाला. म्हणजे सुमारें ११०० वर्षें इतक्या आश्चर्य वाटण्याजोग्या दीर्घ काळपर्यंत तें टिकलें. त्याचा अंत उस्मानी किंवा उस्मानली तुर्क लोकांनीं कॉन्स्टांटिनोपल शहराचा पाडाव केला त्या वेळीं झाला. तेव्हांपासून आज सुमारें ५०० वर्षेंपर्यंत कॉन्स्टांटिनोपल शहर—यालाच इस्तंबूल असेंही म्हणतात—हें तुर्कांच्या ताब्यांत आहे. या शहरांतून निघून तुर्कांनीं यूरपवर वारंवार स्वाऱ्या केल्या. एकदां तर ते थेट व्हिएन्नाच्या तटाशीं येऊन भिडले होते. पुढच्या ३-४ शतकात हळूहळू त्यांना मागें रेटण्यांत आलें आणि गेल्या महायुद्धात त्याचा पराभव झाल्यानंतर सुमारें बारा वर्षांपूर्वीं कॉन्स्टांटिनोपल शहरही त्यांच्या हातून जाण्याची वेळ आली होती. शहराचा ताबा इंग्रजांकडे गेला होता आणि तेथील सुलतान त्यांच्या हातचें एक खेळणें होऊन राहिलेला होता. परंतु एक श्रेष्ठ नेता, कमाल पाशा, हा त्याच्या संरक्षणार्थ उभा राहिला आणि मोठ्या शौर्यानें लढून त्यानें जयही मिळविला. आज तुर्कस्तानात प्रजासत्ताक राज्य असून सुलतान कायमचा नाहींसा झाला आहे. कमाल पाशा हा या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष आहे. पहिल्याप्रथम पूर्वेकडील रोमन साम्राज्य आणि नंतर तुर्कांचें साम्राज्य अशा दोन्ही साम्राज्यांच्या राजधानीचें वैभव ज्या कॉन्स्टान्टिनोपल शहरानें पंधराशें वर्षें उपभोगिलें, तें कॉन्स्टान्टिनोपल शहर तुर्की राज्याचा एक भाग आजही आहे; परंतु त्या ठिकाणीं आज राजधानी मात्र नाहीं. त्या शहराच्या साम्राज्यशाही परंपरेपासून दूर राहण्याचें ठरवून तुर्कांनीं आपली राजधानी दूर आशिया मायनरमध्यें अंगोरा (अथवा अंकारा) या ठिकाणीं स्थापन केली आहे.

म्हणजे आपण जवळजवळ दोन हजार वर्षांचें अंतर घाईघाईनें तोडलें म्हणावयाचें. आणि कॉन्स्टान्टिनोपल शहराची संस्थापना, मूळची रोम येथील राजधानी बदलून तेथें रोमन साम्राज्याची राजधानी येणें वगैरेसारख्या एकामागून एक होत आलेल्या घडामोडी आपण फारच जलदीनें अवलोकन केल्या. ही राजधानी बदलली त्याचप्रमाणें कॉन्स्टंटाइननें आणखी एक मोठाच नवीन उपक्रम केला. त्यानें स्वतः ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला, आणि तो बादशहा असल्यामुळें स्वाभाविकच रोमन साम्राज्याचा अधिकृत धर्म म्हणजे ख्रिस्ती धर्म असें झालें. काल ज्या पंथाचा छळ होत होता, तो आज एकदम मोठ्या साम्राज्याचा अधिकृत धर्म झाला; ख्रिस्ती धर्माच्या परिस्थितींत एकाएकीं झालेला हा बदल किती चमत्कारिक आहे—त्या काळींही तो केवढा आश्चर्यकारक वाटला असला पाहिजे! मात्र हा बदल कांहीं काळपर्यंत ख्रिस्ती धर्माला तसा विशेष सुखाचा झाला नाहीं. निरानिराळ्या धर्मपंथांमध्यें या सुमारास भांडणें सुरू झालीं आणि शेवटीं त्यांच्यामधील दोन अत्यंत मोठे गट म्हणजे एक ग्रीक आणि दुसरा लॅटिन गट यांची एकमेकापासून मोठ्या प्रमाणांत कायमची फारकत झाली. लॅटिन गटाचें प्रमुख पीठ रोममध्यें होतें; रोमचा बिशप हा या गटाचा प्रमुख

समजला जाई. यालाच पुढें रोमचा पोप असें म्हणूं लागले. ग्रीक लोकांचें प्रमुख पीठ कॉन्स्टान्टिनोपल येथें राहिलें. लॅटिन धर्मसंस्थेचा (चर्चचा) फैलाव सगळ्या उत्तर आणि पश्चिम यूरपभर झाला आणि त्याला रोमन कॅथॉलिक चर्च असें नांव मिळालें. ग्रीक चर्चला सनातन चर्च (Orthodox church) असें म्हणूं लागले. पूर्वेंकडील रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर या सनातन चर्चचा अमल व प्रसार ज्या ठिकाणीं चालू राहिला, असा रशिया हा एक देश मुख्यतः होता. आतां रशियामध्यें बोल्शेविझम् झाल्यानंतर या धर्मपीठाला किंवा इतर कोणत्याच धर्मपीठाला या देशांत अधिकृत स्थान नाहीं.

पूर्वेंकडील रोमन साम्राज्य असे शब्द मी वापरतों आहें खरा; परंतु या साम्राज्याशीं रोमचा संबंध जवळजवळ कांहींच नव्हता. त्यामध्यें भाषा वापरीत ती सुद्धां लॅटिन नव्हती, तर ग्रीक. एका अर्थीं ॲलेक्झांडरचें ग्रीक साम्राज्यच या नव्या नांवाखालीं चालू होतें असें बहुतांशीं म्हणतां येईल. पुष्कळ काळपर्यंत पश्चिमेकडील देशांच्या स्वातंत्र्याचा हक्क हें साम्राज्य मान्य करण्यास तयार नव्हतें; तरी पश्चिमेकडील यूरपशीं या साम्राज्याचा जवळजवळ कांहीं संबंध राहिलेला नव्हता आणि तरी सुद्धां हें साम्राज्य रोमन या शब्दाला घट्ट चिकटून राहिलेलें होतें. त्यामधील लोकांना सुद्धां रोमन लोकच म्हणत; जणुं रोमन या शब्दांत कांहीं विशेष जादूच असावी! याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे रोम शहरामधून साम्राज्याच्या प्रमुख पदाचें वैभव जरी नाहींसें झालें, तरी ही त्याची जगांतील छाप कांहीं नाहींशी झाली नाहीं. तें शहर जिंकण्यासाठीं चालून आलेले रानटी बर्बरादि लोक सुद्धां त्याच्यापुढें थोडेसे थबकले आणि त्याचा त्यांनींही मान राखला. मोठ्या नांवामध्यें असें कांहीं चमत्कारिक सामर्थ्य असतें; आणि कल्पनांचें सामर्थ्यही हें इतकें प्रभावी असतें! दुसरें काय?

एक साम्राज्य नष्ट झालें, तेव्हां रोमनें राहिल्यासाहिल्यांतूनच नवीन प्रकारचें दुसरें एक साम्राज्य उभें करण्यास सुरुवात केली. जीझसचा पीटर नांवाचा शिष्य प्रथम रोममध्यें आला व तोच रोमचा पहिला बिशप झाला असें म्हणतात. पुष्कळ ख्रिस्ती लोकांच्या मनांत त्यामुळें रोमबद्दल एक विशेष पावित्र्याची भावना निर्माण झाली आणि रोमच्या बिशपच्या स्थानाला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें. सुरुवातीला रोमचा बिशप हा इतर ठिकाणच्या बिशपांहून कांहीं वेगळा नव्हता. परंतु रोममधून बादशहांचें वास्तव्य कॉन्स्टान्टिनोपलमध्यें गेल्यानंतर या बिशपचें महत्त्व वाढलें. त्याच्यापेक्षां मोठें मग तेथें कोणी राहिलें नाहीं आणि मग पीटरच्या पीठाचा वारस या नात्यानें सर्व बिशपांचा प्रमुख असें त्याला मानण्यांत येऊं लागलें. पुढें त्याला पोप म्हणूं लागले. आजही पोपची परंपरा चालू आहे आणि पोपलाच रोमन कॅथॉलिक धर्मपीठाचा प्रमुख समजतात हें तुला माहीतच आहे.

रोमन धर्मपीठ आणि ग्रीक सनातन धर्मपीठ यांच्यामधील फुटीचें एक कारण मूर्तीचा उपयोग करण्याबद्दलचा मतभेद हें होतें, हें पाहून तुला मोठेंच आश्चर्य वाटेल.

रोमन धर्मपीठाचें साधूंच्या प्रतिमांच्या, विशेषतः जीझसची आई मेरी हिच्या प्रतिमेच्या पूजनाला प्रोत्साहन होतें, तर ग्रीक धर्मपीठाचा या गोष्टीला प्रबल विरोध होता.

रोम शहर काबीज केल्यावर पुष्कळ पिढ्यांपर्यंत उत्तरेकडील टोळ्यांच्या नायकांचेंच राज्य रोममध्यें चालू असून रोम शहरही त्यांच्याच ताब्यांत होतें. परंतु पुष्कळ प्रसंगीं ते सुद्धां कॉन्स्टान्टिनोपलच्या बादशहाचें अधिराज्य मान्य करीत असत. दरम्यान धर्मपीठाचा प्रमुख या नात्यानें रोमच्या बिशपची सत्ता वाढतच होती; शेवटीं ती इतकी वाढली, कीं कॉन्स्टान्टिनोपलची सत्ता नाकारण्याची शक्यता त्याला वाटूं लागली आणि प्रतिमापूजनाची ही भानगड जेव्हां उपस्थित झाली, तेव्हां त्यानें रोमचा व पूर्वेच्या साम्राज्यशाहीचा संबंध अजीबात तोडून टाकला. या दरम्यानच्या काळांत आणखी किती तरी घडामोडी झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, याच काळांत अरबस्तानांत नवीनच इस्लामधर्म उदयास आला. या अरबांनीं सर्व उत्तर आफ्रिका व स्पेन यांवर आक्रमण केलें; उत्तर आणि पश्चिम यूरपमध्यें नवीन राज्यांची स्थापना होत गेली आणि पूर्वेकडील रोमन साम्राज्यावर अरबांचा अत्यंत भयंकर हल्ला सुरू झाला; वगैरे वगैरे कितीक घटना. परंतु त्याबद्दल आपणांस पुष्कळ जें बोलायचें तें आज नव्हे; पुढें केव्हां तरी.

उत्तरेकडील जर्मन टोळ्यांमध्यें फ्रँक नांवाची एक टोळी होती. या लोकांतील एका मोठ्या नायकाचें साहाय्य पोपनें मागितलें आणि पुढें कांहीं काळानंतर या फ्रँक लोकांच्या कार्ल किंवा चार्लस् नांवाच्या पुढाऱ्याला रोमच्या बादशहाच्या गादीवर बसविण्यांत आलें. खरोखर, हें आतां एक अगदींच नवीन साम्राज्य किंवा राज्य होतें. परंतु त्याला रोमन साम्राज्य हेंच नांव रूढ झालें आणि पुढें त्यालाच पवित्र रोमन साम्राज्य असें म्हणूं लागले. रोमन या विशेषणाशिवाय साम्राज्य असूंच शकणार नाहीं, अशींच जणुं या लोकांची भावना होती; आणि म्हणूनच शार्लमेन बादशहाचा – यालाच चार्ल्स् दि ग्रेट असें म्हणतात – रोमशीं कांहीं संबंध नव्हता, तरी सुद्धां त्याला हे लोक इंपेरेटर, सीझर, ऑगस्टस या नांवानें ओळखूं लागले. हें नवें सम्राज्य म्हणजे मूळचेंच रोमन साम्राज्य पुढें चालू होतें असें समजत. मात्र त्याच्या नांवांत एक भर तेवढी पडली. हें साम्राज्य आतां Holy म्हणजे पवित्र झालें होतें. पोप हा आतां God-father, धर्मपिता झाला होता, म्हणून तें साम्राज्य एक खास ख्रिस्ती साम्राज्य झालें होतें; हें त्याला आतां पवित्रपण येण्याचें कारण.

यामध्येंही कल्पनांचें सामर्थ्य किती आश्चर्यकारक असतें, हेंच तुला पुन्हां दिसून येईल. त्याचमुळें मध्य यूरपांत राहणारा मूळचा फ्रँक अथवा जर्मन मनुष्य स्वतःला रोमन बादशहा म्हणवूं लागतो. या पवित्र रोमन साम्राज्याचा पुढचा इतिहास याहूनही आश्चर्यकारक आहे. साम्राज्य म्हणून पाहिलें तर त्याला फारसें अस्तित्व कांहीं उरलें नाहीं. पूर्वेकडचें रोमन साम्राज्य तिकडे चांगला सुरळीत अमल चालवीत होतें. पण या पश्चिमेकडील साम्राज्यांत मात्र पुष्कळच घडामोडी झाल्या. मधून मधून तें नाहींसेंही

होईं आणि पुन्हां उदयास येई. तें आतां साम्राज्य राहिलें नव्हतें. तर साम्राज्याचें भूत किंवा पिशाच जणुं तें झालें होतें; आणि रोमचें नांव आणि ख्रिस्ती धर्म यांच्या पतीच्या जोरावर नुसतें नाव सांगण्यापुरतें तें टिकून राहिलें होतें. तें एक कल्पनेंतलें साम्राज्य होतें; प्रत्यक्षांत त्याला कांहीं अस्तित्व राहिलें नव्हतें. एका लेखकानें – मला वाटतें तो बहुधा व्हॉल्टेअरच असावा – या पवित्र रोमन साम्राज्याची गमतीची व्याख्या केली आहे. तो म्हणतो, "पवित्र रोमन साम्राज्य म्हणजे असें एक कांहीं तरी, कीं जें पवित्र नाहीं, रोमनही नाहीं आणि साम्राज्य तर त्याहूनही नाहीं!" दुर्दैवानें ज्या सिव्हिल सर्व्हिसचा छळ, जांच, अद्यापही या देशांत आमच्या पाठीमागचा सुटला नाहीं, त्या इंडियन सिव्हिल सर्व्हिसची अशीच कोणीशी व्याख्या केली आहे; हा व्याख्याकार म्हणतो, कीं इंडियन म्हणजे हिंदी नाहीं, आणि सिव्हिल म्हणजे नम्र किंवा सोज्वळ नाहीं, आणि सर्व्हिस म्हणजे सेवाप्रवण नाहीं, ती इंडियन सिव्हिल सर्व्हिस!

तेव्हां प्रत्यक्षांत या पवित्र रोमच्या साम्राज्याचें स्वरूप कशाही प्रकारचें असो, या नावानें तें सुमारें एक हजार वर्षें चालू राहिलें. अखेरीस शंभर-एक वर्षांपूर्वी नेपोलियनच्या काळीं तें नाहींसें झालें. त्याचा अंत होतांना विशेष लक्षांत येण्यासारखें किंवा चमत्कृतिमय असें कांहींच घडलें नाहीं. खरें म्हटलें तर प्रत्यक्षांत असें एखादें राज्य किती दीर्घ काळापासून मुळीं अस्तित्वांतच नव्हतें. तेव्हा आतां तें कायमचें नाहींसें केव्हां झालें, असें कोणाच्या फारसें लक्षांत सुद्धां आलें नसेल. हें पिशाच त्या वेळीं एकदांचें गाडलें गेलें तर खरेंच; परंतु तें कायमचें गाडलें गेलेलें दिसत नाहीं. कायसर, झार अशा भिन्न भिन्न रूपांनीं तें पुनः पुनः डोकें वर काढतेंच आहे. चौदा वर्षांपूर्वी महायुद्धांत मात्र यापैकीं बहुतेक पिशाचांना शांत करून गाडून टाकण्यांत आलें आहे.

३४

जागतिक राज्याची कल्पना

२५ एप्रिल, १९३२

मला वाटतें, माझ्या या पत्रांमुळें पुष्कळदां तुला कंटाळल्यासारखें होत असेल, तर पुष्कळदां तुझ्या मनाचा गोंधळ उडून जात असेल. विशेषतः रोमन साम्राज्याविषयींच्या माझ्या गेल्या दोन पत्रांनीं तर तुझी विशेषच तारांबळ केली असेल. त्या पत्रांमध्यें मीं हजारों वर्षांवरून मागें-पुढें उड्या मारल्या आहेत आणि हजारों मैलांचा प्रदेश इकडून तिकडे ओलांडला आहे. त्यामुळें कशाचा कांहीं थांगपत्ताच तुला लागेनासा झाला असला तर त्यांत सारा दोष माझा आहे. म्हणून तूं नाउमेद होऊं नकोस. अशीच पुढें वाचीत जा. कुठें कुठें मीं लिहिलेलें तुझ्या नीटसें ध्यानांत आलें नाहीं तरी त्याची

फिकीर करूं नकोस, तर तशीच पुढें वाचीत रहा. हीं पत्रें कांहीं तुला इतिहासाचें बिनचूक परिपूर्ण ज्ञान देण्यासाठीं लिहिलेलीं नाहींत; तर इतिहासाचें ओझरतें दर्शन तुला करवावें आणि त्या संबंधांत तुझी जिज्ञासा जागृत करावी एवढाच त्यांचा हेतु आहे.

या रोमन साम्राज्यांचा मात्र आतां तुला कांहींसा कंटाळा आला असेल. निदान मला तरी आला आहे खास. तरी पण आजच्या दिवस आपण त्यांचा सहवास सहन केला पाहिजे. मग आपण त्यांची कांहीं काळ रजा घेऊं.

राष्ट्रीयत्व, देशभक्ति – म्हणजेच आपल्या स्वतःच्या देशाबद्दलचें प्रेम – याबद्दल आजकाल फार मोठमोठ्या गोष्टी बोलल्या जात असतात, हें तूं पाहिलेंच असशील. आज हिंदुस्थानात तर आम्ही बहुतेक सर्व जण अगदीं कट्टे राष्ट्रवादीच आहों. हा राष्ट्रवाद ही एक जगांतील नवीन चीज आहे. आणि तिचा उगम व वाढ यांबद्दल या पत्रांमधून पुढें आपण बहुधा विचार करूंच. रोमन साम्राज्याच्या वेळीं मात्र अशा प्रकारची भावना अस्तित्वांत नव्हती. तें साम्राज्य म्हणजे सगळ्या जगावर अमल गाजविणारें एक अधिराज्य अशीच कल्पना होती. खरें म्हणजे साऱ्या जगावर राज्य असणारें एक साम्राज्य असें आजपर्यंत केव्हांच झालेलें नाहीं. परंतु भूगोलाचें अज्ञान, मालवाहतुकीमधील आणि दूरंदूरच्या अंतराच्या प्रवासांमधील प्रचंड अडचणी यांमुळें प्राचीन काळीं लोकाना असें राज्य अस्तित्वांत आहे, असें वाटे मात्र. उदाहरणार्थ, यूरपमध्यें भूमध्यसमुद्राच्या आसपास रोमचें एक छोटेंसें राज्य प्रथम होतें; अद्यापि त्याचें साम्राज्यही वाढलें नव्हतें; त्या वेळीं सुद्धां हें एक इतर सर्वांहून श्रेष्ठ असें राज्य असून बाकीचीं राज्यें त्याच्या अधिराज्याखालचीं आहेत, अशी समजूत होतीच. या राज्याची प्रतिष्ठा एवढी वाढलेली होती, कीं आशिया मायनरमधील ग्रीकांचें पेरगॅमम प्रदेशांतील राज्य आणि ईजिप्तचें राज्य येथील राज्यकर्त्यांनीं आपण होऊन आपलीं राज्यें रोमन लोकांना बहाल केलीं; नजराणा म्हणून अर्पण केलीं. त्यांना रोमचें राज्य हें एक सर्वसत्ताधीश आणि अजिंक्य राज्य आहे असें वाटलें. पण खरी गोष्ट मीं तुला सांगितलीच आहे, कीं भूमध्यसमुद्राच्या लगतच्या देशांहून फारशा मोठ्या प्रदेशावर रोमचें राज्य कधींच नव्हतें. उत्तर यूरपमधील बर्बर (रानटी) लोकांनीं रोमची सत्ता कधींच कबूल केली नाहीं, आणि रोमनेंही त्यांचा पाडाव करण्याची कधीं खटपट केली नाहीं. परंतु रोमच्या राज्याचा विस्तार केवढाही असो, तें एक सर्व जगाचें राज्य आहे, अशी त्याच्यामागची कल्पना होती आणि पश्चिमेकडील त्या काळच्या लोकांनीं ही कल्पना मान्य केली होती. या कारणामुळेंच रोमन साम्राज्यें इतक्या दीर्घ काळपर्यंत टिकून राहिलीं आणि त्यांच्यांत अंगचें प्राण कांहीं शिल्लक राहिलेलें नव्हतें, तरीही त्यांचा नांवलौकिक आणि प्रतिष्ठा फार मोठी राहिली.

साऱ्या जगावर प्रभुत्व गाजविणाऱ्या एक साम्राज्याची कल्पना एकट्या रोममध्येंच होती असें नव्हे. प्राचीन काळीं ही कल्पना चीनमध्यें आणि हिंदुस्थानांतही असलेली आढळते. तुला माहीतच आहे, कीं चीनचें राज्य हें पुष्कळ काळ रोमच्या

साम्राज्यापेक्षा किती तरी मोठें होतें आणि त्याचा विस्तार थेट कास्पियन समुद्रापर्यंत पसरलेला होता. चीनच्या बादशहाला स्वर्गपुत्र (किंवा देवपुत्र) अशी संज्ञा असे आणि चिनी लोक त्याला सर्व जगताचा स्वामी मानीत. आतां या बादशहाला त्रास देणाऱ्या आणि त्याचें राज्य न मानणाऱ्या कांहीं टोळ्या अवश्य होत्या. पण रोमन लोक उत्तर यूरपमधील लोकांना 'सनटी' म्हणत त्याप्रमाणें चिनी लोकांच्या दृष्टीनेंही या टोळ्या रानटी, असुधारलेल्या होत्या.

अशाच प्रकारें हिंदुस्थानांतही अगदीं प्राचीनतम काळापासून चक्रवर्ती राजांचा—जागतिक राज्यकर्त्यांचा—उल्लेख आपल्याला आढळतो. अर्थात् त्यांच्या कल्पनेंतलें जग हें स्वाभाविकच एक प्रकारें फार संकुचितच होतें. हिंदुस्थानचाच विस्तार इतका मोठा होता, कीं हिंदुस्थान म्हणजेच सारें जग असें त्यांना वाटे; आणि ज्याचें अधिराज्य हिंदुस्थानवर असेल तो साऱ्या जगाचा स्वामी असें ते मानीत. याच्या बाहेरचे लोक म्हणजे रानटी, असुधारलेले; त्यांनाच ते म्लेंच्छ म्हणत. ज्याच्या नांवावरून आपल्या देशाला भारतवर्ष हें नांव प्राप्त झालें आहे तो पुराणकाळांतील भरत राजाही चक्रवर्ती होता, असेंच मानण्याची परंपरा आहे. महाभारतांत सांगितल्याप्रमाणें युधिष्ठिर व त्याचे बंधू यांनींही जगताचें अधिराज्य मिळविण्यासाठीं लढाया केल्या. अश्वमेध यज्ञ म्हणजे अशा प्रकारच्या जागतिक अधिराज्याचें इतरांना आव्हानच होतें. हा यज्ञ करणें म्हणजे अशा अधिराज्यत्वाचें एक चिह्न होतें. पश्चात्ताप होऊन अशोकानें युद्धच अजीबात बंद केलें, पण त्याच्यापूर्वी त्याचाही हाच हेतु असावासें दिसतें. पुढच्या काळांत गुप्तांसारख्या हिंदुस्थानांतील सम्राटांचीही हीच मनीषा होती हें पुढें तुला दिसेलच.

तेव्हां तात्पर्य काय, कीं प्राचीन काळीं लोकांच्या मनांत जागतिक राज्यें आणि सर्व जगाचें सम्राट्पद अशा कल्पनाच बहुतेक सर्वत्र होत्या. यानंतर पुष्कळच काळ लोटल्यावर राष्ट्रवादाची कल्पना उद्भवली आणि अगदीं अलीकडे नव्याच प्रकारच्या साम्राज्यवादाची कल्पना निघाली, आणि या दोन कल्पनांनीं मिळून साऱ्या जगांत हवा तेवढा अनर्थ माजवून ठेवलेला आहे. अलीकडे पुन्हां एकदां लोक आणखी एका जागतिक राज्याची भाषा बोलूं लागले आहेत; पण ही कल्पना, आधुनिक पद्धतीचेंच पण फार मोठें साम्राज्य किंवा एका राज्याचें अथवा पृथ्वीपतीचें सर्व जगावर अधिराज्य अशा प्रकारची नाहीं. तर सर्व जगाचें मिळून एक प्रजासत्ताक राज्य असावें आणि त्याच्या स्थापनेमुळें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राची किंवा एका वर्गानें दुसऱ्या वर्गाची पिळणूक करणें अशक्य व्हावें, अशी ही कल्पना आहे. नजिकच्या भविष्यकाळांत यासारखें कांहीं घडून येईल कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. परंतु जगाची आज जी आहे ही अवस्था रोगग्रस्त अशी आहे आणि या आजारांतून त्याला मुक्त करायला या कल्पनेवांचून दुसरा कांहीं उपाय नाहीं.

उत्तर यूरपांतील बर्बर म्हणजे रानटी लोकांचा मीं पुनः पुनः उल्लेख 'रानटी' अशा रीतीनें केला आहे. या लोकांना रोमन लोकांनीं हें नांव दिलेलें आहे म्हणूनच केवळ तें नांव मी वापरतों.

मध्य आशियांतील फिरत्या किंवा इतर टोळ्यांप्रमाणें हे लोकही थोडेसे सुधारणेंत आपल्या रोमन किंवा हिंदी शेजाऱ्यांपेक्षां मागें होते हें खरें; परंतु मोकळ्या हवेंतच सदैव राहत असल्यानें ते अधिक शरीरसामर्थ्यवान् होते. पुढें त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. आणि त्यांनीं पुढें रोमचें साम्राज्य जिंकलें त्या वेळीं प्रत्येकच प्रसंगीं किंवा प्रत्येकच ठिकाणीं त्यांनीं तेथील लोकांशीं शत्रूप्रमाणें निर्दय वर्तन केलें असें कांहीं नव्हे. आधुनिक यूरपांतील राष्ट्रांचा उदय गॉथ, फ्रँक अशांसारख्या यांच्या टोळ्यांमधूनच झालेला आहे.

रोमच्या बादशहांचीं नांवें मी तुला सांगत बसलों नाहीं. रोमच्या इतिहासांत या बादशहांची मोठी खेंच गर्दी आहे. आणि त्यातले बहुतेक कोणी नांव घेण्यासारखे नाहींत. पुष्कळसे बादशहा दुर्जनच होते. कांहीं कांहीं तर पापी राक्षसच होते. नीरोचें नांव तूं बहुतेक ऐकलेलें असशील. परंतु त्यांच्याहून किती तरी वाईट असलेले महापुरुष यांच्यामध्यें होऊन गेले आहेत. आयरीन नांवाच्या बाईनें तर स्वतः सम्राज्ञी होण्याच्या अभिलाषेनें आपल्या प्रत्यक्ष मुलाचा तो बादशहा असतांना खून केला; ही गोष्ट कॉन्स्टान्टिनोपलमधली आहे.

एक रोमन बादशहा मात्र बाकीच्या इतरांहून फार श्रेष्ठ होऊन गेला, त्याचें नांव मार्कस् ऑरेलियस अँटोनिनस. तो तत्त्वज्ञ होता अशी समजूत आहे; त्याचे विचार व अनुभूति यांचा एका ग्रंथांत संग्रह केलेला असून तो ग्रंथ चांगला अभ्यास करण्यासारखा आहे. पण या मार्कस् ऑरेलियसनें अशा रीतीनें या बादशहांच्या मालिकेंत स्वतः गुणी होऊन जें एक प्रकारचें पापच केलें, त्याची भरपाई त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या त्याच्या मुलानेंच केली. साऱ्या रोमच्या इतिहासांत इतका पाजी, नीच इसम दुसरा कोणीही झाला नसेल.

रोमन साम्राज्याच्या पहिल्या तीनशें वर्षांच्या काळांत रोम शहर हें पाश्चिमात्य जगाचें केंद्र होतें. त्या वेळीं तें फार श्रेष्ठ शहर असलें पाहिजे; त्याच्यामध्यें प्रचंड इमारती असाव्या, सर्व साम्राज्यातून आणि त्याच्याहीं पलीकडून लोक तेथें येत असावे. जहाजेंच्या जहाजें भरून दूर दूर देशांतून नानाविध सुंदर पदार्थ, खाद्यपेयें आणि कापडचोपड तेथें येई. असें म्हणतात, कीं तांबड्या समुद्रांतील ईजिप्तच्या एका बंदरांतून दर वर्षीं १२० जहाजांचा एक काफिला हिंदुस्थानकडे जाई. पावसाळी वाऱ्याचा फायदा मिळावा अशा नेमाच्या हिशेबानें ते निघत असत आणि त्याची त्यांना फार मदत होई. सामान्यतः ते दक्षिण हिंदुस्थानकडेच जात. अत्यंत मौल्यवान् माल भरून पुन्हां अनुकूल वारा मिळतांच हीं जहाजें ईजिप्तला परत जात. ईजिप्तमधून हा माल खुष्कीच्या मार्गानें रोममध्यें पाठविला जाई.

पण हा सर्व व्यापार बहुतांशीं श्रीमंतांच्या फायद्यासाठींच होता. थोड्या लोकांच्या चैनीच्या मागें पुष्कळांचें दैन्य लपलेलें होतें. तीनशें वर्षेंपर्यंत रोम हें अशा रीतीनें पश्चिमेकडे एकमेव श्रेष्ठ पद उपभोगीत होतें. पुढें कॉन्स्टान्टिनोपल शहराची स्थापना झाल्यावर त्याच्या श्रेष्ठत्वांत कॉन्स्टान्टिनोपलला पण भागीदारी मिळाली. प्राचीन ग्रीसनें आपल्या अगदीं अल्पकालीन अमदानीमध्यें विचारक्षेत्रांत केवढी महत्त्वाची भर घातली; परंतु रोमची अमदानी इतकी दीर्घकाळ चालूनही त्याच्या हातून या क्षेत्रांत म्हणण्यासारखें महत्त्वाचें कांहींच कार्य झालें नाहीं, हीं मात्र मोठी विचित्र गोष्ट आहे: तसें पाहिलें तर रोमन संस्कृति म्हणजे पुष्कळ बाबतींत हेलनिक संस्कृतीची निव्वळ अंधुक छाया मात्र होती. एका बाबतींत मात्र रोमनें नवीनच पुढाकार घेतला असें मानतात. तो म्हणजे कायद्याच्या क्षेत्रांत. आज पश्चिमेकडे वकिलांना रोमन कायद्यांचा अभ्यास करावा लागतो; कारण यूरपमधील बहुतेक साऱ्या कायद्यांचें मूळ रोमन कायद्यांमध्यें आहे.

ब्रिटिश साम्राज्य हें रोमन साम्राज्यासारखें आहे असें मानलें जातें. विशेषतः इंग्रजांची अशी समजूत आहे आणि त्याबद्दल त्यांना मोठें समाधान वाटत असतें. तसें पाहिलें तर सगळींच साम्राज्यें थोड्याफार प्रमाणांत एकमेकांसारखीं असतात. पुष्कळांची पिळणूक करूनच तीं पुष्ट होत असतात. पण याहून आणखी एक मोठें प्रबळ साम्य इंग्लिश आणि रोमन लोकांमध्यें आहे; दोघांच्याही ठिकाणीं कल्पनाशक्तीचा विशेषच आश्चर्यकारक अभाव आहे. राहणी मोठी टापटिपीची, मनानें आपलें जें आहे तेवढ्यावरच संतुष्ट; आणि सारें जग जणुं कांहीं खास आपल्याच उपयोगासाठीं आहे अशी पक्की श्रद्धा; अशा या लोकांच्या जीवितांत कधीं म्हणून संशयाच्या किंवा अडचणीच्या लाटांची खळबळ क्षणमात्रही उत्पन्न होत नाहीं.

३५

पार्थिया आणि सस्सन लोक

२६ एप्रिल, १९३२

रोमचें साम्राज्य आणि यूरप यांची रजा घेऊन आपल्याला आतां जगाच्या इतर भागांना भेट द्यायला गेलें पाहिजे. इकडे आशियांत काय घडलें हें आपल्याला पाहिलें पाहिजे आणि चीन व हिंदुस्थान यांची गोष्ट पुढें सांगितली पाहिजे. ज्ञात इतिहासाच्या प्रांतांत आतां यामध्यें दुसऱ्या आणखी देशांचा उदय होतो. त्यांच्याबद्दलही थोडें थोडें बोलणें आपल्याला करायला हवें. अशा रीतीनें पुढें जात असतां खरोखर इतक्या पुष्कळ ठिकाणांबद्दल लिहिण्याचा प्रसंग येणार आहे, कीं आपल्याला कांहीं हें काम

जमत नाहीं म्हणून निराशेनें मी लिहिण्याचेंच बंद करीन कीं काय अशी मला भीति वाटते.

माझ्या एका पत्रामध्यें पार्थिया देशांत कऱ्हा येथें रोमच्या प्रजासत्ताक राज्याच्या सैन्याचा मोठा पराभव झाला असा उल्लेख मीं केला आहे. हे पार्थियन लोक कोण, कुठले आणि आज जेथें इराण आणि मेसापोटेमिया आहेत त्या प्रदेशांत त्यांनीं एक राज्य कसें स्थापन केलें होतें, हें मात्र तुला सांगण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं. अॅलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याचा सेनापति सेल्युकस व त्याचे वंशज यांचें एक साम्राज्य हिंदुस्थानपासून पश्चिमेकडे आशिया मायनरपर्यंत पसरलेलें होतें हें तुला आठवत असेल. सुमारें २०० वर्षेंपर्यंत त्यांचा अमल चालू होता. परंतु अखेरीस मध्य आशियांतील पार्थियन नांवाच्या एका टोळीच्या लोकांनीं त्यांना या प्रदेशांतून हुसकून लावलें. इराणला त्या वेळीं पर्शिया किंवा पार्थिया (पृथुराष्ट्र) म्हणत. तेथें या पार्थियन लोकांनींच रोमन प्रजासत्ताक राज्याच्या अखेरच्या काळांत रोमन लोकांचा पराभव केला; आणि मागून आलेल्या रोमन साम्राज्यालाही या पार्थियन लोकांचा पुरा पराभव केव्हांच करतां आला नाहीं. या लोकांचें राज्य पार्थियामध्यें अडीचशें वर्षें चाललें. पुढें अखेरीस आपसांतील यादवीमुळें त्यांचें राज्य तेथून नाहींसें झालें. पार्थियांतील इराणमधील मूळचे जे लोक होते त्यांनींच या परकी राज्यकर्त्यांविरुद्ध बंड केलें. आपल्याच वंशांतील व धर्मांतील एकाची त्यांच्या जागीं त्यांनीं स्थापना केली. हाच पहिला आर्देशीर राजा होय व त्याच्या घराण्याला सस्सन राजवंश म्हणतात. आर्देशीर हा झोरोॲस्ट्रियन धर्माचा, म्हणजेच पारशी लोकांच्या धर्माचा कट्टा पुरस्कर्ता होता आणि हे सस्सन लोक आणि रोमन लोक यांच्यामध्यें अगदीं सतत युद्ध जुंपलेलें होतें. एका रोमन बादशहाला त्यांनीं पकडून सुद्धां आणलें होतें. पुष्कळ पार्थियन सैन्यें अगदीं थेट कॉन्स्टान्टिनोपलपर्यंत सुद्धां जाऊन पोंचलीं होतीं. एकदां त्यांनीं ईजिप्त देश जिंकला होता. सस्सनांचें साम्राज्य हें झोरोॲस्ट्रियन धर्माबद्दलच्या निष्ठेसाठीं विशेष प्रसिद्ध आहे. पुढें सतराव्या शतकांत इस्लाम धर्माचा उदय झाला. तेव्हां त्यानें सस्सन साम्राज्य आणि त्याचा अधिकृत धर्म या दोघांचाही नाश केला. देशांतील धर्मांत झालेल्या या बदलामुळें व छळ होण्याच्या भीतीनें कितीएक झोरोॲस्ट्रियन लोकांनीं देशत्यागाचा मार्ग पत्करला आणि ते हिंदुस्थानांत आले. जे जे कोणी आसऱ्याला आले, त्यांचें हिंदुस्थान आजपर्यंत नेहमींच स्वागत करीत आला आहे. त्याप्रमाणें त्यांचेंही त्यानें स्वागत केलें. हिंदुस्थानांतले आजचे पारशी लोक हे त्याच झोरोॲस्ट्रियन लोकांचे वंशज होत.

निरानिराळ्या धर्मांची इतर देशांत कशी संभावना झाली आणि त्यांची हिंदुस्थानांत कशी संभावना झाली या गोष्टीची तुलना केली असतां मोठा चमत्कार वाटतो; आणि हिंदुस्थानचा कांहीं एक विशेष स्वभाव नजरेंत भरतो. बहुतेक सर्व ठिकाणीं आणि विशेषतः यूरपमध्यें पूर्वीं अधिकृत धर्मांचा स्वीकार जे कोणी करीत नसत, ते इतर

कोणत्याही मताचे असले तरी त्या सर्वांना अत्यंत असहिष्णुतेनें वागविण्यांत येई व त्यांचा फार छळ होई असें तुला आढळून येईल. धर्मांबद्दल सर्वत्रच जवळजवळ सक्तीचा अवलंब केला जात असे. यूरपमध्यें अत्यंत भयंकर असा जो इन्क्विझिशनचा (धार्मिक शिक्षासत्रांचा) प्रकार होता त्याबद्दल आणि चेंटक्या म्हणून स्त्रियांना जाळण्याची जी पद्धति होती तीबद्दल पुढें तूं इतिहासांत वाचशीलच. परंतु हिंदुस्थानांत मात्र प्राचीन काळीं धर्मांबद्दल पूर्ण सहिष्णुता नांदत होती. हिंदुधर्म व बुद्धधर्म यांच्यामध्यें थोडासा विरोध झाला हें खरें; परंतु पश्चिमेकडील निरनिराळ्या धर्मपंथांतील अत्याचारपूर्ण झगड्यांच्या मानानें हा विरोध म्हणजे कांहींच नव्हे, ही गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. कारण अलीकडे आपल्या देशांत धार्मिक आणि जातीय तंटे सुरू झाले आहेत; आणि इतिहासाच्या अज्ञानामुळें कांहीं लोकांची समजूत अशी आहे, कीं हिंदुस्थानच्या नशिबाला हे असले झगडे थेट प्राचीन काळापासून लागलेले आहेत. तुला आढळून येईल, कीं इस्लामच्या उदयानंतर कितीक शतकेंपर्यंत मुसलमान लोक हिंदुस्थानांत सर्व प्रांतांत आपल्या हिंदू शेजाऱ्यांबरोबर अत्यंत गुण्यागोविंदानें राहत होते. व्यापार करायला म्हणून मुसलमान लोक इकडे आले तेव्हां या देशांतील लोकांनीं त्यांचें स्वागतच केलें आणि त्यांना येथें वसाहत करायला प्रोत्साहन दिलें. परंतु पुन्हां मी फार पुढच्या काळच्या गोष्टी सांगायला लागलों.

तेव्हां मी सांगत काय होतों, कीं हिंदुस्थाननें झोरोऑस्ट्रियन लोकांचें स्वागत केलें; यापूर्वी कांहीं शतकें, ख्रिस्तानंतर पहिल्या शतकांत छळाला कंटाळून ज्यू लोक रोममधून पळून आले होते, त्यांनाही हिंदुस्थाननें असाच आसरा दिला होता.

पर्शियामध्यें–इराणमध्यें–सस्सन घराण्याचा अमल चालू होता. त्याच काळांत सीरिया प्रांतांतील निर्जन प्रदेशांतच पामीर डोंगराच्या पठारावर एक लहानसें राज्य स्थापन झालें होतें; व कांहीं काळ त्यानें वैभवही भोगलें. सीरियांतील वालुकामय प्रदेशामध्यें पामीरा उर्फ ताडमोर नगरी ही एक व्यापारी पेठ होती. त्या ठिकाणच्या इमारती केवढ्या प्रचंड असल्या पाहिजेत हें आज जे त्यांचे मोडकेतोडके अवशेष पाहायला सांपडतात, त्यांवरून सहज दिसून येतें. एकदां या राज्याची झेनोबिया नांवाची स्त्री राणी होती. परंतु तिचा रोमन लोकांनीं पराभव केला; आणि हे लोक इतके स्त्रीदाक्षिण्यविरहित किंवा शिष्टाचारविरहित होते, कीं त्यांनीं तिला बेड्या घालून रोमला नेलें!

ख्रिस्ती शकाच्या सुरुवातीला सीरिया हा मोठा मनोहर प्रदेश होता. नव्या करारामध्यें त्यासंबंधीं माहिती सांपडते. जरी येथलें राज्य जुलमी आणि बेबंदशाहीचें होतें, तरी त्या काळीं या देशांत मोठमोठीं शहरें होतीं आणि लोकसंख्याही बरीच दाट होती. त्यामध्यें मोठाले कालवे होते आणि व्यापारधंदाही फार मोठा होता. परंतु सहाशें वर्षांच्या सततच्या लढ्यांमुळें व बेबंद राज्यकारभारामुळें हा प्रदेश अगदीं वैराण बनून गेला; सगळीं मोठीं शहरें उजाड झालीं आणि इमारतींचा विध्वंस झाला.

हिंदुस्थानांतून यूरपकडे तूं कधीं विमानांतून गेलीस, तर तुला या पामीरा आणि बालबेक यांच्या आसपासच्या निर्जन मैदानावरून जावें लागेल. तसेंच बॉबिलॉन शहर ज्या ठिकाणीं होतें आणि दुसरींही कितीएक इतिहासप्रसिद्ध स्थळें ज्या ठिकाणीं होतीं तीं ठिकाणेंही पहावयास मिळतील; पण आतां आज हें पत्र येथेंच पुरे.

३६

दक्षिण हिंदुस्थानच्या वसाहती

२८ एप्रिल, १९३२

अलीकडे आपण फार दूर दूर भटकतों आहों. आता जरा आपल्या हिंदुस्थानकडे परत येऊं या आणि आमचे पूर्वज या देशांत काय करीत होते नें पाहूं या. सरहद्दीवरील कुशानांच्या साम्राज्याबद्दल आपण बोलत होतों तें तुला आठवत असेल. हें एक मोठें बुद्धधर्मीय राज्य होतें. जवळजवळ सर्व उत्तर हिंदुस्थान व मध्य आशियाचा कांहीं भाग त्यानें व्यापलेला होता आणि पुरुषपूर किंवा हल्लींचें पेशावर हें त्याची राजधानी होतें. तसेंच याच सुमारास दक्षिणेमध्येंही एक या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत पसरलेलें मोठें राज्य होतें हेंही बहुधा तुला आठवत असेल. हें आंध्रांचें राज्य होय. कुशान आणि आंध्र यांचीं राज्यें ३०० वर्षेंपर्यंत भरभराटींत राहिलीं. खिस्तानंतर तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हीं दोन्ही साम्राज्यें नष्ट झालीं आणि मग कांहीं काळपर्यंत हिंदुस्थानांत बरींचशीं छोटीं छोटीं राज्येंच राज्य करीत होतीं. परंतु शंभर वर्षांच्या आंतच पाटलिपुत्रामध्यें दुसरा एक चंद्रगुप्त राजा झाला आणि त्याच्यापासून हिंदूंच्या साम्राज्यशाही आक्रमणाला सुरुवात झाली. या घराण्याचें नांव गुप्त असें होतें. परंतु त्याच्याकडे जाण्यापूर्वी दक्षिणेकडील लोकांनीं जे मोठमोठे अचाट साहसी उद्योग केले आणि ज्यामुळें हिंदी कला आणि संस्कृति पूर्वेकडील दूरवरच्या बेटांपर्यंत जाऊन पोंचली, त्या त्यांच्या सुरुवातीच्या काळाकडे आधीं आपण थोडीशी नजर टाकून आलों तर ठीक होईल.

उत्तरेकडे हिमालय आणि खालीं दोन बाजूंना दोन समुद्र हें हिंदुस्थानचें स्वरूप तुझ्या चांगल्या परिचयाचें आहे. उत्तरेकडचा भाग समुद्रापासून फारच दूर आहे. तिकडच्या लोकांचें सर्व लक्ष तिकडच्या भूमिगत सरहद्दीकडेच लागलेलें असे; याच सरहद्दीपलीकडून शत्रू आणि स्वाऱ्या करणारे लोक येत असत; परंतु आपल्या पश्चिमेकडे, पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे केवढा प्रचंड समुद्रकिनारा आहे; दक्षिणेकडे तेवढा देश निमुळता होत गेला असून अखेरीस केप कामोरीन म्हणजेच कन्याकुमारीपाशीं पूर्व आणि पाश्चिम याचा संगम झाला आहे. या सर्व मोठ्या किनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांचें

लक्ष समुद्राकडे लागलेलें असणें स्वाभाविकच होतें; आणि त्यांच्यापैकीं पुष्कळ जण दर्यावर्दी लोक असावेत अशी सहजच कोणाचीही अपेक्षा असणार. अगदीं प्राचीन काळापासून दक्षिण हिंदुस्थानचा पश्चिमेकडील प्रदेशांशीं फार मोठा व्यापार चालू होता हें तुला मीं सांगितलेंच आहे. त्यामुळें प्राचीन काळापासूनच हिंदुस्थानांत जहाजें बांधण्याचे कारखाने अस्तित्वांत होते आणि व्यापाराच्या किंवा साहसजन्य अकल्पित लाभाच्या शोधार्थ लोक निरनिराळे समुद्र ओलांडून इकडे तिकडे जात असत यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. इकडे गौतम बुद्ध हयात होता त्याच काळीं दक्षिणेकडील विजय नांवाच्या राजानें सिलोनमध्यें जाऊन तें बेट जिंकलें होतें अशी सर्वसाधारण समजूत आहे. अजंठ्याच्या लेण्यामध्यें याबद्दलचें एक चित्र आहे. त्यामध्यें विजय राजा समुद्र ओलांडून सिलोनमध्यें जातो आहे व त्याच्याबरोबर पुष्कळ घोडे व हत्ती जहाजांवरून पलीकडे नेले जात आहेत असें दाखविलें आहे. विजयानें या बेटाला सिंहल – सिंहलद्वीप – असें नांव दिलें. सिंहल हें नांव सिंह या शब्दापासून निघालेलें आहे; या सिंहाच्या संबंधीं सिलोनमध्यें एक जुनी दंतकथाही प्रचलित आहे. परंतु ती माझ्या लक्षांत नाहीं आतां. मला वाटतें, सिलोन हा शब्दही या सिंहल शब्दापासूनच निघालेला असावा.

हिंदुस्थानांतून सिलोनमध्यें जाण्यासाठीं एवढासा अरुंद समुद्र ओलांडून जाणें हें काहीं विशेष पराक्रमाचें काम होतें असें मुळींच नाहीं. परंतु या देशामध्यें जहाजें बांधण्याचा धंदा चालू होता आणि बंगालच्या उपसागरापासून तों थेट गुजरातपर्यंत किनाऱ्यावर माळेंतील मण्यांप्रमाणें जीं अनेक बंदरें होतीं त्यांमधून लोक समुद्रापलीकडे सफरी करायला नेहमीं जात असत, याबद्दलही आपल्याला भरपूर पुरावा सांपडतो. चाणक्यानें (चंद्रगुप्त मौर्याचा मंत्री) आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथांत आरमाराबद्दल थोडेफार लिहिलेलें आपणांस आढळतें. त्याबद्दल नैनीच्या तुरुंगांतून मीं तुला लिहिलें होतें. चंद्रगुप्ताच्या दरबारांतील ग्रीक वकील मेगॅस्थिनीस यानेंही या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून असें दिसतें, कीं मौर्यांच्या काळाच्या सुरुवातीलासुद्धां जहाजें बांधण्याचा धंदा हिंदुस्थानांत चांगला भरभराटींत होता. आणि एवढीं जहाजें बांधलीं जात होतीं तीं कांहीं निव्वळ पाडून ठेवण्यासाठीं कोणी बांधणार नाहीं. त्यांचा उपयोग होतच असला पाहिजे, ही उघड गोष्ट आहे. तेव्हां या जहाजांतून पुष्कळच लोक समुद्रपार जात असले पाहिजेत. या गोष्टीचा विचार केला आणि आजच्या घटकेला आमच्यांपैकीं कांहीं लोक समुद्रपार प्रवास करण्याला भितात, तें त्यांना आपल्या धर्माच्या विरुद्ध वाटतें, हें पाहिलें म्हणजे मोठेंच आश्चर्य वाटतें; हे असले लोक जुन्या पुराण्या काळच्या अवस्थेचे नमुने आहेत असें सुद्धां आपल्याला म्हणतां येणार नाहीं. कारण आमचे पूर्वज लोक यांच्यापेक्षां पुष्कळच शहाणे होते असें दिसतें. आनंदाची गोष्ट इतकीच, कीं असल्या अलौकिक विचारांचे लोक आतां जवळजवळ नाहींसे होत आले आहेत, आणि अगदींच थोडया लोकांच्या मनावर आतां अशा विचारांचा पगडा राहिलेला आहे.

उत्तरेकडच्यापेक्षां स्वाभाविकच दक्षिणेकडील लोक दर्यावर्दीपणाकडे अधिक झुकले. परदेशाचा व्यापार हा बहुतेक सर्व दक्षिण हिंदुस्थानशींच होई. तामीळ वाङ्मयांत यवनांची दारू, भांडीं आणि दिवे यांबद्दल जागोजाग उल्लेख सांपडतात. 'यवन' हा शब्द मुख्यतः ग्रीक लोकांचा वाचक म्हणून वापरीत, परंतु इतरही परकी लोकांचा त्यामध्यें अंतर्भाव केला जाई. दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकांतील आंध्रांच्या नाण्यावर दोन शिडांच्या जहाजाचा ठसा आढळतो. त्यावरून जहाजें बांधणें आणि समुद्रावरून व्यापार करणें याबद्दल आंध्र लोकांना किती मोठी आस्था वाटत असली पाहिजे, हें चांगलें दिसून येण्यासारखें आहे.

अशा स्थितींत हिंदुस्थानच्या वसाहती पूर्वेकडील सर्व बेटांवर वसाविण्याच्या कार्याची सुरुवात ज्यामधून झाली तें मोठें अचाट साहसकर्म करण्याचा मान दक्षिण हिंदुस्थानला मिळाला हें सहजच आहे. वसाहतीसाठीं स्वाऱ्या करण्याची ही प्रथा ख्रिस्तानंतर पहिल्या शतकांत सुरू झाली आणि पुढें कितीएक शतकांपर्यंत ती चालू राहिली. मलाया (मलयु किंवा मलयद्वीप), जावा (यावा किंवा यवद्वीप), सुमात्रा, कँबोडिया (उर्फ कांबोजद्वीप), बोर्निओ, इकडे सगळीकडे या स्वाऱ्या झाल्या. त्या ठिकाणीं हिंदी वसाहती स्थापन झाल्या आणि त्याबरोबरच हिंदी कला, संस्कृति यांचाही तेथें प्रवेश झाला. ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना यांमध्येंही मोठमोठ्या हिंदी वसाहती होत्या. त्या ठिकाणच्या आपल्या नव्या शहरांना आणि वसाहतींना या स्वाऱ्या करणारांनीं नांवें दिलीं तीं सुद्धां हिंदुस्थानमधील होतीं; उदाहरणार्थ, अयोध्या, हस्तिनापूर, तक्षशिला, गांधार हीं नांवें पहा. इतिहासाची किती चमत्कारिक पुनरावृत्ति होते पहा! अँग्लो-सॅक्सन वसाहतवाले अमेरिकेंत गेले त्यांनीं अगदीं हाच प्रकार केला; आज सुद्धां जुन्या इंग्लंडमधील शहरांचीं त्यांनीं अमेरिकेंतील शहरांना दिलेलीं नांवें प्रचलित आहेत.

वसाहती करायला जाणारे लोक जिकडे तिकडे नेहमींच करतात, त्याप्रमाणें या हिंदी वसाहतवाल्यांनींही पुष्कळ प्रकारें अयोग्य वर्तन केलें यांत कांहींच शंका नाहीं. त्यांनींही या बेटांतील लोकांची पिळणूक केली आणि त्यांच्यावर प्रभुत्व गाजविलें. परंतु त्या त्या ठिकाणांहून हिंदुस्थानशीं अगदीं एकसारखा अप्रतिहत संबंध ठेवणें शक्य नसल्यामुळें हळूहळू हे वसाहतवाले व तेथील मूळचे लोक हे एकमेकांत मिसळून गेले असले पाहिजेत. या पूर्वेकडच्या बेटांत प्रथम हिंदू राज्यें व साम्राज्यें स्थापन झालीं, मागून बुद्धधर्मीय राज्यकर्ते तेथें आले; आणि तेथल्या स्वामित्वाबद्दल या हिंदू आणि बुद्ध राज्यांमध्यें झगडा सुरू आला. बृहद्भारताची किंवा विशाल भारताची ही कथा मोठी मनोरंजक आहे आणि फार प्रचंडही आहे. जुन्या मोठमोठ्या मंदिरांचे-इमारतींचे जे प्रचंड अवशेष आजही पहायला मिळतात, त्यांवरून या वसाहतींमधील सुंदर आणि भूषणभूत बांधकामाची कल्पना येते. हिंदी शिल्पकारांनीं आणि कारागिरांनीं तिकडे कांबोज, श्रीविजय, अंकोरथोम, किंवा शानदार (डौलदार) अंकोर, मज्झपाहित (मध्यमाहित) अशांसारखीं मोठमोठीं शहरें बांधलीं होतीं.


हिमालय पर्वत
हिंदुस्थान
चीन देश
ब्रह्मदेश
अराकान
पेगू
सयाम
मलाया
अंदमान
निकोबार
सिंगापूर
जावा
बोर्निओ
सेलिबीस
न्यू गिनी
फिलिपाइन बेटे
फॉर्मोसा
कोरिया
जपान
सखालीन बेट
कामस्चाटका
अल्यूशन बेटे
अलास्का
कॅनडा
ग्रीनलंड
आइसलंड
युरोप
आशिया
आफ्रिका
अमेरिका
ऑस्ट्रेलिया
हिंदुस्थान देश
(पृष्ठ ४६ वे पहा.)
हिंदुस्थानच्या सभोवतालचे देश व समुद्र

सुमारें १४०० वर्षेंपर्यंत हिंदू आणि बुद्ध धर्मीय राजांचा अमल या बेटांमध्यें चालू राहिला. या काळांत वर्चस्वासाठीं या दोन धर्मांच्या राज्यांमध्यें झगडा चालूच असे; कधीं हे तर कधीं ते असे तेथें प्रमुखत्वानें राज्य करीत; केव्हां केव्हां कांहीं कालपर्यंत एकमेक एकमेकांचा संपूर्ण °पाडाव करीत. पंधराव्या शतकांत मात्र त्या दोघांनाही जिंकून मुसलमान लोकांनीं तेथें आपली संपूर्ण सत्ता स्थापन केली. त्यांच्या नंतर लौकरच तेथें पोर्तुगीज आणि स्पॅनिश लोक आले; त्यांच्यापाठोपाठ डच आणि इंग्रज आले. सगळ्यांच्या शेवटीं अमेरिकनही आले. चिनी लोक तर या प्रदेशाचे कायमचे आणि जवळचेच शेजारी. तेही मधून मधून आपला हात °त्यामध्यें शिरकविण्याचा प्रयत्न करीतच असत; केव्हां केव्हां त्यांनीं तो प्रदेश जिंकलाही होता. परंतु सामान्यतः चिनी लोक या प्रदेशाशीं सख्यत्वानेंच वागत आणि केव्हां केव्हां कांहीं भेटीही त्यांच्यामधील लोकांना पाठवीत. अर्थात् चिनी लोकांच्या महान् संस्कृतीचा, विद्यांचा आणि सुधारणेचा येथील लोकांवर परिणाम मात्र सदैव होतच होता.

हिंदुस्थानच्या या पूर्वेकडील वसाहतींच्या चाचतींत आपलें चित्त वेधून घेण्यासारख्या पुष्कळच गोष्टी आहेत. त्यांतली सगळ्यांत अधिक डोळ्यांत भरण्यासारखी गोष्ट ही आहे, कीं हें वसाहतींचें कार्य उघड उघड त्या काळच्या दक्षिण हिंदुस्थानांतील एका प्रमुख राज्यानें आपल्या अंगावर घेतलेलें होतें. अर्थात् त्यापूर्वी एकेकट्या व्यक्ती संशोधनबुद्धीनें त्या प्रदेशांत पुष्कळच गेलेल्या असणार. पुढें पुढें व्यापार वाढला तसतशीं कांहीं कुटुंबें किंवा समूहही आपल्याच जबाबदारीवर तेथें जाऊन वसाहतीही करून राहिले असतील. अशा तऱ्हेचे अगदीं पहिले वसाहतवाले हे कलिंगामधील (ओरिसा) होते असें म्हणतात. बंगालमधीलही कांहीं लोक त्यांत होते. अशीही एक परंपरागत समजूत आहे, कीं गुजरातमधलेही कांहीं लोक देशांतून हांकलून दिल्यामुळें या बेटांत राहायला गेले होते. पण हे सारे तर्क आहेत. वसाहतवाल्यांचा खरा मुख्य ओघ हा पल्हवांच्या देशांतून गेलेला आढळतो. हा देश म्हणजे तामीलनाडचा दक्षिणेकडील भाग असून त्यावर महान् पल्हव वंशाचें राज्य होतें. या पल्हवांच्या राज्यानेंच मॅलेशियाच्या वसाहतीचें कार्य योजून घडवून आणलें असें दिसतें. उत्तर हिंदुस्थानांतील लोक दक्षिणेकडे अधिकाधिक घुसूं लागल्यामुळें वाढत्या लोकसंख्येच्या दडपणामुळेंही त्यांना असें करावें लागलें असेल. कारण कांहींही असो, हिंदुस्थानपासून दूरच्या भागांत आणि एकमेकांपासून दूर दूर पसरलेल्या या भूमिभागांत वसाहती स्थापण्याची ही योजना जाणूनबुजून विचारपूर्वकच आंखण्यांत आली आणि या सर्व ठिकाणीं एकाच वेळीं वसाहतींची सुरुवात करण्यांत आली. या वसाहती इंडोचायना, मलाया द्वीपकल्प, बोर्निओ, सुमात्रा, जावा या व इतर ठिकाणींही पसरल्या होत्या. या सर्व वसाहती पल्हव राजांच्या होत्या आणि त्यांचीं नांवें हिंदुस्थानमधीलच होतीं. इंडोचायनांतील वसाहतीस कांबोज हें नांव होतें (यालाच आज कँबोडिया असें म्हणतात). हें नाव दूर गांधार देशांतील

काबूलच्या खोऱ्यामधील कांबोज या गांवापासून इतका दूर प्रवास करीत आलेलें आहे.

सुमारें ४०० ते ५०० वर्षें या वसाहती धर्मानें हिंदू राहिल्या. नंतर हळूहळू त्यांमध्यें सर्वत्र बुद्धधर्म फैलावला. यानंतर पुष्कळ काळानें इस्लाम धर्म येऊन तो चोहोंकडे तेथें पसरला आणि कांहीं थोड्या भागांतच मात्र बुद्धधर्म शिल्लक राहिला.

मॅलेशियामध्यें पुष्कळ निरनिराळ्या साम्राज्यांचे अमल होऊन गेले. परंतु दक्षिण हिंदुस्थानांतील लोकाच्या या वसाहतीच्या कार्याचा एक म्हणण्यासारखा परिणाम हा, कीं भारतीय आर्यांच्यां संस्कृतीचा प्रवेश त्यामुळें जगाच्या या भागांत झाला; आणि आजकालचे मॅलेशियांतील लोक हेही कांहीं अंशीं आम्ही ज्या संस्कृतीचे वंशज आहों त्याच भारतीय आर्यसंस्कृतीचे वंशज आहेत, असें म्हणतां येण्यासारखें आहे. त्यांच्यावरही आमच्याप्रमाणेंच इतरही दुसऱ्या संस्कृतींचा परिणाम झालेला आहे. चिनी संस्कृतीचा तर विशेषच; आणि मॅलेशियांतील निरनिराळ्या भागांत दिसून येणारें या दोन्ही संस्कृतींचें – चिनी आणि भारतीय संस्कृतींचें – मिश्रण मोठें पाहण्यासारखें आहे. कांहींमध्यें भारतीय संस्कृतीचा प्रभाव अधिक आहे; तर कांहींत चिनी संस्कृतीचें स्वरूप अधिक आढळून येतें. ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना या सलग प्रांतांत चिनी संस्कृतीचा प्रभाव अधिक आढळतो, पण तसा तो मलायांत दिसून येत नाहीं. जावा, सुमात्रा आणि इतरही बेटांमधून मात्र भारतीय संस्कृतीचा ठसा अधिक आढळतो, आणि अधूनमधून वरवरचें आवरण तेवढें इस्लामी संस्कृतीचें दिसून येतें.

पण चिनी आणि भारतीय संस्कृतीच्या या वर्चस्वाच्या वादींत झगडा झालेला आढळत नाहीं. या दोन्ही संस्कृती परस्परांहून आहेत अगदींच निराळ्या. परंतु कांहीं तंटा-बखेडा न होतां दोन्ही संस्कृतींचें कार्य येथें जोडीनें चालू राहूं शकलें. तेथील धर्माच्या बाबतींत मात्र हिंदुस्थान हें एकच मूळ उगमस्थान होतें. मग तो हिंदुधर्म असो वा बुद्धधर्म असो. कारण खुद्द चीनमधल्या धर्माचें मूळही हिंदुस्थानांतच होतें. कलेच्या प्रांतांतही मॅलेशियामध्यें हिंदुस्थानचेंच संपूर्ण आणि अबाधित वर्चस्व होतें. इंडोचायनामध्यें तर चिनी संस्कृतीचें प्रभुत्व फार मोठें. परंतु तेथेंही शिल्पकला सर्वथा भारतीयच होती. चीनच्या सुधारणेचा परिणाम या खंडांतील देशांत मुख्यतः राज्यव्यवस्था आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान या बाबतींत घडून आला. त्यामुळें इंडोचायना, ब्रह्मदेश आणि सयाम यांमधील लोक आचारविचारानें हिंदी लोकांपेक्षां चिनी लोकांना अधिक जवळचे भासतात. अर्थात् वांशिक दृष्ट्याही त्यांच्यामध्यें मंगोलियन रक्त अधिक आहे. त्यामुळें दिसायला कांहीं प्रमाणात ते चिनी लोकांसारखेच दिसतात.

जावा बेटांत बोरोबदूर येथें हिंदी कारागिरांनीं बांधलेल्या बुद्ध मंदिरांचे अवशेष आहेत. बुद्धाच्या जीवनाची संपूर्ण कथा या इमारतींच्या दर्शनी भिंतीवर कोरलेली आहे आणि बुद्धांचें स्मारक म्हणून नव्हे, तर त्या काळच्या हिंदी कलेचा नमुना म्हणूनही हे अवशेष अलौकिक आहेत.

हिंदी सत्तेचा फैलाव या प्रदेशांच्याही पलीकडे पुष्कळ दूरवर झाला होता. फिलिपाइन्समध्यें आणि फोर्मोसा बेटामध्येंही तिचा शिरकाव झाला होता. कांहीं काळपर्यंत हीं दोन्ही बेटें सुमात्रामधील श्रीविजयाच्या हिंदु राज्यांचाच एक भाग होतीं. त्यानंतर पुष्कळ काळानें फिलिपाइन्समध्यें स्पॅनिश लोकांचा अमल सुरू झाला आणि आज तीं अमेरिकेच्या ताब्यांत आहेत. फिलिपाइन्स बेटांची राजधानी मॅनिला हें शहर आहे. नुकतीच तेथें नवीन कायदेमंडळासाठीं एक इमारत बांधण्यांत आली. तिच्या दर्शनी भिंतीवर फिलिपाइन्समधील संस्कृतीच्या उगमाच्या निदर्शक अशा चार आकृती उभारण्यांत आल्या आहेत. या आकृतींपैकी दोन प्राचीन हिंदुस्थानच्या धर्मशास्त्रकार मनु व चिनी तत्त्वज्ञ लौ चे यांच्या असून दुसऱ्या दोन अँग्लो-सॅक्सन व स्पॅनिश कायदा व न्याय यांच्या निदर्शक आहेत.

३७

गुप्तांच्या अमलांतील हिंदु-साम्राज्यशाही

२९ एप्रिल, १९३२

दक्षिणेकडचे लोक इकडे समुद्रपार होऊन दूरदूरच्या देशांत जाऊन वसाहती आणि शहरें स्थापन करीत होते, तर तिकडे उत्तर हिंदुस्थानांत कांहीं निराळींच चमत्कारिक धामधूम व खळबळ सुरू होती. कुशानांच्या साम्राज्याचें सामर्थ्य आणि महत्त्व दोन्ही नाहींशीं झालीं होतीं आणि तें विस्तारानेंही लहान लहान होत जाऊन विरून जाण्याच्या पंथाला लागलें होतें. सगळ्या उत्तर हिंदुस्थानभर छोटीं छोटीं राज्यें प्रस्थापित झालीं होतीं आणि त्यांमध्यें बहुतेक ठिकाणीं वायव्य सरहद्दीपलीकडून हिंदुस्थानांत आलेल्या शक, सिथियन, तुर्क यांसारख्या लोकांचा अमल चालू होता. मीं सांगितलेंच आहे तुला, कीं हे लोक बुद्धधर्मीय असून हिंदुस्थानांत शत्रू म्हणून लूटमार करण्यासाठीं नव्हे, तर येथें वसाहत करून राहण्यासाठीं आलेले होते. मध्य आशियांतील दुसऱ्या टोळ्यांनीं त्यांना मागून येऊन निर्दयपणें खालीं रेटलें होतें; आणि या दुसऱ्या टोळ्यांना चिनी राज्यानें पुढें रेटलें होतें. हिंदुस्थानांत आल्यावर या लोकांनीं भारतीय आर्यांच्या रीतीभाती आणि परंपरा यांचा पुष्कळ प्रमाणांत स्वीकार केला. आपला धर्म, विद्या, संस्कृति यांची जन्मभूमि या दृष्टीनें हिंदुस्थानकडे हे लोक आदरभावानेंच पाहत. प्रत्यक्ष कुशान लोकानीं सुद्धां भारतीय आर्यांच्या चालीरीतींचाच फार मोठ्या प्रमाणांत अवलंब केलेला होता. त्यामुळेंच तर त्यांना हिंदुस्थानांत वसाहत करतां आली आणि इतक्या दीर्घकाळपर्यंत येथें एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर राज्य करतां आलें, भारतीय आर्यांप्रमाणेंच राहणी ठेवण्याचा ते प्रयत्न करीत आणि आपण परकी

आहोंत ही गोष्ट येथील लोकाच्या लक्षात सुद्धां राहूं नये, अशी त्यांची इच्छा होती. थोडेंफार यशही जरी त्यांना या प्रयत्नामध्यें आलें, तरी संपूर्ण यश मात्र त्यांना लाभलें नाहीं. कारण आपल्यावर परकीयांचें राज्य चालू आहे ही गोष्ट देशांत, विशेषतः क्षत्रियांच्या मनांत, फार सलत होती. परकी अमलाखालीं त्यांचा कोंडमारा होऊन जात होता; त्यामुळें त्यांच्यामध्यें खळबळ वाढत होती आणि लोकांचीं मनें त्रस्त होऊन गेलीं होतीं. शेवटीं या असंतुष्ट लोकांना एक पुढारी मिळाला आणि त्याच्या निशाणाखालीं जमा होऊन या लोकांनीं आर्यावर्ताला स्वतंत्र करण्यासाठीं एक प्रकारचें धर्मयुद्धच सुरू केलें.

या पुढाऱ्याचें नांव चंद्रगुप्त. अशोकाचा आजा चंद्रगुप्त आणि हा चंद्रगुप्त यांचा गोंधळ मात्र करूं नकोस. या दुसऱ्या सद्गृहस्थाचा मौर्य घराण्याशीं कांहीं संबंध नाहीं. हें खरें, कीं पाटलिपुत्रांतच त्याचें एक अगदीं छोटेंसें राज्य होतें. परंतु त्या सुमारास अशोकाचे वंशज मात्र पार कोठें लोपून गेलेले होते. अर्थात् हें विसरतां उपयोगी नाहीं, कीं आतां आपण ख्रिस्तानंतर चौथ्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजे सुमारें इ. स. ३०८ च्या आसपास आलों आहों. अशोकाच्या मृत्यूनंतर ५३४ वर्षांनंतरचा हा काळ आहे.

हा दुसरा चंद्रगुप्त महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार होता. उत्तरेकडील इतर आर्य राजे आपल्याकडे वळवून घ्यावयाचे आणि त्या सर्वांचें मिळून एक प्रकारचें संयुक्त राज्य स्थापन करावयाचें या उद्योगाला त्यानें सुरुवात केली. अत्यंत प्रसिद्ध आणि प्रबळ अशा लिच्छवी वंशांतील कुमारीदेवीशीं त्यानें विवाह केला. आणि अशा रीतीनें या वंशाच्या लोकांचा पाठिंबा मिळविला. प्राथमिक तयारी सावधानपणें पुरी करून जमीन तयार झालीसें दिसल्यावर त्यानें हिंदुस्थानमधील सर्व परकी राज्यकर्त्यांविरुद्ध 'धर्मयुद्ध' पुकारलें. सर्व क्षत्रिय आणि आर्यांमधील वरिष्ठ वर्ग यांची सत्ता आणि अधिकारस्थानें या परकीयांच्यामुळें नाहींशीं झालेलीं होतीं. तेव्हां ते सर्व या लढाईच्या पाठीशीं होते. सुमारें बारा वर्षांच्या युद्धानंतर चंद्रगुप्ताच्या ताब्यांत, आज ज्याला आपण संयुक्त प्रांत म्हणतों त्या प्रदेशासह उत्तर हिंदुस्थानचा कांहीं भाग आला आणि त्यानें आपल्याला राजराजेश्वर अशी पदवी धारण करून राज्याभिषेक करवून घेतला.

अशा रीतीनें गुप्तांचें म्हणून म्हणतात तें घराणें सुरू झालें. हूण लोकांनीं येऊन त्याला त्रास द्यायला लागेपर्यंत सुमारें १०० वर्षें या घराण्याचा अमल चालू राहिला. कांहीं अंशीं हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्रवाद यांच्या आक्रमक प्रवृत्तीचा हा काळ होता. या काळांत भारतवर्षांत तुर्क, पार्थियन इत्यादि अनार्य असे जे परकी राजे होते, त्या सर्वांना मुळासकट उखडून काढून तरवारीच्या जोरावर बाहेर हांकलून देण्यांत आलें. अशा रीतीनें या काळांत वांशिक शत्रुत्व उदयास येऊन तें लोकांच्या हालचालींवर परिणाम करूं लागलें असें दिसतें. भारतीय आर्यांना आपल्या वंशाबद्दल अभिमान

हिंदी सत्तेचा फैलाव या प्रदेशांच्याही पलीकडे पुष्कळ दूरवर झाला होता. फिलिपाइन्समध्यें आणि फोर्मोसा बेटामध्येंही तिचा शिरकाव झाला होता. कांहीं काळपर्यंत हीं दोन्ही बेटें सुमात्रामधील श्रीविजयाच्या हिंदु राज्यांचाच एक भाग होतीं. त्यानंतर पुष्कळ काळानें फिलिपाइन्समध्यें स्पॅनिश लोकांचा अमल सुरू झाला आणि आज तीं अमेरिकेच्या ताब्यांत आहेत. फिलिपाइन्स बेटांची राजधानी मॅनिला हें शहर आहे. नुकतीच तेथें नवीन कायदेमंडळासाठीं एक इमारत बांधण्यांत आली. तिच्या दर्शनी भिंतीवर फिलिपाइन्समधील संस्कृतीच्या उगमाच्या निदर्शक अशा चार आकृती उभारण्यांत आल्या आहेत. या आकृतींपैकी दोन प्राचीन हिंदुस्थानचा धर्मशास्त्रकार मनु व चिनी तत्त्वज्ञ लौ चे यांच्या असून दुसऱ्या दोन अँग्लो-सॅक्सन व स्पॅनिश कायदा व न्याय यांच्या निदर्शक आहेत.

३७

गुप्तांच्या अमलांतील हिंदु-साम्राज्यशाही

२९ एप्रिल, १९३२

दक्षिणेकडचे लोक इकडे समुद्रपार होऊन दूरदूरच्या देशांत जाऊन वसाहती आणि शहरें स्थापन करीत होते, तर तिकडे उत्तर हिंदुस्थानांत कांहीं निराळीच चमत्कारिक धामधूम व खळबळ सुरू होती. कुशानांच्या साम्राज्याचें सामर्थ्य आणि महत्त्व दोन्ही नाहींशीं झालीं होतीं आणि तें विस्तारानेंही लहान लहान होत जाऊन विरून जाण्याच्या पंथाला लागलें होतें. सगळ्या उत्तर हिंदुस्थानभर छोटीं छोटीं राज्यें प्रस्थापित झालीं होतीं आणि त्यांमध्यें बहुतेक ठिकाणीं वायव्य सरहद्दीपलीकडून हिंदुस्थानांत आलेल्या शक, सिथियन, तुर्क यांसारख्या लोकांचा अमल चालू होता. मीं सांगितलेंच आहे तुला, कीं हे लोक बुद्धधर्मीय असून हिंदुस्थानांत शत्रू म्हणून लूटमार करण्यासाठीं नव्हे, तर येथें वसाहत करून राहण्यासाठीं आलेले होते. मध्य आशियांतील दुसऱ्या टोळ्यांनीं त्यांना मागून येऊन निर्दयपणें खालीं रेटलें होतें; आणि या दुसऱ्या टोळ्यांना चिनी राज्यानें पुढें रेटलें होतें. हिंदुस्थानांत आल्यावर या लोकांनीं भारतीय आर्यांच्या रीतीभाती आणि परंपरा यांचा पुष्कळ प्रमाणांत स्वीकार केला. आपला धर्म, विद्या, संस्कृति यांची जन्मभूमि या दृष्टीनें हिंदुस्थानकडे हे लोक आदरभावानेंच पाहत. प्रत्यक्ष कुशान लोकानीं सुद्धां भारतीय आर्यांच्या चालीरीतींचाच फार मोठ्या प्रमाणांत अवलंब केलेला होता. त्यामुळेंच तर त्यांना हिंदुस्थानांत वसाहत करतां आली आणि इतक्या दीर्घकाळपर्यंत येथें एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर राज्य करतां आलें, भारतीय आर्यांप्रमाणेंच राहणी ठेवण्याचा ते प्रयत्न करीत आणि आपण परकी

आहोंत ही गोष्ट येथील लोकाच्या लक्षात सुद्धां राहूं नये, अशी त्यांची इच्छा होती. थोडेंफार यशही जरी त्यांना या प्रयत्नामध्यें आलें, तरी संपूर्ण यश मात्र त्यांना लाभलें नाहीं. कारण आपल्यावर परकीयांचें राज्य चालू आहे ही गोष्ट देशांत, विशेषतः क्षत्रियांच्या मनांत, फार सलत होती. परकी अमलांखालीं त्यांचा कोंडमारा होऊन जात होता; त्यामुळें त्यांच्यामध्यें खळबळ वाढत होती आणि लोकांचीं मनें त्रस्त होऊन गेलीं होतीं. शेवटीं या असंतुष्ट लोकांना एक पुढारी मिळाला आणि त्याच्या निशाणाखालीं जमा होऊन या लोकांनीं आर्यावर्ताला स्वतंत्र करण्यासाठीं एक प्रकारचें धर्मयुद्धच सुरू केलें.

या पुढाऱ्याचें नांव चंद्रगुप्त. अशोकाचा आजा चंद्रगुप्त आणि हा चंद्रगुप्त यांचा गोंधळ मात्र करूं नकोस. या दुसऱ्या सद्गृहस्थाचा मौर्य घराण्याशीं कांहीं संबंध नाहीं. हें खरें, कीं पाटलिपुत्रांतच त्याचें एक अगदीं छोटेंसें राज्य होतें. परंतु त्या सुमारास अशोकाचे वंशज मात्र पार कोठें लोपून गेलेले होते. अर्थात् हें विसरतां उपयोगी नाहीं, कीं आतां आपण ख्रिस्तानंतर चौथ्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजे सुमारें इ. स. ३०८ च्या आसपास आलों आहों. अशोकाच्या मृत्यूनंतर ५३४ वर्षांनंतरचा हा काळ आहे.

हा दुसरा चंद्रगुप्त महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार होता. उत्तरेकडील इतर आर्य राजे आपल्याकडे वळवून घ्यावयाचे आणि त्या सर्वांचें मिळून एक प्रकारचें संयुक्त राज्य स्थापन करावयाचें या उद्योगाला त्यानें सुरुवात केली. अत्यंत प्रसिद्ध आणि प्रबळ अशा लिच्छवी वंशांतील कुमारीदेवीशीं त्यानें विवाह केला. आणि अशा रीतीनें या वंशाच्या लोकांचा पाठिंबा मिळविला. प्राथमिक तयारी सावधानपणें पुरी करून जमीन तयार झालीसें दिसल्यावर त्यानें हिंदुस्थानमधील सर्व परकी राज्यकर्त्यांविरुद्ध 'धर्मयुद्ध' पुकारलें. सर्व क्षात्रिय आणि आर्यांमधील वरिष्ठ वर्ग यांची सत्ता आणि अधिकारस्थानें या परकीयांच्यामुळें नाहींशीं झालेलीं होतीं. तेव्हां ते सर्व या लढाईच्या पाठीशीं होते. सुमारें बारा वर्षांच्या युद्धानंतर चंद्रगुप्ताच्या ताब्यांत, आज ज्याला आपण संयुक्त प्रांत म्हणतों त्या प्रदेशासह उत्तर हिंदुस्थानचा कांहीं भाग आला आणि त्यानें आपल्याला राजराजेश्वर अशी पदवी धारण करून राज्याभिषेक करवून घेतला.

अशा रीतीनें गुप्तांचें म्हणून म्हणतात तें घराणें सुरू झालें. हूण लोकांनीं येऊन त्याला त्रास द्यायला लागेपर्यंत सुमारें १०० वर्षें या घराण्याचा अमल चालू राहिला. कांहीं अंशीं हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्रवाद यांच्या आक्रमक प्रवृत्तीचा हा काळ होता. या काळांत भारतवर्षांत तुर्क, पार्थियन इत्यादि अनार्य असे जे परकी राजे होते, त्या सर्वांना मुळासकट उखडून काढून तरवारीच्या जोरावर बाहेर हांकलून देण्यांत आलें. अशा रीतीनें या काळांत वांशिक शत्रुत्व उदयास येऊन तें लोकांच्या हालचालींवर परिणाम करूं लागलें असें दिसतें. भारतीय आर्यांना आपल्या वंशाबद्दल अभिमान

उत्पन्न झाला आणि बाकीच्या या लोकांना रानटी (बर्बर), अनार्य, म्लेंच्छ म्हणून ते तुच्छ मानूं लागले. यामुळें गुप्तांनीं जेव्हां भारतीय आर्य राजांना जिंकून त्यांचीं राज्यें पादाक्रांत केलीं, तेव्हां त्यांच्याशीं त्यांनीं नरमाईचें व गोडीचें धोरण ठेवलें. परंतु अनार्यांच्या बाबतींत मात्र त्यांनीं कसलीही सवलत दिली नाहीं.

चंद्रगुप्ताचा मुलगा समुद्रगुप्त हा बापापेक्षांही अधिक आक्रमणशील योद्धा होता. तो श्रेष्ठ दर्जाचा सेनापति होता आणि सम्राट्पदावर आल्यावर त्यानें साऱ्या देशभर, दक्षिण हिंदुस्थानांत सुद्धां, विजयी स्वाऱ्या केल्या. गुप्तांच्या साम्राज्याचा विस्तार त्यानें इतका वाढविला, कीं हिंदुस्थानचा बहुतेक भाग त्यानें व्यापला. परंतु दक्षिणेंतील राज्यावरचें त्याचें प्रभुत्व अर्थात् नुसतें नांवालाच होतें. उत्तरेस मात्र कुशानांना त्यानें सिंधु नदीच्या परतीरावर पिटाळून लावलें होतें.

समुद्रगुप्ताचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त हा राजाही मोठा योद्धा होता. पुष्कळ दिवसपर्यंत शक किंवा तुर्की राजांच्या अमलाखालीं असलेले काठेवाड व गुजरात हे प्रांत. यानें काबीज केले. यानें आपल्याला विक्रमादित्य हें नांव घेतलें व याच नांवानें तो प्रसिद्ध आहे. परंतु हें नांव सीझरच्या नांवाप्रमाणें पुढें पुष्कळशा राजांची एक पदवीच होऊन गेलें. त्यामुळें निरनिराळ्या विक्रमादित्यांचा मोठा गोंधळ होतो.

दिल्लीच्या कुतुबमीनारजवळ एक प्रचंड लोखंडी स्तंभ तूं पाहिलेला आहेस, तो तुला आठवतो का? हा स्तंभ विक्रमादित्यानें विजयस्तंभ म्हणून बांधला असें सांगतात. कलेच्या दृष्टीनें त्याचें काम फार सुंदर केलेलें आहे आणि त्याच्या शेंड्यावर विजयाचें चिह्न म्हणून कमलपुष्प बसविलेलें आहे.

गुप्तांचा काळ हा हिंदुस्थानांतील हिंदु-साम्राज्यशाहीचा काळ आहे. या काळांत आर्य संस्कृति, आर्य विद्या, यांचें फार मोठें पुनरुज्जीवन झालें. हिंदी जीवन आणि संस्कृति यांमध्यें ग्रीक किंवा कुशान लोकांनीं कांहीं कांहीं हेलनिस्टिक म्हणजेच ग्रीक आणि मंगोलियन गोष्टींचा अंतर्भाव केलेला होता; त्यांना या काळांत उत्तेजन मिळणें तर दूरच, परंतु उलट भारतीय आर्य परंपरेवर अधिक भर देऊन त्या प्रकारांना उखडून काढण्याचें काम जाणूनबुजून करण्यांत आलें. दरबारची भाषा हीं संस्कृत होती. पण या काळामध्यें सुद्धां सामान्य लोकांची बोलण्याची भाषा संस्कृत ही राहिली नव्हती. बोलण्याची भाषा ही संस्कृतशीं पुष्कळच निकट संबंध असलेली अशी एक प्राकृत भाषा होती. अर्थात् संस्कृत ही जरी त्या वेळीं लोकभाषा नसली, तरी ती कांहीं मृतभाषा झालेली नव्हती. अद्यापि तिचा चांगलाच प्रसार होता. गुप्तसाम्राज्याच्या कॉळामध्यें संस्कृत काव्य व नाटक यांना फार मोठा बहर आला आणि भारतीय कलांचीही मोठीच चलती झाली. वेदांच्या आणि रामायण-महाभारतादि महाकाव्यांच्या काळानंतर संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत हाच काळ बहुधा अत्यंत श्रेष्ठ व सुसंपन्न काळ असें म्हणतां येईल. आपल्या देशांतील अत्यंत अलौकिक ग्रंथकार कालिदास हा या काळामधलाच. विक्रमादित्याचा दरबार फारच वैभवशाली होता असें

म्हणतात. त्याच्या दरबारांत तत्कालीन सर्व श्रेष्ठ ग्रंथकार आणि कलावंत याची बैठक असे. त्याच्या दरबारांतील नवरत्नांबद्दलची कथा तुला माहीत नाहीं का ? कालिदास या नवरत्नांपैकींच एक होता असें म्हणतात.

समुद्रगुप्तानें आपली राजधानी पाटलिपुत्राहून बदलून अयोध्येस आणली. आपल्या भारतीय परंपरेच्या चढाईच्या कार्याला वाल्मीकीच्या अमर महाकाव्यामुळें अमर झालेल्या रामचंद्राच्या कथेशीं संलग्न होऊन पावन झालेली अयोध्यानगरी ही त्याला कदाचित् अधिक सोयीची वाटली असेल.

गुप्तांनीं सुरू केलेली आर्यत्व आणि हिंदुत्व यांच्या पुनरुजीवनाची ही प्रवृत्ति स्वाभाविकच बुद्धधर्माला अनुकूल नव्हती. एक तर ही चळवळ वरिष्ठ-वर्गीय चळवळ होती; मुख्यतः तिला क्षत्रिय-वर्गाचा पाठिंबा होता; आणि बुद्धधर्मीय परंपरेंत तर सामान्य लोकांचाच विशेष भर होता. दुसरें म्हणजे बुद्धांच्या महायानपंथाचा उत्तरेकडील कुशान आणि इतर परकी राज्यकर्त्यांशीं अत्यंत निकट संबंध होता. असें जरी होतें तरी या काळांत बुद्धधर्मीयांचा छळ मात्र झालेला आढळत नाहीं. बुद्ध भिक्षूंचे मठ चालूच राहिले, आणि त्या ठिकाणीं विद्यार्जनाचे मोठाले आश्रमही राहिले. सिलोनमध्यें बुद्धधर्मच पसरलेला होता. पण त्रेथील राजांशीं गुप्तसम्राटांचे मैत्रीचे संबंध होते. सिलोनच्या राजा मेघवर्ण यानें अत्यंत मौल्यवान् नजराणे समुद्रगुप्ताला पाठविल्याचें आढळतें; आणि गयेला त्यानें सिंहली विद्यार्थ्यांसाठीं एक मठही स्थापन केला होता.

तरी पण हिंदुस्थानांत मात्र बुद्धधर्माला ओहोटीच लागली. या ओहोटीचें कारण ब्राह्मणांनीं कांहीं बाह्य दडपण आणलें किंवा राजे लोकांनीं जुलूम केला हें नसून हिंदुधर्माच्या ठिकाणीं तो धर्म आपल्यामध्यें पचवून घेण्याची जी शक्ति होती तिच्यामुळें असें घडलें, हें मीं पूर्वी तुला सांगितलेंच आहे.

याच सुमारास चीनमधील एक अत्यंत प्रसिद्ध प्रवासी हिंदुस्थानास भेट देऊन गेला. तो म्हणजे पूर्वी एकदां ज्याच्याबद्दल मीं तुला सांगितलें तो ह्युएन चँग नव्हे, तर फाहियान हा होय. हा बुद्धधर्मीय असून बुद्धधर्मीयांच्या पवित्र ग्रंथांचा शोध करण्यासाठीं तो इकडे आला होता. त्यानें लिहिलें आहे कीं, "मगधांतील लोक फार सुखी आणि संपन्न होते; न्यायाची अमलबजावणी फार दयाबुद्धीनें करण्यांत येत असे; आणि देहान्त शिक्षा मुळीं अस्तित्वांतच नव्हती. गया क्षेत्र हें वैराण आणि निर्जन झालेलें होतें; कपिलवस्तु शहर तर अरण्यमय झालें होतें; परंतु पाटलिपुत्रांतील लोक संपन्न, वैभवशाली आणि सदाचरणी होते. राज्यामध्यें पुष्कळ संपन्न आणि विशाल बौद्ध मठ होते. राजरस्त्याच्या कडेला धर्मशाळा असत; त्या ठिकाणीं वाटसरूंना राहतां येई व सार्वजनिक खर्चांतून त्यांची तेथें खाण्यापिण्याची सोय होई. मोठमोठ्या शहरांतून फुकट रुग्णालयें असत."

हिंदुस्थानांत पुष्कळ हिंडल्यावर फाहियान सिलोनमध्यें गेला व तेथें तो दोन वर्षें राहिला. त्याचा एक सोबती नौ चिंग म्हणून होता. त्याला मात्र हिंदुस्थानच फार

आवडलें आणि येथील बुद्ध भिक्षूंच्या धार्मिक वृत्तीचा त्याच्या मनावर फारच परिणाम झाला. त्यामुळें त्यानें मात्र हिंदुस्थानांतच राहण्याचें ठरवलें. फाहियान समुद्रमार्गानें चीनला परत जाण्यास निघाला, आणि वाटेंत पुष्कळ चित्रविचित्र अनुभव घेत घेत फारा दिवसांनीं तो आपल्या मायभूमींला पोंचला.

दुसरा चंद्रगुप्त म्हणजेच विक्रमादित्य याची कारकीर्द तेवीस वर्षें झाली. त्यानंतर त्याचा मुलगा कुमारगुप्त याची कारकीर्द मात्र बरीच दीर्घ मुदतीची म्हणजे चाळीस वर्षांची झाली. त्याच्यानंतर स्कंदगुप्त हा इ. स. ४५३ या सालीं गादीवर आला. त्याला एका नवीनच संकटाला तोंड द्यावें लागलें व त्यांतूनच अखेरीस गुप्तांच्या साम्राज्याची कंबर मोडली. पण त्याबद्दल मी पुढच्या पत्रांत लिहीन.

अजंठ्याच्या लेण्यांमधील कितीएक भिंतींवरील चित्रें, तसेंच त्यांतील दिवाणखाने आणि प्रार्थनागृहें हे गुप्तांच्या काळच्या कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. प्रत्यक्ष पाहिल्यावरच तें किती अलौकिक काम आहे हें तुला समजेल. दुःखाची गोष्ट अशी, कीं हीं भिंतींवरील चित्रें हळूहळू नाहींशीं होत आहेत. कारण उघड्या हवेंत, उन्हा-पावसांत तीं सदासर्वकाळ जशींच्या तशीं टिकून राहणें शक्य नाहीं.

हिंदुस्थानात गुप्ताचा अमल चालू होता त्या वेळीं बाकीच्या जगांत काय घडामोडी चालू होत्या बरें? गुप्त घराण्यांतील पाहिला चंद्रगुप्त हा तिकडे कॉन्स्टान्टिनोपल शहराची स्थापना करणारा रोमचा बादशहा कॉन्स्टंटाइन दि ग्रेट याचा समकालीन होता. गुप्तांच्या यापुढील राजांच्या अमदानींतच रोमन साम्राज्याचें पश्चिमेकडील रोमन साम्राज्य व पूर्वेकडील रोमन साम्राज्य असे तुकडे झाले आणि उत्तर यूरपांतील रानटी टोळ्यांनीं पश्चिमेकडील रोमन साम्राज्य अखेरीस उलथून टाकलें. तेव्हां ज्या वेळीं रोमच्या साम्राज्याचा तिकडे ऱ्हास होत होता, त्याच काळीं हिंदुस्थानांत एक अत्यंत प्रबळ राज्य अस्तित्वांत असून त्यामध्यें श्रेष्ठ सेनापती आणि प्रचंड शौर्यशाली सैन्यें नांदत होतीं. समुद्रगुप्ताला कधीं कधीं 'हिंदी नेपोलियन' असें म्हणण्यांत येतें; परंतु समुद्रगुप्त महत्त्वाकांक्षी असला तरी देश जिंकण्यासांठीं हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या पलीकडे केव्हांच त्याची नजर वळली नाहीं.

गुप्ताचा काळ हा एक प्रकारें आक्रमक साम्राज्यशाहींचा, देश पादाक्रांत करण्याचा, विजयाचा काळ होता. प्रत्येक देशाच्या इतिहासांत असे साम्राज्यशाहीच्या वैभवशाली उदयाचे अनेक काळ येत असतात; तरी एकंदर देशाच्या इतिहासाच्या ओघाच्या दृष्टीनें अखेरीस त्यांचें विशेषसें महत्त्व असत नाहीं. परंतु गुप्तांचा काळ या अशा सर्व काळांहून अगदीं निराळा असा उठून दिसतो, आणि हिंदुस्थानमध्यें त्याचें थोडें अभिमानपूर्वक स्मरण करणें उचित वाटतें. याचें कारण त्या काळांत कला व वाङ्मय याचें जें अभूतपूर्व पुनरुज्जीवन झालेलें आढळून येतें तें होय.

३८

हूण लोक हिंदुस्थानांत येतात

४ मे, १९३२

नवीनच एक संकट आलें म्हणून म्हटलें तें म्हणजे वायव्य सरहद्दीकडील पर्वत ओलांडून हिंदुस्थानांत खालीं आलेल्या हूण लोकांच्या हल्ल्याचें संकट होय. रोमन साम्राज्यासंबंधीं आपण विचार करीत असतांना मागें एका पत्रांत मीं या हूणांबद्दल थोडेंफार तुला सांगितलें आहे. यूरपमध्यें यांचा सर्वांत श्रेष्ठ पुढारी ॲटिला या नांवाचा होऊन गेला. त्यानें कितीएक वर्षेंपर्यंत रोम आणि कॉन्स्टान्टिनोपल येथील दोन्ही साम्राज्यांना सळो कीं पळो करून सोडलें होतें. त्याच सुमारास हिंदुस्थानांत आलेले हूण लोक हे या युरपांतील हूणांचेच भाईबंद होत. यांना श्वेत हूण असें म्हणत असत. हेही मध्य आशियांतील भटक्या टोळ्यांपैकींच लोक होत. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी किती तरी काळपर्यंत हे लोक हिंदी सरहद्दीवर घिरट्या घालीत होते .आणि तेथल्या सर्वच लोकांना त्यांच्यापासून त्रास पोंचत होता.* हळूहळू त्यांची लोकसंख्या वाढली म्हणून आणि त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या टोळ्यांनीं त्यांना पुढें रेटलें असेल म्हणूनही, पुढें त्यानीं हिंदुस्थानवर प्रत्यक्ष स्वारीच केली.

गुप्त घराण्यांतील पांचवा राजा स्कंदगुप्त याला त्या हूण लोकांच्या स्वारीला तोंड द्यावें लागलें. त्यानें त्यांचा पराभव केला व त्यांना सरहद्दीपलीकडे हुसकून लावलें. परंतु बारा वर्षांनीं ते लोक पुन्हां स्वारी करून आले. हळूहळू त्यांनीं सर्व गांधार देश आणि उत्तर हिंदुस्थानचा बहुतेक भाग व्यापला. बुद्धधर्मीय लोकांना त्यांनीं फार त्रास्रलें आणि सर्वच लोक भयभीत होतील अशी भयंकर अत्याचाराचीं कृत्यें करावयास सुरुवात केली.

त्याच्याशीं गुप्तांनीं सतत युद्ध सुरू ठेवलें होतें, परंतु त्यांना हांकलून लावण्यांत यापुढें त्यांना यश आलें नाहीं. आणखीच नव्यानव्या हूणांच्या टोळ्यांच्या लाटांवर लाटा आल्या आणि त्यांनीं मध्य हिंदुस्थानही व्यापला. तसेंच त्यांचा पुढारी तोरमाण यानें आपणांस राजा (महाराजाधिराज) म्हणूनही जाहीर केलें. हा कांहीं कमी दुष्ट मनुष्य होता असें नव्हे ; परंतु त्याच्यामागून त्याचा मुलगा मिहिरगुल हा आला. तो तर अगदीं निर्भेळ शंभर नंबरी रानटी आणि अत्यंत क्रूर सैतानच जणुं होता. मिहिरगुलाच्या करमणुकीचा एक प्रकार म्हणजे मोठमोठ्या कड्यांवरून हत्तींना खालीं खोल दऱ्यांत लोटून द्यावयाचें हा होता, असें राजतरंगिणी या आपल्या काश्मीरच्या इतिहासग्रंथांत कल्हण कवीनें वर्णन केलें आहे. त्याच्या अत्याचारामुळें अखेरीस आर्यावर्ताचा संताप जागृत झाला आणि गुप्तांच्या घराण्यांतील राजा बालादित्य आणि

मध्य हिंदुस्थानांतील राजा यशोधर्मा या दोघांच्या निशाणाखालीं आर्यांनीं एकत्र येऊन हूण लोकांचा पराभव केला आणि मिहिरगुल यास कैद केलें. परंतु हूणांप्रमाणें त्याच्याशीं आर्यांनीं क्रूरपणाचें वर्तन केलें नाहीं. राजा बालादित्य हा उदार होता. त्यानें मिहिरगुलाला मुक्त केलें व या देशामधून निघून जाण्यास सांगितलें. परंतु पळून न जातां मिहिरगुल काश्मीरमध्येंच दडून राहिला आणि ज्यानें त्याला इतक्या सभ्यपणानें आणि औदार्यानें वागविलें होतें त्याच बालादित्यावर त्यानें अचानक विश्वासघातपूर्ण हल्ला केला.

परंतु लौकरच हूणांची हिंदुस्थानांतील सत्ता दुर्बळ होत गेली. त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक मात्र येथेंच राहिले आणि आर्यलोकांच्या समाजांतच हळूहळू मिसळून गेले. मध्य हिंदुस्थान व राजपुताना यांमधील आपल्या रजपूत लोकांच्या रक्तामध्यें या हूण लोकांच्या रक्ताची कांहीं छटा असण्याचा संभव आहे.

हूणाचें राज्य फारच थोडा काळपर्यंत उत्तर हिंदुस्थानांत चाललें; फक्त सुमारें पन्नास वर्षेंच. त्यानंतर या देशांत ते शांतपणें वसाहत करून राहिले. परंतु हीं हूण लोकांचीं युद्धें आणि त्यांचे भयंकर अत्याचार, यांचा भारतीय आर्यांवर मात्र फार मोठा परिणाम झाला. हूण लोकांची राहणी व राज्यव्यवस्था ही आर्यांहून अगदींच निराळी होती. आर्य लोक या सुमारासही अजून पुष्कळच प्रमाणांत स्वातंत्र्यप्रेमी लोक होते. त्यांच्या राजांना सुद्धां लोकांच्या इच्छेपुढें नमावें लागे. त्याच्या ग्रामपंचायतींची सत्ता फारच मोठी असे. परंतु हे हूण लोक येऊन येथें वसाहत करून राहिले व हिंदी समाजांतच मिसळले, याचा मात्र आर्यांच्या जीवनांतील या आदर्शांवर विपरीत परिणाम झाला; त्याच्यात हीनत्व आलें.

गुप्तांच्या घराण्यांतील बालादित्य हा शेवटचा श्रेष्ठ राजा. त्याचा अंत इ. स. ५३० या वर्षीं झाला. एका गोष्टीचें मात्र विशेष कौतुक वाटतें, कीं हा बालादित्य राजा एका खास हिंदुधर्मीय वंशांतला असूनही त्याचा कल मात्र बुद्धधर्माकडे होता आणि त्याचा स्वतःचा गुरु एक बुद्ध भिक्षु होता. गुप्तांचा काळ हा हिंदुस्थानांतील कृष्णभक्तीच्या उदयाचा काळ होय; तरी सुद्धां त्यामध्यें बुद्धधर्माशीं तसा म्हणण्यासारखा झगडा झालेला आढळून येत नाहीं.

गुप्तांच्या दोनशें वर्षांच्या अमलानंतर उत्तर हिंदुस्थानांत पुन्हां एकदां छोटीं छोटीं, वेगवेगळीं, कोणाही मध्यवर्ती सत्तेचा अम्मल न मानणारीं स्वतंत्र राज्यें अस्तित्वांत आलीं. पण याच काळांत दक्षिण हिंदुस्थानांत एक महान् राज्य उदयास आलेलें आढळतें. आपण रामचंद्राच्या वंशांतील आहों असें म्हणणारा पुलकेशी नांवाचा राजा तेथें झाला. त्यानें इतिहासांत चालुक्यांचें साम्राज्य म्हणून प्रसिद्ध असलेलें साम्राज्य दक्षिणेंत स्थापन केलें. दक्षिणेंतील या राज्यांतील लोकांचा पूर्वेकडील बेटांमधील हिंदी वसाहतींशीं संबंध असलाच पाहिजे आणि त्या वसाहती आणि हिंदुस्थान यांमध्यें सतत दळणवळण असलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर हिंदी जहाजांतून इराणमध्यें सुद्धां नेहमीं माल वाहून नेण्यांत येत असे अशीही माहिती

आपणांला मिळते. इराणांतील सस्सन घराण्यांच्या अम्मलाच्या वेळीं, त्यांच्यापैकीं एक श्रेष्ठ राजा दुसरा खुशरू याच्या कारकीर्दीत, या दोन्ही देशांचे वकील सुद्धा एकमेकांच्या दरबारांत असत.

३९

हिंदुस्थानचा परकी बाजारपेठांवरील ताबा

५ मे, १९३२

ज्या प्राचीन काळच्या इतिहासाची चर्चा आपण करतों आहों त्या काळांत अगदीं प्रथमपासून तों थेट हजार वर्षांहून अधिक काळपर्यंत, हिंदी लोकांचा व्यापार सर्व पश्चिम यूरप व पश्चिम आशिया यांमध्यें आणि पूर्वेकडे थेट चीनपर्यंत सतत जोमानें चालू असलेला आढळून येतो. कशाच्या जोरावर हें असें घडून आलें असेल? हिंदी लोक उत्कृष्ट दर्यावर्दी होते आणि उत्कृष्ट व्यापारी होते यांत तर खरोखरच कांहीं शंका नाहीं. पण तेवढ्यामुळेंच कांहीं त्यांचा व्यापार हा असा दूरवर भरभराटला असें नव्हे. तसेंच त्यांच्या ठिकाणीं हस्तव्यवसाय व कारागिरी यांच्यामधील अत्यंत श्रेष्ठ कौशल्य होतें हेंही खरें असलें, तरी तेवढ्यानें केवळ हें साधलें असेंही नव्हे. कांहीं प्रमाणांत या दोन्ही गोष्टींचा उपयोग या कामीं झाला हें खरें. परंतु दूरदूरच्या देशांतील बाजारपेठांवर हिंदुस्थानचें हें जें वर्चस्व चालत होतें याचें एक विशेष प्रमुख कारण हिंदुस्थानमध्यें रसायनशास्त्रांत, विशेषतः रंगविण्याच्या कलेंत करण्यांत आलेली प्रगति, हें असावें असें दिसतें. कापडासाठीं पक्के रंग तयार करण्याच्या कांहीं खास पद्धती त्या काळच्या हिंदी लोकांनीं शोधून काढलेल्या होत्या असें दिसतें. निळीच्या झाडापांसून एक विशेष प्रकारचा रंग करण्याची खास कृतीही त्यांना अवगत होती. या रंगाचें इंडिगो हें परकी भाषेंतील नांव सुद्धां इंडिया, हिंदुस्थान या शब्दापासून निघालेलें आहे, हें तुझ्या ध्यानांत येईल. त्याचप्रमाणें पोलादाला चांगलें तेजदार पाणी देण्याची कलाही बहुधा त्या लोकांना माहीत असावी; आणि त्यांना छानदार पोलादी शस्त्रें तयार करतां येत असावीं. तुला आठवतच असेल मागें एकदां मीं सांगितलेलें, कीं अॅलेक्झांडरच्या स्वारीसंबंधीं इराणमध्यें ज्या प्राचीन कथा प्रचलित आहेत त्यांमध्यें जेव्हां जेव्हां उत्कृष्ट तरवार किंवा जंबिया यांचा उल्लेख येतो, तेव्हां तेव्हां तें हत्यार हिंदुस्थानांत तयार झालेलें होतें असें सांगितलेलें असतें.

हिंदुस्थानमध्यें हे रंग आणि इतर वस्तू इतर देशांतल्यापेक्षां जास्त चांगल्या दर्जाच्या तयार होत असत. तेव्हां हिंदुस्थानचें सर्व बाजारपेठांवर प्रभुत्व चालावें हें अगदीं स्वाभाविक होतें. ज्या देशाजवळ अथवा मनुष्याजवळ हत्यार चांगलें असेल,

किंवा ज्याला कोणतीही वस्तु अधिक चांगल्या रीतीनें किंवा स्वस्त भावांत तयार करण्याची कृति अवगत असेल, तो देश किंवा तो मनुष्य आज ना उद्यां केव्हां तरी, ज्याच्याजवळ असें हत्यार किंवा अशी कृति नाहीं अशा देशाला किंवा मनुष्याला बाजारांतून हाकलून लावणार, ही गोष्ट अपरिहार्य आहे. गेल्या दोनशें वर्षांत यूरप खंड आशियाच्या पुष्कळच पुढें गेलें आहे यांचें हेंच कारण आहे. तिकडच्या लोकांनीं नवनवे प्रदेश शोधून काढले आणि नवनवे शास्त्रीय शोध लावले; त्यामुळें यूरपजवळ नवीं आणि प्रचंड सामर्थ्यवान् हत्यारें निर्माण झालीं. आणि उत्पादनाच्या नवनव्या पद्धतीही अमलांत आल्या. याच्या सहाय्यानें यूरपनें सर्व जगांतील व्यापारी पेठा काबीज केल्या आणि तें खंड संपन्न आणि सत्ताधीश झालें. त्या कामीं इतरही आणखी कांहीं कारणांची मदत झाली, नाहीं असें नाहीं. परंतु सध्यांच्या क्षणीं हत्यार, यंत्र हें किती महत्त्वाचें आहे ही गोष्ट मला तुझ्या ध्यानांत आणावयाची आहे. एका श्रेष्ठ पुरुषानें म्हटलें आहे, कीं मनुष्य हा यंत्र (tool) निर्माण करणारा प्राणी आहे आणि मनुष्याचा अगदीं प्राचीनतम काळापासून तों आजपर्यंतचा इतिहास म्हणजे सुरुवातीच्या अश्मयुगांतील दगडी टोंकांचे बाण आणि दगडी हातोडे याच्यापासून आजचीं आगगाडीचीं इंजिनें आणि महाप्रचंड यंत्रें येथपर्यंत, एकाहून एक अधिकाधिक कार्यक्षम होत गेलेल्या अवजारांचा, यंत्राचा (tool) च इतिहास आहे. खरोखर, एवढीशी काहीं गोष्ट करावयाची म्हटली तरी हत्यारावांचून आपलें चालत नाहीं. हत्यारें नसतीं तर आपण आज कोणत्या अवस्थेंत असतों कोण जाणे!

मुळांत हत्यार, यंत्र ही एक चांगली वस्तु आहे. त्यामुळें आपलें काम कमी श्रमांत होतें. परंतु हत्याराचा दुरुपयोग होणें शक्य आहे हेंही अर्थात् खरें आहे. करवत हें एक उपयुक्त हत्यार आहे. पण लहान मुलाच्या हातांत ती पडली तर तें तिच्यापासून स्वतःला दुखापत करून घेण्याचा संभव आहे. चाकूइतकी उपयुक्त वस्तु तर फारच क्वचित् असेल; प्रत्येक स्काउटजवळ तो असलाच पाहिजे असा तर नियम आहे. पण एखादा मूर्ख मनुष्य तोच चाकू घेऊन एखाद्याचा प्राणही घेईल. हा कांहीं बिचाऱ्या त्या चाकूचा दोष नव्हे. दोष त्या हत्याराचा दुरुपयोग करणाऱ्या माणसाचा आहे.

अशाच रीतीनें आधुनिक काळची यंत्रसामग्री मुळांत चांगली उपयुक्त असूनही अनेक रीतींनीं तिचा दुरुपयोग करण्यांत येत आहे. वास्तविक या यंत्रसामग्रीचा उपयोग जनतेवरील कामाचा बोजा कमी करण्यासाठीं व्हावयास पाहिजे होता; पण उलट तिच्यामुळें पुष्कळ अंशीं पूर्वीपेक्षाही जनतेची स्थिति अधिक विकट आणि दुःखमय झाली. लाखों लोकांना या यंत्रसामग्रीमुळें वास्तविक सुख आणि सोयी यांचा लाभ व्हावयास पाहिजे होता. त्याऐवजीं तिच्यापासून पुष्कळांच्या वांट्याला दैन्यच आलें आहे आणि शिवाय त्यामुळें राज्यकर्त्यांच्या राज्ययंत्रांच्या हातीं एवढें मोठें सामर्थ्य उत्पन्न झालें आहे, कीं आपल्या लढायांमध्यें कोट्यवधि लोकांचे बळी देणें आज त्यांना शक्य झालें आहे.

परंतु हा कांहीं त्या यंत्रसामग्रीचा दोष नव्हे; दोष आहे त्या यंत्रसामग्रीचा दुरुपयोग केला जातो हा. ही सारी यंत्रसामग्री ज्यांना तिच्यापासून आपलाच सगळा फायदा करून घ्यावयाचा आहे अशा बेजबाबदार लोकांच्या ताब्यांत जर नसती आणि तिचें सर्व कार्य लोकांच्याच प्रतिनिधींनीं लोकांच्या हिताच्या दृष्टीनें चालविलें असतें, तर आज जगांत केवढा मोठा तरी फरक झालेला आढळून आला असता.

तेव्हा मी सांगत होतों काय, कीं त्या काळीं हिंदुस्थान आजच्यासारख्या अवस्थेंत नव्हता; तर त्या वेळीं तो उत्पादनपद्धतींत सर्व जगांत आघाडीच्या स्थानीं होता. आणि म्हणूनच हिंदी कापड, हिंदी रंग, आणि इतर हिंदी वस्तू दूरदूरच्या देशांमध्यें जात असत आणि या वस्तू त्या त्या देशांत आपल्याला मिळाव्या यासाठीं लोकांची मोठी धडपड असे. या व्यापारामुळें हिंदुस्थानला संपत्तीचा मोठा लाभ झाला. या वस्तूंच्या व्यापाराखेरीज दक्षिण हिंदुस्थानांतून बाहेरच्या देशांत मिरीं आणि इतर मसाल्याचे जिन्नस यांचाही पुरवठा होत असे. हे मसाल्याचे जिन्नस अर्थात् येत पूर्वेकडच्या बेटांमधून आणि हिंदुस्थानच्या मार्गानें पाश्चिमेकडे जात. रोममध्यें आणि पश्चिम यूरपांत या मिऱ्यांची मोठी चहा असे, आणि गॉथ लोकांचा एक नेता ॲलॅरिक यानें इ. स. ४१० मध्यें रोम शहर पादाक्रांत केलें, तेव्हां तेथून त्यानें ३००० पौंड मिरीं लुटून नेलीं असें सांगतात. हीं सर्व मिरीं तेथें हिंदुस्थानांतून किंवा हिंदुस्थानच्या मार्गानेंच आलेलीं असलीं पाहिजेत.

४०

देशांच्या आणि संस्कृतींच्या भाग्याचे चढउतार

६ मे, १९३२

चीनला अलीकडे आपण फार दिवस दूर ठेवलें आहे. तेव्हां आतां पुन्हां तिकडे जाऊन चीनची थोडी हकीकत पुढें सांगूं या. आणि इकडे पश्चिमेस रोमचें साम्राज्य गडगडून पडत असतां आणि गुप्तांच्या अम्मलाखालीं हिंदुस्थानांत राष्ट्रीय पुनरुज्जीवन होत असताना चीनमध्यें काय घडामोडी होत होत्या तें पाहूं या. रोमचा उदय व ऱ्हास याचा चीनवर तसा कांहींच परिणाम झाला नाहीं. हीं दोन्ही राज्यें एकमेकांपासून फारच दूर आणि अलग होतीं. तथापि चिनी राज्याकडून मध्य आशियांतील टोळ्यांना हुसकून लावण्यांत आल्यामुळें यूरपमध्यें आणि हिंदुस्थानांत फार घातक परिणाम घडून आले, हें मीं तुला सांगितलेंच आहे. या टोळ्या स्वतः, किंवा त्यांनीं ज्याना हुसकून लावलें त्या टोळ्या, एक तर पश्चिमेकडे गेल्या किंवा दक्षिणेकडे गेल्या. तेथील राज्यें आणि राज्यव्यवस्था त्यांनीं उखडून टाकिल्या आणि सगळा गोंधळ

निर्माण केला. त्यांपैकीं पुष्कळसे लोक पूर्व यूरपमध्यें आणि हिंदुस्थानात वसाहत करून स्थिर झाले.

दोन्ही देश परस्परांपासून फार दूर असले तरी रोम व चीन यांमध्यें प्रत्यक्ष दळणवळणाचे संबंध मात्र जरूर होते आणि एकमेकांचे वकीलही एकमेकांकडे असत. चिनी ग्रंथांमध्यें अशा अगदीं जुन्यांत जुन्या वकिलातीचा उल्लेख सापडतो, तो म्हणजे इ. स. १६६ सालीं रोमचा बादशहा आनटून यानें पाठविलेल्या वकिलाचा. हा आनटून म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून बादशहा मार्कस् ऑरेलियस अँटोनिनस हाच होय. मागें एका पत्रांत मीं तुला त्याच्याबद्दल सांगितलें आहे.

रोमचा पाडाव व ऱ्हास ही यूरपमधील एक फारच प्रचंड घटना होती. एखादें शहर किंवा साम्राज्यच काय तें नाहींसें झालें, एवढाच याचा अर्थ नव्हता. तसें पाहिलें तर रोमचें साम्राज्य यानंतर पुष्कळ काळपर्यंत कॉन्स्टान्टिनोपल येथें चालूच होतें; आणि जवळजवळ १४०० वर्षेपर्यंत रोमच्या साम्राज्याचें पिशाचही यूरपमध्यें वावरतच होतें. परंतु रोमचा पाडाव म्हणजे एका युगाचा अंत होता. प्राचीन ग्रीक आणि रोमन जगताचा तो अंत होता. रोमच्या नष्ट झालेल्या त्या संस्कृतीच्या पायावर एक नवीनच जग, नवीनच संस्कृति, नवीनच भौतिक सुधारणा व साधनसंपत्ति पश्चिमेकडे त्या वेळीं उदयास येऊं लागली. पूर्वीच्या काळीं वापरले जाणारे शब्द व संप्रदायच नव्या काळीं वापरले जात असतात; आणि त्यामुळें आपली फसगत होत असते. आपल्याला असें वाटतें, कीं पूर्वीं त्यांचा जो अर्थ होता तोच आजही आहे. रोमचें राज्य पडल्यानंतरही पश्चिम यूरपांतील लोक रोमच्या संप्रदायांतलिच भाषा बोलत; परंतु त्या भाषेच्या पाठीमागें आतां निराळ्याच कल्पना आल्या होत्या, शब्दांना निराळेच अर्थ प्राप्त झालेले होते. लोक असें म्हणतात, कीं आजची यूरपांतील राष्ट्रें हीं ग्रीस आणि रोम यांचींच प्रजा – अपत्यें – आहेत. कांहीं अंशीं हें खरेंही आहे. तरी पण या विधानामुळें फार गैरसमज होण्याचा संभव आहे. कारण ग्रीस व रोमचीं राज्यें ज्या विशिष्ट संस्कृतींचीं निदर्शक होतीं, त्यांहून अगदींच भिन्न संस्कृतींचीं निदर्शक आजचीं यूरपीय राष्ट्रें आहेत. ग्रीस आणि रोम यांचें जुनें जग त्यांच्याबरोबर जवळजवळ पार रसातळाला गेलें. एक हजार वर्षें किंवा त्यांहून अधिक काळपर्यंत संवार्धित झालेल्या सुधारणेचा तो वृक्ष म्हातारा होऊन वठून गेला. आणि त्यानंतरच मग पश्चिम यूरपमधील अर्धवट सुधारलेले व अर्धवट रानटी लोक इतिहासाच्या ग्रंथाच्या एका पानावर अवतीर्ण झाले, आणि हळूहळू त्यांनीं नवीनच विद्या आणि नवीनच संस्कृति संपादन केली. रोमपासून ते पुष्कळच शिकले; जुन्या जगापासून पुष्कळच गोष्टी त्यांनीं घेतल्या. परंतु हें शिकण्यासाठीं त्यांना सायास फार पडले व काळही फारच मोठा लागला. कितीएक शतकें विद्या आणि संस्कृति या यूरपमध्यें झोंपीं गेल्या, असें होऊन गेलें. सगळीकडे अज्ञानांधकार आणि धर्मवेड याचाच धुमाकूळ माजला. म्हणूनच या कांहीं शतकांच्या काळाला तमोयुग, कृष्णयुग असें

म्हणण्याचा प्रघात पडला आहे. हें कशामुळें झालें? जग पुढें जाण्याचें सोडून असें मागें कां गेलें? शेंकडों वर्षांच्या परिश्रमानें संपादिलेलें सगळें ज्ञान नाहींसें कां झालें, किंवा विसरलें का गेलें? हे फार मोठमोठे प्रश्न आहेत. जगांतील मोठमोठ्या शहाण्या लोकांचें चित्त भांबावून सोडणारें हें एक कोडें आहे. म्हणून मी कांहीं त्याचें उत्तर देण्याच्या भानगडींत पडणार नाहीं, आपल्या हिंदुस्थानचेंच उदाहरण पहा ना: आचार आणि विचार दोन्ही दृष्टींनीं श्रेष्ठ असलेलें हें राष्ट्र-ह्याला इतकी भिकार अवदशा प्राप्त व्हावी आणि किती तरी दीर्घ काळपर्यंत त्याला गुलाम, परतंत्र देश होऊन पडावें लागावें, ही किती चमत्कारिक गोष्ट आहे! तीच गत चीनची. त्याचा भूतकाळ किती ऐश्वर्यसंपन्न, किती ओजस्वी आहे! आणि आज तें राष्ट्र ज्याला कधीं अंतच नाहीं, अशा युद्धांच्या तावडींत सांपडावें! मनुष्यानें युगानुयुगें परिश्रम करून कणाकणानें संपादन करून एकत्र केलेलें ज्ञान व विद्या या स्वतःच मुळांतच अजीबात नष्ट होऊन जात नसतील हें खरें; परंतु कशानें तरी आमचेच डोळे जणुं मिटल्यासारखे होतात आणि आम्हांला कांहींच दिसेनासें होतें. घराच्या खिडक्या बंद केल्या म्हणजे नाहीं का आंत अंधारगुडुप होत? तशी अवस्था आमच्या मनाची झाली आहे. बाहेरच्या अंगाला सगळीकडे भरपूर प्रकाश असतांना आम्हींच जर आपले डोळे मिटले किंवा खिडक्या लावून घेतल्या, तर त्याचा अर्थ प्रकाशाचाच अंत झाला असें कांहीं नव्हे.

कांहीं लोक म्हणतात, कीं यूरपांतील तमोयुगाचें मूळ कारण ख्रिस्ती धर्म हा आहे. हा ख्रिस्ती धर्म जीझसनें प्रतिपादिलेलें नवें धर्मतत्त्व नव्हे; तर रोमचा बादशहा कॉन्स्टन्टाइन यानें या धर्माचा स्वीकार केल्यानंतर मरमराटीला आलेलें अधिकृत ख्रिस्ती धर्मपीठ हें होय. हे लोक स्पष्टच असें म्हणतात, कीं कॉन्स्टन्टाइननें चौथ्या शतकांत ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला तेव्हापासून एक निराळेंच 'हजार वर्षांचें युग' सुरू झालें. या युगामध्यें बुद्धीला बेड्या घालण्यांत आल्या, विचाराला गुलाम करून टाकण्यांत आलें, ज्ञानाची मुळींच प्रगति झाली नाहीं. या युगाबरोबर छळ, धर्मवेड, असहिष्णुता यांचाच जीवनांत प्रवेश व वाढ होऊन आटोपलें नाहीं, तर शास्त्रामध्यें किंवा इतर कशामध्यें प्रगति करणें कोणालाही अत्यंत दुर्धर करून टाकलें गेलें. धर्मविषयक ग्रंथ हेच पुष्कळदां प्रगतीच्या मार्गांतील धोंडे होऊन बसूं लागले. हे ग्रंथ लिहिले गेले त्या वेळचें जग कशा प्रकारचें असेल याची या ग्रंथांवरून चांगली कल्पना येते. त्या काळच्या कल्पना व आचार-विचार काय असतील यांचीही त्यांमधून आपल्याला माहिती मिळते. परंतु या सर्व कल्पना आणि हे आचार-विचार धार्मिक ग्रंथांमध्यें ग्रथित केलले असल्यामुळें त्यांच्याबद्दल विरोध प्रकट करणें, त्यांच्या उपयुक्तत्वाबद्दल शंका प्रकट करणें, हें कोणालाही शक्य असत नाहीं. जगामध्यें वाटेल तेवढा प्रचंड बदल होवो, तरी या बदलत्या परिस्थितीला जुळती अशी एक राहणी व विचारसरणी यांचा अवलंब, या धार्मिक ग्रंथांशीं आमचीं मनें जखडून गेल्यामुळें आम्हांला करता येत नाहीं. याचा परिणाम

असा होतो, कीं आमचें सारें जीवन सभोंवतालच्या परिस्थितीशीं अगदींच जुळेनासें होतें. आणि मग अर्थातच अनवस्था निर्माण होते.

म्हणून कितीएक लोक यूरपमध्यें हें अंधकाराचें युग–तमोयुग – आणल्याबद्दल ख्रिस्ती धर्मावर आरोप करतात; तर दुसरे कांहीं लोक असें म्हणतात, कीं या तमोयुगात ख्रिस्ती धर्म, ख्रिस्ती धर्मोपदेशक, ख्रिस्ती भिक्षू यांनींच ज्ञानदीप तेवता ठेवला. त्यांनींच लौकिक विद्या वा चित्रकलादि कला जिवंत ठेवल्या आणि मोठमोठ्या मौल्यवान् ग्रंथांच्या नकला करून त्यांनींच त्यांचें संरक्षण केलें.

अशीं भिन्न भिन्न मतें लोक माडतात. कदाचित् दोघांच्याही म्हणण्यांत तथ्य असेल. परंतु रोमच्या पाडावानंतर घडून आलेल्या सर्वच वाईट गोष्टींना केवळ एक ख्रिस्ती धर्मच जबाबदार आहे, हें म्हणणें हास्यास्पद वाटतें. खरी गोष्ट अशी, कीं या वाईट गोष्टींनींच तर रोमचा पाडाव झाला.

परंतु हें फारच मोठें विषयांवर झालें. मी सांगत होतों काय, कीं तिकडे यूरपमध्यें एकाएकीं एक सामाजिक घडी विस्कटली; आणि आकस्मिक सगळीच उलथापालथ झाली. असा आकस्मिक बदल इकडे चीनमध्यें किंवा हिंदुस्थानमध्यें झाला नाहीं. यूरपमध्यें या सुमारास एका सुधारणेचा अजीबात अंत होऊन तिच्या जागीं एका नव्याच संस्कृतीचा जन्म होत असलेला आपणांस दिसतो. पुढें हळूहळू चाढून तीच संस्कृति आजच्या प्रकट अवस्थेला येऊन पोंचली आहे. परंतु चीनमध्यें पहिलीच उच्च दर्जाची संस्कृति आणि सुधारणा जशीच्या तशीच, मध्यें कसलाही विघात किंवा बदल न होतां, चालू राहिलेली आपल्याला दिसून येते. त्याच्यामध्यें चढउतार पुष्कळ झाले. भरभराटीचे काळ आले व गेले. चांगले व वाईट राजे आले व गेले. राजवंश पुष्कळ बदलले. परंतु संस्कारांचा, पंरपरेचा, वारसा कोठेंही तुटला नाहीं. पुढें चीनचीं छकलें होऊन तेथें पुष्कळ निरनिराळीं राज्यें स्थापन झालीं. आणि या राज्यांत आपापसांत यादवीसुद्धा सुरू झाली. तरीसुद्धां कला आणि साहित्य यांचा बहर कमी झाला नाहीं. उत्कृष्ट चित्रें रंगविलीं जातच राहिलीं; आणि सुंदर भांडीं घडत राहिलीं व सुंदर इमारतीही बांधल्या जात राहिल्या. चीनमधील यादवीच्या काळांतच छपाईची कला उपयोगांत आली, चहा पिण्याची चाल पडली आणि तिचें गुणगान काव्यांतही होऊं लागलें. कलाकौशल्य आणि माधुर्य यांचा चिनी जीवनात असा काहीं एक सुंदर अखंड ओघ चालत आलेला आहे, कीं उच्च दर्जाच्या संस्कृतीशिवाय तो निर्माण होऊन चालू राहणें शक्यच नव्हतें.

हिंदुस्थानांतही हाच प्रकार आढळतो. येथेंही रोममध्ल्याप्रमाणें आकस्मिक ओघ तुटलेला आढळत नाहीं. कांहीं काळ चांगला तर कांहीं वाईट, असा चढउतार येथेंही झाला, यांत कांहींच संशय नाहीं. कांहीं काळ साहित्य आणि कला यांच्या निर्मितीस बहर आला, तर काहीं काळ मोडतोड आणि नासधूस याचा गेला. पण एक तऱ्हेनें संस्कृतीचा ओघ मात्र कायम राहिला. तो हिंदुस्थानांतून पूर्वेकडच्या प्रदेशांत प्रसारही

पावला. आणि हा देश लुटण्याकरितां आलेले रानटी लोकही या ओघात शिकून शहाणे होऊन त्या संस्कृतीशीं एकजीव व समरस होऊन गेले.

चीन व हिंदुस्थान यांची स्तुति करून मला पश्चिमेकडील लोकांचें उणें काढावयाचें आहे, अशी मात्र समजूत करून घेऊं नकोस. चीनमध्यें काय किंवा हिंदुस्थानांत काय, जगाला ओरडून टाळ्या पिटून सांगण्यासारखें या दोन्ही देशांत आजच्या घटकेला कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं. भूतकाळीं हे देश कितीही श्रेष्ठ होऊन गेलेले असले, तरी आजच्या जगांत त्यांचा राष्ट्रीय दर्जा फारच खालच्या प्रतीचा आहे, हें आधळ्याला सुद्धां दिसण्यासारखें आहे. त्यांचा आपल्या प्राचीन संस्कृतीशीं केव्हांही आकस्मिकपणें किंवा अजीबात संबंध तुटून गेला नाहीं ही गोष्ट खरी असली, तरी या देशांत कांहीं वाईट घडत आलेंच नाहीं, किंवा त्यांचें श्रेष्ठत्व कमी होत गेलेंच नाहीं, असा कांहीं त्याचा अर्थ नव्हे. एकदां आपण उच्च स्थानीं होतों आणि आज अगदीं तळाशीं आहोंत. याचा उघड अर्थ हाच, कीं जगाच्या इतिहासात आम्ही खालींच घरंगळत गेलों आहों, आमची अवनतीच झाली आहे. आमच्या संस्कृतीचा ओघ सारखा कायम आहे म्हणून पुष्कळ आम्हीं फुशारकी मारली, तरी जर ह्या संस्कृतीच्या मुळाशींच कीड लागली असेल तर ह्या फुशारकींत समाधान मानण्याजोगें काय आहे? उलट, आमच्या प्राचीन काळच्या परंपरेपासून आमची आकस्मिक ताटातूट झाली असती तरच बरें झालें असतें, असेंच म्हणावें लागेल. त्यामुळें आम्हांला चांगला हादरा बसला असता. नवीन जीवन आणि नवीन जोम त्यामुळें आमच्या ठिकाणीं निर्माण झाला असता. आज हिंदुस्थानांत व जगामध्यें ज्या घडामोडी चालू आहेत, त्यामुळें मात्र आमच्या देशाला अशी जरूर ती जोराची ढकली मिळत आहे व त्याच्या ठिकाणीं नवचैतन्य आणि तारुण्य निर्माण होत आहेसें वाटतें.

प्राचीन काळीं हिंदुस्थानात जी चिकाटी आणि सामर्थ्य आढळून येतें त्याचें मूळ या देशात सर्वत्र परसलेल्या स्वायत्त, आपल्यापुरत्या स्वतंत्र अशा पंचायतींतील लोकराज्यांत असावें असें दिसतें. आज आपल्यामध्यें आहेत असे मोठमोठे जमीनदार, सरंजामदार त्या काळीं नव्हते. जमीन ही खेडेगांवची समाईक मालकीची म्हणजेच पंचायतीच्या मालकीची असे; किंवा जे प्रत्यक्ष जमीन कशीत अशा शेतकऱ्यांच्या मालकीची असे. या पंचायतींच्या हातीं फार मोठी सत्ता आणि अधिकार असे. खेडेगावांतील लोकांकडून या पंचायतींची निवड होत असे, आणि अशा रीतीनें या पद्धतींत एक प्रकारें लोकशाहीचा पायाच मुळाशीं होता. पुष्कळ राजे झाले आणि गेले. त्यांच्या आपापसांत झटापटी झाल्या. परंतु त्यानीं कोणीं या ग्रामराज्याच्या पद्धतीला हात लावला नाहीं; त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ केली नाहीं, किंवा या पंचायतींच्या स्वातंत्र्यावर गदा घालण्याचेंही त्यांनीं कधीं धाडस केलें नाहीं. त्यामुळें निरनिराळीं साम्राज्यें जरी बदललीं, तरी या ग्रामराज्यांच्या पद्धतीवर आधारलेली समाजव्यवस्था विशेष फरक न होतां तशीच कायम राहिली. निरनिराळ्या स्वाऱ्या, लढाया आणि

वेळोवेळीं बदलणारे राजवंश यांचे वृत्तांत वाचून आपली अशी गैरसमजूत होत असते, कीं या गोष्टींचा सर्वच लोकसमाजावर परिणाम झालेला असला पाहिजे. अर्थात् कधीं कधीं या गोष्टींचा सर्व समाजावर परिणाम झालाही. विशेषतः उत्तरेकडील भागांत हा परिणाम मोठ्या प्रमाणांत झाला. परंतु सामान्यतः असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं, कीं समाजाच्या वरच्या भागांत घडून आलेल्या या धामधुमीनें सामान्य लोक-समाजाला फारसा त्रास कधींच पोंचला नाहीं आणि त्यांचें जीवन जसेंच्या तसें चालू राहिलें.

हिंदी समाजव्यवस्थेमध्यें पुष्कळ काळपर्यंत दृढता टिकून राहण्याचें आणखी एक कारण म्हणजे या देशामधील जातिसंस्था. अर्थात् आजच्या स्वरूपांत ही संस्था आढळते तशी नव्हे ; तर मुळांत तिची ज्या प्रकारची आंखणी करण्यांत आलेली होती तशा प्रकारची जातिसंस्था. त्या वेळीं पुढच्या काळातल्याप्रमाणें जातिसंस्थेचीं बंधनें कडक झालेलीं नव्हतीं. तसेंच निव्वळ जन्मावरून जात ठरवण्याची पद्धति तेव्हां नव्हती. या जातिसंस्थेमुळें हिंदी समाजजीवनाची घडी हजारों वर्षेंपर्यंत टिकून राहिली. अर्थात् जातिसंस्थेकडून हें कार्य जें झालें, तें जातिसंस्थेमध्यें कांहीं वाढ होऊं नये किंवा फरक होऊं नये असा प्रयत्न करून नव्हे ; तर उलट, या गोष्टी होण्याला अनुकूलता उत्पन्न करून देऊनच झालें. हिंदुस्थानांतील धर्माची व जीवनाची परंपरा ही नेहमींच सहिष्णुतेची आहे. नवीन प्रयोग करून पाहण्याची त्यांत दृष्टि आहे आणि बदल घडवून आणावयाला त्यांत नित्य अवसर असे. यामुळेंच त्या धर्माला व समाज-व्यवस्थेला शक्ति प्राप्त झाली. परंतु परकी स्वाऱ्या व इतर धामधुमी यांच्यामुळें हळूहळू जातिसंस्था ही अगदीं कडक झाली आणि सर्वच हिंदी सामाजिक परंपरेंतील लवचिकपणा नाहींसा होऊन ती मुळींच वांकेनाशी झाली, बदलेनाशी झाली. ही प्रवृत्ति इतक्या दीर्घकाळपर्यंत सुरू राहिली, कीं अखेरीस हिंदी लोकांना सध्यांची दैन्यावस्था प्राप्त झाली आणि आमची जातिसंस्था ही सर्व प्रकारच्या प्रगतीची शत्रु बनून गेली. सर्व सामाजिक यंत्राची एकदृढता आणि एकसूत्रीपणा कायम ठेवण्या-ऐवजीं जातिसंस्थेनें समाजयंत्राचीं शेंकडों शकलें केलीं आहेत, आम्हांला दुर्बल करून टाकलें आहे आणि भावाला भावाशीं शत्रुत्व करायला लावलें आहे.

अशा रीतीनें प्राचीन काळीं जातिसंस्थेनें हिंदी समाजव्यवस्थेंत सामर्थ्य निर्माण केलें. पण त्याच वेळीं या समाजव्यवस्थेच्या ऱ्हासाचीं बीजेंही या जातिसंस्थेंतच सामावलेलीं होतीं. जी केव्हांही नष्ट होऊं शकणारच नाहीं अशा प्रकारची विषमता अखंड चालू ठेवण्याचा हा प्रयत्न अखेरीस फसणार हें ठरलेलेंच होतें. विषमता किंवा अन्याय अथवा एका वर्गाकडून किंवा गटाकडून दुसऱ्या वर्गाची किंवा गटाची होत राहणारी लूट यांच्या पायावर दृढ आणि दीर्घकाळ टिकून राहणारी समाजव्यवस्था कधींच स्थापन करता येणार नाहीं. जगामध्यें आजही अजून अशा प्रकारची अन्याय्य पिळणूक चालूच आहे आणि त्यामुळेंच जगांत सर्वत्र दुःख आणि धडपड दिसून येत

आहे; पण सर्वत्र लोकाना आतां हें समजून चुकलें आहे आणि या, पिळणुकीपासून मुक्तता करून घेण्यासाठीं लोक कसून प्रयत्न करीत आहेत.

हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच चीनमध्येंही समाजव्यवस्थेच्या सामर्थ्याचें मूळ तेथील खेड्यांमध्यें आणि स्वतःचो जमीन कसून राहणाऱ्या लाखों शेतकऱ्यांमध्यें होतें. तेथेंही असे मोठमोठे जमीनदार नव्हते. धर्माचें स्वरूप तेथील लोकांनीं हटवादीपणाचें, वेदवाक्याप्रमाणें अढळ असें किंवा परमतासहिष्णु केव्हांच होऊं दिलें नाहीं. जगांतील इतर कोणत्याही लोकांपेक्षा चिनी लोक पूर्वीही धर्माच्या बाबतींत कमींत कमी हटवादी किंवा अंधश्रद्धायुक्त होते आणि आजच्या घटकेलाही ते तसेच सर्वांत कमी धर्मवेडे आहेत.

तसेंच हिंदुस्थानांत आणि चीनमध्येंही ग्रीस अथवा रोममधल्यासारखी किंवा त्यापूर्वीही ईजिप्तमधल्यासारखी मजुरांची गुलामगिरी नव्हती हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. गुलाम असलेले कांहीं घरगुती नोकर या देशांत असत खरे; परंतु त्यामुळें येथील एकंदर समाजव्यवस्थेंत फारसा फरक होण्यासारखा नव्हता. असे हे गुलाम नसते, तरीही ती समाजव्यवस्था जशीच्या तशीच चालू राहिली असती. ग्रीस किंवा रोममध्यें मात्र असें होऊं शकलें नसतें. तेथील ते असंख्य गुलाम हे समाजव्यवस्थेचा एक अत्यंत आवश्यक भाग होते. समाजांतील साऱ्या श्रमांचा खरा भार केवळ याच लोकांवर असे. तसेंच ईजिप्तमध्येंही हे मजूर गुलाम नसते, तर तेथले ते पिरॅमीड आपल्यासमोर कोठून उभे राहते?

या पत्राची सुरुवात मीं चीनपासून केली आणि चीनची हकीकत पुढें सांगण्याचा माझा हेतु होता. पण मी दुसऱ्याच विषयाकडे वाहवलों. बाकी माझी ही नेहमींचीच खोड आहे म्हणा. निदान पुढच्या पत्रांत आपण चीनला धरून राहूं या.

४१

तंग राज्याच्या अम्मलाखालीं चीनचा उत्कर्ष होतो

७ मे, १९३२

चीनमधील हान घराण्याबद्दल मीं तुला सांगितलें आहे; तसेंच तेथें झालेला बुद्धधर्माचा उदय, छापखान्याच्या कलेचा शोध आणि सार्वजनिक अम्मलदार निवडण्याकरितां करण्यांत आलेली परीक्षेच्या पद्धतीची योजना, यांबद्दलही मी तुझ्याशीं बोललों. ख्रिस्तानंतरच्या तिसऱ्या शतकांत हान घराण्याचा अंत झाला आणि चिनी साम्राज्याचे तीन तुकडे झाले. हा त्या "त्रिराज्याचा" काळ कांहीं शतकें चालला. परंतु पुनः एकदां तंग नांवाच्या वंशाच्या राजांनीं चीनमध्यें सर्व देशाचें मिळून एक प्रबळ राज्य स्थापन केलें. सातव्या शतकाच्या सुरुवातीची ही गोष्ट.

चीनच्या विभागणीच्या काळांतही, आणि उत्तरेकडून तार्तरी लोकांचे हल्ले होतच होते तरीही चिनी संस्कृति आणि विद्या व कला यांचा ओघ जसाच्या तसा कायम राहिला. तत्कालीन मोठमोठीं ग्रंथालयें आणि सुंदर चित्रें यांबद्दलचीं वर्णनें आपल्याला पुष्कळच आढळतात. हिंदुस्थानांतून चीनमध्यें निवळ तलम कापड आणि इतर अशा जातीचा माल यांचीच फक्त निर्यात होत होती असें नव्हे; तर येथील तत्त्वविचार, धर्म, कला यांचीही निर्यात होत होती. हिंदुस्थानमधून पुष्कळ बुद्धधर्म-प्रचारक चीनमध्यें जात असत. अर्थात् ते आपल्याबरोबर हिंदी कलेची परंपराही नेतच असत. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील कलावंत व श्रेष्ठ कारागीरही तिकडे गेलेले असावे. बुद्धधर्माचा उदय आणि हिंदुस्थानातून आलेल्या नवनव्या कल्पना यांचा चीनवर फार परिणाम झाला. चीन देश अर्थातच मुळापासून फार सुधारलेला असाच देश होता. तेव्हा हिंदुस्थानांतील विद्या, धर्म, कला यानीं म्हणजे एखाद्या मागासलेल्या देशांत जाऊन तो सर्व देशच पूर्ण व्यापून टाकावा असा कांहीं प्रकार चीनमध्यें झाला नाहीं. चीनमध्यें या सर्वांना तेथील प्राचीन कला आणि विचारपद्धति याच्याशीं दोन हात करावे लागले. या दोहोंच्या संघर्षांतून कांहीं अंशीं या दोहोंपेक्षा निराळें असेंच जीवन तेथें निर्माण झालें. हिंदुस्थानांतील धर्म, तत्त्वविचार व कला यांची त्यांत पुष्कळशी छाप जरी शिल्लक राहिली, तरी पण त्याचा गाभा हा चिनीच राहिला. आणि त्याचें बाह्य स्वरूपही बहुतांशीं चिनी जीवनाच्या धर्तीवरच राहिलें. अशा रीतीनें हिंदुस्थानांतून आलेल्या या विचारप्रवाहांनीं चीनमधील कलात्मक आणि वैचारिक जीवनाला एक प्रकारें धक्का देऊन चांगली चालना दिली.

चीनप्रमाणेंच त्याहीपलीकडे पूर्वेस कोरिया आणि जपान यामध्येंही बुद्धधर्म आणि हिंदी कला यांच्या संदेशाचें लोण जाऊन पोंचलें. त्या देशांवर याचा काय परिणाम झाला हेंही पाहण्यासारखें आहे. त्यांपैकीं प्रत्येक देशानें आपल्या मूळ स्वभावाला जुळेल अशा प्रकारें त्याचा उपयोग करून घेतला. त्यामुळें चीन आणि जपान यांमध्यें आज बुद्धधर्माचाच प्रसार असला, तरी त्या धर्माचें स्वरूप मात्र दोन्हीं देशांत वेगवेगळें आहे. तसेंच हिंदुस्थानांतून मुळात जो बुद्धधर्म तिकडे गेला त्याहूनही हीं दोन्ही स्वरूपें बरींचशीं निरनिराळीं आहेत. कलेच्या परंपरेंत सुद्धां हवामान आणि लोकसमाज यांच्या अनुरोधानें येथें फरक झालेले आढळतात. हिंदुस्थानमध्यें सर्वसामान्य लोकसमाजाच्या दृष्टीनें पाहिलें, तर कला आणि सौंदर्य यांची आमची ओळख बुजली आहे. कित्येक शतकांमध्यें महान् सौंदर्यशाली असें कांहीं आम्ही निर्माण तर करूं शकलेलों नाहींच, पण सुंदर वस्तूंचें गुणग्रहण करण्याची शक्ति सुद्धां आमची लोपून गेलेली आहे. जो देश स्वतंत्र नाहीं, त्यांत सौंदर्य आणि कला यांचा उत्कर्ष कसा व्हावा? पारतंत्र्याच्या आणि बंधनाच्या काळोखात सौंदर्य व कला पार कोमेजून जातात. परंतु आतां स्वातंत्र्याची उगवती कला डोळ्यांसमोर दिसूं लागल्यापासून मात्र आमच्यामधील सौंदर्यदृष्टि हळूहळू जागृत होते आहेसें दिसतें. स्वातंत्र्य आलें म्हणजे आपल्या या देशांत सौंदर्य आणि कला

यांचें प्रचंड पुनरुज्जीवन झालेलें तुला आढळेल आणि मग आपलीं घरें, शहरें, आणि जीवन यांमधील हेंगाडेपण पार कोठच्या कोठें झाडून उडून जाईल. या बाबतींत चीन आणि जपान हे देश हिंदुस्थानपेक्षा अधिक दैववान् आहेत. त्यांच्यामध्यें कलाकौशल्य आणि सौंदर्य यांबद्दल अद्यापि पुष्कळच जागृत भावना शिल्लक आहे.

चीनमध्यें बुद्धधर्माचा प्रसार जसजसा अधिकाधिक वाढला, तसतसे हिंदुस्थानांतून जास्त जास्त बुद्ध भिक्षू चीनमध्यें जाऊं लागले आणि चिनी भिक्षूही हिंदुस्थानांत व इतरही देशांत संचार करूं लागले. फाहियानबद्दल मी तुला मागें बोललोंच आहें. तशीच ह्यूएन चँगचीही तुला माहिती आहे. हे दोघेही हिंदुस्थानमध्यें येऊन गेले होते. हुई शेंग नांवाच्या एका चिनी भिक्षूनें पूर्वसमुद्रपार प्रवास केला. त्याबद्दलचाही एक मोठा मनोरंजक वृत्तान्त उपलब्ध आहे. इ. स. ४९९ या सालीं तो चीनच्या राजधानीस परत आला आणि म्हणूं लागला, कीं चीनच्या पूर्वेकडे कित्येक हजार मैल दूर असलेल्या एका देशांत मी जाऊन आलों आहें. आणि त्या देशाचें नांव फूसांग असें आहे. चीन आणि जपान यांच्या पूर्वेला आहे पॅसिफिक समुद्र. बहुधा हा महासागर ओलांडून हुई शेंग हा मेक्सिकोंत गेला असावा. कारण त्या काळींसुद्धां मेक्सिकोंत एक प्राचीन संस्कृति अस्तित्वांत होती.

चीनमध्यें बुद्धधर्माचा मोठा प्रसार झालेला पाहून हिंदुस्थानांतील बुद्धधर्मीयांचा एक प्रमुख आचार्य आणि धर्मगुरु दाक्षिण हिंदुस्थानातून चीनमधील कँटन बंदराकडे जाण्यासाठीं समुद्रप्रवासास निघाला. बोधिधर्म हें त्याचें नांव होतें किंव कदाचित् ही त्याची पदवी असेल. कदाचित् या सुमारास हिंदुस्थानात बुद्धधर्माचा प्रभाव हळूहळू कमी होऊं लागला असावा. यामुळें तिकडे जावें असें त्याच्या मनांत आलें असेल. तो तिकडे इ. स. ५२६ सालीं गेला; त्या वेळीं त्याचें उतार वय झालेलें होतें. त्याच्याबरोबर आणि त्याच्यामागूनही पुष्कळ बुद्ध भिक्षू चीनमध्यें गेले. असें सांगतात, कीं या सुमारास लो यांग नांवाच्या केवळ एका चिनी प्रांतांत तीन हजारांहून अधिक हिंदी बुद्ध भिक्षू होते आणि दहा हजारांहून अधिक हिंदी कुटुंबें होतीं.

यानंतर लौकरच हिंदुस्थानांत बुद्धधर्माचा पुन्हां एकदां उत्कर्ष झाला. त्यामुळें, तसेंच बुद्धाची जन्मभूमि आणि बुद्धधर्मीय ग्रंथांचें संग्रहस्थान म्हणून, पुष्कळ श्रद्धाळू बुद्धभिक्षू बाहेरदेशांतून हिंदुस्थानांत येत राहिले. तथापि बुद्धधर्माचें वैभव मात्र हिंदुस्थानांतून अजीबात नाहींसें झालें आणि चीन हाच पुढें प्रमुख बुद्धधर्मीय देश होऊन राहिला असें आढळून येतें.

तंग राजघराण्याची स्थापना इ. स. ६१८ या वर्षीं सम्राट् कौ चू याच्या हातून झाली. त्यानें सर्व चीन एका राजवटीखालीं आणला. एवढेंच नव्हे, तर त्याहून किती तरी विशाल अशा प्रदेशावर त्याचें प्रभुत्व चालूं लागलें. दाक्षिणेस अनाम (आतां व्हाएटनाम) आणि कांबोडिया (कांबोजद्वीप) येथपर्यंत आणि पश्चिमेस थेट इराण



आणि कास्पियन समुद्रापर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें. त्याच्या साम्राज्याची राजधानी सि-आन-फू हें शहर होतें. पूर्व आशियांत हें शहर ऐश्वर्य, शोभिवंतपणा, संस्कृति व शोभा याकरितां फार सुप्रासिद्ध होतें. तेथील कला, तत्त्वज्ञान, आणि संस्कृति यांचा अभ्यास करण्यासाठीं त्या ठिकाणीं कितीएक मंडळें आणि वकिलाती जपानमधून आणि त्या वेळीं स्वतंत्र असलेल्या दक्षिण कोरियामधून येत असत.

तंग बादशहा परदेशीय व्यापार व परदेशीय प्रवासी यांना उत्तेजन देत असत. चीनमध्यें वसाहत करून राहणाऱ्या किंवा येणाऱ्या-जाणाऱ्या परदेशीय लोकांकरितां म्हणून त्यांनीं स्वतंत्र कायदे केले होते; अशासाठीं, कीं शक्य तोंवर त्याना आपापल्या देशाच्या रीतीरिवाजानुसार न्याय मिळावा. चीनमध्यें वसाहत करून राहणारांमध्यें इ. स. ३०० च्या सुमारास दक्षिण चीनमध्यें कँटनच्याजवळ आरबी लोकांनीं केलेली वसाहत ध्यानात घेण्यासारखी आहे. इस्लाम धर्माचा उदय होण्यापूर्वीची, म्हणजेच महंमद पैगंबराचा जन्म होण्यापूर्वीची ही गोष्ट आहे. या आरबांच्या मदतीनें चीनचा समुद्रापलीकडील देशांशीं व्यापार वाढला; तेथील माल-वाहतूक आरबी तशीच चिनी जहाजांतून होऊं लागली.

खानेसुमारीची म्हणजे देशांतील लोकसंख्या किती आहे हें मोजण्याची पद्धति चीनमधील एक जुनी पद्धति आहे हें ऐकून तुला मोठेंच आश्चर्य वाटेल. इ. स. १५६

इतक्या जुन्या काळीं चीनमध्यें एक खानेसुमारी झाली असें म्हणतात. म्हणजे हा हान राजवंशाचा काळ; त्या वेळीं ही गोष्ट घडली असावी. मोजदाद एकेका व्यक्तीची करीत नसत, तर कुटुंबांचीच संख्या मात्र मोजीत. प्रत्येक कुटुंबांत सामान्यतः पांच माणसें असा हिशेब धरीत असत. या हिशेबाप्रमाणें इ. स. १५६ या वर्षीं चीनची लोकसंख्या सुमारें ५० कोटी असावी असें दिसतें. ही पद्धति विशेषशी बिनचूक नाहीं हें खरें; परंतु पाश्चिमेंत तरी खानेसुमारीची पद्धति अगदीं किती अलीकडची आहे हें लक्षांत आण. मला वाटतें, पहिली खानेसुमारी फक्त सुमारें १५० वर्षांपूर्वी अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांमध्यें घेण्यांत आलेली आहे.

तंग राजवंशाच्या अम्मलाच्या सुरुवातीच्या काळांत चीनमध्यें आणखी दोन धर्मांचा प्रवेश झाला. ते म्हणजे ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम धर्म. पश्चिमेकडे नास्तिक व पाखंडी ठरवून हांकलून दिलेल्या एका पंथामार्फत ख्रिस्ती धर्म चीनमध्यें आला. या पंथाच्या लोकांना नेस्टोरियन म्हणत असत. कांहीं दिवसांमागें ख्रिस्ती पंथोपपंथांमधील वाद आणि झगडे याबद्दल एकदां मीं तुला लिहिलें आहे. या अशाच एका झगड्यांतून अखेरीस या नेस्टोरियन लोकांचें रोममधून उच्चाटन झालें. पण त्याचा पंथ मृत झाला नाहीं. ते लोक तेथून निघून चीन व इराण यांमध्यें आणि आशियामधील इतरही भागांत पसरले. हिंदुस्थानांतही ते आले होते. परंतु पुढें ख्रिस्ती धर्माचे इतर पंथ व इस्लामी धर्म यांनीं नेस्टोरियन लोकांना आपल्यामध्यें पचवून टाकलें आणि आज आतां त्यांची ओळखसुद्धां कोठें फारशी शिल्लक उरलेली नाहीं. गेल्या वर्षी आपण दक्षिण हिंदुस्थानांत प्रवास करीत असतांना या लोकांची एक छोटीशी वस्ती तिकडे एका ठिकाणीं पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. आठवतें का तुला? त्यांच्या बिशपनें आपल्याला चहाला बोलाविलें. तो मोठा गोड आणि भला गृहस्थ होता.

ख्रिस्ती धर्माची स्थापना झाल्यापासून पुष्कळच काळानंतर त्याचा चीनमध्यें प्रवेश झाला. त्या मानानें इस्लाम धर्म तेथें फारच लौकर आला. नेस्टोरियन पंथाच्या पाठोपाठच, खुद्द महंमद पैगंबर जिवंत असतांच, इस्लामचा चीनमध्यें प्रवेश झाला. चिनी बादशहानें नेस्टोरियन पंथ आणि इस्लाम धर्म या दोघांच्याही प्रतिनिधींचें आदरपूर्वक स्वागत केलें आणि त्यांचें सर्व म्हणणें ऐकून घेतलें. त्यानें त्यांच्या धर्ममतांतील गुण ग्रहण केले आणि दोघांनाही सारख्या सवलती दिल्या. अरब लोकांना कँटनमध्यें एक मशीद बांधण्यास परवानगी मिळाली. ती बांधून आज तेराशें वर्षें होऊन गेलीं असलीं, तरीही ही मशीद नीट उभी आहे आणि जगांतील प्राचीन मशिदींपैकीं ही एक मशीद आहे.

त्याचप्रमाणें तंग बादशहानें एक ख्रिस्ती प्रार्थनामंदिर (चर्च) आणि धर्ममठ बांधण्यासही परवानगी दिली. सहिष्णुतेची ही प्रवृत्ति आणि यूरपमधील त्या काळची असहिष्णुतेची प्रवृत्ति यांमधील विरोध ठसठशीतपणें नजरेंत भरण्यासारखा आहे.

कागद तयार करण्याची कला अरब लोक प्रथम चिनी लोकांपासून शिकले

आणि त्यांनीं ती कला यूरपमधील लोकाना शिकवली असें म्हणतात. इ. स. ७५१ मध्यें तुर्कस्तान आणि मध्य आशिया या प्रदेशात चिनी लोक आणि आरबी मुसलमान यांच्यामध्यें युद्ध झालें. त्यांत आरबांनीं पुष्कळ चिनी सैनिकांना कैद करून नेलें; या कैदी लोकानीं त्याना कागद कसा तयार करावा हें शिकविलें.

तंग राजघराणें इ. स. ९०७ पर्यंत सुमारें ३०८ वर्षें चालू राहिलें. कितीएकांच्या मताप्रमाणें हा ३०० वर्षांचा काळ चीनच्या इतिहासांतील अत्यंत श्रेष्ठ काळ होय. त्या काळांत चीनमध्यें संस्कृति आणि विद्या यांचा तर फार मोठा उत्कर्ष झालाच; परंतु त्याचबरोबर सर्वसामान्य जनतेच्या सुखाचें प्रमाणही फार उंच वाढलें होतें. ज्या गोष्टींचा शोध पश्चिमेकडील लोकांना फार पुढें लागला, अशा पुष्कळ गोष्टी चीनमध्यें त्या वेळीं माहीत होत्या. कागदाबद्दल तुला मीं मागें सांगितलेंच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे बंदुकीची दारू. चिनी लोकांमध्यें या काळीं मोठे यंत्रशास्त्रज्ञही झाले होते आणि बहुतेक प्रत्येक बाबतींत यूरपपेक्षां हे लोक पुष्कळच पुढारलेले होते. इतके जर ते यूरपच्या पुढें गेले होते, तर ते यूरपच्या पुढें कां राहिले नाहींत? आणि शास्त्रांत आणि संशोधनांत यूरपच्यापुढें त्यांनीं आघाडी कां मारली नाहीं? परंतु तरुण माणसानें हळूहळू मागून येऊन वृद्ध माणसाला गांठावें व त्याच्यापुढें आघाडी मारावी, तसेंच यूरपनें चीनच्या पाठीमागून येऊन कांहीं बाबतींत तरी चीनच्या पुढचा पल्ला गांठला. राष्ट्राच्या इतिहासामध्यें हा असा प्रकार कां घडून येतो, हा मोठा बिकट प्रश्न आहे व तत्त्वज्ञ लोकांनीं त्याचें चिंतन करण्यासारखें आहे. परंतु या प्रश्नानें डोकें पिकवून घेण्याजोगी कोणी मोठी तत्त्वज्ञ तूं कांहीं अजून झाली नाहींस. तेव्हा मी तरी उगाच माथेफोड कशाला करूं?

चीनच्या या मोठेपणाचा त्या काळीं आशियांतील बाकीच्या प्रदेशावर स्वाभाविकच फार मोठा परिणाम झाला. कलाकौशल्य आणि ज्ञानसंपादन यांच्या बाबतींत चीनकडूनच मार्गदर्शन व्हावें, अशी या लोकांची अपेक्षा व खटपट असे. इकडे हिंदुस्थानांत गुप्तांच्या साम्राज्याचा काळ आतां संपला होता. त्यानंतर हिंदुस्थानचा तारा कांहीं तेजानें आसंमतात् आतां फारसा चमकत नव्हता. तथापि, इतिहासातील नित्यक्रमाप्रमाणें सुधारणा आणि संपन्नता यांच्यामधून चीनमध्यें पण अमर्याद चैनबाजी आणि आरामशीर खुशालचेंडू राहणी यांचा प्रादुर्भाव झाला. त्याच्यापाठोपाठ राज्य-व्यवस्थेंत लाचलुचपतीचा प्रवेश झाला. त्यासाठीं अवजड करांची आवश्यकता उत्पन्न झाली. त्यामुळें लोकांना तंग घराण्याचा अम्मल नकोसा झाला. आणि त्यांनीं तें घराणें नष्ट करून टाकलें.

४२

चोसेन आणि दै निपॉन

८ मे, १९३२

जगाच्या इतिहासाची आपली ही गोष्ट जसजशी पुढें जाईल, तसतसे आणखी आणखी देश आपल्या नजरेसमोर येत जाणार. म्हणून आतां आपल्याला थोडा वेळ कोरिआ व जपान यांच्याकडे जराशी नजर वळविली पाहिजे. हे देश चीनचे अगदीं जवळचे शेजारी असून पुष्कळ बाबतींत चिनी सुधारणेचींच जणुं हीं अपत्यें आहेत. हे देश म्हणजे आशिया खंडाचें पूर्वेच्या बाजूचें अगदीं शेवटचें टोंक होत. म्हणूनच या भागाला अतिपूर्व म्हणतात. त्याच्या पलीकडे महान् पॅसिफिक सागर आहे. अगदीं अलीकडेपर्यंत अर्थातच या देशाचा अमेरिका खंडाशीं कांहींच संबंध नव्हता. यामुळें त्यांचा जो कांहीं संबंध आला तो सगळा जवळच्याच आशिया खंडाच्या मुख्य भूमीवरील चीन या महान् राष्ट्राशीं. त्यांचा धर्म, कला, सुधारणा, हीं सर्व त्यांना चीनपासून किंवा चीनच्या मार्गानें प्राप्त झालीं. या दृष्टीनें चीनच्या ऋणाचें फार प्रचंड ओझें कोरिआ आणि जपान या दोन्ही राष्ट्रांवर आहे. थोडेंफार हिंदुस्थानचें ऋणही त्यांच्या माथ्यावर आहे; परंतु हिंदुस्थानकडून त्यांना जें कांहीं मिळालें, तें सर्व चीनच्या मार्फत आणि त्यावर चिनी परंपरेचा छाप मारून.

कोरिआ आणि जपान यांना प्राप्त झालेली जागाच अशी स्वतंत्र आहे, कीं आशिया खंडांतील किंवा इतरही ठिकाणच्या मोठमोठ्या घडामोडींशीं या दोन्ही देशांचा जवळजवळ मुळींच संबंध आला नाहीं. या सर्व घडामोडींच्या प्रमुख क्षेत्रांपासून हे देश फारच दूर होते; आणि ही गोष्ट त्यांच्या, विशेषतः जपानच्या कांहीं अंशीं फायद्याचीच ठरली. याच कारणामुळें त्यांच्या अगदीं बऱ्याच अलीकडच्या काळापर्यंतच्या इतिहासाकडे आपण जरी दुर्लक्ष केलें, तरी विशेष अडचण होण्याचें कांहीं कारण नाहीं. आशिया खंडांतील बाकीच्या प्रदेशाचा इतिहास समजून घेण्याच्या आपल्या कामांत त्यामुळें कांहींच कमीजास्त होण्याचें कारण नाहीं. पण मॅलेशिया आणि पूर्वेकडील त्या बाजूचे प्रदेश यांच्या प्राचीन इतिहासाचा सुद्धां जेथें आपण विचार केला, तेथें या देशांचाच प्राचीन इतिहास तेवढा नजरेआड करण्याचें आपल्याला कांहीं प्रयोजन नाहीं. गरीब बिचाऱ्या कोरिआ देशाची तर आजकाल जवळजवळ कोणाला आठवणसुद्धां नाहीं. (जपाननें सध्यां तो देश गिळंकृत करून आपल्या साम्राज्याला जोडून टाकलेला आहे.) परंतु कोरिआपुढेंही अजून स्वातंत्र्याचें ध्येय खडें आहे. आणि दास्यविमोचनासाठीं त्याचा झगडा चालू आहे. आजकाल ज्याच्या त्याच्या डोळ्यांपुढें जपानचेंच नांव आहे; जपाननें केलेल्या चीनवरील हल्ल्याच्या वृत्तान्तानेंच सगळीं वर्तमानपत्रें भरून जात आहेत.

मी हें येथें बसून लिहितों आहें त्याच वेळीं तिकडे मँचुरियांत चागलेंच युद्ध जुंपलेलें आहे. म्हणून कोरिआ आणि जपान यांच्या प्राचीन इतिहासाची थोडीफार माहिती आपल्याला असावी हें बरें. त्यामुळें आजच्या त्या भागांतील घडामोडी समजण्यास मदत होईल.

त्यांच्याविषयीं पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हणजे हे देश फार दीर्घकाळपर्यंत सर्वांपासून अलग, अगदीं एकटे राहिलेले आहेत ही होय. जपानच्या बाबतींत हा अलगपणा आणि त्या देशावर किती तरी काळपर्यंत कोणाचाही हल्ला झाला नाहीं ही गोष्ट, हे जपानच्या इतिहासाचे दोन मोठे लक्षांत घेण्यासारखे विशेष आहेत. आजपर्यंतच्या जपानच्या सर्व इतिहासांत जपानवर बाहेरून स्वारी करण्याचे अगदींच हाताच्या बोटांवर मोजण्याइतके प्रयत्न झाले आहेत, आणि त्यांत एकही हल्ला यशस्वी झाला नाहीं. अगदीं अलीकडच्या काळापर्यंत जपानपुढें जर कांहीं अडचणी उभ्या राहिल्या असतील, तर त्या सर्व अंतर्गत अडचणी होत्या. कांहीं काळपर्यंत तर जपाननें बाकीच्या जगापासून आपला संबंध पार तोडून टाकला होता. जपानमधून क्वचितच कोणाला बाहेर पडतां येई. आणि कोणाही परकीयाला, प्रत्यक्ष चीनमधून सुद्धा कोणाला, जपानमध्यें प्रवेश करतां येत नसे. यूरपांतील परदेशस्थ लोक आणि ख्रिस्ती धर्मप्रचारक यांचा त्रास वांचविण्यासाठीं हा निर्बंध घालण्यांत आलेला होता. पण हें करणें मूर्खपणाचें आणि धोक्याचेंही होतें. कारण त्याचा अर्थ 'आपण होऊनच आपल्या सर्व देशाला तुरुंगांत डांबणें आणि बाहेरच्या वाईट गोष्टींबरोबर चांगल्या गोष्टींपासूनही त्याचा संबंध अजीबात तोडून टाकणें असा होत होता. पण मग पुढें जपाननें एकाएकीं आपल्या या तुरुंगाचीं दारें व खिडक्या पार सताड उघडल्या आणि यूरपपासून जें कांहीं शिकण्यासारखें होतें तें सारें आत्मसात् करण्यासाठीं प्रचंड धांवपळ सुरू केली. यूरपांतील सर्व नव्या गोष्टी शिकून घेण्याचा हा प्रयत्न जपाननें इतक्या कांहीं चमत्कारिक चिकाटीनें केला, कीं अवघ्या एकदोन पिढ्यांत बाह्यतः जपानचें स्वरूप कोणत्याही यूरपीय राष्ट्राच्यासारखें होऊन गेलें आहे; एवढेंच नव्हे, यूरपीय लोकांच्या सगळ्या वाईट संवयीही जपाननें उचलल्या आहेत. ही सर्व घडामोड अवघ्या सत्तर वर्षांमध्यें घडून आलेली आहे.

चीनच्या इतिहासाला सुरुवात झाल्यावर पुष्कळ काळानंतर कोरिआचा इतिहास सुरू होतो. आणि जपानचा इतिहास कोरिआनंतरही पुष्कळ काळानें सुरू होतो. गेल्या वर्षीं एका पत्रांत मीं लिहिलेलें तुला आठवत असेल, कीं कि चे नांवाचा एक चिनी गृहस्थ चीनमध्यें आलेल्या नवीन राजवंशाला त्याची मान्यता नव्हती म्हणून आपल्या पांच हजार अनुयायांनिशीं देश सोडून पूर्वेकडे निघून गेला होता. त्यानें ह्या देशांत, कोरिआंत वसाहत केली आणि त्या देशाला चोसेन—'प्रातःशांति'—हें नांव दिलें. ही गोष्ट इ. स. पूर्वी ११२२ मध्यें घडली. कि चेबरोबर चिनी कलाकौशल्य, शेतकीचा उद्योग, रेशीम तयार करण्याचा व्यवसाय याही गोष्टी या नव्या प्रदेशांत आल्या. सुमारें नऊशेंहूनही अधिक वर्षें कि चेच्या वंशजांनीं चोसेनवर राज्य केलें. वेळोवेळीं पुष्कळ

लोक चीन सोडून चोसेनमध्यें येऊन राहत असत आणि अशा रीतीनें चोसेनचा चीनशीं चांगलाच निकट संबंध चालू होता.

चीनमध्यें शी हुआंग टी हा बादशहा होता. त्या वेळीं चिनी लोकांचा एक बराच मोठा गट चोसेनमध्यें येऊन राहिला. हीं बादशहा अशोकाचा समकालीन होता, हें बहुतेक तुझ्या लक्षांत असेलच. आपल्याला जो चीनचा 'पहिला बादशहा' म्हणवीत असे आणि ज्यानें प्राचीन ग्रंथांची होळी केली तो हा गृहस्थ. शी हुआंग टीच्या या निर्दय व जुलमी राज्यपद्धतीमुळें ज्यांना आपलीं घरेंदारें सोडून पळून जाण्याचा प्रसंग आला, अशा पुष्कळ चिनी लोकांनीं कोरिआंत आसरा घेतला आणि कि चेच्या दुर्बल झालेल्या वंशजांची राजपदावरून त्यांनीं हकालपट्टी केली. त्यानंतर चोसेनचीं बरींच छकलें होऊन त्या ठिकाणीं कितीएक लहानलहान राज्यें झालीं. सुमारें ८०० वर्षें ही अवस्था टिकून राहिली. या निरानिराळ्या राज्यांचें एकमेकात नेहमीं तंटे असत. एकदां त्यांपैकीं एका राज्यानें एकदां चीनची मदत मागितली. पण अशी ही मदत मागणें म्हणजे मोठ्या थोरल्या सुंकटाला आमंत्रणच होतें तें. मदत जरूर आली. पण मदत घेऊन येणारे परतच जाईनात! प्रबळ देशांची ही नेहमींचीच रीत आहे. म्हणून चीननें चोसेनमध्यें एकदां टाकलेला पाय कांहीं मागें घेतला नाहीं आणि चोसेनचा कांहीं प्रदेश त्यानें आपल्या साम्राज्यांतच सामील करून टाकला. चोसेनचा बाकीचा जो भाग राहिला, तो सुद्धां शेंकडों वर्षेंपर्यंत चीनच्या तंगवंशीय सम्राटांचें अधिराज्य मान्य करीत होताच.

शेवटीं इ. स. ९३५ मध्यें चोसेनमध्यें एकच अखंड राज्य स्थापन झालें. हें राज्य स्थापन करण्याचा मान वँग कीन याचा असून त्याच्या वंशांतील लोकांचा अम्मल त्यानंतर ४५० वर्षें त्या राज्यावर राहूं शकला.

या दोनतीन परिच्छेदांमध्यें मीं तुला कोरिआचा २००० हून अधिक वर्षांचा इतिहास सांगून टाकला आहे. यामध्यें विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे चीनचें कोरिआवरील महान् ऋण. लिहिण्याची कला कोरिआमध्यें चीनमधूनच आली. एक हजार वर्षें तेथें चिनी लिपीच वापरांत होती. ही चिनी लिपि आपल्यासारखी अक्षरांची नसून निरनिराळ्या कल्पना, शब्द आणि संप्रदाय यांचीं निदर्शक अशीं अगणित चित्रें व खुणा यांची ती लिपि आहे, हें तुला ठाऊक असेलच. हजार वर्षांनंतर मग त्यांतूनच आपल्या भाषेला जुळेल अशी एक लिपि चोसेनमधील लोकांनीं तयार केली.

त्या ठिकाणीं बुद्ध धर्मही चीनच्या मार्गानेंच आला आणि चीनच्या कॉन्फ्युशिअसच्या तत्त्वज्ञानाचाही तेथें प्रवेश झाला. भारतीय कलेचें वळण कोरिआ व जपान यांच्यापर्यंत चीनमधूनच जाऊन पोंचलें. कोरिआमध्यें कलेचे, विशेषतः शिल्पकलेचे अत्यंत सुंदर नमुने त्या काळीं निर्माण झालेले आढळतात. त्यांच्या शिल्पकलेचें वळण चिनी शिल्पकलेच्या धर्तीवरच आहे. जहाजें बांधण्याचा धंदासुद्धां तेथें चांगला भरभराट-

लेला होता. इतका, कीं एका काळीं कोरिआजवळ मोठें प्रबल आरमार सुसज्ज असून तें घेऊन त्यानें जपानवर हल्लाही केला होता.

आजच्या जपानी लोकांचे पूर्वज या कोरिआ म्हणजे चोसेन देशांतूनच आले असावेत. त्यांच्यापैकीं कांहीं लोक दक्षिणेकडून मॅलेशियामधूनही आलेले असतील. तुला माहीत आहे, कीं जपानी लोक हे मंगोलियन वंशाचे आहेत. आजही जपानमध्यें अइनु नांवाच्या जातीचे कांहीं लोक आहेत; ते लोक त्या देशांतले अगदीं मूळचे रहिवासी होत असें समजतात. हे लोक वर्णानें गोरे, थोडे केसाळ असे असून सर्वसामान्य जपानी लोकांपेक्षां अगदींच निराळे आहेत. आज या अइनु लोकांची जपानी बेटांच्या अगदीं उत्तरेकडे हकालपट्टी करण्यांत आलेली आहे.

इ. स. २०० च्या सुमारास जपानमध्यें यामाटो नांवाच्या राज्यांत जिंगो नावाची सम्राज्ञी होती, असा उल्लेख आढळतो. यामाटो हें जपानचें मूळचें नांव असावें किंवा बाहेरदेशाहून आलेले लोक ज्या भागांत वसाहत करून राहत त्यांचें तें नांव असावें. या राणीचें जिंगो हें नांव नीट लक्षांत घे. जपानच्या एका अत्यंत प्राचीन राज्यपदस्थ व्यक्तीचें नांव जिंगो हें असावें, हा एक मोठा अजब योगायोग आहे. जिंगो या शब्दाला इंग्रजी भाषेंत एक विशेष अर्थ प्राप्त झालेला आहे. घमेंडखोर, चढेल, दुडप्या साम्राज्यवादी असा त्याचा अर्थ आहे; किंवा नुसता साम्राज्यवादी असा त्याचा अर्थ केला तरी हरकत नाहीं. कारण साम्राज्यवादी म्हटला म्हणजे तो स्वतःच्या फुशारक्या सांगणारा, अहंमन्य, चढेल असा माणूस कांहीं प्रमाणांत तरी असावयाचाच. जपानलाही अलीकडे हा साम्राज्यवादाचा, किंवा जिंगोवादाचा म्हणा, रोग जडलेला दिसतो. आणि त्यामुळें अलीकडच्या कांहीं वर्षांत त्यानें चीन व कोरिआ यांच्या बाबतींत गैरवर्तन चालविलें आहे. तेव्हां इतिहासकालातील जपानच्या पहिल्या राज्यकर्त्या व्यक्तीचें नाव जिंगो असावें हा किती विचित्र योगायोग आहे!

यामाटोचे कोरिआशीं अगदीं निकट संबंध होते. आणि चिनी सुधारणेचा प्रदेश यामाटोमध्यें कोरिआमार्फत झाला. चिनी लोकांची ग्रांथिक भाषा (लिखित भाषा) हीही इ. स. ४०० च्या सुमारास कोरिआंतून तेथें आली. बुद्धधर्मही याच मार्गानें आला. इ. स. ५५२ मध्यें पाकचेच्या राजानें (या सुमारास कोरिआमध्यें तीन वेगळीं वेगळीं राज्यें स्थापन झालीं होतीं, त्यांपैकीं हें एक राज्य होतें) यामाटोच्या राजाकडे एक बुद्धाची सुवर्णमूर्ति आणि बुद्धधर्मीय प्रचारक त्यांच्या धर्मग्रंथांसह पाठवून दिले.

जपानच्या पूर्वीच्या धर्माचें नांव शिंटो धर्म असें होतें. हा चिनी शब्द असून त्याचा अर्थ 'देवांचा पंथ' असा होता. निसर्गपूजा आणि पूर्वजपूजा यांचें एक प्रकारचें मिश्रण या धर्मामध्यें होतें. पारलौकिक जीवन किंवा सृष्टीचें गूढ या किंवा अशा कूट प्रश्नांशीं या धर्माचा फारसा संबंध नव्हता. लढाऊ लोकांचा हा धर्म होता. जपानी लोक हे चिनी लोकांचे इतके जवळचे शेजारी आहेत आणि चिनी सुधारणांची त्यांनीं इतकी उसनवारी केलेली आहे; तरी पण चिनी लोकांपासून ते अगदींच निराळे राहिले

आहेत. चिनी लोक हे पूर्वीपासून तों थेट आतांपर्यंत स्वभावतः अगदीं शांततापिय आहेत. त्यांची सर्व सुधारणा, जीवित, तत्त्वज्ञान हें शांतिमय आहे. उलटपक्षीं, जपानी लोक हे पहिल्यापासूनच लढवय्ये लोक आहेत. सैनिकाचा मुख्य गुण म्हणजे आपल्या नेत्याशीं आणि जोडीदाराशीं एकनिष्ठ राहणें हा आंहे. जपानमध्यें या गुणाचें वास्तव्य प्रथमपासून चालत आलेलें आहे ; त्यांतच त्यांच्या सामर्थ्याचें फार मोठें मूळ आहे. शिंटो धर्मानें त्याना हाच गुण शिकविला, कीं परमेश्वराला मान द्या आणि त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या वंशाशीं एकनिष्ठ राहा! असा हा शिंटो धर्म आजही जपानांत जिवंत आहे. आणि बुद्धधर्माच्या बरोबरीनें त्याचाही प्रभाव तेथें चालू आहे.

पण याला सद्गुण म्हणता येईल का? आपल्या जोडीदाराशीं किंवा आपल्या कार्याशीं एकनिष्ठ राहणें हा खरोखरच सद्गुण आहे. परंतु शिंटो किंवा इतरही धर्मांनीं नेहमीं आमच्या एकनिष्ठ वृत्तीचा फायदा आमच्यावर राज्य करणाऱ्या लोकांनाच लुटूं दिला आहे. जपानमध्यें, रोममध्यें, इतरही ठिकाणीं, अधिकारावरील लोक म्हणजे प्रभु किंवा देव, आणि म्हणून त्यांच्याशीं एकनिष्ठ राहणें हाच धर्म, एवढेंच लोकांना शिकविलें जात असे. आणि ह्या गोष्टीचा केवढा दुष्परिणाम झालेला आहे, हें पुढें दिसून येईलच तुला.

बुद्धधर्माचा जेव्हां जपानमध्यें प्रवेश झाला, तेव्हां त्याचा आणि मूळच्या शिंटो धर्माचा परस्परांशीं थोडासा झगडा झाला. परंतु लौकरच त्यांची समजी होऊन ते एक-मेकांच्या जोडीनें नांदूं लागले आणि मूळच्या शिंटो धर्माचा ऱ्हास झाला नाहीं. दोहोंमध्यें शिंटो हाच अधिक लोकप्रिय धर्म असून राज्यकर्ते लोकही त्यालाच प्रोत्साहन देत असतात. कारण तो धर्म लोकांना राज्यकर्त्यांविषयीं एकनिष्ठ राहण्याला आणि राज्यकर्त्यांच्या आज्ञा पालन करण्याला शिकवीत असतो. शिवाय, बुद्धधर्म हा त्यांना थोडासा धोक्याचा धर्म वाटतो. कारण त्याचा संस्थापक हा स्वतः बंडखोर होता.

जपानमधील कलाकौशल्याच्या इतिहासाला बुद्धधर्माच्या प्रवेशापासून सुरुवात होते. जपान उर्फ यामाटो देशाचा तेव्हांपासून चीनशीं प्रत्यक्ष संबंध वाढण्यास सुरुवात होते. तंग राजांच्या काळांत त्याच्या नवीन राजधानीची, सि-आन-फू या शहराची कीर्ति साऱ्या पूर्व आशियाभर पसरली होती; त्या काळीं जपानमधून चीनमध्यें नेहमीं वकील पाठविले जात असत. एवढेंच नव्हे, तर या जपानी उर्फ यामाटो लोकांनीं आपल्या देशांतही नारा नांवाच्या नवीन राजधानीची स्थापना केली. आणि हें नारा शहर म्हणजे अगदीं थेट सि-आन-फूची हुबेहूब प्रतिकृति करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. दुसऱ्यांची नक्कल करण्याचें किंवा प्रतिकृति वठविण्याचें मोठें आश्चर्यकारक सामर्थ्य या जपानी लोकांत पहिल्यापासून आहेसें दिसतें.

जपानच्या साऱ्या इतिहासांत आपल्याला मोठमोठ्या घराण्यांचें परस्पराशीं शत्रुत्व आणि सत्तेसाठीं धडपड, याच गोष्टी मुख्यत्वें आढळून येतात. प्राचीन काळीं इतर देशांतही तुला हाच प्रकार आढळून येईल. त्या देशांतील या राज्यघराण्यांमध्यें प्राचीन

काळची ती कुलाभिमानाची पद्धति कायम राहिलेली दिसते. त्यामुळें जपानचा इतिहास म्हणजे मुख्यतः या घराण्यांच्या परस्पर-स्पर्धेचा वृत्तान्तच होय. त्यांचा बादशहा मिकॅडो हा सर्वसत्ताधीश, अनियंत्रित, देवाचा अंश आणि सूर्यकुलोत्पन्न आहे, अशी भावना चालत आलेली आहे. शिंटो धर्म आणि पूर्वजपूजेची परंपरा यांमुळें लोकांमध्यें बादशहाची अनियंत्रित सत्ता मानण्याची आणि देशांतील सत्ताधारी उच्च वर्गाच्या आज्ञा पालन करण्याची प्रवृत्ति उत्पन्न झालेली आहे. परंतु बादशहा मात्र स्वतः जपानच्या इतिहासांत कितीएक प्रसंगीं दुसऱ्याच्या हातचें बाहुलें झालेला, हातीं मुळींच सत्ता नसलेला, असा आढळतो. खरी सत्ता असायची एखाद्या मोठ्या घराण्याच्या किंवा कुळाच्या हातीं. कोणाला राज्यपदावर आणावयाचें ही सत्ताही त्यांच्या हातीं असावयाची; राजा किंवा बादशहा त्यांच्या मतानुसार ठरावयाचा.

जपानच्या इतिहासांत अशा रीतीनें राज्याची सत्ता चालविणारें पहिलें मोठें घराणें आढळून येतें तें सोगा घराणें होय. या घराण्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला व त्यामुळें बुद्धधर्म हा दरबारचा आणि राज्याचा अधिकृत धर्म झाला. या घराण्यांतील एक नायक, शोतुकू तैशी, हा जपानच्या इतिहासांतील एक अत्यंत श्रेष्ठ पुरुष होऊन गेला. हा अत्यंत निष्ठावंत बुद्धधर्मानुयायी असून मोठा कलावंत होता. चीनमधील कॉन्फ्यूशिअसच्या ग्रंथांतील विचारांचा त्याच्या मनावर फार परिणाम झालेला आहे. त्यामुळें निव्वळ शक्तीवर आधारलेल्या राज्यव्यवस्थेऐवजीं न्यायावर, नीतीवर आधारलेली राज्यव्यवस्था प्रस्थापित करण्याचा त्यानें प्रयत्न केला. जपानमध्यें या काळीं सत्ता खरोखर निरनिराळ्या कुळांमध्यें विभागलेली असून त्यांच्या घराण्यांचे नायक जणुं कांहीं स्वतंत्र राज्यकर्तेच असत; ते परस्परांशीं लढत आणि कोणतीच वरिष्ठ सत्ता मानीत नसत. बादशहाला नांवाला मात्र खूप मोठा मान असे. पण तो झाला तरी अशा एखाद्या मोठ्या घराण्याचा नायक असे एवढेंच. ही परिस्थिति बदलून मध्यवर्ती सत्ता प्रबळ करण्याचा प्रयत्न शोतुकू तैशी यानें केला. निरनिराळ्या कुळांचे नायक आणि अमीर-उमराव यांना त्यानें बादशहाच्या अमलाखालीं आणून मांडलिक किंवा दुय्यम सरदार बनविलें. ही हकीकत सुमारें इ. स. ६०० च्या सुमाराची होय.

शोतुकू तैशीच्या मृत्यूनंतर त्याच्या घराण्याची हकालपट्टी करण्यांत आली. त्यानंतर थोड्याच काळांत जपानी इतिहासाच्या रंगभूमीवर आणखी एक फार प्रख्यात पुरुष येतो. त्याचें नाव काका तोमीनो कामातोरी. त्यानें राज्यव्यवस्थेंत हरएक प्रकारचे आमूलाग्र फरक करून चिनी राज्यव्यवस्थेची नक्कल करण्याचा प्रयत्न केला. पण चीनमधील विशेष अशी जी अधिकाराच्या जागेवर नेमण्यासाठीं उमेदवार निवडण्याची परीक्षेची पद्धति, तिचें मात्र त्यानें अनुकरण केलें नाहीं. या काळात बादशहा म्हणजे केवळ एका कुळाचा प्रमुख न राहतां बराच बलाढ्य झाला आणि मध्यवर्ती सरकार प्रबळ झालें.

याच काळांत नारा शहर हें राजधानीचें शहर झालें. पण तेथें राजधानी फारच

थोडा काळ टिकली. इ. स. ७९४ मध्यें ही राजधानी कियोटो या शहरांत आणण्यांत आली. आणि तेथेंच सुमारें ११०० वर्षें तो राहिली. अगदीं अगदीं अलीकडे तेथून बदलून टोकिओ शहरांत राजधानी आणण्यांत आली. टोकियो हें एक भलें मोठें आधुनिक पद्धतीचें शहर आहे. परंतु जपानच्या खऱ्या अंतरंगाची थोडीफार साक्ष आपणांस कियोटो शहरात पाहायला सापडते. सुमारें एक हजार वर्षांच्या घडामोडींचें स्मरणही कियोटो शहराच्याभोंवतींच घुटमळत आहे.

काका तोमीनो कामातोरी हाच जपानमधील फुजीवारा घराण्याचा संस्थापक. जपानच्या इतिहासात या घराण्याच्या हातून फार मोठ्या घडामोडी झाल्या आहेत. सुमारें २०० वर्षें या घराण्यानें सत्ता उपभोगिली. बादशहांना निव्वळ आपल्या हातचीं बाहुलीं बनवून त्यांना आपल्या घराण्यांतील मुलींशीं विवाह करावयास लावलें. दुसऱ्या घराण्यांतील कर्तबगार लोकांची भीति नको म्हणून ते त्याना भिक्षू होऊन मठामध्यें जाऊन राहावयाला सक्तीनें भाग पाडीत.

राजधानी नारा येथें होती त्या वेळीं चिनी बादशहानें जपानच्या बादशहाला एक पत्र पाठविलें होतें; त्यांत जपानच्या बादशाला तैनी पुङ्कोकचा सम्राट् असें संबोधिलें होतें. त्याचा अर्थ, 'श्रेष्ठ सूर्योदयाचा सम्राट्' असा आहे. जपानी लोकाना या नांवांतील कल्पना विशेष आवडली. नुसत्या यामाटो या नांवापेक्षा हें नांव जरा अधिक भारदस्त आहेसें वाटलें. म्हणून त्यांनीं आपल्या देशाला **'दै निपॉन'** 'सूर्योदयाची भूमि' असें नांव दिलें. आणि जपानी लोकांमध्यें जपानचें खरें घरचें नाव अद्यापिही हेंच चालू आहे. निपॉनपासून जपान या नावाची उत्पत्ति मोठ्या विचित्र रीतीनें झाली. हें नवें नांव घेतल्यानंतर सहाशें वर्षांनीं एक मोठा इटालियन प्रवासी मार्को पोलो, हा चीनमध्यें गेला होता. तो खुद्द जपानला नाहींच गेला. परंतु आपल्या ग्रंथांत जपानबद्दल मात्र त्यानें लिहिलें आहे. जपानचें नांव चीनमध्यें त्याच्या कानावर चै-पुङ्-कोक् असें पडलें होतें. तें त्यानें आपल्या ग्रंथांमध्यें **झिपँगो** असें लिहिलें आणि या शब्दावरून जपान हें नांव निघालें.

आपल्या देशाला हिंदुस्थान आणि इंडिया हीं नांवें कशीं पडलीं हें मीं तुला कधीं सांगितलें आहे का? अथवा तुला तें दुसरीकडून कोठून समजलें आहे? हीं दोन्ही नांवें इंडस म्हणजेच सिंधु नदीच्याच नांवापासून निघालेलीं आहेत. त्यामुळें सिंधु हीच हिंदुस्थानची खरीखुरी अशी नदी समजली पाहिजे. सिंधु नदीवरून आपल्या देशाला ग्रीक लोक इंडॉस म्हणूं लागले आणि त्यावरून इंडिया हें नांव निघालें. या सिंधूपासूनच पर्शियन लोकांनीं हिंदु हा शब्द बनविला आणि त्यावरून हिंदुस्थान हें नांव निघालें.

४२

हर्षवर्धन आणि ह्यूएन चँग

११ मे, १९३२

पुन्हां एकदां आपण हिंदुस्थानकडे जाऊं या. हूण लोकांचा पराभव करून त्यांना मागें हांकून देण्यांत आलेलें आहे. तथापि त्यांच्यापैकीं पुष्कळसे लोक कोनाकोपऱ्यांत राहिलेच आहेत. बालादित्यानंतर गुप्तांचें महान् कुल निस्तेज होऊन जातें आणि उत्तर हिंदुस्थानांत अनेक स्वतंत्र राज्यें निर्माण होतात. इकडे दक्षिणेकडे पुलकेशीनें चालुक्यांचें साम्राज्य स्थापन केलेलें आहे. येथपर्यंत आपली गाडी येऊन ठेपलेली आहे.

कानपूरपासून जवळच कनोज हें छोटेंसें शहर आहे. कानपूर हें शहर आतां मोठें शहर झालेलें आहे. पण त्यांतले ते कारखाने आणि गिरण्यांचीं धुराडीं यामुळें त्याचें स्वरूप हेंगाडें वाटतें. कनोज तर आजकाल फारच लहान शहर झालेलें आहे; जवळजवळ एखादें खेडेंच. आपण ज्या कळाबद्दल बोलतों आहों, त्या काळीं कनोज हें महान् राजधानीचें शहर होतें. त्या ठिकाणीं प्रख्यात कवी, कलावंत आणि तत्त्वज्ञ राहत होते. कानपूर शहर त्या वेळीं तर जन्मालाही आलें नव्हतें. पण पुढेंही पुष्कळ शतकें अजून त्याचा जन्म होईपर्यंत जावयाचीं होतीं.

कनोज हें अलीकडचें नांव आहे. खरें नांव कान्यकुब्जा म्हणजे कुबड आलेली मुलगी. त्याबद्दलची गोष्ट अशी सांगतात, कीं फार प्राचीन काळीं एका ऋषीचा कांहीं अपमान झाला. त्यामुळें संतप्त होऊन राजाच्या शंभर मुलींना त्यानें शाप देऊन सर्वांच्या पाठीला कुबड आणलें. तेव्हांपासून त्याच्या नगरीला कुबड्या मुलींची म्हणून कान्यकुब्जा हें नांव मिळालें.

परंतु आपण आपलें कनोज हेंच सुटसुटीत नांव वापरूं. हूण लोकांनीं कनोजच्या राजाला ठार केलें व त्याची पत्नी राज्यश्री हिला कैद केलें. त्यानंतर राज्यश्रीचा भाऊ राज्यवर्धन हा हूणांशीं लढून राज्यश्रीला सोडविण्यासाठीं पुढें झाला. त्यानें हूणांचा पराभव केला. परंतु विश्वासघातानें त्याचा कोणीं खून केला. त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ हर्षवर्धन हा आपली बहीण राज्यश्री हिच्या शोधार्थ निघाला. दरम्यान ती बिचारी राजपत्नी कशी तरी हूणांच्या तडाक्यांतून निसटून डोंगरकपारींतून दडून राहिली होती. आणि हाल व दुःख यांना कंटाळून जाऊन जीव देण्याचा निश्चय तिनें केला होता. सती म्हणून स्वतःला जाळून घेण्याच्या ती अगदीं बेतांत होती. अशा स्थितींत हर्षवर्धनाला ती सांपडली व त्यानें तिला त्या विचारापासून परावृत्त केलें; अशी कथा लोकांत प्रचलित आहे.

अशा रीतीनें बहिणीचा शोध करून तिला संकटांतून सोडविल्यानंतर ज्या त्या क्षुद्र राजानें विश्वासघातानें आपला भाऊ राज्यवर्धन याचा खून केला होता, त्याला

शिक्षा करण्याचें कार्य हर्षवर्धनानें प्रथम हातीं घेतलें. त्या राजाला तर शिक्षा त्यानें केलीच; पण तेवढ्यावरच तो स्वस्थ बसला नाहीं. पूर्वेस बंगालच्या उपसागरापासून तों पश्चिमेस आरबी समुद्रापर्यंत आणि दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत सारा उत्तर हिंदुस्थानचा प्रदेश त्यानें जिंकला. विंध्य पर्वताच्या पलीकडे चालुक्यांचें साम्राज्य होतें, तेथें मात्र हर्षवर्धनाचा पुढचा मार्ग खुंटला.

हर्षवर्धनानें कनोज येथें आपली राजधानी स्थापिली. हर्ष हा स्वतः कवि आणि नाटककार होता. त्यामुळें त्यानें आपल्याभोंवतीं अनेक कवी आणि कलावंत यांचा संच जमविला होता. यामुळें कनोज शहराची जिकडेतिकडे फार ख्याति झाली. हर्ष हा निष्ठावंत, कडवा, बुद्धधर्मीय होता. त्या सुमारास बुद्धधर्माचें एक स्वतंत्र धर्म या दृष्टीनें महत्त्व हिंदुस्थानांतून बहुतेक नाहींसें झालें होतें. ब्राह्मणांनीं त्याचा हिंदुधर्मांत बहुतेक अंतर्भाव करून टाकला होता. हर्ष हा हिंदुस्थानांतील शेवटचाच मोठा बुद्धधर्मीय सम्राट् म्हटला पाहिजे.

हर्षवर्धनाच्या आमदानींतच आपला जुना दोस्त ह्यूएन चँग* हा हिंदुस्थानांत आला होता. परत गेल्यावर त्यानें आपल्या प्रवासवर्णनाचा जो ग्रंथ लिहिला, त्यांत हिंदुस्थान आणि तेथपर्यंत येताना वाटेंत ओलांडावे लागलेले मध्य आशियांतील देश यांबद्दल पुष्कळच माहिती दिलेली आहे. ह्यूएन चँग हा स्वतः मोठा श्रद्धावान् बुद्धधर्मीय होता. बुद्धधर्माच्या तीर्थस्थानांची यात्रा करावी आणि आपल्या धर्माचे पवित्र ग्रंथ इकडून मिळवून न्यावे, या उद्देशानें तो हिंदुस्थानांत आला होता. येतांना वाटेंत त्याला तें गोबीचें प्रचंड निर्जन मैदान या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ओलांडून यावें लागलें. प्रवासांत ताष्कंद, समरकंद, बल्ख (बाल्हीक, बॅक्ट्रा किंवा झैनिस्पा), खूतान, यारकंद यांसारखीं अनेक शहरें त्यानें पाहिलीं. त्यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. सिलोनलाही बहुधा तो गेला असावा. त्याचा ग्रंथ म्हणजे, त्यानें पाहिलेल्या देशांची अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें केलेलीं वर्णनें; हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचीं आजकालच्या त्या त्या प्रांतांतील लोकांना सुद्धां अगदीं हुबेहुब जुळण्यासारखीं विस्मयकारक स्वभाववर्णनें; त्याच्या कानांवर आलेल्या विलक्षण कहाण्या आणि बुद्ध आणि बोधिसत्त्व यांच्या चमत्कारांसंबंधींच्या असंख्य कथा यांची एक मोठी खुमासदार, लज्जतदार अशी अलौकिक खिचडी आहे. त्यानें सांगितलेल्या तांब्याच्या पत्र्याचें पोटाला वेष्टण घालून फिरणाऱ्या त्या महान् ज्ञानी माणसाची गोष्ट मीं तुला सांगितलीच आहे.

त्यानें हिंदुस्थानांत, विशेषतः पाटलिपुत्राच्या जवळच्याच नालंदाच्या विद्यापीठांत बरींचशीं वर्षें घालविलीं. नालंदा येथें धर्ममठ आणि विद्यापीठ यांचें मीलन झालेलें होतें. त्या एकाच ठिकाणीं दहा हजार विद्यार्थी व भिक्षू वास्तव्य करीत असत, असें

* ह्यूएन चँगच्या नांवाचा उच्चार यू एन् चँग, युआन चाँग किंवा शुआंगशंग असाही करतात.

म्हणतात. काशी हें जसें ब्राह्मणधर्मीयांचें विद्यार्जनाचें प्रमुख असें आधारस्थान होतें, तसेंच नालंदा हें बुद्धधर्मीयांचें तितक्याच तोलाचें श्रेष्ठ विद्यापीठ होतें.

मागें एकदां मीं तुला सांगितलें आहे, कीं एका काळीं हिंदुस्थानची ख्याति चंद्राची भूमि—इंदु-भूमि—अशी होती. ह्यूएन चँगनेंही या गोष्टीचा उल्लेख केला आहे; आणि हें नांव आपल्या देशाला किती अनुरूप आहे हें त्यानें लिहिलें आहे. चीनमध्येंही चंद्राला इनतु हें नांव असावें. तेव्हा तुला चिनी नांव धारण करावें असें वाटलें, तर तसें करणें किती सोपें आहे, नाहीं? †

ह्यूएन चँग हा हिंदुस्थानांत इ. स. ६२९ या वर्षीं आला. चीनमधून तो इकडे यावयास निघाला त्या वेळीं त्याचें वय २६ वर्षांचें होतें. एका जुन्या चिनी बखरींत असें लिहिलेलें आढळतें, कीं ह्यूएन चँग हा उंच आणि दिसायला उमदा होता. त्याचा रंग नाजुक होता. डोळे तेजस्वी होते. त्याची अंगलट गंभीर आणि ऐटदार होती. त्याच्या सर्वांगांतून माधुर्य आणि तेज यांचा प्रकाश जणुं बाहेर पडतो आहेसें वाटे. त्याच्या ठिकाणीं पृथ्वीच्या भोंवतीं असणाऱ्या महासागरांचें ऐश्वर्य आणि पाण्यामध्यें जन्मास येऊन विलसणाऱ्या कमलाच्या ठिकाणीं असणारें तेज आणि विमलत्व होतें, असें त्यात लिहिलेलें आहे.

बुद्ध भिक्षूचा केशरी रंगाचा पोषाख करून तो अगदीं एकटाच, चिनी बादशहानें त्याला जाण्यास परवानगी दिली नव्हती तरीही, या दीर्घ प्रवासाला निघाला. जेमतेम कसाबसा जीव राखून त्यानें एकदांचें गोबीचें निर्जन मैदान ओलांडलें आणि त्या मैदानाच्या अगदीं टोंकाला वसलेलें जें तुर्फान राज्य तेथें तो येऊन पोंचला. त्या सर्व निर्जन मरुभूमीमध्यें हें लहानसें राज्य म्हणजे एक लहानशी संस्कृतीची रम्य हिरवळच होती. आज तें राज्य नष्ट होऊन गेलेलें असून पुराणवस्तु-संशोधक आणि प्राचीन इतिहाससंशोधक जुन्या काळचे कांहीं अवशेष सांपडतील या आशेनें येथें उत्खनन करीत असतात. परंतु सातव्या शतकांत ह्यूएन चँगनें त्यामधून प्रवास केला, त्या वेळीं तें उच्च संस्कृतीनें युक्त असें गजबजलेलें एक राज्य होतें. तेथील त्या संस्कृतीमध्यें हिंदुस्थान, चीन, इराण आणि कांहीं अंशीं यूरपसुद्धां, यांच्या संस्कृतींचें मोठें पाहण्यासारखें मीलन झालेलें होतें. त्या काळीं तेथें बुद्धधर्माचा प्रभाव होता. आणि संस्कृत भाषेच्या द्वारानें हिंदु संस्कृतीचें वर्चस्व विशेष लक्षांत येण्यासारखें तेथें होतें; आणि तरीही लोकांची राहणी मात्र बहुतांशीं चीन किंवा इराण येथील राहणीवरून उचललेली होती. कुणाची कल्पना होईल, कीं मग यांची भाषाही मंगोलियन असेल. पण तशी ती नव्हती; तर ती भारतीय आणि यूरपीय भाषांच्या वळणाची भाषा असून यूरपमधील केल्टिक भाषांशीं तिचें पुष्कळ बाबतींत साम्य होतें. आणि याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेथें दगडी भिंतींवर कोरलेलीं जीं चित्रें

---

† इंदिरेचें लाडकें नांव इंदु हें आहे.

आढळतात त्यांतील मनुष्याकृती या यूरपांतील शरीराच्या ठेवणीच्या आढळतात. या चित्रांत बुद्ध आणि बोधिसत्त्व यांचीं, तशींच देवदेवतांचीं चित्रें मोठीं सुंदर आहेत. या देवतांचे पोषाख बरेचसे भारतीय पद्धतीचे आहेत. तर बऱ्याच ठिकाणीं त्यांच्या मस्तकावरील आवेष्टणें व इतर पोषाख ग्रीक पद्धतीचे आढळतात. त्यावरून प्रसिद्ध फ्रेंच टीकाकार एम्. ग्राउसे म्हणतो, "या ठिकाणीं या चित्रांमध्यें भारतीय अंगलालित्य, हेलनिक म्हणजे ग्रीक भावदर्शकत्व आणि चिनी माधुर्य यांचा सुखकर संगम आढळून येतो."

तुर्फान गांव अजूनही अस्तित्वांत असून नकाशामध्यें तें तुला सांपडेल. आजकाल त्याला कांहींच महत्त्व नाहीं. परंतु त्या दूरच्या प्राचीन काळीं, सातव्या शतकांत, दूरदूरच्या प्रदेशातील संस्कृतींचे महान् संपन्न ओघ या ठिकाणीं वाहत येऊन त्यांचा संगम तेथें झालेला असावा आणि त्यांतून त्या सर्वांचा एकजीव झालेली निराळी एक मधुर नवसंस्कृति निर्माण झालेली असावी, ही घटना किती अद्भुत आणि मनोहर आहे.

तुर्फानहून आपला यात्रेकरू ह्यूएन चँग हा कूचा येथें गेला. हेंही त्या काळचें मध्य-आशियांतील एक प्रसिद्ध केंद्रस्थान होतें. मोठें संपन्न आणि सुधारणायुक्त असें हें स्थान तेथील संगीतप्रवीण लोक आणि मधुर सौंदर्यसंपन्न स्त्रिया यांसाठीं विशेष प्रख्यातीस आलेलें होतें. तेथील धर्म व कला हीं तेथें हिंदुस्थानांतून आलेलीं होतीं; इराणमधून व्यापार-धंद्यांचा माल व विद्या यांची त्याला प्राप्ति झाली होती. तेथील भाषेचा संस्कृत, जुनी पर्शियन, लॅटिन व केल्टिक या भाषांशीं संबंध होता. मनोहर संस्कृतिमीलनाचा हा आणखी एक नमुना!

अशाच रीतीनें पुढें मग ह्यूएन चँगनें तुर्कांच्या प्रदेशांतून प्रवास केला. त्या ठिकाणीं एक महान् खान राज्य करीत होता. तो बुद्धधर्मी असून मध्य आशियाच्या बहुतेक भागांवर त्याचा अम्मल चालत असे. प्रथम ह्यूएन चँग हा समरकंद येथें गेला; सुमारें एक हजार वर्षांपूर्वी अॅलेक्झांडर या शहरावरून गेला होता. ह्यूएन चँगच्या वेळेला तें एक जुनाट शहर झालें होतें. अॅलेक्झांडरच्या आठवणीच काय त्या तेथें शिल्लक होत्या. तेथून तो बलखला गेला आणि तेथून काबूल नदीचें खोरें ओलांडून काश्मीरमध्यें आला व तेथून खालीं हिंदुस्थानांत त्यानें प्रवेश केला.

चीनमधील तंग घराण्याच्या प्रारंभींचा हा काळ होता. त्यांची राजधानी सि-आन-फू नगरी ही कला व विद्या यांचें त्या काळीं केंद्रस्थान होती आणि चीन देश जगामध्यें सर्व सुधारणांच्या आघाडीला होता. तेव्हां ह्यूएन चँग हा अशा या अत्यंत सुधारलेल्या देशांतून आलेला होता हें तूं विशेष लक्षांत घेतलें पाहिजेस. त्यामुळें त्याची तुलनेची कसोटी फार उंच प्रकारची असली पाहिजे. म्हणून तत्कालीन हिंदी परिस्थितीबद्दलची त्याची साक्ष ही फार महत्त्वाची आणि किंमतवान् समजली जाते. हिंदी लोक व त्यांची राज्यव्यवस्था यांची त्यानें स्तुति केली आहे. तो म्हणतो: "सामान्य जनतेसंबंधीं

पाहायचें तर, हे लोक स्वाभाविक थोडे हलक्या मनोवृत्तीचे असले तरी ते मोठे प्रामाणिक आणि अब्रूदार लोक आहेत. पैशाच्या बाबतींत त्यांच्यामध्यें लबाडी मुळींच नाहीं आणि न्यायदानाच्या बाबतींत ते दयाळू आहेत. व्यवहारांत वागणुकींत ते फसवे किंवा विश्वासघातकी नाहींत. ते आपला शब्द व वचन प्रामाणिकपणें पाळणारे आहेत. त्यांच्या राज्यविषयक नियमांमध्यें मोठी पाहण्यासारखी नीतिप्रियता – निर्मळता आढळते. आणि त्यांच्या वागणुकींत माधुर्य आणि मार्दव आढळतें. गुन्हेगार किंवा बंडखोर लोक पाहिले तर फारच थोडे आढळतात. आणि त्यांच्यापासून क्वचितच केव्हां त्रास होतो."

पुढें एका ठिकाणीं तो म्हणतो, "राज्याची व्यवस्था ही लोकहितकर तत्त्वावर आधारलेली असल्यामुळें अधिकारी लोक साधे असतात. सक्तीनें कोणालाही काम करावयास लावलें जात नाहीं." "अशा रीतीनें लोकांवरील कर हलके आहेत आणि त्यांना करावी लागणारी सेवाचाकरीही बेताची आहे. प्रत्येकाला आपली चीजवस्तही निर्वेध बाळगतां येते आणि सर्व जण शेती करून आपली उपजीविका करतात. राज्याच्या जमिनी जे करतात त्यांना उत्पन्नाच्या एक-षष्ठांश राजाला नजराणा म्हणून द्यावा लागतो. व्यापारधंदा करणारे वैश्य लोक व्यापारासाठीं चोहोंकडे प्रवास करीत असतात." वगैरे.

ह्यूएन चँगला असें आढळून आलें, कीं लोकांच्या शिक्षणाची येथें चांगली सुसंघटित व्यवस्था होती. शिक्षणाचें काम फार लहान वयापासून सुरू होत असे. अक्षरओळख करून देणारें पहिलें पुस्तक शिकून झाल्यावर प्रत्येक मुलाला किंवा मुलीला सात वर्षें वयाला होतांच शास्त्रांच्या अभ्यासाला सुरुवात करावी लागे. शास्त्रें म्हणजे सर्व प्रकारच्या विद्या असा अर्थ असे. त्या काळीं पांच प्रमुख शास्त्रें मानीत असत : (१) व्याकरण, (२) कलाकौशल्य, (३) वैद्यक (आयुर्वेद), (४) तर्कशास्त्र (न्याय), (५) तत्त्वज्ञान (दर्शनें). विद्यापीठांतून या शास्त्रीय विषयांचा अभ्यास होत असे आणि सर्व अध्ययन तीस वर्षांच्या वयाला पुरें होई. अर्थात् मला नाहीं वाटत, फारशी कोणी मंडळी इतक्या मोठ्या वयापर्यंत अध्ययन करीत असतील असें. परंतु प्राथमिक शिक्षणाचा मात्र फार मोठ्या प्रमाणावर सर्वत्र प्रसार झालेला होता असें दिसतें. कारण सर्वच भिक्षू आणि उपाध्याय यांचें काम शिक्षण देण्याचें असे आणि या लोकांची संख्याही काहीं थोडीथोडकी नव्हती. ह्यूएन चँगच्या मनावर भारतीयांच्या विद्याप्रेमाचा फार मोठा परिणाम झाला. इतका, कीं त्यानें आपल्या ग्रंथांत जागोजाग त्या गोष्टीचा पुन्हां पुन्हां उल्लेख केला आहे.

ह्यूएन चँगनें प्रयाग येथील प्रचंड कुंभमेळ्याचें वर्णन दिलें आहे. आतां पुन्हा तूं हा मेळा पाहशील तेव्हां १३०० वर्षांपूर्वी हाच मेळा ह्यूएन चँगनें पाहिला होता, आणि त्याच्या काळीं सुद्धां थेट वैदिक काळापासून चालत आलेल्या या मेळ्याची परंपरा प्राचीन समजली जात होती, या गोष्टी तुझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहतील. त्या

प्राचीन प्रयाग शहराच्या मानानें त्यांतील त्या अतिप्राचीन अखंड परंपरेच्या मानानें आमचें अलाहाबाद शहर म्हणजे कालचें शहरसें वाटतें. ४०० वर्षांपूर्वी अकबरानें तें वसविलें. प्रयाग शहर त्याच्यापेक्षां किती तरी जुनें, आणि त्या ठिकाणीं गंगा आणि यमुना याच्या संगमावर आज हजारों वर्षें ज्या आकर्षणामुळें वर्षानुवर्षें लाखों लोक जमा होत आलेले आहेत, तें आकर्षण तर त्याहूनही किती तरी जुनें.

स्वतः बुद्धधर्मीय असूनही हर्षवर्धन या खास हिंदु उत्सवाला जात असे, असें ह्यूएन चँगनें लिहिलें आहे. त्याच्यातर्फे एक बादशही आज्ञापत्र काढण्यांत येऊन त्यामध्यें पांची खंडांतील सर्व गरीब व गरजू लोकांनीं या मेळ्याला आपले पाहुणे म्हणून यावें असें सार्वत्रिक आमंत्रण असे. बादशहा झाला म्हणून काय झालें? त्याच्या दृष्टीनें हें फार मोठें आमंत्रण आहे. बरें, लोकही पुष्कळ येत असत हें सांगावयाला नको. एक लक्ष लोक येत होते. ते तेथें हर्षाचे पाहुणे म्हणून जेवीत असत असे उल्लेख आहेत. या मेळ्यामध्यें हर्षवर्धन दर पांच वर्षांनीं आपल्या खजिन्यांतील सर्वच्या सर्व सोनेंनाणें, मोतीं, रत्नें, रेशमि जें काय जवळ असेल नसेल तें सारें लोकाना वाटून टाकीत असे. प्रत्यक्ष आपला राजमुकुट, आणि किमती वस्त्रें हीं पण तो देत असे. आणि स्वतःसाठीं आपली बहीण राज्यश्री हिच्याकडून एक साधें आणि वापरून जुनें झालेलें वस्त्र मागून घेत असे.

श्रद्धाळू बुद्धधर्मीय असल्यामुळें अन्नासाठीं होणारा पशुवध हर्षानें बंद केला. ब्राह्मणांनीं त्या बाबतींत त्याला म्हणण्यासारखा कांहीं विरोध केला नाहीं. कारण ते स्वतःच बुद्धाच्या उदयापासून शाकाहारीच बनले होते.

ह्यूएनच्या ग्रंथांत एक थोडीशी जमतीची माहिती आहे. ती वाचून तुला मौज वाटेल. तो म्हणतो, कीं हिंदुस्थानांत कोणी मनुष्य आजारी पडला कीं लगेच तो सात दिवसांचा उपास करीत असे. या उपासाच्या काळांत पुष्कळसे लोक बरे होऊन जात. पण त्यानंतरही जर आजार चालू राहिला तर ते औषध घेत. यामुळें आजारी पडणें ही कांहीं त्या वेळीं कोणाच्या आवडीची गोष्ट असणें शक्य नाहीं. किंवा वैद्यांचीही त्या काळीं फारशी मागणी असणें शक्य नाहीं.

त्या वेळच्या हिंदुस्थानांतील एक विशेष नजरेंत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे राजे लोक आणि योद्धे हे विद्वान् आणि सुसंस्कृत लोकांशीं अतिशय आदरानें व लीनतेनें वागत असत. समाजांत सन्मानांचें स्थान विद्या आणि सुसंस्कृति यांना द्यावयाचें, पाशवी शक्ति किंवा संपत्ति यांना द्यावयाचें नाहीं, असा प्रयत्न हिंदुस्थानांत आणि चीनमध्यें विचारपूर्वक करण्यांत आला होता आणि त्या प्रयत्नाला या दोन्ही देशांत मोठें यशही आलें होतें.

हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षें राहिल्यानंतर ह्यूएन चँग उत्तरेकडील पर्वत ओलांडून पुन्हा आपल्या मायभूमीला जाण्यास निघाला. जातांना सिंधु नदींत तो बुडता बुडता वांचला. परंतु त्याच्याजवळचे पुष्कळसे मौल्यवान् ग्रंथ मात्र वाहून गेले. तरी पण

पुष्कळसे हस्तलिखित ग्रंथ त्याला आपणांबरोबर नेता आले आणि त्या ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर करण्यांत पुढें त्यानें कित्येक वर्षें घालविलीं. सि-आन-फू येथील तंग कुलातील बादशहानें त्याचें मोठें प्रेमादरपूर्वक स्वागत केलें आणि याच बादशहानें त्याला आपल्या प्रवासाचा वृत्तान्त लिहिण्यास उद्युक्त केलें.

ज्या तुर्की लोकानीं पुढें पश्चिमेकडे राज्यें बुडवून टाकलीं त्या मध्य आशियामध्यें आढळलेल्या तुर्की लोकांबद्दलही ह्यूएन चँगनें लिहिलें आहे. मध्य आशियांत सर्वत्र बुद्धधर्मीय मठ होते; त्यांबद्दलही त्यानें लिहिलें आहे. मध्य आशियतांलेच काय, पण इराण, इराक, मेसापोटेमिया, खोरासान, मोसल या प्रदेशांत – नव्हे, थेट सीरिआच्या सरहद्दीपर्यंत बौद्धांचे मठ पसरले होते. पर्शियन – इराणी – लोकांबद्दल ह्यूएन लिहितो, कीं " या लोकांना विद्येची मोठीशी आवड नसून ते कलाविलासांतच आपला सर्व काळ घालवतात. त्यांनीं तयार केलेल्या सर्व वस्तूंना शेजारच्या देशांमधून फार किंमत मिळते. "

किती असामान्य प्रतीचे हे प्रवासी त्या काळांत होऊन गेले. आजच्या आफ्रिकेच्या दाट अरण्यांमधील आणि दक्षिण अथवा उत्तर ध्रुवाकडच्या सफरी यासुद्धां प्राचीन काळच्या साहसी प्रचंड प्रवासापुढें अगदीं फिक्या वाटूं लागतात. निव्वळ पायाखालीं पर्वत आणि निर्जन मैदानें ओलांडीत, बरोबर कोणी एकही स्नेहीसोबती नाहीं, कोणाशीं कसला संबंध ठेवण्याची सोय नाहीं, अशा स्थितींत हे लोक वर्षानुवर्ष प्रवास करीत असत. मधून मधून त्यांना घरीं जाण्याची ओढ वाटून प्रवासाचा कंटाळा खास आला असेल; परंतु कष्ट सहन करण्यांत त्यांना इतका अपूर्व अभिमान वाटत होता, कीं तसें ते केव्हांच स्वतःच्या तोंडानें सांगत नाहींत. त्यांच्यापैकीं एकानें मात्र दूरच्या प्रदेशांत असतांना घराची आठवण होऊन तेथें जाण्याची उत्कंठा वाटूं लागली असतांना आपल्या मनाची काय अवस्था झाली, याची थोडीशी ओळख आपणांस दिली आहे. त्याचें नांव सुंग युन. ह्यूएन चँगच्या पूर्वी शंभर वर्षें हा हिंदुस्थानांत आला होता. वायव्येकडील गांधार प्रदेशांतील डोंगराळ मुलुखांत तो होता, त्या वेळच्याबद्दल तो लिहितो – वातावरणांतील नाजुक वायुलहरी, पक्ष्यांचें गान, वसंत ऋतूंतील सौंदर्यानें बहरलेले वृक्ष, अगणित पुष्पांवर उड्या मारणारीं फुलपांखरें – ही सर्व त्या दूर देशामधील रम्य वनश्री व निसर्गशोभा पाहून सुंग युनच्या मनाचें सुकाणूं स्वतःच्या घराकडे वळलें. आणि त्यामुळें त्याच्या मनांत इतके खिन्नतेचे विचार आले, कीं तेवढ्यानें तो फार मोठ्या आजाराच्या तावडींत सांपडला!

४४

दक्षिणेंत कितीएक राजे, योद्धे आणि एक श्रेष्ठ पुरुष उदयाला येतात

१३ मे, १९३२

हर्ष राजा इ. स. ६४८ मध्यें मरण पावला. परंतु त्याच्या मृत्यूपूर्वीच हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर बलुचिस्तानांत एका लहानशा काळ्या ढगानें डोकें वर काढलें होतें. पश्चिम आशिया, उत्तर आफ्रिका आणि दक्षिण यूरपमध्यें अगदीं उसळायला आलेल्या प्रचंड वादळाचा हा ढग म्हणजे आघाडीवरचा दूतच होता जणुं. अरबस्तानांत या सुमारास परमेश्वराचा एक नवा प्रेषित उदयास आलेला होता, त्याचें नांव महंमद. तो नवीनच इस्लाम धर्माचा प्रचार करूं लागला होता. या नव्या धर्मश्रद्धेनें वेडे झालेले आणि आत्मविश्वासानें भरलेले असे ते आरबी लोक सगळीं खंडें पालथीं घालीत जात होते. आणि जेथें जातील तेथील प्रदेश जिंकीत जात होते. त्यांचा हा पराक्रम बुद्धि गुंग करून टाकणारा असून ही नवीनच उत्पन्न झालेली व जगाचें स्वरूप इतकें पुष्कळ बदलून टाकणारी शक्ति होती तरी कशा स्वरूपाची, हें आपण नीट तपासून पाहिलें पाहिजे. पण त्याच्या आधीं आपल्याला एकदां दक्षिण हिंदुस्थानांत जाऊन आतांपर्यंतच्या दरम्यानच्या काळांत तेथें काय अवस्था होती याचा कांहीं सुगावा लागतो का, तें पाहिलें पाहिजे. आरबी मुसलमान हर्षाच्या काळांतच बलुचिस्तानांत येऊन पोंचले होते व लौकरच त्यांनीं सिंधचाही ताबा मिळविला होता. पण तेथेंच ते थांबून राहिले. आणि त्यानंतर तीनशें वर्षेंपर्यंत मुसलमानांची हिंदुस्थानांत स्वारी झाली नाहीं. पुढें सुद्धां जेव्हां स्वारी झाली ती कांहीं या आरबी लोकांकडून झाली नाहीं,तर इस्लाम धर्माचा स्वीकार केलेल्या मध्य आशियांतील कांहीं टोळ्यांकडून झाली.

म्हणून तूर्त आपण दक्षिण हिंदुस्थानांत जाऊं या. त्या सुमारास दक्षिण भारतांत पश्चिम दिशेला आणि मध्य विभागांत चालुक्यांचें राज्य पसरलेलें आढळतें. बहुतेक सर्व महाराष्ट्राचा त्यांत समावेश झालेला असून बदामी ही त्यांची राजधानी होती. ह्यूएन चँग महाराष्ट्रीय लोकांची स्तुति करतो आणि त्यांचें धैर्य आणि दिलदारपणा यांबद्दल फार प्रशंसेचे उद्गार काढतो. तो म्हणतो, " हे लोक लढवय्ये, तेजस्वी, स्वाभिमानी, जो त्यांच्याशीं चांगलें वागतो त्याच्याशीं कृतज्ञ आणि अपकृत्याचा सूड घेणारे असे आहेत. " चालुक्य राजाना उत्तरेकडे हर्षाला, दाक्षिणेकडे पल्लव राजांना आणि पूर्वेकडे कलिंग (ओरिसा) देशाच्या राजांना थोपवून धरावें लागत होतें. पुढें त्यांची सत्ता वाढून पूर्व समुद्रापासून पाश्चिम समुद्रापर्यंत पसरली आणि नंतर राष्ट्रकूटांनीं त्यांची हकालपट्टी केली.

अशा रीतीनें या काळांत दक्षिणेंत मोठीं साम्राज्यें भरभराटीस आलेलीं होतीं.

कधीं कधीं त्यांचें सामर्थ्य समसमान असे. कधीं कधीं त्यांच्यापैकीं एखादें साम्राज्य अधिक बलिष्ठ होऊन त्या मानानें इतर साम्राज्यें अगदींच फिकी पडत. त्यांपैकीं पांड्यांच्या राज्यांत मदुरा हें विद्येचें माहेरघर झालें होतें आणि तामीळ भाषेंतील कवी आणि ग्रंथकार तेथें येऊन राहत असत. तामीळ भाषेंतील बहुतेक श्रेष्ठ अभिजात ग्रंथ इसवी सनाच्या सुरुवातीनंतरच्या काळांत लिहिले गेलेले दिसतात. पल्लव राजांची राजधानी कांचीपुर येथें होती. हेंच हल्लींचें कांजीवरम् शहर होय. हे पल्लव राजेही एका काळीं मोठ्या वैभवाला चढलेले होते. मॅलेशियांत वसाहत करण्याच्या कामांत याच लोकांचा पुष्कळसा हात होता.

त्यापुढें चोल राजांच्या साम्राज्याचा उदयकाळ आला. नवव्या शतकाच्या मध्याला त्यांचेंच साऱ्या दक्षिण हिंदुस्थानभर प्रभुत्व होतें. हें राज्य दर्यावर्दी लोकांचें असून त्यांच्याजवळ मोठें आरमार असे. हें आरमार बंगालचा उपसागर आणि आरबी समुद्र यांवर अम्मल गाजवीत असे. कावेरीच्या मुखाजवळ काविरी पट्टिनम् या नांवाचें त्यांचें मुख्य बंदर होतें. या कुलांतील पहिला राजा विजयालया या नांवाचा होता. यांचें राज्य झपाट्यानें उत्तरेकडे पसरत होतें. परंतु मध्येंच राष्ट्रकूटांनीं त्यांचा पराभव केला. तथापि, राजराज नांवाच्या त्यांच्या राजाच्या आमदानींत त्यांनीं पुन्हां डोकें वर काढलें. आणि राजराजानें चोलांचें पूर्ववैभव पुन्हां संपादन केलें. ही हकीकत जवळजवळ दहाव्या शतकाच्या अखेरची असून याच वेळीं उत्तरेंत मुसलमानांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या होत्या. अर्थात् उत्तरेकडे दूर चाललेल्या या घडामोडींचा राजराजांवर कांहींच परिणाम झाला नाहीं. त्याचे आपले साम्राज्य वाढविण्याचे उद्योग चालूच राहिले. त्यानें सिलोन बेट जिंकलें. आणि सत्तर वर्षें त्या ठिकाणीं चोलाचा अम्मल चालू राहिला. त्याचा मुलगा राजेंद्र हाही लढवय्या आणि बापासारखाच विजेता होता. आपले लढाऊ हत्ती जहाजांमधून बरोबर घेऊन तो गेला आणि ब्रह्मदेशचा दक्षिण भाग त्यानें जिंकला. त्यानें उत्तर हिंदुस्थानमध्येंही स्वारी केली व बंगालच्या राजांचा पराभव केला. अशा रीतीनें चोलांच्या साम्राज्याचा विस्तार फार वाढला. गुप्तांच्या नंतरच्या काळांतलें हिंदुस्थानमधील हेंच सर्वांत मोठें साम्राज्य होय. पण हें साम्राज्य पुढें फार काळ टिकलें नाहीं. राजेंद्र हा मोठा योद्धा होता हें खरें; परंतु तो मोठा क्रूर होता असें दिसतें; जिंकलेल्या देशांना आपल्याला अनुकूल करून घेण्याचा त्यानें कांहींच प्रयत्न केला नाहीं. त्याची कारकीर्द इ. स. १०१२ पासून १०४४ पर्यंत चालली; परंतु त्याच्या मृत्यूनंतर चोलांच्या साम्राज्यांतील पुष्कळ मांडलिकांनीं बंडें केलीं आणि चोलांच्या साम्राज्याचे तुकडे-तुकडे झाले.

युद्धामधील विजयाखेरीज समुद्रावरील व्यापारासाठीं चोलाची फार ख्याति होती. त्यांच्या तलम कापसाच्या कापडाला जिकडून तिकडून फारच मागणी असे आणि काविरी पट्टिनम् हें त्यांचें बंदर दूरदूरच्या प्रदेशांत माल घेऊन येणाऱ्या जहाजांनीं

गजबजलेलें असे. यवन म्हणजेच ग्रीक लोकांची या बंदरामध्यें वसाहत होती. महाभारतामध्येंसुद्धां चोलांच्या राज्याचा उल्लेख आहे.

दक्षिण हिंदुस्थानचा कितीएक शतकांचा इतिहास असा अगदीं थोडक्यांत सांगण्याचा मीं प्रयत्न केला आहे. इतक्या थोडक्यांत सांगण्याच्या या प्रयत्नानें, उलट तुझा गोंधळ मात्र उडून जाण्याचा संभव आहे. पण काय करणार? या प्रदेशांतील भिन्नभिन्न राज्यें आणि राजवंश यांच्या चक्रव्यूहांत गुंतून राहण्याला आपल्याला सवड नाहीं. आपल्याला साऱ्या जगाचा इतिहास पाहायचा आहे. तेव्हां त्यांतल्या एखाद्या लहानशा भागांतच जर आपला पुष्कळ वेळ जाऊं लागला तर—मग तो भाग जरी अगदीं आपण ज्यांत राहतों असाच असला तरी—त्यामुळें बाकीच्या इतिहासाकडे पाहायला मग आपल्याला बहुधा वेळच मिळणार नाहीं.

परंतु राजे आणि त्यांचे विजय यांच्या वृत्तांतापेक्षां त्या काळच्या विद्या व कला यांचा वृत्तांत अधिक महत्त्वाचा आहे. उत्तरेकडे सांपडतात त्याहून किती तरी अधिक प्रमाणांत दक्षिणेकडे प्राचीन कालांचे अवशेष पाहायला आज सांपडतात. उत्तरेकडील पुष्कळशा स्मारक-स्थळांच्या इमारतीं आणि दगडी पुतळे आणि कोरकामें, यांचा मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्या वेळीं नाश झाला. दक्षिणेकडे मुसलमानांचा प्रवेश होऊनसुद्धां या सर्व गोष्टी त्यांच्या तडाक्यांतून वांचल्या. उत्तरेंत मात्र दुर्दैवानें अगणित स्मारक-स्थळांचा पूर्ण नाश करण्यांत आला. उत्तरेंत जे मुसलमान आले ते आरबी मुसलमान नव्हते, तर मध्य आशियांतील ते लोक होते हें ध्यानात आण. हे लोक धर्माच्या वेडानें भारलेले असून मूर्तिभंजनासाठीं ते उत्सुक झालेले होते. परंतु त्यांच्या या मोडतोडीच्या प्रवृत्तीचें एक कारण, प्राचीन मंदिरांचा एक प्रकारें किल्ल्यासारखा लढण्यासाठीं उपयोग करण्यांत येत असे, हें असण्याचा संभव आहे. आजचीं दक्षिण हिंदुस्थानांतील पुष्कळशीं देवालयें—पुष्कळशीं मंदिरें—म्हणजे जणुं किल्लेच आहेतसें भासतें. हल्ला झाला तर त्यांत राहून लोकांना आपला चांगला बचाव करतां येईल. अशा रीतीनें देवपूजे-शिवाय या मंदिरांचा इतरही अनेक रीतींनीं उपयोग होत असे. गांवाचें शाला-गृहही देवालयच असे; गांवाच्या सभेचें स्थान, पंचायत-घर, ग्रामराज्याची दरबारची जागाही देवालयच असे आणि तसाच प्रसंग पडला तर शत्रूविरुद्ध लढण्यासाठीं खेडे-गांवचा किल्लाही—भुईकोटही या देवालयाचाच होत असे. अशा रीतीनें गांवच्या सर्व जीवनाचा देवालय हा मध्यबिंदु होता. स्वाभाविकच मग पुजारी, उपाध्याय, यांचेंच सर्वांवर आणि सर्व बाबतींत प्रस्थ माजलेलें असणार. तें कसेंही असलें तरी देवळांचा उपयोग केव्हां केव्हां किल्ल्यांप्रमाणें होत असे या गोष्टीवरून मुसलमान मंदिरें मोडून तोडून कां टाकीत, याचें कारण कळून येण्यासारखें आहे.

चोल राजा राजराज यानें त्या काळीं बांधलेलें एक सुंदर मंदिर तंजावर येथें आहे. बदामी येथें फार सुंदर मंदिरें आहेत; त्याप्रमाणेंच कांजीवरम् येथेंही. परंतु त्या काळचें

सर्वांत अत्यंत प्रेक्षणीय आणि मनोहर असें देवालय आज आपल्याला पाहायला मिळतें तें म्हणजे वेरूळ येथील कैलासमंदिर होय. कठिण दगडांतून केवळ कोरून तयार केलेली जंगलांतील ही एक अजब कलाकृति आहे. आठव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध्यांत हें काम सुरू झालें. त्याचप्रमाणें दक्षिणेंत तांव्याच्या अत्यंत सुंदर मूर्तीही ओतलेल्या आढळतील; उदाहरणार्थ, शिवाच्या तांडवनृत्याचें दर्शन करवणारी प्रसिद्ध नटराजाची मूर्ति.

चोल राजा पहिला राजेंद्र यानें चोलपुरम् येथें बांधविलेलें कालव्याचें काम मोठें प्रेक्षणीय आहे. त्याचा तो नुसत्या दगडांनीं खालपासून वरपर्यंत बांधलेला बंधाराच सोळा मैल लांब आहे. हें बांधकाम पुरें झाल्यावर अल्बेरुणी हा आरबी प्रवासी तिकडे गेला होता. हीं कामें पाहून तो तर चकित होऊन गेला. त्यानें त्या संबंधांत लिहिलें आहे, "आमच्या लोकांनीं हीं कामें पाहिलीं म्हणजे त्यांना अत्यंत अचंबा वाटतो, त्यांना त्यांचें नीटसें वर्णनसुद्धां करतां येत नाहीं; मग त्यासारखें कांहीं बांधकाम त्यांना करतां येण्याची गोष्टच दूर."

या पत्रांत कितीएक राजे आणि राजवंश याच्या नांवांचा भी उल्लेख केला आहे. कांहीं अल्पकाळ त्यांनीं वैभव भोगलें; परंतु पुढें त्यांचा अंत होऊन त्यांची स्मृतीही राहिली नाहीं. परंतु या सर्व राजा-महाराजांपेक्षांही अधिक लक्षांत घेण्यासारखा व ज्याच्या हातून हिंदी जीवनांत त्यांच्याहून अधिक जिवंत आणि प्रेरक कार्य घडावयाचें होतें असा एक महापुरुष या काळीं दक्षिण हिंदुस्थानांत जन्मास आला. अगदीं तरुण वयांतच प्रभाव दाखवून अन्त पावलेली ही व्यक्ति म्हणजे शंकराचार्य होत. त्यांचा जन्म बहुधा आठव्या शतकाच्या अखेरीस झाला असावा. या पुरुषाला अलौकिक, मति गुंग करून टाकणाऱ्या प्रतिभेची देणगी होती असें दिसतें. त्यानें हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या कार्याला हात घातला. अथवा खरें म्हणजे हिंदुधर्मांतीलच एका बुद्धिनिष्ठ अशा पंथाचा प्रसार करण्याचें कार्य अंगावर घेऊन त्यानें पार पाडलें. शैवमत या नांवानें हा पंथ प्रसिद्ध आहे. शिवपूजा हें या पंथाचें मुख्य बाह्य चिह्न आहे. बुद्धधर्मांशीं त्यानें सामना केला. अर्थात् केवळ आपली बुद्धि आणि तर्कचातुर्य याच साधनांनीं बुद्ध-धर्मीय भिक्षुसंघाच्या धर्तीवर त्यानें एक सर्व वर्णांना मोकळा असा संन्यासमार्ग प्रस्थापित केला. या संन्यासपंथाचीं त्यानें चार भिन्न केंद्रें, धामें, हिंदुस्थानच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या चारी दिशांना प्रस्थापित केलीं. सर्व हिंदुस्थानभर त्यानें प्रवास केला आणि जेथें तो गेला तेथें त्याचा विजयच झाला. बनारसमध्यें – काशीमध्यें – विजयी वीराचें अधिष्ठान त्याला लाभलें; पण त्याचा हा विजय मुलूखगिरीचा नव्हता; तर अंतःकरणें जिंकण्याचा आणि तर्कचातुर्याचा विजय होता. शेवटीं तो जेथें सतत बर्फमय प्रदेशाला सुरुवात होते, त्या केदारनाथाच्या स्थळीं गेला आणि तेथेंच त्याला मृत्यु आला. आणि एवढें सगळें करून मृत्युसमयीं त्याचें वय किती म्हणशील, तर ३२ च्या आंतबाहेर!

शंकराचार्यांच्या कामगिरीची हकिकत मोठी अद्भुत आहे. त्या सुमारास बुद्धधर्म

उत्तरेकडून खालीं दक्षिणेंत लोटला गेला होता. परंतु शंकराचार्यांच्या वेळीं तो हिंदुस्थानांतून जवळजवळ पारच नाहींसा झाला. तेव्हांपासून हिंदुधर्म आणि विशेषतः त्यातील शैवपंथ या नांवानें ओळखला जाणारा पंथ हाच साऱ्या देशांत प्रभावी होऊन गेला. शंकराचार्यांचे ग्रंथ, टीका आणि वादविवाद यांच्यामुळें साऱ्या देशांत बौद्धिक क्षेत्रांत खालपासून वरपर्यंत नुसती खळबळ माजून गेली. ब्राह्मणवर्गाचे अत्यंत श्रेष्ठ नायक तर ते झालेच ; पण सामान्य जनतेचीं अंतःकरणेंही त्यांनीं आपल्याकडे वेधून घेतलीं. एखाद्या गृहस्थानें केवळ आपल्या बुद्धीच्या बळावर समाजाचा महान् नेता व्हावें आणि लाखों लोकांच्या अंतःकरणांवर आणि प्रत्यक्ष इतिहासाच्या ओघावर आपली छाप पाडावी, ही एक अलौकिक घटना आहे. इतिहासांत मोठमोठ्या योद्धयांना आणि विजेत्यांना महत्त्वाचें स्थान मिळालेलें आढळतें ; ते लोकांना प्रिय होतात किंवा कोणी त्यांचा द्वेषही करतात ; आणि केव्हां केव्हां इतिहासाला वळण देण्यांत त्यांचा हातभार लागतो. मोठमोठ्या धार्मिक नेत्यांनींही लाखों लोकांना हालवून त्यांचीं मनें उत्साहानें भारल्याचीं इतिहासांत उदाहरणें आढळतात. पण त्यांच्या साऱ्या कर्तृत्वाचा आधार लोकांच्या श्रद्धाबुद्धीवर होता. लोकांच्या भावना जाग्या करून आणि त्या भडकवून त्यांनीं आपलें कार्य साधलें.

परंतु मनुष्याचें मन आणि बुद्धि यांच्यावर परिणाम करून फार मोठें कार्य साधणें, हें मात्र कठिण आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, कीं बहुतेक लोकांना विचार करण्याची संवय आणि शक्तीच नसते ; त्यांना फक्त भावना असतात आणि आपल्या भावनाच्या अनुरोधानेंच त्यांचा व्यवहार चालत असतो. परंतु शंकराचार्यांना तर केवळ मन, बुद्धि, आणि विवेकशक्ति यांना जागृत करूनच आपलें सर्व कार्य साधायचें होतें. प्राचीन ग्रंथांतील एखादें आप्तवाक्य घेऊन त्याचाच केवळ जप करीत बसून त्यांना राहायचें नव्हतें. त्यांचा सिद्धांत बरोबर आहे कीं चुकीचा आहे, याच्याशीं आपणांस कर्तव्य नाहीं. परंतु धार्मिक प्रश्नाचा बुद्धिवादी दृष्टीनें विचार करण्याची त्यांची प्रवृत्ति आणि त्यापेक्षांही अशा पद्धतीचा अवलंब करीत असूनही धर्माच्या क्षेत्रांत त्यांना मिळालेलें यश, या गोष्टी यांत आपल्याला विशेष लक्षांत घेण्यासारख्या आहेत. त्यावरून त्या काळचा राज्याधिकार चालविणाऱ्या वर्गाच्या मनोभूमीची थोडीशी ओळख आपल्याला पटते.

हिंदी तत्त्वज्ञान्यांमध्यें – दार्शनिकामध्यें चार्वाक नावाचा जो एक तत्त्वज्ञ होऊन गेला तो नास्तिकवाद प्रतिपादीत असे ; म्हणजे परमेश्वर नाहीं असें म्हणत असे ; हें ऐकून तुला बहुधा मोठेंच नवल वाटेल. जगामध्यें, विशेषतः रशियात, आजकाल खूप लोक असे आहेत, कीं त्यांचा परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नाहीं. या प्रश्नाचा मूलभूत विचार कांहीं आपल्याला येथें करण्याचें कारण नाहीं. परंतु विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट आहे ती ही, कीं प्राचीन काळीं हिंदुस्थानांत विचारस्वातंत्र्य व प्रतिपादनस्वातंत्र्य होतें. ज्याला धर्मविषयक स्वातंत्र्य – श्रद्धास्वातंत्र्य – विवेकबुद्धीचें स्वातंत्र्य

म्हणतात तें या देशात होतें. अगदीं अलीकडेपर्यंत यूरपमध्यें अशी स्थिति नव्हती; आणि सध्यां सुद्धां देशांतील प्रचलित किंवा अधिकृत धर्म अमान्य करणारांना तेथें पुष्कळ हक्कांना मुकावें लागतें.

शंकराचार्यांच्या अल्पायुषी परंतु मोठ्या धामधुमीच्या व धकाधकीच्या आयुष्यांतून आणखी एक गोष्ट प्रत्ययाला येते; ती म्हणजे हिंदुस्थानांतील सांस्कृतिक ऐक्य. अगदीं थेट प्राचीन इतिहासकालापासून ही गोष्ट मान्य झालेली आढळते. भौगोलिक दृष्ट्या तूं पाहशील, कीं हिंदुस्थान हा पुष्कळ अंशीं एक सलग तुकडा आहे. राजकीय दृष्ट्या या देशाचे पुष्कळच प्रसंगीं अनेक विभाग पडलेले आढळतात. परंतु मधूनमधून जवळ-जवळ एकाच मध्यवर्ती सत्तेच्या अमलाखालीं हा देश आलेलाही आढळतो. परंतु सांस्कृतिक दृष्ट्या मात्र हा देश पूर्वीपासून एकजीव झालेला आहे. कारण या देशामध्यें विचारांची पार्श्वभूमि एक, परंपरा, रूढी, प्राचीन काळचा धर्मही एक, वीर पुरुष व वीर स्त्रिया सर्व एक, सर्व ठिकाणच्या लोकांचे पवित्र पुराणग्रंथ एक, प्रौढ ग्रंथभाषा सर्वांची एकच म्हणजे संस्कृत, राज्यव्यवस्थेच्या पायाशीं मुख्य अंग म्हणून ग्रामपंचायतींची रचना सगळीकडे सारखी, यात्रा-ठिकाणेंही सर्वांचीं एक आणि समाजरचनेची भूमिका आणि राज्यव्यवस्थेचें धोरणही एक, असा विशेष सारखेपणा आढळून येतो. सर्वसामान्य भारतीयाला सर्व हिंदुस्थान ही पुण्यभूमि वाटायची आणि बाकी सगळीकडे म्लेंच्छ आणि अनार्य लोक भरलेले आहेत असें वाटावयाचें! त्यामुळें लोकांत एकभारतीयत्वाची जाणीव निर्माण झाली आणि त्यापुढें राजकीय विभागांचा फारसा प्रादुर्भाव राहूं शकला नाहीं. विशेषतः वरतीं राज्यकर्त्यांत कितीही बदल झाले, तरीही तळचा ग्रामपंचायतींचा कारभार सर्वत्र सारखाच चालू राहिल्यानें हें एकत्व जास्तच दृढ झालें.

शंकराचार्यांनीं आपले मठ, म्हणजे आपल्या नव्या संन्यासधर्मीयांचीं प्रमुख केंद्रस्थानें, धामें, हिंदुस्थानच्या चारी दिशांच्या चार टोंकांना स्थापिलीं; यावरून हिंदुस्थान हा त्यांनाही सांस्कृतिक दृष्ट्या एक सलग गट वाटत होता हें स्पष्ट दिसतें. त्याचप्रमाणें साऱ्या देशभर त्यांच्या बौद्धिक स्वारीला इतक्या थोड्या काळांत इतकें मोठें यश लाभलें या गोष्टीवरूनही बौद्धिक आणि सांस्कृतिक प्रवाह देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत किती जलदीनें पोंचत असत, हेंही दिसून येतें.

शंकराचार्यांनीं शैवपंथाचा प्रचार केला; त्यामुळें या पंथाचा दक्षिणेंत विशेष प्रसार झाला असून तिकडचीं मंदिरें शंकराचीं, शिवाचीं आहेत. उत्तरेकडे गुप्तांच्या काळांत वैष्णवपंथ आणि कृष्णभक्ति यांना फार बहर आला होता. हिंदुधर्मांतील या दोन पंथांचीं – शाखांचीं – मंदिरें एकमेकांहून अगदीं भिन्न पद्धतीचीं आहेत.

हें पत्र फारच लांबलें आहे. आणि तरी पण मला हिंदुस्थानातील मध्ययुगीन परिस्थितीबद्दल अजून पुष्कळच सांगावयाचें आहे; पण त्यासाठीं पुढच्या पत्राची वाट पाहिली पाहिजे.

४५

मध्ययुगीन भारत

१४ मे, १९३२

अशोकाचा आजा चंद्रगुप्त याचा मुख्य मंत्रि कौटिल्य उर्फ चाणक्य यानें लिहिलेल्या अर्थशास्त्र या ग्रंथाबद्दल मागें मी तुला सांगत होतों, तें तुला आठवत असेल. तत्कालीन लोकाबद्दल आणि राज्यव्यवस्थेबद्दल नानाविध गोष्टी या ग्रंथामध्यें सांगितलेल्या आढळतात. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकांतील भारताच्या मंदिरांत डोकावून आंत काय काय दिसतें हें पाहण्यासाठीं ही एक खिडकीच जणुं मुद्दाम उघडून ठेवलेली आहे. आपल्यासारख्यांच्यासाठीं राज्यव्यवस्थेचे अगदीं बारीकसारीक तपशील देणारे हे अशा प्रकारचे ग्रंथ राजे लोकांचीं आणि त्यांच्या विजयांचीं भलीं मोठीं अतिशयोक्त वर्णनें देणाऱ्या ग्रंथांपेक्षां केव्हांही पुष्कळच अधिक उपयुक्त असतात.

असाच आणखी एक ग्रंथ आपल्याला उपलब्ध आहे. त्याच्यावरून मध्ययुगीन भारताची आपल्याला कल्पना येण्यासारखी आहे. शुक्राचार्यांचा 'नीतिसार' हा तो ग्रंथ होय. अर्थशास्त्राइतका काहीं हा ग्रंथ परिपूर्ण किंवा उपयुक्त नाहीं; परंतु हा ग्रंथ, तत्कालीन कांहीं शिलालेख आणि इतर वृत्तांत, यांच्या साहाय्यानें ख्रिस्तानंतरच्या नवव्या किंवा दहाव्या शतकांतील भारताच्या दालनांत डोकावून त्याचें थोडेंसें ओझरतें दर्शन आपल्याला घेतां येतें का पाहूं.

नीतिसारांत सांगितलें आहे, कीं "ब्राह्मणत्वाला योग्य असें तेज शरीराच्या वर्णामुळेंही निर्माण होत नाहीं किंवा विशिष्ट कुलांत जन्म घेतल्यानेंही होत नाहीं." म्हणजे नीतिसाराच्या मताप्रमाणें जाति किंवा वर्णभेद हा जन्मावर अवलंबून नसून गुणावर अवलंबून आहे. तसेंच पुन्हां त्यांत म्हटलेलें आहे: "अधिकाराच्या स्थानावर नेमणूक करताना आचरण (शील), कार्यक्षमता आणि गुण याचाच विचार करून नेमणूक केली पाहिजे; जाति किंवा कुल यांचा विचार करून नव्हे." राजानें केवळ स्वतःच्याच मताप्रमाणें चालतां उपयोगी नाहीं; तर बहुसंख्य लोकांच्या विचाराप्रमाणें त्यानें वागलें पाहिजे, असा त्या काळचा दंडक दिसतो. "लोकमत हें राजापेक्षां अधिक सामर्थ्यवान् आहे; कारण लहान लहान धाग्यांनीं तयार झालेला दोर सिंहालासुद्धा बांधून ओढावयाला समर्थ असतो," असें नीतिसाराचें म्हणणें आहे.

तत्त्व म्हणून हे सारे उपदेश आजच्या काळालासुद्धां अत्यंत उत्कृष्ट आहेत. परंतु वास्तविक पाहिल्यास प्रत्यक्ष व्यवहारांत आपल्याला त्यांचा तसा कांहीं उपयोग होत नाहीं. अंगीं गुण आणि योग्यता असली म्हणजे मनुष्याला उच्च स्थान प्राप्त व्हावें असें म्हणणें. परंतु गुण आणि योग्यता प्राप्त करून घेण्याच्या मार्गाचें काय? कोणी मुलगा अथवा मुलगी जात्या हुशार असलीं आणि त्यांना योग्य प्रकारचें शिक्षण

आणि संस्कार लाभले, तर तीं मोठीं चतुर आणि कर्तबगार माणसें होतील हें खरें; पण असें शिक्षण किंवा संस्कार घडविण्याची कांहीं व्यवस्थाच नसली, तर तीं बिचारीं मुलें-मुली काय करणार?

त्याचप्रमाणें लोकमत म्हणजे तरी काय? कोणाचें मत लोकमत म्हणून विचारांत घेतलें जावयाचें? अगणित अशा शूद्र कामगारांना मत देण्याची पात्रता आहे, असें कांहीं नीतिसाराच्या कर्त्यांचें मत असावेंसें दिसत नाहीं. तत्कालीन समाजांत अशा लोकांना जवळवळ कांहीं स्थानच नव्हतें. तेव्हां लोकमत म्हणजे काय, तर वरिष्ठ व राज्यकारभार करणाऱ्या वर्गांमधील व्यक्तींचें मत, अशीच बहुधा त्याच्याही मतानें व्यवस्था असली पाहिजे.

तथापि, एक गोष्ट मात्र विशेष कौतुक करण्याजोगी आहे, कीं मध्ययुगांत काय किंवा त्यापूर्वीही काय, भारतीय समाजव्यवस्थेंत राजांचे परमेश्वरसिद्ध अधिकार किंवा अनियंत्रित सत्ता याना मुळींच स्थान नव्हतें.

यानंतर नीतिसारांत आपल्याला मंत्रिसभा, सार्वजनिक बांधकामें, उद्यानें, शहरें आणि अरण्यें याच्यावर देखरेख ठेवणारे वरिष्ठ अधिकारी, शहरें आणि खेडीं यांमधील जीवनक्रम, पूल, नावा, धर्मशाळा, रस्ते, आणि कोणत्याही शहरांतील अथवा खेड्यांतील जीवनाच्या दृष्टीनें सर्वांत अधिक लक्ष पुरविण्यासारखी गोष्ट म्हणजे सांडपाण्याचा निकाल करण्यासाठीं गटारांची व्यवस्था, अशा अनेक विषयांसंबंधीं माहिती दिलेली आढळते.

गांवांतील सर्व व्यवहारांवर ग्रामपंचायतीची सर्व सत्ता असून राजाचे अधिकारी पंचांना फार मान देऊन वागत. गांवच्या जमिनीची वांटणी (लागवडीसाठीं) पंचायतीकडूनच होत असे. पंचायतच कर वसूल करून गांवच्या वतीनें ती रक्कम सरकारांत भरीत असे. या सर्व पंचायतींच्यावर देखरेख करण्यासाठीं एक मोठी पंचायत किंवा महासभा असे, असें दिसतें. जरूर तर खालच्या पंचायतींच्या कारभारांत हात घालण्याचा अधिकार या महासभेला असे. या पंचायतींना न्यायदानाचाही अधिकार असून त्यांच्यापुढें खटले चालत व गुन्ह्यांची चौकशी होई.

दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं लेखांमध्यें आपल्याला या पंचायतींतील पंचांची निवड कशी होत असे, त्यांच्या ठिकाणीं कोणते गुण असावे लागत, आणि कोणत्या कारणामुळें निवडून देण्याला प्रतिबंध होत असे, याबद्दल माहिती आढळते. जर कोणी सभासदानें सार्वजनिक पैशांचा हिशेब दिला नाहीं, तर त्याचा निवडून येण्याचा हक्क नष्ट होत असे. दुसरा एक विशेष ध्यानांत घेण्यासारखा नियम असा होता, कीं पंचांच्या जवळच्या नातेवाइकांना अधिकाराच्या जागेवर येण्यास प्रतिबंध असे. आमचीं सारीं कौन्सिलें, असेंब्ल्या, आणि म्युनिसिपालिट्या यांच्यामध्यें हा नियम जारी केला तर किती उत्तम होईल. एका पोटमंडळांत एका स्त्रीच्या नांवाचा उल्लेख आढळतो. त्यावरून पोटमंडळ किंवा पंचायतीवर निवडून येण्याचा अधिकार स्त्रियानाही होता असें दिसतें.

निवडून आलेल्या पंचायतींमधून पोटमंडळें स्थापन होत असत. यांची मुदत एक वर्षाची असे. कोणत्याही सभासदाच्या हातून दुर्वर्तन झालें, तर त्यास सभासदाच्या जागेवरून ताबडतोब कमी करतां येत असे.

ही ग्रामराज्याची पद्धति आर्यांच्या समाजव्यवस्थेचा पायाच होती. याचमुळें त्या समाजव्यवस्थेला दृढत्व प्राप्त झालेलें होतें. ग्रामपंचायती आपल्या स्वातंत्र्याबद्दल व हक्कांबद्दल इतक्या जागरूक असत, कीं प्रत्यक्ष राजाची आज्ञा असल्याखेरीज कोणाही सैनिकाला गांवांत प्रवेश करण्याचा अधिकार नाहीं, असा सक्त नियम होता. नीतिसारांत लिहिलें आहे, कीं प्रजा जेव्हां अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार करील तेव्हां "राजानें अधिकाऱ्यांची बाजू घेतां उपयोगी नाहीं, प्रजेची घेतली पाहिजे;" आणि फारच बहुसंख्य लोकांची तक्रार असेल तर अधिकाऱ्याला कामावरून काढून टाकलें पाहिजे. "कारण अधिकारमदाच्या पानानें उन्मत्त होणार नाहीं असा कोण आहे?" असें नीतिसाराचें म्हणणें आहे. किती शहाणपणानें भरलेले शब्द आहेत हे! आणि आज आमच्या देशांत अयोग्य प्रकारचा राज्यकारभार करणाऱ्या आणि गैरवर्तणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची जी गर्दी माजलेली आहे, तिला हे शब्द किती जुळण्यासारखे आहेत!

मोठमोठ्या शहरांत, ज्या ठिकाणीं कारागीर व व्यापारी असत तेथें त्यांचे संघ बनविलेले असत. अशा रीतीनें कारागिरांचे संघ, पेढीवाल्यांचे संघ, व्यापारी लोकांचे संघ असे वेगवेगळे संघ असत. स्थानिक कारभारावर या संघांचा मोठ्या प्रमाणांत ताबा चालत असे.

लोकांना कष्ट होऊं नयेत किंवा ओझें वाटूं नये अशा बेतानें हलके कर राजानें लोकांवर बसवावे, असा राजावर निर्बंध होता. मालाकार मालांच्यासाठीं वनामध्यें जशीं हलक्या हातानें पानें आणि फुलें गोळा करतो तसे राजानें कर वसूल करावे, एखाद्या कोळशाच्या भट्टीवाल्याप्रमाणें नव्हे, असा दंडक होता.

मध्ययुगीन भारताबद्दल अशी कांहीं तुटक माहिती कोठें कोठें आपल्याला जमा करतां येते. ग्रंथामध्यें वर्णन केलेल्या या सिद्धांतांशीं प्रत्यक्ष व्यवहार कितीसा जुळता होता हें समजून येणें मात्र फार बिकट आहे. ग्रंथांमध्यें मोठमोठे सिद्धांत आणि ध्येयें यांबद्दल लिहिणें फार सोपें आहे. त्याप्रमाणें प्रत्यक्ष व्यवहार करणें हें अधिक बिकट आहे. आतां हें खरें, कीं ग्रंथांवरून निदान लोकांचे विचार आणि सामाजिक आदर्श काय होते हें आपल्याला चांगलें समजतें. मग त्यांचा प्रत्यक्ष व्यवहार अगदीं संपूर्णपणें लिहिल्याबोलल्याप्रमाणें होत असो वा नसो. त्या दृष्टीनें मध्ययुगीन भारतांत आपल्याला असें आढळतें, कीं राजाच्या अथवा अधिकाऱ्यांच्या हातीं अनियंत्रित सत्ता मुळींच नव्हती. लोकनियुक्त पंचायतींचें त्यांच्या सत्तेवर नियंत्रण होतें. शहरांमध्यें किंवा खेड्यांमध्यें स्थानिक कारभारांत स्वायत्ततेची अत्यंत पुढारलेली पद्धति अस्तित्वांत होती आणि या स्वायत्ततेंत मध्यवर्ती सत्तेकडून सहसा ढवळाढवळ होत नसे, असेंही आपल्याला आढळतें.

परंतु तत्कालीन लोकाच्या समाजव्यवस्थेचा आदर्श किंवा स्वायत्तता यांबद्दल एवढें हें सगळें मी सांगतों, तेव्हां खरोखर माझ्या सांगण्याचा अर्थ काय आहे? हिंदुस्थानांतील सर्वच समाजव्यवस्था, जाति व वर्णव्यवस्था यांच्या पायावर त्या काळींही आधारलेली होती. तत्त्वतः जातिभेद किंवा वर्णभेद कठोर मानले जात नव्हते; किंवा नीतिसारांत म्हटल्याप्रमाणें लायकी व गुण यांवरून जाति व वर्ण ठरत असत, असें म्हणतां येईल. परंतु व्यवहारांत या म्हणण्यामध्यें जवळजवळ कांहीं अर्थ नव्हता. राज्याधिकार चालविणारा वर्ग खरोखर ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचाच होता. कधीं कधीं प्रभुत्वाबद्दल यांच्यामध्यें झगडा उत्पन्न झालेला आढळतो; परंतु बहुतेक प्रसंगीं हे दोन्ही वर्ण मिळूनच सत्ता चालवीत आणि त्यांची आपसांत देवाण-घेवाण चालत असे. बाकीच्यांना मात्र हे नेहमीं आपल्या सत्तेखालीं दडपून ठेवीत. हळूहळू व्यापार आणि उद्योगधंदे वाढूं लागले तसतसा वैश्यवर्ग हा संपन्न होऊं लागला, त्याचें महत्त्वही वाढूं लागलें. वाढत्या महत्त्वाबरोबर वैश्यवर्गाला कांहीं अधिकारही मिळत गेले व त्यांना त्याच्या व्यापारी संघांचा अंतर्गत कारभार चालविण्यासंबंधीं अधिकाधिक स्वातंत्र्य मिळत गेलें. तरी पण इतकें होऊनही प्रत्यक्ष राज्यसत्तेंत त्यांना खरा हिस्सा असा नाहीं मिळाला. शूद्रांकडे पाहिलें, तर ते बिचारे पाहिल्यापासून अखेरपर्यंत तळाशीं दडपलेले दासच राहिले. आणि त्यांच्याही खालच्या अवस्थेला कांहीं लोक असतच.

अधूनमधून हीनवर्णीय लोकानींही वरचा पल्ला गांठलेला आढळतो. शूद्र लोक केव्हां केव्हां राजे झालेलेही ऐकिवांत येतें. पण हा अगदींच अपवादात्मक प्रकार. सामाजिक दर्जामध्यें वाढ होण्याचा नित्याचा मार्ग म्हणजे एखाद्या सबंधच्या सबंध पोटजातीला एक वरची पायरी प्राप्त होणें. नवे नवे समाज हिंदु-समाजांत अंतर्भूत करून घेण्यांत येत, तेव्हां त्यांना अगदीं खालच्या पायरीवर स्थान मिळे. पुढें हळूहळू आपल्या कर्तबगारीनें हे समाज वरच्या वरच्या पायरीवर चढत.

तेव्हां तुझ्या आतां लक्षात येईल, कीं पश्चिमेंतल्याप्रमाणें हिंदुस्थानांत जरी मजुरी करणाऱ्या गुलामांची संस्था नव्हती, तरी आमची सर्व समाजव्यवस्था खालपासून वरपर्यंत एकावर एक चढत जाणाऱ्या निरनिराळ्या थरांची बनलेली होती. अगदीं तळाशीं जे कोट्यवधि लोक होते, त्यांना वर शिखराशीं जे लोक होते त्यांच्या दडपणाखालीं राहावें लागे व त्यांच्याकडून त्या बिचाऱ्यांची पिळवणूक होई. शिडीच्या तळाशीं असणाऱ्या या लोकांना शिक्षण किंवा संस्कार प्राप्त करून घेण्याची संधि हे वरच्या पायरीवर असणारे लोक मिळूं देत नसत आणि अशा रीतीनें ही उच्च-नीच अवस्थांची पद्धति चिरकाल चालू राहावी आणि खरी सत्ता आपल्याच केवळ हातांत राहावी, अशी ते काळजीपूर्वक व्यवस्था करीत असत. ग्रामपंचायतींमध्यें मात्र या शेतकाम करणाऱ्या लोकांना बोलण्याचा थोडाफार अधिकार असावा आणि त्यांच्याकडे अजीबातच दुर्लक्ष करणें शक्य होत नसावें. परंतु या पंचायतींमध्यें कांहीं चतुर ब्राह्मणांचेंच प्रस्थ माजलेलें असण्याचा पुष्कळसा संभव.

आर्य लोक हिंदुस्थानात येऊन त्याचा आणि द्रविडांचा परस्परांशीं संबंध आला तेव्हापासून आतां आपण बोलतों आहों त्या मध्ययुगीन कालापर्यंत ही प्राचीन भारतीय समाजव्यवस्था चालत आलेली दिसते. परंतु जसजसा काळ गेला, तसतशी ती कमी दर्जाची आणि दुर्बळ होत चाललेली दिसते. ती म्हातारी होत चालली हें कदाचित् याचें कारण असावें; किंवा बाहेरून जे वारंवार हल्ले झाले त्यानें तिच्यातील जोम नाहींसा झाला असेल.

प्राचीन काळीं हिंदुस्थान देश गणितशास्त्रांत मोठ्या श्रेष्ठ पदवीला पोंचलेला असून भारतीय श्रेष्ठ गणितशास्त्रज्ञांच्या यादींत लीलावती नांवाच्या एका स्त्रीचें नांव आढळतें. असें म्हणतात, कीं ही लीलावती, तिचा पिता भास्कराचार्य आणि तसेंच बहुतकरून ब्रह्मगुप्त हा आणखी एक गृहस्थ यांनीं प्रथम दशांशपद्धति शोधून काढली. बीजगणिताचा उगमही हिंदुस्थानांतच झाला म्हणतात. येथून तें शास्त्र अरबस्तानांत गेलें आणि तेथून यूरपमध्यें. ऑल्जिब्रा हा इंग्रजी शब्द मूळ आरबी भाषेंतून आलेला आहे.

डौलदार अङ्कोर नगरी आणि श्रीविजय

१७ मे, १९३२

आतां आपण बृहद्भारताला म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतील लोकानीं स्थापन केलेल्या मॅलेशिया व इंडोचायना यामधील वसाहतींना जरा धांवती भेट देऊन येऊं या. या वसाहती मुद्दाम, सहेतुक, योजनापूर्वक कशा वसविल्या गेल्या, हें मीं यापूर्वीं तुला सांगितलेंच आहे. एकाच वेळीं इतक्या अनेक ठिकाणीं अशा अगदीं रेखीव नमुन्याप्रमाणें या वसाहती स्थापन झाल्या याचा अर्थ त्या वेळीं लोक वारंवार समुद्रावरून सफरी करीत असले पाहिजेत आणि समुद्रावर त्यांनीं चांगलेंच वर्चस्व संपादन केलें असलें पाहिजे. या वसाहती खिस्ती शकाच्या पहिल्या आणि दुसऱ्या शतकांमध्यें सुरू झाल्या हेंही मीं तुला सांगिलेंच आहे. या सर्व हिंदू वसाहती असून दक्षिण हिंदुस्थानाकडील नांवें त्यांना दिलेलीं होतीं. कांहीं शतकांनंतर तेथें बुद्धधर्माचा प्रसार होऊं लागला आणि जवळजवळ सर्व मॅलेशियाच्या वसाहतींचा भाग बुद्धधर्मीय झाला.

प्रथम आपण इंडोचायनामध्यें जाऊं या. अगदीं पहिली वसाहत या भागांत झाली. तिचें नांव चंपा असून ती अनाम प्रांतामध्यें होती. (याच प्रांताला आतां नवीन व्हाएटनाम अथवा वैतनाम असें नांव दिलेलें आहे.) याच वसाहतींत पुढें तिसऱ्या शतकांत पांडुरंगम् नांवाचें शहर उदयास आलेलें आढळतें. त्यानंतर दोनशें वर्षांत कांबोज नगर भरभराटीस आलें. दगडी मंदिरें व इमारती यांनीं हें शहर गजबजलेलें

होतें. या सर्व भारतीय वसाहतींत तुला जेथें तेथें भल्या भक्कम इमारती बांधल्या गेलेल्या आढळतील. त्यासाठीं शिल्पकाम आणि बांधकामांत प्रवीण असलेले कारागीर हिंदुस्थानमधूनच तिकडे न्यावे लागले असणार. त्यांनीं शिल्प व वास्तुशास्त्र यांमधील हिंदी परंपरा आपल्याबरोबर तिकडे नेली. या प्रदेशांतील निरनिराळ्या राज्यांमध्यें आणि बेटांमध्यें बांधकामाची फार प्रचंड लाटच उसळली. आणि त्याचा परिणाम म्हणजे कलाकौशल्याला तेथें सुंदर बहर आला.

या वसाहतींमध्यें राहणारे लोक स्वाभाविकच दर्यावर्दी होते. ते किंवा त्यांचे पूर्वज यांना तेथें वसाहत करावयाला येण्यासाठीं समुद्र ओलांडूनच यावें लागलें होतें. तसेंच त्याच्या चारी बाजूंना समुद्रच होता. दर्यावर्दी लोकांची व्यापारधंदा करण्याकडे अगदीं सहज प्रवृत्ति होते. त्यामुळें हे लोक लौकरच धंदेवाले, कारखानदार, व्यापारी बनले; आणि आपला माल समुद्रावरून निरनिराळ्या आजूबाजूंच्या बेटांत, हिंदुस्थानांत आणि पूर्वेकडे चीनमध्यें घेऊन जाऊं लागले. अशा रीतीनें मॅलेशियांतील निरनिराळ्या राज्यांवर मोठ्या प्रमाणात या वैश्य-व्यापारी-वर्गांचेंच वर्चस्व चालूं लागलें. या राज्यांमध्यें वारंवार मोठालीं युद्धें होत आणि मनुष्यवध फार मोठ्या प्रमाणावर होई. कधीं कधीं हें युद्ध एका बाजूला एक हिंदुराज्य आणि दुसऱ्या बाजूला एक बुद्धराज्य अशा प्रकारें चालू असलेलें दिसे. परंतु त्या वेळीं युद्धामागें खरें कारण ही व्यापारी स्पर्धा हेंच होतेंसें दिसतें. आजही अशाच रीतीनें मोठमोठ्या राजसत्तांमध्यें जीं युद्धें होतात तींही त्या राष्ट्रांत उत्पन्न होणाऱ्या मालाला हव्या असणाऱ्या बाजारपेठांसाठीं, हें आपण पाहतोंच.

सुमारें तीनशें वर्षें—म्हणजे आठव्या शतकापर्यंत—इंडोचायनामध्यें तीन वेगवेगळीं हिंदू राज्यें होतीं. नवव्या शतकांत जयवर्मा नांवाचा एक मोठा राजा उदयास आला. त्यानें हीं तिन्ही राज्यें एका छत्राखालीं आणिलीं आणि मोठें साम्राज्य प्रस्थापित केलें. हा राजा बहुधा बुद्धधर्मीय असावा. त्यानें अङ्कोर येथें आपल्या राजधानीचें नगर वसविण्यास सुरुवात केली व त्याच्यामागून गादीवर आलेला यशोवर्मा यानें तें पुरें केलें. या साम्राज्यालाच कँबोडियन (कांबोजचें) साम्राज्य म्हणत. याचा अम्मल जवळजवळ चारशें वर्षें चालला. साम्राज्य म्हटलें कीं तें प्रबळ आणि वैभवशाली असायचेंच. या दृष्टीनें हेंही साम्राज्य मोठें प्रबळ आणि वैभवशाली होतें अशीच त्या काळीं समजूत होती. राजधानीची नगरी अङ्कोर थोम ही साऱ्या पूर्व प्रदेशांत "डौलदार अङ्कोर" या नांवानें विख्यात होती. १० लाखांहून अधिक वस्तीचें हें शहर सीझरांच्या (रोम बादशहांच्या) काळांतील रोमपेक्षांही मोठें होतें. त्याच्याच शेजारीं 'अङ्कोरवाट' या नांवाचें अत्यंत विलोभनीय मंदिर होतें. तेराव्या शतकांत कँबोडियावर चोहों बाजूंनीं हल्ले झाले. पूर्वेकडून अनाम (वैतनाम) प्रांतातील लोकांनीं हल्ला केला, तर पश्चिमेकडून स्थानिक रानटी लोकांनीं हल्ला केला. उत्तरेकडून मंगोलियनांनीं शान प्रांतांतील रहिवाशांना खालीं लोटलें. तेव्हां त्यांना संरक्षणासाठीं

दुसरा आसराच न राहिल्यामुळें त्यांनींही कँबोडियाकडेच मोर्चा वळविला. या सर्व एकसारख्या चाललेल्या लढाया खेळतां खेळतां आणि आपलें संरक्षण करतां करतां तें राज्य अगदीं मेटाकुटीस आलें. तथापि अङ्कोर नगरीचें वैभव व ऐश्वर्य मात्र शिल्लक राहिलें. इ. स. १२९७ मध्यें चीनच्या दरबारचा एक वकील काबोजच्या राजाच्या दरबारांत आला होता. त्यानें तेथील आश्चर्यचकित करून टाकणाऱ्या इमारतींचें मोठें रसभरित, गौरवपूर्ण वर्णन केलें आहे.

परंतु एकाएकीं अङ्कोर नगरी एका भयाण उत्पाताच्या तावडींत सापडली. इ. स. १३०० च्या सुमारास मेकांग नदीच्या मुखाशीं फारच गाळ सांचून तिचें मुख बंद झालें. पाणी पुढें समुद्रांत वाहून जाईनासें होऊन तें मागेंच वाढूं लागलें आणि त्यामुळें त्या महान् नगरीच्या भोंवतीं सगळीकडे पुराचें पाणीच पाणी होऊन गेलें. आसपासच्या सगळ्या अत्यंत पिकाऊ शेतजमिनीची नुसती निरुपयोगी दलदल बनून गेली. त्यामुळें नगरीमधील प्रचंड लोकसंख्येचा अन्नाचा पुरवठा कमी होऊन लोकांची उपासमार होऊं लागली. लोकांना तेथें राहणेंच अशक्य झालें आणि म्हणून ते शहर सोडून जाऊं लागले. अशा रीतीनें वैभवशाली अङ्कोरमधील लोकवस्ती नाहींशी झाली; तेथें निर्जन अरण्याचें साम्राज्य सुरू झालें; कांहीं काळ तेथल्या त्या मनोहर आणि भव्य इमारतींमध्यें रानटी पशूंचें वास्तव्य होतें. परंतु लौकरच त्या अरण्याच्या वाढींत सगळे राजवाडे आणि इमारती धुळीस मिळून गेल्या आणि मग अरण्याला तेथें कोणीही प्रतिस्पर्धी म्हणून राहिला नाहीं !

या उत्पाताच्या धक्क्यानंतर काबोजचें साम्राज्य फार काळ तग काढूं शकलें नाहीं. हळूहळू त्याची सर्व सत्ता पार नष्ट झाली आणि एका दुर्गम प्रांताचें स्थान त्याला प्राप्त झालें. हा प्रांत मग कधीं सयामच्या तर कधीं अनामच्या (वैतनाम) राजवटीच्या अमलाखालीं असे. परंतु तेथील त्या अङ्कोरवाट मंदिराचे अवशेष अद्यापही उपलब्ध आहेत. त्यावरून दूरदूरच्या देशांतील व्यापारी आपापला माल विकण्यासाठीं जेथें येत असत आणि जेथल्या कारागिरांनीं आणि नागरिकांनीं तयार केलेल्या सुंदर सुंदर कलाकुसरीच्या वस्तू दूरदूरच्या देशांमध्यें पाठविल्या जात असत, अशा त्या त्याच्याच शेजारच्या गौरवशाली व ऐश्वर्यानें धुंद झालेल्या नगरीच्या वैभवकाळची थोडीफार कल्पना आपल्याला येऊं शकते.

इंडोचायनापासून जवळच समुद्राच्या पलीकडे सुमात्राचें बेट आहे. त्या ठिकाणीं सुद्धां ख्रिस्तानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांतच दक्षिणेंतील पल्लवानीं आपल्या अगदीं पहिल्या पहिल्या नव्या वसाहती स्थापल्या होत्या. पुढें त्या हळूहळू वाढल्या. मॅले द्वीपकल्प हें अगदीं पूर्वीपासूनच सुमात्राच्या राज्याचा भाग झालेलें होतें आणि पुढें पुष्कळ काळपर्यंत सुमात्रा आणि मॅले द्वीपकल्प यांचा सगळा इतिहास परस्परांशीं अतिशय निकट बांधलेला आहे. या राज्याची राजधानी श्रीविजय नांवाचें शहर होतें. सुमात्रामधील पर्वतांत आंतल्या अंगाला हें शहर असून पालेमबांग नदीच्या मुखाशीं

या नगराचें बंदर होतें. पाचव्या-सहाव्या शतकानंतर सुमात्रांत बुद्धधर्माचेंच वर्चस्व चालू लागलें. एवढेंच नव्हे, तर सुमात्राच्या राज्यानें बुद्धधर्माचा प्रचार करण्याचें प्रत्यक्ष कार्य आपल्या अंगावर घेतलें आणि अखेरीस मॅलेशियांतील बहुतेक सारा हिंदुधर्मीय प्रदेश त्याच्या प्रयत्नानें बुद्धधर्मीय होऊन गेला. त्यामुळें या सुमात्राच्या साम्राज्याला श्रीविजय येथील बुद्धांचें (बुद्धधर्मीय) साम्राज्य असें म्हटलें जातें.

श्रीविजयाचें हें साम्राज्य वाढतां वाढतां इतकें वाढलें, कीं सुमात्रा आणि मलाया यांच्या जोडीला त्यामध्यें बोर्निओ, फिलिपाइन बेटें, सेलीबीस, जावाचा अर्धा भाग, फोर्मोसा बेटाचा अर्धा भाग (आज हें बेट जपानच्या ताब्यांत आहे) व सिलोन यांचा समावेश होऊं लागला. एवढेंच नव्हे, तर दक्षिण चीनमधील कँटन बंदराजवळील एक बंदरही त्यामध्यें सामील होतें. सिलोनच्या समोरचा हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकाचा कांहीं भागही त्यांत बहुधा असावा. अशा रीतीनें साऱ्या मॅलेशियावर पसरलेलें एक विस्तीर्ण असें साम्राज्य होतें हें तुला दिसून येईल. व्यापारधंदा, मालवाहतूक आणि जहाजें बांधणें हे या देशाचे प्रमुख व्यवसाय होते. तत्कालीन आरबी आणि चिनी ग्रंथकारांनीं सुमात्राच्या राज्याच्या अमलाखालीं आलेलीं बंदरें आणि नवीन नवीन वसाहती यांचीं नांवें दिलेलीं आपल्याला आढळतात. त्यांच्या या यादी पुढें पुढें वाढतच गेलेल्या दिसतात.

ब्रिटिश साम्राज्य आज साऱ्या जगावर पसरलेलें असून प्रत्येक ठिकाणीं त्याचीं बंदरें आणि कोळसा भरण्याचीं ठिकाणें आहेत. उदाहरणार्थ, जिब्राल्टर, सुएज कालवा (हा बहुतांशीं ब्रिटिशांच्याच प्रभुत्वाखालीं आहे), एडन, कोलंबो, सिंगापूर, हाँगकाँग वगैरे. गेलीं तीनशें वर्षें ब्रिटिश लोक हे व्यापारी लोकांचें राष्ट्र म्हणून नांदत आहेत आणि व्यापार व सामर्थ्य हीं त्यांच्या आरमारी शक्तीवर अवलंबून आहेत. त्यासाठीं स्वाभाविकच त्यांनीं सोयीसोयीच्या अंतरावर बंदरें आणि कोळसा भरण्याचीं ठिकाणें हातीं आणलेलीं आहेत. श्रीविजयचें साम्राज्यही व्यापारावरच उभारलेलें अशाच प्रकारचें एका दर्गावर्दी सत्तेचें राज्य होतें. त्यामुळें जिथें म्हणून थोडासा पाय शिरकवावयाला जागा मिळेल तेथें त्यांनीं आपलें बंदर केलेलें आढळेल. त्यांच्या वसाहतींची एक विशेष गोष्ट तुला आढळून येईल, कीं त्या सर्व महत्त्वाच्या माऱ्याच्या जागीं होत्या; म्हणजे काय, तर जेथून आजूबाजूच्या सर्व समुद्रावर चांगलें प्रभुत्व चालवितां येईल अशा जागीं मुद्दाम काळजीपूर्वक या वसाहती उभारण्यांत आलेल्या होत्या. कोठें कोठें तर सुमात्राच्या या बंदरी वसाहती जोडीजोडीनें उभारलेल्या असत. त्यांचा तर समुद्रावरील वर्चस्व आणे सत्ता मजबूत होण्यासाठीं विशेषच उपयोग होई.

उदाहरणार्थ, आजचें खूप मोठें झालेलें सिंगापूर शहर! हें मुळांत सुमात्रामधील वसाहतवाल्यांनीं वसविलेलें एक ठिकाण होतें. सिंगापूर हें नांवही अगदीं खास हिंदी आहे असें तुला आढलेल. सिंगापूर म्हणजे सिंगपूर अथवा सिंहपूर. सिंगापूरच्या समोरच्या सामुद्रधुनीच्या पलीकडच्या तीरावर सुमात्राच्या लोकांची आणखी एक वसाहत

होती. मधूनमधून ते एक लोखंडी सांखळी या सामुद्रधुनीमध्यें या कांठापासून त्या कांठापर्यंत बांधीत असत आणि भलाभक्कम कर घेतल्याशिवाय जहाजांना पलीकडे जाऊं देत नसत.

तेव्हां श्रीविजयचें साम्राज्य ब्रिटिश साम्राज्याहून कांहीं निराळें नव्हतें. अर्थात् तें त्याच्याहून बरेंच लहान होतें हें खरें. परंतु ब्रिटिश साम्राज्य जितका काळ अस्तिवांत राहण्याचा संभव आहे, त्याच्यापेक्षां त्याचा अम्मल मात्रं अधिक काळ चालू होता. श्रीविजयाच्या वाढीची अगदीं शेवटची सीमा अकराव्या शतकांत, म्हणजे इकडे दक्षिणेंत चोलांचें राज्य भरभराटीला आलें होतें त्याच सुमारास गाठली गेली. परंतु चोल राजांच्यानंतरही पुढें किती तरी काळपर्यंत श्रीविजयचें साम्राज्य चालू राहिलें. या दोन्ही राज्यांमध्यें पुष्कळ काळपर्यंत मैत्रीचे संबंध होते. परंतु दोन्ही-मधील लोक आक्रमक वृत्तीचे दर्यावर्दी लोक होते; दोघांच्याजवळ प्रबळ आरमारें होतीं आणि लांबलांबपर्यंत व्यापारधंद्यांचीं साधनें होतीं. अकराव्या शतकाच्या सुरुवातीला या दोन राज्यांत झगडा उत्पन्न होऊन युद्धाला सुरुवात झाली. चोल राजा पहिला राजेंद्र यानें सैन्य समुद्रपार पाठवून श्रीविजयच्या साम्राज्यावर स्वारी केली व त्या राज्याचा पराभव केला. परंतु या धक्क्यांतून श्रीविजयानें पुन्हां लौकरच डोकें वर काढलें.

अकराव्या शतकाच्या सुरुवातीला चिनी बादशहानें सुमात्राच्या राज्याकडे पुष्कळ तांब्याच्या घंटा भेट म्हणून पाठविल्या. परतभेट म्हणून सुमात्राच्या राजानें मोती, हस्तिदंत आणि संस्कृत ग्रंथ पाठविले. बरोबर सुवर्णाच्या पत्र्यावर "**हिंदी लिपीं**"त कोरलेलें एक पत्रही होतें म्हणतात.

श्रीविजयचें साम्राज्य फार काळपर्यंत भरभराटत राहिलें. त्याची अगदीं पहिली पहिली जमवाजमव खिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकापासून पांचव्या शतकापर्यंत झाली. या सुमारास तेथें बुद्धधर्माचा उदय झाला. नंतर त्याची क्रमाक्रमानें अकराव्या शतकापर्यंत सारखी वाढच होत गेली. त्यापुढें तीनशें वर्षेंपर्यंत हें मोठें साम्राज्य मॅलेशियामधील सर्व व्यापार व दळणवळण यांवर प्रभुत्व गाजवीत टिकून राहिलें. अखेरीस पुढें इ. स. १३७७ मध्यें पल्लवांच्याच एका दुसऱ्या प्राचीन वसाहतीनें त्याचा पाडाव केला.

मीं तुला सांगितलेंच आहे, कीं श्रीविजयचें साम्राज्य सिलोनपासून चीनमधील कँटन-पर्यंत पसरलेलें होतें. दरम्यानचीं बहुतेक सर्व बेटें या साम्राज्यांत सामील होतीं. पण एक लहानसा तुकडा मात्र या साम्राज्याला जिंकतां आला नाहीं. तो म्हणजे जावाचा पूर्व भाग. या भागांतील राज्य तेवढें स्वतंत्र राहिलें आणि हिंदुधर्मानुयायी राहिलें. बुद्ध-धर्माचा स्वीकार करण्याचें त्यानें नाकारलें. अशा रीतीनें पश्चिम जावावर श्रीविजयाच्या राज्याचा अम्मल होता, तर पूर्व जावा हें स्वतंत्र राज्य होतें. पूर्व जावाचें हें हिंदु राज्यही व्यापारी राज्य होतें आणि व्यापार व वाहतुकीच्या भरभराटीवर त्याची

भरभराट अवलंबून होती. सिंगापूरला मोठी माऱ्याची जागा लाभल्यामुळें तेथें आतां मोठेंच व्यापाराचें केंद्र निर्माण झालेलें होतें. त्यामुळें त्याकडे पूर्व जावाच्या राज्याची लोभी नजर स्वाभाविकच वळली असली पाहिजे. त्यामुळें श्रीविजय आणि पूर्व जावा यांमध्यें स्पर्धा उत्पन्न होऊन तिचें पर्यवसान अत्यंत तीव्र शत्रुत्वांत झालें. बाराव्या शतकापासून पुढें हें पूर्व जावाचें राज्य श्रीविजयच्या राज्याचा थोडा थोडा भाग बळकावीत बळकावीतच वाढत गेलें आणि शेवटीं मी मागें म्हटल्याप्रमाणें चौदाव्या शतकांत इ. स. १३७७ मध्यें त्यानें श्रीविजयचा पूर्ण पाडाव केला. हें युद्ध अतिशयच क्रूर प्रकारचें झालें आणि त्यात हानि फार झाली. श्रीविजय आणि सिंगापूर हीं दोन्ही शहरें त्यांत नष्ट झालीं. अशा रीतीनें मॅलेशियांतील दुसरें मोठें साम्राज्य समाप्त झालें. आणि त्याच्या मोडतोडींतून मॅलेशियांतील तिसरें साम्राज्य – मज्झपहित साम्राज्य हें उदयास आलें.

पूर्व जावांतील लोकांनीं श्रीविजयाशीं झालेल्या त्याच्या या युद्धांत पुष्कळच क्रौर्य आणि रानटीपणा दाखविला ही गोष्ट खरी असली, तरीही त्या काळचे जावामधील जे पुष्कळ ग्रंथ आजही उपलब्ध आहेत त्यावरून या हिंदु राज्यानें सुधारणेची फार उच्च पायरी गांठली होती असें दिसून येतें. त्याच्यामध्यें बांधकामाची, विशेषतः मंदिरें बांधण्याची कला सर्वांत अधिक उत्कर्षाला पोंचली होती. त्या राज्यांत ५०० मंदिरें असून त्यांपैकीं कितीएक जगामधील अत्यंत सुंदर आणि कलायुक्त अशा दगडी शिल्प-कलेचे नमुने होतीं असें म्हणतात. यांपैकीं बहुतेक भव्य मंदिरें सातव्या शतकाच्या मध्यापासून तों दहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत (म्हणजे इ. स. ६५० पासून ९५० पर्यंत) बांधण्यांत आलीं. हीं एवढीं भव्य मंदिरें बांधण्यासाठीं या जावांतील लोकांनीं अगणित कारागीर, सुतार, गवंडी व शिल्पशास्त्रज्ञ आणि वास्तुशास्त्रनिपुण लोक हिंदुस्थानांतून आणि इतरही प्रदेशांतून आणले असले पाहिजेत. परंतु जावा आणि हें मज्झपहित साम्राज्य यांचा पुढचा इतिहास आपण दुसऱ्या एका पत्रांत लिहूं.

येथें एवढें सांगून ठेवतों, कीं बोर्निओ आणि फिलिपाइन बेटें येथील लोक लेखनकला हिंदुस्थानपासूनच या पल्हवांच्या प्राचीन वसाहतीमार्फत शिकले. दुःखाची गोष्ट ही, कीं फिलिपाइन्समधील पुष्कळच प्राचीन हस्तलिखिताचा पुढें स्पॅनिश लोकांनीं नाश केला.

त्याचप्रमाणें हेंही तूं लक्षांत ठेव, कीं या भागांत आरबी लोकांच्याही वसाहती पुष्कळ पूर्वीपासून, इस्लामच्याही उदयाच्या पूर्वीपासून होत्या. हे आरबी लोक मोठे व्यापारी होते. आणि जेथें जेथें कांहीं व्यापाराचें संधान असेल तेथें ते हटकून असावयाचेच.

४७

रोम अंधकारांत गडप होतें

१९ मे, १९३२

प्राचीन इतिहासाच्या या चक्रव्यूहामध्यें मी तुझ्या वाटाड्याचें काम मुळींच चांगल्या रीतीनें करूं शकत नाहीं, असें कितीक वेळां मला वाटतें. मला स्वतःलाच वाटेचा मागमूस राहत नाहीं, तेथें मी तुला योग्य वाट दाखवून पलीकडे कसा नेऊं शकणार? तरी पण अगदींच कांहीं नाहीं त्यापेक्षां काहीं तरी मदत तुला होईल ना असें वाटून हीं पत्रें लिहिण्याचें मी चालू ठेवतों. मला स्वतःला मात्र या पत्रांचा फारच मोठा उपयोग होतो. पत्र लिहीत बसलों आणि तुझी मूर्ति डोळ्यांपुढें आली कीं नाहीं बाळ, म्हणजे मग – मी बसतों त्या ठिकाणचें उष्णतामान सावलीमध्यें सुद्धां ११२ अंशावर आहे, उन्हाच्या उष्ण झळा वाहत आहेत, याची मला आठवण सुद्धां राहत नाहीं. कधीं कधीं तर मी बरेलीच्या डिस्ट्रिक्ट जेलमध्यें आहें, हें सुद्धां मी विसरतों.

माझ्या गेल्या पत्रांत तूं मॅलेशियामध्यें थेट चौदाव्या शतकाच्या अखेरीला येऊन पोंचलीस. तरी पण उत्तर हिंदुस्थानात आपण हर्षाच्या काळाच्या म्हणजे सातव्या शतकाच्या पलीकडे पोंचलों नाहीं, आणि यूरपमध्यें तर आपल्याला अजून केवढा तरी मोठा काळ ओलांडावयाचा आहे. सगळीकडे एकच वेळापत्रक, किंवा काळाचें एकच कोष्टक पाळणें हें कठिण पडतें. तसा प्रयत्न मी करतों, परंतु केव्हां केव्हा, उदाहरणार्थ, या अङ्कोर आणि श्रीविजय साम्राज्यांच्या बाबतींत झालें त्याप्रमाणें, हातीं घेतलेली गोष्ट पुरी करावी म्हणून मी पुढच्या कितीएक शतकांपर्यंत भरारी मारतों. म्हणून तुला ध्यानात ठेवणें जरूर आहे, कीं इकडे पूर्वेकडे कांबोज आणि श्रीविजय हीं साम्राज्यें भरभराटीस आलेलीं होतीं त्या काळांत हिंदुस्थान, चीन आणि यूरपमध्येंही हरएक प्रकारच्या घडामोडी चालू होत्याच. तसेंच हेंही लक्षांत ठेव, कीं माझ्या गेल्या पत्रांत थोड्याशाच पानांमध्यें इंडोचायना व मॅलेशिया यांचा एक हजार वर्षांचा इतिहास दिलेला आहे. आशियाच्या आणि यूरपच्या इतिहासाच्या मुख्य ओघापासून हीं राष्ट्रें काहींशीं अलग पडलेलीं असल्यामुळें त्यांच्याकडे कोणाचें फारसें लक्ष जात नाहीं, पण त्याचाही इतिहास फार मोठ्या काळाचा आणि भरीव असाच आहे; कर्तबगारी, यशःप्राप्ति, व्यापारधंदा, कला आणि शिल्प यांमध्यें तर त्यांच्या हातून विशेष भरीव कामगिरी झालेली असून त्यांचा इतिहास चांगला अभ्यास करण्यासारखा आहे. हिंदी लोकांना तर त्यांचा वृत्तांत विशेषच कौतुकाचा आहे. कारण हीं साम्राज्यें म्हणजे जणुं हिंदुस्थानचाच एक भाग आहेत. आमच्या देशांतील लोक समुद्र ओलांडून हिंदी संस्कृति, कला, धर्म घेऊन तेथें जाऊन राहिलेले होते.

परंतु अशा रीतीनें मलायांत जरी आपण पुष्कळ पुढल्या काळांत गेलों असलों, तरी

खरोखर आपण अजून सातव्या शतकाशींच आहों असें म्हटलें पाहिजे. अरबस्तानात जाऊन आपल्याला अद्यापि तेथें इस्लामचा उदय कसा झाला आणि त्यामुळें यूरप आणि आशिया यांमध्यें केवढाले प्रचंड फरक घडून आले, हें पाहावयाचें आहे. तसेंच यूरपमधील सर्वच घडामोडींचा सलग वृत्तांत आपणाला सांगावयाचा आहे.

म्हणून आपण थोडेंसें मागें जाऊन यूरपकडे ज्रा नजर टाकूं या. बॉस्फरसच्या सामुद्रधुनीवर ज्या ठिकाणीं बायझांटियम शहर होतें तेथें रोमचा बादशहा कॉन्स्टंटाइन यानें कॉन्स्टॉन्टिनोपल हें शहर वसविलें, हें तुला आठवत असेल. या शहरामध्यें, या नवीन रोममध्यें,त्यानें आपल्या साम्राज्याची राजधानी जुन्या रोममधून काढून आणली. त्यानंतर लौकरच रोमन साम्राज्याचे दोन भाग पडले. एक पश्चिमेकडचें साम्राज्य, त्याची राजधानी रोम शहर; व दुसरा पूर्वेकडील साम्राज्य आणि त्याची राजधानी कॉन्स्टॉन्टिनोपल हें शहर. पूर्वेकडच्या साम्राज्यालां पुष्कळच शत्रूंना तोंड द्यावें लागलें आणि त्यावर अडचणीही फार आल्या; तरी आश्चर्य हें, कीं अशाही स्थितींत शतकांमागून शतकें अशा रीतीनें ११०० वर्षेंपर्यंत तें साम्राज्य टिकलें. अखेरीस तुर्की लोकांनीं तें नष्ट करून टाकलें.

पश्चिमेकडल्या साम्राज्याला इतकें दीर्घायुष्य लाभलें नाहीं. रोमच्या नांवाचा तो एवढा मोठा दरारा, आणि साम्राज्यवैभव भोगणाऱ्या रोम नगरीनें पश्चिमेकडील जगावर इतक्या दीर्घकाळपर्यंत उपभोगलेलें तें प्रभुत्व, यांचें कांहीं न चालून पश्चिमेकडचें साम्राज्य पाहतां पाहतां त्वरेनें नाहींसें झालें. उत्तरेकडच्या कोणाही टोळ्यांचा हल्ला त्यांना परतवितां आला नाहीं. गॉथ लोकांचा नायक अलॅरिक इटलीवर चालून आला आणि इ. स. ४१० मध्यें त्यानें रोम काबीज केलें. पुढें व्हँडॉल लोक येऊन त्यांनींही रोमची लूट केली. हे व्हँडॉल लोक जर्मन वंशाचे असून फ्रान्स ओलांडून ते आफ्रिकेंत गेले होते; व तेथें मोडून पडलेल्या कार्थेजच्या जागीं आपलें एक राज्य त्यांनीं स्थापन केलें होतें. पूर्वीच्या त्या कार्थेजकडच्या बाजूनेंच समुद्र ओलांडून येऊन त्यांनीं रोम शहर काबीज केलें. इतक्या दीर्घ काळानंतर का होईना, पण रोमन लोकांनीं प्यूनिक युद्धामध्यें कार्थेजवर मिळवलेल्या विजयाचा हा एक प्रकारचा सूडच घेतला गेला म्हणावयाचा.

याच सुमारास हूण लोक प्रबल झाले. हे लोक मुळांत मध्य आशियामधून किंवा मंगोलियांतून तिकडे गेलेले होते. पशुधन घेऊन भटकणाऱ्या लोकाचा हा समाज होता. डान्यूब नदीच्या पूर्वेला आणि पूर्व रोमन साम्राज्याच्या उत्तरेला आणि पश्चिमेला हे वसती करून राहिले होते. त्यांचा नायक ॲटिला याच्या अमदानींतच आजूबाजूच्या प्रदेशावर त्यांनीं आक्रमण करावयाला सुरुवात केली. कॉन्स्टॉन्टिनोपलचा बादशहा व त्याचें सरकार यांना त्यांचें सतत भय वाटत असे. ॲटिला त्यांना धमक्या देई आणि त्यांच्याकडून मोठमोठाल्या रकमा उकळीत असे. अशा रीतीनें पूर्वेकडील रोमन साम्राज्याची पुरेशी रग जिरविल्यानंतर ॲटिलानें पश्चिम रोमन साम्राज्यावर स्वारी

करण्याचा बेत केला. त्यानें प्रथम गॉल प्रांतावर हल्ला करून दक्षिण फ्रान्समधील पुष्कळशीं शहरें उध्वस्त केलीं. केवळ साम्राज्याच्या सैन्याचें त्याच्यापुढें कांहींच चाललें नसतें. परंतु रोमन लोक ज्यांना रानटी (बर्बर) म्हणत अशा ज्या त्या भागांत जर्मनवंशीय फ्रँक आणि गॉथ लोकांच्या टोळ्या होत्या, त्यांना या हूणांच्या स्वारीचें भय वाटून ते रोमन साम्राज्याच्या सैन्याला मिळाले आणि त्या सर्वांनीं ॲटिलाशीं ट्रॉय येथें फार मोठी निकराची लढाई दिली. यांत दीड लक्षांहून अधिक लोक मेले. ॲटिलाचा या ठिकाणीं पाडाव झाला आणि या मंगोलियन हूणांना पिटाळून लावण्यांत आलें. इ. स. ४५१ मधील ही हकीकत. पण ॲटिलाचा पराभव झाला असला तरी त्याचा लढण्याचा दम कायम होता. त्यानें इटलीवर मोर्चा फिरविला आणि उत्तरेकडील पुष्कळ शहरें लुटलीं. लौकरच तो मरण पावला. परंतु त्याच्यामागें त्याचा क्रूरपणा आणि निर्दयपणा यांचा महिमा मात्र कायम शिल्लक राहिला. आजच्या काळांतही हूणांच्या ॲटिलाला निर्दय व निर्घृण नाशकारकतेचा मूर्तिमंत अवतारच मानतात. त्याच्या मृत्यूनंतर हूण लोकांची खुमखुम थोडी शांत झाली, आणि भटकणें सोडून ते तेथेंच जमीन करून राहिले व तेथल्या इतर बऱ्याचशा लोकांमध्यें मिसळून गेले. तुला आठवतच असेल, कीं सामान्यतः याच सुमारास श्वेतवर्णीय हूण लोक हिंदुस्थानमध्यें आले.

यानंतर चाळीस वर्षांनीं थिओडोरिक नावाचा एक गॉथ गृहस्थ रोमचा राजा झाला आणि तेथून रोमचें पश्चिम साम्राज्य संपलेंच म्हणावयाचें. यापुढें थोड्याच काळानंतर पूर्वेकडील साम्राज्याचा बादशहा जस्टिनियन याचा इटली आपल्या साम्राज्यांत सामील करून घेण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. इटली व सिसिली हे दोनही देश त्यानें जिंकले होते. परंतु लौकरच ते दोन्ही पूर्व साम्राज्यांतून फुटले. आणि पूर्व साम्राज्याला इकडे स्वतःचें संरक्षण करतां करतांच पुरेसें झालें.

कोठलीही टोळी येऊन तिनें रोमवर हल्ला करण्याचें मनांत आणावें आणि एवढी साम्राज्यवैभव उपभोगणारी रोम नगरी आणि तिचें तें साम्राज्य प्रत्येक हल्ल्यापुढें इतक्या सहज रीतीनें आणि हां हां म्हणतां कोसळून पडावें, ही किती आश्चर्याची गोष्ट वाटते, नव्हे? रोम म्हणजे एक पोकळ डोलारा किंवा निव्वळ आवळाभोपळ्याची कशी तरी बांधलेली मोट तर नव्हती ना, त्याचे सगळे सांधे खिळखिळे झाले नव्हते ना, असा विचार मनांत येतो. हीच कल्पना बहुतांशीं खरी मानली पाहिजे. पुष्कळ काळपर्यंत रोमचें सगळें सामर्थ्य एक काय तें त्याच्या नांवाच्या प्रतिष्ठेमध्यें, कीर्तीमध्येंच शिल्लक राहिलेलें होतें. त्याच्या प्राचीन इतिहासामुळें तें साम्राज्य साऱ्या जगाच्या आघाडीवर आहे असें लोक समजत होते, त्याला ते मोठेपणाचा मान देत होते; त्याच्या भीतीचें एक प्रकारचें भूत त्यांच्या मानगुटीला बसलेलें होतें. म्हणून बाह्यतः एका प्रबळ साम्राज्याची स्वामिनी म्हणून रोमचा दिमाख

चालू राहिला होता; परंतु खरोखर तिच्या पाठीशीं बळ असें कांहींच नव्हतें. बाहेरून सगळी शातता होती. नाट्यगृहांत, क्रीडांगणामध्यें, बाजारपेठेंत पुष्कळ गर्दी गजबजत होती; परंतु ती अगदीं निःसंशय आणि अपरिहार्यपणें नाशाच्या वाटेला लागलेली होती. तिच्या ठिकाणीं सामर्थ्य उरलें नव्हतें. रोमच्या कोलमडण्याचें हें एक कारण असलें, तरी तेवढेंच एक कारण त्याचें होतें असें नव्हे. तर क्रूरतेची गुलामगिरी आणि दैन्य यांच्या पायावर आधारलेली श्रीमंतांची, धनिकांची संस्कृति रोमनें निर्माण केली होती हें त्याचें दुसरें आणि मोठें कारण आहे. पूर्वीच्या एका पत्रांत मीं सांगितलेंच आहे तुला, कीं तेथें गरीब लोकांचीं बंडें आणि हल्ले होऊं लागलेले होते; तसेंच गुलामांचेंही एक मोठें बंड होऊन त्याचा मोड करावा लागला होता. हीं सगळीं बंडें रोमची समाजव्यवस्था किती किडून गेली होती हेंच दाखवितात. आंतूनच ती मोडकळीला आलेली होती. गॉथ आणि इतर उत्तरेकडील टोळ्या आल्यामुळें ती मोडण्याचें कार्य लौकर पुरें होण्याला मदतच झाली आणि म्हणूनच त्या ठिकाणीं फारसा विरोध झालाच नाहीं. रोमन शेतकऱ्याला आपल्या नशिबीं आलेल्या दैन्याची इतकी चीड आणि किळस आली होती, कीं ही स्थिति कांहींही होऊन बदलावी, मग तिच्या जागीं नवीन कांहीं येवो, अशी त्याची वृत्ति झाली होती. आणि गरीब बिचारे कामगार व गुलाम जे होते त्यांची अवस्था तर यांच्याहूनही अधिक वाईट होती.

पश्चिम रोमन साम्राज्याचा अंत झाल्याच्या वेळेपासून पश्चिम यूरपांतील नवनवे लोक काळाच्या आघाडीवर पुढें येऊं लागलेले आढळतात. त्यांत गॉथ होते, फ्रँक लोक होते, आणखी इतरही कांहीं लोक होते. त्यांचीं सर्वांचींच नांवें येथें सांगून मी तुला त्रास देत नाहीं. आजचे पश्चिम यूरपमधील जर्मन, फ्रेंच वगैरे जे लोक आहेत त्यांचेच हे लोक पूर्वज होत. पुढें हळूहळू यूरपमध्यें या लोकांच्या देशांच्या मर्यादा निश्चित होत गेलेल्या आपल्याला आढळतात. पण त्याच काळांत समाजव्यवस्था मात्र अगदींच हीन प्रकारची अशी अस्तित्वांत असलेली आढळते. रोमच्या साम्राज्याच्या अंताबरोबर रोममधील सगळा दिमाख आणि ऐश्वर्योपभोग यांचाही नाश झाला. आणि रोममध्यें कशीबशी चालू राहिलेली वरची सुधारणा, तिचें मूळ पूर्वीच निःसत्त्व होऊन गेलें असल्यामुळें, पाहतां पाहतां जणुं एका दिवसांत विलयाला गेली. अशा रीतीनें या ठिकाणीं मनुष्यसमाजानें सुधारणेच्या मार्गांत मागचें पाऊल टाकल्याचें एक विचित्र उदाहरण प्रत्यक्ष आपल्या नजरेस येतें. हिंदुस्थान, चीन, ईजिप्त, रोम यांत व इतरही ठिकाणीं हा प्रकार घडून आलेला आपणांस दिसतो. पुष्कळ दिवसपर्यंत अत्यंत परिश्रमानें ज्ञान आणि अनुभव संपादला जातो; संस्कृति आणि सुधारणा निर्माण होतात. आणि मग हें कार्य बंद पडतें. नुसतें बंदच पडून राहत नाहीं, तर एक प्रकारची माघारच सुरू होते. भूतकालावर, आजपर्यंत मिळविलेल्या यशावर, एक प्रकारचा पडदा टाकला जातो. आणि अधूनमधून त्याचें ओझरतें दर्शन आपणांला जरी होऊं शकलें, तरी ज्ञानाचा आणि अनुभवाचा तो सारा पर्वत पुन्हां तळापासून

वरपर्यंत चढावा लागतो. आतां असें मात्र होत असावें बहुधा, कीं प्रत्येक नवीन चढण्याच्या प्रसंगीं समाज पाहिल्याहून थोडा अधिक वर चढत असावा, आणि पुन्हां चढण्याचें कामही अधिक सुकर होत असावें. माउंट एवरेस्टचें शिखर गांठण्यासाठीं नाहीं का स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या चालल्या आहेत? तसाच हा प्रकार. प्रत्येक पुढची स्वारी शिखराच्या अधिकाधिक जवळ जवळ जात आहे आणि कोणीं सांगावें, लौकरच अगदीं शेवटचें टोंक गांठलें जाईलही.

तात्पर्य, यूरपमध्यें या सुमारास सगळा अंधकार पसरलेला आपणांस दिसतो. या वेळीं तमोयुग सुरू होतें; जीवन अगदींच गांवढळ आणि नीरस होतें; शिक्षणाचा जवळजवळ मागमूसही कोठें राहत नाहीं आणि लढणें हाच एक काय तो लोकांचा धंदा किंवा करमणुकीचें साधन होऊन राहिलेलें आढळतें. सॉक्रेटीस आणि प्लेटो यांचा काळ आतां फार फार लाच गेलासा वाटूं लागतो.

ही झाली पाश्चिमेकडील रोमन साम्राज्याची हकिकत. आतां पूर्वेकडील साम्राज्याचें काय झालें तेंही पाहूं या. तिकडे कॉन्स्टंटाइननें ख्रिस्ती धर्म हा साम्राज्याचा अधिकृत धर्म केला होता हें तुला ठाऊक आहे. पण त्याच्यानंतरचा एक बादशहा ज्यूलियन यानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्याचें नाकारलें. जुन्या देवदेवतांच्या पूजेचा धर्म त्याच्या मनांतून पुन्हां प्रस्थापित करावयाचा होता. परंतु त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. कारण जुन्या देवांच्या सद्दीचा काळ आतां संपला होता आणि ख्रिस्ती धर्माचें बळ आता त्यांच्यापेक्षां फार मोठें वाढलें होतें. ज्यूलियनला ख्रिस्ती लोक व्रात्य किंवा धर्मभ्रष्ट, काफीर ज्यूलियन (Julian the Apostate) असें म्हणत आणि याच पदवीनिशीं आज तो इतिहासांत ओळखला जातो.

ज्यूलियनच्यानंतर लौकरच एक बादशहा झाला. तो ज्यूलियनहून अगदीं वेगळ्या प्रवृत्तीचा होता. त्याचें नांव थिओडोसियस असून त्याला ग्रेट म्हणजे श्रेष्ठ, महान् ही पदवी लावतात. प्राचीन मंदिरें आणि देवदेवतांच्या प्राचीन मूर्ती नष्ट करण्याचें महत्कार्य त्यानें केलें, म्हणून त्याला ही पदवी मिळाली असावी. ख्रिस्ती नव्हते अशानाच त्याचा केवळ प्रबळ विरोध होता असें नव्हे; तर ख्रिस्ती लोकांतही त्याच्या कल्पनेप्रमाणें जुन्या – सनातन – मताचे जे नव्हते, त्यांच्यावरही तो तितकाच कडक हात चालवीत असे. त्याला पसंत नाहीं असें कोणतेंही मत किंवा धर्म यांना तो मुळींच थारा देत नसे. या थिओडोसियसनें कांहीं काळ पूर्व आणि पश्चिम, दोन्ही रोमन साम्राज्यें एकत्र केलीं होतीं व दोहोंचाही तो एकटाच बादशहा झाला होता. रोमवर रानटी लोकांचे हल्ले सुरू होण्यापूर्वीची, इ. स. ३९२ मधली ही हकिकत.

यापुढें ख्रिस्ती धर्माचा प्रसार वाढतच राहिला. यापुढें त्याला ख्रिस्ती नव्हते अशांशीं झगडावें लागलें नाहीं; तर जे झगडे झाले, ते सगळे ख्रिस्ती धर्मांतीलच निरानिराळ्या पंथांचे आपापसांत झाले. या पंथांनीं परस्परांबद्दल जें असहिष्णुत्व दाखविलें, तें पाहून काय म्हणावें कांहीं समजत नाहीं. सर्व उत्तर आफ्रिका व पश्चिम

आशिया येथें आणि यूरपमध्येंही त्यांनीं रणमैदानें उघडलीं; आणि त्यांवर तरवारींचे घाव व दंड्यांचे तडाखे या व अशासारख्या मतपरिवर्तनाच्या अत्यंत मृदु साधनांनीं ख्रिस्ती लोकांनीं आपल्या या ख्रिस्ती धर्मबांधवांना खऱ्या धर्माचें सत्यस्वरूप समाजावून देण्याचें कार्य चालू केलें !

यानंतर इ. स. ५२७ पासून ५६५ पर्यंत जस्टिनियन हा कॉन्स्टान्टिनोपलचा बादशहा होता. नुकतेंच मीं तुला सांगितलें, कीं त्यानें गॉथ लोकांना इटलींतून घालवून लाविलें आणि कांहीं काळपर्यंत इटली आणि सिसिली हे देश पूर्व रोमन साम्राज्यांत सामील झाले. पुढें कांहीं काळानें गॉथ लोकांनीं पुन्हां इटली देश काबीज केला.

जस्टिनियननें कॉन्स्टान्टिनोपल येथील अतिसुंदर असें सँक्टा सोफायाचें कॅथेड्रल, बिशपचें पीठ असणारें मंदिर, बांधलें. बायझंटाइन पंथाच्या मंदिरांत हें एक अत्यंत मनोहर मंदिर आहे. तसेंच जास्टिनियननें त्या काळचे सर्व कायदेकानू एकत्र करविले आणि चांगल्या बाकबगार कायदेपंडितांकडून त्यांची विषयवार नीट जुळणी केली. पूर्व रोमन साम्राज्य आणि बादशहा यांचा इतिहास वाचण्याच्या आधीं पुष्कळ दिवस मला जस्टिनियनचें नांव माहीत झालेलें होतें, तें त्याच्या या कायद्याच्या ग्रंथावरून. या पुस्तकाचें नांव इन्टिस्ट्यूटस् ऑफ जस्टिनियन, जस्टिनियनचे कायदे, असें असून तें मला माझ्या अभ्यासक्रमांत वाचणें भाग झालें होतें. परंतु इकडे कॉन्स्टांटिनोपलमध्यें जरी जस्टिनियननें एक विद्यापीठ स्थापन केलें, तरी अथेन्समधील प्लेटोनें स्थापन केलेली ॲकॅडमी किंवा तत्त्वज्ञानाच्या प्राचीन शाळा, ज्या आतां जवळजवळ हजार वर्षांपासून चालू होत्या, त्या मात्र त्यानें बंद केल्या. अंधश्रद्धेवर आधारलेल्या कोणत्याही धर्माला तत्त्वज्ञान हें फार भयंकर वाटतें; कारण तें लोकांना स्वतंत्र विचार करावयास शिकवीत असतें.

अशा रीतीनें सहाव्या शतकापर्यंत आपण येऊन पोंचलों. या दरम्यान रोम आणि कॉन्स्टान्टिनोपल एकमेकांपासून दूर दूर होत गेल्याचें आपण पाहिलें. रोमवर उत्तरेकडील जर्मनवंशीय टोळ्यांचा ताबा चालू लागला, तर कॉन्स्टान्टिनोपलचें नांव जरी रोमन साम्राज्य राहिलें, तरी तें वास्तविक ग्रीक साम्राज्याचेंची एक केंद्र होऊन गेलें; इकडे रोम पार मोडून तोडून पडलें आणि वैभवकाळीं ज्या लोकांना तें रानटी म्हणत असे, त्या आपल्या विजेत्यांच्याच सुधारणेपर्यंत खालीं घसरून जगण्याइतकी रोमची अधोगति झाली; तर तिकडे कॉन्स्टान्टिनोपलनें मात्र जुनी परंपरा एक प्रकारें टिकविण्याचा प्रयत्न केला; अर्थात् सुधारणेच्या शिखरावरून तेथेंही हळूहळू घसरगुंडी सुरू झालीच होती. ख्रिस्ती धर्मपंथ नंतर आपापसांत वर्चस्वासाठीं झगडूं लागले; आणि थेट तुर्कस्तान, चीन, ॲबिसिनियापर्यंत पसरलेला पूर्वेकडील ख्रिस्ती धर्म रोम व कॉन्स्टान्टिनोपल या दोन्ही साम्राज्यांपासून फुटून अलग पडला. यापासून या वेळीं तमोयुगाला सुरुवात झाली. हा काळ सुरू होण्याच्या पूर्वीं अध्ययन, विद्यार्जन म्हणजे पूर्वीच्या महान् ग्रंथांचें वाचन, असा क्रम चालू होता. हे ग्रंथ ग्रीक भाषेंत किंवा ग्रीक

भाषेपासून निर्माण झालेल्या प्राचीन लॅटिन भाषेंत असत. परंतु देवादिकांचीं वर्णनें असलेले किंवा तत्त्वज्ञानाची चर्चा असलेले हे प्राचीन ग्रीक ग्रंथ हे त्या पहिल्या काळच्या श्रद्धाळू, धर्मनिष्ठ आणि असहिष्णु खिस्ती लोकांना वाचण्यास योग्य ग्रंथ नव्हेत, असें वाटूं लागलें. म्हणून त्यांच्या अध्ययनाला प्रोत्साहन मिळेनासें झालें. त्यामुळें विद्यार्जनाला ओहोटी लागली ; तशीच कितीएक प्रकारच्या कलांनाही ओहोटी लागली.

अर्थात् खिस्ती धर्मानेंही विद्या आणि कला यांचें संरक्षण करण्याचा थोडाफार प्रयत्न आपल्या परीनें केलेला आहे. बुद्धाच्या संघाच्या धर्तीवर त्यांनीं मठ स्थापिले; अशा मठांचा प्रसार फार त्वरेनें झाला. या मठांतून प्राचीन विद्यांना केव्हां केव्हां स्थान मिळे. आणि पुढें पुष्कळ शतकांनंतर जी एक नवीन कलेची परंपरा बहराला येऊन सौंदर्यानें प्रफुल्लित झाली, तिची प्रारंभींचीं बीजेंही मठांतूनच पेरलीं गेलीं. विद्या आणि कला यांचा दीप त्या मठवासी भिक्षूंनीं जेमतेम कसाबसा तेवत ठेवला. तो दीप अजिबात मालवूं न देण्यांत त्यांनीं मानवी समाजाची मोठीच सेवा केली हें खरें. पण हा दीप त्यांनीं अगदींच संकुचित क्षेत्रांत कोंडून ठेवला. बाहेर मात्र सगळीकडे पूर्ण अंधारच पसरून राहिला.

खिस्ती धर्माच्या त्या पहिल्या काळांत आणखी एक मोठी प्रवृत्ति निर्माण झाली होती. धर्मनिष्ठेनें भारलेले पुष्कळ लोक समाज सोडून दूर दूर जेथें मनुष्याचें वारें देखील फिरकणार नाहीं अशा निर्जन अरण्यांत किंवा निर्वांत ठिकाणीं जाऊन राहत आणि तेथें अगदींच असुधारलेलें, पशुवत् जीवन घालवीत. स्वतःच्या शरीराचे हाल करीत. स्नान मुळींच करीत नसत. आणि जितकें म्हणून दुःख सहन करवेल, तितकें सहन करीत. ईजिप्तमध्यें हीच प्रथा चालू होती; तेथें निर्जन मैदानामध्यें असे पुष्कळ वनवासी लोक राहत असत. त्यांची अशी कल्पना दिसते, कीं आपण जितके अधिक कष्ट सहन करूं आणि शरीराची स्वच्छता जितकी कमी ठेवूं, तितकें आपल्याला अधिक पुण्य लागेल ! हळूहळू हे वनवासी लोक नाहींसे झाले. परंतु त्यानंतर पुष्कळ काळ धर्मनिष्ठ खिस्ती लोकांची अशी श्रद्धा असे, कीं कोणत्याही प्रकारचा सुखोपभोग घेणें हें पाप आहे. या कष्ट सोसण्याच्या कल्पनेची छाया खिस्त्यांच्या साऱ्या समाजप्रवृत्तीवर पडली. अर्थात् आजच्या यूरपांत या प्रकाराचा कांहीं मागमूस नाहीं. उलट, आज तेथें जो तो जणुं वेड्यासारखा सुखाच्या मागें धांव घेण्याशिवाय आणि जिवाची मुंबई करायची म्हणून ज्याला म्हणतात, तसें जिवन घालविण्याशिवाय दुसरें कांहीं ओळखीतच नाहींसा झाला आहे.

परंतु हिंदुस्थानमध्यें आजही कांहीं लोक कधीं कधीं ईजिप्तमधील हे खिस्ती प्रवासी लोक वागत त्याप्रमाणें कांहीं अंशीं वागतांना आढळतात. कोणी एक हात उचलून धरतो; अशा रीतीनें, कीं शेवटीं तो सुकून लाकडासारखा निर्जीव होऊन जातो; कोणी अणकुचीदार भाल्याच्या टोंकावरच बसतो. असे कोणी कांहीं कोणी कांहीं पुष्कळ विचित्र आणि मूर्खपणाचे प्रकार करीत असतात. कोणी कोणी या गोष्टी

केवळ अज्ञानी लोकांच्या भावना झुलवून त्यांच्या मनांत आपल्याबद्दल भ्रामक निष्ठा उत्पन्न करून पैसे उपटण्याच्या बुद्धीनें करीत असतात; तर कांहीं लोक आपणांस पुण्य लागेल या बुद्धीनें तें करतात. त्यांची अशी समजूत असावी, कीं कोणत्याही प्रकारची नीट चांगली हालचाल करायला शरीर असमर्थ करणें, हीच एक मोठी इष्ट गोष्ट आहे!

येथें मला बुद्धाची एक गोष्ट आठवते; आपला जुना दोस्त ह्युएन चँग याच्याकडे या गोष्टीसाठीं आपल्याला जायला हवें आहे. बुद्धाचा एक तरुण शिष्य तप करीत होता. बुद्धानें त्याला विचारलें, "अरे प्रिय तरुण मनुष्या, तूं जेव्हां संसार करीत होतास तेव्हां तुला वीणा वाजवितां येत असे काय?" त्यानें उत्तर दिलें, "होय, येत असे." "तर मग" बुद्ध म्हणाला, "यावरून मला एक दृष्टांत सुचतो. वीणेच्या तारा जेव्हां अतिशय ताणलेल्या असतील तेव्हां त्यांतून मंदमृदु ध्वनी निघूं शकत नसतील. तारा जेव्हां अतिशय सैल असतील तेव्हां त्यांतून निघणाऱ्या ध्वनींत स्वरसंगति किंवा माधुर्य निर्माण होत नसेल. परंतु तारा फार ताणलेल्या नाहींत किंवा फार सैलही नाहींत, अशा स्थितींत ध्वनीमध्यें उत्कृष्ट लय निर्माण होत असेल. त्याचप्रमाणें" बुद्धदेव पुढें म्हणाले, "शरीराचेंही आहे. त्याला कष्ट दिले तर तें श्रांत होतें आणि मन स्थिर राहत नाहीं. त्याला अत्यंत मृदु वागविलें तर त्याच्या ठिकाणच्या वासना लाडावून माजतात आणि माणसाची इच्छाशक्ति दुर्बल होते."

४८

इस्लामचा उदय

२१ मे, १९३२

आतांपर्यंत आपण पुष्कळ देशांच्या इतिहासाचा विचार केला. कितीएक राजांचे आणि राज्यांचे उत्कर्षापकर्ष पाहिले. पण आपल्या गोष्टींत अरबस्तानला कांहीं अजून जागा मिळाली नाहीं. या देशांतून दर्यावर्दी खलाशी आणि व्यापारी जगांत दूरदूरच्या प्रदेशांत जात असत, एवढाच फार तर आपण एकदोन वेळां त्याच्याविषयीं उल्लेख केला. आतां जरा नकाशा पाहा. या देशाच्या पश्चिमेला ईजिप्त आहे; उत्तरेला सीरिया आणि इराक; आणि त्यांच्या थोडे पूर्वेला पर्शिया उर्फ इराण; वायव्येला जरा पलीकडे आशिया मायनर आणि कॉन्स्टान्टिनोपल. ग्रीसही कांहीं येथून फार दूर नाहीं. आणि या इकडच्या बाजूला समुद्र ओलांडला, कीं समोरच हिंदुस्थान आहे. एक चीन आणि आशियाच्या अतिपूर्वेकडील भाग सोडला, तर अरबस्तान हें प्राचीन सुधारलेल्या जगाच्या अगदीं ऐन मध्यभागींच होतें. इकडे इराकमधील तैग्रीस आणि युफ्रेटीस नद्यांच्या कांठीं मोठालीं शहरें उदयास आलेलीं होतीं. तर ईजिप्तमध्यें ॲलेक्झांड्रिया,

सीरियामध्यें दमास्कस आणि आशिया मायनरमध्यें अँटिऑक, हीं शहरें भरभराटलीं होतीं. आरबी लोक हे जात्याच व्यापारी आणि प्रवासकुशल असल्यामुळें या शहरांमध्यें त्यांना वारंवार जाण्याचा प्रसंग आला असावा. असें असूनसुद्धां त्या काळच्या इतिहासांत अरबस्तानकडून म्हणण्यासारखें कांहींच घडलेलें दिसत नाहीं. शेजारच्या देशांतल्याइतकी उच्च सुधारणाही० या देशांत उत्पन्न झालेली दिसत नाहीं. त्यानें इतर कोठले देश पादाक्रांत करण्याचा प्रयत्न केला नाहीं आणि त्याचा पाँडाव करणेंही कोणाला साधलें नाहीं.

अरबस्तान हा वालुकामय मैदानांचा प्रदेश आहे. पर्वत आणि वालुकामय मैदानें यांमध्यें वाढणारीं माणसें हीं स्वभावतःच स्वातंत्र्यप्रिय असतात आणि तीं सहसा कोणाच्या काबूंत जात नाहींत. तसेंच हा कांहीं मोठा संपन्न देशही नव्हता. त्यामुळें परकीय विजेत्यांना किंवा साम्राज्यवाद्यांना त्याचें आकर्षण वाटावयाला कांहीं विशेष कारण नव्हतें. त्यामध्यें नांव घेण्यासारखीं दोनच लहान लहान शहरें होतीं; मक्का आणि समुद्राच्या कांठावरील येथीच. बाकी मग वालुकामैदानांत इकडे तिकडे पसरलेल्या वसत्या मात्र होत्या. त्यांत राहणारे बहुतेक सारे लोक हे बेदुईं किंवा बद्दू लोकच होते. या नांवाचा अर्थच मुळीं निर्जन-प्रदेशवासी लोक असा आहे. त्यांचे नित्याचे सहचर म्हणजे जलद चालीचे उंट आणि सुंदर घोडे. गाढव हा प्राणीही त्यांचा मोठा सच्चा दोस्त होता. त्याच्या त्या निःसीम कष्टाळूपणामुळें त्याची त्यांना फारच किंमत वाटे. गाढवाची किंवा खेचराची उपमा म्हणजे या देशांत एक स्तुतीचा प्रकार असे. इतर देशांतल्याप्रमाणें त्यांत निंदाव्यंजक असें कांहींच नव्हतें. कारण वालुकामय मैदानांच्या प्रदेशांत जीवन फार बिकट असतें; त्यामुळें शक्ति आणि कष्ट सहन करण्याची ताकद, हे गुण इतर ठिकाणापेक्षां येथें तर फारच किमतीचे वाटत असतात.

वालुकामय प्रदेशांतील हे रहिवासी मोठे अभिमानी, भावनाप्रधान, नाजुक मनाचे आणि तंटेखोर होते. आपल्या कुटुंबाला व कुळाला ते धरून राहत व इतर कुटुंबांशीं व कुळांशीं झगडत. वर्षांतून एकदां ते आपसांतील सर्व भांडणें बाजूस ठेवून एक होत आणि त्यांचे अगणित देव ज्या ठिकाणीं ठेवलेले होते, त्या मक्केच्या यात्रेला ते सर्व जण मिळून जात. या देवदेवतांत सर्वांत अधिक भक्तिभावानें ते तेथील काबा नांवाच्या प्रचंड शिळेची पूजाअर्चा करीत असत.

यांचेंही जीवन पशुधन घेऊन भटकणारांचेंच होतें. आणि कुटुंबप्रमुखाची आपापल्या कुटुंबापुरती सत्ता चालावयाची एवढ्याच प्रकारची त्यांची समाजव्यवस्था असे. शहरामध्यें जाऊन वसाहत करण्यापूर्वी आणि तेथील सुधारणेशीं समरस होण्यापूर्वी मध्य आशियांतील किंवा इतर ठिकाणचें जीवन ज्या प्रकारचें होतें त्याच प्रकारचें हें जीवन होतें. अरबस्तानच्या सभोंवार जीं मोठमोठीं साम्राज्यें उदयास आलेलीं होतीं, तीं आपापल्या साम्राज्यांमध्यें अरबस्तानची गणना करीत. परंतु ही गोष्ट नांवापुरतीच खरी होती. प्रत्यक्ष त्यांचें राज्य अरबस्तानवर कधींच प्रस्थापित झालें

नाहीं. या वालुकामय प्रदेशांतील भटकत्या टोळ्यांना जिंकणें किंवा त्यांवर अम्मल गाजविणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती.

तुला आठवत असेल मीं सांगितलेलें, कीं एकदां सीरियामध्यें पामीरा येथें आरबांचें एक लहानसें राज्य उदयाला आलें होतें. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत अगदीं थोडा काळपर्यंत त्याची चलती चालली होती. परंतु हें राज्यही खुद्द अरबस्तानच्या बाहेरच होतें. अशा स्थितींत शतकांमागून शतकें जात होतीं, तरी अरबस्तानच्या त्या वालुकामय प्रदेशांत या बेदुई लोकांची ही अशाच प्रकारची वस्ती चालू होती. त्यांचीं जहाजें व्यापारासाठीं दूर दूर जात असत; तथापि अरबस्तानमध्यें मात्र कांहींही बदल घडून आला नाहीं. कांहीं लोकांनीं तेथें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला, तर कांहीं थोड्या लोकांनीं ज्यू धर्माचा अवलंब केला; परंतु बाकीचे बहुसंख्य लोक सगळे त्यांचे ते ३६० देव आणि तो काबाचा दगड यांची पूजाअर्चा करणारेच राहिले.

अशा रीतीनें युगानुयुगें हे आरबी लोक एक प्रकारचे निद्रिस्त जीवन कंठीत आले होते; बाहेरच्या जगांत ज्या घडामोडी चाललेल्या होत्या त्यांचें जणुं वारेंसुद्धां त्यांच्यावरून जात नव्हतें. असे हे लोक एकाएकीं जागे झाले आणि साऱ्या जगाला चकित करून टाकण्यासारखी, जगाच्या इतिहासाचा ओघ पालटून टाकण्यासारखी, प्रचंड शक्ति त्यांच्या अंगीं दिसून आली, ही केवढी चमत्काराची गोष्ट आहे. आरबांचा यानंतरचा इतिहास, ते झपाट्यानें आशिया, यूरप आणि आफ्रिका या तिन्ही खंडांत कसे पसरले आणि उच्च प्रकारची संस्कृति आणि सुधारणा त्यांनीं कशी निर्माण केली ही सारीच घटना, म्हणजे एक जगांतलें मोठेंच आश्चर्य आहे.

आरबी लोकांना जागृत करून त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास आणि सामर्थ्य प्रफुल्लित करणारी शक्ति म्हणजे इस्लामधर्म. हा धर्म महमद नांवाच्या नवीनच उदयास आलेल्या प्रेषितानें, पैगंबरानें सुरू केला. महमदाचा जन्म मक्का येथें इ. स. ५७० मध्यें झाला. परंतु त्यानें हा धर्म तारुण्याच्या उतावीळपणांत किंवा अविचारानें स्थापला नाहीं. तो आपला उद्योगधंदा संभाळून साधेपणानें शांत जीवन कंठीत होता. आजूबाजूच्या लोकांचें त्याच्यावर प्रेम होतें, आणि त्याच्यावर त्यांचा विश्वासही होता; नव्हे, त्याचें नांवच लोकांनीं 'अल्अमीन' म्हणजे विश्वासू असें ठेवलें होतें. परंतु त्यानें जेव्हां आपल्या नवीन धर्माचा उपदेश करावयाला सुरुवात केली, विशेषतः मक्का येथील मूर्तींच्या विरुद्ध जेव्हां त्यानें प्रचार चालू केला, त्या वेळीं लोकांचा त्याच्याविरुद्ध फार मोठा आरडाओरडा सुरू झाला आणि शेवटीं लोकांनीं त्याला मक्केतून हांकलून लावलें. जेमतेम जीव घेऊन त्याला तेथून पळून जावें लागलें. त्याच्या उपदेशांत सर्वांत मोठा भर यावर होता, कीं परमेश्वर फक्त एकच आहे आणि मी महमद त्या परमेश्वराचा प्रेषित–पैगंबर आहें.

आपल्याच लोकाकडून अशा रीतीनें मक्केतून हांकलला गेल्यानंतर महमद येथीच येथील आपल्या कांहीं मित्रांच्या आणि साहाय्यकांच्या आश्रयाला जाऊन राहिला.

मक्केमधून केलेल्या या पलायनाला आरबी भाषेंत हिजरात असें म्हणतात. आणि मुसलमानी कालगणना या तारखेपासून म्हणजे इ. स. ६२२. पासून सुरू होते. ही हिजरी कालगणना चांद्रवर्षीय आहे. म्हणजे चंद्राच्या गतीप्रमाणें त्यांचे महिने व वर्षें हीं ठरत असतात. आपण सामान्यतः सौर वर्षमान अवलंबीत असतों. त्याच्या मानानें हें चांद्र वर्ष पांचसहा दिवसांनीं लहान असतें. त्यामुळें वर्षाचे निरनिराळे ऋतू हिजरी शकाच्या नेमक्या त्याच त्या महिन्यांत येत नाहींत. त्यांचा एक महिना या वर्षीं ऐन थंडींत असेल, तर पुढें कांहीं वर्षांनीं त्याच महिन्यांत भर उन्हाळा असेल.

खरोखर इस्लामधर्माचा उदय एका अर्थीं थोडासा आधींच झालेला असला, तरी त्याची सुरुवात या पलायनापासून, इ. स. ६२२ मधील हिजरातीपासून झाली, असें धरून चालण्यास हरकत नाहीं. येथ्रीब शहरामध्यें महमदाला आश्रय मिळाला; त्याच्या तेथें येण्याची पुण्यस्मृतीची खूण म्हणून येथ्रीबचें नांव बदलून त्याला "मदीनत्-उन-नबी" म्हणजे प्रेषिताची किंवा पैगंबराची नगरी असें नवीन नांव ठेवण्यांत आलें. आतां हल्लीं त्यालाच थोडक्यांत मदीना असें म्हणतात. मदीनांतील ज्या लोकांनीं महमदाला मदत केली, त्यांना अन्सार म्हणजे साहाय्यक असें म्हणतात. या साहाय्यकांच्या वंशजांना ही पदवी मोठी मानाची वाटते आणि आजच्या घटकेलाही ते तिचा उपयोग करतात.

इस्लामधर्म आणि आरबी लोक यांच्या यापुढील दिग्विजयाच्या वृत्तांताला हात घालण्यापूर्वी आपण जरा किंचित् आजूबाजूला नजर टाकूं या. आपण पाहिलेंच आहे नुकतें, कीं या सुमारास रोमची धूळधाण होऊन गेलेली होती; प्राचीन ग्रीक आणि रोमन लोकांची संमिश्र सुधारणा विलयाला गेली होती आणि तिच्या आधारावर उभी असलेली सगळी समाजरचना उलथीपालथी झाली होती. उत्तर यूरपमधील टोळ्या आणि वंश आतां हळूहळू महत्त्वाला चढूं लागले होते. रोमपासून कांहीं कांहीं गोष्टी घेण्याचा जरी त्यांनीं क्रम ठेवला होता, तरी खरोखर ते अगदींच नवीन प्रकारची सुधारणा व संस्कृति निर्माण करीत होते. अर्थात् आतांशा नुकती कोठें या प्रकाराची सुरुवात झाली होती. अद्याप त्याला कांहीं तसें रंगरूप आलेलें दिसूं लागलें नव्हतें. अशा रीतीनें जुनें सर्व नष्ट झालें होतें; पण त्याची जागा नव्यानें अजून भरून काढली नव्हती. त्यामुळें सर्व यूरपभर अंधकार पसरलेला होता. यूरपच्या पूर्व टोंकाला पूर्वेकडील रोमन साम्राज्य अद्यापि भरभराटींत होतें हें खरें. कॉन्स्टान्टिनोपल शहर हें यूरपमधील अजूनही सर्वांत मोठें शहर होतें. अजूनही त्याला तेथें फार महत्त्व होतें. अजूनही त्याचें ऐश्वर्य व वैभव कमी झालें नव्हतें. तेथील अर्धवर्तुळाकृति क्रीडांगणामध्यें, रंगभूमीमध्यें खेळ आणि शर्यती अजूनही चालू होत्या; आणि थाटमाट, डामडौल यांच्यामध्यें अजून एवढीही उणीव नव्हती. तरी पण याही साम्राज्याचें सामर्थ्य मात्र कमी होत होतें. त्याचीं इराणांतील सस्सन लोकांशीं सारखीं युद्धें चालूच होतीं. इराणचा बादशहा दुसरा खुशरू यानें कॉन्स्टान्टिनोपलच्या साम्राज्यांतील प्रत्यक्ष कांहीं भाग जिंकून-

सुद्धां घेतला होता आणि अरबस्तानावर नांवालाच का होईना पण आपलेंच स्वामित्व आहे, असें तो प्रतिपादूं लागला होता. पुढें खुशरूनें ईजिप्त देशही जिंकून घेतला व तो थेट कॉन्स्टान्टिनोपलवरही चालून गेला. परंतु तेथील ग्रीक बादशहा हेराक्लिअस यानें त्याचा त्या वेळीं पराभव केला. पुढें खुशरूचा खून प्रत्यक्ष त्याचा मुलगा कवाध यानेंच केला.

तेव्हां त्या सुमारास यूरपची आणि पूर्वेस इराणची हालहवाल कांहीं चांगली नव्हती. त्याच्याच जोडीला आणखी ते ख्रिस्ती धर्मपंथांमधील झगडे घ्या. त्यांना तर जणुं अंतच नव्हता मुळीं. पश्चिमेंत आणि आफ्रिकेमध्येंही जो ख्रिस्ती धर्मपंथ भरभराटींत होता, तो अतिशय तंटेखोर आणि लांचलुचपतखोर होता. इराणमध्यें झोरोऑस्ट्रियन धर्माला राजदरबारीं स्थान मिळून लोकांवर तो सक्तीनें लादला गेला होता. त्यामुळें यूरपमध्यें, आफ्रिकेंत किंवा इराणमध्यें काय, सर्व ठिकाणीं लोकांचा प्रचलित धर्मावरील विश्वास नाहींसा झालेला होता. याच सुमारास, सातव्या शतकाच्या सुरुवातीला सर्व यूरपभर मोठमोठ्या सांथींच्या रोगांच्या लाटांवर लाटा आल्या व लाखों माणसें मृत्युमुखीं पडलीं.

या सुमाराला हिंदुस्थानांत हर्षवर्धनाचें राज्य असून त्याच वेळीं ह्यूएन चँग इकडे येऊन गेला. हर्षाच्या अमदानींत हिंदुस्थान हें एक प्रबळ सत्ताधीश राज्य होतें. परंतु त्यानंतर लौकरच उत्तर हिंदुस्थानचे तुकडे पडले आणि तितकें त्याचें सामर्थ्य कमी झालें. पलीकडे पूर्वेला महान् तंग वंशाचा अम्मल नुकताच सुरू झाला होता. इ. स. ६२७ मध्यें तै चुंग नांवाचा त्या घराण्यांतील एक अत्यंत सामर्थ्यवान् व श्रेष्ठ राजा गादीवर आला होता. आणि त्याच्या वेळींच चिनी साम्राज्य थेट पश्चिमेकडे कास्पिअन समुद्रापर्यंत जाऊन भिडलें होतें. मध्य आशियांतील बहुतेक राज्यांनीं त्यांचें सार्वभौमत्व मान्य करून त्याला खंडणी देण्यास सुरुवात केली होती. मात्र या सर्व प्रचंड विस्ताराच्या साम्राज्याची मिळून एकच अशी एखादी प्रबळ मध्यवर्ती सत्ता त्या वेळींही निर्माण झालेली नसावी.

इस्लामधर्म उदयाला आला त्या वेळीं आशियामधील आणि यूरपातील जगाची अवस्था ही अशी होती. चीन देश सामर्थ्यवान् आणि सत्ताधीश होता. पण अरबस्तानापासून तो फारच दूर होता. हिंदुस्थान पुष्कळ सामर्थ्यवान् होता; परंतु आपल्याला दिसेलच पुढें, कीं पुष्कळ काळपर्यंत इस्लामधर्मीयांचा हिंदुस्थानशीं झगडा होण्याचा प्रसंगच आला नाहीं. राहिलीं यूरप व आफ्रिका खंडें; तीं मात्र दुर्बळ होतीं, थंकून जाऊन त्यांत त्राण उरलें नव्हतें.

पळून गेल्यानंतर सात वर्षांच्या आंतच महमदानें मक्केंत मक्केचा स्वामी म्हणून प्रवेश केला. त्यापूर्वीच मदीना येथूनच त्यानें जगामधील राजे लोकांना आणि राज्यकर्त्यांना एकच परमेश्वर आणि त्याचा प्रेषित यांना मान्यता देण्याबद्दल आज्ञापत्र पाठविलें होतें. सीरिआमध्यें इराणी लोकांविरुद्ध केलेल्या स्वारींत गुंतलेला असतांनाच

कॉन्स्टान्टिनोपलचा बादशहा हेराक्लिअस याला हें आज्ञापत्र मिळालें; इराणच्या राजालाही तें पोंचलें. चीनचा बादशहा तै चुंग यालाही तें मिळालें होतें म्हणतात. हे सर्व राजे आणि महाराजे, त्यांना किती आश्चर्य वाटलें असेल नाहीं, कीं अशा रीतीनें आपल्याला आज्ञा करण्याचें साहस करणारा, ज्याचें नांवसुद्धां कधीं कोणीं ऐकिलें नाहीं असा कुठला, कोण हा मनुष्य ! महमदानें असे हे संदेश पाठविले यावरून त्याला स्वतःविषयीं आणि आपल्या कार्याविषयीं केवढा निरतिशय विश्वास असला पाहिजे, याची आपल्याला थोडीशी कल्पना येते. हाच विश्वास, हीच श्रद्धा त्यानें आपल्या लोकांमध्येंही निर्माण केली, आणि या श्रद्धेमुळें उत्पन्न होणाऱ्या उत्साहाच्या आणि समाधानाच्या बळावर, वालुकामय प्रदेशांतील आतांपर्यंत अगदींच क्षुद्र असलेल्या अशा त्या लोकांनीं तोंपर्यंत ज्ञात झालेल्या जगापैकीं अर्धा भाग जिंकून घेण्यांत यश मिळविलें.

आत्मप्रत्यय आणि आत्मविश्वास या गोष्टी मुळांत कांहीं कमी प्रभावी नव्हत्या. परंतु त्यांच्या जोडीला आणखी इस्लामधर्मानें त्या लोकांना बंधुभावनेची, जे जे कोणी मुसलमान असतील ते सर्व सारखे असल्याची शिकवण दिली. अशा रीतीनें लोकांच्या-पुढें लोकशाहीचा थोडासा अंशच ठेवण्यांत आला. लांचलुचपतीनें भरलेल्या त्या काळच्या ख्रिस्ती धर्मापेक्षां या बंधुभावनेच्या शिकवणीचा लोकांच्या मनावर फारच मोठा परिणाम झाला असला पाहिजे. केवळ अरबी लोकांच्या मनावरच नव्हे, तर ज्या अनेक देशांमध्यें ते गेले तेथील रहिवाशांच्या मनावरही हा परिणाम झाला असला पाहिजे.

हिजरातीनंतर दहा वर्षांनीं इ. स. ६३२ मध्यें महमद मरण पावला. एवढ्या अवधींतच आपापसांत लढणाऱ्या अरबस्तानांतील अनेक टोळ्यांचें एकजीव राष्ट्र बनविण्याचें कार्य त्यानें तडीस नेलें आणि त्या लोकांच्या अंतःकरणांत कार्याविषयीं, ध्येयाविषयीं उत्साह प्रज्वलित केला. त्याच्या पाठीमागून त्याच्याच कुटुंबांतील अबू बकर हा खलीप किंवा कलीफ, म्हणजेच नायक झाला. खलिफाच्या पदावर कोणीं यावयाचें हें एक प्रकारें सार्वजनिक सभेंत साधारणपणें लोकमत अजमावून ठरविण्याची पद्धत होती. दोन वर्षांतच अबू बकर मरण पावला. त्याच्यानंतर उमर हा खलिफा होऊन दहा वर्षें जगला.

अबू बकर आणि उमर हे फार श्रेष्ठ पुरुष होऊन गेले. अरबस्तानच्या आणि इस्लामधर्माच्या श्रेष्ठतेचा त्यांनीं पाया घातला. खलिफा या नात्यानें त्यांच्याकडे देशाचें धार्मिक पुढारीपण होतें आणि राजकीय पुढारीपणही होतें; म्हणजे खलिफा हा राजाही होता आणि धर्मगुरूही (पोप किंवा शंकराचार्य) होता. खलिफाचें मोठें स्थान त्यांना लाभलेलें होतें; त्यांच्या राज्याचें सामर्थ्यही वाढत होतें; तरी पण त्यांनीं आपली साधीसुधी राहणी सोडली नाहीं आणि डामडौल व विलास यांना बिलकुल थारा दिला नाहीं. इस्लामधर्मांतील समानतेचें तत्त्व त्यांनीं आपल्या जीवनात सतत जागतें ठेवलें होतें. परंतु त्यांचे अधिकारी आणि अमीरउमराव यांनीं मात्र लौकरच रेशमी वस्त्रें

परिधान करण्याला आणि उपभोगण्यास सुरुवात केली; आणि अबू बकर व उमर यांनीं त्यांची या त्यांच्या उधळपट्टीबद्दल व ऐषआरामाबद्दल निर्भर्त्सना कशी केली, अधिकाऱ्यांना शिक्षा कशा केल्या आणि केव्हां केव्हां त्यांना त्याबद्दल रट्टेसुद्धां कसे आलें, यांबद्दलच्या कितीएक गोष्टी त्या लोकांत प्रचलित आहेत. त्या दोघांचीही भावना अशी होती, कीं आपलें खरें सामर्थ्य साध्या आणि कष्टाच्या राहणींतच आहे आणि आरबी लोकांनीं जर इराणच्या किंवा कॉन्स्टान्टिनोपलच्या राजदरबारांतील विलासी राहणी उचलली तर त्यांच्या जीवनाला कीड लागून तें अवनतीस जाईल.

अबू बकर आणि उमर यांचा अम्मल काय तो सारा बाराच वर्षें चालला. परंतु तेवढ्यांत आरबी लोकांनीं यूरपमधील पूर्वेकडील रोमन साम्राज्य आणि इराणमधील सस्सन लोकांचा राजा या दोघांचाही पाडाव केला. ज्यू आणि ख्रिस्ती लोकांची पवित्र भूमि जें जेरूसलेम शहर, तेंही त्यांनीं व्यापलें आणि सीरिया, इराक व इराण हे प्रदेशही नवीन आरबी साम्राज्यामध्यें समाविष्ट झाले.

४९

आरबी लोक स्पेनपासून मंगोलियापर्यंतचा प्रदेश जिंकतात

२३ मे, १९३२

इतर कांहीं धर्मांच्या संस्थापकांप्रमाणें महमद हाही पुष्कळशा प्रचलित सामाजिक चालीरीतींविरुद्ध बंड पुकारणारा गृहस्थ होता. त्याच्या आजूबाजूच्या देशांमधील सामान्य जनता किती तरी काळपर्यंत अनियंत्रित सत्ताधीश राजे आणि त्यांच्याइतकेच अनियंत्रित आणि अधिकाराच्या उन्मादानें भरलेले धर्मगुरू, यांच्या जुलुमाखालीं पिचून निघालेली होती. त्यामुळें महमद उपदेशीत असलेल्या धर्मांतील साधेसुधेपणा आणि त्याच्यांतील व्यक्तिस्वातंत्र्य व समता यांचा आस्वाद, यांमुळें त्या धर्माचा त्या लोकांच्या मनावर अनुकूल परिणाम झाला. जुन्या जमान्याला हे लोक कंटाळलेले असून नव्याचा स्वीकार करावयाला त्यांची मनोभूमि अगदीं तयार झालेली होती. इस्लामधर्मानें त्यांना नवा जमाना प्राप्त करून दिला आणि त्यांना तो हितकरही वाटला; कारण त्यामुळें त्यांच्यामधील कितीएक जुन्या अनिष्ट रूढी नष्ट झाल्या आणि कितीएक दृष्टींनीं त्यांच्या स्थितींत सुधारणा झाली. जिच्यामुळें सर्वसामान्य जनतेची पिळणूक बऱ्याचशा मोठ्या प्रमाणांत नाहींशी व्हावी, अशी मोठी सामाजिक क्रांति कांहीं इस्लाम-धर्माच्या मागोमाग घडून आली नाहीं. परंतु मुसलमानांच्यापुरती तरी ही पिळणूक इस्लामधर्मानें अवश्य कमी केली आणि आपण सर्व एका मोठ्या प्रबळ कुटुंबाचे घटक आहोंत, अशा प्रकारची भावना या धर्माच्या लोकांच्या मनात उत्पन्न झाली.

आणि मग आरबी लोक विजयामागून विजय मिळवीत पुढें चालले. कितीएकदां तर लढल्याशिवायच पुष्कळ प्रदेश त्यांनीं जिंकले. त्यांच्या पैगंबराच्या मृत्यूपासून पंचवीस वर्षांच्या आंतच त्यांनीं एका बाजूला इराण, सीरिया आणि आर्मिनिया हे सबंध देश आणि मध्य आशियाचा थोडासा भाग हे प्रदेश कबजांत घेतले आणि दुसरीकडे पाश्चिमेस सबंध ईजिप्त देश आणि उत्तर आफ्रिकेचा कांहीं भाग त्यांच्या कबजांत आला. ईजिप्त देश त्यांच्या हातांत पडावयाला त्यांना जवळंजवळ कांहींच परिश्रम पडले नाहींत. कारण रोमन साम्राज्याकडून होणारी पिळणूक आणि निरनिराळ्या ख्रिस्ती धर्मपंथीयांमधील झगडे, यांमुळें ईजिप्त देश सर्वांत अधिक त्रस्त झालेला होता. आरबी लोकांनीं ॲलेक्झांड्रिया येथील ग्रंथालय जाळून टाकलें अशी एक कथा प्रचलित आहे. परंतु ही गोष्ट खोटी आहे असेंच आतां सिद्ध होत आहे. आरबी लोकांची ग्रंथांवर इतकी मोठी भक्ति होती, कीं त्यांच्या हातून हा असला रानटी अत्याचार होणेंच शक्य नाहीं. उलटपक्षीं, खरा प्रकार बहुधा असा असावा, कीं कॉन्स्टान्टिनोपलचा बादशहा थिओडोसिअस–याच्याबद्दल मागें थोडेंसें मीं तुला सांगितलें आहे– यानें हें ग्रंथालय, निदान त्यांतला कांहीं भाग जाळण्याचें दुष्कृत्य केलें. त्या ग्रंथालयापैकीं कांहीं भाग पुष्कळ पूर्वी ज्यूलिअस सीझरनें ॲलेक्झांड्रियाला वेढा घातला त्याच वेळीं नष्ट करून टाकण्यांत आला होता. जुन्या ग्रीक पौराणिक कथा आणि ग्रीक तत्त्वज्ञान यांबद्दलचे ग्रीक भाषेंतील मूर्तिपूजावादी ग्रंथ थिओडोसिअसला मुळींच पसंत नव्हते; इतकें त्याचें ख्रिस्ती धर्मप्रेम अत्यंत कडवें होतें. त्यामुळें त्यानें आपल्या स्नानगृहांतील पाणी तापविण्याकरितां ॲलेक्झांड्रियाच्या ग्रंथालयांतील ग्रंथांचा उपयोग केला असें सांगतात.

आरबी लोक पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे सारखे पसरतच चालले. पूर्वेकडे हिरात, काबूल आणि बलख यांचा पाडाव करून ते सिंधु नदी आणि सिंधपर्यंत जाऊन पोंचले. परंतु त्याच्यापलीकडे मात्र त्यांनीं हिंदुस्थानमध्यें आंत प्रवेश केला नाहीं आणि पुढें कितीएक शतकें हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांशीं त्यांचे संबंध अत्यंत सख्यत्वाचे होते. पश्चिमेकडे मात्र त्यांचा मोर्चा सारखा पुढेंच जात राहिला. असें सांगतात, कीं त्यांचा एक सेनापति उक्बा (Okba) हा सर्व उत्तर आफ्रिका ओलांडून आज जो देश मोरोक्को म्हणून ओळखला जातो त्याच्या पश्चिम किनाऱ्यावर ॲटलांटिक महासागरापाशीं जाऊन ठेपला. आपल्या मार्गांत समुद्राची ही अडचण पुढें उभी राहिलेली पाहून त्याला फार वाईट वाटलें; तरी पण समुद्रांत जितकें आंत जातां येईल तितका तो घोड्यावरून गेला आणि नंतर मग अत्यंत खिन्नतापूर्वक परमेश्वराला (अल्लाला) म्हणाला, "हे अल्ला, तुझ्या नांवानें जिंकण्यासाठीं मला आतां यापुढें जमीनच शिल्लक राहिली नाहीं, त्याला आता मी काय करूं?"

मोरोक्को आणि आफ्रिका यांमधून मग आरबी लोक वरचा निरुंद समुद्र ओलांडून यूरपमध्यें स्पेनच्या भूमीवर उतरले; या ठिकाणच्या अरुंद सामुद्रधुनीला ग्रीक

लोक प्राचीन काळीं हर्क्युलसचे स्तंभ असें म्हणत असत. ही सामुद्रधुनी ओलांडून जो आरबी सेनापति गेला तो प्रथम जिब्राल्टर येथें उतरला. त्याच्या नांवावरूनच जिब्राल्टर हें नांव निघालेलें आहे. त्याचें नांव तरीक असें असून त्यावरून जिब्राल्टरचें खरें मूळचें नांव जबल-उत्-तरीक – तरीकचा खडक – असें ठेवण्यांत आलें होतें.

स्पेनचा अतिशय जलदीनें पाडाव झाला आणि मग आरबी लोकांचा लोंढा दक्षिण फ्रान्समध्यें घुसला. अशा रीतीनें महमदाच्या मृत्यूपासून सुमारें शंभर वर्षांत आरबी साम्राज्य दक्षिण फ्रान्स व स्पेनपासून थेट उत्तर आफ्रिकेतून सुएजपर्यंत आणि अरबस्तानच्या पलीकडे इराण, मध्य आशिया आणि मंगोलियाची सरहद्द येथपर्यंत पसरलें. एक सिंध सोडून हिंदुस्थानचा मात्र कोणताच भाग त्यात सामील नव्हता. यूरपवर आरबी लोकांचा हल्ला दोन बाजूंनीं चालू होता; एक समोरून कॉन्स्टान्टिनोपलवर आणि दुसरीकडून आफ्रिका-मार्गानें फ्रान्सवर. दक्षिण फ्रान्समध्यें घुसलेल्या आरबी लोकांची संख्या लहान होती आणि शिवाय ते आपल्या जन्मभूमीपासून फार दूर होते. त्यांतच अरबस्तान इकडे मध्य आशियांतील प्रदेश झिंकण्यांत गुंतलेलें होतें. त्यामुळें फ्रान्समधील आरबी सैन्याला घरची फारशी मदतही मिळत नव्हती. इतकें असूनही फ्रान्समध्यें शिरलेल्या आरबी लोकांचें पाश्चिम यूरपमधील लोकांना फार भय वाटलें, आणि त्यांच्याशीं लढा देण्यासाठीं म्हणून पाश्चिम यूरपमधील लोकांचा एक मोठा संघ स्थापन झाला. चार्ल्स मॉर्टेल हा या संघाचा पुढारी असून इ. स. ७३२ मध्यें त्यानें फ्रान्समध्यें टूर्स येथील लढाईंत आरबांचा पराभव केला. या पराजयामुळें सर्व यूरप खंड आरबांच्या ताब्यांत जाण्याचें वांचलें. एका इतिहासकारानें लिहिलें आहे, कीं "जवळजवळ त्यांच्या हातांत आलेलें सर्व जगाचें साम्राज्य आरबी लोकांनीं टूर्सच्या मैदानांत गमाविलें." आरबांचा जर टूर्सच्या लढाईंत जय झाला असता, तर यूरपच्या सर्व इतिहासाला भलतेंच निराळें वळण लागलें असतें यांत मुळींच संशय नाहीं. मग त्यांना रोखून धरायला यूरपमध्यें कोणी राहिलें नसतें आणि त्यांनीं थेट कॉन्स्टान्टिनोपलवर चालून जाऊन पूर्वेकडचें रोमन साम्राज्य आणि वाटेंतलीं सगळीं छोटीं राज्यें नष्ट करून टाकलीं असतीं. खिस्ती धर्माऐवजीं मग इस्लाम हाच सर्व यूरप खंडाचा धर्म झाला असता. आणि दुसरेही कितीएक नानाविध बदल होऊन गेले असते. पण या सगळ्या निव्वळ कल्पनेच्या भराऱ्या आहेत. प्रत्यक्ष आरबांना फ्रान्समध्येंच रोखून धरण्यांत आलें. स्पेनमध्यें मात्र ते पुढें पुष्कळ शतकें राज्य करीत राहिले.

अशा रीतीनें स्पेनपासून मंगोलियापर्यंत आरबी लोकांच्या विजयाचा झेंडा फडकला. आणि वालुकामय प्रदेशांतील भटकणारे हे लोक एका प्रबल साम्राज्याचे प्रतिष्ठित राज्यकर्ते बनले. त्यांना सारासान लोक असें नांव पडलें, तें बहुधा सहारा आणि नशीन या शब्दांवरून, वालुकामय प्रदेशांतील रहिवासी, या अर्थानें पडलें असावें. पण वालुकामय निर्जन प्रदेशांतील या रहिवाशांनीं लौकरच शहरी राहणी


आरबी लोक स्पेनपासून मंगोलियापर्यंतचा प्रदेश जिंकतात
तुर्कस्थान
इराण
अफगाणिस्तान
मध्य आशिया
भारत
हिंदी महासागर
चीन
मंगोलिया

आणि विलास उचलले आणि मोठमोठ्या प्रासादांनीं युक्त अशीं शहरेंही त्यांच्या साम्राज्यांत उदयास आलीं. इकडे दूरदूरच्या देशांमध्यें ते एवढाले विजय मिळवीत होते तरी आपापसांत तंटे करण्याची त्यांची जुनी संवय मात्र अद्याप सुटली नव्हती. शिवाय आतां तर ज्यासाठीं लढावें असा एक प्रकारचा मोठा लग्गाही उत्पन्न झालेला होता. कारण ज्याच्या हातीं अरबस्तानचीं सूत्रें त्याच्या हातांत साऱ्या साम्राज्याचा कारभार, अशीं आतां अवस्था होती. अर्थात् यामुळें खलिफाच्या पदासाठीं वारंवार झगडे होऊं लागले. छोटीं छोटीं भांडणें, कुटुंबाकुटुंबांमधील तंटे, असें करतां करतां यादवीपर्यंत – आपापसांतील युद्धापर्यंत – वेळ येऊन ठेपली. या झगड्यांमधून इस्लाम-धर्मीयांचे दोन मोठे तट पडून दोन धर्मपंथ निर्माण झाले. शिया आणि सुनी हे ते दोन पंथ आजही अस्तित्वांत आहेत.

पहिले दोन श्रेष्ठ खलिफा, अबू बकर आणि उमर यांच्यानंतर लगेचच ही गडबड सुरू झाली. महमदाची मुलगी फातिमा हिचा नवरा अली हा त्यानंतर कांहीं काळपर्यंत खलिफा होता. परंतु त्याच्या अमदानींत एकसारखे झगडे चालू होते. शेवटीं अलीचा खून झाला. आणि कांहीं काळानंतर त्याचा मुलगा हुसेन आणि त्याचें सारें कुटुंब यांची करबलाच्या मैदानांत कत्तल करण्यांत आली. मुसलमान लोक, विशेषतः शियापंथीय मुसलमान, मोहरमच्या महिन्यांत करबला येथील याच दुःखकारक घटने-बद्दल सालोसाल शोकनिदर्शन करीत असतात.

कांहीं काळानें मग खलिफा हा अनियंत्रित सर्वसत्ताधीश राजाच बनला. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, निवडणूक यांचा आतां त्याच्या बाबतींत कांहीं मागमूस राहिला नाहीं. तत्कालीन इतर अनियंत्रित राजपुरुषांमध्यें आणि त्याच्यांत आतां कांहींच अंतर राहिलें नाहीं. तत्त्वतः अजूनही इस्लामधर्माचा प्रमुख ... 'सद्धर्मीयांचा सरदार' (अमीर उल् मोमनीन) म्हणून तो होताच. परंतु ज्या इस्लामधर्माचे मुख्य संरक्षक म्हणून हे राज्यकर्ते समजले जात होते, त्या इस्लामधर्माचाच कित्येकदां त्यांनीं अवमान केल्याचें आढळून येतें.

सुमारें शंभर वर्षें खलिफापद महमदाच्याच घराण्याची एक शाखा उम्मेया या नांवानें प्रसिद्ध असलेली होती, त्या शाखेच्या हातीं राहिलें. दमास्कस ही त्यांनीं आपली राजधानी केली; आणि मग हें प्राचीन शहर राजप्रासाद, मशिदी, कारंजीं आणि चबुतरे यांच्या योगानें मोठें शोभिवंत होऊन गेलें. दमास्कसच्या पाणी-पुरवठ्याच्या व्यवस्थेची त्या काळीं मोठीच प्रख्याति होती. या काळांत आरबी लोकांनीं एक स्वतंत्र प्रकारची शिल्परचना निर्माण केली. ती जगांत सारासनी लोकांची शिल्प-रचना म्हणून प्रसिद्ध आहे. या पद्धतींत नक्षीकामाला विशेषसें स्थान नाहीं. तर साधे-पणा, भव्यपणा, रमणीयता यांचा त्यामध्यें आविष्कार आहे. या सर्व शिल्परचनेच्या पाठीमागें आधारभूत अशी मध्यवर्ती कल्पना अरबस्तान आणि सीरियामधील डौलदार अशा खजुरीच्या वृक्षांची आहे. त्यामधील त्या कमानी व मेहेरपी, ते स्तंभ, ते मनोरे,

ते घुमट, ते बुरूज पाहिले म्हणजे खजुरीच्या वृक्षांच्या मेहेरंपी, कमानी आणि घुंमटाकृति शाखासमूह, यांचेंच चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें.

ही शिल्परचना पुढें हिंदुस्थानांतही आली. परंतु येथें तिच्यावर हिंदी कल्पनांचा पुष्कळ परिणाम होऊन येथें एक निराळीच मिश्र शिल्परचना निर्माण झाली. सारासनी शिल्पकलेचे अत्यंत उत्कृष्ट नमुने स्पेनमध्यें आजही पाहावयाला सांपडतात.

संपत्ति व साम्राज्य यांच्याबरोबर विलासभोग, खेळ आणि विलासोपयोगी कला याही आल्या. घोड्यांच्या शर्यती हा आरबी लोकांचा एक मोठा आवडीचा, करमणुकीचा विषय होता. तसेंच पोलो, शिकार आणि बुद्धिबळें यांचीही त्यांना आवड होती. आणि शहरी दिमाखदार लोकांमध्यें संगीताचें, विशेषतः गायनाचें वेडच पसरलें होतें. राजधानीमध्यें गायक-गायिका, आणि त्यांच्या पाठीमागचे साथीदारांचे, साजिंद्यांचे तांडे आणि त्यांच्याभोंवतालीं घुटमळणारांचे घोळके यांचा नुसता सुळसुळाट होऊन गेला होता.

आणखी एक जो फार मोठा बदल घडून आला तो मात्र अतिशय खेदकारक. तो म्हणजे स्त्रियांच्या दर्जामध्यें व परिस्थितीमध्यें घडून आलेला फरक. आरबी लोकांमध्यें स्त्रिया पडदा वापरीत नसत. समाजांतून दूर एकीकडे कोंडलेल्या अशाही त्या राहत नसत. सार्वजनिक ठिकाणीं, समाजामध्यें त्या हिंडत-फिरत असत, माशिर्दीत जांत असतं, व्याख्यानाला हजर राहतं असत ; एवढेंच नव्हे, तर स्वतःही व्याख्यानें देत असत. परंतु एक पूर्वेकडील रोमचें साम्राज्य, आणि दुसरें इराणचें साम्राज्य अशीं जीं दोन प्राचीन साम्राज्यें आरबांच्या दोन्ही बाजूंना होतीं तीं जिंकल्यानंतर त्या साम्राज्यामधल्याच पुष्कळशा चालीरीतींचें अधिकाधिक अनुकरण करण्याकडे आरबांची प्रवृत्ति झाली. त्यांपैकीं एका साम्राज्याचा त्यांनीं पराभव केला होता. एक तर पार नष्टच करून टाकलें होतें. परंतु त्या दोन्ही साम्राज्यांतील कित्येक अनिष्ट चालींना आरब लोक स्वतःच बळी पडले. कॉन्स्टान्टिनोपल आणि इराण यांमधील उदाहरणामुळेंच आरबी लोकांमध्यें स्त्रियांना समाजापासून दूर एकांतांत ठेवण्याची पद्धति रूढ झाली असें म्हणतात. हळूहळू अंतःपुराची पद्धति सुरू झाली आणि स्त्री व पुरुष यांचें सामाजिक मीलन कमी कमी प्रमाणावर होऊं लागलें. दुर्दैवानें स्त्रियांना पुरुषांपासून अलग ठेवणें हें इस्लामधर्मीय समाजाचें एक वैशिष्ट्यच होऊन बसलें आणि मुसलमान हिंदुस्थानांत आल्यानंतर हिंदुस्थानांतही त्यांच्यापासून हा धडा घेण्यांत आला. अजूनसुद्धां कांहीं लोक हा रानटीपणा चालू देतात, हें पाहून मला आश्चर्याचा धक्का बसून चीड येते. बाहेरच्या जगापासून पार तोडून टाकलेल्या अशा पडद्यांतील स्त्रियांचा विचार मनांत आला कीं माझ्या डोळ्यांपुढें तुरुंग किंवा कोंडवाडा अगर प्राणिसंग्रहालय यांचें दृश्य उभें राहतें. ज्या देशांतील अर्धी लोकसंख्या एक प्रकारच्या तुरुंगांत डांबून कोंडून ठेवलेली आहे, त्या देशाची प्रगति व्हावी तरी कशी ?

मोठी आनंदाची गोष्ट आहे, कीं हिंदुस्थानांत आतां पडदा झपाट्यानें टाकून देण्यांत येत आहे. या भयंकर दडपणापासून खुद्द मुसलमान समाजसुद्धां पुष्कळ अंशीं आपली सोडवणूक करून घेत आहे. तुर्कस्तानमध्यें कमालपाशानें पडदा अजीबात नाहींसा करून टाकला असून ईजिप्तमध्येंही तो झपाट्यानें नाहींसा होत आहे.

आणखी एक गोष्ट सांगून हें पत्र पुरें करतों. आरबी लोक हे त्यांच्या जागृतीच्या काळाच्या सुरुवातीला, आपल्या धर्माविषयींच्या श्रद्धेनें विशेषच भारले गेले होते. परंतु जात्या ते परमतसहिष्णु लोक असून धर्माच्या बाबतींतील त्यांच्या नेमस्त वृत्तीचीं अगणित उदाहरणें आढळून येतात. जेरुसलेममध्यें खलिफा उमरनें तर धर्म-विषयक सहिष्णुतेचा विशेषच अवलंब केला होता. स्पेनमध्यें ख्रिस्ती लोकांची संख्या फार मोठी असून त्यांना तेथें संपूर्ण धर्ममतस्वातंत्र्य होतें. हिंदुस्थानांत आरबी लोकांचें राज्य सिंधशिवाय इतरत्र कोठेंच केव्हां नव्हतें; परंतु हिंदुस्थानशीं त्यांचे संबंध वारंवार येत आणि दोन्ही देशांमध्यें पूर्ण सख्यत्वाचे संबंध होते. एवढेंच नव्हे, तर या काळच्या इतिहासांतील सर्वांत अधिक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली, तर एका बाजूला आरबी मुसलमानांची धार्मिक सहिष्णुता आणि दुसऱ्या बाजूला यूरपांतील ख्रिस्ती लोकांची धार्मिक असहिष्णुता हें परस्परविरोधी दृश्य होय.

५०

बगदाद आणि हरून-अल्-रशीद

२७ मे, १९३२

दुसऱ्या देशांकडे पुन्हा वळण्यापूर्वी आरबी लोकाचीच गोष्ट जरा आणखी पुढें चालवूं या.

मागच्या पत्रांत मीं तुला सांगितलें, कीं खलिफाचें पद पहिलीं सुमारें शंभर वर्षें-पर्यंत महंमद पैगंबराच्याच घराण्याच्या उम्मैया नांवाच्या शाखेकडे राहिलें. दमास्कस येथें त्यांनीं आपली राजधानी केली होती आणि त्यांच्या अमदानींत आरबी मुसलमानांनीं इस्लाम धर्माचा झेंडा दूरवर चोहोंकडे फडकविला. दूरदूरचे देश तिकडे ते जिंकून घेत होते. परंतु इकडे घरीं मात्र आपसांत झगडत होते. आणि त्यांच्यामध्यें वारंवार यादवी माजून राहत होती. शेवटीं महंमदाच्याच घराण्याच्या दुसऱ्या एका शाखेनें उम्मैया घराण्याला उलथून टाकलें. हें घराणें महंमदाचा चुलता आब्बास याच्यापासूनचें असल्यामुळें त्यांना आब्बासी म्हणत असत. उम्मैया लोकांनीं जीं अनेक क्रूर कृत्यें केलीं होतीं त्यांचा नायनाट करून दुष्टांचें शासन करण्यासाठीं म्हणून हें आब्बासी घराणें पुढें आलें

होतें. परंतु एकदां त्यांना जय मिळाल्यानंतर क्रूरपणा आणि कत्तली या बाबतींत त्यांनीं उम्मैया घराण्यावरहीं ताण केली. उम्मैया घराण्यांतील माणसांना जेथून तेथून शोधून काढून त्यांचा रानटीपणें त्यांनीं वध केला.

अशा रीतीनें इ. स. ७५० मध्यें आब्बासी खलिफाच्या अमलाला सुरुवात झाली. आणि तो किती तरी दीर्घ काळपर्यंत चालू राहिला. त्यांच्या अमलाच्या सुरुवातीचा हा सारा प्रकार मोठासा श्रेयस्कर किंवा सुखदायक नव्हता हें खरें. परंतु आब्बासी खलिफाची अमदानी आरबांच्या इतिहासांत एकंदरींत बरीच हितकर आणि वैभवाची गेली यांत शंका नाहीं. आता त्यांच्या अमदानींत उम्मैयांच्या वेळेपेक्षां घडामोडी मात्र फार मोठ-मोठ्या झाल्या. अरबस्तानांतील यादवीमुळें सारें आरबी साम्राज्य हादरून डळमळूं लागलें. घरीं अरबस्तानांत आब्बासी लोकांचा जय झाला. परंतु तिकडे स्पेनमध्यें राज-प्रतिनिधि (गव्हर्नर) अमीर होता उम्मैयाच्या घराण्यांतला. त्यानें आब्बासी घराण्यां-तील खलिफांचा अधिकार मानण्याचें नाकारलें. उत्तर आफ्रिका पण—याच प्रदेशाला पूर्वी इफ्रिकियाची सुभेदारी असें म्हणत असत—त्यानंतर लौकरच जवळजवळ स्वतंत्र झाली. ईजिप्तनेंही तोच मार्ग स्वीकारला, एवढेंच नव्हे, तर त्या देशांत स्वतंत्रच खलिफाची स्थापना करण्यांत आली. ईजिप्त देश जवळच असल्यामुळें त्याला पुनः पुनः दटावणी दाखवून साम्राज्याचा अधिकार मान्य करायला लावण्याचा प्रयत्न करतां येत असे, आणि मधूनमधून असा प्रयत्न यशस्वी पण होई. परंतु इफ्रिकियाला कोणींच केव्हां हात लावला नाहीं आणि स्पेन देश तर इतका दूर होता, कीं त्याच्यापर्यंत हात पोंचणेंच शक्य नव्हतें. अशा रीतीनें आब्बासी खलिफांची अमदानी सुरू झाल्यानंतर आरबी साम्राज्याचे तुकडे पडून गेले. खलिफा कांहीं मग साऱ्या मुसलमानी साम्राज्याचा प्रमुख राहिला नाहीं; किंवा तो अमीरुल मोमनीन म्हणजे सगळ्या धर्मनिष्ठ मुसलमानांचा नायकही राहिला नाहीं. इस्लामधर्मीयांमध्यें आतां एकी राहिली नाहीं. स्पेनमधील आरब आणि आब्बासी लोक यांच्यामध्यें तर एकमेकांबद्दल इतका द्वेष वाढला, कीं परस्परांवरील संकटांमुळें परस्परांना उलट आनंदच वाटूं लागला.

हें सगळें खरें असलें, तरीही आब्बासी खलिफा हे फार मोठे राज्यकर्ते होऊन गेले आणि जगांतील एकंदर साम्राज्यांच्या मानानें पाहतां त्यांचें साम्राज्यही श्रेष्ठ होऊन गेलें. मात्र ज्या श्रद्धेच्या आणि तेजाच्या बळावर आरबी लोक मोठमोठाले पर्वत ओलांडून वणव्यासारखे चोहोंकडे पसरले, ती त्यांची मूळची श्रद्धा आणि तें मूळचें तेज मात्र आतां त्यांच्यामध्यें शिल्लक राहिलें नाहीं. त्यांचा साधेपणाही नाहींसा झाला; लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचाही मागमूस राहिला नाहीं; आणि ज्या इराणी शहेनशहांचा आरबांनीं यापूर्वी पहिल्या पहिल्या दिवसांत पाडाव केला होता, त्या शहेन-शहांत किंवा कॉन्स्टान्टिनोपलच्या बादशहांत आणि सद्धर्मानुयायाच्या या नायकांत, अमीरुल मोमनीनमध्यें, आतां कांहींच फरक राहिला नाहीं. महंमद पैगंबरच्या काळच्या सुरुवातीसुरुवातीच्या आरब पिढ्यांमध्यें जें चैतन्य होतें आणि जी शक्ति होती, ती राजे

लोकांच्या सैन्यांतल्यापेक्षां अगदीं वेगळ्या प्रकारची होती. आपल्या वेळच्या सगळ्या जगांत त्यांचा दर्जा कांहीं अपूर्व होता आणि त्यांच्या अमोघ मोर्चापुढें राजे लोक आणि त्यांचीं सैन्यें पार कोलमडून पडलीं. सामान्य जनता या राजे लोकांना विटलेली होती आणि आरबी लोकांच्यामुळें एक सामाजिक क्रांति होऊन आपल्याला चांगले दिवस येतील अशी त्यांना आशा उत्पन्न झालेली होती.

पण आतां हें गाडें सर्व पालटून गेलें. वालुकामय प्रदेशांत राहणाऱ्या लोकांची वस्ती आतां प्रासादामध्यें होऊं लागली आणि खजुराऐवजीं नानाविध रुचकर, स्वादिष्ट आणि मनोहर पक्वान्नें त्यांच्या खाण्यांत येऊं लागलीं. आतां ते चांगले सुखांत रंगले, तेव्हां आतां त्यांनीं सामाजिक क्रांतीची आणि सामान्य जनतेच्या राहणींत फरक घडविण्याची काळजी कशाला करावी? उलट, प्राचीन साम्राज्यांच्या ऐश्वर्योपभोगापेक्षांही अधिक ऐश्वर्योपभोग घेण्यास त्यांनीं सुरुवात केली. आणि त्यांच्या कितीएक अनिष्ट चाली त्यांनीं उचलल्या. स्त्रियाना पडद्याआड समाजापासून दूर ठेवण्याची चाल ही यांपैकींच एक होती, हें मीं तुला सांगितलेंच आहे.

यानंतर राजधानी दमास्कस सोडून इराकमध्यें बगदाद येथें गेली. राजधानीच्या या बदलावरून सुद्धां आरबी लोकांच्या जीवनक्रमांत कशा प्रकारचा बदल होत चालला होता याची ओळख पटेल. कारण बगदाद शहर हें इराणच्या शहांचें उन्हाळ्यांतील हवा खाण्याचें ठिकाण होतें. शिवाय, बगदाद शहर दमास्कसच्या मानानें यूरपला दूर होतें. त्यामुळें यापुढें आब्बासी खलिफांची नजर यूरपपेक्षां आशियाकडेच अधिक वळलेली राहिली. त्यानंतरही कॉन्स्टान्टिनोपल जिंकण्याचे आणखी पुष्कळ प्रयत्न झाले आणि यूरपियन राष्ट्रांशीं युद्धेंही पुष्कळ झालीं. परंतु हीं युद्धें सगळीं आत्मसंरक्षणाच्या स्वरूपाचीं होतीं. नवनवे देश पादाक्रांत करण्याचे दिवस आतां निघून गेले होते आणि आब्बासी खलिफा आपलें राहिलें होतें तेवढेंच साम्राज्य संघटित करून टिकवून धरण्याची धडपड करीत होते. अर्थात् स्पेन आणि आफ्रिका वगळून सुद्धां हें साम्राज्य कांहीं लहानसहान नव्हतें.

बगदाद शहर! नाहीं आठवत तुला त्यांतला तो हरून-अल्-रशीद, ती शहेराजादी आणि आरबी भाषेंतील त्या सुरस आणि नवलपूर्ण गोष्टी? आब्बासी खलिफांच्या अमलांत बगदाद शहराला यापुढें अरेबियन नाइट्समध्यें वर्णन केलेल्या बगदाद शहराचें स्वरूप प्राप्त झालें. आतां तें राजप्रासाद, सार्वजनिक कचेऱ्या, शाळा आणि विद्यालयें, मोठमोठीं दुकानें, राखीव हिरवळीचीं मैदानें आणि उद्यानें यांनीं गजबजलेलें एकं प्रचंड शहर झालें. तेथल्या व्यापाऱ्यांचा पश्चिमेकडील आणि पूर्वेकडील देशांशीं फारच विशाल प्रमाणावर व्यापार सुरू झाला. साम्राज्याच्या दूरदूरच्या प्रांतांशींही सारखा निकट संबंध राहावा म्हणून अगणित अधिकारी वर्गांचें जाळें निर्माण झालें, आणि राज्यकारभाराचें काम रोजरोज अधिकाधिक बिकट होत गेल्यामुळें त्याची निरनिराळ्या खात्यांत विभागणी करावी लागली. टपाल नेण्या-आणण्याची अत्यंत

चोख व्यवस्था करण्यांत येऊन साम्राज्यांतील कोनाकोपऱ्यांतील ठिकाणांचा सुद्धां राजधानीशीं चांगला संबंध राहील, अशी व्यवस्था करण्यांत आली. इस्पितळांची संख्याही पुष्कळ झाली. जगांतून जिकडून तिकडून प्रवासी लोक, विशेषतः विद्वान् लोक, विद्यार्थी आणि कलावंत बगदादला भेट देऊं लागले; कारण खलिफाकडून विद्वानांचा आणि कलावंतांचा चांगल्या प्रकारें आदरसत्कार होतो, अशी जगभर ख्याति झाली होती.

खलिफा हाही स्वतः अतिशय विलासोपभोगांत आणि थाटामाटांत राहूं लागला; त्याच्या सभोंवार गुलामांचा तांडा असे आणि त्याच्या कुटुंबीय स्त्रिया अंतःपुरांत पडद्याआड असत. आब्बासी साम्राज्याचें हें बाहेरचें वैभव हरून-अल्-रशीदच्या अमदानींत इ. स. ७८६ पासून ८०९ पर्यंत अगदीं कळसाला पोंचलें. पूर्वेकडून चीनच्या बादशहाच्या दरबाराचे आणि पश्चिमेकडून शार्लमेन बादशहाच्या दरबारचे वकील हरूनच्या दरबारांत येऊं लागले. आरबांच्या कबजांतील स्पेन देश तेवढा सोडला, तर बाकीच्या सर्व युरोपच्या मानानें बगदाद शहर आणि आब्बासी साम्राज्य हें राज्यकारभाराचें शास्त्र, व्यापार आणि विद्यावृद्धि यांमध्यें किती तरी पुढारलेलें होतें.

आब्बासी राज्याचा काळ आम्हा लोकांना विशेष कौतुकाचा वाटतो यांचें कारण शास्त्रांच्याबद्दल त्या काळांतील लोकांच्या मनांत एक नवीनच प्रकारची जाणीव – जिज्ञासा व आपुलकी – उत्पन्न झाली होती हें होय. आधुनिक जगांत आज शास्त्राचें स्थान फारच मोठें आहे हें तुला माहीत आहे. शास्त्राचे आपल्यावर फारच उपकार आहेत. चित्त शांत करून एका ठिकाणीं बसावयाचें आणि हवें असेल तें घडो म्हणून प्रार्थना करीत राह्यचें असला मार्ग शास्त्राचा नाहीं. तर शास्त्र जें कांहीं घडतें तें कां व कसें, याच्या शोधाची खटपट करीत असतें. शास्त्र प्रयोग करतें. पुनः पुनः प्रयत्न करतें. केव्हां त्याला यश येतें, केव्हां त्याला अपेश येतें; आणि अशा रीतीनें कणाकणानें शास्त्र मानवी ज्ञानांत भर घालीत असतें. प्राचीन काळच्या किंवा मध्ययुगीन जगापेक्षां आपलें आजचें हें जग फारच निराळें आहे. हा जो एवढा मोठा फरक पडलेला आहे, त्याचें श्रेय मुख्यतः शास्त्राला आहे; कारण आजच्या जगाची सर्व निर्मिति शास्त्रानें केलेली आहे.

प्राचीन काळच्या लोकांमध्यें, ईजिप्तमध्यें काय, चीनमध्यें काय किंवा हिंदुस्थानमध्यें काय, कोठेंच अशी शास्त्रीय पद्धति अवलंबिलेली आढळून येत नाहीं. प्राचीन ग्रीसमध्यें थोडासा तिचा अंश आढळतो. परंतु रोममध्यें पुन्हां तिचा अभाव होतो. आरबी लोकांच्या ठिकाणीं मात्र ही शास्त्रीय संशोधनाची उपजत प्रवृत्ति होती. यासाठीं आधुनिक शास्त्रांचे ते जनकच समजले पाहिजेत. वैद्यक, गणित, अशांसारख्या कांहीं विषयांत हिंदुस्थानकडून त्यांनीं पुष्कळ शिकून घेतलें. पुष्कळ हिंदी विद्वान् आणि गणितज्ञ बगदादला येत असत. पुष्कळ आरबी विद्यार्थी तक्षशिलेला जात असत. तेथें त्या काळींही मोठें विद्यापीठ असून वैद्यकीचें अध्यापन तेथें विशेष चांगल्या प्रकारें

होत असे. वैद्यकाच्या आणि इतर विषयांच्या संस्कृत ग्रंथांचीं आरबी भाषेंत मुद्दाम भाषांतरें करण्यांत आलीं. दुसऱ्या पुष्कळ गोष्टी—उदाहरणार्थ, कागद तयार करण्याची कला—आरबी लोक चीनपासून शिकले. परंतु इतरांपासून मिळाविलेल्या या ज्ञानाच्या पायावर त्यांनीं आपलें स्वतःचें संशोधन चालू केलें आणि पुष्कळ महत्त्वाचे शोध लावले. जगांतील पहिली दुर्बीण आणि होकायंत्र आरबी लोकांनीं तयार केलीं. वैद्यकामध्यें आरबी वैद्य आणि शस्त्रक्रियाविशारद साऱ्या यूरपभर ख्याति पावलेले होते.

आरबी लोकांच्या या बौद्धिक हालचालींचें मुख्य केंद्र अर्थातच बगदाद शहर हेंच होतें. पश्चिमेकडील स्पेनमधील कार्डोबा किंवा कोर्डोबा शहर हें दुसरें एक असें केंद्र होतें. आरबी जगांत दुसरींही अनेक विद्यापीठांचीं स्थानें असून त्या ठिकाणीं बौद्धिक जीवनाचा उत्कर्ष झालेला आढळतो. उदाहरणार्थ, कैरो किंवा 'अल्काहिरा' (म्हणजे विजयी), बसरा आणि कूफा या ठिकाणीं अशीं विद्यापीठें होतीं. पण या सर्व सुप्रसिद्ध शहरांच्यावर बगदादचें वैभव होतें. इस्लामची राजधानी, इराकचा डोळा, साम्राज्याचें अधिष्ठान, सौंदर्यविद्या आणि कला यांचें माहेरघर असें त्याचें एका आरबी इतिहासकारानें वर्णन केलें आहे. बगदादची लोकसंख्या वीस लक्ष असे. म्हणजे तें शहर आजच्या आपल्या मुंबई किंवा कलकत्ता या शहरांपेक्षांही मोठें होतें.

छोटेमोठे पायमोजे वापरण्याची पद्धति बगदादमधील श्रीमान् लोकांत सुरू झाली, हें वाचून तुला विशेष गंमत वाटेल. त्यांना ते 'मोजे' म्हणत. आणि आपला हिंदुस्थानीमधील शब्द याच शब्दापासून निघाला असला पाहिजे. त्याचप्रमाणें फ्रेंच भाषेंतील शेमीस शब्दही आरबी लोकांच्या कमीस या सदरावाचक शब्दापासूनच निघालेला आहे. कमीस आणि मोझा या दोन्ही वस्तू आरबांकडून बायझांटियममध्यें गेल्या आणि तेथून त्यांचा यूरपमध्यें प्रसार झाला.

आरब लोक हे पहिल्यापासूनच मोठे प्रवासप्रिय होते. दूरवर समुद्रपार प्रवास करीत राहून आफ्रिकेमध्यें, हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर मॅलेशियामध्यें, एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष चीनमध्येंही त्यांनीं वसाहती केल्या होत्या. त्यांच्यांतील एक सुप्रसिद्ध प्रवासी अल्बेरुणी हा हिंदुस्थानांत येऊन गेला होता. ह्यूएन चँगप्रमाणें त्यानेंही आपल्या प्रवासाचें वर्णन लिहून ठेवलेलें आहे.

आरबी लोक हे मोठे इतिहासलेखकही होते. त्यांच्याबद्दलची माहिती आपल्याला त्यांनीं स्वतःच लिहिलेल्या इतिहासाच्या व इतर ग्रंथांमधून मिळते. तसेंच ते लोक किती सुंदर गोष्टी आणि अद्भुतरमणीय कथा लिहीत असत, हें तर कोणाला सांगावयालाच नको. हजारों, लाखों लोक असे आढळतील, कीं ज्यांनीं अब्बासी घराण्यांतील खलिफांचें काय किंवा त्यांच्या साम्राज्याचें काय नांव सुद्धां कधीं ऐकलें नसेल; परंतु 'अलिफ्लैला व लैला' उर्फ 'एक हजार आणि एक रात्री' (अरेबियन नाइट्स) मधील ती रहस्यमय आणि अद्भुतरमणीय बगदाद नगरी—तिचें नांव ऐकलें नसेल असा क्वचितच कोणी असेल. कल्पनासाम्राज्यें हींच वास्तविक साम्राज्यां-

पेक्षां पुष्कळदां अधिक दीर्घायुषी आणि मनुष्यांच्या चांगल्या परिचयाचीं असतातसें म्हटलें पाहिजे.

हरून-अल्-रशीदच्या मरणानंतर लौकरच आरबी साम्राज्यावर दुर्दैव ओढवलें. राज्यांत दंगेधोपे होऊं लागले, अव्यवस्था माजली, निरनिराळ्या प्रांतांचे नबाब स्वतःच आपापलीं राजघराणीं स्थापूं लागून साम्राज्यांतले वेगवेगळे भाग स्वतंत्र व अलग होऊं लागले. खलिफांची सत्ता दुर्बळ होत गेली; आणि शेवटीं इतकी अवस्था झाली, कीं खलिफांचा अम्मल फक्त बगदाद शहर आणि त्यामोंवतालचीं कांहीं गांवें एवढ्यापुरताच शिल्लक राहिला. एका खलिफाला तर त्याच्याच शिपाई लोकांनीं राजवाड्यांतून ओढून बाहेर काढलें व त्याचा वध केला. त्यानंतर बगदादमध्यें राहून कांहीं जबरदस्त लोक राज्य करूं लागले आणि खलिफाला त्यांनीं आपल्या ताटाखालचें मांजर केलें.

दरम्यान इस्लामी धर्माचें ऐक्य ही एक निव्वळ पुराणांतली कथाच होऊन राहिली. मध्य आशियांत खोरासानपर्यंत जिकडे तिकडे स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं. आणि अतिपूर्वेपासून पश्चिमेकडे भटकणाऱ्या टोळ्या अजूनही येतच राहिल्या. मध्य आशियांत मूळचे जे तुर्क लोक होते त्यांनीं मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली आणि येऊन बगदाद शहराचा कब्जा घेंतला. त्यांना **सेल्जुक तुर्क** असें नांव आहे. त्यांनीं कॉन्स्टान्टिनोपलॅच्या बादशाही बायझांटियन सैन्यांचा अगदीं धुळधाण पराभव केलेला पाहून सारें यूरप खंड चकित झालें. कारण यूरप खंडांतल्या लोकांना वाटत होतें, कीं आरब आणि मुसलमान लोकांची शक्ति आतां संपली असून दिवसेंदिवस ते अधिकाधिक दुर्बळ होऊं लागले आहेत. आरब लोकांची पुष्कळच अवनति झालेली होती, हें खरेंच आहे. परंतु त्यांच्यामागून या सेल्जुक तुर्कांनीं रणांगणावर येऊन इस्लामधर्माचा झेंडा हातांत घेतला आणि यूरप खंडाला त्या झेंड्याचा स्वीकार करण्याचें त्यांनीं आव्हान दिलें.

आपण लौकरच पाहूं आतां यापुढें, कीं या आव्हानाचा लगेच स्वीकार करून ख्रिस्ती राष्ट्रांनीं मुसलमानी राष्ट्रांशीं धर्मयुद्धें करण्यासाठीं व आपली पवित्र धर्मभूमि जेरुसलेम ही जिंकून परत घेण्यासाठीं आपसांमध्यें संघटना केली. शंभरांहून अधिक वर्षें सीरिया, पॅलेस्टाइन आणि आशिया मायनर यांच्या स्वामित्वाबद्दल ख्रिस्ती लोक आणि इस्लामधर्मीय लोक यांच्यामध्यें सतत युद्ध झालें; त्यांत दोघांचीही शक्ति क्षीण झाली. आणि या देशांतील इंचन् इंच भूमि मानवी रक्तानें ओलीचिंब होऊन गेली. त्या देशांतील भरभराटीला आलेल्या शहरांतील व्यापारधंदा बुडाला, त्यांचें महत्त्व नष्ट झालें आणि धनधान्यांनीं प्रफुल्लित अशा शेतांच्या जागीं रान माजलें.

असें हें या दोन धर्मांच्या लोकांचें युद्ध झालें. परंतु त्या युद्धाचा शेवट होण्याच्या आधींच तिकडे आशियाच्या पलीकडील बाजूच्या मंगोलिया प्रांतांत चेंगिझखान हा उदयास आला. त्याला जग हादरविणारा मोंगल असें म्हणतात. आणि खरोखरच त्याच्या हातून यूरप आणि आशिया खंडांना चांगलाच हादरा बसावयाचा होता. त्यानें

आणि त्याच्या वंशजांनीं बगदादची आणि त्याच्या साम्राज्याची अखेरची इतिश्री केली. मोंगल लोकांनीं या सुप्रसिद्ध महान् शहराचा नाश करण्याचें कार्य पुरें केलें त्या वेळीं बगदाद शहर म्हणजे धुळीची आणि राखेची नुसती एक रास होऊन राहिली आणि त्यामधील वीस लक्ष लोकांपैकीं बहुतेक सर्वजण मृत्युमुखीं पडले!

बगदाद शहर आतां पुन्हां भरभराटलें असून आज तें इराकची राजधानी आहे. परंतु त्याच्या पूर्वीच्या वैभवाची आतांचें हें शहर म्हणजे नुसती छायाच मात्र आहे. कारण मोंगल लोकांनीं त्याची धुळधाण आणि नाश केल्यावर त्याच्या पूर्ववैभवाला पुन्हा डोकें वर काढणें अशक्यच होऊन गेलें.

५१

उत्तर हिंदुस्थानांत हर्षापासून महमुदापर्यंत

१ जून, १९३२

आरबी किंवा सारासान लोकांचीं कथा मध्येंच सोडून देऊन आपणांला आतां थोडेंसें इतर देशांच्याकडे पाहिलें पाहिजे. आरबी लोकांची सत्ता इकडे वाढत होती, आणि निरनिराळे देश पादाक्रांत करून साऱ्या जगभर पसरल्यानंतर त्यांच्या सत्तेचा ऱ्हासही झाला; या सगळ्या दरम्यानच्या काळांत हिंदुस्थानांत, चीनमध्यें आणि यूरपमधील इतर देशांत कोणत्या घडामोडी चालू होत्या? त्यांपैकीं कांहींचे अगदीं ओझरतें दर्शन आपल्याला आतापर्यंत झालेलें आहे. उदाहरणार्थ, चार्ल्स मार्टेल याच्या नेतृत्वाखालीं यूरपीय राष्ट्रांच्या संयुक्त सैन्यांनीं आरबांचा फ्रान्समध्यें टूर्स येथें इ. स. ७३२ मध्यें केलेला पराभव, आरबी लोकांनीं मध्य आशियाचा केलेला पाडाव किंवा त्यांचें हिंदुस्थानांत सिंधपर्यंत येणें वगैरे. त्यांत प्रथम आतां आपण हिंदुस्थानकडे वळूं या.

कनोजचा राजा हर्षवर्धन हा इ. स. ६४८ मध्यें मरण पावला होता. त्याच्या मृत्यूपासून उत्तर हिंदुस्थानांतील राजकीय अवनति अधिकाधिक स्पष्ट होऊं लागली. वास्तविक हें अवनतीचें बीज त्याच्यापूर्वीच कांहीं काळ मूळ धरूं लागलेलें होतें. हिंदु आणि बुद्धधर्म यांच्यामधील झगड्यामुळें त्याला आणखीच जोर चढत होता. हर्षाच्या अमदानींत बाहेरून मोठ्या वैभवाचा आणि दृढतेचा देखावा दिसला; परंतु तोही कांहीं काळापुरताच होता. त्याच्या मृत्यूनंतर उत्तरेंत किती तरी छोटीं छोटीं राज्यें निर्माण झालीं; थोडा वेळ त्यांनीं अधून मधून वैभवही उपभोगलें; आणि मधून मधून त्यांचे आपापसांत झगडे पण होत राहिले. असें असूनही हर्षानंतरच्या या तीनशें वर्षांच्या काळांतसुद्धां कला आणि वाङ्मय यांचा उत्कर्षच होत राहिला आणि पुष्कळ

सुंदर सार्वजानिक बांधकामें पुरीं झालीं, ही गोष्ट मात्र आश्चर्य करण्यासारखी आहे. भवभूति किंवा राजशेखर यांसारखे विख्यात ग्रंथकार या काळांत होऊन गेले; आणि कितीएक राजेही राजकीय दृष्टीनें नसले, तरी त्यांच्या अमदानींत विद्या आणि कला यांची जी अभिवृद्धि झाली, त्यासाठीं संस्मरणीय असे होऊन गेले. त्यांच्याचपैकीं एक राजा भोज हा तर आदर्श राजाचा देवाप्रमाणें एक वंद्य असा नमुनाच होऊन राहिला आणि लोक त्याला याच दृष्टीनें ओळखतात.

परंतु अधून मधून अशीं कांहीं उज्ज्वल उदाहरणें आढळलीं, तरी एकंदरींत उत्तर हिंदुस्थानचा ऱ्हासच होत चालला होता. दक्षिण हिंदुस्थान पुन्हां एकदां आघाडीवर चमकूं लागलें होतें आणि उत्तरेवर कडी करूं लागलें होतें. पूर्वीच्या एका पत्रांत (पत्र ४४ वें) दक्षिण हिंदुस्थानच्या या काळांतील इतिहासाबद्दल (तेथें उदयास आलेलीं जीं चोल, पल्लव आणि राष्ट्रकूटांचीं राज्यें त्यांच्याबद्दल) थोडेंसें मीं तुला सांगितलें आहे. शंकराचार्यांबद्दल, आपल्या अगदींच लहानशा आयुष्यांत देशभरांतील विद्वान् आणि बिनशिकलेल्या सर्वच लोकांच्या मनाचा त्यांनीं ठाव कसा घेतला आणि बुद्धधर्माला हिंदुस्थानातून जवळजवळ नष्ट करण्याच्या कामीं त्यांना यश कसें आलें, याबद्दलही मीं सांगितलें आहे. परंतु हें कार्य शंकराचार्य करीत होते, त्याच क्षणाला हिंदुस्थानच्या दाराशीं एक नवाच धर्म आंत प्रवेश करण्याच्या हेतूनें उभा ठाकावा आणि पुढें पुराच्या लोंढ्याप्रमाणें त्याचें विजयी आक्रमण या देशावर होऊन येथील प्रचलित समाजव्यवस्था उखडून काढण्याचा त्यानें चंग बांधावा, हा मात्र किती विचित्र योगायोग आहे!

आरबी लोकांना हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत पोंचण्यास फारसा अवकाश लागला नाहीं; हर्ष असतांनाच ते तेथपर्यंत आले. थोडा वेळ तेथेंच थांबून मग त्यांनीं सिंधचा कबजा मिळविला. इ. स. ७१० मध्यें महंमद इब्न कासीम नांवाचा एक अवघ्या सतरा वर्षांचा मुलगा आरबी लष्कराचा सेनापति होता. त्यानें आपल्या सैन्यानिशीं येऊन पश्चिम पंजाबांतील मुलतानपर्यंतचा सिंधु नदीच्या खोऱ्यांतील मुलूख जिंकून घेतला. आरबांनीं हिंदुस्थानचा जो काय मुलूख जिंकला तो एवढाच. त्यांनीं आणखी थोडा नेटानें प्रयत्न केला असता, तर त्यांना आणखीही पुढें जातां आलें असतें. उत्तर हिंदुस्थान दुर्बळ झालेला असल्यामुळें यामध्यें त्यांना कांहींच कठिण गेलें नसतें. तसें पाहिलें तर आरबी लोकांमध्यें आणि त्यांच्या आसपासच्या राजांमध्यें पुष्कळ लढायाही एकसारख्या चालू होत्या; परंतु देश जिंकून घेण्याचा सुसंघटित असा प्रयत्नच आरबी लोकांनीं केला नाहीं. तेव्हां आरबी लोकांनीं सिंध प्रांत जिंकून घेतला ही गोष्ट राजकीय दृष्ट्या कांहीं विशेष महत्त्वाची ठरली नाहीं. कारण हिंदुस्थानवर मुसलमानांचा संपूर्ण विजय व्हावयाला यानंतर किती तरी शतकें लागलीं. परंतु आरबी लोकांशीं हिंदुस्थानांतील लोकांचा जो हा संबंध आला, त्याचे संस्कृतिदृष्ट्या मात्र फार मोठे परिणाम झाले.

आरबी लोकांचें दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदी राजे लोकांशीं, विशेषतः राष्ट्रकूट घराण्याशीं सख्यत्वाचे संबंध होते. पुष्कळसे आरब लोक हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर वसाहत करून राहिले होते; आपल्या वसाहतीमध्यें त्यांनीं मशिदीही बांधल्या होत्या. आरबी प्रवासी आणि व्यापारी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांमध्यें हिंडत असत. पुष्कळच आरबी विद्यार्थी वैद्यकाच्या अध्यापनासाठीं विशेष प्रसिद्ध असलेल्या उत्तरेंतील तक्षशिला येथील विद्यापीठांत येत असत. असें सांगतात, कीं हरून-अल्-रशीदच्या कारकीर्दीत हिंदी विद्वानांना व विद्यांना बगदादमध्यें फार मोठें मानाचें स्थान असे आणि हिंदुस्थानांतील वैद्यकांतील निपुण लोक तेथें रुग्णालयें आणि वैद्यकशास्त्रांच्या शाळा स्थापन करून त्या चालविण्यासाठीं जात असत. संस्कृत-मधील गणित आणि ज्योतिषशास्त्राच्या पुष्कळशा ग्रंथांची आरबी भाषेंत भाषांतरेंही करण्यांत आलीं होतीं.

अशा रीतीनें आरबी लोकांनीं प्राचीन भारतीय आर्यांच्या संस्कृतीपासून पुष्कळच गोष्टी घेतल्या आणि कांहीं थोड्या गोष्टी ते हेलनिक म्हणजे ग्रीक संस्कृतीपासूनही शिकले. आरब लोक म्हणजे जणुं एक ताज्या दमाचा पहिल्यांदांच आखाड्यांत उतरलेला नवाच मानववंश होता. तसाच तो आपल्यां ऐन भरांत आलेला मानववंश होता. म्हणून आपल्या सभोंवतालीं आंढळणाऱ्या सर्व संस्कृतींचा घेतां येईल तेवढा फायदा त्यांनीं घेतला; त्यांच्यापासून शिकतां येईल तें सर्व त्यांनीं शिकून घेतलें. परंतु त्या पायावर त्यांनीं आपलें स्वतःचें असें निराळें कांहीं तरी जरूर निर्माण केलें; तें म्हणजेच सारासनी संस्कृति. जगांतील एकंदर संस्कृतींच्या मानानें पाहतां या संस्कृतीचें आयुष्य फार थोडें ठरलें; परंतु त्या थोड्या काळावर का होईना, या संस्कृतीचा आविष्कार मात्र मोठा प्रभावी आणि तेजस्वी असा झाला; विशेषतः तत्कालीन यूरपच्या मध्ययुगीन परिस्थितीच्या अंधकारमय पार्श्वभूमीवर तर या संस्कृतीचें तेज विशेषच खुलून दिसतें.

आरबी लोकांनीं त्यांचा जो भारतीय आर्य संस्कृति, ग्रीक संस्कृति व इराणी संस्कृति यांच्याशीं संबंध आला, त्यापासून स्वतःचा पुष्कळ फायदा करून घेतला; परंतु हिंदी, इराणी आणि ग्रीक लोकांनीं मात्र आरबांशीं त्यांचा जो हा संबंध आला त्यापासून स्वतःचा विशेष असा कांहींच फायदा करून घेतला नाहीं, हें पाहून मोठें विचित्र वाटतें. त्याचें कारण कदाचित् असें असावें, कीं आरबी-लोक हे नवतारुण्ययुक्त, जोमदार आणि उत्साहानें भरलेले असे लोक होते, तर बाकीचे हे लोक म्हातारपण आलेल्या मानववंशाचे, प्राचीन काळापासून चालत आलेल्या चाकोरीलाच चिकटून राहणारे, आणि कांहीं बदल व्हावा असा फारसा विचारच कधीं मनांत न आणणारे अशा प्रकारचे लोक होते. म्हातारपणाचा एखाद्या व्यक्तीवर जो परिणाम होतो, तोच समाजावर किंवा मानववंशावरही होतो, ही मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे; व्यक्ति काय आणि समाज काय, दोन्ही म्हातारपणामुळें हालचालीमध्यें मंद होतात,

त्यांचा शरीर आणि मन यांच्यामधील लवचिकपणा नाहींसा होतो, त्यांची बुद्धि पुराणप्रिय बनते, नवीनाचें भयच तिला वाटूं लागतें.

तात्पर्य, हिंदुस्थानचा आणि आरबांचा हा असा संबंध पुष्कळ शतकें जरी चालू राहिला, तरी हिंदुस्थानवर कांहीं त्याचा परिणाम झाला नाहीं, किंवा येथें त्यामुळें म्हणण्यासारखे बदलही घडून आले नाहींत. परंतु या एवढ्या काळामध्यें हा जो इस्लामचा नवा धर्म त्याबद्दल हिंदुस्थानांत कांहीं कांहीं माहिती तरी खास येऊन पोंचली असली पाहिजे. आरची मुसलमान देशांत ठिकठिकाणीं येऊन जात होते आणि केव्हां केव्हां कांहीं.लोकांना आपल्या धर्मांची दीक्षाही देत होते. यांत त्यांना त्या काळीं कोणी काहीं आडकाठी केल्याचें आढळत नाहीं, किंवा हिंदुधर्म आणि इस्लाम-धर्म यांच्यामध्यें कांहीं कटकट किंवा झगडाही झालेला आढळून येत नाहीं. पुढच्या काळांत मात्र या दोन धर्मांमध्यें अशी कटकट आणि असे झगडे निर्माण झाल्यावांचून राहिले नाहींत, या दृष्टीनें आधींची ही गोष्ट विशेषच लक्षांत घेण्यासारखी वाटते. इस्लामधर्म अकराव्या शतकांत जेव्हां तरवार हातांत घेऊन विजेत्याच्या थाटानें हिंदुस्थानात आला, तेव्हां मात्र त्याच्याविरुद्ध जोराची प्रतिक्रिया झाली आणि त्यापूर्वीची धर्मविषयक सहनशील, खेळीमेळीची वृत्ति नाहींशी होऊन तिच्या जागीं द्वेष आणि झगडे यांचें राज्य सुरू झालें.

अशी ही तरवार परजीत येऊन हिंदुस्थानमध्यें आग आणि मनुष्यवध याचा डोंब ज्यानें उडवून दिला, असा गृहस्थ म्हणजे गझनीचा महमूद हा होय. गझनी हें आतां अफगाणिस्तानमध्यें एक लहानसें शहर आहे. पण दहाव्या शतकांत गझनी आणि त्याच्या आसपासचा प्रदेश मिळून एक राज्य निर्माण झालेलें होतें. मध्य आशियांतील सगळींच राज्यें नांवाला पाहिलीं तर खलिफाच्या अधिराज्याखालीं होतीं. परंतु मीं सांगितलेंच आहे तुला, कीं हरून-अल्-रशीदच्या मृत्यूनंतर खलिफाची सत्ता दुर्बल होत गेली आणि अखेरीस एक काळ असा आला, कीं त्या सुमारास साम्राज्याचे अनेक तुकडे होऊन जिकडे तिकडे पुष्कळशीं स्वतंत्र राज्यें प्रस्थापित झालीं होतीं. याच काळाबद्दल आपण आतां या क्षणीं बोलतों आहों. या काळांत इ. स. ९७५ च्या सुमारास तुर्कीपैकीं गुलाम वंशांतला सबक्तगीन यानें गझनी व कंदाहार यांच्या सभोंवार आपलें स्वतःचें एक वेगळेंच राज्य स्थापन केलें. त्यानें हिंदुस्थानवरही हल्ले केले होते. त्या काळीं लाहोर येथें जयपाळ नांवाचा राजा राज्य करीत होता. जयपाळ मोठा घाडसी राजा होता. त्यानें काबूल नदीच्या खोऱ्यांत सबक्तगीनवर स्वारी केली; परंतु त्याचा तेथें पराभव झाला.

सबक्तगीनच्या पाठीमागून त्याचा मुलगा महमूद हा गादीवर आला. हा एक अत्यंत कुशल सेनानी आणि घोडदळाचा मोठा उमदा नायक होता. दरसाल तो हिंदुस्थानवर धाड घाली, येथें पुष्कळ लोकांना लुटून ठार करी आणि प्रचंड संपत्ति आणि अगणित कैदी बरोबर घेऊन परत जाई. अशा रीतीनें त्यानें एकंदर सतरा हल्ले

या देशावर केले आणि त्यांपैकीं काश्मीरवरील हल्ल्यांतच काय तो एकदां त्याचा पराभव झाला. बाकीच्या सर्व हल्ल्यांत त्याला यश आलें आणि सर्व उत्तर हिंदुस्थानभर त्याची मोठीच दहशत बसली. खालीं थेट पाटलिपुत्र, मथुरा आणि सोमनाथ येथपर्यंत तो चालून जात असे. ठाणेश्वर येथून त्यानें दोन लक्ष कैदी आणि अगणित संपत्ति नेली असें म्हणतात. परंतु सोमनाथ येथेंच त्याला सगळ्यांत अधिक संपत्ति मिळाली. कारण हें एक फारचं श्रेष्ठ मंदिर असून भक्तांनीं शेंकडों वर्षें अर्पण केलेल्या वस्तूंचा तेथें मोठाच सांठा जमा होता. असें सांगतात, कीं महमुदाचा हल्ला आल्यावेळीं हजारों लोकांनीं या मंदिरांत आसरा घेतला. त्यांना आशा वाटत होती, कीं ज्या देवाची आपण भक्ति करतों तो कांहीं तरी चमत्कार करून आपलें संरक्षण करील. परंतु श्रद्धावंतांच्या कल्पनाक्षेत्राच्या बाहेर इतर ठिकाणीं असे चमत्कार कधींच घडत नाहींत. त्यामुळें महमुदानें तें मंदिर फोडलें आणि लुटलें; आणि चमत्काराची वाट पाहत बसलेले ५०,००० लोक तसा कांहीं चमत्कार न घडल्यानें मृत्युमुखीं पडले.

महमूद इ. स. १०३० मध्यें मरण पावला. त्या वेळीं सर्व पंजाब व सिंध हा प्रदेश त्याच्या अमलाखालीं आलेला होता. इस्लामधर्माचा हिंदुस्थानांत प्रसार करण्यासाठीं आलेला तो एक महान् पुढारी होता असें मानलें जातें. बहुतेक सर्व मुसलमानांच्या मनांत त्याच्याविषयीं अत्यंत पूज्यभाव आहे. बहुतेक हिंदू त्याचा अत्यंत तिरस्कार करतात. तसें पाहिलें तर महमुदाला धार्मिक विचारांनीं भरलेला मनुष्य म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. तो मुसलमान होता ही गोष्ट अर्थातच खरी आहे; परंतु ती काहीं एवढी महत्त्वाची गोष्ट नाहीं. सगळ्यांत महत्त्वाची खरी गोष्ट ही आहे, कीं महमूद हा शिपाई होता; मोठा धडाडीचा शूर शिपाई होता; लढवय्ये लोकांच्या नित्याच्या खेदकारक रिवाजास अनुसरून तोही हिंदुस्थानांत लढाई करून लूट मारण्यासाठीं म्हणून आला. आणि तो कोणत्याही धर्माचा असता तरी असाच आला असता. मोठी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे, कीं त्यानें सिंधच्या मुसलमान राजांवरही दाब आणण्यास कमी केलें नाहीं. त्यानीं त्याचा अम्मल मान्य केला आणि खंडणी दिली तेव्हांच महमुदानें त्यांना सुखानें राहूं दिलें. फार कशाला, त्यानें बगदादच्या खलिफाला सुद्धां मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडून समरकंद शहराची मागणी केली होती. तेव्हां महमूद हा कांहीं नुसताच एक यशस्वी लढाऊ गडी नसून आणखी कांहीं तरी होता अशी जी सामान्यतः चुकीची समजूत आहे, तिला आपण तरी बळी पडतां उपयोगी नाहीं.

महमुदानें आपल्याबरोबर पुष्कळ हिंदी शिल्पज्ञ आणि कारागीर नेले आणि त्यांच्या साह्यानें त्यानें गझनी येथें एक सुंदर मशीद बांधून तिला 'उरुस-इ-जन्नत' म्हणजे 'स्वर्गवधू' असें नांव दिलें. महमुदाला बागांचा फार मोठा शोक होता.

महमुदानें एका ठिकाणीं मथुरेचें ओझरतें वर्णन केलेलें आहे. त्यावरून मथुरा हें केवढें श्रेष्ठ शहर असलें पाहिजे, याची आपल्याला थोडीशी कल्पना येते. गझनी येथें त्याचा एक सुभेदार होता; त्याला लिहिलेल्या पत्रांत महमूद म्हणतो, "या ठिकाणीं

(मथुरा येथें) सद्धर्मनिष्ठांच्या, मोमिनांच्या धर्मनिष्ठेप्रमाणें अचल अशा एक हजार इमारती आहेत. लक्षावधि दिनार खर्च केलेले असल्याशिवाय शहराला आजची ही अवस्था प्राप्त झालेली असणें शक्य नाहीं, आणि दोनशें वर्षांहून कमी काळामध्यें असें दुसरें शहर निर्माण करतां येणार नाहीं."

मथुरेचें महमुदानें केलेलें हें वर्णन फिरदोसीनें लिहिलेल्या त्या काळच्या वृत्तांतामध्यें आपल्याला वाचावयास मिळतें. महमुदाच्या काळीं उदयास आलेला फिरदोसी हा एक श्रेष्ठ कवि होता. गेल्या वर्षींच्या एका पत्रांत त्याचा आणि त्याचा महान् ग्रंथ जो शहानामा यांचा उल्लेख मीं केला होता, असें मला आठवतें. एक दंतकथा अशी सांगतात, कीं महमुदानें मुद्दाम सांगितल्यावरून फिरदोसीनें 'शहानामा' हा ग्रंथ लिहिला आणि त्यांतील प्रत्येक श्लोकाबद्दल – शेराबद्दल (दोन ओळींबद्दल) – एक सोन्याचा दिनार देण्याचें महमुदानें कबूल केलें होतें. परंतु आटोपशीरपणा किंवा सुटसुटीतपणा यांची बहुधा फिरदोसीला फारशी फिकीर नसावी. त्यानें इतका अवाढव्य लांबीचा ग्रंथ लिहिला, कीं अखेरीस आपले ते हजारों शेर जेव्हां त्यानें महमुदापुढें हजर केले तेव्हां महमुदानें त्याच्या ग्रंथाची स्तुति केली. परंतु "पारितोषिक देण्याचें माझें वचन अगदींच अविचाराचें होतें, तें मला पुरें करणें शक्य नाहीं" असें म्हणून कबूल केल्यापेक्षां बरींच कमी रक्कम त्यानें फिरदोसीला देऊं केली; परंतु याचा अत्यंत राग येऊन फिरदोसीनें त्याच्याकडून कांहींही घेण्याचें नाकारलें.

कांहीं थोड्याशा परिच्छेदांत आपण हर्षापासून महमुदापर्यंत भली लांब उडी मारून हिंदुस्थानच्या साडेतीनशें वर्षांहूनही अधिक काळच्या इतिहासावर नजर टाकली आहे. या काळाबद्दल मनोरंजक असें पुष्कळच सांगण्यासारखें असलें पाहिजे हें मी जाणतों. परंतु मला स्वतःला ही प्रत्यक्ष माहिती नाहीं. तेव्हां त्याबद्दल मौन धारण करणें हें अधिक शहाणपणाचें आहे. या ठिकाणचे अनेक राजेरजवाडे एकमेकांशीं नित्य कसकसे लढत आले, मधेंमधें पांचाळाच्या राज्यांप्रमाणें मोठमोठीं राज्येंही उत्तर हिंदुस्थानांत त्यांनीं स्थापन कशीं केलीं, कनोजसारख्या महान् नगरीवर केवढे दुर्दैवाचे प्रसंग ओढवले, तिच्यावर हल्ला करून कांहीं काळ काश्मीरच्या राजांनीं ती काबीज कशी केली, पुढें तिच्यावर बंगालच्या राजांचें आणि त्यानंतर दक्षिणेंतील राष्ट्रकूटांचें स्वामित्व कसें स्थापन झालें, या हकिकती कांहीं कांहीं प्रमाणांत मी तुला सांगूं शकेन. परंतु या वृत्तांताचा तसा कांहीं विशेष उपयोग नाहीं आणि उलट तुझा त्यामुळें व्यर्थ गोंधळ मात्र उडेल.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील एका विभागाच्या टोंकापर्यंत आतां आपण येऊन पोंचलों असून येथून पुढें आतां नव्याच विभागाची सुरुवात व्हावयाची आहे. इतिहासाचे असे हे तुटक विभाग पाडणें हें मोठें बिकट काम आहे आणि तसें करणें पुष्कळदां बरेंचसें चुकीचेंही ठरतें. इतिहास हा वाहत्या नदीसारखा आहे. त्याचा ओघ सतत आणि अखंड वाहतच असतो. परंतु त्या ओघांत मधून मधून बदल

पडत असतो, आणि या ठिकाणीं पहिला ओघ संपला आणि या ठिकाणीं नवीनच प्रकारचा ओघ सुरू झाला, हें केव्हां केव्हांच सांगणें शक्य होतें. हे असे फरक एकदम आणि अगदींच विलगपणें घडून येत नसतात. त्यांचा आदि आणि अंत यांच्या छटा एकमेकांत सूक्ष्मपणें मिसळून गेलेल्या असतात. याच अर्थानें मीं म्हटलें, कीं या ठिकाणीं इतिहासाच्या कधींच अंत न पावणाऱ्या या नाटकांत हिंदुस्थानापुरतें तरी आपण एका अंकाच्या अखेरीस येऊन पोंचलों आहों. ज्याला हिंदु वर्चस्वाचा काळ म्हणतां येईल, तो आतां हळूहळू संपुष्टांत येऊं लागला असून गेलीं कित्येक हजार वर्षेंपर्यंत या ठिकाणीं भरभराटत राहिलेल्या भारतीय आर्य संस्कृतीवर आतां नवीनच या ठिकाणीं आलेल्या संस्कृतीशीं झगडा करण्याचा प्रसंग उभा राहिला आहे. पण ही सारी घटना कांहीं अकस्मात् घडून आलेली नाहीं हें तूं लक्षांत ठेव ; हळूहळू ही घटना घडत येत होती. महमुदाच्या-बरोबर इस्लामचा प्रवेश उत्तर हिंदुस्थानमध्यें झाला ; दक्षिण हिंदुस्थानांत त्यानंतर किती तरी दीर्घकाळपर्यंत त्याचा स्पर्शसुद्धां झाला नाहीं ; एवढेंच नव्हे, तर त्यानंतर २०० वर्षेंपर्यंत बंगालमध्यें सुद्धां इस्लामचा प्रवेश झाला नव्हता. पुढील इतिहासात आपल्या अचाट आणि बेगुमान शौर्यधैर्याबद्दल प्रसिद्धींस आलेल्या चितोड शहरीं सर्व रजपूत घराण्यांनीं एकत्र येऊन इस्लामलां विरोध करण्याची संघटना केल्याचें आपण पाहतों. परंतु असें जरी होतें, तरी कसल्याही विरोधाला न जुमानतां अगदीं दृढपणें आणि वाटेंत जें येईल तें कापीत, तुडवीत मुसलमानांच्या विजयाची ही भरतीची लाट चोहोंकडे पसरली आणि कोणीं किती वैयक्तिक शौर्य गाजविलें असलें, तरी तिला कोणी अटकावून धरूं शकला नाहीं. प्राचीन भारतीय आर्यांच्या भारताचा आतां अवनतीचा काळ सुरू झाला होता, यांत बिलकुल शंका नाहीं.

परकीय विजेत्यांचें आक्रमण थांबवितां येईनासें झालें तेव्हां भारतीय आर्य-संस्कृतीच्या लोकांनीं बचावाचें धोरण स्वीकारलें. स्वसंरक्षणासाठीं आपल्याभोंवतीं एक प्रकारचें कुंपण उत्पन्न करून त्याच्या आंत दडून राहण्याचा मार्ग त्यांनीं स्वीकारला. या काळपर्यंत जातिसंस्थेंत एक प्रकारचा लवचिकपणा होता ; तो काढून टाकून भारतीय आर्यसंस्कृतींत जातिसंस्था आतां अगदीं खडी चक्कडबंद करण्यांत आली. स्त्रियांचें स्वातंत्र्य तेथें कमी करण्यांत आलें. हळूहळू ग्रामपंचायतीचें स्वरूप सुद्धां बदलून त्यांत दीनपणा उत्पन्न झाला. तथापि, अशा रीतीनें आपल्याहून अधिक जोमदार अशा लोकांपुढें माघार घेत असतांही या संस्कृतीच्या वंशजांनीं त्या नव्या लोकांवरही आपला परिणाम करून त्यांनाच आपल्या प्रवृत्तींशीं मिळून घेण्याचा प्रयत्न करण्यास कमी केलें नाहीं. आणि त्यांच्या संस्कृतीच्या अंगची दुसऱ्याला आत्मसात् करून घेण्याची, आपल्यांत एकरूप करून टाकण्याची शक्ति इतकी मोठी होती, कीं काहीं अंशीं आपल्या विजेत्यांवर सांस्कृतिक विजय मिळविण्याचें कार्य भारतीय संस्कृतीनें पार पाडलेंच.

मात्र हें लक्षात ठेव, कीं हा झगडा कांहीं आर्यसंस्कृति आणि अत्यंत सुधारलेले आरबी लोक यांच्यामध्यें नव्हता. हा झगडा चांगला सुधारलेला परंतु आतां क्षीण होत चाललेला हिंदुस्थान देश एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला नुकतेच मुसलमानी धर्माची दीक्षा घेंतलेले मध्य आशियामधील अर्धवट सुधारलेले आणि मधूनअधून भटक्या मारीत फिरणारे लोक यांच्यामध्यें होता. दुर्दैवाची गोष्ट ही, कीं हा सुधारणेचा अभाव आणि महमुदाच्या स्वाऱ्यांमधील अमानुष अत्याचार यांची हिंदी लोकांनीं एक अभेद्य सांगड घातली आणि त्यामुळें या धर्माच्या लोकांविषयीं चिंडीची भावनाच येथें वाढीस लागली.

५२

यूरपांतील देशांचीं स्वरूपें निश्चित होतात

३ जून, १९३२

आतां जरासा यूरपकडे फेरफटका करून येऊं या का बाळ? मागच्या खेपेला आपण तिकडे गेलों होतों, तेव्हां यूरपला वाईट दिवस आलेले होते. रोमचें राज्य कोलमडून पडल्यामुळें पश्चिमेकडील सगळी यूरपीय संस्कृतीच कोलमडून पडल्यासारखें झालें होतें. पूर्व यूरपांतही, कॉन्स्टान्टिनोपलच्या साम्राज्याच्या अमलाखालील मुलूख सोडला, तर बाकीच्या भागाची अवस्था याहूनही वाईट होती. हूणांचा नायक ॲटिला यानें यूरप खंडाच्या बहुतेक भागामध्यें जाळपोळ आणि मोडतोड यांचा धुमाकूळ उडवून दिला होता. पूर्वेकडचें रोमन साम्राज्य मात्र – जरी तेंही हळूहळू दुर्बल होत चाललें होतें तरीही – त्या सर्व सपाट्यांत टिकून राहिलें होतें आणि तें उत्साहानें वर उसळीही मारण्याचा प्रयत्न करीत होतें.

रोमचें पतन झाल्यावर पश्चिम यूरप खंड एक प्रकारें तळापासून हादरून निघालें; आणि त्यानंतर तेथें स्थिरस्थावर होऊं लागून नवीनच प्रकारचें वळण निर्माण होतेंसें दिसूं लागलें. अर्थात् असें स्थिरस्थावर होण्याला काळ पुष्कळच लागला. परंतु हें जें कांहीं नवें वळण निर्माण होत होतें तें कशा प्रकारचें होतें, याची सुरुवातीपासूनच काहीं कांहीं कल्पना येण्यासारखी होती. पहिली गोष्ट म्हणजे ख्रिस्ती धर्माचा प्रसार वाढत होता. त्या धर्मांतील साधुसंत आणि शांततेचे पुरस्कर्ते यांच्यामुळें जसा हा प्रसार वाढत होता, तसाच त्या धर्माचा तरवारीच्या जोरावर प्रसार करणारे जे लढवय्ये राजे निघाले त्यांच्याहीमुळें तो वाढत होता. दुसरी गोष्ट म्हणजे नवीं नवीं राज्यें उदयाला येत होतीं. फ्रान्स, बेल्जम आणि जर्मनीचा कांहीं भाग या प्रदेशांवर फ्रँक लोकांनीं (त्यांना एवढ्यांतच फ्रेंच लोकाशीं एकरूप मानण्याचा गोंधळ मात्र करूं


नव्या आतकांतील पूर्वखंड
उत्तरेकडील मध्यखंड
हिमालय
गोबी
तिबेट
गंगा
ब्रह्मपुत्र
जपान
फिलिपाइन
बोर्निओ
सुमात्रा
जावा
न्यू गिनी
ऑस्ट्रेलिया

नको) क्लोव्हिस नांवाच्या राज्याच्या नेतृत्वाखालीं एक राज्य स्थापन केलें. क्लोव्हिसनें इ. स. ४८१ पासून ५२१ पर्यंत राज्य केलें. क्लोव्हिसच्या आजाच्या नांवावरून त्याच्या राजवंशाला मेरोव्हिजियन घराणें हें नांव मिळालें. परंतु या राजांची सद्दी फार दिवस चालली नाहीं; त्यांच्याच एका अधिकाऱ्यानें, राजवाड्यावरील व्यवस्थापकानेंच, त्यांना निस्तेज करून टाकलें. हे व्यवस्थापकच पुढें सर्वसत्ताधीश झाले आणि आनुवंशिकपणें तो अधिकार भोगूं लागले. खरें राज्य त्यांचेंच होतें; आणि नांवाला जे राजे होते, ते त्यांच्या हातचीं बाहुलीं मात्र होते.

इ. स. ७३२ मध्यें सारासन लोकांचा पराभव फ्रान्समध्यें टूर्स येथील घनघोर लढाईंत ज्यानें केला, तो चार्ल्स मार्टेल हा याच प्रासादाधिकाऱ्यांपैकीं एक होता. आपल्या त्या जयामुळें सारासन लोकांची देशामागून देश जिंकीत जाण्याची लाट त्यानें परताविली आणि ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीनें त्यानें यूरपचें मोठ्या संकटापासून रक्षण केलें. त्यामुळें त्याची कीर्ति व प्रतिष्ठा फारच वाढली. ख्रितधर्मी जगताचा शत्रूविरुद्ध दंड थोपटून उभा राहणारा नायक, पुढारी, असें लोक त्याला मानूं लागले. या सुमारास रोम येथील पोपांचें कॉन्स्टान्टिनोपल येथील बादशहाशीं जमत नाहींसें झालेलें होतें. म्हणून चार्ल्स मार्टेलकडून आपल्याला मदत मिळवावी, असा उद्योग त्यांनीं सुरू केला होता. मार्टेलचा मुलगा पेपिन यानें या नव्या राज्यांत राजाचें जें एक नुसतें बाहुलें चालत आलेलें होतें, तें काढून टाकून स्वतःच राजा होण्याचा विचार ठरविला आणि पोपनें मोठ्या आनंदानें त्याला संमति दिली.

पेपिनचा मुलगा म्हणजेच शार्लमेन. पोप पुन्हां कांहीं अडचणींत सांपडला व त्यानें शार्लमेनला आपणाला त्यांतून सोडविण्यासाठीं विनंति केली. चार्ल्सनें (शार्लमेननें) ही विनंति मान्य करून पोपच्या शत्रूंना पिटाळून लावलें आणि इ. स. ८०० च्या नाताळच्या दिवशीं रोम येथील कॅथेड्रलमध्यें मोठा समारंभ करून पोपनें त्याला रोमन बादशहाच्या पदावर यथाविधि प्रस्थापित केलें. मागें मीं तुला पवित्र रोमन साम्राज्य म्हणून सांगितलें ना, तें या दिवसापासून सुरू झालें.

हें मोठें विचित्र साम्राज्य होतें; आणि ज्या काळांत पुढें त्याचा हळूहळू लोप झाला, त्या पुढच्या काळचा त्याचा इतिहास अधिकच विचित्र आहे. ॲलिस इन दि वंडरलँड या गोष्टीमधील तें चेशायर जातीचें मांजर तुला आठवतें ना, तशी त्याची अवस्था झाली. त्या मांजराचें शरीर मुळींच दिसेनासें झालें. परंतु मागें त्याचें हास्य तेवढें दृष्टीसमोर राहिलें, त्याप्रमाणेंच. पण या सर्व पुढें होणाऱ्या गोष्टी आहेत. आतां भविष्यकाळांत इतक्यांतच खोल जाऊन पाहण्याचें आपल्याला कांहीं कारण नाहीं.

हें पवित्र रोमन साम्राज्य म्हणजे, जुनें जें पश्चिम रोमन साम्राज्य, त्याचीच मागील पानावरून पुढें चालू अशी आवृत्ति मुळींच नव्हती. त्याच्यांत आणि याच्यांत बराच फरक होता. पहिली गोष्ट साऱ्या जगात साम्राज्य असें काय तें एक फक्त हेंच

आणि एक पोप तेवढा कदाचित् सोडला, तर बाकीच्या जगामध्यें एकूण एक व्यक्तीवर या साम्राज्याच्या बादशहाचा अधिकार, अशी समजूत आतां अस्तित्वांत आली. पोप श्रेष्ठ कीं बादशहा श्रेष्ठ, असाही झगडा त्या दोघांमध्यें कितीक शतकेंपर्यंत होता. पण अर्थात् हाही पुढें घडून येणारा प्रकार होता. विशेष मौजेची गोष्ट काय, तर हें साम्राज्य म्हणजे पूर्वी रोमला साऱ्या जगाची स्वामिनी समजत असत ना, त्या काळच्या सर्वश्रेष्ठ रोमन साम्राज्याचें पुनरुज्जीवन आहे, अशी कल्पना दृढ करण्यांत आली. अर्थात् त्यामध्यें एका गोष्टीची तेवढी नवीन भर होती. ती म्हणजे ख्रिस्ती धर्म आणि ख्रिस्ती जगत् यांबद्दलची. याचमुळें या साम्राज्याला 'पवित्र' म्हणूं लागले. बादशहा म्हणजे परमेश्वराचा पृथ्वीवरील एक प्रतिनिधीच, अशी समजूत; तीच गोष्ट पोपचीही. एकाकडे राज्यव्यवस्थेचा अधिकार; दुसऱ्याकडे आत्मिक जीवनाची व्यवस्था. अशी एक कल्पना तरी निदान होती आणि तिच्यापासूनच मला वाटतें, कीं यूरपमध्यें राजांच्या दैवी हक्कांची कल्पना निघाली. बादशहाला आतां धर्मसंरक्षक ही पदवी प्राप्त झाली. इंग्लंडच्या राजाला अजूनही धर्मसंरक्षक ही पदवी लावतात, हें ऐकून तुला मोठी गंमत वाटेल.

या बादशहाची मुसलमानांच्या खलिफाशीं तुलना करून पाहा. तोही आपल्याला श्रद्धभींयांचा नायक, अमीर-उल्-मोमनीन, म्हणवीत असे. खलिफा हा वस्तुतः स्वतःच बादशहाही होता आणि पोप म्हणजे धर्मगुरूही होता. पुढें त्याची सत्ता नुसती नांवाला मात्र राहिली व त्याचें स्थान म्हणजे एक निव्वळ शोभेची वस्तु होऊन राहिलें, हें आपल्याला ओघाओघानें दिसेलच.

अर्थातच कॉन्स्टान्टिनोपल येथील बादशहांना रोममध्यें नवीनच उदयास आलेलें हें 'पवित्र रोमन साम्राज्य' मुळींच मान्य नव्हतें. शार्लमेनला बादशहा म्हणून राज्याभिषेक झाला, त्या वेळीं आयरीन नांवाची एक स्त्रीच कॉन्स्टान्टिनोपलची सम्राज्ञी झाली होती. आपल्याला राजपद मिळावें म्हणूस जिनें आपल्या मुलाचा वध केला, तीच ही दुष्ट बया; हिच्या काळीं त्या साम्राज्याला फार वाईट दिवस आले होते. याचमुळें कॉन्स्टान्टिनोपलच्या साम्राज्याशीं असलेले संबंध तोडून टाकून शार्लमेनला सम्राटाचा मुकुट देण्याचें धाडस पोपला करवलें.

शार्लमेन हा आतां पश्चिमेकडील ख्रिस्ती जगताचा नेता, परमेश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधि, पवित्र साम्राज्याचा बादशहा झाला. किती पोकळ डामडौलाच्या या पदव्या आहेत खरोखर! पण लोकांचीं मनें भारून टाकून त्यांना भूलत्याच गोष्टीवर विश्वास टाकावयाला लावण्यासाठीं अशा पदव्या फार मोठ्या उपयोगाच्या असतात. अधिकारपदावर असलेले लोक परमेश्वर आणि धर्म यांच्या नांवांचा उपयोग लोकांना बनवून आपली सत्ता वाढविण्यासाठीं जगांत नेहमींच करीत आलेले आढळतात. राजा, बादशहा आणि धर्माधिकारी या व्यक्ती म्हणजे सामान्य जनापासून फार फार निराळ्या, जवळजवळ देवासारख्या, अशा कोणी अवर्णनीय, अतिमानुष व्यक्ती आहेत, असें

सर्वसामान्य माणसाला वाटत असतें. त्यांच्याबद्दल त्याला जी ही एक गूढ भावना वाटत असते, त्यामुळें त्याला त्यांची भीतीही वाटते. राजदरबारांतील वागणुकीचे ते कितीक बारीकसारीक नियम, तेथली ती शिस्त, ते दरबारी लहानमोठे समारंभ आणि मंदिरें किंवा चर्चमधील पूजा-अर्चांचें अगदीं तसेंच व तितकेंच तें विविध प्रकारचें तंत्र, यांच्यामधील सारखेपणाचा थोडा विचार करून पाहा. दोन्ही ठिकाणीं ते नमस्कार, तें नाक घासणें, जमिनीवर वांकणें किंवा साष्टांग प्रणिपात करणें – चिनी लोक त्याला कोटो करणें म्हणतात – हे प्रकार अगदीं एकसारखे आढळतात. लहानपणापासून आम्हांला अधिकारी लोकांची अशी ही पूजा करावयाला नाना प्रकारांनीं शिकवण्यांत येत असतें. पण हें जें भक्तीचें प्रदर्शन घडतें, तें सगळें भीतीच्या पोटीं जन्मलेलें असतें; प्रेमाच्या पोटीं नव्हे.

शार्लमेन हा बगदादच्या हरून-अल्-रशीदचा समकालीन होता. या दोघांचा पत्रव्यवहारही चाले. आणि ही गोष्ट तूं मुद्दाम लक्षांत ठेव, कीं पूर्वेकडील रोमन साम्राज्य आणि स्पेनमधील सारासन लोक यांच्याशीं लढण्याकरितां आपण दोघांनीं दोस्तीचा तह करावा, असें खुद्द शार्लमेननें हरून-अल्-रशीदला सुचविलें होतें. या सूचनेंतून निष्पन्न कांहीं झालें नाहीं; परंतु अशी सूचना करण्यापर्यंत तरी मजल गेली होती, यावरून राजे लोक आणि मुत्सद्दी यांचे मनोव्यापार कशा रीतीनें चालत असतात, यावर केवढा प्रचंड प्रकाश पडतो. तूंच पाहा ना आतां, "पवित्र साम्राज्या"चा हा बादशहा, ख्रिस्ती जगताचा नेता, करीत काय होता, तर एक ख्रिस्तीच राज्य आणि एक आरबी राज्य यांच्याविरुद्ध लढण्यासाठीं म्हणून बगदादच्या खलिफाच्या हातांत हात घालावयाला तयार झाला होता. स्पेनमधील सारासन लोकांनीं बगदाद येथील आब्बासी घराण्यांतील खलिफांची सत्ता मानण्याचें नाकारलें होतें, हें तुला आठवतच असेल. ते स्वतंत्र झाल्यामुळें बगदादच्या खलिफांचा त्यांच्यावर दांत होता. परंतु दोघांमध्यें अंतर फार असल्यामुळें त्यांची एकमेकांशीं लढाई होणें अशक्य झालें होतें. त्याचप्रमाणें कॉन्स्टान्टिनोपलचें साम्राज्य आणि शार्लमेन यांच्यामध्येंही गोडी मुळींच नव्हती. परंतु याही ठिकाणीं मध्यें अंतर फार असल्यामुळें प्रत्यक्ष हातघाई होणें कठिण होतें. असें जरी होतें, तरीही योजना काय सुचविली गेली, कीं एक ख्रिस्ती आणि एक आरबी अशा राजांनीं एक होऊन ख्रिस्ती आणि आरबी अशाच इतर दोन राज्यांशीं युद्धें करावीं. राजे लोकांच्या मनांतला खरा हेतु सत्ता, अधिकार आणि संपत्ति मिळवावयाची हाच असतो. परंतु पुष्कळदां धर्माच्या बाह्य आवरणाच्या आंत तो दडवून ठेवण्यांत येत असतो. सगळीकडे हाच प्रकार झालेला आढळून येतो. हिंदुस्थानांत नाहीं का आपण पाहिलें, कीं महमूद हाही धर्माच्याच नांवाचा जप करीत आला आणि त्यानें आपला चांगलाच फायदा करून घेतला. धर्माच्या आरोळ्या ठोकून जगांत खरोखरच नेहमीं चांगली भक्कम प्राप्ति होत आलेली आढळते.

परंतु निरनिराळ्या युगांतले विचारप्रवाह सारखे निरनिराळे होत असतात;

त्यामुळें आपल्यापासून फार दूरच्या काळात जे लोक होऊन गेले, त्याना बरेंवाईट ठरविणें ही गोष्ट खरोखरच कठिण आहे, हें आपण कधीं विसरतां कामा नये. आज ज्या पुष्कळशा गोष्टी आपल्याला अगदीं साध्या आणि स्वाभाविक वाटतात, त्या त्या काळीं लोकांना अतिशय चमत्कारिक वाटल्या असण्याचा संभव आहे; आणि त्यांच्या काळच्या रोजच्या चालीरीती आणि विचारपरंपरा आज आपल्याला विचित्र वाटण्याचा संभव आहे. त्या वेळचे लोक जरी मोठमोठ्या ध्येयांच्याबद्दल आणि पवित्र साम्राज्य, परमेश्वराचा प्रतिनिधि बादशहा, आणि खिस्ताचा प्रतिनिधि पोप यांच्याबद्दल मोठ-मोठ्या गप्पा मारीत असले, तरी त्या काळची पश्चिम यूरपची परिस्थिति जास्तींत जास्त वाईट होती, हें निःसंशय. शार्लमेनच्या कारकीर्दीनंतर इटली व रोम यांना फारच हलाखीचे दिवस आले. रोमचा कारभार कांहीं नष्टचरित्र स्त्रीपुरुषांच्या लहरीप्रमाणें चालूं लागला आणि मनास येईल त्याला हे लोक पोप करूं लागले किंवा पोपच्या स्थानावरून भ्रष्ट करूं लागले.

रोमचा पाडाव झाल्यानंतर पश्चिम यूरपांत जी अव्यवस्था माजली होती, तिच्या-मुळें तर लोकांना वाटूं लागलें होतें, कीं जुन्या साम्राज्याचें पुनरुज्जीवन केलें तर बरे दिवस येतील. तसेंच आपल्यामध्यें एक बादशहा असल्याशिवाय आपली जगांत खरी प्रतिष्ठा राहत नाहीं, असेंही कांहीं लोकांना वाटत होतें. त्या काळच्या एका प्राचीन ग्रंथकारानें चार्ल्सला बादशहा कां केलें याविषयीं लिहितांना म्हटलें आहे, "तसें केलें नसतें तर खिस्ती लोकांमध्यें बादशहाचें नांव शिल्लक राहिलें नाहीं म्हणून काफीर – बिगर खिस्ती लोकांनीं खिस्ती लोकांना हिणवलें असतें."

शार्लमेनच्या साम्राज्यामध्यें फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, स्वित्झर्लंड, जर्मनीचा अर्धा भाग आणि इटली एवढ्या प्रदेशाचा समावेश होत होता. त्याच्या साम्राज्याच्या नैऋत्येला आरबी अमलाखालील स्पेन देश होता. ईशान्येला स्लाव्ह आणि इतर टोळ्यांचे – वंशांचे – मुलूख होते; उत्तरेला डेन्स आणि नॉर्थमेन यांचे मुलूख, आग्नेयीला बल्गेरियन आणि सर्बियन लोकांचे मुलूख आणि त्यांच्या पलीकडे कॉन्स्टान्टिनोपलचें पूर्व रोमन साम्राज्य होतें.

शार्लमेन इ. स. ८१४ मध्यें मरण पावला आणि त्यानंतर लौकरच साम्राज्य-लक्ष्मीच्या वांटण्या करण्याबाबत झगडे उत्पन्न झाले. त्याच्या वंशजांना कालोंव्हिंजियन म्हणतात. (लॅटिन भाषेंत चार्ल्सचें रूप कॅरोलस असें होतें त्यांवरून.) या त्याच्या वंशजांपैकीं कुणाला लढ, कुणाला टकल्या, कुणाला धर्मभीरू अशा पदव्या दिलेल्या आढळतात. त्यावरून पाहतां या कालोंव्हिंजियन राजांत कांहीं दम होता, असें दिसत नाहीं. शार्लमेनच्या साम्राज्याचे जे विभाग पडले त्यांतून या सुमारास फ्रान्स आणि जर्मनी हे देश उदयास येतांना आपल्याला दिसतात. एक राष्ट्र म्हणून जर्मनीची संघटना इ. स. ८४३ या सालीं सुरू झाली असें मानतात; आणि पुढें बादशहा आटो दि ग्रेट यानें इ. स. ९६२ ते ९७३ पर्यंतच्या आपल्या कारकीर्दींत सर्व जर्मन

लोकांना बहुतांशीं एकजीव केलें असें म्हणतात. याच्या आधींच फ्रान्स देश स्वतंत्र झाला असून तो कांहीं आटोच्या साम्राज्यामध्यें नव्हता. इ. स. ९८७ मध्यें ह्यूजेस कॅपेट यानें दुर्बळ झालेल्या कार्लोव्हिंजियन राजघराण्याला हुसकून देऊन फ्रान्सवर आपलें प्रभुत्व स्थापन केलें. परंतु हें त्याचें प्रभुत्व म्हणण्यासारखें सार्वत्रिक व प्रभावी नव्हतें. कारण फ्रान्सचे निरनिराळे मोठे विभाग झालेले असून ते स्वतंत्र सरदारांच्या हातांत होते; व त्यांचीं आपसांत सारखीं युद्धें चालू असत. परंतु परस्परांपेक्षां त्या सर्वांना रोमचा बादशहा आणि पोप यांची भीति अधिक वाटे. म्हणून त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं ते सगळे एकत्र झाले. ह्यूजेस कॅपेटच्या काळापासून फ्रान्स हें एकजीव असें एक राष्ट्र झालें. आज एक हजार वर्षेंपर्यंत, थेट आमच्या काळापर्यंत, चालत आलेल्या फ्रान्स व जर्मनी यांच्यामधील वैराचीं बीजें इतक्या त्या पहिल्या पहिल्या काळींसुद्धा आपणांस आढळून येतात. फ्रेंच आणि जर्मन यांसारख्या दोन सुधारलेल्या आणि अत्यंत उच्च बुद्धि व शक्ति असलेल्या दोन शेजारी राष्ट्रांनीं पिढ्यान्‌पिढ्या हें प्राचीन वैर असेंच धुमसत ठेवावें, हें पाहून किती चमत्कारिक वाटतें. परंतु हा दोष त्या राष्ट्रांतील लोकांचा नसून त्यांच्यामधील समाजव्यवस्थेचा असला पाहिजे.

याच सुमारास रशियाही इतिहासाच्या रंगभूमीवर प्रवेश करतो. उत्तरेकडील प्रदेशांमधील रूरिक नांवाच्या एका गृहस्थानें इ. स. ८५० सालीं रशियाच्या राज्याचा पाया घातला असें म्हणतात. इकडे यूरपच्या आग्नेय कोपऱ्यात बल्गेरियन लोक स्थिरस्थावर होऊं लागले होते, एवढेंच नव्हे, तर बाहेरच्या भागांत स्वाऱ्याही करूं लागले होते. तसेंच सर्बियन लोकही. त्याचप्रमाणें पवित्र रोमन साम्राज्य आणि नवें रशियन राज्य यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत मग्यार म्हणजेच हंगेरियन लोक, आणि पोल लोक यांनींही आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन करण्यास सुरुवात केलेली होती.

दरम्यान उत्तर यूरपांतून कांहीं लोक जहाजांतून यूरपच्या पश्चिमेकडील आणि दक्षिणेकडील देशांत आले आणि तेथें त्यांनीं लूटमार आणि जाळपोळ सुरू केली. डेन्स आणि इतर नॉर्थमेन लोकांनीं इंग्लंडमध्यें कसा धुमाकूळ घातला आणि लुटालूट केली, हें तुझ्या वाचण्यांत आलेलें आहे. याच नॉर्थमेन लोकांना पुढें नॉर्समेन आणि अखेरीस नॉर्मन म्हणूं लागले. हे पुढें भूमध्य समुद्रांत गेले आणि तेथून मोठमोठ्या नद्यांच्या मुखांतून आपलीं जहाजें घेऊन वर जाऊन जेथें जमेल तेथें त्यांनीं दरोडे घातले, कत्तली केल्या आणि लूटमार केली. या वेळीं रोममध्यें कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता, अराजक माजलेलें होतें आणि रोमची अवस्था अगदींच कींव करण्यासारखी झालेली होती. नॉर्मन लोकांनीं रोम लुटलें आणि खुद्द कॉन्स्टान्टिनोपललाही दटावण्यापर्यंत त्यांची मजल गेली. या लुटारू आणि दरोडेखोर लोकांनीं ज्या ठिकाणीं नार्मंडी परगणा आहे, त्या फ्रान्सच्या ईशान्य भागांतील प्रदेशाचा कबजा घेतला; तसेंच इटली व सिसिली हे देश काबीज करून ते या प्रदेशांत वसाहत करून स्थिरस्थावर झाले व तेथले सरदार आणि जमीनदार बनले. दरोडेखोर लोकांची चांगली चलती

त्यामुळें आपल्यापासून फार दूरच्या काळात जे लोक होऊन गेले, त्याना बरेंवाईट ठरविणें ही गोष्ट खरोखरच कठिण आहे, हें आपण कधीं विसरतां कामा नये. आज ज्या पुष्कळशा गोष्टी आपल्याला अगदीं साध्या आणि स्वाभाविक वाटतात, त्या त्या काळीं लोकांना अतिशय चमत्कारिक वाटल्या असण्याचा संभव आहे; आणि त्यांच्या काळच्या रोजच्या चालीरीती आणि विचारपरंपरा आज आपल्याला विचित्र वाटण्याचा संभव आहे. त्या वेळचे लोक जरी मोठमोठ्या ध्येयांच्याबद्दल आणि पवित्र साम्राज्य, परमेश्वराचा प्रतिनिधि बादशहा, आणि खिस्ताचा प्रतिनिधि पोप यांच्याबद्दल मोठमोठ्या गप्पा मारीत असले, तरी त्या काळची पश्चिम यूरपची परिस्थिति जास्तींत जास्त वाईट होती, हें निःसंशय. शार्लमेनच्या कारकीर्दीनंतर इटली व रोम यांना फारच हलाखीचे दिवस आले. रोमचा कारभार कांहीं नष्टचरित्र स्त्रीपुरुषांच्या लहरीप्रमाणें चालूं लागला आणि मनास येईल त्याला हे लोक पोप करूं लागले किंवा पोपच्या स्थानावरून भ्रष्ट करूं लागले.

रोमचा पाडाव झाल्यानंतर पश्चिम यूरपांत जी अव्यवस्था माजली होती, तिच्यामुळें तर लोकांना वाटूं लागलें होतें, कीं जुन्या साम्राज्याचें पुनरुज्जीवन केलें तर बरे दिवस येतील. तसेंच आपल्यामध्यें एक बादशहा असल्याशिवाय आपली जगांत खरी प्रतिष्ठा राहत नाहीं, असेंही कांहीं लोकांना वाटत होतें. त्या काळच्या एका प्राचीन ग्रंथकारानें चार्ल्सला बादशहा कां केलें याविषयीं लिहितांना म्हटलें आहे, "तसें केलें नसतें तर खिस्ती लोकांमध्यें बादशहाचें नांव शिल्लक राहिलें नाहीं म्हणून काफीर – बिगर खिस्ती लोकांनीं खिस्ती लोकांना हिणवलें असतें."

शार्लमेनच्या साम्राज्यामध्यें फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, स्वित्झर्लंड, जर्मनीचा अर्धा भाग आणि इटली एवढ्या प्रदेशाचा समावेश होत होता. त्याच्या साम्राज्याच्या नैऋत्येला आरबी अमलाखालील स्पेन देश होता. ईशान्येला स्लाव्ह आणि इतर टोळ्यांचे – वंशांचे – मुलूख होते; उत्तरेला डेन्स आणि नॉर्थमेन यांचे मुलूख, आग्नेयीला बल्गेरियन आणि सर्बियन लोकांचे मुलूख आणि त्यांच्या पलीकडे कॉन्स्टान्टिनोपलचें पूर्व रोमन साम्राज्य होतें.

शार्लमेन इ. स. ८१४ मध्यें मरण पावला आणि त्यानंतर लौकरच साम्राज्यलक्ष्मीच्या वांटण्या करण्याबाबत झगडे उत्पन्न झाले. त्याच्या वंशजांना कालोंव्हिंजियन म्हणतात. (लॅटिन भाषेंत चार्ल्सचें रूप कॅरोलस असें होतें त्यांवरून.) या त्याच्या वंशजांपैकीं कुणाला लढ, कुणाला टकल्या, कुणाला धर्मभीरू अशा पदव्या दिलेल्या आढळतात. त्यावरून पाहतां या कालोंव्हिंजियन राजांत कांहीं दम होता, असें दिसत नाहीं. शार्लमेनच्या साम्राज्याचे जे विभाग पडले त्यांतून या सुमारास फ्रान्स आणि जर्मनी हे देश उदयास येतांना आपल्याला दिसतात. एक राष्ट्र म्हणून जर्मनीची संघटना इ. स. ८४३ या सालीं सुरू झाली असें मानतात; आणि पुढें बादशहा आटो दि ग्रेट यानें इ. स. ९६२ ते ९७३ पर्यंतच्या आपल्या कारकीर्दींत सर्व जर्मन

लोकांना बहुतांशीं एकजीव केलें असें म्हणतात. याच्या आधींच फ्रान्स देश स्वतंत्र झाला असून तो कांहीं आटोच्या साम्राज्यामध्यें नव्हता. इ. स. ९८७ मध्यें ह्यूजेस कॅपेट यानें दुर्बळ झालेल्या कार्लोव्हिंजियन राजघराण्याला हुसकून देऊन फ्रान्सवर आपलें प्रभुत्व स्थापन केलें. परंतु हें त्याचें प्रभुत्व म्हणण्यासारखें सार्वत्रिक व प्रभावी नव्हतें. कारण फ्रान्सचे निरनिराळे मोठे विभाग झालेले असून ते स्वतंत्र सरदारांच्या हातांत होते; व त्यांचीं आपसांत सारखीं युद्धें चालू असत. परंतु परस्परांपेक्षां त्या सर्वांना रोमचा बादशहा आणि पोप यांची भीति अधिक वाटे. म्हणून त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं ते सगळे एकत्र झाले. ह्यूजेस कॅपेटच्या काळापासून फ्रान्स हें एकजीव असें एक राष्ट्र झालें. आज एक हजार वर्षेंपर्यंत, थेट आमच्या काळापर्यंत, चालत आलेल्या फ्रान्स व जर्मनी यांच्यामधील वैराचीं बीजें इतक्या त्या पहिल्या पहिल्या काळींसुद्धा आपणांस आढळून येतात. फ्रेंच आणि जर्मन यांसारख्या दोन सुधारलेल्या आणि अत्यंत उच्च बुद्धि व शक्ति असलेल्या दोन शेजारी राष्ट्रांनीं पिढ्यान्‌पिढ्या हें प्राचीन वैर असेंच धुमसत ठेवावें, हें पाहून किती चमत्कारिक वाटतें. परंतु हा दोष त्या राष्ट्रांतील लोकांचा नसून त्यांच्यामधील समाजव्यवस्थेचा असला पाहिजे.

याच सुमारास रशियाही इतिहासाच्या रंगभूमीवर प्रवेश करतो. उत्तरेकडील प्रदेशांमधील रूरिक नांवाच्या एका गृहस्थानें इ. स. ८५० सालीं रशियाच्या राज्याचा पाया घातला असें म्हणतात. इकडे यूरपच्या आग्नेय कोपऱ्यात बल्गेरियन लोक स्थिरस्थावर होऊं लागले होते, एवढेंच नव्हे, तर बाहेरच्या भागांत स्वाऱ्याही करूं लागले होते. तसेंच सर्बियन लोकही. त्याचप्रमाणें पवित्र रोमन साम्राज्य आणि नवें रशियन राज्य यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत मग्यार म्हणजेच हंगेरियन लोक, आणि पोल लोक यांनींही आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन करण्यास सुरुवात केलेली होती.

दरम्यान उत्तर यूरपांतून काहीं लोक जहाजांतून यूरपच्या पश्चिमेकडील आणि दक्षिणेकडील देशांत आले आणि तेथें त्यांनीं लूटमार आणि जाळपोळ सुरू केली. डेन्स आणि इतर नॉर्थमेन लोकांनीं इंग्लंडमध्यें कसा धुमाकूळ घातला आणि लुटालूट केली, हें तुझ्या वाचण्यांत आलेलें आहे. याच नॉर्थमेन लोकांना पुढें नॉर्समेन आणि अखेरीस नॉर्मन म्हणूं लागले. हे पुढें भूमध्य समुद्रांत गेले आणि तेथून मोठमोठ्या नद्यांच्या मुखांतून आपलीं जहाजें घेऊन वर जाऊन जेथें जमेल तेथें त्यांनीं दरोडे घातले, कत्तली केल्या आणि लूटमार केली. या वेळीं रोममध्यें कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता, अराजक माजलेलें होतें आणि रोमची अवस्था अगदींच कींव करण्यासारखी झालेली होती. नॉर्मन लोकांनीं रोम लुटलें आणि खुद्द कॉन्स्टान्टिनोपलला ही दटावण्यापर्यंत त्यांची मजल गेली. या लुटारू आणि दरोडेखोर लोकांनीं ज्या ठिकाणीं नार्मंडी परगणा आहे, त्या फ्रान्सच्या ईशान्य भागांतील प्रदेशाचा कबजा घेतला; तसेंच इटली व सिसिली हे देश काबीज करून ते या प्रदेशांत वसाहत करून स्थिरस्थावर झाले व तेथले सरदार आणि जमीनदार बनले. दरोडेखोर लोकांची चांगली चलती

सुरू झाली, म्हणजे पुढें ते नेहमींच हा मार्ग अनुसरीत असतात. फ्रान्समधील नॉर्मंडी विभागांतील याच नॉर्मन लोकांनीं कॉंकरर म्हणजे विजेता या नांवानें प्रसिद्ध असलेल्या विल्यमच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडवर स्वारी करून इ. स. १०६६ मध्यें तो देश जिंकला. अशा रीतीनें याच काळांत इंग्लंडलाही रंगरूप येऊं लागलेलें आपण पांहतों.

यूरपमध्यें आतां आपण ख्रिस्ती शकाच्या पहिल्या सहस्रकाच्या म्हणजे ख्रिस्ती शकाच्या हजार वर्षांच्या काळाच्या अखेरीस येऊन पोंचलों आहों. या सुमारास इकडे गझनीचा महमूद हिंदुस्थानमध्यें दरोडे घालीत होता; याच सुमारास आब्बासी खलिफांची सत्ता मोडकळीला आली होती. आणि सेल्जुक तुर्क लोक पश्चिम आशियामध्यें इस्लामधर्माचें पुनरुज्जीवन करीत होते. स्पेन देश अजून आरबांच्या हातांत होता; परंतु या आरबांचा आपला मायदेश जो अरबस्तान त्याच्याशीं अजिबात संबंध तुटून गेला असून बगदादच्या राज्यकर्त्यांशीं त्यांचे संबंध शत्रुत्वाचेच झाले होते. उत्तर आफ्रिका बगदादच्या साम्राज्यांतून फुटून जवळजवळ पूर्ण स्वतंत्र झाली होती. ईजिप्तमध्यें राज्य तर स्वतंत्र होतेंच, परंतु खलिफाची गादीही स्वतंत्र होती; आणि कांहीं काळपर्यंत ईजिप्तच्या खलिफाचा उत्तर आफ्रिकेवरही अम्मल चालू होता.

५३

सरंजामी पद्धति

४ जून, १९३२

आजचे आपले फ्रान्स, जर्मनी, रशिया, इंग्लंड हे जे देश त्यांची सुरुवात कशा प्रकारें झाली याचें थोडें ओझरतें दर्शन आपण गेल्या पत्रांत घेतलें. परंतु या देशांच्याबद्दल आज आपली ज्या प्रकारची समजूत आहे, त्याच प्रकारची समजूत या देशांबद्दल त्या सुरुवातीच्या काळच्या लोकांची होती, असी मात्र कल्पना करून घेऊं नकोस. आज आपण हीं वेगवेगळीं राष्ट्रें आहेत अशी कल्पना करतों; हे कोण तर इंग्लिश लोक, हे म्हणे फ्रेंच किंवा जर्मन लोक, अशीं वेगवेगळीं नांवेंही त्या त्या देशांतल्या लोकांना आपण देतों; आणि हे लोकही आपापल्या देशाला मातृभूमि नाहीं तर पितृभूमि असें मानतात. आज जगांत सगळीकडे अतिशय स्पष्टपणें प्रत्ययाला येणारी ही भावना म्हणजेच राष्ट्रीयत्वाची भावना होय. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां चाललेला आपला झगडा हा याच अर्थानें राष्ट्रीय झगडा आहे. परंतु ही राष्ट्रीयत्वाची भावना पहिल्या काळीं अस्तित्वांत नव्हती. ख्रिस्त्यांचें असें एक स्वतंत्र जग, म्हणजेच मुसलमान किंवा इतर परधर्मीयांच्या दृष्टीनें वेगळ्या आणि विरोधी अशा व ख्रिस्ती धर्म मानणाऱ्या एका समाजाचा किंवा गटाचा प्रदेश, अशी एक प्रकारची कल्पना त्या काळीं होती. त्याच-

प्रमाणें मुसलमानांचीही बाकीचे जे सगळे त्यांच्या धर्मांत नसलेले काफीर लोक त्यांच्याहून वेगळ्या अशा इस्लामच्या जगताची कल्पना होती.

परंतु ख्रिस्ती जग किंवा इस्लामी जग या कल्पना नुसत्या विचार-सृष्टींतल्या आणि त्याही अस्पष्ट अशा गोष्टी असून लोकांच्या रोजच्या प्रत्यक्ष व्यवहारावर त्यांचा कांहींच परिणाम झालेला नव्हता. कांहीं कांहीं विशेष प्रसंगीं ख्रिस्तधर्मीयांना इस्लामधर्मीयांविरुद्ध किंवा इस्लामधर्मीयांना ख्रिस्तधर्मीयांविरुद्ध युद्धें करावयाचीं असत. अशा वेळीं लोकांचीं मनें धार्मिक उत्साहानें भडकवून त्यांना लढण्याला तयार करण्यासाठीं अशा कल्पनांचा उपयोग करण्यांत येत असे. बाकी समाजामध्यें एक-राष्ट्रीयत्वाचें बंधन अद्यापि उत्पन्न झालेलें नसून त्याऐवजीं निराळ्याच प्रकारचें एक बंधन किंवा माणसामाणसांमधील परस्पर-संबंधाचें नातें त्या काळीं अस्तित्वांत होतें. हें नातें म्हणजे सरंजामी पद्धतींतून उत्पन्न झालेलें सरंजामशाहीचें बंधन किंवा नातें म्हणून म्हणतात तें होय. रोमचा पाडाव झाल्यानंतर त्या वेळपर्यंत चालत आलेली पश्चिम यूरपांतील जुनी समाजव्यवस्था पार नष्ट होऊन गेली होती. जिकडे तिकडे अव्यवस्था, अराजकता, अत्याचार आणि बळी तो कान पिळी असा प्रकार चालू झाला होता. ज्याच्यां हातांत सामर्थ्य असेल तो हातांत सांपडेल तें बळकावून बसे आणि दुसरा कोणी त्याच्याहून अधिक बलवान् मनुष्य येऊन त्यानें तें हिसकावून घेतलें नाहीं तोंपर्यंत त्याचा उपभोग त्याला घ्यावयास मिळे. त्यासाठीं मग मोठमोठे गड – किल्ले – बांधण्यास सुरुवात झाली. या किल्ल्यांचे स्वामी आपल्याबरोबर दरोडे घालणाऱ्या टोळ्या घेऊन बाहेर पडत, आजूबाजूच्या छोट्या छोट्या गांवांत लूटमार करीत ; कधीं कधीं त्यांना आपल्यासारख्याच दुसऱ्या कोणा किल्ल्याच्या मालकाशीं लढावेंही लागे. गरीब शेतकरी आणि शेतकाम करणारे मजूर यांना अर्थातच यांचा सर्वांत अधिक छळ सोसावा लागे. असा हा जो गोंधळ माजून राहिला होता, त्यांतूनच पुढें सरंजामी पद्धति निर्माण झाली.

या शेतकऱ्यांची आपसांत कसल्याच प्रकारची संघटना नव्हती. त्यामुळें या दरोडेखोर किल्ले-मालकांपासून – सरदारांपासून – आपलें संरक्षण करणें त्यांना शक्य होत नव्हतें. बरें, मध्यवर्ती राज्यसत्ता त्यांचें रक्षण करील म्हणावें तर अशी राज्यसत्ताही नव्हती. म्हणून आलेल्या प्रसंगांतून कशी तरी तोड काढावयाची म्हणून शेतकऱ्यांनीं लूटमार करणाऱ्या या किल्लेमालकांशीं तडजोडी केल्या. शेतकऱ्यांनीं शेतीचा जो माल उत्पन्न होईल त्यापैकीं कांहीं वांटा या दरोडेखोरांच्या नायकाला द्यावयाचा ; तसेंच त्याच्याकडे कांहीं एक प्रकारची सेवाचाकरीही करावयाची ; आणि याच्या मोबदल्यांत अशा सरदारानें मग त्यांची लूटमार करून त्यांना त्रास द्यावयाचा नाहीं ; आणि दुसरा कोणी सरदार तसें करावयास आला, तर त्याच्यापासूनही त्यांचें संरक्षण करावयाचें ; अशा प्रकारची ही तडजोड होती. अशाच रीतीनें छोट्या छोट्या किल्लेमालकांच्या मोठ-मोठ्या किल्लेमालकांशीं पण तडजोडी झाल्या. पण छोटा किल्लेमालक मोठ्या किल्ले-

मालकाला शेतांतला माल देण्याचें कसें कबूल करणार? कारण तो कांहीं स्वतः जमीन कसून कसला माल काढीत नव्हता किंवा तो स्वतः शेतमालक पण नव्हता. म्हणून त्यानें त्या मोठ्या किल्लेवाल्याकडे लष्करी चाकरी करण्याचें म्हणजेच जरूर पडेल तेव्हां त्याच्या बाजूनें लढण्याचें कबूल केलें. याच्या मोबदल्यांत मोठ्या किल्लेदारानें त्याला आपला मांडलिक समजून त्याचें संरक्षण करावयाचें. अशा रीतीनें एकेक पायरी चढत चढत हें गाडें एकापेक्षां एक मोठ्या सरदार-हक्कदारापर्यंत जातां जातां या सरंजामदारी संघटनेच्या अगदीं शिखरावरील जो राजा त्याच्यापर्यंत जाऊन पोंचलें. पण तेथेंच तें थांबलें नाहीं. स्वर्गांतसुद्धां त्यांच्या दृष्टीनें अशा या सरंजामी पद्धतीचें एक प्रकारें अस्तित्व होतें. पोप, ख्रिस्त आणि परमेश्वर अशा चढत्या पायऱ्यांच्या त्रिमूर्तींचा तेथें अधिकार व त्या सर्वांत श्रेष्ठ परमेश्वर अशी कल्पना बसविण्यांत आलेली होती.

रोमच्या पाडावानंतर यूरपमध्यें जी बंडाळी माजली होती तिच्यांतून जी समाज-व्यवस्था निर्माण झाली ती ही अशा प्रकारची. मुद्दाम लक्षांत ठेव, कीं या पद्धतींत या वेळीं मध्यवर्ती अशी एखादी राज्यसत्ता जवळजवळ नव्हतीच; आणि अशा कोणाचें पोलीसदल, किंवा अधिकारी-मंडळ अशीही कांहीं व्यवस्था नव्हती. एखाद्या जमिनीचा जो मालक असेल तोच त्या जमिनीचा आणि त्या जमिनींवर राहणाऱ्या सर्व लोकांचा मालक, अधिकारी, सर्व कांहीं असे. त्या लोकांचा तो छोटासा राजाच म्हणा ना. लोकांनीं त्याला जमिनींत होणाऱ्या मालापैकीं काहीं माल द्यावयाचा व त्याची चाकरी करावयाची आणि त्यानें त्यांचें संरक्षण करावयाचें. या जमीन-मालकाला स्वामी म्हणत आणि लोकांना भूदास म्हणत. असा हा जमीनदार प्रत्यक्षांत जरी मालक म्हणून वावरत असला, तरी तत्त्वतः त्याची जमीन कांहीं त्याच्या मालकीची समजली जात नसे. तर त्याच्या वरचा जो लॉर्ड किंवा सरदार, जमीनदार असेल, त्याच्या वतीनें ही जमीन या छोट्या सरदाराकडे दिलेली असून तो त्या मोठ्या जमीनदाराचा पोट-जमीनदार किंवा दुय्यम सरदार होय असें समजण्यांत येई व त्यासाठीं त्याला त्या मोठ्या जमीनदाराची लष्करी चाकरी पण करावी लागे.

धर्मपीठाचे अधिकारी सुद्धां या सरंजामशाहीमध्यें सामील असत. ते एकीकडे धर्मगुरू असत, तर एकीकडे सरंजामदार, जमीनमालक असत. अशा रीतीनें जर्मनीमध्यें जवळजवळ अर्धी जमीन आणि मालमत्ता बिशप आणि ॲबट अशा धर्मपीठांच्या अधिकाऱ्याच्या हातीं होती. प्रत्यक्ष पोपसुद्धां एक सरंजामदारच झाला होता.

या सर्व पद्धतींमध्यें एकापेक्षां एक श्रेष्ठ असे थर किंवा वर्ग असत, हें तुझ्या ध्यानांत आलें असेल. समतेची यामध्यें मुळीं कल्पना सुद्धां नव्हती. अगदीं तळाशीं होते भूदास, त्यांच्या वर ते छोटे जमीनदार, त्यांच्या वर मोठे जमीनदार, त्यापुढें त्यांच्याहून मोठे सरदार आणि शेवटीं राजा अशा प्रकारची ही मोठी समाजाची इमारत होती आणि तिचा सर्व आधार आणि भार पायामधल्या या भूदासांच्या माथ्यावर होता. त्याच्याच भरतीला बिशप, ॲबट, कार्डिनल वगैरे मोठे आणि इतर

सर्व छोटे धर्माधिकारी, धर्मगुरू, भिक्षुकवर्ग याच्यासुद्धां धर्मपीठाचा सर्व खर्चही भूदासांच्याच डोक्यावर लादला जावयाचा. हे जहागिरदार – सरंजामदार – जमीनदार, मग ते छोटे असोत किंवा मोठे असोत, कसलेंही धनधान्य किंवा मालमत्ता निर्माण होईल अशा प्रकारचें कांहीं एक काम करीत नसत. त्यांचा एकमेव धंदा म्हणजे लढण्याचा, आणि तो चालू नसेल तेव्हां शिकार करण्याचा किंवा लटुपुटीच्या लढाया किंवा मैदानी खेळ खेळण्याचा. अगदींच रानगट आणि अक्षरशत्रू अशा लोकांचें तें एक टोळकें असून लढणें किंवा खाणेंपिणें यावांचून इतर कसलेंच करमणुकीचें साधन त्यांच्या माहितीचें नव्हतें. त्यामुळें धनधान्य, खाद्यपदार्थ व आयुष्यातील इतर आवश्यक वस्तू निर्माण करण्याचें काम सर्वस्वीं केवळ शेतकरी आणि कारागीर लोक यांच्यावर पडे. या सर्व समाजव्यवस्थेच्या डोक्यावर एक राजा म्हणून असायचा आणि त्यालाही परमेश्वराचा एक दुय्यम सरंजामदारच समजावयाचें.

अशा प्रकारच्या कल्पनेच्या पायावर ही सरंजामशाहीची पद्धति उभारली गेली. तत्त्वतः या सरंजामदार-जहागिरदारांनीं आपल्या पोट-जमीनदारांचें आणि भूदासांचें संरक्षण केलें पाहिजे, अशी त्यांच्यावर जबाबदारी होती. पण प्रत्यक्षांत त्यांना विचारता कोणीच नव्हता; कीय वाटेल तें करायला ते मुखत्यार होते. कारण त्यांच्याहून जे खालचे वरिष्ठ जमीनदार होते ते किंवा प्रत्यक्ष राजा यांपैकीं कोणी त्यांच्यावर नियंत्रण असें क्वचितच चालवीत असे. आणि त्यांच्या मागण्यांना नाहीं म्हणण्याची भूदासांची कुवत नव्हती. त्याच्या मानानें हे जमीनदार स्वतः फारच प्रबळ असल्यामुळें त्यांच्याकडून ते जास्तींत जास्त वसूल करीत आणि त्यांना बिचाऱ्यांना कसेंबसें जिवंत राहतां येईल एवढेंच काय तें शिल्लक ठेवीत. साऱ्या जगांतील जमीन-मालकांचा हा नेहमींच चालत आलेला प्रघात आहे. जमिनींच्या मालकींतून पुढें सरदारवर्ग निर्माण झाला. मूळचा जो दरोडेखोर लढवय्या होता, तो लोकांच्या जमिनी लुबाडून तेथें किल्ला बांधून आता मोठा प्रतिष्ठित राव – सरदार – उमराव – लॉर्ड झाला. जमिनीच्या मालकीबरोबर सत्ताही आली; आणि या सत्तेच्या बळावर प्रत्यक्ष माल पिकविणारा शेतकरी, शेतमजूर किंवा कारखानदार आणि कारागीर यांच्याकडून जितका उकळता येईल तितका फायदा हे सरंजामदार उकळीत आलेले आहेत. आजवर सगळीकडे कायदेसुद्धां या जमीनमालकांच्या, सरंजामदारांच्या, रावांच्या फायद्याचे! कारण ते तरी त्यांनींच स्वतः किंवा त्यांच्या स्नेह्यासोबत्यांनीं केलेले. आणि म्हणूनच तर पुष्कळ लोकांना असें वाटूं लागलें आहे, कीं जमीन ही एकट्या व्यक्तीच्या मालकीची नसावी; ती साऱ्या समाजाच्या मालकीची असावी. जमीन जर अशा रीतीनें राज्याच्या किंवा समाजाच्या मालकीची झाली, तर त्याचा अर्थ त्या जमिनीवर जे राहतील त्या सर्वांच्या मालकीची ती होऊन तिच्यावर कोणालाही एकमेकांची पिळणूक करतां येणार नाहीं किंवा कोणावर कसला अन्याय्य बोजा टाकतां येणार नाहीं.

पण या सगळ्या कल्पना अजून पुढें उदंयाला यायच्या होत्या. आपण ज्या

काळाबद्दल बोलतों आहों त्या काळीं लोकांचे विचार अजून अशा प्रकारचे होऊं लागले नव्हते. सामान्य जनतेची परिस्थिति होती दैन्याचीच. परंतु आपल्यावरील अडचणींचें निवारण कसें करावें याचा त्यांना काहींच मार्ग उमगत नव्हता. म्हणून ते होईल तो सारा छळ सोशीत होते; आणि ज्यापासून त्यांचें कांहीं भलें होत नव्हतें असे श्रमसायास ते करीतच होते. आज्ञापालनाचें महत्त्व रोज ओरडून त्यांच्या हाडींमासीं ती संवय खिळवून टाकण्यांत आलेली होती; एकदां ही हुकमी संवय अंगीं बाणली, म्हणजे मग लोक खरोखर काय वाटेल तें सहन करतील. अशा रीतीनें एका बाजूला हे सरंजामदार–उमराव व त्यांचे नोकर-चाकर आणि दुसऱ्या बाजूला अत्यंत गरीब असे शेतकरी व कारागीर यांचा वर्ग, अशा प्रकारची समाजव्यवस्था या काळांत रंगारूपाला येतांना आपणांस आढळते. सरदारांच्या त्या भव्य दगडी कोटाभोंवतीं भूदासांच्या मातीच्या किंवा कुडामाडांच्या छोट्या छोट्या झोंपडयांचे पुंजके पुंजके असावयाचे. हीं दोन अगदीं निरनिराळीं जगेंच निर्माण होत होतीं; एक जमीनदार–उमरावांचें जग आणि एक भूदासांचें जग; आणि त्यातही भूदास म्हणजे आपल्या पाळीव जनावरांच्यापेक्षां थोडासा वरच्या दर्जाचा एक प्राणी अशीच बहुधा जमीनदारांची त्यांच्याबद्दल समजूत असावयाची.

केव्हां केव्हा छोट्या पाद्री लोकांनीं भूदासांचें आपल्या रावांच्या छळापासून रक्षण केल्याचें आढळून येतें. परंतु सामान्य नियम म्हणजे पाद्री आणि धर्मपीठांचे अधिकारी हे या रावांच्याच बाजूला असावयाचे; आणि बिशप व ॲबट लोक तर स्वतःच सरंजामी जमीनदार–राव–असावयाचे.

आपल्या इकडे हिंदुस्थानांत अगदीं थेट याच स्वरूपाची सरंजामशाही अस्तित्वांत नसली, तरी थोडाफार त्याच प्रकारचा नमुना आपल्याकडेही निर्माण होऊन गेलेला आहे. फार कशाला, अगदीं आजसुद्धां आमचीं हिंदी संस्थानें, त्यांमधील ते राजे, त्यांचे छोटेमोठे सरदार आणि लहानमोठे जहागिरदार यांनीं सरंजामदारशाहीच्या किती-एक चालीरीती जिवंत ठेवलेल्या आहेतच. हिंदुस्थानांतील जातिव्यवस्था ही या सरंजामशाहीहून अगदींच निराळ्या प्रकारची समाजव्यवस्था होती. परंतु तिच्या-मध्येंही समाजाचे निरनिराळे उच्चनीच वर्ग ठरविण्यांत आलेले आहेतच. मला वाटतें, मीं मागें एकदां तुला सांगितलेलें असावें, कीं चीनमध्यें मात्र अनियंत्रित सत्ताधारी किंवा कांहीं खास हक्क उपभोगणारा अशा तऱ्हेचा एखादा वर्ग निर्माण झाला नाहीं. त्यांच्यामध्यें फार प्राचीन काळीं जी परीक्षेची पद्धति सुरू झाली, तिच्यामुळें मोठ्यांत मोठी अधिकाराची जागा मिळण्याचा मार्ग कोणाही व्यक्तीला खुला झालेला होता. अर्थात् प्रत्यक्ष व्यवहारात त्या मार्गांत अनेक बंधनें आलेलीं असणार हें खरेंच.

तेव्हां अशा रीतीनें सरंजामशाहीमध्यें समता किंवा व्यक्तिस्वातंत्र्य या कल्पनांना स्थान नव्हतें. हक्क आणि कर्तव्यें यांबद्दलची एक प्रकारची कल्पना या समाज-व्यवस्थेच्या बुडाशीं होती. म्हणजे काय, तर जमिनींतील उत्पन्नापैकीं कांहीं भाग व

सेवाचाकरी घेण्याचा आपला हक्क आहे, आणि लोकांना संरक्षण देणें आपलें कर्तव्य आहे, असें धरून जमीनदारानें – रावानें – वागावयाचें होतें. परंतु जगांत नेहमींच हक्काची तेवढी आठवण राहत असते आणि कर्तव्याची जाणीव राहत नसते. आजही यूरपीय देशांत आणि हिंदुस्थानात मोठमोठाले जमीनदार आपणाला आढळतात. आपल्या कुंळाकडून हे प्रचंड रकमा वसूल करतात आणि स्वतः कसल्याही प्रकारचे श्रम करीत नाहींत; परंतु आपलें कांहीं कर्तव्य आहे याबद्दलची त्याची आठवण बुजून गेल्याला आतां कितीक युगें लोटून गेलीं आहेत!

यूरपमधील या प्राचीन रानटी टोळ्या मुळामध्यें व्यक्तिस्वातंत्र्याच्या इतक्या मोठ्या भोक्त्या असतांही ज्या सरंजामशाहीमध्यें त्यांचें तें स्वातंत्र्य अजिबात नाहींसें झालें, अशा सरंजामशाहीच्या आहारीं त्या हळूहळू कशा गेल्या याचें मात्र मोठें आश्चर्य वाटतें. पूर्वी ह्या टोळ्या आपला नायक आपणच निवडीत असत आणि नायकावरही त्यांचें नियंत्रण चालत असे. पण त्या ठिकाणीं आतां या नव्या पद्धतींत जिकडे तिकडे अनियंत्रित एकतंत्री झोंडशाही सुरू झालेली आढळते. निवडणुकीचें त्यांत आतां कोठें नांवसुद्धां राहिलें नाहीं. असा हा बदल कशामुळें घडून आला, हें मात्र मला निश्चयानें सांगतां येणार नाहीं. ख्रिस्ती धर्मपीठ ज्या प्रकारच्या तत्त्वांचा प्रसार करीत होतें, त्या तत्त्वामुळें कदाचित् व्यक्तिस्वातंत्र्यविरोधी कल्पनांचा प्रसार झाला असेल. त्यांच्या तत्त्वांप्रमाणें राजा हा या पृथ्वीवरील परमेश्वराची छायाच होऊन गेला; मग प्रत्यक्ष परमेश्वराच्या या छायेची अवज्ञा कोणीं कशी करावयाची किंवा त्याच्या कोणत्याही करण्याला बरेंवाईट तरी कसें म्हणावयाचें? त्याला हें कर किंवा तें करूं नको, असें कसें बोलावयाचें? सरंजामशाहीच्या पोतडींत स्वर्ग आणि पृथ्वी दोहोंचाही समावेश झालेला दिसत होता!

इकडे हिंदुस्थानमध्येंही प्राचीन भारतीयांची स्वातंत्र्याची कल्पना हळूहळू बदलत गेलेली दिसते. येथेंही हळूहळू त्यासंबंधींच्या भावना दुर्बल होत जाऊन पुढें स्वतंत्रतेच्या विचारांचें पूर्ण विस्मरणच झालेलें आढळतें. मध्ययुगीन भारतांत मात्र या कल्पनेची कांहीं अंशीं आठवण शिल्लक होती, असें शुक्राचार्यांच्या नीतिसारावरून आणि दक्षिणेतील शिलालेखांवरून दिसून येतें, हें मीं तुला दाखविलेंच आहे.

या ज्या नवीन सामाजिक परंपरा यूरपमध्यें निर्माण होत होत्या, त्यांतूनच पुढें थोडेंफार व्यक्तिस्वातंत्र्य यूरपमध्यें निर्माण झालें. जमीनदार आणि ज़ामिनी कसणारे लोक, राव आणि त्यांचे भूदास, यांशिवायही समाजांत आणखी कांहीं वर्ग होते. उदाहरणार्थ, कारागीर आणि व्यापारी. हे लोक तसें पाहिलें तर, आपापल्या धंद्याच्या क्षेत्रापुरतें कांहीं या सरंजामशाहींत समाविष्ट नव्हते. सुरुवातीच्या बंडाळीच्या काळांत व्यापार म्हणण्यासारखा नव्हताच आणि कारागिरीचे दिवसही भरभराटीचे नव्हते. परंतु हळूहळू व्यापारधंदा वाढूं लागला व कारागिरीचा माल बनविणारे आणि व्यापारधंदा करणारे लोक यांचें महत्त्व वाढूं लागलें. हे लोक संपत्तिमान् झाले आणि सरंजामदार –

जहागीरदार – राव लोक त्यांचेकडे कर्जाऊ रकमा मागण्यासाठीं जाऊं लागले. या लोकांनीं त्याना कर्जें देण्याचें कबूल केलें. परंतु त्याच्या मोबदल्यांत रावांकडून त्यांनीं आधीं कांहीं खास हक्क व सवलती मिळवून घेतल्या. या सवलतींमुळें त्यांचें बळ वाढलें. अशा रीतीनें मग रावांचा कोट आणि त्यांच्याभोंवतीं भूदासांच्या झोपड्याचे पुंजके अशी जी वसाहतीची पद्धति होती, तिच्या ऐवजीं छोटीं छोटीं शहरें निर्माण होऊं लागलीं. मध्यें एक कॅथेड्रल किंवा प्रार्थनामंदिर किंवा व्यापारी व कारागीर-संघाची कचेरीची इमारत आणि तिच्याभोंवतीं सगळीकडे घरें अशी या शहरांची रचना असे. व्यापारी आणि कारागीर यांनीं आपापले संघ स्थापन केलेले होते. या संघांची कचेरी एका मध्यवर्ती दिवाणखान्यामध्यें असे; अशा दिवाणखान्यांनाच पुढें टॉऊन हॉल म्हणजे नगर-भवन असें म्हणूं लागले.

अशीं हीं जीं शहरें निर्माण होऊं लागलीं होतीं – उदाहरणार्थ, कोलोन, फ्रांकफोर्ट, हॉंबर्ग वगैरे – तीं सरंजामदार – रावाच्या सत्तेला प्रतिस्पर्धी स्थानेंच बनूं लागलीं. व्यापारी व कारागीर यांचा या शहरांमधून एक नवीनच वर्ग समाजांत निर्माण होत गेला. हा वर्ग संपत्तिमान् होत जाऊन सरंजामदार – रावांची सत्ता न जुमानण्या-इतकी शक्ति त्याच्या ठिकाणीं निर्माण झाली. या दोन वर्गांमधील हा झगडा फार काळपर्यंत चालू होता; कित्येकदां स्वतः राजे लोक आपल्या सरदारदरकाराच्या सत्तेला भिऊन या शहरांच्या बाजूला जाऊन मिळतांना आढळतात. पण पुन्हा मी फार पुढच्या काळांत धांव घेऊं लागलों.

या पत्रांच्या सुरुवातीला मी तुला सागत होतों, कीं त्या पहिल्या काळीं एक-राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झालेली नव्हती. आपलें व्यक्तीचें कर्तव्य आणि आपल्या वरिष्ठ रावाबद्दल बाळगण्याची निष्ठा, एवढ्याच कल्पना लोकांना ठाऊक होत्या. त्या रावाची चाकरी करण्याबद्दल लोकांची प्रतिज्ञा असे; देशाची चाकरी करण्याबद्दल नव्हे. राजाचीसुद्धा त्यांना तशी म्हणण्यासारखी स्पष्ट कल्पना नव्हती. इतकें सामान्य जनतेंत आणि राजामध्यें अंतर होतें. रावानें, सरंजामदारानें जर राजा-विरुद्ध बंड केलें, तर लोक मानीत, कीं तो त्याचा प्रश्न आहे; आणि रावाचे मांडलिक किंवा दुय्यम जमीनदार हे मुकाट्यानें त्याचीच साथ करीत. पुढच्या काळांत एकराष्ट्रीयत्वाची जी कल्पना उदयास आली, तिच्याहून हें तंत्र अगदीं निराळें होतें.

५४

चीनमधून भटक्या टोळ्यांना पश्चिमेकडे पिटाळून देण्यांत येतें

५ जून, १९३२

फार दिवस होऊन गेले, मला वाटतें जवळजवळ एक महिना झाला असेल, मीं तुला चीन किंवा अतिपूर्वेकडील देश यांच्याबद्दल कांहीं लिहिलें नाहीं त्याला. यूरप, हिंदुस्थान आणि पश्चिम आशिया इकडील घडामोडींसंबंधींच आपण आतांपर्यंत विचार केला. त्यामध्यें आरबी लोक चोहोंकडे पसरून त्यांनीं अनेक देश जिंकले आणि यूरपखंड मागें पडून तेथें सगळीकडे अंधकार होऊन गेला व त्यामधून बाहेर पडण्याकरितां धडपड सुरू झाली, हें आपण पाहिलें. या सर्व काळांत चीनचें गाडें नुसतें चालू होतें, एवढेंच नव्हे, तर तें क्वचित् एखादा अपवाद सोडला तर फार चांगल्या रीतीनें चालू होतें. सातव्या आणि आठव्या शतकामध्यें तंग राजांच्या अमलाखालीं चीन देश हा साऱ्या जगांत जास्तींत जास्त सुधारलेला, जास्तींत जास्त संपन्न आणि जास्तींत जास्त चांगल्या प्रकारची राज्यव्यवस्था असलेला देश होता, असें म्हणता येईल. त्या काळच्या यूरपची तर चीनशीं तुलनासुद्धां करतां येणार नाहीं. कारण तिकडे रोमचा पाडाव झालेला असून सगळीकडे अतिशयच मागासलेपणा आलेला होता. इकडे उत्तर हिंदुस्थानमध्येंही हा सर्व काळ ओहोटीचाच होता. त्याहीं सुमारास, उदाहरणार्थ, हर्षाच्या अमलाच्या वेळीं हिंदुस्थानला केव्हां केव्हां ऐश्वर्याचे थोडेसे दिवस लाभलेले आढळतात ; परंतु एकंदरींत पाहतां येथेंही घसरगुंडीच सुरू झालेली होती. उत्तर हिंदुस्थानच्या मानानें दाक्षिण हिंदुस्थान पुष्कळच जोमांत होतें. आणि तेथील लोकांच्या समुद्रापलीकडच्या अड्‌कोर, श्रीविजय वगैरे वसाहती आपल्या महान् उदय-कालाच्या उंबरठ्यावर होत्या. परंतु त्या काळच्या चीनशीं ज्यांची कांहीं कांहीं बाबतींत बरीचशी बरोबरी पाहतां येईल अशीं फक्त दोनच राज्यें होतीं. तीं म्हणजे आरबांचीं बगदाद आणि स्पेन येथील राज्यें. परंतु हीं राज्यें सुद्धां वैभवशिखरावर अशीं, चीनच्या मानानें पाहतां, फारच थोडा काळ राहिलीं. तरीपण हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, कीं एकदां एका तंग बादशहाला जेव्हां गादीवरून हांकलून देण्यांत आलें होतें, त्या वेळीं त्यानें या आरबी लोकांचीच मदत मागितली आणि त्याच्याच मदतीनें त्यानें आपली सत्ता परत मिळविली.

तात्पर्य, त्या काळीं चीन देशाचा रथ चांगला सुधारणेच्या मार्गावर असून तत्कालीन यूरपीयांना चिनी लोक जर अर्धवट रानटी समजत असले, तर त्यांत त्यांना कांहीं दोष देतां येण्यासारखा नव्हता. त्या काळीं माहीत असलेल्या सर्व जगांत चीन

देश हाच सर्वश्रेष्ठ देश होता. माहीत असलेलें जग हे शब्द मी मुद्दाम वापरतों आहे. कारण त्या काळीं अमेरिकेंत कोणत्या घडामोडी चाललेल्या होत्या हें मला नीटसें ठाऊक नाहीं. या काळाच्या आधींच कित्येक शतकांपासून मेक्सिको, पेरू आणि या देशांच्या आसपासचे प्रदेश यांमध्यें भिन्न भिन्न प्रकारची सुधारणा नांदत होती, एवढें आपल्याला आतां ठाऊक झालेलें आहे. कांहीं कांहीं बाबतींत हे देश विशेष नांवाजण्यासारखे सुधारलेले होते ; तर कांहीं बाबतींत ते तितकेच मागासलेले होते. परंतु माझें या देशांबद्दलचें ज्ञान इतकें थोडें आहे, कीं त्यासंबंधीं विशेष तपशिलाचें असें मला कांहीं सांगतां येणार नाहीं. पण या देशांचा, मेक्सिको आणि मध्य अमेरिका यांमधील मय-सुधारणेचा आणि पेरूमधील इन्कांच्या राज्यांचा विसर तूं मात्र होऊं देऊं नकोस. माझ्याहून अधिक ज्ञान असणारे लोक तुला त्याबद्दल पुष्कळ अधिक उपयुक्त माहिती सांगूं शकतील. मला त्यांच्याबद्दल एक प्रकारची विशेष ओढ वाटते हें कबूल ; पण जितकी माझी ओढ मोठी आहे, तितकेंच मोठें माझें त्यांच्याविषयींचें अज्ञान आहे.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवायला मला तुला सांगावयाचें आहे. यापूर्वीच्या पत्रांमध्यें आपण पाहिलें, कीं मध्य आशियामध्यें पुष्कळशा भटक्या टोळ्या उत्पन्न होऊन त्या यूरप किंवा हिंदुस्थान या प्रदेशाकडे हल्ले करून गेल्या. हूण लोक, सिथियन लोक, तुर्क लोक, या आणि अशाच इतर वंशांच्या एकामागून एक लाटाच जणुं आल्या. श्वेत हूण हिंदुस्थानमध्यें आले आणि ॲटिलाचे हूण यूरपमध्यें गेले, हें तुला आठवत असेल. बगदादचें साम्राज्य काबीज करणारे सेल्जुक तुर्क हेही मध्य-आशियामधून आलेले होते. त्यांच्यामागून ज्यांना आटोमन म्हणजे उस्मानी तुर्क म्हणत, त्या तुर्कांची दुसरी एक शाखा येऊन तिनें कॉन्स्टान्टिनोपलचें साम्राज्य पूर्ण जिंकून घेतलें आणि थेट व्हिएन्नाच्या तटापर्यंत मोर्चा नेला. मध्य आशिया किंवा मंगोलिया यांमधूनच मंगोलियन लोक निघाले; हे मोठे क्रूर लोक असून त्यांनीं थेट यूरपपर्यंतचा देश जिंकला आणि चीन देशही आपल्या अमलाखालीं आणला. त्यांच्याच वंशजांपैकीं एकानें पुढें हिंदुस्थानांत आपलें राजघराणें आणि साम्राज्य स्थापन केलें. आणि त्या घराण्यांत पुढें पुष्कळ प्रसिद्ध राजे उदयास आले. अर्थात् या घटना पुढच्या काळांत घडून आलेल्या आहेत.

मध्य आशिया व मंगोलिया यांमधील या भटक्या टोळ्यांशीं चीनचें सतत युद्ध चालू होतें. किंवा खरें म्हणजे, हे भटके लोकच चीनला एकसारखे हल्ले करून त्रास देत आणि चीनला स्वसंरक्षणासाठीं म्हणून लढणें भाग पडे. या लोकांपासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून तर चीनची ती प्रचंड भिंत बांधण्यांत आली. तिचा कांहीं थोडासा उपयोगही झाला, नाहीं असें नाहीं ; परंतु बाहेरच्या हल्ल्यांपासून संरक्षण करावयाला अशा बिचाऱ्या भिंतीचा कितीसा उपयोग होणार ? दरेक बादशहाला या टोळ्यांना मागें हटविण्याकरितां लढाया कराव्या लागतच. या टोळ्यांना मागें हटवितां

हटवितांच चीनचें साम्राज्य, मीं तुला मागें सांगितल्याप्रमाणें, कॅस्पियन समुद्रापर्यंत वाढत गेलें. चिनी लोकांना स्वभावतः साम्राज्यवर्धनाची मोठीशी आवड नव्हती. त्यांच्यामधील कांहीं कांहीं बादशहांना देश जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असून ते साम्राज्यवादी होते असें म्हणतां येईल. पण जगांतल्या इतर लोकांच्या मानानें पाहतां चिनी लोक हे शांततापिय असून युद्धें आणि देश जिंकणें या गोष्टींची त्यांना आवड नव्हती. चीनमध्यें योध्यापेक्षां विद्वान् माणसाला नेहमीं अधिक मान मिळत आलेला आहे. असें असूनही कांहीं कांहीं काळीं चीनच्या साम्राज्याचा विस्तार फारच प्रचंड वाढलेला आढळतो याचें कारण उत्तरेकडून आणि पश्चिमेकडून या भटक्या टोळ्यांचे जे हल्ले होत किंवा जे उगीच चिमटे घेण्याचे प्रयत्न होत, त्यामुळें आलेली चीड हें होय. चिनी बादशहा फारच प्रबळ होते. म्हणून ही कटकट कायमची मिटवून टाकावी यासाठीं त्यांनीं या टोळ्यांना पश्चिमेकडे फार दूरवर पिटाळून लावलें. याचा अर्थ ही कटकट अगदीं कायमची त्यांना मिटवितां आली असें नव्हे; परंतु कांहीं काळ तरी त्यांना शांतता मिळाली.

पण चिनी लोकांना जी ही उसंत मिळाली तिचा वचपा मात्र दुसऱ्या देशांवर आणि लोकांवर निघाला. कारण चिनी लोकांनीं तिकडून हांकून दिल्यावर या भटक्या लोकांनीं दुसऱ्या बाजूला जाऊन इतर देशांवर हल्ले केले. ते हिंदुस्थानमध्यें आले. यूरपमध्यें तर त्यांनीं वारंवार हल्ले केले. चीनमधील हानवंशीय बादशहांनीं उधळून लावलेले हूण, तार्तर आणि इतर भटक्ये लोक दुसऱ्या देशांवर जाऊन आदळले; आणि तंग घराण्यांतील राजांनीं तुर्कांची भेट यूरपला पाठवली.

अशा रीतीनें पुष्कळ काळपर्यंत चिनी लोकांना या भटक्या लोकांपासून आपलें संरक्षण करण्यांत यश मिळालें खरें. पण आतां आपण अशा काळाशीं आलों आहोंत, कीं त्या वेळीं मात्र त्यांना या प्रयत्नांत इतकेंसें यश लाभलेलें आढळत नाहीं.

जगांतील सर्वच राजघराण्यांत जो एक नित्यक्रम आढळतो, त्या नित्यक्रमानेंच या तंग घराण्यांतही अखेरीअखेरीला पुष्कळशा नालायक अशा राजांची रांग सुरू झाली आणि त्यामुळें त्या घराण्याच्या यशोदीपाची ज्योत मंदमंद होत गेली. आपल्या पूर्वजांच्या गुणांपैकीं एकही गुण या पुढच्या पुढच्या राजांजवळ नव्हता. पण त्यांचें ऐश्वर्यप्रेम व विलासप्रेम मात्र त्यांच्या ठिकाणीं भरपूर होतें. देशांत लांचलुचपत खूप वाढली होती. त्यांतच भरीला करांचें ओझें फार अवजड झालें होतें; आणि अर्थातच या सगळ्यांचा भार बहुतांशीं गरिबांनाच सोसावा लागत होता. त्यामुळें लोकांमध्यें असंतोष वाढीस लागून दहाव्या शतकाच्या सुरुवातीला, इ. स. ९०७ मध्यें तंग घराण्याचा पाडाव झाला.

यानंतर अर्ध्या शतकापर्यंत एकामागून एक अगदींच क्षुद्र आणि कवडी किंमतीचे राजे गादीवर आले. इ. स. ९६० मध्यें मात्र पुन्हां चीनमधील आणखी एका मोठ्या राजवंशाच्या अमलाला सुरुवात झाली. कौत्सु किंवा कौचू नांवाच्या राजानें स्थापन

केलेलें हें तें सुंग घराणें होय. परंतु सरहद्दीवर आणि आंतही कटकटी व बंडाळी ही चालू होतीच. शेतावरील अवजड करांचें ओझें शेतकऱ्याला असह्य झाल्यामुळें त्याबद्दल शेतकऱ्यांमध्यें फारच असंतोष माजलेला होता. हिंदुस्थानांतल्याप्रमाणें तेथेंही शेतीवरील करांची वगैरे सर्वच पद्धति लोकांना अगदीं दुःसह होऊन गेली असून ती अजिबात बदलल्याशिवाय कसलीही शांतता होणें किंवा प्रगति होणें शक्य नव्हतें. परंतु असे आमूलाग्र फरक इतक्या सहजासहजीं कधींच होत नसतात. प्रचलित पद्धतीपासून वरच्या थरामधील लोकांचा फायदा होत असतो आणि म्हणून तिच्यांत कोणी बदल करूं लागल्यास ते त्यांना कसून विरोध करतात. परंतु लोकांनीं आपण होऊन जर वेळेवर असा बदल केला नाहीं, तर तो नको म्हटल्यामुळें घडून यायचा थांबतो, असें मात्र नाहीं. न बोलावतांही हा नव्या बदलाचा पाहुणा घरांत शिरतोच आणि सगळी उलथापालथ करून टाकतोच.

तंग राजवंशानें असा काळाला अनुसरून असलेला बदल केला नाहीं यामुळेंच त्या राजवंशाचा पाडाव झाला. सुंग घराण्यालाही याच कारणामुळें सतत त्रास सहन करावा लागला. त्याच्या राज्यांत एक मनुष्य मात्र असा निर्माण झाला होता, कीं ज्याच्या अंगीं असा बदल घडवून आणण्याबद्दलचें ज्ञान व सामर्थ्य दोन्ही होतीं; आणि परिस्थिति अगदींच प्रतिकूल नसती, तर त्याला यश आलेंही असतें. सुंग राजांचा अकराव्या शतकामधील एक मुख्य प्रधान वांग आन् शी हा तो गृहस्थ. मीं तुला सांगितलेंच आहे, कीं चीनच्या भूमीवर कॉन्फ्यूशिअसच्या विचारांचा पगडा होता. सर्व चिनी अधिकाऱ्यांना कॉन्फ्यूशिअसच्या ग्रंथाचें अध्ययन करून परीक्षा द्यावी लागे आणि कॉन्फ्यूशिअसनें लिहून ठेवलें त्याच्या बाहेर जाण्याची कोणाची छाती नसे. वांग आन् शी हा सुद्धां या कॉन्फ्यूशिअसच्या शिकवणीच्या विरुद्ध प्रत्यक्ष गेला नाहीं. परंतु त्याच्या लिहिण्याचा त्यानें मोठा कौतुक करण्यासारखा अर्थ लावला. अडचणींतून मार्ग काढण्याची चतुर लोकांची ही नेहमींचीच एक रीत आहे. वांगच्या कांहीं कल्पना अगदीं आधुनिक काळाला साजेशा होत्या. त्याचा सगळा खरा हेतु गरिबांवरील करांचें ओझें कमी करून ज्यांना कर देण्याचें सामर्थ्य होतें अशा श्रीमंतांवर कर बसवावयाचे हाच होता. त्यानें जमिनीवरील करांचें प्रमाण कमी केलें आणि पैशांच्या स्वरूपांत कर भरणें जर कठिण वाटलें तर धान्य अथवा इतर शेतमाल यांच्या स्वरूपांतही कर भरावा, अशी त्यानें सवलत दिली. श्रीमंतांच्याकडून त्यानें प्राप्तीवरील कर घेण्यास सुरुवात केली. हा कर आजच्या आधुनिक काळीं शोधून काढलेला एक कर असें समजतात. परंतु ९०० वर्षांपूर्वीं चीनमध्यें प्रत्यक्ष त्याची योजना झालेली आढळते. शेतकऱ्यांना मदत म्हणून सरकारनें पैसे कर्जाऊ द्यावे आणि त्यांनीं ते सराईच्या मोसमांत परत करावे, अशीही एक वांगची योजना होती. धान्याच्या व शेतमालाच्या किमतींत चढउतार फार होत असत; ही एक अडचण त्याच्या मनांतून दूर करावयाची होती. कारण बाजार पडला म्हणजे शेतकऱ्याला आपल्या मालाच्या

मोबदल्यांत कांहींच मिळत नसे. म्हणून त्यांना माल तर विकता येत नाहीं; पण त्यामुळें कर देण्यासाठीं किंवा इतर कांहीं जरुरीच्या वस्तू खरेदी करण्यासाठीं त्यांच्याजवळ पैसा येत नाहीं. वांग आन शीनें याही प्रश्नावर तोड काढण्याचा प्रयत्न केला; त्याची योजना अशी होती, कीं धान्याच्या किंमतींत चढउतार होऊं नये म्हणून सरकारनेंच स्वतः हा माल खरेदी करून विक्रीचें काम करावें.

वांगची आणखीही एक योजना अशी होती, कीं सार्वजनिक कामासाठीं कोणावरही मजुरीची सक्ती होता कामा नये आणि प्रत्येक मनुष्याला त्याच्या कामाबद्दल भरपूर वेतन मिळालेंच पाहिजे. त्यानें पौ विया या नावाचें एक स्थानिक लष्करही संघटित केलें होतें. परंतु वांगच्या या साऱ्या योजना त्याच्या काळाच्या मानानें फारच न झेपण्यासारख्या असल्यानें लौकरच त्या साऱ्या कोसळून पडल्या. एक त्याची लष्कराची योजना तेवढी ८०० वर्षांहून अधिक काळपर्यंत चालू राहिली.

आंपल्यापुढें उभे असलेले सामाजिक प्रश्न योग्य रीतीनें सोडवितां न आल्यामुळें सुंग घराण्यांतील राजांची सत्ता यापुढें हळूहळू दुबळी पडत गेली. उत्तरेकडून खितान नांवाच्या रानटी लोकांचें दडपण आलें. त्याला त्यांना तोंड देतां आलें नाहीं. या लोकांना मागें पिटाळून लावणें अशक्य झाल्यामुळें वायव्येकडील किन किंवा सुवर्ण तार्तार नांवाच्या दुसऱ्या एक असुधारलेल्या टोळीला त्यांनीं आपल्या मदतीला येण्याची विनंति केली. त्याप्रमाणें हे किन लोक आले; त्यांनीं खितान लोकांना पिटाळूनही लावलें; परंतु त्यांनीं स्वतःच चीनमध्यें मुक्काम केला आणि परत जाण्याचें अजिबात नाकारलें. दुसऱ्या प्रबळ देशाची अथवा व्यक्तीची मदत मागणाऱ्या दुर्बळ देशाचें किंवा व्यक्तीचें हें कायमचेंच ठरलेलें नशीब आहे. या किन लोकांनीं चीनचा उत्तर भाग आपल्या कबजांत घेतला आणि पेकिंग येथें आपली राजधानी केली. सुंग राजे खालीं दक्षिणेकडे सरकले आणि किन लोक जसजसे पुढें येत गेले, तसतसे ते अधिक अधिक माघार घेत घेत आपल्या राज्याचा संकोच करीत गेले. अशा रीतीनें चीनमध्यें उत्तरेस किन लोकांचें साम्राज्य आणि दक्षिणेस सुंग घराण्याचें साम्राज्य, अशी व्यवस्था झाली. सुंग राजांना मग दक्षिणेकडील राजे असें नांव मिळालें. सुंग घराण्याचा अम्मल उत्तर चीनमध्यें असतांना इ. स. ९६० पासून ११२७ पर्यंत चालला. दक्षिण चीनमध्यें त्यांनीं आणखी दीडशें वर्षें राज्य केलें; पण अखेरीस मोंगल लोकांनीं येऊन इ. स. १२६० मध्यें त्यांचा पूर्ण नाश केला. परंतु प्राचीन हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच चीननेंही या मोंगल लोकांना निराळ्याच रीतीनें प्रतिकार केला. चिनी लोकांनीं त्यांना आपल्यामध्यें सामील करून पूर्ण एकजीव करून टाकलें आणि त्यांना अगदीं नमुनेदार चिनीच बनवून टाकलें.

अशा रीतीनें अखेरीस चीनला दोन भटक्या टोळ्यांच्या आहारीं जावें लागलें. परंतु त्यांच्या आहारीं जातांजातांनाच चीननें त्या टोळ्यांनाच सुसंस्कृत केलें. त्यामुळें

आशिया किंवा यूरप खंडांतील इतर देशांतल्याप्रमाणें चीनला त्याच्यापासून त्रास सहन करावा लागला नाहीं.

सुंग राजवंश हा उत्तरेंत असतांना काय किंवा दक्षिणेंत असतांना काय, केव्हांच तंग राजवंशाइतका राजकीय दृष्ट्या समर्थ नव्हता. परंतु तंग घराण्याच्या वैभवशाली काळांतील कलांची परंपरा मात्र त्यांनीं चालू ठेवली; इतकेंच नव्हे, तर तिच्यामध्यें प्रगतीही केली. दक्षिणेंतील सुंग राजांच्या कारकीर्दींत दक्षिण चीनमध्यें कला आणि काव्य यांची फारच भरभराट झाली आणि पुष्कळ मोठमोठीं चित्रें रंगवलीं गेलीं; यांमध्यें निसर्गांमधील देखाव्यांचीं चित्रें विशेष आहेत; कारण सुंगकालीन कलावंतांना निसर्गाची फार आवड होती. कलावंतांच्या बोटांच्या स्पर्शांच्या योगानें त्यांच्या मातीच्या भांड्यांनाही सौंदर्याची जोड त्या वेळेपासून मिळूं लागलेली आढळते. मातीवरील भांड्यांचें नक्षीकाम पुढें पुढें सुंदर होत जाऊन दोनशें वर्षांनंतर मिंग राजांच्या कारकीर्दींत अत्यंत अद्भुत सौंदर्यशाली अशीं मातीचीं भांडीं तयार होऊं लागलीं. चीनमधील मिंग काळांतील मातीचें भांडें म्हणजे या आधुनिक काळांतही मनाला विशेष अपूर्व आल्हाददायक वाटतें.

५५

जपानमधील शोगूनांचें राज्य

६ जून, १९३२

चीनमधून पिवळा समुद्र ओलांडून जपानमध्यें जाणें सोपें आहे. म्हणून आतां आपण इतके जवळ आलोंच आहों तर जाऊन येऊं या तिकडे एकदां. मागच्या खेपेला आपण इकडचा फेरफटका करून आलों तो आठवतो का तुला ? प्रथम तिथें कितीएक घराण्यांमध्यें वर्चस्वाकरतां झगडे होतां होतां एक मध्यवर्ती सत्ता उदयास येऊं लागलेली आपण पाहिली. मूळचा एका अत्यंत मोठ्या आणि बलिष्ठ टोळीचा नायक पुढें या मध्यवर्ती सत्तेचा प्रमुख बादशहा बनला. मध्यवर्ती सत्तेचें प्रतीक म्हणून नारा येथें राजधानी वसविण्यांत आली. त्यानंतर ती तेथून बदलून किओटो येथें नेण्यांत आली. राज्यव्यवस्थेच्या बाबतींत चिनी परंपरांची नक्कल करण्यांत आली; कला, धर्म, राजकारण, वगैरेंच्या बाबतींत बाहेरून जें कांहीं घेण्यांत आलें, तें सगळें चीनच्या मार्फतीनें घेण्यांत आलें. प्रत्यक्ष देशाचें नांव दै निपॉन हें सुद्धां चीनमधूनच आलें.

हें जसें आपण पाहिलें त्याचप्रमाणें फुजीवार नांवाच्या एका घराण्यानें सगळी सत्ता आपल्याच हातीं बळकावून बादशहांना आपल्या हातचें बाहुलें कसें केलें हेंही आपण पाहिलें. या घराण्याची सत्ता अशा रीतीनें दोनशें वर्षें चालली. त्यांची सत्तेची पकड

इतकी कठिण असे, कीं बादशहांना आपलें जिणें अगदीं असह्य होऊन ते राज्यत्याग करून मठवासी होत. परंतु भिक्षु झाल्यानंतर सुद्धा माजी बादशहा आपल्या मागून गादीवर आलेल्या आपल्या मुलाला सल्ला देण्याच्या मिषानें राज्यकारभारांत गडबड चालू ठेवीतच. अशा रीतीनें फुजीवार घराण्याच्या वर्चस्वाला खो देण्याची ही एक युक्ति होती. हा मोठाच द्राविडी प्राणायाम होता हें खरें; परंतु त्यामुळें फुजीवार घराण्याची सत्ता कमी झाली हेंही खरें. एकामागून एक राज्यत्याग करून जे बादशहा भिक्षू होत गेले, त्यांच्या हातीं खरी सत्ता हळूहळू येत गेली. यासाठीं या बादशहांना मठवासी बादशहा म्हणून म्हणतात.

दरम्यान जपानी समाजांत आणखीही घडामोडी होतां होतां जमीनदार असून शिवाय लढवय्ये असणारे अशा लोकांचा एक नवीन वर्ग निर्माण झाला. फुजीवार घराण्यानें हे जमीनदार निर्माण करून त्यांच्याकडे सरकारी कर वसूल करण्याचें काम सोंपविलें होतें. त्यांना दाइम्यो म्हणत. याचा अर्थ महान् नांवाचे म्हणजेच नामवंत किंवा नामदार असा आहे. ब्रिटिश लोक आपल्याकडे येण्यापूर्वी कांहीं थोडे दिवस आपल्या प्रांतांत असाच एक वर्ग निर्माण झाला होता हें पाहून मौज वाटते. त्याची जपानमधल्या या नव्या वर्गाशीं तुलना करण्यासारखी आहे. विशेषतः अयोध्या प्रांतामध्यें राजानें स्वतः दुर्बल असल्यामुळें अशा प्रकारचे कर वसूल करणारे लोक नेमले होते. सक्तीनें कर वसूल करतां यावा म्हणून हे लोक स्वतःजवळ थोडेंसें स्वतःचें असें सैन्य बाळगीत; आणि वसूल झालेला कर बहुतेक सगळा आपल्याच खिशांत ठेवीत. या कर वसूल करणाराचेच पुढें मग कांहीं कांहीं ठिकाणीं मोठमोठे तालुकदार झाले.

दाइम्यो लोकांजवळही स्वतःचे नोकरचाकर, शिपाई आणि छोटेंसें सैन्य असे. त्यामुळें बलिष्ठ होऊन ते एकमेकांत लढूं लागले व कियोटो येथील मध्यवर्ती राज्याला जुमानीनातसे झाले. या दाइम्योंमध्यें तैरा आणि मिनामोटो हीं दोन घराणीं प्रमुख होतीं. त्यांनीं बादशहाला इ. स. ११५६ मध्यें फुजीवार घराण्याला दडपून टाकण्यांत साहाय्य केलें. परंतु त्यानंतर या दोन घराण्यांचेंच परस्परांशीं युद्ध जुंपलें. त्यामध्यें तैरा घराण्याचा जय झाला, आणि पुढें केव्हां आपल्या विरुद्ध कसलीही गडबड उपस्थित करण्याचा संभव सुद्धां राहूं नये याच हेतूनें बहुधा त्यांनीं शत्रु-घराण्याची कत्तल केली. चार लहान मुलें सोडून बाकी मिनामोटो घराण्यांतील सर्व लोक त्यांनीं ठार केले. या चार मुलांत योरीटोमो या नांवाचा एक बारा वर्षांचा मुलगा होता. तैरा घराण्यानें इतका सगळा प्रयत्न केला तरीही तो अपुराच ठरला. त्यांनीं योरीटोमो हा काय तो एक लहान मुलगा म्हणून त्याला सोडलें; परंतु हाच योरीटोमो जसजसा मोठा होत गेला तसतसा त्याच्या मनांत तैरा घराण्याविषयीं तीव्र द्वेष वाढत जाऊन सूड घेण्याच्या इच्छेनें त्याचें सर्व अंतःकरण व्यापून गेलें. त्याला सूड घेण्यांत यशही आलें; राजधानींतून त्यानें तैरा घराण्याला हांकलून लावलें आणि एका आरमारी लढाईंत त्यांचा चक्काचूर केला.

आतां योरीटोमो हा सर्वसत्ताधीश झाला. बादशहानें त्याला सी-ए-ताय् शोगून

अशी भली थोरली पदवी दिली. तिचा अर्थ रानटी लोकांना पराभूत करणारा महान् सेनापति असा आहे. ही गोष्ट इ. स. ११९२ सालची. ही पदवी आनुवंशिक असून तिच्याबरोबर राज्यकारभाराचा संपूर्ण अधिकारही प्राप्त होई. शोगून, हाच खरा राज्य करणारा असे. अशा रीतीनें जपानमध्यें शोगूनशाही सुरू झाली. ही शोगूनशाही फार दीर्घ काळपर्यंत – जवळजवळ ७०० वर्षेंपर्यंत चालून अगदीं आधुनिक काळांत जपाननें आपलें सरंजामदारशाहीचें कवच फोडून टाकून नव्या जगांत प्रवेश केला, तेथपर्यंत टिकून राहिली होती.

परंतु याचा अर्थ योरिटोमोच्या घराण्यांतलेच लोक ७०० वर्षेंपर्यंत शोगूनचें पद उपभोगीत राहिले असा मात्र नव्हे. शोगूनचें पद पुष्कळ निरनिराळ्या घराण्यांतील लोकांच्या हातीं जात राहिलें. आपापसांत त्यासाठीं पुष्कळदां यादवीही होई. परंतु शोगून हाच एकमेव खरा सत्ताधीश असावयाचा, बादशहाच्या नांवानें त्यानें राज्यकारभार करावयाचा, खुद्द बादशहाला जवळजवळ काहींच सत्ता नसावयाची, ही व्यवस्था मात्र या सर्व दीर्घ काळांत जशीच्या तशी टिकून राहिली. मधून-मधून कितीएक वेळां असेंही घडे, कीं शोगूनची सत्ताही निव्वळ नांवालाच असे आणि खालच्या पुष्कळशा अधिकाऱ्यांनींच सत्ता बळकावलेली असे.

योरिटोमोला कियोटो येथील राजधानीमधील ऐश्वर्य आणि विलास यांनीं युक्त अशा त्या जीवनाचें भय वाटलें. तेथल्या त्या चैनी जीवनामुळें स्वतःच्या ठिकाणीं आणि आपल्या सहकाऱ्यांमध्येंही दुबळेपणा येईल असें त्याला वाटे. म्हणून त्यानें कामाकुरा येथें आपलें लष्करी ठाणें स्थापन केलें. त्यामुळें या पहिल्या शोगूनशाहीला कामाकुराची शोगूनशाही असें म्हणतात. इ. स. १३३३ पर्यंत म्हणजे सुमारें दीडशें वर्षें तिचा अम्मल चालला. या काळांत जपानमध्यें बहुतेक एकसारखी शांतता होती. आधींच्या कितीएक वर्षांच्या यादवीनंतर आलेले हे शाततेचे दिवस लोकाना हवेहवेसेच होते; त्यामुळें एक प्रकारची भरभराटही समाजामध्यें उत्पन्न झाली. तत्कालीन यूरपमधील कोणत्याही देशांतल्यापेक्षां याकाळची जपानची स्थिति खात्रीनें अधिक चांगली आणि तेथील राज्यव्यवस्था खात्रीनें अधिक कार्यक्षम होती. जपान देश हा चीनचा चांगलाच पट्टशिष्य झाला होता. परंतु दोन्ही देशांच्या मनोभूमिकेंत मात्र फारच मोठा फरक होता. मीं पूर्वीं म्हटल्याप्रमाणें चीन देश हा स्वभावतः शांततापिय आणि स्थिरप्रकृति देश होता. उलटपक्षीं, जपान हा आक्रमणशील प्रवृत्तीचा, लढाऊ देश होता. चीनमध्यें शिपायाला हीन दर्जाचा मानीत आणि लढण्याचा पेशा विशेषसा अब्रूदार समजत नसत. तर जपानमध्यें लढवय्ये लोक सर्वश्रेष्ठ स्थानीं असत आणि दाइम्यो होणें किंवा लढवय्या वीर होणें हें एक मोठेंच ध्येय मानलें जाई.

तेव्हां जपाननें चीनपासून जरी पुष्कळ गोष्टी शिकून घेतल्या असल्या, तरी त्या जशाच्या तशा कांहीं घेतल्या नाहींत. जें घेतलें तें आपल्याला हवें तसें आणि तेवढेंच घेतलें आणि आपल्या लोकांच्या प्रवृत्तीशीं त्याचा बिनतोड सांधा बसेल असें त्याचें

रूपांतर केलें. जपानचा चीनशीं नित्य अगदीं निकट संबंध चालू राहिला; व्यापार-धंदाही चालू राहिला; परंतु मालाची वाहतुक मात्र बहुतेक सर्व चिनी जहाजांमधून होत असे. तथापि तेराव्या शतकाच्या अखेरीला या दोन्ही गोष्टींत एकदम खंड पडला. कारण त्या सुमारास चीनमध्यें आणि कोरियामध्यें मोंगल लोकांचा प्रवेश झाला. या मोंगल लोकांनीं जपान जिंकण्याचाही प्रयत्न केला, परंतु त्यांत त्यांना माघार घ्यावी लागली. त्यामुळें या मोंगल लोकांनीं इकडे जरी आशियाचें रंगरूपच बदलून टाकलें असलें आणि यूरप खंडाला चांगलाच हादरा दिला असला, तरी जपानवर त्यांचा म्हणण्यासारखा कांहीं परिणाम झाला नाहीं. जपानमध्यें पूर्वीचाच क्रम पुढें चालू राहिला. बाहेरच्या जगाशीं अधिकाधिकच त्याचे संबंध तुटत जाऊन बाहेरचे नवीन वारे तेथें फिरकेनासेच झाले.

जपानच्या प्राचीन दरबारी कागदपत्रांत जपानमध्यें कापसाचें झाड प्रथम कसें आलें याबद्दलची एक हकिकत दिली आहे. तिचा सारांश असा, कीं कांहीं हिंदी लोकांचें जहाज इ. स. ७९९ मध्यें जपानच्या किनाऱ्याजवळ बुडाल्यामुळें ते जपानला आले; त्यांच्याजवळ कापसाचें बीं होतें तें त्या वेळीं प्रथम जपानमध्यें लागवडीस आणलें गेलें.

चहाची लागवड यानंतर झाली. प्रथम त्याची सुरुवात नवव्या शतकाच्या प्रारंभीं झाली; पण तेव्हां ती यशस्वी झाली नाहीं. पुढें इ. स. ११९१ मध्यें एका बुद्धभिक्षूनें चीनमधून चहाचें बीं नेलें, आणि त्यानंतर लौकरच जपानांत चहाची चहा वाढली. चहा पिण्यामुळें चांगल्या मातीच्या भांड्यांना मागणी सुरू झाली. तेराव्या शतकाच्या अखेरीस एक जपानी कुंभार चीनमध्यें चिनी मातीचीं भांडीं करण्याची कला शिकण्यासाठीं गेला. सहा वर्षें त्यानें ही कला शिकण्यासाठीं चीनमध्यें घालविलीं. परत आल्यावर जपानमध्यें तशींच सुंदर भांडीं तयार करण्यास त्यानें सुरुवात केलीं. चहा पिणें म्हणजे जपानमध्यें आज एक मोठी कलेची गोष्ट होऊन राहिलेली आहे. आणि त्याचें तेथें एक मोठेंच गुंतागुंतीचें तंत्र वाढलेलें आहे. जपानला तूं जाशील तेव्हां तेथील चहा पिण्याची ती शिष्ट पद्धति तुला शिकावी लागेल. नाहीं तर लोक तुला कोणी तरी एक रानटी स्त्री समजतील!

५६

मानवाची ज्ञानलालसा

१० जून, १९३२

चार दिवसांपूर्वी मीं तुला बरेली तुरुंगामधून पत्र लिहिलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं माझें सर्व सामानसुमान बांधून मला बाहेर पडावयास सांगण्यांत आलें. म्हणजे सुटण्यासाठीं नव्हे हो, तर येथून दुसऱ्या तुरुंगांत बदलून जाण्यासाठीं. म्हणून मग आज चार महिने ज्या बराकींत काढले तेथल्या आमच्या जोडीदाराचा निरोप घेतला, जिच्या आसऱ्याला बसून इतके दिवस काढले त्या आमच्या भल्या भक्कम चोवीस फूट उंच भिंतीचें शेवटचें दर्शन घेतलें आणि थोडा वेळ बाहेरच्या जगाचें दर्शन घेण्यासाठीं कूच केलें. आम्हां दोघांची तुरुंग-बदली व्हावयाची होती. पण आम्हांला कांहीं बरेली स्टेशनवर नेणार नव्हते; कारण लोक आम्हांला पाहतील; आम्ही आता पडदानशीन झालों आहों; लोकांच्या नजरेस आम्हांला कसें पडून चालेल? म्हणून मोटारीनेंच, पन्नास मैल दूर, एका आडरानांतल्या स्टेशनवर आम्हांला नेण्यांत आलें. मोटारच्या त्या प्रवासानें मात्र मला फार बरें वाटलें. रात्रीचा गार वारा मोठा मधुर होता आणि तुरुंगांतील कित्येक महिन्यांच्या एकांतवासानंतर रात्रीच्या त्या अंधुक प्रकाशामध्यें वृक्ष, पशू, आणि माणसें यांचीं तीं भुतासारखीं दृश्यें, जीं डोळ्यांपुढून झपाट्यानें सरकून जात होतीं, तीं सुद्धां मनाला फार आल्हादकारक वाटलीं.

आम्हांला डेहराडूनच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. परंतु या टोकालाही आम्हाला शेवटच्या स्टेशनपर्यंत न नेतां पहांटेच्या वेळीं अलीकडच्या एका स्टेशनवर उतरवून पुढें नेलें; हो उगीच चोरट्या नजरा आमच्यावर पडायच्या नाहीं तर!

तेव्हां आज हा मी येथें डेहराडूनच्या छोट्या तुरुंगांत बसलों आहें. बरेलीपेक्षां येथें पुष्कळच सुखाचें आहे. येथें म्हणण्यासारखा उन्हाळा नाहीं. बरेलीप्रमाणें येथें उष्णतामान ११२ अंशावर जात नाहीं. सभोंवतालच्या भिंतीही उंचीला पुष्कळ कमी आहेत; त्यांच्या शेजारचीं झाडें त्यांहून उंच असून हिरवींगार आहेत. आमच्या भिंतीच्यावरून पलीकडे बाहेरच्या दूरच्या एका ताडाच्या झाडाचा शेंडा येथून मला दिसूं शकतो; तो बघून मला फार आनंद होतो आणि सिलोन व मलबार याची मला आठवण येते. या झाडांच्या पलीकडे, कांहीं थोड्या मैलांवर पर्वतांच्या रांगा असून त्यांच्या शेंडयावर मसुरी वसलेली आहे. त्या पर्वतराजी कांहीं मला दिसत नाहींत; कारण मध्यें झाडें आड येतात. परंतु आपण त्या पर्वतांच्या जवळ आहोंत या जाणिवेनें आणि रात्रीच्या वेळीं त्या तिथें दूर ते मसुरीचे दिवेच चमकत असतील या कल्पनेनें सुद्धा मनाला एक प्रकारचें सुख होतें.

चार वर्षांपूर्वी–का तीन?–ही पत्रमालिका तुझ्यासाठीं लिहावयाला मीं सुरुवात केली. त्या वेळीं तूं मसुरीतच होतीस. या तीन-चार वर्षांच्या दरम्यानच्या काळांत

केवढाल्या मोठ्या घडामोडी घडून आल्या आहेत; आणि तूं तर केवढी मोठी बाई साहेब झाली आहेस! मधें मधें खूप वेगांत येऊन आणि मधें मधें भली मोठी सुटी घेऊन हीं पत्रें मी तुला बहुतेक सगळीं तुरुंगांत बसूनच लिहीत आलों आहें. परंतु जों जों मी पुढें पुढें लिहीत जातों आहें, तों तों जें लिहिलें तें तितकेंसें मला पसंत पडत नाहींसें झालें आहे; आणि अशी आशंका वाटूं लागली आहे, कीं तुला कांहीं या पत्रांमध्यें विशेष वाचण्यासारखें वाटणार नाहीं. कदाचित् तुला तीं कंटाळवाणींच होण्याचा संभव आहे. असें जर आहे, तर मग कशाला लिहीत बसतों हीं पत्रें तुला मी?

माझ्या मनांतील फार फार इच्छा अशी, कीं प्राचीन काळचे अत्यंत सुंदर हुबेहूब देखावे तुझ्यां दृष्टीसमोर एकापुढें एक उभे करावे आणि आपल्या या जगामध्यें नानाविध बदल एकामागून एक पायरीपायरीनें कसे होत गेले, जगाची वाढ कशी होत गेली, प्रगति आणि सुधारणा कशी होत गेली, आणि क्वचित् एखाद्या काळीं जगाचें पाऊल मागें पडल्यासारखें कसें झालें याची जाणीव तुझ्या मनाला करून द्यावी; प्राचीन सुधारणांचें व संस्कृतींचें दर्शन तुला करवून समुद्राच्या भरतीप्रमाणें त्या वाढल्या कशा आणि ओहटी लागून कालात विलीनही झाल्या कशा हें तुला दाखवावें; तसेंच जागतिक इतिहासाचा हा ओघ प्राचीन काळापासून युगानुयुगें सतत अखंड कसा वाहत आला आहे, अजून तो वाहतोच आहे, कुठेंच थांबत नाहीं, मध्यें मध्यें त्यांत भोंवरे बनलेले दिसतील, लाटा उसळलेल्या आढळतील, केव्हां केव्हां पाणी परतून माघारें आल्याचा भास होईल; तथापि हा ओघ असाच जोरानें पुढें पुढेंच जात असून तो कोठल्या अज्ञात समुद्राला जाऊन मिळणार आहे याची कोणालाच कांहीं कल्पना नाहीं, ही गोष्ट तुझ्या मनांत ठसवावी. मानव-जातीच्या या प्रवास-मार्गावर तुला फिरवून आणावें; अगदीं सुरुवातीच्या काळीं, प्रथम मनुष्याला मनुष्यपण सुद्धा म्हणण्यासारखें प्राप्त झालें नव्हतें तेथून सुरुवात करून तों थेट आजच्या क्षणाला, मानव जेव्हां एका अर्थीं मूर्खासारखा आणि व्यर्थच आपल्या महान् संस्कृतीचा मोठा अभिमान बाळगूं लागला आहे तेथपर्यंतचा सर्व प्रवास तुझ्याकडून करवावा अशी मला किती हौस वाटते! तूं मसुरीला होतीस तेव्हां आपण या प्रकारच्या प्रवासाला सुरुवातसुद्धां केली होती हें तुला आठवत असेल. अग्नीचा शोध कसा लागला, शेतीला सुरुवात कशी झाली, शहरें कशीं वसलीं गेलीं, श्रमविभागाला कशी सुरुवात झाली वगैरे गोष्टींची आपण चर्चा करीत होतों त्या वेळीं. पण आपण जसजसें पुढें पुढें जाऊं लागलों, तसतसें ह्या साम्राज्यें वगैरेंच्या गोंधळांतच अधिकाधिक सांपडलों आणि मानवाच्या प्रगतीच्या मार्गावरची आपली नजर थोडीशी चळत चालली. इतिहासाचें अगदीं वरवरचेंच काय तें दर्शन आपल्याला आतांपर्यंत घडलें आहे. प्राचीन काळीं घडलेल्या घटनाचा नुसता निर्जीव सांगाडा मात्र मी तुझ्यापुढें उभा करूं शकलों आहें; परंतु त्यांत रक्त आणि मांस घालून तुझ्यापुढें प्राचीन इतिहासाची चालती-बोलती जिवंत मूर्तीच मला उभी करता आली असती, तर ती मला किती हवी होती!

पण मला वाटतें माझ्या अंगांत कांहीं ती शक्ति नाहीं ; तेव्हां असा हा चमत्कार घडवून आणण्यासाठीं तुला स्वतःच्या कल्पनाशक्तीवरच अवलंबून राहिलें पाहिजे. पण मग पुष्कळशा सुंदर सुंदर ग्रंथांतून प्राचीन इतिहास तुला वाचावयास मिळण्यासारखा असतांना मीं हीं पत्रें तुला कां लिहीत बसावें ? असा हा संशय वारंवार वाटत असून सुद्धां मी हीं पत्रें लिहीत आलोंच आहें आणि बहुधा यापुढेंही असाच लिहीत राहणार. तसें मीं तुला वचन दिलें आहे याची मला आठवण आहे ; तें वचन पुरें करण्याचा मी जरूर प्रयत्न करणार. परंतु वचनपूर्तीच्या आनंदापेक्षांही पत्र लिहावयाला बसलों म्हणजे तुझी आठवण मनांत येते, आणि तूं माझ्याजवळ बसली असून आपण दोघें एकमेकांशीं बोलत आहों अशी भावना होते, याचा आनंद कांहीं विशेष मोठा आहे.

आपल्या प्राथमिक जंगली अवस्थेंतून धडपडत, हातपाय टेंकात बाहेर पडून मनुष्यानें प्रगतीचा मार्ग आक्रमिण्यास सुरुवात केली त्याबद्दल मीं वर तुला लिहिलें. कितीएक हजारों वर्षेंपर्यंत लांबपासून मानवाचा हा प्रवास चालू आहे. तथापि तसें पाहिलें तर पृथ्वीच्या एकंदर सुरुवातीपासूनचा अनंत काळचा इतिहास, आणि मनुष्य पृथ्वीवर निर्माण होण्यापूर्वी होऊन गेलेला कितीएक युगांचा आणि कल्पांचा जो काळ, त्याच्या मानानें मनुष्याच्या प्रवासाचा हा काळ किती तरी थोडा आहे. अर्थात् पृथ्वीवरील मानवापूर्वीच निर्माण झालेल्या इतर मोठमोठ्या प्राण्यांपेक्षां मानवाचें स्वाभाविकच आपल्याला जास्त महत्त्व वाटतें. त्याचें कारण असें आहे : इतर पशूंजवळ नव्हती अशी एक नवीनच गोष्ट माणसाबरोबर पृथ्वीवर आली. ती म्हणजे माणसाचें मन, जिज्ञासावृत्ति, शोध करण्याची आणि कार्यकारणभाव समजून घेण्याची इच्छा ही होय. त्यामुळें मनुष्याच्या अगदीं सुरुवातीच्या दिवसापासूनच त्याचें ज्ञानसाधनेचें कार्य सुरू झालेलें आहे. लहान मुलाकडे पाहा ; तें कसें आपल्या भोंवतींच्या अगदीं नवीन आणि आश्चर्यकारक जगाकडे टक लावून पाहत असतें तें ; हळूहळू तें माणसांची आणि वस्तूंची ओळख कसें ठेवूं लागतें, नवनवीन गोष्टी कशा शिकत असतें, ज्ञानसंपादन कसें करीत असतें तें ध्यानांत आण. एखाद्या लहान मुलीचेंच पाहा ; ती जर निरोगी असेल आणि चांगली खेळकर आणि हुषार असेल, तर ती तुम्हांला निरनिराळ्या गोष्टींबद्दल इतके कांहीं प्रश्न विचारील म्हणतां ! इतिहासाच्या प्रभातकाळीं मनुष्य जेव्हां लहान होता, सारें जग त्याला नवें आणि आश्चर्य उत्पन्न करणारें होतें, किंवा थोडीबहुत आजूबाजूच्या जगाची माणसाला एक प्रकारची भीतीच वाटत होती, अशा वेळीं अगदीं अशा लहान मुलासारखीच त्यानें आपल्या आजूबाजूला टक लावून किती पुनः पुनः निरखून पाहिलें असेल, किती प्रश्न विचारले असतील ! पण प्रश्न तरी स्वतःशिवाय दुसऱ्या कोणाला तो विचारूं शकणार होता ! कारण उत्तर द्यायला त्याच्याहून अधिक समर्थ किंवा माहितगार दुसरें कोणीं नव्हतेंच. परंतु माणसाजवळ एक छोटीशी विलक्षण सामर्थ्याची वस्तु होती ; त्याच्याजवळ त्याचें मन (बुद्धि) होतें ; आणि त्याच्या साहाय्यानें हळूहळू, धडपडत

धडपडत, कष्ट सोशीत तो अनेक अनुभवांचा सांठा आपल्या मनामध्यें सतत करीत गेला आणि त्यांपासून नवनव्या गोष्टी शिकत गेला. अशा रीतीनें अगदीं जुन्यात जुन्या काळापासून तों थेट आजपर्यंत मनुष्याचें हें संशोधन आणि ज्ञानसंपादन सारखें चालू आहे; पुष्कळशा गोष्टी त्याला समजून आल्या आहेत; परंतु पुष्कळशा अजून त्याला समजावयाच्या आहेत; आणि जों जों तो या मार्गावर पुढें पुढें प्रवास करीत जातो आहे, तों तों त्याच्या दृष्टीसमोर एवढाले विशाल नवे नवे प्रदेश दूरवर पसरलेले उभे राहत आहेत कीं त्यावरून आपल्या मार्गावर शेंवटचें थांबण्याचें स्थान कोठें तरी खरोखरीच आहे असें गृहीत धरलें, तरीसुद्धां त्यापासून आपण अद्यापि किती किती तरी दूर आहों हेंच त्याला दिसून येऊं लागलें आहे.

मनुष्याचा हा सगळा शोध कशाचा चाललेला आहे आणि त्याचा प्रवास कोठल्या ठिकाणासाठीं आहे? हजारों वर्षें अनेक माणसांनीं या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. धर्म, तत्त्वज्ञान आणि शास्त्रें यानीं या प्रश्नांचा विचार करून पुष्कळ उत्तरें दिलेलीं आहेत. हीं उत्तरें काय आहेत हें सांगून मी तुला त्रास देत नाहीं, त्याचें सगळ्यांत मोठें कारण म्हणजे मला त्यांतील बहुतेक उत्तरें नीटशीं माहीत नाहींत; परंतु त्या सगळ्यांमध्यें मुख्यतः धर्मानें या प्रश्नांचा संपूर्ण आणि ज्याच्याबद्दल कोणाला कसली शंका काढण्याचा हक्कच नाहीं असा उलगडा करण्याचा चंग बांधलेला आहे; आणि मानवी मनाच्या शक्तींचा फारसा विचार न करतां आपण घेतलेला निर्णय निरपवाद मान्य केला जावा यासाठीं निरनिराळे उपाय मात्र धर्मानें काढलेले आहेत. भौतिक शास्त्रांनीं केलेला या प्रश्नांचा उलगडा निःसंदिग्ध नाहीं, साशंक आणि कचरत उत्तर देण्याचा त्यांनीं यत्न केला आहे; कोणत्याही बाबतींत कसलाही परिवर्तनातीत हटवादी निर्णय करावयाचा नाहीं, परंतु मानवी मनाच्या जिज्ञासावृत्तीवर विसंबून राहून प्रयोगाला आणि अनुमानाला वाव ठेवावयाचा हा शास्त्रांचा स्वभावच आहे. मला स्वतःला शास्त्रें आणि शास्त्राचा मार्ग हींच इतर कशापेक्षांही जास्त पसंत आहेत हें कांहीं मीं तुला सांगावयाला नको.

मनुष्याच्या या ज्ञानसंशोधनाच्या – अनुभवप्राप्तीच्या – प्रयत्नाबद्दलच्या वरील प्रश्नांचें हमखास समाधानकारक उत्तर देणें हें आपणाला शक्य नसलें, तरी या संशोधनाचे दोन वेगवेगळे मार्ग माणसानें चोखाळले आहेत हें आपल्याला दिसून येतें. मनुष्यानें आपल्या बाहेरच्या जगाचें निरीक्षण करण्याचा प्रयत्न केलेला आहे; बाह्य जगाचें स्वरूप समजून घेण्याचा जसा त्यानें प्रयत्न केला आहे, तसाच आपलें स्वतःचेंही स्वरूप समजून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. खरें पाहिलें तर संशोधनाचे हे दोन्ही प्रकार मुळांत एकच आहेत. कारण मनुष्य झाला तरी या निसर्गाचा, या जगाचाच एक भाग आहे. "आत्मानं विद्धि" म्हणजे "तूं स्वतःला जाण" अशी शिकवण हिंदुस्थान आणि ग्रीस यांमधील प्राचीन तत्त्वज्ञांनीं दिलेली आहे. आणि प्राचीन भारतीय आर्यांनीं हें आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं किती आश्चर्यकारक अखंड

घडपड केली, याचा सर्व वृत्तांतच उपनिषदांमध्यें सांपडतो. जगाच्या बाह्य स्वरूपाचें– मानवमनाच्या बाहेरच्या जगाचें–जें दुसऱ्या प्रकारचें ज्ञान, तें खास शास्त्रांच्या कक्षेंतील विषय असून आजचें आधुनिक जगताचें स्वरूप हाच या बाबतींत केवढी प्रगति झालेली आहे याचा उत्कृष्ट साक्षीदार–पुरावा–आहे. आतां शास्त्राची पकड, झडप फारच दूरवर होऊं लागली असून ज्ञानसंपादनाच्या दोन्ही प्रकारांचे, प्रवृत्तींचें कार्य शास्त्रांनीं आपल्या अंगावर आतां घेतलें आहे आणि या दोन्ही प्रकारांचा समन्वय करण्याचें, त्यांच्यामध्यें एकसूत्रता आणण्याचें काम सुरू केलें आहे. आपणापासून अत्यंत दूरच्या अशा प्रचंड ताऱ्यांचें आत्मविश्वासपूर्वक आणि शंकाविरहित अशा प्रकारचें निरीक्षण करण्यास आतां शास्त्र समर्थ झालें आहे; त्याचप्रमाणें ज्यांनींच सर्व पदार्थ-मात्र बनलेले, भरलेले आहेत आणि ज्यांची एकसारखी अखंड हालचाल सुरूच आहे अशा अत्यंत सूक्ष्म अणूपरमाणूंबद्दल–Electrons व Protons बद्दलही निश्चित ज्ञान आतां शास्त्राला होऊं लागलेलें आहे.

आपल्या संशोधनकार्यार्थ चालविलेल्या या मार्गक्रमणात मनाच्या साहाय्यानें मनुष्यानें पुष्कळ मोठा पल्ला गांठलेला आहे. सृष्टीचें जसजसें अधिकाधिक ज्ञान त्याला होत गेलें, तसतसें निसर्गशक्तींना त्यानें अधिकाधिक आपल्या कामाला लावलें आहे आणि आपलें सामर्थ्य वाढविलें आहे. परंतु हें मिळविलेलें सामर्थ्य कशा रीतीनें आणि कशासाठीं उपयोगांत आणावें याचें मात्र चांगलेंसें ज्ञान त्याला पुष्कळ प्रसंगीं झालेलें दिसत नाहीं. आणि म्हणून या सामर्थ्याचा मनुष्य दुरुपयोग करीत आला आहे. शास्त्राचाच उपयोग करून माणसानें आपल्या बांधवांचा खून करण्यासाठीं व स्वतःच इतक्या परिश्रमानें निर्माण केलेली सुधारणा व संस्कृति नष्ट करून टाकण्यासारखीं अत्यंत भयंकर शस्त्रें निर्माण केलीं आहेत.

५७

ख्रिस्तानंतर पहिल्या एक हजार वर्षांच्या अखेरीस

११ जून, १९३२

आपल्या या प्रवासामध्यें अशा एका ठिकाणीं आतां आपण येऊन पोंचलों आहों, कीं या ठिकाणीं थोडा वेळ थांबून जरा आजूबाजूस चोहोंकडे दृष्टि टाकली तर बरें होईल. किती दूरपर्यंत येऊन पोंचलों आहों आपण ? आतां कोठेंसें आलों आहों आपण ? आणि या ठिकाणीं जगाचें एकंदर रंगरूप कशा प्रकारचें आहे ? हें जरा आपण पाहूं या. त्यासाठीं अल्लाउद्दीनाच्या जादूच्या सतरंजीवर बसून आपण त्या काळच्या जगांतील सर्व देशांना धांवती भेट देऊन येऊं या.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या हजार वर्षांच्या अखेरीला आपण येऊन पोंचलों आहों. कांहीं कांहीं देशांत आपण याच्याही पुढें आघाडी मारलेली आहे, तर कांहीं कांहीं देशांत आपण अद्यापि थोडेंसें मागें पडलेलो आहों.

आशियांमध्यें आपल्याला यावेळीं चीनमध्यें सुंग वंशाचा अम्मल आढळतो. तो महान् तंग राजवंश आतां आटोपला असून सुंग घराण्यालाही एका बाजूला अंतर्गत असंतोष आणि दुसऱ्या बाजूला उत्तरेकडील रानटी परकी शत्रूंचे, खितानांचे हल्ले यांचा त्रास सोसावा लागत आहे. त्याला तोंड देत तें घराणें १५० वर्षें काढतें, परंतु शेवटीं त्याला इतका दुचळेपणा येतो, कीं दुसऱ्या एका रानटी टोळीची, सुवर्ण तार्तार किंवा किन नांवाच्या लोकांची मदत मागण्याचा प्रसंग त्याच्यावर येतो. हे किन लोक येतात ते चीनमध्येंच आपलें बिऱ्हाड थाटतात आणि गरीब बिचाऱ्या सुंग राजवंशाला आपलें चंबूगवाळें आटोपून दक्षिण चीनमध्यें जावें लागतें. तेथें दक्षिणेंतील सुंग राजे या नांवानें आणखी १५० वर्षें त्यांचा अम्मल चालतो. मात्र या सर्व दरम्यानच्या काळांत सुंदर कला, चित्रकला आणि चिनी मातीच्या भांड्यांचा उद्योग या गोष्टी चांगल्या भरभराटीला येतात.

कोरियामध्यें प्रथम प्रथम पुष्कळ फाटाफूट आणि झगडे होत राहून शेवटीं इ. स. ९३५ मध्यें तेथें एक स्वतंत्र संघटित राज्य स्थापन होतें आणि हें राज्य पुढें पुष्कळच काळपर्यंत – सुमारें ४५० वर्षें – चालू राहतें. कोरियानें आपली संस्कृति, कला, राज्यव्यवस्थेची पद्धति यांमधील बराचसा भाग चीनपासून घेतलेला होता. धर्म आणि कलांचाही थोडासा भाग तेथें आणि जपानमध्यें हिंदुस्थानमधून चीनच्या मार्फत गेलेला आढळतो. पूर्वेच्या अगदीं टोंकाला आशियाचा जणुं द्वारपाल असा वसलेला जपान देश या काळामध्यें बहुतांशीं बाकीच्या जगापासून तुटून निराळा राहत असलेला दिसतो. तेथें सध्यां फुजीवार घराण्याचें सर्वश्रेष्ठ वर्चस्व आहे; आणि बादशहा जरी आता निव्वळ एखाद्या घराण्याचा नायक म्हणून राहिला नसून त्याहून थोडा जास्त प्रभावी झाला आहे, तरी फुजीवार घराण्यापुढें तो फिकाच पडलेला आहे. त्यानंतर तेथें शोगूनशाही सुरू होते आहे.

मॅलेशियामध्यें हिंदी वसाहती भरभराटीला आलेल्या आहेत. वैभवशाली अङ्कोर नगरी ही कांबोज देशाची राजधानी असून या देशाची प्रगति आणि शक्ति हीं कळसाला जाऊन पोंचलेलीं आहेत. सुमात्रामध्यें एक महान् बुद्धधर्मीय साम्राज्य असून श्रीविजय शहर हें त्याची राजधानी आहे. आजूबाजूचीं सर्व बेटें या साम्राज्याच्या ताब्यांत असून त्यांच्यामध्यें व्यापार फार मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. जावाच्या पूर्व विभागांत मात्र एक स्वतंत्र हिंदु राज्य आहे. लौकरच हें राज्य मोठें होऊन व्यापार व व्यापारापासून येणारी संपन्नता या बाबतींत श्रीविजयाच्या राज्याशीं स्पर्धा करूं लागणार आहे; आधुनिक यूरपीय राष्ट्रें करतात त्याप्रमाणें व्यापारासाठींच तें श्रीविजयाच्या राज्याशीं युद्ध करणार आहे; आणि अखेरीस तें राज्य जिंकून नष्ट करून टाकणार आहे.


पूर्वी आर्यांचे प्रसारक्षेत्र
इ. स. २००० चा सुमारास
आधुनिकांचे पूर्वज

हिंदुस्थानमध्यें उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान यांमधील संबंध पूर्वी कांहीं काळ होता त्यापेक्षांही अधिक तुटक झाला आहे. उत्तरेकडे गझनीचा महमूद पुनःपुनः चालून येतो आहे, मोडतोड करतो आहे, लुटालूट करून जातो आहे. प्रचंड संपत्ति तो लुटून घेऊन जातो आणि पंजाब प्रांत जिंकून आपल्या राज्याला जोडतो. दक्षिणेकडे चोल घराण्याचें साम्राज्य राजराज आणि त्याचा मुलगा राजेंद्र यांच्या कारकीर्दीत विस्तार पावून प्रबळ होत चाललेलें आपल्याला दिसतें. साऱ्या दक्षिण हिंदुस्थानवर त्यांचें प्रभुत्व चालूं लागतें आणि तेथील राहिवासी आरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांवरही झडपा घालूं लागतात. सीलोन, दक्षिण ब्रह्मदेश आणि बंगाल या देशांवरही ते आक्रमक स्वाऱ्या करून जातात.

मध्य आणि पश्चिम आशियामध्यें आपल्याला बगदाद येथील आब्बासी खलिफांचें उरलें सुरलें साम्राज्य आढळतें. बगदादची मात्र अद्यापि चांगली भरभराट चालू असून तेथें आलेले नवीन राज्यकर्ते जे सेल्जुक तुर्क, त्यांच्या अमलाखालीं त्याचें सामर्थ्य वाढतेंच आहे. परंतु जुन्या साम्राज्याचे मात्र तुकडे होऊन निरानिराळीं राज्यें स्थापन झालेलीं आहेत. इस्लामचें एकच एक साम्राज्य राहिलेलें नसून इस्लाम हा आतां भिन्न भिन्न राज्यांचा आणि समाजांचा धर्म होऊन गेला आहे. मोडून पडलेल्या आब्बासी साम्राज्यांतूनच गझनीचें राज्य निर्माण झालें. येथेंच राज्य करून महमूद हा हिंदुस्थानवर चालून येत होता. अशा रीतीनें बगदादचें साम्राज्य मोडून तोडून गेलेलें असलें तरी बगदाद शहराचें श्रेष्ठपण अजून कायम आहे, आणि दूरदेशाहून पुष्कळ कलावंत आणि विद्वान् लोक अद्यापि तेथें येत आहेत. बुखारा, समरकंद, बल्ख हीं आणि अशीं पुष्कळ मोठालीं शहरें या काळामध्यें मध्य आशियांत भरभराटीला आलेलीं आहेत. या शहरांमध्यें फारच मोठ्या प्रमाणावर व्यापार चालू असून मोठमोठे उंटांचे तांडे त्यामध्यें मालाची नेआण करीत असतात.

मंगोलियांत आणि त्याच्या आसपास भटक्या लोकांच्या कांहीं नव्याच टोळ्यांची लोकसंख्या वाढून त्या प्रबल होत होत्या. यापुढें दोनशें वर्षांनंतर साऱ्या आशिया खंडभर या टोळ्या धुमाकूळ घालणार आहेत. परंतु या काळींसुद्धां मध्य आशियांत आणि पश्चिम आशियांत ज्या मानववंशांचें वर्चस्व चालू आहे त्यांचें मूळही मध्य आशियांतील भटक्या लोकांच्या या जन्मभूमींतच आहे. चिनी लोकांनीं त्यांना हांकलून दिल्यामुळें ते दुसरीकडे पसरले, कांहीं हिंदुस्थानांत आले, कांहीं यूरपमध्यें गेले. या काळामध्यें आतां पुन्हां सेल्जुक तुर्क हेही पश्चिमेकडे लोटले गेल्यामुळें बगदादच्या साम्राज्याचें पुनरुज्जीवन करून, कॉन्स्टांटिनोपलच्या पूर्व रोमन साम्राज्यावर हल्ला करून त्याचा पराभव करतांना ते आढळतात.

ही झाली आशियाची हकिकत. तिकडे तांबड्या समुद्राच्या पलीकडे बगदादच्या साम्राज्यापासून फुटून स्वतंत्र झालेला ईजिप्त देश आहे. तेथल्या मुसलमान राजांनीं स्वतंत्रपणें स्वतःलाच खलिफा म्हणून नियुक्त केलें आहे. उत्तर आफ्रिकेंतही स्वतंत्र

मुसलमानी राज्य स्थापन झालेलें आहे. जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या पलीकडच्या बाजूला स्पेन देशांतही कुर्तुबाचें म्हणजेच कार्डोव्हाचें साम्राज्य या नांवाचें स्वतंत्र मुसलमानी राज्य आहे. परंतु आब्बासी घराण्याच्या हातीं खालिफाची गादी व साम्राज्य आल्यानंतर स्पेनमधील आरबी राज्यानें त्यांची सत्ता मानण्याचें नाकारलें हें तुला माहीत आहे. तेव्हांपासूनच त्यांचें तेथें स्वतंत्र राज्य चालू झालें. त्याच्या आधीं बराच काळ त्यांनीं फ्रान्स देश जिंकण्याचा प्रयत्न केला होता. परंतु चार्ल्स मार्टेलनें त्यांना चांगलाच शह देऊन गप्प केलें होतें. आतां उलट स्पेनच्या उत्तर भागांतील ख्रिस्ती राज्येंच मुसलमानांवर हल्ले करूं लागलीं होतीं आणि पुढें पुढें त्यांचे हल्ले अधिकाधिक जोमदार होणार होते. परंतु आपण ज्या काळाबद्दल आतां बोलतों आहों त्यावेळेला कार्डोव्हाचें साम्राज्य हें एक मोठें आणि प्रगतिशील राज्य असून सुधारणा आणि शास्त्रें यांच्या बाबतींत यूरपांतील इतर देशांपेक्षां तें फार पुढें गेलेलें होतें.

स्पेन देश सोडला म्हणजे बाकीच्या यूरपखंडांत आतां पुष्कळ वेगवेगळीं स्वतंत्र ख्रिस्ती राज्यें स्थापन झालेलीं आढळतील. साऱ्या यूरपखंडभर आतां ख्रिस्ती धर्माचा प्रसार झालेला असून जुने वीरपुरुष किंवा देवदेवता यांच्या पूजाअर्चांचे धर्म आतां येथून पार नाहींसे झालेले आहेत. या सुमारासच आजच्या आधुनिक यूरपीय देशांचीं स्वरूपें निश्चित होत गेलेलीं आपणांस आढळतात. ह्यू कॅपेटच्या नेतृत्वाखालीं इ. स. ९८७ मध्यें फ्रान्स देशाचा उदय होतो. समुद्राच्या भरतीला परत जाण्याचा हुकूम दिल्याबद्दलची ज्याची कथा प्रसिद्ध आहे, तो डेन वंशाचा कॅन्यूट राजा इ. स. १०१६ मध्यें इंग्लंडमध्यें राज्य करीत होता. त्यानंतर पन्नास वर्षांनीं तेथें नॉर्मंडीमधून विजेता विल्यम हा आला. जर्मनी देश अद्यापि रोमच्या पवित्र साम्राज्याचाच एक भाग होता; अजूनपर्यंत जरी तेथें पुष्कळ छोटीं छोटीं स्वतंत्र संस्थानेंच होतीं, तरी त्या सर्वांचें मिळून एक स्वतंत्र राज्य निर्माण होण्याचीं स्पष्ट चिन्हें तेथेंही त्या सुमारास दिसूं लागलीं होतीं. पूर्वेकडे रशियाचा विस्तार वाढत होता आणि जहाजांतून जाऊन कॉन्स्टान्टिनोपलवर स्वारी करण्याचाही तो प्रयत्न करीत होता. रशियाला कॉन्स्टान्टिनोपलचें जें एक चमत्कारिक वेड लागलेलें दिसतें त्याची सुरुवात एव्हांपासूनच झाली. एक हजार वर्षेंपर्यंत या शहराचा लोभ रशियानें अंतःकरणांत बाळगला आणि चौदा वर्षांपूर्वीं जें महायुद्ध संपलें त्याच्यांतून अखेरीस तें शहर आपल्याला मिळेल अशी रशियाला आशा होती. परंतु दरम्यान एकदम क्रांतीच झाली आणि जुन्या रशियाच्या याबद्दलच्या सगळ्याच योजना कोलमडून पडल्या.

९०० वर्षांपूर्वीच्या यूरपच्या या नकाशावर तुला पोलंड आणि हंगेरी हे देशही आढळतील; त्यांमध्यें मग्यार लोकाची तेव्हां वसती होती. त्याचप्रमाणें बल्गेरियन आणि सर्बियन लोकांचीं राज्येंही तुला तेथें आढळतील. त्याचप्रमाणें चोहोंबाजूंनीं शत्रूंनीं वेढलेलें परंतु तरीसुद्धां जीव धरून असलेलें पूर्वेकडील रोमन साम्राज्यही त्यांत तुला

आढळून येईल. रशियन लोक त्याच्यावर हल्ला करीत होते; बल्गेरियन लोक त्याला चिमटे घेत होते; नॉर्मन लोक समुद्राकडून त्याच्या राशीस लागल्यासारखे करीत होते. आणि आतां तर त्या सर्वांहूनही भयंकर असे सेल्जुक तुर्क लोक आले असून त्यांनीं त्याच्या प्राणांवरच संकट आणलें होतें. इतके हे शत्रू आणि इतकीं संकटें सतावून सोडीत असूनही आणखी ४०० वर्षेंपर्यंत हें साम्राज्य नष्ट होणार नव्हतें. इतका हा जो आश्चर्यकारक चिवटपणा त्याच्या ठिकाणीं आढळून आला त्याचें अंशतः कारण कॉन्स्टान्टिनोपल शहराची अत्यंत प्रबळ परिस्थिति हें आहे. हें शहर इतक्या कांहीं चांगल्या ठिकाणीं वसलेलें आहे, कीं शत्रूला तें काबीज करणें फारच कठिण होतें. ग्रीक लोकांनीं संरक्षणाचें नवीनच एक साधन शोधून काढलें होतें, हेंही अंशतः या गोष्टीचें कारण होतें. या नवीन साधनाला 'ग्रीक अग्नि' असें नांव पडलें होतें. तो असा कांहीं पदार्थ होता, कीं पाण्याचा व त्याचा स्पर्श झाला कीं तो पेटत असे. बास्फरसची सामुद्रधुनी ओलांडून येणाऱ्या शत्रूच्या जहाजांना या ग्रीक अग्नीच्या साहाय्यानें आगी लावून कॉन्स्टान्टिनोपलचे लोक स्वारी करणाऱ्या शत्रूच्या सैन्यांत हाहाःकार उडवून देत असत.

ख्रिस्त शक सुरू झाल्यानंतर १००० वर्षें संपण्याच्या सुमारास यूरपचा नकाशा हा अशा स्वरूपाचा होता. याच सुमारास नॉर्थमेन किंवा नॉर्मन लोक आपल्या जहाजांतून खालीं येऊन भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील शहरें लुटतांना आणि त्यांना सळो कीं पळो करून सोडतांना, तसेंच भर समुद्रांत जहाजांची लूटमारही करतांना तुला आढळतील. त्यांना मिळालेल्या यशामुळें तर आतां ते प्रतिष्ठित होऊं लागलेले दिसतील तुला. फ्रान्समध्यें पश्चिम किनाऱ्यावर नॉर्मंडी भागांत ते आतां स्थिरस्थावर झाले होते. याच आपल्या तळावरून इंग्लंडवर हल्ला करून तो देश त्यांनीं जिंकला. मुसलमानांपासून सिसिली बेट जिंकून घेऊन तें त्यांनीं दक्षिण इटलीच्या राज्याला जोडून दिलें होतें आणि या प्रदेशांत सिसिलियाचें राज्य म्हणून एक स्वतंत्र राज्यच त्यांनीं स्थापन केलें होतें.

मध्य यूरपमध्यें उत्तरसमुद्रापासून तों रोमपर्यंत रोमचें पवित्र साम्राज्य कसें तरी पसरलेलें होतें; पुष्कळ छोटीं राज्यें त्यामध्यें असून सर्वांचा मिळून बादशहा प्रमुख होता. हा जर्मन वंशाचा बादशहा व रोमचा पोप यांच्यामध्यें एकसारखें सत्तेचें भांडण चालू असे. केव्हां बादशहाचें वर्चस्व अधिक होई, तर केव्हां पोपचें; परंतु हळूहळू पोपची सत्ता वाढत गेली. पोपच्या हातीं बहिष्काराचें—मनुष्याला धर्मांतून काढून टाकून हद्दपार करण्याचें, वाळींत टाकण्याचें—फार मोठें भयंकर शस्त्र होतें. या शस्त्राच्या जोरावर एका पोपनें एका बादशहाची इतकी दीन अवस्था केली, कीं त्याला पोपची क्षमा मागण्यासाठीं बर्फावरून पोपच्या इटलीतील कॅनोसा येथील वसतिस्थानापर्यंत अनवाणी चालत राहावें लागलें आणि आंत येण्यासाठीं त्याला परवानगी देण्याची पोपची मर्जी लागेपर्यंत त्याला बाहेर तिष्ठत उभें राहावें लागलें!

अशा रीतीनें यूरपांतील हे देश रंगरूप घेतांना आपल्याला आढळत असले, तरी त्यांचें आज जें स्वरूप आपण पाहतों त्यापेक्षां यावेळीं त्यांचें रूप फारच निराळें होतें; विशेषतः त्यांत राहणारे लोक हे तर अगदींच वेगळ्या अवस्थेंत आढळतात. अजून आपणांला फ्रेंच लोक, इंग्लिश लोक, किंवा जर्मन लोक असें म्हणविण्यास तशी फारशी सुरुवातसुद्धां त्यांनीं केलेली नाहीं. त्यांमधील गरीब बिचारे शेतकरी अद्यापि अत्यंत दैन्यावस्थेंत असून देश किंवा भूगोल यांची त्यांना कांहीं माहिती नव्हती. त्यांना एवढेंच ठाऊक होतें, कीं आपण आपल्या जमीनदाराचे भूदास असून त्याची आज्ञा पाळणें एवढें आपलें काम. आणि या सरदार लोकांना जरी तुम्हीं विचारलें असतें कीं तुम्ही कोण, तर ते असेंच म्हणाले असते, कीं आम्ही या भूमिप्रदेशाचे स्वामी असून आमच्यापेक्षां श्रेष्ठ अशा दुसऱ्या सरदाराचे किंवा राजाचे आम्ही अंकित आहोंत. अशा तऱ्हेची ही सरंजामशाही रचना साऱ्या यूरपभर त्या काळीं पसरलेली होती.

मात्र हळूहळू जर्मनीमध्यें आणि विशेषतः इटलीमध्यें मोठमोठीं शहरें उदयास येतांना आपल्याला आढळतात. पॅरिस हेंही या सुमाराला एक प्रमुख शहर झालें होतें. हीं शहरें म्हणजे त्या काळच्या सगळ्या व्यापारधंद्यांचीं केंद्रस्थानें असल्यामुळें तेथें संपत्तीचा साठा वाढत जातांना दिसतो. या शहरांना सरंजामदार सरदारांची सत्ता कांहीं पटत नाहीं, त्यामुळें त्यांच्यांत नित्य झगडा सुरू होतो; परंतु अखेरीस पैशाचा विजय होतो. शहरांतील व्यापारी हा पैसा सरंजामदारांना कर्जाऊ देऊन त्याच्या जोरावर स्वतःला अधिकार आणि सत्ता प्राप्त करून घेतात. आणि हळूहळू या शहरांमधून सरंजामशाहीशीं कांहींच सूतगोत नसलेला असा नवाच एक वर्ग निर्माण होतो.

तात्पर्य, यूरपखंडांतील समाज हा या काळीं सरंजामशाहीच्या नमुन्याबरहुकूम निरनिराळ्या उच्चनीच थरांमध्यें विभागलेला आढळतो. आणि खुद्द धर्मपीठसुद्धां ही वर्गव्यवस्था मान्य करून तिला आपला आशीर्वाद देतांना आढळतें. अद्याप राष्ट्रभावना उत्पन्न झालेली दिसत नाहीं. परंतु यूरपखंडांतील सर्व ख्रिस्ती राजांना एकवटणारी ख्रिस्ती जगासंबंधींची कांहीं एक प्रकारची अस्पष्ट भावना मात्र, यूरपमध्यें, विशेषतः वरिष्ठ वर्गांमध्यें, त्या काळीं दिसून येते. ख्रिस्ती धर्मपीठानें या भावनेचा प्रसार करण्यास साहाय्य केलें. कारण त्यामुळें ख्रिस्ती धर्मपीठाचें बळ वाढून पश्चिम यूरपमधील ख्रिस्ती धर्मपीठाचा आतां एकमेव आणि सर्वमान्य असा पुढारी झालेला जो रोमचा पोप त्याची सत्ताही त्यामुळें वाढत गेली. कॉन्स्टान्टिनोपल आणि पूर्वेकडील रोमचें साम्राज्य यांचा व रोमचा संबंध कधींच तुटून गेलेला होता, हें तुला आठवतच असेल. कॉन्स्टान्टिनोपलमध्यें अद्यापि **जुनें सनातन धर्मपीठ** (Orthodox Church) चालू असून रशियानें आपला धर्म त्याच्यापासूनच घेतलेला होता. कॉन्स्टान्टिनोपलच्या ग्रीक लोकांची रोमच्या पोपला मान्यता नव्हती.

परंतु संकटाचा जेव्हां प्रसंग ओढवला, कॉन्स्टान्टिनोपलभोंवतीं जेव्हां शत्रूंचा वेढा पडला, त्याहूनही विशेषतः सेल्जुक तुर्कांनीं जेव्हां त्याची गळचेपी करण्यास सुरुवात

केली, त्या वेळीं कॉन्स्टान्टिनोपलचा सर्व गर्व गळाला; रोमबद्दलचा द्वेष त्यानें गिळून टाकला, आणि या मुस्लिम काफिरांविरुद्ध आपल्याला मदत करण्याबद्दल त्यानें पोपला विनंति केली. रोम येथें त्या वेळीं एक श्रेष्ठ पोप होता. त्याचें मूळचें नांव हाइल्डब्रँड असून पुढें हाच पोप सातवा ग्रेगरी म्हणून प्रसिद्धीस आला. या हाइल्डब्रँडपुढेंच जर्मन बादशहासारख्या बड्या धेंडाला बर्फावरून कॅनोसापर्यंत अनवाणी चालत यावें लागलें होतें.

आणखी एका गोष्टीमुळें यूरपांतील ख्रिस्ती जगांत या सुमारास मोठीच कल्पनांची खळबळ माजून राहिलेली होती. पुष्कळशा धर्मनिष्ठ ख्रिस्ती लोकांची श्रद्धा अशी होती, कीं ख्रिस्तानंतर १००० वर्षांनीं सर्व जगाचा एकाएकीं अंत होणार आहे. मिलेनियम या शब्दाचा अर्थ हजार वर्षांचा काळ असा आहे. मिले म्हणजे हजार आणि ॲनस म्हणजे वर्ष अशा दोन लॅटिन शब्दांचा मिळून हा शब्द बनलेला आहे. परंतु या काळाच्या अखेरीस तर जगाचा अंत व्हावयाचा अशी कल्पना होती. त्यामुळें मिलेनियम या शब्दाच्या अर्थांत अकस्मात् बदल होऊन चालू जगाचें नवीन अधिक चांगल्या जगांत रूपांतर असा झाला होता. या वेळीं साऱ्या यूरपमध्यें अतिशय दैन्यावस्था पसरलेली होती हें मीं तुला सांगितलेंच आहे; त्यामुळें लौकरच हें मिलेनियम म्हणजे सुवर्णयुग येणार या कल्पनेनें थकल्याभागल्या लोकांना एक प्रकारें समाधानाला स्थान मिळत होतें. कित्येकांनीं तर आपापला जमीनजुमला विकून पॅलेस्टाइनमध्यें कूच केलें होतें; हेतु हा, कीं जगाच्या अंताच्या समयीं आपण आपल्या पवित्र धर्मभूमींत असावें.

परंतु जगाचा अंत कांहीं झाला नाहीं आणि पॅलेस्टाइनमध्यें जे हजारों यात्रेकरू गेलेले होते त्यांचा छळ करून तुर्की लोकांनीं त्यांना सळो कीं पळो केलें. अत्यंत अपमानित आणि संतप्त होऊन ते यूरपमध्यें परत आले आणि पवित्र धर्मभूमीमध्यें आपल्याला काढाव्या लागलेल्या अत्याचारांची कहाणी त्यांनीं सगळीकडे प्रसृत केली. भिक्षु पीटर या नांवाचा एक प्रसिद्ध यात्रेकरू तर हातांत दंड घेऊन, मुसलमानांच्या हातून आपली पवित्र जरुसलेमनगरी सोडवा, असा उपदेश करीत सगळीकडे हिंडूं लागला.

याच सुमाराला कॉन्स्टान्टिनोपलकडून काफिरांविरुद्ध मदतीची याचना करण्यांत आली. आतां रोमन आणि ग्रीक प्रदेशांतील सर्वच्या सर्व ख्रिस्ती जग एकवटून चाल करून येणाऱ्या तुर्कांविरुद्ध खडें झालेंसें दिसूं लागलें. १०९५ मध्यें धर्मपीठांची एक मोठी बैठक भरून मुसलमानांकडून जेरुसलेमची पवित्र नगरी परत मिळविण्यासाठीं युद्ध पुकारण्याचा ठराव करण्यांत आला. अशा रीतीनें क्रूसेडस्ना, म्हणजेच इस्लाम जगाविरुद्ध ख्रिस्ती जग, क्रूसाविरुद्ध चंद्रकोर, यांच्या युद्धास सुरुवात झाली.

५५

आशिया व यूरप यांकडे आणखी एक दृष्टिक्षेप

१२ जून, १९३२

जगाचें, म्हणजे आशिया, यूरप आणि आफ्रिकेचा कांहीं भाग यांचें ख्रिस्तानंतर १००० वर्षें संपण्याच्या वेळीं कशा प्रकारचें स्वरूप होतें, याचें थोडेंसें निरीक्षण गेल्या पत्रांत आपण पुरें केलें. तरी पण आणखी एकदां तिकडेच नजर टाकून पाहा.

प्रथम आशिया खंड. तेथें हिंदुस्थान आणि चीन यांमधील प्राचीन संस्कृति आणि सुधारणा अद्याप सुस्थितींत चालू आहेत. हिंदी संस्कृति मॅलेशिया आणि कांबोज यांमध्यें पसरत असून तेथें तिला फार मरदार फळ येत आहे. चिनी संस्कृति कोरिया-मध्यें, जपानमध्यें आणि कांहीं अंशीं मॅलेशियामध्यें पसरली आहे. पश्चिम आशियामध्यें अरबस्तान, पॅलेस्टाइन, सीरिया आणि मेसापोटेमिया या देशांत आरबी संस्कृति नांदते आहे; पर्शिया उर्फ इराणमध्यें प्राचीन इराणी संस्कृति आणि नवीन आरबी सस्कृति यांचें एक प्रकारचें मिश्रण दिसून येत आहे. मध्य आशियांतील कांहीं देशांमध्येंही हें इराणी-आरबी संस्कृतींचें मिश्रण थोडें थोडें मुरलें असून चीन आणि हिंदुस्थान यांचाही त्यांच्यावर कांहींसा परिणाम झालेला आहे. या सर्व देशांमध्यें उच्च प्रकारची सुधारणा नांदते आहे; व्यापार आणि कला आणि विद्या यांची भरभराट आहे; तेथील विद्यापीठांमध्यें दूरदूरच्या देशांतील विद्यार्थी जमा होत आहेत. फक्त मंगोलिया, मध्य आशियाचा कांहीं भाग आणि उत्तरेकडे सायबेरिया या प्रदेशांत सुधारणेची पातळी जरा कमी उंच आहे.

त्यानंतर यूरप खंड. आशियांतील पुढारलेल्या देशांच्या मानानें हें खंड मागास-लेलें आणि अर्धवट रानटी आहे. जुनी ग्रीक-रोमन संस्कृति म्हणजे फार प्राचीन-काळची एक नुसती आठवणीची गोष्ट होऊन बसली आहे. विद्यांना विशेषसा मान शिल्लक राहिलेला नाहीं; कलांचें कोठें फारसें दर्शन होत नाहीं, आणि व्यापारही आशियाच्या मानानें फारच कमी आहे. दोन ठिकाणीं मात्र थोडी चमक आढळते आहे. एक स्पेनमध्यें. तो देश आरबांच्या अमलाखालीं असून तेथें आरबी लोकाच्या वैभवाच्या काळांतील परंपरा चालू आहे. आणि दुसरी आशिया व यूरप यांच्यामधील सीमेवर वसलेलें जें कॉन्स्टान्टिनोपल शहर त्यामध्यें. हळूहळू त्याचा आतां पडता काळ सुरू झाला असला तरीही अजून तें चांगलें श्रेष्ठ दर्जाचें आणि गजबजलेलें शहर आहे. बाकी यूरपच्या बहुतेक भागामध्यें वारंवार धुमधुमे सुरू आहेत आणि तेथें प्रचलित असलेल्या सरंजामशाहीमध्यें प्रत्येक सरदार आणि सरंजामदार हा आपआपल्या भागापुरता स्वतंत्र राजाच झालेला आहे. पूर्वीची ती साम्राज्याची राजधानी असलेली रोम नगरी तर या काळांत एकदां लहानशा खेड्याच्या अवस्थेला येऊन पोंचली होती

आणि तेथील त्या प्रचंड कलोजियम नांवाच्या रंगभूमीच्या ठिकाणीं जंगली जनावरें राहूं लागलीं होतीं! परंतु आतां पुन्हां हें शहर वाढूं लागलें आहे.

अशा रीतीनें ख्रिस्तानंतर १००० वर्षांच्या सुमाराच्या या दोन खंडांची, आशिया व यूरप यांच्या स्वरूपाची तूं तुलना केलीस, तर आशियाचें पारडें फारच जड आहेसें आढळेल.

परंतु वरवर दिसणाऱ्या या गोष्टींच्या आंत जरा खोलवर जाऊन आपण पुन्हां एकवार निरीक्षण करूं या. मग आपणाला आढळतें, कीं वरवर पाहणाराची कल्पना होते त्याप्रमाणें आशिया खंडाची अवस्था कांहीं तशी खरी चांगली नाहीं. हिंदुस्थान आणि चीन—प्राचीन संस्कृतींना पहिलें बाळसें ज्या ठिकाणीं चढलें ते हे देश—अडचणींत, संकटांत आहेत, असेंच आढळतें. ही अडचण किंवा हें संकट म्हणजे बाहेरून स्वाऱ्या होत आहेत एवढेंच केवळ नव्हे; तर त्यांची अंतर्गत शक्ति आणि जोम यांच्यामधील सत्त्वच शोषून घेणारें जें संकट तें अधिक खरें महत्त्वाचें संकट आहे. पश्चिमेकडे आरबी लोकांचा वैभवाचा काळ संपलेला आहे व सेल्जुक तुर्कांची सत्ता प्रस्थापित होऊन वाढलेली दिसते आहे हें खरें; परंतु तिचें मूळ केवळ त्यांच्या लढाऊ वृत्तीमध्यें आहे. त्यांच्या ठिकाणीं हिंदी, चिनी, इराणी किंवा आरबी संस्कृतींचा आविष्कार झालेला दिसत नाहीं; तर आशिया खंडांतील क्षात्रवृत्ति, लष्करी बाणा तेवढा त्यांच्या ठिकाणीं वाढलेला दिसतो. आशिया खंडांतही या सर्व प्राचीन संस्कृतींचा संकोच होत आहेसें दिसतें. त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास राहिला नसून चढाई सोडून निव्वळ बचावाचें धोरण त्यांनीं स्वीकारलेलें दिसतें. शक्ति आणि उत्साह यांनीं नटलेले नवीन मनुष्यसमाज उदयाला येऊन ते आशियांतील या जुन्या मानववंशाला जिंकूं लागले आहेत आणि यूरप खंडाला सुद्धां त्याचें ग्रहण लागण्याचीं चिन्हें दिसत आहेत. परंतु त्यांनीं आपल्याबरोबर कांहीं एखादी सुधारणेची लाट किंवा संस्कृतीची नवीन मोठी प्रेरणा मात्र आणलेली नाहीं. उलट, आशियांतील या प्राचीन समाजांनींच त्यांना सुसंस्कृत करून आपल्यामध्यें समाविष्ट करून घेतलेलें आढळतें.

अशा रीतीनें आशिया खंडामध्यें एक फार मोठा बदल घडून येत असलेला आढळतो. प्राचीन सुधारणा चांगल्या नांदत आहेत असें दिसत असलें, कलांचा उत्कर्ष होत असला आणि विलासोपभोगांनां रोज नवा नवा रंग चढत जात असला, तरी सुद्धां त्या सर्व सुधारणा व संस्कृति यांची नाडी मात्र मंद होऊं लागली आहे; त्यांचा श्वास आत आंत खोल जाऊं लागला आहे. तरी पण अजून त्या खूप दीर्घ काळपर्यंत टिकून राहणार आहेत. मोंगल लोक आल्यावर मध्य आशिया व अरबस्तान यांच्यांतील संस्कृतींचा ओघ मात्र खंडित होतो. परंतु एवढा एक अपवाद सोडला, तर या संस्कृतींचा इतर ठिकाणीं प्रत्यक्ष अंतही होत नाहीं किंवा त्यांच्या ओघांत मध्येंच कोठें मोठा खंडही पडत नाहीं. हिंदुस्थान आणि चीन यांमध्यें त्यांच्यामधील तेज हळूहळू मंद होतां होतां शेवटीं तेथें या संस्कृतींना जवळजवळ रंगीत चित्रांचें स्वरूप

प्राप्त होतें; दुरून पाह्यला तेवढें सुंदर, पण प्रत्यक्ष आत जिवंतपणा मात्र मुळींच नांहीं; आणि फार जवळ जाऊन निरीक्षण केलेंत, तर वाळवीनें पोखरून सगळा पोकळ डोलारा केलेला!

संस्कृति काय किंवा साम्राज्यें काय, यांचा अंत बाहेरचा शत्रु प्रबळ असतो म्हणून होतो म्हणण्यापेक्षां त्यांच्या अंतरंगातच कीड लागते व दुबळेंपणा उत्पन्न होतो आणि त्यामुळेंच त्यांचा अंत होतो हेंच म्हणणें अधिक युक्त आहे. रानटी लोकांच्यामुळें रोमचा पाडाव झाला असें कांहीं नव्हे. खरोखर रोम आधींच निर्जीव प्रेताप्रमाणें झालें होतें. रानटी लोकांनीं काय केलें, तर त्याला एक धक्का देऊन खालीं पाडलें इतकेंच. रोमचे हातपाय रानटी लोकांनीं कापले, तेव्हां रोमचें हृदय आधींच बंद पडलेलें होतें. असाच कांहींसा प्रकार चीन आणि हिंदुस्थान या देशांमध्यें आणि आरबी लोकांच्या बाबतींतही झालेला आढळून येतो. फरक इतकाच, कीं आरबी लोकांच्या संस्कृतीचा उदय जसा अतिशय जलद झाला तसाच तिचा पाडावही फार वेगानें झाला. तर चिनी आणि भारतीय संस्कृतींच्या ऱ्हासाची ही क्रिया इतकी हळूहळू आणि दीर्घ काळपर्यंत होत राहिली, कीं ऱ्हास झाला हें सुद्धां नीटसें लक्षांत येणें सहज शक्य झालें नाहीं.

गझनीचा महमूद येण्यापूर्वीच पुष्कळ दीर्घ काळापासून ऱ्हासाचें हें कार्य सुरू झालेलें होतें. लोकांच्या मनामध्येंच फरक झालेला आपल्याला आढळतो. नवीन विचार किंवा नवीन वस्तु निर्माण करण्याची प्रवृत्ति नाहींशी होऊन तिच्या जागीं भारतीय लोक पूर्वी जें कांहीं झालें त्याची नुसती नक्कल किंवा पुनरुच्चार करण्यामध्येंच गुंग होऊं लागलेले दिसतात. त्यांच्या बुद्धीची तीव्रता अजून काहीं कमी झाली होती असें नव्हे. पण तिचा सगळा उपयोग फार फार जुन्या काळीं जें कांहीं लिहिलें गेलें त्याचा अर्थ लावण्यांत आणि त्याच्यावर टीका लिहिण्यांत होऊं लागला होता. त्यांच्यामध्यें शिल्पकला आणि मूर्तिकाम उत्कृष्ट दर्जाचें होत होतें; परंतु त्यामध्येंही बारीक बारीक नक्षीकामावर आणि सजावटीवर प्रमाणाबाहेर भर देण्यांत येऊं लागला होता; इतका, कीं नक्षीकामाच्या आणि सजावटीच्या त्या ओझ्याखालीं सौंदर्याच्याऐवजीं बेंगरूळपणाचें मात्र केव्हां केव्हां प्रदर्शन होऊं लागलें. स्वतंत्र कल्पना तर मुळींच कोठें प्रत्ययाला येईनाशी झाली; तशीच भव्य आणि उदात्त अशी रचनाही आढळत नाहींशी झाली. कला, विलास आणि विषयोपभोगांच्या नाजुक नाजुक तऱ्हा आणि साधनें यांचा श्रीमंत आणि सुखवस्तू लोकांमध्यें प्रसार सुरू असलेला आढळतो. परंतु सर्वसामान्य लोकांचें दैन्य किंवा श्रम कमी करण्यासाठीं किंवा समाजाची उत्पादनशक्ति वाढविण्यासाठीं कोणीं कांहीं प्रयत्न केलेला मात्र आढळून येत नाहीं.

संस्कृतीच्या अस्तकाळाचीं हीं सगळीं चिन्हें आहेत: हें असें होऊं लागलें, कीं अशा संस्कृतीचा प्राण कंठाशीं आला म्हणून खात्रीनें समजावें. कारण नवनिर्मिति करणें हें खरें जिवंतपणाचें लक्षण आहे; नक्कल करणें किंवा त्याच त्याच गोष्टी पाठ म्हणून दाखविणें हें नव्हे.

अशा तऱ्हेची ऱ्हासाची ही क्रिया त्या काळीं चीन व हिंदुस्थान यांमध्यें सुरू झालेली आढळते. परंतु माझ्या म्हण्ण्याचा भलताच कांहीं अर्थ समजूं नकोस. माझ्या म्हणण्याचा हेतु असा नव्हे, कीं चीन आणि हिंदुस्थान हे देशच या कारणामुळें अजिबात नष्ट होऊन गेले अथवा त्यांच्यामध्यें रानटी अवस्था निर्माण झाली. माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच, कीं चीन आणि हिंदुस्थान यांमध्यें प्राचीन काळीं नवनिर्मितीची जी चैतन्यशक्ति भराला आली होती, ती त्या देशांत पुष्कळ काळ नांदल्यानंतर आतां थकली होती; तिच्यांतील दम नाहींसा होऊं लागला होता; तिच्यांतील आत्मस्फूर्तीचें, स्वयंविकासाचें सामर्थ्य नष्ट झालें होतें. आजूबाजूच्या बदलत्या परिस्थितीशीं जुळतें होण्याची तिच्यांत ताकद उरली नव्हती. त्या बदललेल्या परिस्थितींतच जीव धरून कशीबशी अद्याप ती जिवंत राहिली होती इतकेंच. प्रत्येक देशाच्या आणि सुधारणेच्या व संस्कृतीच्या बाबतींत हें असें घडत असतें. कांहीं काळ अत्यंत श्रेष्ठ नवनिर्मितीचा आणि प्रगतीचा – वाढीचा – जातो; तर कांहीं काळ थकण्याचा जातो. हिंदुस्थान आणि चीन यांच्यामध्यें हा थकण्याचा काळ इतक्या उशिरा आला आणि तो थकवाही त्यांचें सगळेंच कर्तृत्व नाहींसें व्हावें इतक्या मोठ्या प्रमाणांत आला नाहीं, हीच उलट अज़ब गोष्ट आहे.

इस्लामधर्मानें हिंदुस्थानांत मानवी प्रगतीची एक नवीन प्रेरणा आणली. कांहीं अंशीं एक प्रकारच्या शक्तिवर्धक औषधासारखा इस्लामधर्माचा हिंदुस्थानला उपयोग झाला. त्यानें हिंदुस्थानला खडबडून जागें केलें, परंतु त्याच्या हातून हिंदुस्थानचें जितकें हित व्हावयाला पाहिजे होतें तितकें झालें नाहीं; यार्ची दोन कारणें आहेत. इस्लामधर्मानें हिंदुस्थानांत प्रवेश केला तो चुकीच्या पद्धतीनें केला; आणि तोही थोडासा योग्य काळ टळून गेल्यानंतर केला. गझनीच्या महमुदाच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या होऊं लागण्यापूर्वीच किती तरी शतकें मुसलमानी धर्म-प्रचारक हिंदुस्थानांत येत होते आणि त्यांचें येथें स्वागतही होत होतें. येथें येण्यासाठीं त्यांना कसलाही दंगाधोपा किंवा झगडा करावा लागला नाहीं आणि त्यांच्या धर्मप्रसाराच्या कामांत शेंडेबहुत त्यांना यशही आलें. हिंदुस्थानांत या सुमारास मुसलमानी धर्माबद्दल प्रतिकूल किंवा शत्रुत्वाची भावना जवळजवळ मुळींच नव्हती म्हटली तरी चालेल. नंतर महमूद आला तो तरवार परजीत आणि आग पाखडीतच आला. जेता, लुटारू आणि कत्तली करणारा अशा स्वरूपांत तो यां देशांत आल्यामुळें हिंदुस्थानांत इस्लामधर्माची जितकी अपकीर्ति झाली, तितकी दुसरी कशामुळेंही झाली नाहीं. महमुदाला अर्थातच धर्माची, त्याच्यासारख्याच इतर जगज्जेत्यांप्रमाणें फारशी फिकीर नव्हती; तर लूटमार करणें हाच त्याचा मुख्य उद्देश होता. परंतु त्याच्या या स्वाऱ्यांच्या दुष्कीर्तीची छाया मुसलमानी धर्मावर हिंदुस्थानमध्यें फार काळपर्यंत पसरलेली राहिली; आणि लोक त्यासंबंधीं निर्विकार मनानें विचार करूं शकत नाहींसे झाले; असें झालें नसतें, तर कदाचित् मुसलमानी धर्माचा या देशात निराळ्या रीतीनें विचार होऊं शकला असता.

हें झालें एक कारण. दुसरें कारण म्हणजे मुसलमानी धर्माचा प्रवेश हा या देशांत व्हायला पाहिजे होता त्याहून उशिरा झाला. त्या धर्माचा प्रथम उदय झाल्यानंतर ४०० वर्षांनीं त्याचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला. एवढया या दीर्घकाळांत त्याची स्वतःचीच थोडीफार दमछाकी झाली होती आणि त्याच्यामधील नवनिर्मितीची शक्ति पुष्कळ प्रमाणांत नाहींशी झाली होती. इस्लामधर्मांच्या उदयाच्या पहिल्या काळांत आरब लोक जर हिंदुस्थानांत आले असते, तर उदयोन्मुख आरबी संस्कृतीचा येथील प्राचीन भारतीय संस्कृतीशीं मिलाफ होऊन गेला असता आणि त्यांचा एकमेकांवर जो परिणाम झाला असता, त्यामधून पुष्कळ मोठाल्या घटना घडून आल्या असत्या. दोन सुसंस्कृत अशा मानववंशांचें हें मीलन झालें असतें; आरब लोक तर धर्माच्या बाबतींत कडवे धर्मवेडे मुळींच नव्हते; बुद्धिवादी असल्याबद्दलच त्यांची ख्याति होती. बगदादमध्यें तर एका काळीं, खुद्द खलिफाच्या आश्रयाखालीं, सर्व भिन्न भिन्न धर्मांच्या आणि मुळींच धर्म नसणाऱ्या अशाहीं लोकांचें एक मंडळ स्थापण्यांत आलेलें होतें; या मंडळाच्या वेळोवेळीं बैठकी भरून त्यांत नानाविध विषयांची चर्चा केवळ बुद्धिवादाच्या भूमिकेवरून करण्यांत येत असे.

परंतु आरबी लोक प्रत्यक्ष हिंदुस्थानमध्यें आले नाहींत. ते सिंधमध्येंच थांबले आणि हिंदुस्थानभर त्यांचा कांहीं परिणाम झाला नाहीं. मुसलमानी धर्माचा प्रवेश हिंदुस्थानमध्यें तुर्क किंवा दुसऱ्या अशा लोकांमार्फत झाला, कीं ज्यांच्या ठिकाणीं आरब लोकांची संस्कृतिसंपन्नताही नव्हती आणि धर्मबद्दलची सहिष्णुताही नव्हती. ते सारे लोक मुख्यतः शिपाईगडी होते.

असें असलें तरीही त्यांच्या येण्यानें प्रगति आणि नवनिर्मितीचा प्रयत्न या बाबतींत एक प्रकारची नवीच चेतना निर्माण झाली हें खरें. यामुळें हिंदुस्थानांत नवचैतन्य निर्माण कसें झालें आणि त्याचें पुढें एकंदर कोणतें स्वरूप झालें याचा आपण पुढें विचार करणार आहों.

हिंदी संस्कृति दुर्बळ होत चालली होती या गोष्टीचा आणखी एक परिणाम या काळांत दिसून येतो. बाहेरून जेव्हां हे हल्ले होऊं लागले, तेव्हां आंत येणाऱ्या त्या लोंढयापासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं त्या संस्कृतीनें स्वतःच्या भोंवतीं एक प्रकारचें कवच किंवा कडें उभारण्याचा, म्हणजेच जवळजवळ स्वतःला तुरुंगांत कोंडून टाकण्याचा उपक्रम सुरू केला. हेंही एक दुर्बळपणाचें आणि भीतीचेंच लक्षण आहे. शिवाय, या उपायानें खरा विकार जो होता तो वाढतच गेला. परकी हल्ले हा कांहीं खरा विकार नव्हता, तर आंतला जोम नाहींसा होऊं लागला होता हा खरा विकार होता. आणि संरक्षणार्थ स्वीकारलेल्या या एकलकोंडेपणामुळें हा शक्तिक्षय वाढतच गेला आणि शक्ति वाढण्याचे सर्व मार्ग बंद झाले. पुढें दिसेलच आपल्याला, कीं चीननेंही आपल्यापरी हाच मार्ग स्वीकारला आणि तसाच जपाननें पण. चोहों बाजूंनीं आवरण घालून कोंडून टाकलेल्या अशा समाजात राहणें ही मोठी धोक्याची गोष्ट

आहे. कारण मनुष्य तेथें दगडासारखा चलनवलनविरहित होऊं लागतो; ताजी हवा आणि नव्या ताज्या कल्पना सहन करण्याची त्याची संवय नाहींशी होते. जितकी व्यक्तीला तितकीच समाजालाही ताज्या हवेची आवश्यकता असते.

हें झालें आशियापुरतें. यूरप तर या काळीं मागासलेला असून तेथें तंटे माजले होते, हें आपण पाहिलेंच आहे. पण या सगळ्या बंडाळीच्या आणि अडाणीपणाच्या पाठीमागें तेथें निदान जिवंतपणा आणि उत्साह तरी आढळतो. पुष्कळ वर्षें मोठेपण भोगून आशिया खंड आतां घरंगळीला लागलेलें होतें; तर यूरप खंड वर चढण्याची धडपड करीत होतें. परंतु आशियाच्या पातळीच्या बरोबर येण्यासाठीं त्याला अजून पुष्कळच वर चढून जायला हवें होतें.

आज यूरप खंडाचें सगळीकडे प्रभुत्व असून आशिया खंडाची स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं मोठे कष्ट सोसून धडपड चालली आहे. परंतु त्यांतही वरवर सोडून जरा खोलवर पाहा. आशिया खंडांत तुला आज एक प्रकारचा नवीनच उत्साह, नवीनच शक्ति, नवीनच नवनिर्माणसामर्थ्य, एक प्रकारचें नवीनच चैतन्य उत्पन्न झालेलें दिसेल. आशिया खंड पुन्हां उठून उभें राहिलें आहे यांत मुळींच संशय नाहीं. आणि यूरप खंडांत, विशेषतः पश्चिम यूरप खंडांत आज कितीही मोठेपणाचा डौल असला, तरी तेथें ऱ्हासाचीं थोडीं थोडीं लक्षणें दिसूं लागलेलीं आहेत. यूरपीय संस्कृतीचा नाश करण्याइतकें बळ अंगीं असलेले रानटी लोक आज जगांत नाहींत हें खरें. परंतु सुधारलेले लोकच केव्हां केव्हां रानटीपणाचें वर्तन करतात आणि असें झालें म्हणजे त्यांची सुधारणा आपली आपणच नष्ट होते.

आशिया खंड आणि यूरप खंड अशा वेगवेगळ्या खंडांबद्दल मी बोलतों आहें. पण हें केवळ भूवर्णनशास्त्रांतले पारिभाषिक शब्द आहेत असें म्हटलें पाहिजे. आपल्यापुढें जे प्रश्न उभे आहेत, त्यांत हे प्रश्न आशियापुरते, हे यूरपपुरते असा कांहीं एक प्रकार नसून आपल्यापुढचे सगळे प्रश्न सर्व जगाचे किंवा अखिल मानवजातीचे प्रश्न आहेत. साऱ्या जगाच्या दृष्टीनेंच ते आम्हीं सोडविले पाहिजेत; नाहीं तर पुन्हां अव्यवस्था आणि गडबड माजल्याशिवाय राहणार नाहीं. अशा प्रकारें हे प्रश्न सोडवावयाचे म्हणजे सर्व ठिकाणचें दारिद्र्य आणि दैन्य यांचा नाश झाला पाहिजे. हें घडवून आणायला बराच काळ लागेलही. परंतु आपलें तें ध्येय असलें पाहिजे; त्याच्यांत कसली तडजोड किंवा कमीअधिक करायला आपण तयार होतां कामा नये. असें केलें तरच समतेच्या पायावर आधारलेली खरी संस्कृति आणि खरी सुधारणा प्राप्त होईल; आणि मग एका देशाकडून दुसऱ्या देशाची किंवा एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची पिळणूक होण्याला जागाच राहणार नाहीं. अशी समाजरचना ही प्रगतिशील राहील; तिच्यांत नवनिर्मितीची शक्ति नेहमींच राहील; बदलत्या परिस्थितीबरोबर जुळते होण्याजोगे बदल स्वतःमध्यें करून घेण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं असेल; तिचा आधार समाजाच्या सर्व घटकांमधील परस्पर-सहकार्य

हा असेल. अशी ही संस्कृति अखेरीला सर्व जगावर पसरलीच पाहिजे. पूर्वीच्या काळच्या संस्कृतींचा ऱ्हास होऊं लागून जसा नाश झाला, तसा ऱ्हास आणि नाश या नव्या संस्कृतीचा होणार नाहीं.

म्हणून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत असतांना आपण नेहमीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं मनुष्यसमाजाचें खरें महान् ध्येय, अखिल मानवजातीचें स्वातंत्र्य हें आहे; आणि या ध्येयाच्या पोटांत आपल्या लोकांच्या स्वातंत्र्याचा आणि दुसऱ्याही लोकांच्या स्वातंत्र्याचा समावेश आहे.

५९

अमेरिकेंतील मय-सुधारणा

१३ जून, १९३२

माझ्या या पत्रांमध्यें सर्व जगाच्या इतिहासाचा 'आढावा घेण्याचा माझा प्रयत्न आहे, असें मी तुला सागतों आहे खरा; परंतु प्रत्यक्ष पाहिलें तर आतांपर्यंत हा फक्त यूरप, आशिया आणि उत्तर आफ्रिका यांचाच इतिहास होऊन गेला आहे. अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया यांच्याबद्दल मीं तुला जवळजवळ कांहींसुद्धां सांगितलें नाहीं म्हटलें तरी चालेल. अर्थात् या प्राचीन काळींही अमेरिकेंत एक सुधारणा नांदत होती एवढें मात्र एकदां मीं तुला बजावून ठेवलेलें आहे. या सुधारणेसंबंधीं आधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं; आणि मला तर स्वतःला त्यांतील फारच थोडी माहिती आहे. परंतु सर्वसामान्य लोकांची एक चुकीची समजूत असते, कीं कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढून यूरपीयन लोक तेथें जाऊन पोंचेपर्यंत अमेरिका देश हा आपला एक निव्वळ रानटी देश होता. तशी चुकीची समजूत तुझी होऊं नये म्हणून माझी माहिती अपुरी असूनही या सुधारणेबद्दल तुला थोडेंफार सांगण्याचा मोह मला आवरत नाहीं.

मानव अश्मयुगांत ज्या काळीं होता, ज्या काळीं घरदार करून मनुष्य अद्यापि कोठेंही स्थिरस्थावर झालेला नव्हता, तर शिकार करून पोट भरीत जंगलांत भटकत होता; इतक्या ला प्राचीन काळीं आशिया आणि उत्तर अमेरिका याच्यामध्यें जमिनीवरून दळणवळण सुरू असावें असें दिसतें. या खंडांतून त्या खंडांत अलास्काच्या मार्गानें कांहीं कांहीं मनुष्यसंघ किंवा टोळ्या जात-येत असल्या पाहिजेत. पुढें हें दळणवळण बंद पडलें आणि अमेरिकेंतल्या लोकांनीं आपली स्वतंत्रपणेंच सुधारणा संपादिली. आज जेवढी माहिती मिळालेली आहे तेवढ्यावरून या संस्कृतीचा आशिया किंवा यूरपशीं संबंध जोडण्याला काहीं एक साधन नाहीं हें लक्षांत ठेव. सोळाव्या शतकाच्या अखेरीला अमेरिकेचा जो शोध करण्यांत आला म्हणून म्हणण्याची पद्धति

आहे, तेथपर्यंत अमेरिकेशीं बाकीच्या जगाचा तसा म्हणण्यासारखा संबंध येत नव्हता. अमेरिकेचें हें जग अगदींच लांब अंतरावर आणि सर्वस्वीं निराळ्या प्रकारचें जग असून त्याच्यावर यूरप किंवा आशिया यांमधील घडामोडींचा कांहींही परिणाम होत नव्हता.

या खंडांत संस्कृतींचीं तीन प्रमुख केंद्रें होतीं असें दिसतें; एक मेक्सिकोंत, एक मध्य अमेरिकेंत, आणि एक पेरू देशांत. या संस्कृतींचा उगम केव्हांपासून झाला हें कांहीं सांगतां येत नाहीं. परंतु मेक्सिकोंतील शकाची, कालगणनेची सुरुवात ख्रिस्तपूर्व ६१३ च्या आसपास झालेली आहे. ख्रिस्ती सनाच्या सुरुवातीला, दुसऱ्या शतकापासून पुढें तिकडे पुष्कळ शहरें उदयास आलेलीं आढळतात. दगडी बांधकाम, मातीच्या भांड्यांचें काम, कापड विणणें आणि अत्यंत सुंदर प्रतीचें रंगकाम हे उद्योग त्या ठिकाणीं उदयास आलेले होते. तांबें आणि सोनें तेथें विपुल सांपडत असे. परंतु लोखंड मात्र सांपडत नव्हतें. शिल्पकला चांगली भरभराटीस आलेली दिसते आणि शहरामागून शहरें जणुं एकमेकांशीं स्पर्धा करीत उभीं राहतांना आढळतात. लिहिण्याची कांहीं एक खास गुंतागुंतीची पद्धतीही त्यांच्यामध्यें आढळते. चित्रकला, विशेषतः मूर्तिकाम, फार मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत सौंदर्यपूर्ण असें आढळून येतें.

संस्कृतीच्या या प्रत्येक केंद्रांत अनेक स्वतंत्र राज्यें होतीं. त्यांत किती तरी निरनिराळ्या भाषा असून त्याच्यामध्यें विपुल वाङ्मय होतें. राज्यव्यवस्था चागली सुसूत्र आणि सामर्थ्यवान् असे आणि शहरामधून बुद्धिजीवी आणि सुसंस्कृत समाजाची वसती असे. कायदेपद्धति आणि आर्थिक व्यवहार याची या राज्यांतून चांगलीच वाढ झालेली होती. इ. स. ९६० मध्यें उक्षमल या शहराची प्रस्थापना झाली आणि थोड्याच काळांत आशियांतील मोठमोठ्या शहरांच्या जोडीला जाऊन बसण्याइतकी या शहराची वाढ झाली. लाबुआ, मयपान, चौमुलतुन अशीं दुसरींही पुष्कळ शहरें या खंडांत होतीं.

मध्य अमेरिकेंत तीन प्रमुख राज्यें असून त्यांचा एक मित्रसंघ होता, त्याला आधुनिक काळीं मयपानचा संघ असें नांव दिलेलें आहे. आशिया आणि यूरप खंडांच्या इतिहासात ख्रिस्तानंतर सुमारें एक हजार वर्षांच्या अखेरच्या काळाशीं आपण येऊन पोंचलों आहों; त्या सुमाराचाच काळ या संघाचाही आहे. तात्पर्य काय, तर ख्रिस्तानंतर एक हजार वर्षांच्या सुमारास मध्य अमेरिकेंतील सुधारलेल्या राज्यांचा अशा रीतीनें बाकीच्या जगाला लाज वाटविण्यासारखा एक प्रबळ मित्रसंघ होता. परंतु या सर्व राज्यामध्यें – नव्हे, सगळ्यांत मय-संस्कृतींतच उपाध्यायवर्गाचें फार प्रस्थ माजलेलें होतें. त्यामध्यें ज्योतिषशास्त्राला सगळ्या मोठा मान दिला जाई आणि या शास्त्राच्या ज्ञानार्च्या बळावर उपाध्यायवर्ग अज्ञानी लोकांचा फार गैरफायदा घेई. हिंदुस्थानात पाहतोंच, कीं आपण, किती लाखों लोकाची सूर्यचंद्रांच्या ग्रहणाच्या वेळीं स्नान करण्याची आणि उपास करण्याची प्रवृत्ति बनविण्यांत आलेली आहे ती. तसाच कांहींसा प्रकार येथें होता.

मयपानाचा संघ सुमारें शंभर वर्षें टिकला. त्यानंतर तेथें एक सामाजिक क्रांति


अमेरिकेतील मय सुधारणा
द. अमेरिका
युकाटान
पालांक
उक्समाल
मेक्सिको
चोलुला
टेनाक्टिटलान
टेक्सकोको
आझ्टेक
मोंटेझुमा
प्राचीन मेक्सिकन संस्कृतीचे विकासाचे मार्ग
मायन संस्कृतीचे विकासाचे मार्ग

झाली. आणि सरहद्दीवरील एका परकी सत्तेचा हात तेथें शिरकला असें दिसतें. इ. स. ११९० च्या सुमारास मयपान शहर नष्ट करण्यांत आलें. इतर शहरें मात्र तशींच अस्तित्वांत राहिलीं. त्यानंतर आणखी एक शतकानंतर दुसरेच लोक त्या ठिकाणीं येऊन बलिष्ठ झाले. ते म्हणजे मेक्सिको प्रांतांतील ॲझटेक लोक. चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांनीं मय देश काबीज केला आणि इ. स. १३२५ च्या सुमारास त्यांनीं टेनॉक्टिट्लान या शहराची प्रस्थापना केली. साऱ्या मेक्सिकन भूमीचीं लोकरच्च या ठिकाणीं राजधानी करण्यांत आली, ॲझटेक लोकांच्या साम्राज्याचें तें मुख्य केंद्र बनलें आणि त्याची लोकसंख्या प्रचंड वाढली.

ॲझटेक राष्ट्र हें लढवय्यांचें राष्ट्र होतें. जागोजाग त्यांच्या लष्करी वसाहती आणि तळ होते. लष्कराच्या सोयींसाठीं त्यांनीं रस्त्यांचें जाळें निर्माण केलेलें होतें. असेंही सागतात, कीं आपल्या साम्राज्यांतील मांडलिक राज्यांच्यामध्यें आपसांत कलागती लावून देण्यांतही कांहीं हे लोक कमी निपुण नव्हते. कारण त्या मांडलिक राज्यांत एकजूट नसली म्हणजे त्यांच्यावर साम्राज्याचा अधिकार चालविणें सोपें पडे. सगळ्याच्च साम्राज्यांचें हें फार जुनें धोरण आहे. रोमनें तर याबद्दल म्हणच निर्माण केली, कीं Divide at impera फोडा आणि राज्य करा!

इतर पुष्कळ बाबतींत ॲझटेक लोक फार चतुर आणि पुढारलेले असले, तरी त्यांच्यामध्येंही उपाध्यायवर्गाचें प्रस्थ फार मोठें माजलेलें होतें आणि याहूनही वाईट म्हणजे त्यांच्या धर्मांत मनुष्यबळीची पद्धत होती. दर वर्षीं हजारों माणसांना या धर्मपद्धतीस अनुसरून अंगावर शहारे येण्यासारख्या क्रूर रीतीनें बळी दिलें जात असे.

सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत ॲझटेक लोकांनीं आपल्या साम्राज्याचा अधिकार हातांत जणुं लोखंडाची छडी घेऊन गाजविला. त्यांच्या राज्यात बाह्यतः शांतता आणि सुबत्ता होती. परंतु सामान्य जनतेची अत्यंत निर्दयपणें पिळणूक होत होती व त्यामुळें लोक दरिद्री झालेले होते. अशा तऱ्हेच्या पायावर बांधलेलें आणि अशा रीतीनें चालविलेलें हें साम्राज्य फार काळपर्यंत टिकणें अशक्य होतें. आणि शेवटीं नाहींच तें फार काळ टिकलें. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला (१५१९) ज्या वेळीं ॲझटेक लोकांची सत्ता व सामर्थ्य अगदीं शिखराला पोंचलीं असें दिसत होतें, अशा वेळीं हें भलें थोरलें साम्राज्य मूठभर परकी लुटारू पुंडांच्या – पेंढाऱ्यांच्या पुढें एकदम कोलमडून जमीनदोस्त झालें. हा या साम्राज्याचा चक्काचूर हर्नान कोर्टेझ नांवाच्या एका स्पॅनिश इसमानें एका छोट्याशा लष्करी तुकडीच्या साहाय्यानें केला. कोर्टेझ हा चांगला शूर मनुष्य होता, तसाच तो साहसी पण भरपूर होता. त्याच्याजवळ घोडे होते आणि बंदुका होत्या. या दोन गोष्टींचा त्याला तेथें फारच मोठा उपयोग झाला. असें दिसतें, कीं मेक्सिकोच्या साम्राज्यामध्यें घोडे नसावेत; आणि बंदुका तेथें नव्हत्या यांत तर मुळींच संशय नाहीं. परंतु कोर्टेझ हा कितीही धैर्याचा पुतळा असला आणि त्याच्याजवळ भले पुष्कळ घोडे आणि बंदुका असल्या, तरी पण ॲझटेकच्या साम्राज्याला

आंतूनच जर कीड लागलेली नसती तर त्याच्या सगळ्या साधनसामग्रीचा कोर्टेझला कांहीं उपयोग झाला नसता. परंतु तें साम्राज्य आंतून कुजलेलें होतें; बाहेरचें सोंग मात्र चांगलें कायम ठेवलेलें होतें; परंतु त्याला कोलमडून लावायला एक लहानशी लाथसुद्धां पुरेशी होती. तें साम्राज्य लोकाच्या पिळणुकीवर उभारलेलें असून लोकांना तें अगदीं नकोसें झालेलें होतें. त्यामुळें त्याच्यावर जेव्हां हल्ला झाला, त्या वेळीं साम्राज्य चालविणाऱ्यावरील या संकटाचें सर्वसामान्य लोकांनीं स्वागतच केलें. असें जेव्हां घडतें तेव्हां एक सामाजिक क्रांति घडून यावयाची हा ठरलेला क्रमच आहे.

एक वेळ मेक्सिकन लोकांनीं कोर्टेझला पिटाळून लावलें होतें; आणि तो अगदीं मरतां मरतां वांचला होता. पण तो पुन्हां स्वारी करून आला, त्या वेळीं त्याला स्थानिक रहिवाशांचें साहाय्य मिळालेलें असल्यामुळें त्याचा जय झाला. त्यामुळें ॲझटेक लोकांचें राज्य तर नष्ट झालेंच; परंतु त्याबरोबरच सगळी मेक्सिकन संस्कृतीही पार विलयाला गेली यांचें मोठें नवल वाटतें. एवढेंच नव्हे, तर थोड्याच दिवसात साम्राज्यशाहीचें केंद्रस्थान अशी ती प्रचंड राक्षसी टेनॉक्टिट्लान नगरीही होती का नव्हती अशी होऊन गेली. त्या शहरांतला पूर्वीचा एक दगडसुद्धा शिल्लक राहिला नाहीं. स्पॅनिश लोकानीं त्या ठिकाणीं आपलें एक कॅथेड्रल मात्र बांधलें. मयराज्यांतील इतर शहरेंही नष्ट होऊन त्या ठिकाणीं थुकाटानचें अरण्य पसरलें; पुढें त्या शहरांचीं नांवेंसुद्धां कोणाच्या आठवणींत राहिलीं नाहींत; आणि काहीं थोड्यांची आठवण जी राहिली आहे, ती त्यांच्या मूळच्या ठिकाणांच्या आसपास त्या नांवांचीं क्वचित् लहान लहान खेडीं आहेत त्यांच्यामुळेंच काय ती. त्यांचें सगळें वाङ्मयही नष्ट झालें. केवळ तीन ग्रंथ त्याच्यामधील आज शिल्लक राहिलेले आहेत. पण तेही अजून कोणाला वाचतां आलेले नाहींत.

१५०० वर्षेंपर्यंत चांगल्या रीतीनें नांदत राहिलेली ही प्राचीन संस्कृति आणि हा प्राचीन समाज दोन्ही, यूरपमधील एका नवीन लोकांशीं त्यांचा संबंध येतांक्षणींच एकाएकीं पार नाहींशीं होऊन गेलीं; असें हें झालें तरी कसें याचा खुलासा करणें हें खरोखरच फारच असामान्य कठिण कार्य आहे. हा जो नव्या संस्कृतीचा तेथें संबंध आला, तो जणुं कांहीं एक प्रकारच्या रोगासारखाच झाला असें दिसतें; जणुं हा एक सांथीचा रोगच तेथें आला आणि त्यानें सगळ्यांचा पुरा नायनाट करून टाकला. कांहीं बाबतींत ॲझटेक लोकांची सुधारणा पुष्कळच उच्च दर्जाची होती; तरी कांहीं बाबतींत ते फारच मागासलेले होते. त्यांच्या ठिकाणीं इतिहासाच्या निरनिराळ्या काळांतील विशेषांचें विचित्र मिश्रण झालेलें होतें.

दक्षिण अमेरिकेंत पेरू देशात सुधारणेचें आणखी एक केंद्र असून तेथें इन्काचा अम्मल होता. इन्का हा एक प्रकारें दैवी अंश असलेला राज्यकर्ता समजला जात असे. निदान पुढच्या पुढच्या काळांत तरी पेरूमधील या संस्कृतीचा मेक्सिकन संस्कृतीशीं संबंध अजिबात तुटून गेला होता, ही एक मोठी विचित्र गोष्ट आहे. एकमेकांपासून

फारसे दूर असे हे प्रदेश नसतांनाही त्यांची एकमेकांना फारशी माहिती नव्हती; यावरूनच कांहीं बाबतींत हे देश किती खास मागासलेले होते हें दिसून येण्यासारखें आहे. कोर्टेझचा मेक्सिकोमध्यें जय झाल्यानंतर थोड्याच काळांत पेरूच्या राज्याचा नाशही दुसऱ्या एका स्पॅनिश माणसानेंच केला ; त्याचें नांव पिझारो. तो त्या भागांत इ. स. १५३० मध्यें आला आणि त्यानें विश्वासघात करून इन्काला कैद केलें. देवाचा अंश असलेला आपला राजाच अशा रीतीनें कैद झालेला पाहून लोक. भयभीत होऊन गेले. पिझारोनें तेथें इन्काच्या वतीनें म्हणूनच कांहीं काळ राज्य केलें आणि पुष्कळ संपत्तीची लूट केली. पुढें इन्काच्या वतीच्या राज्याचें हें सोंगही बंद झालें आणि स्पॅनिश लोकांनीं पेरू देश आपल्या साम्राज्यामध्यें सामील केला.

कोर्टेझनें जेव्हा टेनॉक्टिट्लान शहर प्रथम पाहिलें, तेव्हां तो त्याच्या प्रचंडपणानें आश्चर्यानें स्तंभित होऊन गेला. यूरपमध्यें असें एकही शहर त्यानें पाहिलेलें नव्हतें.

मय प्रांतांतील आणि पेरू देश यांमधील कलेचे पुष्कळसे नमुने आतां मिळविण्यात आलेले असून अमेरिकेमधील, मला वाटतें, विशेषतः मेक्सिकोंतील, पदार्थसंग्रहालयामध्यें ते पाहावयास सांपडतात. त्यावरून त्या देशांत कलेची फार सुंदर परंपरा होती हें दिसून येतें. पेरूमधील सोन्यावरील कारागिरी तर फारच अत्युत्कृष्ट, बिनमोल आणि अजोड आहे असें म्हणतात. दगडांतील मूर्तिकामाचे सांपडलेले कांहीं नमुने, विशेषतः दगडाचें कोरलेलें काम, फार सुंदर आहे म्हणतात. दुसरे कांहीं नमुने मुद्दाम भय उत्पन्न करण्यासाठीं तयार केलेल्या वस्तूंचेच असून त्यामुळें खरोखरच अंगावर भीतीनें कांटा उभा राहतो.

६०

मोहेंजोदारोकडे आणखी एक उडी

१४ जून, १९३२

नुकतीच मोहेंजोदारो आणि सिंधु नदीच्या खोऱ्यांतील भारतीय संस्कृति यांच्याविषयीं मला वाचायची संधि मिळाली. ज्यामध्यें याबद्दलची आतांपर्यंत उपलब्ध सर्व माहिती संकलित केली असून या संस्कृतीसंबंधींचें वर्णन केलेलें आहे असा एक मोठा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ज्यांच्या हातीं सिंधु नदीच्या खोऱ्यांतील हें उत्खननाचें आणि संशोधनाचें कार्य सोंपविलेलें आहे, आणि खोल खोलपर्यंत खणीत जात असतांना ज्यांच्या प्रत्यक्ष डोळ्यांपुढें भूमिमातेच्या उदरांतून एक प्राचीन शहर हळूहळू बाहेर पडलें, त्याच लोकानीं तयार करून हा ग्रंथ लिहिलेला आहे. अजून कांहीं तो ग्रंथ मला पाह्यला मिळालेला नाहीं. इथें तो मिळाला असता तर केवढी बहार झाली

असती! परंतु त्याच्यावरचें एक परीक्षण माझ्या वाचनांत आलें असून त्या परीक्षणांत त्या ग्रंथांतले जे उतारे दिले आहेत, त्यांपैकीं कांहीं तुझ्याबरोबर वाचावे असें माझ्या मनांत आहे. सिंधु नदीच्या खोऱ्यांतील ही सुधारणा म्हणजे जगांतील एक मोठेंच आश्चर्य आहे. आणि तिच्याबद्दल जों जों अधिकाधिक माहिती मिळत जात आहे, तों तों पाहणाराची बुद्धि अधिकाधिकच स्तिमित होऊन जात आहे. म्हणून मी असें धरून चालतों, कीं जरी प्राचीन इतिहासाची आपली चालू गोष्ट जरा मध्येंच सोडून या पत्रांत पाच हजार वर्षांच्या पाठीमागें जरी आपण उडी मारली, तरी तूं कांहीं विशेषशी हरकत घेणार नाहींस.

मोहेंजोदारो हें कमींत कमी इतकें प्राचीन असलें पाहिजे असें म्हणतात. असें असूनही आज जें मोहेंजोदारो शहर सांपडलें आहे, तें किती तरी सुंदर शहर आहे; मोठेच सुसंस्कृत आणि सुधारणासंपन्न लोक त्यामध्यें राहत असले पाहिजेत. त्यामुळें त्याच्यापूर्वी एवढ्या प्रगतीपर्यंत पोंचण्यासाठीं वाढीचा केवढा तरी दीर्घ काळ लोटून गेलेला असला पाहिजे. या उत्खननाच्या कामाचा मुख्य अधिकार सर जॉन मार्शल यांच्याकडे आहे. ते लिहितात:

"मोहेंजोदारो येथें आणि हरप्पा येथें, दोन्ही ठिकाणीं एक गोष्ट अगदीं स्पष्ट आणि निःसंदिग्धपणें आढळून येते तीही, कीं या दोन्ही ठिकाणीं व्यक्त होणारी सुधारणा व संस्कृति ही कांहीं प्राथमिक अवस्थेंतील अथवा बाल्यावस्थेंतील संस्कृति नाहीं; तर ही संस्कृति, कितीएक युगांची प्राचीन असून हिंदुस्थानांत तर तिचा जणुं एक प्रकारचा कायम ठसाच होऊन गेलेला आहे; तिच्या पाठीमागें कित्येक हजार वर्षांचे मानवी दीर्घ प्रयत्नांचे डोंगर उभे आहेत. अशा रीतीनें यापुढें इराण, मेसापोटेमिया, आणि ईजिप्त यांच्या बरोबरीनें हिंदुस्थानचीही गणना, ज्या ठिकाणीं मानवी सुधारणेच्या कार्यक्रमांना प्रथम सुरुवात झाली व ज्या ठिकाणीं त्यांची प्रथम वाढही झाली, अशा भूमीमध्यें केली पाहिजे."

हरप्पाबद्दल मी तुला अजूनपर्यंत बोललेलों नाहींसें वाटतें. मोहेंजोदारोसारखेंच हें आणखी एक ठिकाण असून तेथेंही असेंच उत्खननाचें काम चालू आहे. हें ठिकाण पश्चिम पंजाबमध्यें आहे.

तेव्हां असें झालें, कीं सिंधु नदीच्या या खोऱ्यामध्यें आपण ५००० वर्षेंच पाठीमागें जाऊन थांबत नाहीं, तर त्यापेक्षांही किती तरी हजार वर्षांपूर्वीपर्यंतच्या काळांत आपण येथें जाऊन पोंचतों. अगदीं प्रथम त्या ठिकाणीं मनुष्याची वसती जेव्हां झाली असेल, अशा त्या अतिप्राचीन काळापर्यंत आपल्याला जावें लागतें. आणि मानवी इतिहासाच्या ज्ञानाचा माग या ठिकाणीं अंधकारांत लुप्त होऊन जातो. मोहेंजोदारो शहर भरभराटीला आलें होतें, त्या वेळीं आर्य लोक हिंदुस्थानांत अद्यापि आलेले नव्हते; आणि आतां यासंबंधांत यत्किंचितही संशय उरलेला नाहीं कीं,

"पंजाब आणि सिंधमध्यें, आणि कदाचित् हिंदुस्थानच्या इतर भागांमध्येंही

त्या काळीं मेसापोटेमिया किंवा ईजिप्त यांमध्यें नांदत असलेल्या सुधारणेसारखीच परंतु कित्येक बाबतींत तिच्याहून उच्च दर्जाची अशी अगदीं पुढारलेली, सर्व ठिकाणीं एकसारखी आणि स्वतःचीच स्वतंत्र अशी सुधारणा नांदत होती."

मोहेंजोदारो आणि हरप्पा येथील उत्खननामुळें ही प्राचीन आणि मन मोहून टाकणारी सुधारणा आपल्या दृष्टीसमोर उभी राहिली आहे. हिंदभूमीच्या पोटांत अशीं आणखी किती तरी सुधारणेचीं स्थानें गाडलेलीं असतील. ही सुधारणा कांहीं केवळ मोहेंजोदारो किंवा हरप्पा अशा एखाद-दुसऱ्या ठिकाणींच तेवढी उत्पन्न झालेली नसून ती साऱ्या हिंदुस्थानभर खोलवर पसरलेली असली पाहिजे असें दिसतें. कारण हीं दोन ठिकाणेंच पाहिलीं, तरी त्यांच्यामध्येंच केवढें तरी अंतर आहे.

हा काळ अशा संधिकाळचा दिसतो कीं त्या वेळीं "तांबें किंवा ब्रांझ धातूच्या हत्यारांच्या आणि भांड्यांच्या जोडीलाच मातीचीं किंवा दगडाचीं भांडीं आणि हत्यारें लोक वापरीत होते." तत्कालीन ईजिप्त, मेसापोटेमिया यांमधील लोकांपेक्षां सिंधूच्या खोऱ्यांतील लोक कोणत्या बाबतींत निराळे होते आणि कोणत्या बाबतींत वरच्या दर्जाचे होते, हें सर जॉन मार्शल यानीं दाखविलेलें आहे. ते म्हणतात :

"अशा रीतीनें कांहीं अगदीं थोडे प्रमुख मुद्दे सांगावयाचे म्हटलें, तर या काळीं कापसाचा कापडाच्या कामीं उपयोग करण्याची कला केवळ हिंदुस्थानांतच काय ती अस्तित्वांत होती. आणि पश्चिमेकडील जगांत तिचा प्रसार होण्याला त्यानंतर २–३ हजार वर्षें जावीं लागलीं. त्याप्रमाणें इतिहासपूर्वकाळच्या ईजिप्तमध्यें, मेसापोटेमियामध्यें. किंवा पश्चिम आशियामध्यें अथवा इतर कोठेंही आपल्याला मोहेंजोदारोमधील नागरिकांच्या घरांसारखीं प्रशस्त व सोयीस्कर घरें किंवा तेथील सुंदर व मजबूत बांधणीच्या स्नानगृहांसारखीं स्नानगृहें कांहीं आढळून येत नाहींत. त्या देशांमध्यें, देवांचीं विशाल व सुंदर मंदिरें, किंवा राजांचे राजवाडे आणि थडगीं हीं बांधण्याकरितां पुष्कळ पैसा उधळण्यांत आलेला आढळतो; पण बार्काच्या लोकांना मात्र मातीच्या अगदींच भिकार निवासस्थानांवर संतुष्ट राहावें लागत असावें असें दिसतें. सिंधु नदीच्या खोऱ्यांत याच्या उलट प्रकार आढळतो. तेथें जीं सुंदरांत सुंदर श्रेष्ठ दर्जाचीं बांधकामें आढळतात तीं सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठींच तयार केलेलीं आढळतात."

पुढें आणखी एका ठिकाणीं म्हटलें आहे :

"त्याचप्रमाणें सिंधूच्या खोऱ्यांतील कला आणि धर्म हेही अगदीं खास स्वतंत्र ठशाचे आणि सिंधूच्या खोऱ्यांतील इतर अनेक गोष्टींप्रमाणेंच इतर जगापासून सर्वथा वेगळे आहेत. तत्कालीन इतर देशांमधील जे कांहीं कलांचे नमुने आपल्याला माहीत आहेत त्यांमध्यें कोठेंही, येथें जीं मेंढे, कुत्रे किंवा इतर प्राणी यांचीं शाडू मातीचीं किंवा चिनी मातीचीं चित्रें आढळतात, त्यांच्यांतील हातोटीच्या तोडीचीं चित्रें आढळत नाहींत; किंवा निरनिराळ्या मुद्रांवर ज्या पद्धतीचें कोरकाम किंवा कोतरकाम आढळतें, तशा तोडीचें कामही त्या देशांत आढळत नाहीं. विशेषतः अशा कोरकामांचें किंवा चित्रांचे

कांहीं कांहीं जे अत्युत्कृष्ट नमुने आहेत—उदाहरणार्थ, मोठ्या वशिंडाच्या आणि तोकड्या शिंगांच्या बैलाचीं चित्रें पाहा—त्यांमध्यें ज्या उच्च प्रकारचे उठाव निर्माण करण्याचें कौशल्य आणि अंगरचना आणि बाधांच्या वळणाच्या रेषान् रेषासंबंधींची सूक्ष्म दृष्टि आढळते, तीहून उच्च प्रकारची दृष्टि व कसब कोरकामाच्या क्षेत्रात आजपर्यंत कोठेंही आणि केव्हांही दिसून आलेलीं नाहींत. तसेंच दहाव्या आणि अकराव्या चित्रामध्यें हरप्पा येथें सांपडलेले जे दोन मनुष्याच्या छोट्या पुतळ्यांचे नमुने दाखविलेले आहेत तशा तऱ्हेचे नमुने ग्रीक संस्कृतीच्या श्रेष्ठ काळांत येऊन पोंचेपर्यंत मध्यें कोठेंच इतरत्र दिसून येत नाहींत. सिंधूच्या खोऱ्यांतील धर्मामध्यें अर्थातच इतर जगांतील धर्मांशीं समान अशा पुष्कळ गोष्टी दाखवितां येतील. इतिहासपूर्वकालीन आणि इतिहासकालीन सर्वच धर्मांबद्दल हें म्हणतां येण्यासारखें आहे. परंतु एकंदर साकल्यानें विचार केला तर या काळचा धर्म इतका खास हिंदुस्थानचा असा वाटतो, कीं आज प्रचलित असलेल्या हिंदुधर्माहून तो कोणत्या बाबतींत वेगळा आहे हें दाखविणें सुद्धां कठिण आहे."

हरप्पा येथें सांपडलेले हे छोटे पुतळे, किंवा निदान त्यांचीं चित्रें तरी मला पाहावयास मिळालीं असतीं तर किती छान झालें असतें! कदाचित् केव्हां तरी तूं आणि मी दोघेंही हरप्पा आणि मोहेंजोदरो येथें प्रवासाला जाऊं आणि हीं सर्व दृश्यें पोटभर पाहून घेऊं. दरम्यान आपापलीं तूर्तचीं कामें आपण चालू ठेवूं या झालें; तूं तुझ्या पुण्याच्या शाळेंत आणि मी येथें डेहराडून येथील डिस्ट्रिक्ट जेल या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या माझ्या शाळेंत!

६१

कोर्डोबा आणि ग्रॅनाडा

१६ जून, १९३२

आशिया आणि यूरप खंडांमध्यें कितीएक वर्षें प्रवास करीत करीत आपण ख्रिस्तानंतर १००० वर्षांच्या काळापाशीं मुक्काम केला; आणि चालून आलेल्या अंतरावर मागें पुन्हां एकदां नजर टाकली. तथापि कशी कोण जाणे पण स्पेनची—आरबांच्या अमलाखालील स्पेनची—हकीकत त्यामध्यें यायची राहून गेली आहे. म्हणून तिकडे एकदां परत जाऊन ती हकीकत या सगळ्या तसचिरींमध्यें कोठें तरी बसविली पाहिजे.

बाकी तुला आठवण असली तर पूर्वी स्पेनबद्दल थोडीशी माहिती तुला मिळालेली आहे. इ. स. ७११ मध्यें आरबांचा एक सेनापति समुद्रपार होऊन आफ्रिकेतून स्पेन-

मध्यें आला. त्याचें नांव तरीक असून तो जिब्राल्टर येथें उतरला. (म्हणूनच जबल-उत्-तरीक तरीकचा खडक किंवा पहाड हें नांव निघालें.) दोन वर्षांच्या आंत आरबी लोकांनीं सर्व स्पेन देश काबीज केला आणि लौकरच पोर्तुगाल देशही आपल्या राज्याला जोडला. एवढ्यावर न थांबतां त्यांनीं आपला मोर्चा पुढें चालूच ठेवला; आणि फ्रान्समध्यें प्रवेश करून तेथें दक्षिण भागांत ते सर्वत्र पसरले. त्यामुळें अतिशय भयभीत होऊन फ्रँक लोक आणि इतर टोळ्यांमधील लोक चार्ल्स मार्टेलच्या नेतृत्वाखालीं एकत्र होऊन आरबी लोकांना रोखून धरण्याचा त्यांनीं फार मोठा प्रयत्न केला. त्यांत त्यांना यश येऊन फ्रान्समध्यें पॉइटिअर्स शेजारच्या टूर्स येथील प्रचंड लढाईंत आरबांचा फ्रँक लोकांकडून पराभव झाला. हा पराभव फारच मोठा असून त्यामुळें आरबी लोकांचीं सर्व यूरप खंड जिंकण्याचीं सुखस्वप्नें लयाला गेलीं. त्यानंतर अनेक वेळां आरबी लोक व फ्रँक आणि इतर ख्रिस्ती लोक यांचीं फ्रान्समध्यें परस्परांशीं युद्धें झालीं. त्यांत केव्हां केव्हां आरबांचा जय होऊन ते फ्रान्समध्यें घुसत, तर कधीं कधीं त्यांना पुन्हां परत स्पेनमध्यें हांकलून दिलें जाई. शार्लमेन बादशहानें सुद्धां प्रत्यक्ष स्पेनमध्यें जाऊन आरबांवर हल्ला केला होता, परंतु त्याचा पराभव झाला. तथापि पुष्कळ काळपर्यंत या दोन्ही पक्षांचें बळ सामान्यतः एकमेकांच्या तोडीचेंच राहिल्यामुळें आरब लोकांचें राज्य स्पेनमध्यें जरी चालू राहिलें, तरी तेथून आणखी पलीकडे त्यांना हातपाय पसरतां आले नाहींत, एवढी माहिती तुला मिळालेली आहे.

आफ्रिकेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पसरून थेट मंगोलियापर्यंत पसरलेलें जें आरबी लोकांचें साम्राज्य त्याचाच स्पेन देश हा अशा रीतीनें एक भाग झाला. पण तो या साम्राज्याचा भाग म्हणून फार काळपर्यंत राहिला नाहीं. तुला आठवतच असेल, कीं अरबस्तानांत यादवी होऊन आब्बासी वंशानें उम्मैया खलिफांना हांकलून दिलें. स्पेनमधील आरबाचा गव्हर्नर – नबाब – हा उम्मैया घराण्याचा असून त्यानें आब्बासी खलिफांची सत्ता मानण्याचें नाकारलें. अशा रीतीनें स्पेननें आरबी साम्राज्याशीं आपला संबंध तोडून टाकला; आणि बगदादचा खलिफा तेथून फार दूर असल्यामुळें आणि तिकडच्याच स्वतःच्या भानगडींत त्याचे हात सर्वस्वीं गुंतलेले असल्यामुळें त्याला त्या बाबतींत कांहींही करतां आलें नाहीं. परंतु स्पेन आणि बगदाद यांच्यामध्यें वैरभाव मात्र निर्माण होऊन राहिला आणि संकटाच्या प्रसंगीं एकमेकांना मदत करण्याऐवजीं एकमेकांच्या संकटांत आनंदच मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली.

आपल्या मायदेशापासून आपले संबंध अशा रीतीनें तोडून टाकण्यांत स्पेनमधील आरबी लोकांची एक प्रकारें जरा घिसाडघाईच झाली. एक तर ते फार दूरच्या अशा एका देशांत राहत होते; तेथली प्रजा परकी होती; आणि त्यांच्या आजूबाजूला शत्रूंचा गराडा होता. संकटाच्या किंवा अडचणीच्या प्रसंगीं त्यांच्या मदतीला येईल असें तेथें जवळपास कोणीही नव्हतें. परंतु त्या काळीं त्यांचा आत्मविश्वास जणुं उतूं चालला होता आणि

अशा संकटांची ते बिलकुल क्षिति बाळगीत नव्हते. असें होणें थोडेंसें स्वाभाविकच होतें. कारण ख्रिस्ती लोकांचें दडपण सारखें चालू असूनही त्यांनीं आपली बैठक चांगलीच घट्ट धरून ठेवलेली होती आणि पांचशें वर्षेपर्यंत स्पेनचा बहुतेक सारा भाग त्यांनीं आपल्या कबजांत ठेवला होता. त्यानंतर सुद्धां पुढें आणखी दोनशें वर्षेपर्यंत स्पेनच्या दक्षिणेला त्यांचें एक लहानसें स्वतंत्र राज्य त्यांनीं टिकवून धरलेंच. अशा रीतीनें प्रत्यक्ष बगदादच्या साम्राज्याचा नाश झाल्यानंतरही त्यांचें राज्य चालू होतें. आणि आरबी लोकांनीं स्पेनला शेवटचा रामराम ठोकला त्याच्या आधीं बगदाद शहर धुळीस मिळून किती तरी मोठा काळ लोटून गेलेला होता.

अशा रीतीनें स्पेन देशांत कोणत्या ना कोणत्या तरी ठिकाणीं, पण सातशें वर्षेपर्यंत स्पॅनिश लोकांचा अम्मल चालू राहिला, हीच गोष्ट खरोखर मोठी आश्चर्य करण्यासारखी आहे. परंतु त्याहीपेक्षां या स्पेनमधील आरबी लोकांची – यांनाच मूर लोक म्हणत म्हणून या मूर लोकांची म्हणूं या – सुधारणा आणि संस्कृति ही त्याहून जास्त कौतुक करण्यासारखी उच्च होती. एका इतिहासकारानें अर्थात् उत्साहाच्या भरांत वाहून जाऊन थोड्याशा अतिशयोक्तीनेंच लिहिलें आहे :

"मूर लोकांनीं कार्डोवा अथवा कोर्डोबा येथील हें अत्यंत अजब राज्य प्रस्थापित केलें ; हें राज्य म्हणजे मध्ययुगांतील एक महदाश्चर्य आहे ; आणि सारें यूरप खंड ज्या वेळीं रानटी लोकांशीं झुंजण्यांत आणि अज्ञानांधकारांत बुडून गेलें होतें त्या वेळीं सुधारणेचा आणि विद्यांचा दीप पश्चिम यूरपमध्यें याच एका राज्यानें जळता ठेवला."

कुर्तुबा ही या राज्याची सुमारें पांचशें वर्षेपर्यंत राजधानी होती. इंग्रजी भाषेंत या नांवाचा उच्चार सामान्यतः कोर्डोबा असा करतात ; तर केव्हां केव्हां कार्डोवा असाही करतात. मला वाटतें, एकच नांव निरनिराळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या पद्धतीनें लिहिण्याची मला खोड आहे. परंतु या शहराचें नांव मात्र मी कोर्डोबा असेंच नेहमीं लिहिणार आहें. हें एक फार मोठें शहर होतें. तेथील लोकवस्ती दहा लक्ष होती. त्यामध्यें अनेक उद्यानें असून प्रत्यक्ष नगराचा विस्तार दहा मैल लांब होता ; आणि उपनगरें आणखी वीस मैल लांबपर्यंत पसरलेलीं होतीं. असें म्हणतात, कीं या शहरांत ६०,००० राजवाडे आणि बंगले, २,००,००० लहान घरें, ८०,००० दुकानें, ३,८०० मशिदी, ७०० सार्वजनिक हमामखाने – स्नानगृहें – होतीं. या आकड्यांत कदाचित् थोडी अतिशयोक्ति असेल ; परंतु त्यांवरून तुला या शहराची कल्पना करतां येईल. तेथें पुष्कळ ग्रंथालयें असून त्यांपैकीं प्रमुख जें अमीराचें बादशाही ग्रंथालय त्यांत चार लक्ष ग्रंथ होते. कोर्डोबा येथील विद्यापीठ साऱ्या यूरप खंडांत आणि पश्चिम आशियामध्येंही विख्यात होतें. गरिबांसाठीं फुकट प्राथमिक शिक्षणाच्या शाळा विपुल होत्या. एका इतिहासकारानें लिहिलें आहे :

"स्पेनमध्यें बहुतेक प्रत्येक मनुष्याला लिहितां-वाचतां येत असे, तर ख्रिस्ती

यूरपमध्यें एक पाद्री वर्ग सोडला, तर अतिशय वरिष्ठ वर्गांतील लोकसुद्धां सर्वस्वीं निरक्षर असत."

असें हें कोर्डोबा शहर आरबांचें दुसरें जें श्रेष्ठ शहर बगदाद, त्याच्याशीं बरोबरी करूं पाहत होतें. साऱ्या यूरपभर त्याची ख्याति पसरलेली असून दहाव्या शतकांतील एका जर्मन ग्रंथकारानें त्याचा "पृथ्वीचा अलंकार" असा उल्लेख केला आहे. तेथील विद्यापीठांत दूरदूरच्या ठिकाणचे विद्यार्थी येत असत. आरबी लोकांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम यूरपमधील पॅरिस, ऑक्स्फर्ड आणि इतर इटलीमधील विश्वविद्यालयांवरही घडून येऊं लागला, कोर्डोबा येथें बाराव्या शतकांत ॲव्हरोज (म्हणजेच इब्न रशीद) नांवाचा एक प्रख्यात तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याच्या उतार वयांत स्पेनच्या अमीराशीं त्याचें वांकडें आल्यामुळें त्याला तेथून हद्दपार करण्यांत आलें होतें. तेथून निघून जाऊन त्यानें पॅरिसमध्यें मुक्काम ठोकला होता.

यूरप खंडांतील इतर प्रदेशांतल्याप्रमाणें स्पेनमध्येंही एक प्रकारची सरंजामशाही-पद्धतीच होती. तेथेंही मोठे मोठे आणि बलिष्ठ सरदार उदयाला आले होते; त्यांच्यामध्यें आणि तेथील राजा जो अमीर याच्यामध्यें वारंवार लढाया होत असत. बाहेरून होणाऱ्या हल्ल्यांपेक्षांही या आंतील यादवीमुळेंच आरबी राज्य अधिक दुर्बल होत गेलें. त्याच सुमारास स्पेनच्या उत्तर भागांत कांहीं लहान लहान ख्रिस्ती राज्येंही उदयास येऊन प्रबळ होऊं लागलीं होतीं; आणि हीं राज्येंही आरबी लोकांना दूरदूर हांकलून लावण्याची धडपड करीत होतींच.

इ. स. १००० वर्षांच्या सुमाराला म्हणजे सुवर्णयुगाच्या अगदीं शेवटालाच, अमीराचें राज्य जवळजवळ सर्व स्पेन देशावर पसरलेलें होतें. फ्रान्सच्या दक्षिणेकडील एक लहानसा तुकडा सुद्धां त्या वेळीं त्या राज्यांत होता. परंतु या सर्व राज्याचा विनाशकाळ त्यानंतर लौकरच आला. हा विनाश इतर सर्व ठिकाणच्याप्रमाणें अंतर्गत दुर्बलतेमुळेंच घडून आला. आरबी लोकांच्या सुधारणेचा हा पट मोठा मनोहर होता. त्यांत कलांचा उत्कर्ष होता, विलासोपभोगांची लयलूट होती, शौर्य-धैर्यादिकांना अवसर होता, सर्व कांहीं होतें; पण कांहीं झालें तरी ही सगळी श्रीमंतांची सुधारणा होती. त्यामुळें ज्यांची उपासमार होत होती अशा गरीब लोकांनीं बंड केलें, आणि मजुरांचेही दंगे झाले. हळूहळू जिकडे तिकडे यादवी माजली, एकेक प्रांत फुटून वेगळा झाला, आणि आरबांचें स्पेनमधील साम्राज्य फुटून तुटून गेलें. परंतु अशी फुटाफूट झाल्यानंतर सुद्धां स्पेनमध्यें आरबी लोक राज्य करीतच होते. कोर्डोबा शहर कॅस्टीलच्या ख्रिस्ती राज्याच्या हातीं कायमचें पडावयाला इ. स. १२३६ साल उजाडावें लागलें.

आरबी लोकांना दक्षिणेकडे जरी हांकून देण्यांत आलें, तरीपण ते झगडतच राहिले. दक्षिणेंत एक लहानसें राज्य स्थापन करून त्याला धरून ते स्पेनमध्येंच चिकाटीनें राहिले. हें राज्य म्हणजे ग्रॅनाडाचें राज्य होय. आकाराच्या दृष्टीनें पाहिलें तर हें राज्य फारच लहान, अगदींच क्षुद्र होतें; परंतु अगदीं लहान प्रमाणावर का

होईना, पण आरबी संस्कृतीचेंच तें एक प्रतीक होतें. ग्रॅनाडामधील सुप्रसिद्ध अल्हांब्रा प्रासाद आजही अस्तित्वांत आहे. त्याच्यामधील त्या सुंदर कमानी, भव्य खांब आणि आरबी नकासकाम हीं त्या काळची चांगली आठवण करून देतात. आरबी भाषेंत त्याचें मूळचें नांव "अल् हम्र" 'लाल महाल' असें होतें. आरबी लोकांच्या किंवा मुसलमानी वळणाच्या इतर इमारतीवर एक विशिष्ट प्रकारचें नकासकाम किंवा सजावट दिसून येते. तिला इंग्रजींत अरॅबेस्क असें म्हणतात. इस्लाम धर्मामध्यें मानवी शरीराचीं चित्रें काढण्याला उत्तेजन दिलें जात नसे. म्हणून त्यांच्यांतील शिल्पज्ञ लोक विचित्र आणि गुंतागुंतीचे असे नकशीचे अनेक नमुने तयार करूं लागले. कित्येकदां ते कमानीवर किंवा इतरही जागीं कुराणांतील आरबी भाषेमधील कविता (आयतें) कोरून त्यांची एक प्रकारची सुंदर नक्षी तयार करीत. आरबी लिपींत एक प्रकारचा ओघ साधतो; त्यामुळें नक्षीकामाकडे तिचा फार सहज उपयोग करतां येतो.

ग्रॅनाडाचें हें राज्य दोनशें वर्षें चाललें. स्पेनमधील ख्रिती राज्यें – विशेषतः कॅस्टीलचें राज्य – त्याच्यावर एकसारखें दडपण आणीत असत, आणि त्याला फार त्रास देत. केव्हां केव्हां कॅस्टीलच्या राज्याला खंडणी देण्याचाही प्रसंग ग्रॅनाडावर येई. या ख्रिती राज्यांमध्येंच परस्परांत यादवी नसती, तर ग्रॅनाडाचें राज्य बहुधा इतका काळ टिकलें नसतेंही. परंतु इ. स. १४६९ मध्यें प्रमुख अशा ख्रिस्ती राज्यांपैकींच दोन राज्यांतील राज्यकर्त्यांचा, फार्डिनांड आणि इसाबेला यांचा, विवाह घडून आला आणि त्यामुळें कॅस्टील, ॲरॅगॉन आणि लिऑन हीं राज्यें एकत्र झालीं. या फार्डिनांड आणि इसाबेला यांनीं ग्रॅनाडा येथील आरबांचें राज्य नष्ट करून टाकलें. आरबी लोकांनीं पुष्कळ वर्षेंपर्यंत फार शौर्यानें आणि निकरानें युद्ध केलें, परंतु अखेरीस चोहोंकडून रेटीत रेटीत त्यांची ग्रॅनाडामध्यें कोंडी करण्यांत आली. तेथें उपासमारीमुळें अखेरीस इ. स. १४९२ मध्यें ते शरण आले.

त्या वेळीं सारासन म्हणजेच आरबी लोकांपैकीं पुष्कळसे लोक स्पेन सोडून आफ्रिकेंत गेले. ग्रॅनाडाजवळच शहरापासून थोड्याशा अंतरावर एक उंच ठिकाण आहे, त्याला अजूनही 'मूर लोकांचा शेवटचा निःश्वास' हें नांव चालू आहे.

परंतु यानंतरही स्पेनमध्यें पुष्कळच आरब लोक राहिले. या आरबी लोकांना इतक्या वाईट रीतीनें वागविण्यांत आलें, कीं हें एक स्पेनच्या इतिहासातील अतिशय काळेंकुट्ट प्रकरण आहे. त्यांचा क्रूरपणें छळ करण्यांत आला, त्यांच्या कत्तली करण्यांत आल्या, तुम्हांला सवलतीनें वागविलें जाईल म्हणून त्यांना दिलेलीं सर्व वचनें मोडण्यांत आलीं. रोमन धर्मपीठानें आपल्या सत्तेपुढें जे कोणी मान वांकविणार नाहींत, त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठीं इन्क्विझिशन म्हणजे धार्मिक न्यायदानाच्या संस्थेचें जें नवेंच भयंकर शस्त्र निर्माण केलें होतें, त्याची स्थापना याच सुमारास स्पेनमध्यें झाली होती. सारासन लोकांच्या अमलाखालीं ज्यू लोकांची चांगली भरभराट झाली होती. त्यांच्यावर

आतां धर्म बदलण्याची सक्ती करण्यांत आली आणि कित्येक ज्यूंना जाळून ठार करण्यात आलें. स्त्रिया किंवा मुलें यांची सुद्धां त्यांत गय करण्यांत आली नाहीं. एक इतिहासकार लिहितो, "या पाखंडी काफीर लोकांना (म्हणजेच सारासन लोकांना) आपले सुंदर सुंदर चित्रविचित्र पोशाख टाकून देण्याचा हुकूम करण्यांत आला; त्यांना जिंकणाऱ्या लोकांप्रमाणें त्यानींही हॅट आणि ढिजारी वापरल्या पाहिजेत अशी सक्ती करण्यांत आली; त्यांची भाषा त्यांना सोडून द्यावी लागली, त्यांच्या चालीरीती, त्यांचे सण व उत्सव – नव्हे, प्रत्यक्ष त्यांच्या भाषेंतील त्यांचीं नांवें त्यांना सोडून द्यावीं लागलीं, आणि स्पॅनिश भाषा बोलण्याची, स्पॅनिश चालीरीतीप्रमाणें वागण्याची, आणि स्वतःला स्पॅनिश म्हणवून घेण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यांत आली. या सर्व रानटी जुलुमाविरुद्ध दंगे आणि बंडें झालीं नाहींत असें नाहीं; परंतु त्या सर्वांचा निर्दयपणें बीमोड करण्यांत आला."

स्पेनमधील या ख्रिस्ती लोकांचा आंघोळ करण्याला आणि कपडे धुण्याला फारच विरोध होता असें दिसतें. स्पेनमधील आरबी लोकांच्या या गोष्टी फारच आवडीच्या होत्या आणि त्यासाठीं जिकडे तिकडे त्यांनीं मोठमोठे हमामखानेही बांधलेले असत; एवढ्याचमुळें कदाचित् ख्रिस्ती लोकांनीं स्नान आणि कपडे धुणें यांना विरोध केला असावा. या ख्रिस्ती लोकांनीं या बाबतींत खरेखर अगदीं कळसच केला. या मॉरिस्को (म्हणजेच मूर किंवा आरब) लोकांची सुधारणा व्हावी म्हणून त्यांनीं असे हुकूम बजावले कीं "त्यांच्यापैकीं स्वतः कोणाला, त्यांच्या स्त्रियांना किंवा इतरही कोणाला घरीं किंवा इतर कोठेंही कपडे धुण्याची किंवा स्नान करण्याची परवानगी देऊं नये; आणि त्यांचीं सर्व स्नानगृहें – हमामखाने – मोडून तोडून नष्ट करण्यात यावींत."

स्नान करण्याबद्दलच्या त्यांच्या या पापाच्या जोडीला या मॉरिस्को लोकांविरुद्ध आणखी असा एक मोठा आरोप करण्यांत आला, कीं हे लोक धर्माच्या बाबतींत असावे तसे कडवे नाहींत, मऊ आहेत. हें लिहिणें फार विचित्र आणि अविश्वास्य वाटतें खरें; परंतु इ. स. १६०२ सालीं व्हलेन्शियाच्या आर्चबिशपनें या सारासन लोकांना स्पेनमधून हद्दपार करण्यांत यावें असा प्रस्ताव मांडतांना त्यांच्याविरुद्ध "मॉरिस्को लोकांचीं राजद्रोहाचीं आणि धर्मद्रोहाचीं कृत्यें" म्हणून जो एक खलिता तयार केला होता त्यात हा वरचा धार्मिक सहिष्णुतेबद्दलचा आक्षेप एक प्रमुख आक्षेप म्हणून नमूद केला होता. त्या बाबतींत त्यानें लिहिलें होतें, "सर्व लोकांत धर्मविषयक एकूण एक बाबतींत पूर्ण विचार व आचारस्वातंत्र्य असावें याच्याइतकें दुसरें कोणतेंच तत्त्व या (म्हणजे मॉरिस्को लोक) लोकाना प्रिय नाहीं; आणि असें स्वातंत्र्य तुर्की लोक आणि इतरही सर्व मुसलमान लोक आपल्या प्रजेला उपभोगूं देतात." स्पेनमधील सारासन लोकांची न जाणतां ही केवढी मोठी स्तुतीच करण्यात आलेली आहे म्हणावयाची; आणि त्या दृष्टीनें स्पॅनिश ख्रिस्ती लोकांची भूमिका किती भिन्न आणि किती असहिष्णु – हटवादी – दिसून येते.

लाखों सारासन लोकाना स्पेनमधून हांकलून काढण्यांत आलें. त्यांपैकीं बहुतेक जण आफ्रिकेंत गेले. कांहीं थोडे जण फ्रान्समध्यें गेले. पण ध्यानांत ठेव, कीं हे आरब लोक स्पेनमध्यें कांहीं थोडेथोडके नव्हे, तर चौंगले सातशें वर्षें होते. एवढ्या दीर्घ काळांत स्पेनमधील लोकांतच फार मोठ्या प्रमाणांत ते एकजीव होऊन गेलेले होते. मुळांत जरी ते आरब असले तरी हळूहळू ते आतां फार मोठ्या प्रमाणांत स्पॅनिश बनून गेलेले होते. बगदादमधील आरबांपेक्षां हे स्पॅनिश आरब चेहऱ्या-मोहऱ्यांतसुद्धां फार वेगळे झालेले होते म्हटलें, तरी चालेल. आजच्या घटकेलासुद्धां स्पेनमधील मानव-वंशांत पुष्कळसें आरबी रक्त खेळत असलें पाहिजे.

हे सारासन लोक दक्षिण फ्रान्समध्यें आणि स्वित्झर्लंडमध्येंही जाऊन पोंचलेले होते. राज्यकर्ते म्हणून नव्हे, तर साधे रहिवासी म्हणून. मिडीच्या (म्हणजे दक्षिण फ्रान्समधील) फ्रेंच लोकांमध्यें आजही एखाद्या वेळीं अगदीं थेट आरबी वळणाचा चेहरा आढळून येतो.

अशा रीतीनें स्पेनमधील सारासन राज्याचाही नाश झाला आणि आरबी संस्कृतीचाही नाश झाला. कारण याच्या पूर्वीच आशियामध्यें ही संस्कृति कोलमडून पडलेली होती हें लौकरच आपल्याला दिसून येईल. या संस्कृतीचा इतर पुष्कळ देशांवर आणि संस्कृतींवर परिणाम झालेला आहे; कितीएक मोठीं भव्य व सुंदर स्मारकेंही त्या संस्कृतीचीं मागें शिल्लक आहेत. परंतु पुढच्या इतिहासांत तिचें पुनरुज्जीवन मात्र झालें नाहीं.

सारासन लोक गेल्यानंतर, फार्डिनांड आणि इसाबेला यांच्या कारकीर्दीत स्पेनचें सामर्थ्य वाढूं लागलें. लौकरच अमेरिकेचा शोध लागून तिकडून पुष्कळ संपत्ति स्पेन-मध्यें येऊं लागली; आणि कांहीं काळपर्यंत स्पेन हा यूरप खंडांत सर्वांत सामर्थ्यवान् देश होऊन इतर सर्व देशांवर त्याचें वर्चस्व चालूं लागलें. परंतु त्याचा ऱ्हासही अतिशय जलद झाला; आणि इतर यूरपीय देश पुढें पुढें जात असतांच त्याचें महत्त्व अगदीं शून्य झालें. मध्ययुगाचेच विचार उराशीं बाळगून स्पेन देश तसाच निर्जीव अवस्थे-मध्यें राहूं लागला; मध्ययुगानंतर जगामध्यें किती तरी बदल होत आला आहे हें त्याच्या विचारक्षेत्रांतच येऊं शकलें नाहीं.

लेन पूल नांवाच्या एका इंग्रज इतिहासकारानें स्पेनमधील सारासन लोकां-विषयीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे :

"कितीएक शतकांपर्यंत स्पेन देश हा सुधारणेचें माहेरघर होता; कला आणि शास्त्रें, सर्व प्रकारची विद्या आणि उच्च प्रकारचें ज्ञान यांचें तें एक पीठ होतें; मूर लोकांच्या या सुसंकृत प्रदेशाच्या जोडीला बसण्याइतकी प्रगति दुसऱ्या कोणत्याही देशाची यूरपमध्यें झालेली नव्हती. फार्डिनांड आणि इसाबेला यांची कारकीर्द किंवा चार्लस बादशहाचें साम्राज्य यांमधील कांहीं काळ टिकलेलें वैभव हें इतक्या टिकाऊ आणि स्थिर सर्वश्रेष्ठत्वाच्या कोटीला केव्हांच पोंचूं शकलें नाहीं. त्या वेळीं मूर लोकांना

हद्दपार करण्यांत आलें; चंद्राप्रमाणें दुसऱ्याकडून उसन्या घेतलेल्या प्रकाशाच्या बळावर कांहीं काळपर्यंत ख्रिस्ती स्पेनचा प्रकाश पडला; आणि मग जें ग्रहण लागलें त्यामुळें उत्पन्न झालेल्या अंधकारांत आजतागायत स्पेन देश चांचपडतो आहे. स्पेन देशांतील सर्वस्वीं पिकाविरहित असे निर्जन प्रदेशांचे अनेक पट्टेच्या पट्टे हेच खरेंखुरें मूर लोकांचें स्मारक आहे असें म्हटलें पाहिजे. मूर लोकांनीं हींच ठिकाणें एका काळीं अत्यंत सुसंपन्न आणि भरघोस अशा द्राक्षवेली, ऑलिव्ह वृक्ष आणि पिंवळीं पिवळीं धान्यें यांनीं भरून, फुलवून टाकलेलीं असत. ज्या लोकसमाजांत त्यांच्या काळीं चतुरस्रता आणि विद्या यांची भरभराट होती, तोच लोकसमाज आज मठ्ठ, आणि निरक्षर झालेला आहे हेंही एक मूर लोकांचें स्मारकच आहे; आणि येथील सर्वसामान्य जनता निर्जीव, निःसत्त्व आणि 'हीन' होऊन राष्ट्राराष्ट्रांच्या शर्यतींत सर्वतोपरि मागें पडली आहे, तिला आतां पुढें येण्याची आशाही राहिलेली नाहीं आणि तिची जी छी थू होते तींच योग्य आहे अशी तिची अवस्था झालेली आहे, हेंही एक प्रकारें त्या मूर लोकांचें स्मारकच आहे.०"

हा फारच कठोर अभिप्राय आहे. एक वर्षापूर्वीं स्पेनमध्येंही क्रांति झाली आणि राजाला काढून टाकण्यांत आलें. आज तेथें लोकसत्ताक राज्य आहे. बहुधा या नवीन प्रजासत्ताक राज्याला चांगले दिवस येतील आणि स्पेन देश इतर देशांच्या बरोबरीला येईलही.

६२

क्रूसेड किंवा ख्रिस्ती धर्मयुद्धें

१९ जून, १९३२

नुकत्याच एका पत्रांत (५७ व्या) मीं तुला पोप आणि त्याचें धर्ममंडळ यांनीं मुसलमानांविरुद्ध जेरुसलेम शहर परत मिळविण्यासाठीं म्हणून जी धार्मिक-पवित्र लढाई पुकारली तिजबद्दल सांगितलें. सेल्जुक तुर्कांचें सामर्थ्य वाढूं लागल्यामुळें साऱ्या यूरप खंडाला भीति वाटूं लागली होती; परंतु त्यांतही ही भीति कॉन्स्टान्टिनोपलच्या राज्याला सर्वांत अधिक वाटत होती; कारण त्यांच्यावरच तुर्कांची खास धाड प्रथम आली होती. जेरुसलेम व पॅलेस्टाइन येथें जाणाऱ्या ख्रिस्ती यात्रेकरूंचा तुर्क लोकांकडून छळ होई, अशाबद्दलच्या कथा ऐकून यूरपमधील लोकांत फारच खळबळ उडून गेली आणि ते लोक संतप्त झाले. म्हणून ही पवित्र लढाई पुकारण्यांत आली आणि पोप व ख्रिस्ती धर्मपीठ यांनीं यूरपांतील सर्व ख्रिस्ती लोकांना आपल्या पवित्र शहराच्या सुटकेसाठीं चालून जाण्याचा आदेश दिला.

अशा रीतीनें इ. स. १०९५ मध्यें, क्रूसेडस् या नांवानें प्रसिद्ध असलेलीं हीं ख्रिस्तीधर्म आणि इस्लामधर्म, क्रूस आणि चंद्रकोर यांच्यामधील युद्धें सुरू होऊन तीं पुढें सुमारें दीडशें वर्षें चालू राहिलीं. मध्यें मधीं पुष्कळ काळपर्यंत लढाई न करतां दोन्ही पक्ष विश्रांति घेत असत. तथापि एकंदरींत दोन्ही पक्षांमध्यें एकसारखें लढाईचेंच वातावरण कायम होतें. ख्रिस्ती क्रूसेडरांच्या – धर्मासाठीं लढणारांच्या – लाटांवर लाटा एकसारख्या त्यांच्या पवित्र भूमीमध्यें लढण्यासाठीं येत आणि त्यांतले बहुतेक शिपाई तेथेंच मरत. पुष्कळ काळपर्यंत हें युद्ध चालूनही क्रूसेडर लोकांना त्यापासून तसा कांहीं लाभ झाला नाहीं. कांहीं थोडा काळ जेरुसलेम त्यांच्या हातांत आलें होतें. परंतु तें पुन्हां तुर्कांच्या हातीं गेलें, आणि अखेरपर्यंत तें त्यांच्याच हातीं राहिलें. या धर्म-युद्धांचे प्रमुख परिणाम म्हणजे लाखों ख्रिस्ती व मुसलमान लोकांना दैन्य सोसावें लागलें किंवा मरण आलें आणि आशिया मायनर व पॅलेस्टाइनमध्यें जर्मन मानवी रक्तानें न्हाऊन निघाली, हेच काय ते होत.

या काळांत बगदादच्या साम्राज्याची अवस्था काय होती? अब्बासी खलिफाच अजून तेथें प्रमुख स्थानीं होते. तेच अजून खलिफा, सुद्धर्मीयांचे सेनापति अमीरुल मोमनीन होते. परंतु त्यांचें हें प्रमुख पद नुसतें नांवाला मात्र होतें. सत्ता त्यांच्या हातीं मुळींच नव्हती. त्यांच्या साम्राज्याचे तुकडे कसे होऊन गेले होते आणि त्यांच्या प्रांतोप्रांतींच्या हाकिमांनीं, गव्हर्नरांनीं, आपापल्या प्रांतांत स्वतंत्र राज्यें कशीं स्थापन केलीं होतीं, हें आपण पाहिलेंच आहे. हिंदुस्थानांत वेळोवेळीं चालून येणारा गझनीचा महमूद हा एक स्वतंत्रच राजा होता. आणि खलिफा जर आपल्या इच्छेप्रमाणें वागणार नाहींत तर आपण त्यांचा समाचार घेऊं, अशी त्यानें धमकी दिलेली होती. खुद्द बगदादमध्यें सुद्धां खरी सत्ता तुर्कांच्याच हातांत होती. त्यानंतर सेल्जुक तुर्कांची ही आणखी एक शाखा आली ; त्यांनीं आपली सत्ता प्रस्थापित केली आणि विजय मिळवीत मिळवीत ही सत्ता थेट कॉन्स्टान्टिनोपलपर्यंत जाऊन धडकली. त्यामुळें खलिफा हा जरी खलिफा म्हणून शिल्लक राहिला असला, तरी राजकीय सत्ता त्याच्या हातीं मुळींच राहिलेली नव्हती. खलिफांनीं सेल्जुक तुर्कांच्या मुख्याला सुलतान ही पदवी दिली आणि राजसत्ता या सुलतानाच्याच हातांत गेली. तेव्हां क्रूसेड – धर्मयुद्धें – करणाऱ्या ख्रिस्ती लोकांना जें लढावें लागलें, तें या सेल्जुक सुलतानांशीं आणि त्यांच्या अनुयायांशीं.

या धर्मयुद्धांमुळें यूरपमध्यें एका बाजूला ख्रिस्तधर्मीय नसणारे सर्व लोक व त्यांच्याविरुद्ध एक आपलें निराळें ख्रिस्ती जगत्, अशी कल्पना वाढत गेली. ख्रिस्ती लोक ज्यांना पाखंडी किंवा काफिर म्हणत अशा विधर्मी लोकांकडून आपली "पवित्र भूमि" परत मिळविणें हा आतां सगळ्या यूरप खंडापुढें एकच एक सर्वसामान्य विचार आणि उद्देश निर्माण झाला. या सर्वसामान्य – सामाईक – उद्देशामुळें लोकांमध्यें उत्साहाचें वारें भरलें आणि या महत्कार्यासाठीं कितीएक लोकांनीं घरादाराचा त्याग केला. अशा रीतीनें

पुष्कळ लोक या युद्धामध्यें उदात्त हेतूनें सामील झाले. तर पुष्कळ लोक, या युद्धामध्यें जे कोणी सामील होतील त्यांच्या पापाबद्दल माफी मिळेल असें जें पोपनें आश्वासन दिलें होतें त्याला भुलून या युद्धांत सामील झाले. या धर्मयुद्धांच्या पाठीमागें आणखीही कांहीं वेगळीं कारणें होतीं. रोमला कांहीं तरी करून कॉन्स्टान्टिनोपलवर कायमचें वर्चस्व मिळविण्याची इच्छा होती. कॉन्स्टान्टिनोपलचें धर्मपीठ रोमच्या धर्मपीठापासून वेगळें होतें हें तुला आठवतच असेल. हें धर्मपीठ आपल्याला आद्य, सनातन धर्मपीठ म्हणवीत असे; रोमच्या धर्मपीठाबद्दल त्यांतील लोकांना अतिशय तीव्र तिटकारा होता आणि पोपला तर ते उपटसुंभ समजत असत. पोपच्या मनांतून कॉन्स्टान्टिनोपलची ही घमेंड जिरवावयाची होती आणि तें धर्मपीठ आपल्या कबजांत आणावयाचें होतें. धर्मलंड तुर्कांच्या विरुद्ध अशा या पवित्र युद्धाच्या नांवाखालीं पोपला आपली ही फारा दिवसांची मनीषा पुरी करून घ्यावयाची होती. राजकारणी पुरुषांची आणि स्वतःला मुत्सद्दी समजणाऱ्या लोकांची अशीच ही रीत असते! रोम आणि कॉन्स्टान्टिनोपल यांच्यामधील हा झगडा नीट ध्यानांत ठेवणें जरूर आहे; कारण या ख्रिस्ती-धर्मयुद्धांमध्यें तो पुनः पुनः डोकें वर काढतांना आढळतो.

ख्रिस्ती-धर्मयुद्धापाठीमागचें आणखी एक कारण व्यापारासंबंधीचें होतें. व्यापारी लोकांना, विशेषतः उदयास येऊं लागलेल्या व्हेनिस व जिनोआ या बंदरांतील लोकांना, हीं युद्धें हवीं होतीं. कारण, नाहीं तर त्यांच्या व्यापाराला धोका व खोट येत होती. सेल्जुक तुर्कांनीं त्यांचे पूर्वेकडील व्यापाराचे पुष्कळसे मार्ग बंद करून टाकले होते.

सर्वसामान्य लोकाना अर्थातच या आंतल्या हेतूंची कांहींच कल्पना नव्हती. त्यांना त्याबद्दल कोणीं कांहीं सांगितलेंच नव्हतें. राजकारणी लोक नेहमींच खरे हेतू दडवून ठेवीत असतात, आणि धर्म, न्याय, सत्य या किंवा अशाच गोष्टींचे मोठे पवाडे रचीत असतात. आजकालसुद्धां हाच प्रकार चालू आहे. त्या काळीं अशा या त्यांच्या गाजावाजाला लोक बळी पडले; आजही जगांतील बहुतेक लोक राजकारणी लोकाच्या गोड गोड भुलथापांना बळी पडत असतात.

अशा रीतीनें पुष्कळच लोक या धर्मयुद्धांच्या झेंड्याखालीं जमा झाले. त्यामध्यें सच्चे आणि कळकळीचे लोक होते; परंतु पुष्कळसे असे होते, कीं त्यांचा आणि सच्चेपणाचा दुरूनसुद्धां संबंध नव्हता आणि ते लूट मिळण्याच्या आशेनें मात्र यामध्यें सामील झालेले होते. एका बाजूला खरे सात्त्विक धर्मनिष्ठ लोक आणि दुसऱ्या बाजूला एकूण एक प्रकारचे गुन्हे करायला जे मुळींच मागेंपुढें पाहणार नाहींत अशा प्रकारचे समाजांतील सगळ्या घाणीचें आगर असे लोक, असें हें या सैन्यांत अपूर्व मिश्रण होतें. खरोखर, ख्रिस्ती धर्मीयांच्या दृष्टीनें अत्यंत उदात्त कार्य म्हणून या धर्मयुद्धांत सामील झालेल्या या धर्माच्या शिपायांनीं, निदान त्यांच्यापैकीं पुष्कळच जणांनीं अत्यंत घाणेरडीं, अत्यंत किळसवाणीं दुष्कर्में केलीं. इतकीं नीचपणाचीं, कीं त्यांना

दुसरीकडे कोठें तुलनाच नाहीं. वाटेंत जातां जातां लूटमार करणें आणि अनाचार किंवा स्त्रियांवर जुलूम करणें, यांतच त्यांपैकीं पुष्कळ जण इतके रंगून गेले, कीं ते पॅलेस्टाइनपर्यंत पोंचलेच नाहींत. कितीएक लोकांनीं वाटेंत ज्यू लोकांची कत्तल करण्याचा सपाटा चालविला; कितीकांनीं तर आपल्या ख्रिस्ती धर्मबांधवांचीही कत्तल करण्यास कमी केलें नाहीं. त्यांच्या या अनाचाराला कंटाळून, ते ज्या देशांतून जात असत त्या देशांतील शेतकऱ्यांनींच पुष्कळदां त्यांच्यावर हल्ले करून त्यांना ठार तरी करावें किंवा त्यांना पिटाळून लावावें असेही प्रकार घडून आले.

शेवटीं बुइलोचा गॉडफ्रे या नांवाच्या एका नॉर्मन सेनापतीच्या आधिपत्याखालीं हें धर्मयुद्धाचें सैन्य एकदांचें कसेंबसें पॅलेस्टाइनमध्यें जाऊन पोंचलें खरें. जेरुसलेमचा त्यानें पाडावही केला आणि मग तेथें "एक औठवडापर्यंत कत्तल चालू राहिली." ही कत्तल अत्यंतच भयंकर झाली. हा प्रकार प्रत्यक्ष पाहिलेल्या एका फ्रेंच गृहस्थानें लिहिलें आहे, कीं "प्रवेशद्वाराच्या कमानीखालीं गुडघ्यापर्यंत रक्त सांचलें असून घोड्यांच्या लगामाला तें जाऊन पोंचलें होतें." हा ग्रॉडफ्रे नंतर जेरुसलेमचा राजा झाला.

यानंतर सत्तर वर्षांनीं ईजिप्तचा सुलतान सलादिन यानें ख्रिस्ती लोकांच्या हातून जेरुसलेम परत घेतलें. त्यामुळें यूरपमधील लोकांत पुन्हां खळबळ माजली आणि पुन्हां धर्मयुद्धाचा मोर्चा सुरू झाला. या वेळीं यूरपमधील राजे आणि महाराजे त्यामध्यें सामील झाले; परंतु त्यांना विशेषसें यश मिळालें नाहीं. लहान कोण आणि मोठा कोण यांबद्दल त्यांच्यामध्यें आपसांत तंटे होते आणि एकमेकांना एकमेकांबद्दल हेवाही वाटत होता. अत्यंत राक्षसी आणि क्रूर अशा लढाया, क्षुद्र कारस्थानें आणि दुराचार व पाजीपणा यांनीं भरलेली या काळची या प्रसंगाची हकीकत मन खट्टू करणारी आहे. अर्थात् या सर्व भयाण कालखंडामध्येंही मनुष्यस्वभावांतील सद्गुणांचा कधीं कधीं प्रादुर्भाव झालेला आढळतो; कांहीं कांहीं प्रसंग असेही घडलेले आढळतात, कीं जेव्हां परस्पर-शत्रु असणारे लोकही एकमेकांशीं आदरानें आणि उदारबुद्धीनें वागल्याचें दिसतें. पॅलेस्टाइन देशांत गेलेल्या या परकी राजांमध्यें शरीरसामर्थ्य आणि शौर्य यांबद्दल विख्यात असलेला, सिंहहृदय ही पदवी मिळालेला, इंग्लंडचा राजा रिचर्ड हाही एक होता. सलादिन हाही मोठा योद्धा असून औदार्याबद्दल, धीरोदात्तपणाबद्दल त्याची ख्याति होती. त्याच्या या धीरोदात्तपणाची प्रशंसा खुद्द त्याच्याविरुद्ध लढणाऱ्या या ख्रिस्ती धर्मवीरांना सुद्धां करावी लागलेली आहे. एक गोष्ट अशी सांगतात, कीं एकदां रिचर्ड राजा फार आजारी होता आणि उष्णता त्याला असह्य झाली होती. ही गोष्ट सलादिनच्या कानावर गेल्यानंतर त्यानें त्याच्याकडे पर्वतावरून ताजें बर्फ आणि हिम पाठवून दिलें. हल्लीं आपण करतों त्याप्रमाणें पाणी कृत्रिम रीतीनें गोठवून त्या काळीं बर्फ तयार करतां येत नसे. त्यासाठीं पर्वतामध्यें स्वाभाविक रीतीनें गोठलेलें पाणी आणि पडलेलें बर्फ घेऊन अत्यंत जलद गतीनें जाणारे जासूद या कामासाठीं पाठविणें जरूर पडत असे.

अशा या धर्मयुद्धाच्या वेळच्या अनेक गोष्टी आहेत. वाल्टर स्कॉटची या-संबंधींची टालिस्मन ही कादंबरी बहुतेक तूं वाचलेली असशीलच.

या धर्मवीरांची एक तुकडी कॉन्स्टान्टिनोपल येथें गेली आणि त्या लोकांनीं तें शहर कबजांत घेतलें. तेथील पूर्व रोमन साम्राज्याचा जो ग्रीक बादशहा होता त्याला त्यांनीं हांकून दिलें आणि तेथें लॅटिन राज्य व रोमन धर्मपीठ यांची त्यांनीं स्थापना केली. कॉन्स्टान्टिनोपलमध्येंही भयंकर कत्तली करण्यांत आल्या आणि या धर्मवीरांनीं तें शहर अर्धवट जाळूनही टाकलें. परंतु हें लॅटिन राज्य फार काळपर्यंत टिकून राहिलें नाहीं. पूर्व साम्राज्यांतील ग्रीक राज्यकर्ते दुर्बल झाले होते खरे; तरी पण त्यांनीं परतून पन्नास वर्षांनंतर लॅटिन लोकांना तेथून हांकून लावलें. त्यानंतर हें पूर्व साम्राज्य कॉन्स्टान्टिनोपल येथें आणखी दोनशें वर्षेंपर्यंत चाललें. अखेरीस इ. स. १४५३ मध्यें तुर्क लोकांनीं तें कायमचें नष्ट केलें.

या ख्रिस्ती धर्मवीरांनीं कॉन्स्टान्टिनोपल शहर काबीज केलें यावरूनही रोमन धर्मपीठ व पोप यांची तेथपर्यंत आपलें प्रभुत्व वाढविण्याची इच्छा होती हें दिसून येतें. या शहरांतील ग्रीक राज्यकर्त्यांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं घाबरून जाऊन तुर्कां-विरुद्ध रोमच्या साह्याची याचना केली होती खरी; परंतु धर्मयुद्धांना मात्र त्यांनीं कांहींच मदत केली नाहीं; त्यांचा त्यांना फार तिटकाराच होता.

परंतु या सर्व धर्मयुद्धांमध्यें मुलांचीं धर्मयुद्धें म्हणून जीं झालीं तीं सर्वांत अतिशय भयप्रद झालीं. असंख्य लहान लहान मुलगे, यांत बहुतेक फ्रेंच होते आणि कांहीं थोडे जर्मन होते, उत्साहाच्या भरांत घरें सोडून पॅलेस्टाइनमध्यें जाण्याच्या निश्चयानें बाहेर पडले. त्यांपैकीं पुष्कळ जण वाटेंत मेले, कित्येक वाट चुकून कोठें भटकले त्यांचा कांहीं पत्ता लागला नाहीं. पुष्कळ जण त्यांत मार्सेल्स बदरांत गेले. तेथें त्या गरीब बिचाऱ्या मुलांना फसवून त्यांच्या उत्साहाचा गैरफायदा पाजी लोकांकडून घेण्यांत आला. त्यांना पवित्र भूमीकडे घेऊन जाण्याचें मिष करून गुलामांचा व्यापार करणाऱ्या लोकांनीं आपल्या जहाजांवर त्यांना घेतलें; तेथून त्यांना ईजिप्तमध्यें नेलें आणि तेथें त्यांना गुलाम म्हणून विकून टाकलें.

इंग्लंडचा रिचर्ड राजा हा पॅलेस्टाइनमधून परत येत असतांना त्याला त्याच्या पश्चिम यूरपातील शत्रूंनीं पकडून कैद केलें आणि त्याला सोडवून आणण्यासाठीं भली मोठी खंडणी भरावी लागली. फ्रान्सचा एक राजा प्रत्यक्ष पॅलेस्टाइनमध्येंच कैद झाला होता. त्यालाही सोडवून आणण्यासाठीं खंडणी भरावी लागली. पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा, फ्रेडरिक बार्बारोसा हा पॅलेस्टाइनमध्यें एका नदींत बुडून मरण पावला. त्यानंतर जसजसा काळ जात चालला तसतसें धर्मयुद्धांमधील आकर्षण – त्या बद्दलचा सारा उत्साह – मावळत चालला. लोकांना त्यांचा कंटाळा येऊन गेला. जेरुसलेम तर अजून मुसलमानांच्याच हातीं होतें. परंतु यूरपांतील राजे लोकाना किंवा जनतेला तें परत मिळविण्यासाठीं आणखी लोकांचे प्राण व संपत्ति खर्चीं घालावी

अशाचबद्दल फारशी आस्था वाटेनाशी झाली. तेव्हांपासून सुमारें सातशें वर्षेपर्यंत जेरुसलेम मुसलमानांच्याच ताब्यांत राहिलें. अगदीं अलीकडे, गेल्या महायुद्धांत १९१८ सालीं काय ते तें शहर एका इंग्रज सेनापतीनें तुर्कांच्या हातून जिंकून घेतलें.

या सर्व धर्मयुद्धांत पुढें झालेलें एक धर्मयुद्ध मात्र मोठें गमतीचें आणि विलक्षण झालें. खरें म्हटलें तर धर्मयुद्ध या शब्दाचा जो मूळचा जुना अर्थ त्या अर्थानें कांहीं त्याला धर्मयुद्ध म्हणतांच येणार नाहीं. पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा दुसरा फ्रेडरिक हा युद्धासाठीं ईजिप्तमध्यें गेला. पण तेथें लढण्याऐवजीं त्यानें तेथील सुलतानाची गांठ घेतली आणि त्यांच्यात्यांच्यामध्यें एक मित्रत्वाचा करार झाला. फ्रेडरिक हा एक लोकविलक्षण मनुष्य होता. त्याच्या काळच्या राजेलोकांना अक्षरओळखसुद्धां नसावयाची, परंतु त्याला अनेक भाषा येत असून त्यांत त्याला आरबी भाषासुद्धां येत होती. त्याला त्या काळीं 'जगांतील आश्चर्य' म्हणून म्हणत असत. पोपला तो मुळींच जुमानीत नसे; त्यामुळें पोपनें त्याच्यावर बहिष्काराची शिक्षा फर्माविली होती. परंतु तीमुळेंही त्याचें कांहीं वांकडें झालें नाहीं.

अशा तऱ्हेनें या धर्मयुद्धांपासून कांहीं निष्पन्न तर झालें नाहीं. पण या सतत चाललेल्या लढाईनें सेल्जुक तुर्क मात्र दुर्बळ होऊन गेले. तथापि त्यापेक्षांही खरें म्हटलें म्हणजे सरंजामदारशाहीनें सेल्जुक साम्राज्याला अधिक निःसत्त्व केलें. त्यांचे मोठमोठे सरंजामदार जवळजवळ आपण स्वतंत्र आहोंत असें समजूनच राहूं लागले. त्यांच्यांत एकमेकांमध्यें लढाया होऊं लागल्या. त्यांच्यांतील या अंतर्गत दुर्बळपणामुळेंच कधीं कधीं तुर्क लोकांना या खिस्ती धर्मयुद्धवाल्यापुढें हार खावी लागली. परंतु सलादिन-सारखा एखादा प्रबळ राज्यकर्ता उदयाला आला, म्हणजे मात्र थोडी थोडी तुर्कांची सद्दी भराला येत असे.

या धर्मयुद्धांसंबंधीं अगदीं अलीकडे एक निराळाच दृष्टिकोण इंग्रज इतिहासकार जी. एम. ट्रेव्हलीन यानें मांडला आहे. (त्यानें लिहिलेले गॅरिबॉल्डीबद्दलचे ग्रंथ तुला माहीतच आहेत) त्याचा हा दृष्टिकोणही मोठा पाहण्यासारखा आहे. ट्रेव्हलीन लिहितो, "या वेळीं यूरपमध्यें पुन्हां एकदां शक्तीचा, सामर्थ्याचा, संचार होऊं लागला होता. या सामर्थ्याच्या जोरावर पूर्वेकडे आक्रमण करण्याची सर्वसामान्य आकांक्षा यूरपमध्यें निर्माण झालेली होती. या सामान्य आक्रमणांपैकीं लष्करी आणि धार्मिक आक्रमणाचा भाग म्हणजे हीं खिस्ती धर्मयुद्धें होत. यूरपनें या धर्मयुद्धांतून कोणतें विशेष फळ पदरांत पाडून आणलें? आपलें खिस्ताचें पवित्र स्मशानस्थान कायमचें शत्रूच्या हातून सोडविणें किंवा सर्व खिस्ती जगाच्या ऐक्याचा पाया घालणें यांपैकीं एकही कार्य त्याला साधलें नाहीं; किंबहुना, धर्मयुद्धांचा सारा इतिहास म्हणजे या दोन्ही गोष्टी न साधल्या गेल्याचाच एक दीर्घ इतिहास आहे. या गोष्टींच्याऐवजीं यूरपनें अत्यंत कसची कारागिरी व उद्योगधंदे, विलासोपभोग, शास्त्रज्ञान, आणि नवें ज्ञान संपादण्याची आकांक्षा याच गोष्टी पैदा केल्या; म्हणजे अशा साऱ्या गोष्टी, कीं ज्यांचा भिक्षु

पीटर यानें अत्यंत तिटकारा केला असता; ज्यांना त्यानें दुरूनसुद्धां स्पर्श केला नसता."

सलादिन इ. स. ११९३ मध्यें मरण पावला आणि हळूहळू राहिल्यासाहिल्या आरबी साम्राज्याचेही तुकडे तुकडे होऊन गेले. पश्चिम आशियांमधील पुष्कळ प्रदेशांत छोट्या छोट्या सरंजामदारांच्या नेतृत्वाखालीं बंडाळी माजली. त्यानंतर अखेरचें धर्मयुद्ध इ. स. १२४९ मध्यें झालें. त्याचें नेतृत्व फ्रान्सचा राजा नववा लुई यानें स्वीकारलें होतें. त्यांत त्याचा पराभव होऊन त्याला कैद करण्यांत आलें.

या दरम्यान पूर्व आशिया आणि मध्य आशिया इकडे फार मोठमोठ्या घडामोडी चालू होत्या. मोंगल लोक, त्यांचा अत्यंत बलिष्ठ नायक चेंगीझखान अथवा जेंगीझखान याच्या नेतृत्वाखालीं एखाद्या प्रचंड काळ्याकभिन्न मेघाप्रमाणें पुढें पुढें जाऊन पूर्व क्षितिजाखालचा सारा प्रदेश व्यापून टाकूं लागले होते. धर्मयुद्धवाले आणि पॅलेस्टाइनचें संरक्षण करणारे, ख्रिस्ती आणि मुसलमान दोघांनाही या येऊं घातलेल्या स्वारीचें सारखेंच भय उत्पन्न झालें. हा चेंगीझखान आणि मोंगल लोक यांच्याबद्दल पुढच्या एका पत्रांत मी अधिक लिहीन.

हें पत्र पुरें करण्यापूर्वी मला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. मध्य आशियामध्यें बुखारा ह्मेथें एक अत्यंत श्रेष्ठ आरबी रोग-चिकित्सक हकीम या काळांत होऊन गेला. त्याची कीर्ति आशियामध्यें आणि यूरपमध्येंही पसरलेली होती. त्याचें नांव इब्न सिना असें होतें. परंतु तो यूरपमध्यें आव्हिसेना या नांवानें अधिक प्रसिद्ध आहे. त्याला हकीमांचा राजा म्हणत असत. धर्मयुद्धें सुरू होण्यापूर्वीच इ. स. १३०७ मध्यें तो मरण पावला होता.

एकट्या इब्न सिनाचें नांव केवळ त्याची प्रसिद्धि झालेली आहे एवढ्यासाठींच मी सांगतों आहें. परंतु तूं मुद्दाम लक्षांत ठेव, कीं या सर्व काळामध्यें शेवटपर्यंत आरबी लोकांच्या साम्राज्याचा जरी ऱ्हास होत चाललेला होता तरी आरबी सुधारणा, पश्चिम आशिया आणि मध्य आशियातील कांहीं भाग या ठिकाणीं चांगल्या रीतीनें तग धरून होती. सलादीन एकीकडे जरी या ख्रिस्ती धर्मवीरांशीं लढण्यांत गुंतलेला होता, तरी त्यानें त्याही धामधुमींत पुष्कळ विद्यालयें आणि रुग्णालयें बांधलीं. परंतु या सुधारणेचा आतां एकएकीं संपूर्ण विनाशकाल जवळ आला होता; मोंगल लोक पूर्वेकडून तिच्यावर चालून येऊं घातले होते.

६३

ख्रिस्ती धर्मयुद्धांच्या काळांतील यूरपं खंड

२० जून, १९३२

अकराव्या, बाराव्या आणि तेराव्या शतकांमध्यें इस्लामधर्म आणि ख्रिस्ती धर्म यांच्यामध्यें जो झगडा झाला, त्याचें थोडेंसें दर्शन आपण गेल्या पत्रांत घेतलें. या काळांत ख्रिस्ती जगताची कल्पना यूरप खंडांत वाढीस लागली. आतां साऱ्या यूरपभर ख्रिस्ती धर्म पसरलेला आढळतो. सगळ्यांत शेवटीं या धर्माच्या पंखाखालीं आलेले लोक म्हणजे रशियन आणि इतर कांहीं स्लाव्ह वंशाचे लोक. त्यासंबधीं एक गोष्ट प्रचलित आहे; ती खरी कीं खोटी हें कांहीं मला ठाऊक नाहीं; पण असें सांगतात मात्र, कीं ख्रिस्ती होण्यापूर्वी तत्कालीन जुन्या रशियन लोकांनीं जुना धर्म टाकून देऊन नवीन धर्म स्वीकारण्याबाबत आपसांत चर्चा केली. इस्लाम आणि ख्रिस्ती असे दोन नवे धर्म निर्माण झालेले त्यांच्या ऐकिवांत होते. म्हणून हे धर्म ज्या देशांत प्रचलित होते त्या देशांत अगदीं आधुनिक काळाच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं आपलें शिष्टमंडळ पाठविलें. अशासाठीं, कीं त्या त्या धर्माच्या तेथील व्यवहाराचें निरीक्षण करून त्यासंबंधींचा अभिप्राय त्यांनीं आपल्या मायदेशाकडे सादर करावा. असें म्हणतात, कीं हें शिष्ट-मंडळ प्रथम इस्लामधर्माचा प्रसार असलेल्या पश्चिम आशियांत कांहीं ठिकाणीं जाऊन मग कॉन्स्टान्टिनोपल येथें गेलें. कॉन्स्टान्टिनोपल येथें त्यांनीं जें कांहीं पाहिलें त्यानें ते दिपून गेले. आद्य ख्रिस्ती पीठांमधील पूजातंत्र अतिशय छानछोकीचें आणि भपकेबाज होतें; त्याच्यांत वाद्यें आणि सुंदर गायन यांची मोहक जोड होती. उपाध्याय किंवा पाद्री लोक मोठमोठे भरजरी पोशाख घालून येत आणि धूपदीपांची रेलचेल असे. उत्तरेकडून गेलेल्या या अर्धवट सुधारलेल्या लोकांच्या मनावर त्या सर्व समारंभाचा प्रचंड परिणाम झाला. इस्लामधर्मामध्यें असें भपकेबाजपणाचें कांहींच लक्षण नव्हतें. म्हणून ख्रिस्ती धर्मच स्वीकारावा असें त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चित केलें आणि त्याप्रमाणें आपल्या राजाकडे अभिप्राय सादर केला. त्यानंतर रशियाचा राजा व लोक यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला; त्यांनीं कॉन्स्टान्टिनोपलच्या आद्य ख्रिस्ती धर्मपीठाकडून या धर्माची दीक्षा घेतल्यानें ते आद्य धर्मपीठाचे अनुयायी बनले; रोमच्या धर्मपीठाचे नव्हे. पुढें केव्हांच रशियानें रोमच्या पोपला मान्यता दिली नाहीं.

रशियाचें हें धर्मांतर ख्रिस्ती धर्मयुद्धांपूर्वी पुष्कळ काळ झालें होतें. बल्गेरियन लोक सुद्धां प्रथम थोडा वेळ मुसलमानी धर्म स्वीकारण्याकडे कलले होते म्हणतात. परंतु पुढें त्यांनाही कॉन्स्टान्टिनोपलच्या धर्मपीठाचेंच आकर्षण अधिक वाटलें. तेथील एका राजानें बायझांटियम येथील (कॉन्स्टान्टिनोपलचें जुनें नांव बायझांटियम होतें हें तुझ्या लक्षांत असेलच) एका राज्यकन्येशीं लग्न केलें आणि ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. अशाच रीतीनें बाजूच्या इतर प्रदेशांतील लोकही हळूहळू ख्रिस्ती झाले.


नेराव्या शतकांतील यूरपखंड

इकडे हीं धर्मयुद्धें चालू असतांना यूरपची काय हालहवाल होती? तूं पाहिलेंच आहेस, कीं इकडचे कितीएक राजेमहाराजे पॅलेस्टाइनमध्यें गेले होते आणि तेथें त्यांच्यावर अडचणीचे प्रसंगही गुदरले होते. दरम्यान पोप मात्र रोममध्यें बसून काफीर तुर्कांविरुद्ध चाललेल्या या पवित्र धर्मयुद्धासाठीं मदत करण्याबद्दल आज्ञापत्रें आणि संदेशपत्रकें काढीत होता. या काळीं एकंदर यूरपच्या सर्व इतिहासामध्यें पोपची सत्ता अगदीं कळसाला जाऊन पोंचली होती असें म्हटलें तरी चालेल. मीं सांगितलेलें आठवतच असेल तुला, कीं एकदां प्रत्यक्ष एका मोठ्या अभिमानी बादशहाला क्षमा मागण्यासाठीं पोपच्या पायाशीं जाण्याला परवानगी मिळावी म्हणून कॅनोसा येथें पायांत कांहीं न घालतां बर्फामध्यें तिष्ठत उभें राहावें लागलें होतें. त्याच त्या पोपनें, सातवा ग्रेगरी यानें (याचें मूळचें नांव हाइल्डब्रँड असें होतें) पोपच्या निवडणुकीची एक नवीनच पद्धति प्रस्थापित केली. रोमन कॅथॉलिक पंथाच्या उपाध्यायवर्गांमध्यें कार्डिनल लोक हे सर्वांत श्रेष्ठ दर्जाचे धर्मगुरू समजले जात. या सर्व कार्डिनल्सचा मिळून एक संघ स्थापन करण्यांत येऊन त्याला पवित्र संघ किंवा Holy College असें नांव देण्यांत आलें. आणि या संघाकडून पोपची निवडणूक करण्यांत येऊं लागली. ही पद्धति इ. स. १०५९ मध्यें जी सुरू झाली, ती कांहीं किरकोळ फेरफार सोडले तर आजच्या घटकेलाही जशीच्या तशी चालू आहे. हल्लींसुद्धां पोप मरण पावला म्हणजे या कार्डिनल्सची बैठक एका दिवाणखान्यांत भरते आणि बाहेरून कुलूप लावून दार बंद करून टाकलें जातें. पोपची निवडणूक होऊन जाईपर्यंत मग कोणीं आंतून बाहेर यावयाचें नाहीं किंवा बाहेरून कोणीं आंत जावयाचें नाहीं. या कार्डिनल मंडळीमध्यें केव्हां केव्हां कोणाची निवड करावयाची याबद्दल एकमत होत नाहींसें झालें म्हणजे तासन्तास ते असें कोंडून घेऊन बसतात. कुणालाही बाहेर कांहीं येतां येत नाहीं. त्यामुळें शेवटीं त्यांना कांहीं तरी एकमत करावेंच लागतें. आणि त्यांचा निर्णय झाला कीं लगेच, उत्सुकतेनें प्रतीक्षा करीत बाहेर जमून राहिलेल्या लोकांना, निर्णय झाला हें समजण्यासाठीं बाहेर पांढरा धूर सोडण्यांत येतो.

पोपची जशी ही निवडणूक होऊं लागली, त्याचप्रमाणें पुढें पवित्र रोमन साम्राज्याच्या बादशहाचीही निवडणूक होण्याची पद्धति अमलांत आली. मात्र त्याची निवडणूक मोठ्या सरंजामदारांकडून होत असे. असे हे जमीनदार सात असून त्यांना 'मतदार राजे' असें म्हणत असत. अशा रीतीनें बादशहा नेहमीं एकाच घराण्यांतला असूं नये यासाठीं ही व्यवस्था केलेली होती. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या निवडणुकींतही कित्ती तरी काळपर्यंत एकाच घराण्याचें प्रस्थ माजून राहिलेलें दिसून येतें.

बाराव्या आणि तेराव्या शतकांत असें हें प्रस्थ साऱ्या साम्राज्यामध्यें होहेनस्टाफेन घराण्याचें माजलेलें होतें. हें घराणें मूळचें या गांवचें असल्यामुळें त्यांना हें नांव पडलें होतें. त्यांच्यापैकीं पहिला फ्रेडरिक होहेनस्टाफेन हा इ. स. ११५२ मध्यें बादशहा झाला. तो सामान्यतः फ्रेडरिक बार्बारोझा या नांवानें प्रसिद्ध आहे. धर्मयुद्धाहून

परत येतांना बुडून जो मेला तो हाच. पवित्र रोमन साम्राज्याच्या इतिहासात याची कारकीर्द सर्वांत अधिक वैभवशाली झाली असें म्हणतात. जर्मन लोक तर आज किती-एक शतकें त्याला एक विभूति – एक प्रकारचा देवाचा अवतार – समजत आले असून त्याच्यासंबंधीं त्या देशांत असंख्य दंतकथा प्रचलित झालेल्या आहेत. त्या लोकांची अशी समजूत आहे, कीं सध्यां तो पर्वतामध्यें निद्रिस्त आहे आणि योग्य वेळ येतांच जागा होऊन तो आपल्या लोकांचें संरक्षण करण्यासाठीं येणार आहे.

या फ्रेडरिक बार्बारोझानें पुष्कळ मोठा झगडा पोपच्या विरुद्ध केला. परंतु अखेरीस पोपचा जय झाला आणि फ्रेडरिकला त्याच्यापुढें नमावें लागलें. हा स्वतः 'हम करें सो कायदा' अशा वृत्तीचा राजा होता; परंतु त्याच्या माडलिकांकडून त्याला अतिशय त्रास सोसावा लागे. इटलीमध्यें या काळीं मोठमोठीं शहरें उदयास येत होतीं. या शहरांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याची खटपट फ्रेडरिकनें करून पाहिली. परंतु तिच्यांत त्याला यश आलें नाहीं. जर्मनीमध्येंही विशेषतः नद्यांच्या कांठावर कोलन, हॅम्बर्ग, फ्रँकफोर्ट हीं आणि अशीं अनेक शहरें निर्माण होऊं लागलीं होतीं. त्यांच्या बाबतींत मात्र फ्रेडरिकनें निराळें धोरण स्वीकारलें. सरंजामदार आणि सरदार याची सत्ता कमी व्हावी म्हणून त्यानें या उगवत्या शहरांना साहाय्यच केलें.

प्राचीन भारतीय लोकांची राजाविषयींची कल्पना काय होती, हें मीं तुला अनेक वेळां सांगितलेलें आहे. प्राचीन आर्यांच्या काळापासून तों अशोकाच्या काळापर्यंत, अर्थशास्त्रापासून तों शुक्राचार्यांच्या नीतिसारापर्यंत, पुनः पुनः असें आग्रहानें प्रतिपादन केलेलें आहे, कीं राजानें लोकमतापुढें मान वांकवलीच पाहिजे. प्रजा हीच खरी अखेरची सत्ताधीश होय. अर्थात् प्रत्यक्ष व्यवहारांत जरी हिंदुस्थानांतील राजे हे इतर देशांतल्या राजांसारखेच एकतंत्री हुकूमशहा असत, तरी भारतीयांचा सिद्धांत हा असा होता. आतां हा सिद्धांत किंवा दृष्टिकोन प्राचीन यूरपीय दृष्टिकोनाशीं पडताळून पाहा. त्यांच्या त्या काळच्या कायदेपंडितांच्या मताप्रमाणें बादशहा हाच सर्वसत्ताधीश होता. त्याची जशी इच्छा असेल तसा कायदा व्हावयाचा. ते म्हणत, "बादशहा हा या पृथ्वीवरील मूर्तिमंत कायदाच होय; कायद्याचा प्रत्यक्ष अवतारच होय." फ्रेडरिक बार्बारोझाही स्वतः म्हणे, "राजे लोकांना कायद्याच्या गोष्टी सांगणें, नियम घालून देणें हें प्रजेचें काम नव्हे. आज्ञापालन हेंच तेवढें प्रजेचें कर्तव्य."

याची चिनी लोकांच्या दृष्टिकोनाशींही तुलना करून पाहा. त्या देशात राजाला किंवा सम्राटाला मोठमोठ्या पदव्या – 'स्वर्गपुत्र' वगैरेसारख्या देण्याची पद्धति होती. परंतु त्यावरून आपण भलतीच समजूत करून घेतां कामा नये. तेथील कल्पनेप्रमाणेंही राजाची अधिकारमर्यादा ही यूरपांतील सर्वसत्ताधीश बादशहांच्यापेक्षां फारच निराळी होती. मेंगचे नांवाच्या एका प्राचीन चिनी ग्रंथकारानें म्हटलें आहे, "देशांतील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे प्रजा, त्यानंतरचें स्थान जमीन व तिच्यांतील पिकें यांच्याशीं

संबद्ध असलेल्या सोयीच्या व हितकारक अशा देवतांचें, आणि त्यानंतर सर्वांत खालचें स्थान म्हणजे राजाचें."

परंतु यूरपमध्यें मात्र वर सांगितल्याप्रमाणें बादशहाला जगामध्यें सर्वश्रेष्ठ सत्ताधीश असें समजण्यांत येई. यांतूनच राजे लोकांच्या दैवी अधिकारांची कल्पना निर्माण झाली. प्रत्यक्षांत मात्र राजा असा सर्वसत्ताधीश कधींच नसे. त्याचे मांडलिक सरदार हे सुद्धां शिरजोरच असत पुष्कळसे. आणि हळूहळू हीं नवीन शहरें निर्माण होऊं लागल्यावर त्यांच्यामध्यें एक नवाच वर्ग निर्माण होऊन तोही स्वतः कांहीं सत्ता कशी बळकावूं लागला हें दिसेलच आतां आपल्याला. शिवाय, एका बाजूनें पोपही आपण या पृथ्वीवरचे सर्वसत्ताधीश आहों असा दावा सांगतच होता. अशा रीतीनें दोन सत्ताधीश एका ठिकाणीं आले, कीं झगडा आणि गोंधळ उत्पन्न होणारच.

या फ्रेडरिक बार्बारोझाच्या नातवाचें नांवही फ्रेडरिक असेंच होतें. फार अल्पवयांत तो बादशहा झाला. त्याला दुसरा फ्रेडरिक असें म्हणत. ज्याला जगांतील आश्चर्य म्हणून म्हणत असत आणि जो ईजिप्तच्या सुलतानाशीं मैत्रीचीं बोलणीं करून आला तोच हा गृहस्थ. आपल्या आजाप्रमाणें यानेंही पोपला धुडकावून देऊन त्याच्या आज्ञा पाळण्याचें नाकारलें. त्यावर त्याला धर्मबाह्य म्हणून जाहीर करून पोपनें उलट कोलदांडा घतला. पोप लोकांचें हें एकच्जुनें अत्यंत प्रचंड शस्त्र होतें; पण अलीकडे तें गंजून गेल्यासारखें झालें होतें. दुसऱ्या फ्रेडरिकनें पोपच्या रागाच्या या आविष्काराची कांहींच फिकीर केली नाहीं; आणि जग पाहावें तर तेंही बदलूं लागलें होतें. फ्रेडरिकनें यूरपांतील राजेरजवाड्यांना लांबलचक पत्रें लिहून असें प्रतिपादन केलें, कीं राजेलोकांच्या कारभारांत हात घालण्याचा पोपला कांहीं एक अधिकार नाहीं; धार्मिक आणि आध्यात्मिक व्यवहारांची चिंता करणें हेंच फक्त पोपचें कार्य; राजकारणांत लुडबुड करण्याचें नव्हे. त्याबरोबरच उपाध्याय-वर्गांत लांचलुचपत आणि अनाचार किती माजला आहे यांचेंही त्यानें वर्णन केलें. पोपशीं फ्रेडरिकचा हा जो वाद झाला, त्यांत फ्रेडरिकचेंच पारडें फार जड ठरलें. बादशहा आणि पोप यांच्यामधील पूर्वापार चालत आलेल्या झगड्यामध्यें आतां आधुनिक बुद्धिवादी प्रवृत्तीचा शिरकाव होऊं लागल्याचें प्रथमचिन्ह या दृष्टीनें फ्रेडरिकचीं हीं पत्रें मोठीं लक्षांत घेण्यासारखीं आणि मनोवेधक आहेत.

धर्माच्या बाबतींत फ्रेडरिक हा फार उदार वृत्तीचा होता. त्याच्या दरबारीं आरबी आणि ज्यू विद्वान् आणि तत्त्वज्ञही असत. आरबांची गणना-पद्धति (संख्या) आणि बीजगणित (हिंदुस्थानांतून या गोष्टी मूळ अरबस्तानांत गेल्या हें तुझ्या लक्षांत असेलच) हे विषय या फ्रेडरिकच्या मार्फतच यूरपमध्यें आले. नेपल्स येथील विश्वविद्यालयाची आणि सालेर्नो येथील प्राचीन विद्यापीठामध्यें एका महान् वैद्यकीय विद्यालयाची स्थापना या फ्रेडरिकनेंच केली.

दुसऱ्या फ्रेडरिकनें इ. स. १२१२ पासून .१२५०. पर्यंत राज्य केलें. त्याच्या

मृत्यूनंतर साम्राज्यावरील होहेनस्टाफेन घराण्याची सत्ता नष्ट झाली. इटली देश साम्राज्यांतून फुटून निंघाला. जर्मनींत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं. आणि कित्येक वर्षें जिकडे तिकडे भयंकर अव्यवस्था व बंडाळी माजली. दरोडेखोर सरदार आणि लुटारू पेंढारी यांनीं जिकडे तिकडे लूटमार सुरू केली आणि त्यांना आळा घालायला कोणीही समर्थ राहिला नव्हता. पवित्र रोमन साम्राज्याचें अवजड ओझें जर्मनीच्या राज्याला असह्य झालें. फ्रान्स आणि इंग्लंडमध्यें तेथील राजे आपापलें आसन स्वतंत्रपणें स्थिर करण्याच्या उद्योगाला लागले होते आणि आपल्याला त्रास देणारे जे दुष्ट्यूम सरदार त्यांचा कांटा काढून टाकीत होते. परंतु जर्मनीचा राजा हा वर अणखी पहिला बादशहा आणि त्याची सगळी शक्तीही पोपशीं किंवा इटालियन शहरांशीं झगडे करण्यांत किंवा अपल्या सरदारांना ताब्यांत ठेवण्यांत खर्च होऊन जात होती. जर्मनीला बादशाहीचें पोकळ वैभव सांगायला सांपडत होतें, परंतु या खोट्या वैभवाच्या मोबदल्यांत स्वतःच्या देशामध्यें अंतर्गत झगडे आणि दुर्बलता यांचा मात्र उपद्रव त्याला सोसावा लागत होता. त्यामुळें जर्मन देशाचें एक संयुक्त राज्य बनण्याच्या पूर्वी किती तरी काळ फ्रान्स आणि इंग्लंड देश यांचीं दोन्ही प्रबल राष्ट्रें निर्माण झालीं. कित्येक शतकें त्यानंतरही जर्मनींत असंख्य छोट्या छोट्या राजांचें राज्य चालू होतें. अलीकडे साठ वर्षांपूर्वीच काय तें सर्व जर्मनीचें मिळून एक राज्य स्थापन झालें; आणि तरीसुद्धा त्यांत राजेरजवाड्यांचें स्थान कायम राहिलेंच. १९१४ ते १८ च्या महायुद्धानंतर त्यांची ही गर्दी नष्ट झाली.

दुसऱ्या फ्रेडरिकनंतर जर्मनींत इतकी बंडाळी माजली, कीं तेवीस वर्षेंपर्यंत नवीन बादशहाची निवडच होऊं शकली नाहीं. नंतर १२७२ मध्यें हॅप्सबर्गचा काउंट रुडोल्फ याला बादशहा म्हणून निवडण्यांत आलें. अशा रीतीनें हें नवीनच एक हॅप्सबर्गचें घराणें रंगभूमीवर आलें. हें घराणें पवित्र रोमच्या साम्राज्याच्या अंतापर्यंत बादशाहीला चिकटून राहावयाचें होतें. तेंही घराणें राजघराणें या नात्यानें, गेल्या महायुद्धांतच नष्ट झालें. या महायुद्धाच्या वेळचा ऑस्ट्रिया-हंगेरीचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ हा या हॅप्सबर्ग घराण्यामधीलच होता. त्या सुमारास हा फार म्हातारा होता. सुमारें ६० वर्षें त्यानें राज्योपभोग घेतला होता. त्याचा पुतण्या फ्रॅन्स फार्डिनांड हा त्याच्यानंतरचा वारस होता. त्याचा बायकोसह १९१४ मध्यें बाल्कन राष्ट्रांमधील बोस्निया देशांतील सेराजेव्हो येथें खून झाला. या खुनांतून महायुद्ध उपस्थित झालें. आणि या महायुद्धानें ज्या अनेक गोष्टींचा अंत झाला, त्यांमध्यें हें प्राचीन हॅप्सबर्ग घराणेंही होतें.

हें झालें पवित्र रोमन साम्राज्याबद्दल. त्याच्या पश्चिमेला फ्रान्स आणि इंग्लंड यांचीं एकसारखीं एकमेकांशीं युद्धें चालू होतीं आणि त्या त्या देशांतील राजांचे आपापल्या देशांत स्वतःच्या सरदारांशीं झगडे चालू होते. जर्मनींतील राजांपेक्षां किंवा बादशहांपेक्षां या देशांतील राजांना आपल्या सरदारांविरुद्ध फार मोठें यश मिळालें;

संबद्ध असलेल्या सोयीच्या व हितकारक अशा देवतांचें, आणि त्यानंतर सर्वांत खालचें स्थान म्हणजे राजाचें."

परंतु यूरपमध्यें मात्र वर सांगितल्याप्रमाणें बादशहाला जगामध्यें सर्वश्रेष्ठ सत्ताधीश असें समजण्यांत येई. यांतूनच राजे लोकांच्या दैवी अधिकारांची कल्पना निर्माण झाली. प्रत्यक्षांत मात्र राजा असा सर्वसत्ताधीश कधींच नसे. त्याचे मांडलिक सरदार हे सुद्धां शिरजोरच असत पुष्कळसे. आणि हळूहळू हीं नवीन शहरें निर्माण होऊं लागल्यावर त्यांच्यामध्यें एक नवाच वर्ग निर्माण होऊन तोही स्वतः कांहीं सत्ता कशी बळकावूं लागला हें दिसेलच आतां आपल्याला. शिवाय, एका बाजूनें पोपही आपण या पृथ्वीवरचे सर्वसत्ताधीश आहों असा दावा सांगतच होता. अशा रीतीनें दोन सत्ताधीश एका ठिकाणीं आले, कीं झगडा आणि गोंधळ उत्पन्न होणारच.

या फ्रेडरिक बार्बारोझाच्या नातवाचें नांवही फ्रेडरिक असेंच होतें. फार अल्पवयांत तो बादशहा झाला. त्याला दुसरा फ्रेडरिक असें म्हणत. ज्याला जगांतील आश्चर्य म्हणून म्हणत असत आणि जो ईजिप्तच्या सुलतानाशीं मैत्रीचीं बोलणीं करून आला तोच हा गृहस्थ. आपल्या आजाप्रमाणें यानेंही पोपला धुडकावून देऊन त्याच्या आज्ञा पाळण्याचें नाकारलें. त्यावर त्याला धर्मबाह्य म्हणून जाहीर करून पोपनें उलट कोलदांडा घतला. पोप लोकांचें हें एकच्युनें अत्यंत प्रचंड शस्त्र होतें; पण अलीकडे तें गंजून गेल्यासारखें झालें होतें. दुसऱ्या फ्रेडरिकनें पोपच्या रागाच्या या आविष्काराची काहींच फिकीर केली नाहीं; आणि जग पाहावें तर तेंही बदलूं लागलें होतें. फ्रेडरिकनें यूरपांतील राजेरजवाड्यांना लांबलचक पत्रें लिहून असें प्रतिपादन केलें, कीं राजेलोकांच्या कारभारांत हात घालण्याचा पोपला कांहीं एक अधिकार नाहीं; धार्मिक आणि आध्यात्मिक व्यवहारांची चिंता करणें हेंच फक्त पोपचें कार्य; राजकारणांत लुडबुड करण्याचें नव्हे. त्याचरोबरच उपाध्याय-वर्गांत लांचलुचपत आणि अनाचार किती माजला आहे यांचेंही त्यानें वर्णन केलें. पोपशीं फ्रेडरिकचा हा जो वाद झाला, त्यांत फ्रेडरिकचेंच पारडें फार जड ठरलें. बादशहा आणि पोप यांच्यामधील पूर्वापार चालत आलेल्या झगड्यामध्यें आतां आधुनिक बुद्धिवादी प्रवृत्तीचा शिरकाव होऊं लागल्याचें प्रथमचिन्ह या दृष्टीनें फ्रेडरिकचीं हीं पत्रें मोठीं लक्षांत घेण्यासारखीं आणि मनोवेधक आहेत.

धर्माच्या बाबतींत फ्रेडरिक हा फार उदार वृत्तीचा होता. त्याच्या दरबारीं आरबी आणि ज्यू विद्वान् आणि तत्त्वज्ञही असत. आरबाची गणना-पद्धति (संख्या) आणि बीजगणित (हिंदुस्थानांतून या गोष्टी मूळ अरबस्तानांत गेल्या हें तुझ्या लक्षांत असेलच) हे विषय या फ्रेडरिकच्या मार्फतच यूरपमध्यें आले. नेपल्स येथील विश्वविद्यालयाची आणि सालेर्नो येथील प्राचीन विद्यापीठामध्यें एका महान् वैद्यकीय विद्यालयाची स्थापना या फ्रेडरिकनेंच केली.

दुसऱ्या फ्रेडरिकनें इ. स. १२१२ पासून .१२५०. पर्यंत राज्य केलें. त्याच्या

मृत्यूनंतर साम्राज्यावरील होहेनस्टाफेन घराण्याची सत्ता नष्ट झाली. इटली देश साम्राज्यांतून फुटून निंघाला. जर्मनींत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं. आणि कित्येक वर्षें जिकडे तिकडे भयंकर अव्यवस्था व बंडाळी माजली. दरोडेखोर सरदार आणि लुटारू पेंढारी यांनीं जिकडे तिकडे लूटमार सुरू केली आणि त्यांना आळा घालायला कोणीही समर्थ राहिला नव्हता. पवित्र रोमन साम्राज्याचें अवजड ओझें जर्मनीच्या राज्याला असह्य झालें. फ्रान्स आणि इंग्लंडमध्यें तेथील राजे आपापलें आसन स्वतंत्रपणें स्थिर करण्याच्या उद्योगाला लागले होते आणि आपल्याला त्रास देणारे जे दुष्टघ्न सरदार त्यांचा कांटा काढून टाकीत होते. परंतु जर्मनीचा राजा हा वर अणखी पडला बादशहा आणि त्याची सगळी शक्तीही पोपशीं किंवा इटालियन शहरांशीं झगडे करण्यांत किंवा आपल्या सरदारांना ताब्यांत ठेवण्यांत खर्च होऊन जात होती. जर्मनीला बादशाहीचें पोकळ वैभव सांगायला सांपडत होतें, परंतु या खोट्या वैभवाच्या मोबदल्यांत स्वतःच्या देशामध्यें अंतर्गत झगडे आणि दुर्बलता यांचा मात्र उपद्रव त्याला सोसावा लागत होता. त्यामुळें जर्मन देशाचें एक संयुक्त राज्य बनण्याच्या पूर्वी किती तरी काळ फ्रान्स आणि इंग्लंड देश यांचीं दोन्ही प्रबल राष्ट्रें निर्माण झालीं. कित्येक शतकें त्यानंतरही जर्मनींत असंख्य छोट्या छोट्या राजांचें राज्य चालू होतें. अलीकडे साठ वर्षांपूर्वीच काय तें सर्व जर्मनीचें मिळून एक राज्य स्थापन झालें; आणि तरीसुद्धा त्यांत राजेरजवाड्यांचें स्थान कायम राहिलेंच. १९१४ ते १८ च्या महायुद्धानंतर त्यांची ही गर्दी नष्ट झाली.

दुसऱ्या फ्रेडरिकनंतर जर्मनींत इतकी बंडाळी माजली, कीं तेवीस वर्षेंपर्यंत नवीन बादशहाची निवडच होऊं शकली नाहीं. नंतर १२७३ मध्यें हॅप्सबर्गचा काउंट रुडोल्फ याला बादशहा म्हणून निवडण्यांत आलें. अशा रीतीनें हें नवीनच एक हॅप्सबर्गचें घराणें रंगभूमीवर आलें. हें घराणें पवित्र रोमच्या साम्राज्याच्या अंतापर्यंत बादशाहीला चिकटून राहावयाचें होतें. तेंही घराणें राजघराणें या नात्यानें, गेल्या महायुद्धांतच नष्ट झालें. या महायुद्धाच्या वेळचा ऑस्ट्रिया-हंगेरीचा बादशहा फ्रान्सिस जोसेफ हा या हॅप्सबर्ग घराण्यामधीलच होता. त्या सुमारास हा फार म्हातारा होता. सुमारें ६० वर्षें त्यानें राज्योपभोग घेतला होता. त्याचा पुतण्या फ्रॅन्स फार्डिनांड हा त्याच्यानंतरचा वारस होता. त्याचा बायकोसह १९१४ मध्यें बाल्कन राष्ट्रांमधील बोस्निया देशांतील सेराजेव्हो येथें खून झाला. या खुनांतून महायुद्ध उपस्थित झालें. आणि या महायुद्धानें ज्या अनेक गोष्टींचा अंत झाला, त्यांमध्यें हें प्राचीन हॅप्सबर्ग घराणेंही होतें.

हें झालें पवित्र रोमन साम्राज्याबद्दल. त्याच्या पश्चिमेला फ्रान्स आणि इंग्लंड यांचीं एकसारखीं एकमेकांशीं युद्धें चालू होतीं आणि त्या त्या देशांतील राजांचे आपापल्या देशांत स्वतःच्या सरदारांशीं झगडे चालू होते. जर्मनींतील राजांपेक्षां किंवा बादशहांपेक्षां या देशांतील राजांना आपल्या सरदारांविरुद्ध फार मोठें यश मिळालें;

त्यामुळें इंग्लंड व फ्रान्स हे दोन्ही देश एकजीव राष्ट्र अशा अवस्थेला अधिक आले, आणि त्यांच्यामधील या एकजीवपणाचें त्यांच्या ठिकाणीं सामर्थ्यही निर्माण झालें.

याच काळांत असा एक प्रसंग घडला, कीं ज्यासंबंधीं तुझ्या वाचनांत पुष्कळ आलें असेल. हा प्रसंग म्हणजे इ. स. १२१५ मध्यें जॉन राजानें मॅग्ना चार्टावर सही केली हा. जॉन हा आपला भाऊ सिंहहृदय रिचर्ड याच्या भागून गादीवर आला होता. याला अधिकाराची अतिशय हांव होती. परंतु त्या मानानें त्याची कुवत किंवा हिंमत नव्हती. त्यामुळें प्रत्येकाला डिंवचून असंतुष्ट करण्याचें काम तेवढें त्याच्या हातून चांगलें घडलें. त्याच्या सरदारांनीं टेम्स नदींतील रनीमीड या बेटावर त्याला कोंडींत धरलें आणि जवळजवळ नागव्या तरवारीच्या धारेवर धरून त्याच्याकडून मॅग्ना चार्टा (म्हणजे महान् करार) वर त्याची सही घेतली. त्यामध्यें त्यानें आपण इंग्लंडची सामान्य प्रजा व सरदार यांचें कांहीं कांहीं बाबतींतील स्वातंत्र्य संभाळूं असें वचन दिलें होतें. इंग्लंडच्या राजकीय स्वातंत्र्य-लढ्यामधील हें एक फारच मोठें पाऊल होतें. या चार्टरअन्वयें असें खास ठरविण्यांत आलेलें होतें, कीं कोणाही नागरिकाच्या बरोबरीच्या माणसांच्या संमतीशिवाय राजानें त्याच्या मालमत्तेंत किंवा व्यक्तिस्वातंत्र्यांत ढवळाढवळ करतां कामा नये. त्यांतूनच ज्यूरीची पद्धति सुरू झाली. कल्पना अशी, कीं कोणाही माणसाबद्दल न्यायदान हें त्याच्या बरोबरीच्या माणसानें करावें. म्हणजे ज्यूरींतील पंच म्हणजे एक प्रकारें न्यायाधीशच झाले. अशा रीतीनें इंग्लंडमध्यें राजाच्या सत्तेला फार पूर्वीच्या काळीं पायबंद घातला गेला असें आढळतें. पवित्र रोमन साम्राज्यामध्यें राजा हा अगदीं सर्वसत्ताधीश असा जो सिद्धांत मान्य करण्यांत आलेला होता, तो इंग्लंडमध्यें त्या काळीं सुद्धां मान्य झाला नव्हता.

पण एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे, कीं हा जो नियम इंग्लंडमध्यें सातशें वर्षांपूर्वी घालून देण्यांत आला तो आज हिंदुस्थानांत मात्र १९३२ सालीं आणि ब्रिटिशांच्याच राज्यामध्यें लागू नाहीं. आज येथें एका व्यक्तीला – व्हाइसरॉयला – ऑर्डिनन्स, वटहुकूम काढून कायदे करण्याची आणि लोकांची मालमत्ता आणि त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याची सत्ता आहे.

मॅग्ना चार्टाच्या मागोमाग इंग्लंडमध्यें आणखी एक महत्त्वाची घटना घडून आली. तेथें एक राष्ट्रीय पंच-मंडळ हळूहळू निर्माण झालें. त्या मंडळावर देशांतील निरनिराळ्या भागांतील व शहरांतील नागरिक आणि नाइट (योद्धे) हे निवडून येत असंत. अशा रीतीनें इंग्रजांच्या पार्लमेंट संस्थेचा उगम झाला. नागरिक आणि नाइट निवडून येत. त्यांचें मिळून कॉमन्स हाउस होई; आणि सरदार व बिशपांची मिळून लॉर्डांची सभा. पहिल्यापहिल्यांदा या पार्लमेंटला सत्ता कांहींच नव्हती; परंतु ती हळूहळू वाढली. राजा आणि पार्लमेंट यांत श्रेष्ठ सत्ता कोणाची याबद्दलही शेवटीं एकदां कसोटीचा सामना झाला. त्यांत राजाला आपलें डोकें गमवावें लागून पार्लमेंट

हेंच अनिरुद्ध सत्ताधारी ठरलें. परंतु ही गोष्ट घडून यावयाला मॅग्ना चार्टानंतर ४०० वर्षें जाऊन सतरावें शतक यावें लागलें.

फ्रान्समध्येंसुद्धां अशा प्रकारचें एक मंडळ निर्माण झालें. तीन वर्गांचें पंच-मंडळ (Council of three Estates) असें त्याला म्हणत. हे तीन वर्ग म्हणजे सरदार लोक, धर्मपीठाचे लोक आणि सामान्य जनता असे होते. पण या मंडळाच्या सभा केव्हां तरी होत आणि इंग्लंडच्या पार्लमेंटनें ज्या प्रकारची सत्ता मिळविली, तशा प्रकारची सत्ता कांहीं त्या मंडळाला मिळवितां आली नाहीं. फ्रान्समध्येंही राजांची सत्ता मोडून जाण्यापूर्वी एका राजाला आपलें डोकें गमवावें लागलें.

पूर्वेकडे मात्र या काळांत ग्रीक राजांच्या अमलाखालील पूर्वेकडील रोमन साम्राज्य चालू राहिलें. त्याच्या अगदीं पहिल्या पहिल्या काळापासून हें साम्राज्य सदान्कदा कोणाशीं ना कोणाशीं तरी युद्धांत गुंतलेलें होतें आणि पुष्कळदां तें अगदीं नाहींसें होण्याच्याही बेताला आलें होतें. तरी पण तें प्रथम उत्तरेकडील रानटी टोळ्यांच्या हल्ल्यांमधून आणि नंतर मुसलमानांच्या हल्ल्यांतून दोन्हींतून बचावून जिवंत राहिलें. या साम्राज्यावर रशियन, बल्गेरियन, आरबी किंवा सेल्जुक तुर्क वगैरेंकडून जे सगळे हल्ले झाले, त्यापेक्षांही अधिक विनाशकारक आणि घातक असा हल्ला ख्रिस्ती धर्मयुद्धवाल्यांचा झाला.° या ख्रिस्ती धर्मवीरांनीं ख्रिस्तधर्मीय कॉन्स्टान्टिनोपलच्या राज्याचें विधर्मी तुर्कांपेक्षांही अधिक नुकसान केलें. या महान् आघातांतून मात्र कॉन्स्टान्टिनोपल शहरानें पुन्हां केव्हांच डोकें वर काढलें नाहीं.

पश्चिम यूरपांतील जगाला या पूर्व साम्राज्याबद्दल खरी अशी कांहींच माहिती नव्हती. त्याची त्या पाश्चात्य जगाला मुळींच पर्वा नव्हती. त्यांच्या दृष्टीप्रमाणें हें साम्राज्य म्हणजे ख्रिस्ती जगताचा जणुं भागच नव्हतें. या साम्राज्याची भाषा पडली ग्रीक भाषा; तर पश्चिम यूरपांतील विद्वानांची आणि सुसंकृत लोकांची भाषा म्हणजे लॅटिन भाषा. खरी गोष्ट अशी आहे, कीं कॉन्स्टान्टिनोपलच्या पडत्या काळांत-सुद्धां त्या राज्यांत विद्वत्ता, ज्ञानसाधन आणि वाङ्मय-निर्मिति या गोष्टी पश्चिम यूरप-पेक्षां पुष्कळच अधिक प्रमाणांत होत्या. परंतु ही सगळी विद्वत्ता म्हाताऱ्या माणसाची होती. तिच्यामध्यें कांहीं जोम किंवा नवनिर्माणशक्ति शिल्लक राहिलेली नव्हती. पश्चिम यूरपांत विद्वत्तेचें प्रमाण अगदींच कमी होतें. परंतु जी होती ती विद्वत्ता नव-तारुण्याच्या जोमांतील आणि नवनिर्मितीचें सामर्थ्य असलेली होती; आणि लौकरच त्या शक्तीच्या विकासाला बहर येऊन मोठमोठे सुंदर कार्यप्रबंध तिच्या हातून निर्माण होऊं घातले होते.

रोममधल्याप्रमाणें पूर्वेकडील रोमन साम्राज्यांत राजसत्ता आणि धर्मपीठ याच्या-मध्यें सत्तेचा झगडा नव्हता. त्या ठिकाणीं बादशहा हाच सर्वसत्ताधीश होता; आणि त्याची सत्ता अगदींच अनियंत्रित होती. त्या राज्यांत व्यक्तिस्वातंत्र्याचें नांव-सुद्धां नव्हतें. ज्याच्याजवळ सर्वांत अधिक सामर्थ्य, किंवा जो सर्वांत अधिक न्याय-

अन्यायाचीं चाड न बाळगणारा, त्याच्या हातीं गादी पडावयाची. खून करून, कट करून, रक्तपातानें किंवा अनान्वित गुन्हे करून राजे राजमुकुट प्राप्त करून घेत आणि लोक मुकाट्यानें विनतक्रार त्यांची आज्ञा पाळीत. आपल्यावर राज्य कोणाचें आहे याची लोकांना जवळजवळ मुळींच फिकीर नव्हती.

पूर्वेकडील रोमन साम्राज्य हें एक प्रकारें आशियाकडून येणाऱ्या हल्ल्याकडून यूरपचें संरक्षण करण्यासाठीं दाराशीं खड्या राहिलेल्या रखवालदाराप्रमाणेंच होतें म्हणावयाचें. कितीएक शतकेंपर्यंत या कार्यांत त्या साम्राज्याला यश येत गेलें. आरबांना कॉन्स्टान्टिनोपल काबीज करतां आलें नाहीं; सेल्जुक तुर्कांच्या हातीं तें अगदीं पडायला आलें होतें, परंतु अखेरीस त्यांनाहि तें घेतां आलें नाहीं. मोंगल लोक तें शहर बाजूला टाकूनच वर उत्तरेस रशियाकडे गेले. शेवटीं मग उस्मानी (आटोमन) तुर्क जेव्हां आले तेव्हां इ. स. १४५३ मध्यें कॉन्स्टान्टिनोपलच्या साम्राज्यशाही राजधानीचें तें अपूर्व फळ त्यांच्या हातीं पडलें. राजधानीच्या त्या पाडावाबरोबरच सगळ्या पूर्व साम्राज्यशाहीचाही पाडाव झाला.

६४

यूरपमधील शहरांचा उदय

२१ जून, १९३२

ख्रिस्ती धर्मयुद्धांचा काळ हा यूरप खंडामध्यें श्रद्धेचा एक महान् काळ होता. सामुदायिक श्रद्धा आणि सामुदायिक आशा-आकांक्षा यांचा तो काळ होता. साऱ्याच लोकांचीं अंतःकरणें एकाच आशेनें आणि श्रद्धेनें भरलेलीं होतीं; त्या श्रद्धेच्या आणि आशेच्या बळावर लोक आपल्या रोजच्या आयुष्यांतील दैन्यदुःखांतही मनाचें समाधान प्राप्त करून घेत होते. यूरप खंडांत त्या वेळीं शास्त्रसंशोधन नव्हतें; विद्यांचा उत्कर्ष जवळजवळ नव्हता म्हटलें तरी चालेल; कारण श्रद्धा आणि शास्त्र व विद्या कधीं एका ठिकाणीं सहसा नांदूं शकत नाहींत. विद्यार्जन आणि ज्ञानसंपादन यांमुळें मनुष्याला विचार करण्याची शक्ति उत्पन्न होते; परंतु शंका आणि प्रश्न यांची संगत श्रद्धेला तितकीशी सुखकारक वाटत नाहीं; थोडीशी अवघडच वाटते. शास्त्रसंशोधनाचा मार्ग म्हंटला म्हणजे त्यांत नवीन शोध आणि प्रयोग हे आलेच; पण श्रद्धेचा मार्ग हा नव्हे. हळूहळू ही श्रद्धा कशी दुर्बल झाली व शास्त्रांचा उदय कसा झाला, हें पुढें आपणांस दिसणारच आहे.

तूर्त या धर्मयुद्धाच्या क्षणाला मात्र श्रद्धेची चांगली सद्दी आहे आणि रोमन धर्मपीठच बहुधा या श्रद्धावंतांचें नेतृत्व स्वीकारून पुष्कळदां श्रद्धावंतांनाच पिळून

काढीत आहे, त्याच्या श्रमावर आपलें वजन आणि भांडवल वाढवीत आहे. असे हजारों, लाखों, श्रद्धाळू जन पॅलेस्टाइनमध्यें धर्मयुद्धासाठीं पाठविण्यांत आले, पण पुन्हां कांहीं त्यांचे पाय मायदेशाला लागले नाहींत. इकडे यूरप खंडांतही ख्रिस्ती लोकांपैकीं किंवा इतरही गटांपैकीं जे कोणी कोणत्याही बाबतींत आपली आज्ञा मानणार नाहींत, त्यांच्याही विरुद्ध पोपनें धर्मयुद्ध सुरू केलें. लोकांमधील या श्रद्धेचा फायदा घेऊन पोपनें आणि पोपच्या धर्मपीठानें वारंवार सूटपत्रें व "क्षमापत्रें" (Indulgences) विकण्यास सुरुवात केली. सूटपत्र म्हणजे धर्मपीठाचा एखादा नियम किंवा प्रघात मोडण्यासाठीं दिलेली परवानगी असे. अशा रीतीनें धर्मपीठानें स्वतःच घालून दिलेले नियम मोडण्याची परवानगी खास व्यक्तींना धर्मपीठच देऊं लागलें! क्षमापत्रांचा प्रकार तर याहूनही अधिक घाणेरडा होता. रोमनधर्मपीठाच्या सिद्धांताप्रमाणें मेल्यानंतर मनुष्याचा आत्मा पर्गेटरी (शुद्धिस्थान) नांवाच्या स्थानीं जातो. हें स्थान स्वर्ग आणि नरक या दोहोंच्यामध्यें असून पृथ्वीवर केलेल्या पापांबद्दलची शिक्षा दुःखरूपानें त्या आत्म्याला या शुद्धिस्थानांत भोगावी लागते. ही शिक्षा भोगून झाल्यावर मग तो आत्मा स्वर्गांत जातो असें मानतात. परंतु पोपनें पैसे घेऊन लोकांना असें वचन देण्यास सुरुवात केली, कीं तुमच्या आत्म्यावरचें या शुद्धिस्थानांत जाण्याचें संकट टळून तो थेट एकदम स्वर्गांतच जाईल. अशा रीतीनें भोळ्याभाबड्या लोकांच्या श्रद्धेचा धर्मपीठानें हा असा बाजार मांडून आपली तुंबडी भरली; एवढेंच नव्हे, तर गुन्हे आणि धर्मपीठाच्या दृष्टीनें जीं पापें असत अशीं पापें यांच्यामधून सुद्धां धर्मपीठानें पैसे उकळण्यास कमी केलें नाहीं. ख्रिस्ती धर्मयुद्धांनंतर कांहीं काळानें हीं 'क्षमापत्रें' विकण्याची पद्धति सुरू झाली. पुढें पुढें ही पद्धति अगदींच किळसवाण्या अवस्थेला पोंचली आणि पुष्कळसे लोक रोमन धर्मपीठावर पुढें जे उलटले, त्याला हें एक कारण होतें.

भोळे-भाबडे श्रद्धाळू लोक काय काय सहन करतात, हें पाहिलें म्हणजे मन चकित होतें. याचमुळें तर पुष्कळशा देशांत धर्म हा मोठ्यांत मोठा आणि अधिकांत अधिक प्राप्तीचा धंदा झालेला आहे. देवळांतले—मंदिरांतले—पुजारी पाहा ना, कसे गरीब बिचाऱ्या भक्तांना लुचाडीत असतात ते. गंगेच्या कांठावर जा, म्हणजे इतकी दक्षिणा दिलीस तर ठीक, नाहीं तर तुझें धर्मकृत्य करीत नाहीं असें म्हणून गरीब खेडवळ लोकांना नाडणारे ते पंड्ये तुझ्या दृष्टीस पडतील. तुमच्या घरांत कांहीं घडो, कुणी जन्माला येवो, कुणाचें लग्न असो, नाहीं तर कुणी मेलेलें असो, भटजी तेथें यायचाच आणि दक्षिणेसाठीं त्याचा हात पुढें असावयाचाच!

सर्व धर्मांमध्यें हाच प्रकार आहे; मग तो हिंदुधर्म असो, नाहीं तर ख्रिस्ती धर्म असो; इस्लाम धर्म असो, नाहीं तर झरतुष्ट्राचा धर्म असो. श्रद्धाळू लोकांच्या श्रद्धेंतून पैसा उकळण्याचे प्रत्येक धर्माचे मार्ग मात्र निरनिराळे आहेत. हिंदुधर्मांतील हा मार्ग अगदीं उघड उघड कोणालाही दिसून येईल असा आहे. इस्लामधर्मांत असा हा

उपाध्यायांचा किंवा भटजींचा वर्गच नाहीं, अशी समजूत आहे; आणि त्यामुळेंच धार्मिक पिळणुकीपासून या धर्माचे लोक पूर्वीच्या काळीं कांहीं अंशीं वांचले. परंतु याही धर्मांत असे कांहीं विशिष्ट वर्ग निघालेच, कीं जे आपल्याला धर्माचें खास ज्ञान आहे, आपल्या ठिकाणीं खरी विद्वत्ता आहे असें म्हणूं लागले; उदाहरणार्थ, मौलवी-मुल्ला वगैरे लोक; आणि या लोकांनीं भोळ्या-भाबड्या मुसलमान लोकांच्या श्रद्धाळू मनाला भूल पाडून त्यांच्यापासून पैसा उकळलाच आहे. ज्या ठिकाणीं लांब दाढी, किंवा डोक्यावरील शेंडी (केसांचा फक्त झुपका), कपाळावर लांचलचक गंध, किंवा फकिराचा पोषाख, किंवा संन्याशाचीं भगवीं अगर केशरी वस्त्रें, याच वस्तूंवरून धार्मिकपणाचें सारें माप केलें जाणार, तेथें सामान्य जनतेला भुलविणें यांत काय कठिण आहे?

अमेरिका तर अगदीं सर्वांत पुढारलेला देश आहे ना? तेथें जरी तूं जाशील तरी तेथेंही धर्म हा एक बडा थोरला धंदा असून लोकांपासून पैसे उकळून तो व्यवस्थित चाललेला आहे असें तुला आढळून येईल.

परंतु मध्ययुग आणि तें श्रद्धेचें युग यांपासून हा मी फार दूर वाहवत आलों. आपल्याला पुन्हां तिकडे परत जायला हवें. त्या काळीं या श्रद्धेला प्रत्यक्ष मूर्त स्वरूप येत गेलेलें, तिच्यांतून नवनव्या गोष्टी प्रत्यक्षांत निर्माण होत गेलेल्या आढळतात. अकरावें आणि बारावें शतक हा तिकडे फार मोठा बांधकामाचा काळ झाला आणि साऱ्या पाश्चिम यूरपभर कॅथेड्रल्स जागोजाग उभीं राहिलीं. यूरपमध्यें पूर्वी कधींच कोणी पाहिली नव्हती अशी एक नवीच शिल्पपद्धति अस्तित्वांत आली. तिच्यांत अशी एक मोठी कसबी युक्ति योजण्यांत आली, कीं तिच्यामुळें अवजड अशा छपरांचें सर्व वजन आणि दडपण हें इमारतीच्या बाहेर उभारलेल्या मोठमोठ्या धिरास्यांवर, टेंकणावर टाकतां येऊं लागलें. त्यामुळें आंतमध्यें दिसायला खांच अगदींच नाजूक असावयाचे. वरवर पाहिलें तर त्यांच्यावरच्च जणुं वरची सर्व प्रचंड वजनदार इमारत तोलली गेलेली दिसून सकृद्दर्शनीं मोठा अचंबा वाटावयाचा. या खांबांवर आरबी लोकांच्या शिल्पपद्धतीप्रमाणें त्या तिकोनी कमानी असावयाच्या. इमारतीच्या वर अगदीं वरच्या बाजूला बाहेर अंतराळांत उंच जाणारा एक नागमोडी सुळका असावयाचा. यूरपमध्यें निर्माण झालेल्या या नव्या शिल्पपद्धतीलाच गॉथिक पद्धति म्हणतात. ही पद्धति अतिशय सौंदर्यानें नटलेली असून उंच उंच चढत जाणारी श्रद्धा आणि मानवी आकांक्षा यांचा तिच्यांत आविष्कार साधलेला आहे. खरोखर, त्या श्रद्धायुगाचें मूर्तिमंत प्रतीक अशी ही शिल्पपद्धति आहे. अशा प्रकारच्या इमारती ज्यांच्ची आपल्या कामावर भक्ति आहे असे शिल्पकार व कारागीर एखाद्या महान् कार्यासाठीं म्हणून सहकार्य बुद्धीनें एकत्र येऊन काम करतील, तरच फक्त बाधतां येणें शक्य आहे.

पाश्चिम यूरपमध्यें अशा रीतीनें ही गॉथिक शिल्पपद्धति उदयास आली, ही एक आश्चर्यकारक घटना आहे. तेथें त्या काळीं बंडाळी, अराजकता, अज्ञान, धर्मविषयक

अनुदारता यांची सगळीकडे नुसती राड माजून राहिली होती; तिच्यामधें ही मधुर सौंदर्यमय कला म्हणजे या सगळ्या पापांपासून आम्हांला वांचीव अशा अर्थाच्या परमेश्वरी प्रार्थनेची साक्षात् मूर्तीच वर उभी झाली होती, असें म्हटलें पाहिजे. फ्रान्स, उत्तर इटली, जर्मनी, आणि इंग्लंड यां सर्व देशांमध्यें जवळजवळ एकाच वेळीं ही कॅथेड्रल्स बांधण्याची लाट उसळली. ही बांधण्याची सुरुवात केव्हां आणि कशी झाली हें कोणालाही सांगतां येण्यासारखें नाहीं; तीं बांधणारे शिल्पकार कोण होते त्यांचीं नावेंही कोणाला माहीत नाहींत. त्यांच्यामध्यें कोणा एखाद्या विशिष्ट शिल्पकार व्यक्तीचा नव्हे, तर सर्वसामान्य लोकाच्याच एकत्रित प्रयत्नांचा आणि इच्छाशक्तीचा आविष्कार झालेला आहे असें दिसतें. या शिल्पपद्धतींतील आणखी एक नवीन गोष्ट म्हणजे कॅथेड्रल्सच्या खिडक्यांच्या रंगीत कांचा. खिडक्यांच्या या कांचांवर सुंदर सुंदर रंगांचीं बहारदार चित्रें रंगविलेलीं असत आणि या रंगीत कांचांमधून जो प्रकाश आंत येई त्यामुळें त्या इमारतींच्या गंभीर आणि जरब वाटाविणाऱ्या वातावरणांत भरच पडे.

कांहीं दिवसांपूर्वी, अलीकडेच तुला लिहिलेल्या एका पत्रांत, मीं यूरप आणि आशिया याची तुलना केली होती. या काळीं यूरप खंडापेक्षां आशिया खंड हें किती तरी अधिक सुधारलेलें आणि संस्कृतिसंपन्न होतें. असें त्यांत आपण पाहिलें. तरीसुद्धां हिंदुस्थानांत तेव्हां कसलेंच नवनिर्मितीचें कार्य होत नव्हतें. आणि अशी नवनिर्मिति होणें हेंच तर जिवंतपणाचें लक्षण आहे असें मीं सांगितलेंच आहे. अर्धवट सुधारलेल्या यूरपमध्येंसुद्धां या गॉथिक शिल्पपद्धतीचा उदय होऊं शकला, याचा अर्थ यूरपमध्यें चांगलाच जोमदारपणा, जिवंतपणा असला पाहिजे. बंडाळी आणि मागासलेली सुधारणा यांमुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणींना न जुमानतां त्यांच्यांतील हा जोम, आंतील जिवंतपणा, वर उफाळून आल्याशिवाय राहिला नाहीं; त्यानें आपल्य आविष्कारासाठीं मार्ग शोधून काढलाच काढला. गॉथिक पद्धतीच्या इमारती ह त्याच्या आविष्काराचाच एक प्रकारचा मार्ग आहे. पुढच्या काळांत त्याचा हा आविष्कार चित्रकला, मूर्तिकला, आणि साहसाच्या कार्यांवरील प्रेम अशा मार्गांनीं झालेला आढळून येईल आपल्याला.

यांतील कांहीं गॉथिक कॅथेड्रल्स तूं पाहिलेलीं आहेस. आतां तुला त्यांची आठवण असेल का नाहीं कोण जाणे! जर्मनींतील कोलोन शहरांतील कॅथेड्रल पाहण्याला तूं गेलेली आहेस. इटलीमध्यें मिलन येथें एक फार सुंदर गॉथिक कॅथेड्रल आहे. तसेंच फ्रान्समध्यें चाट्रे येथेंही आहे. पण या सगळ्याच ठिकाणांची यादी मला येथें देतां येणार नाहीं. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड आणि उत्तर इटली यांमध्येंही अशीं कॅथेड्रल्स ठिकठिकाणीं पसरलेलीं आहेत. रोममध्यें मात्र एकही नांव घेण्याजोगी गॉथिक पद्धतीवरची इमारत नाहीं ही मोठी विचित्र गोष्ट आहे.

या अकराव्या आणि बाराव्या शतकांतील बांधकामाच्या बहराच्या काळांत

गॉथिक पद्धतीच्यापेक्षां निराळ्या पद्धतीचींही धर्ममंदिरें पुष्कळ बांधण्यात आलीं; उदाहरणार्थ, पॅरिसचें महान् नॉट्रेडेम हें मंदिर आणि बहुधा व्हेनिस येथील सेंट मार्क्सचें मंदिर. हें सेंट मार्क्सचें मंदिर तूं पाहिलेलें आहेस. त्याचें बांधकाम बायझांटाइन पद्धतीचें असून त्यांत चित्रविचित्र रंगांचें नकासी-काम भरपूर आहे.

परंतु हें श्रद्धेचें युग जसजसें ऱ्हास पावत गेलें, तसतसें मंदिरें आणि कॅथेड्रल्स बांधण्याचें कामही मंदावत गेलें. माणसांचे विचार मग अन्य दिशांना वळूं लागले. आपला व्यापारधंदा आणि आपलें नागरिक-जीवन यांकडे माणसाचें मन वेधलें. कॅथेड्रल्सच्या ऐवजीं आतां नगरभवनें बांधण्यास सुरुवात झाली. अशा रीतीनें पंधराव्या शतकाच्या सुरुवातीपासून आपल्याला पश्चिम आणि उत्तर यूरपभर सुंदर गॉथिक पद्धतीचे टाउन हॉल (नगर-भवनें) आणि गिल्ड हॉल (संघस्थानें) विखरूं लागलेले आढळतात. लंडनमधील पार्लमेंटचीं सभागृहें हीं गॉथिक पध्दतीचींच आहेत. पण तीं कधीं बांधलीं हें मात्र मला माहीत नाहीं. माझी आपली अजून समजूत आहे, कीं मूळांतील गॉथिक पद्धतीची पार्लमेंटची इमारत जळून गेली असून नंतर पुन्हां तेथेंच ही हल्लींची गॉथिक पध्दतीचीच इमारत बांधलेली असावी.

अकराव्या आणि बाराव्या शतकांत हीं जीं मोठमोठीं गॉथिक पध्दतीचीं कॅथेड्रल्स निर्माण झालीं, तीं सगळीं शहरांत किंवा मोठमोठ्या व्यापारी गांवांत बांधलेलीं होतीं. जुनीं शहरें झोंपेंतून जागीं होउन आतां हालचाल करूं लागलीं होतीं आणि नवीं नवीं मोठीं व्यापारी गांवें उदयास येऊं लागलीं होतीं. यूरप खंडभर सगळीच घडी पालटत होती आणि शहरी जीवन वाढत होतें. प्राचीन काळीं रोमन साम्राज्यात सुध्दां भूमध्य समुद्राच्या तीरावर सगळीकडे मोठमोठीं शहरें होतीं हें खरें. परंतु ग्रीक आणि ग्रीक-रोमन या सुधारणांचा नाश झाल्यानंतर या शहरांचाही ऱ्हास झाला. आरबी लोकांच्या अमलाखालील स्पेन देश सोडला, तर यानंतर साऱ्या यूरप खंडांत एका कॉन्स्टान्टिनोपलखेरीज नांव घेण्याजोगें एकही मोठें शहर राहिलेलें नव्हतें. या काळीं आशिया खंडांत, चीनमध्यें, हिंदुस्थानांत आणि आरबी लोकांच्या जगांत मोठमोठीं शहरें भरभराटीला आलेलीं होतीं. यूरपमध्यें मात्र असें एकहि शहर नव्हतें. शहरें, संस्कृति आणि सुधारणा हीं नेहमीं एकमेकांच्या संगतींत असतात असें दिसतें; आणि रोमन समाजव्यवस्था उलथून पडल्यानंतर पुष्कळ काळपर्यंत यूरप खंडांत या तिहींपैकीं कशाचेंच अस्तित्व नव्हतें.

पण पुन्हां एकदां यूरपमध्यें शहरी जीवनाला आतां भर आला. विशेषतः इटलीमध्यें अशीं हीं शहरें वाढूं लागलीं. पवित्र रोमन साम्राज्याच्या बादशहाच्या कुशींत जणुं काट्यासारखीं हीं शहरें सलूं लागलीं; कारण आपले कांहीं कांहीं स्वातंत्र्याचे अधिकार हीं शहरें त्याला दडपूं देत नव्हतीं. इटलींतील आणि इतर ठिकाणचीं हीं शहरें म्हणजे व्यापारीवर्ग आणि धनिकवर्ग आणि मध्यमवर्ग यांच्या वाढीचीं आणि भरभराटीचीं लक्षणेंच होतीं.

एड्रियाटिक समुद्रावर आपलें प्रभुत्व गाजवीत असणारें व्हेनिस शहर हें या सुमारास एक स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य झालें होतें. आज त्या शहरांतील कालव्यामध्यें समुद्राचें पाणी आंतबाहेर खेळतांना आढळतें व त्यामुळें हें शहर मोठें सौंदर्यानें फुललेलें दिसतें ; परंतु शहर बांधलें जाण्यापूर्वी त्या ठिकाणीं नुसती दलदलीची जमीन होती असें म्हणतात. हूणांचा नायक ॲटिला हा तरवार परजीत आणि आग पाखडीत जेव्हां उत्तरेकडून ॲक्विलियामध्यें उतरला तेव्हां तेथून कसेबसे पळून गेलेले कांहीं लोक व्हेनिसच्या त्या पूर्वीच्या दलदलीच्या स्थानीं गेले. तेथें त्यानीं हें व्हेनिस शहर उभारलें आणि पूर्वेकडील रोमन साम्राज्य आणि पश्चिमेकडील रोमन साम्राज्य या दोहोंच्या मध्याबर तें वसलेलें असल्यामुळें कांहीं ना काहीं करून एक स्वतंत्र राज्य म्हणून त्याला राहतां आलें. हिंदुस्थानातून आणि पूर्वेकडील देशांतून व्हेनिसशीं व्यापार चाले त्यामुळें शहरात संपत्ति जमा झाली; व्हेनिसनें स्वतःचें आरमार उभारलें ; आणि एक दर्यावर्दी सत्ता म्हणून तें जगांत नांदूं लागलें. येथील राज्य हें श्रीमंत लोकांचें प्रजासत्ताक राज्य असून येथील अध्यक्षाला डोज किंवा डोजे हें नांव होतें. नेपोलियननें १७९७ सालीं या शहरांत विजेता म्हणून प्रवेश केला, तोंपर्यंत हें प्रजासत्ताक राज्य अस्तित्वांत होतें. त्या वेळचा डोजे हा एक वृद्ध गृहस्थ होता. तो त्या नेपोलियनच्या प्रवेशाच्या दिवशीं समुद्रांत बुडून मेला असें म्हणतात. व्हेनिसमधला तो शेवटलाच डोजे.

इटालीच्या दुसऱ्या बाजूला व्हेनिसशीं स्पर्धा करणारें, त्याच्यासारखेंच दर्यावर्दी लोकांचें मोठें व्यापाराचें स्थान असें जिनोआ हें शहर होतें. या दोहोंच्यामध्यें बोलोना हें त्या नांवाच्या प्रसिद्ध विद्यापीठाचें शहर आणि फ्लॉरेन्स हीं शहरें होतीं. मेडिसी या सुविख्यात घराण्याच्या अमलांत लौकरच फ्लॉरेन्स शहर पुढें फारच वैभवाला चढावयाचें होतें आणि तेथें किती तरी महान् कलावंत निर्माण व्हावयाचे होते. उत्तर इटलींतच मिलन हेंही शहर त्या वेळीं नुकतेंच एक उद्योगधंद्याचें स्थान म्हणून वाढूं लागलें होतें आणि दक्षिणेस नेपल्स हें शहर उदयास येत होतें.

फ्रान्समध्यें ह्यू कॅपेटनें पॅरिस येथें राजधानी स्थापन केल्यानंतर तें शहरही फ्रान्सचें सामर्थ्य जसजसें वाढत गेलें तसतसें वाढत गेलें. पॅरिस शहर हें तेव्हांपासून फ्रान्सचें काळीज आणि पाठीचा कणा होऊन राहिलेलें आहे. इतर देशांमध्यें पुष्कळ राजधान्या झाल्या असतील ; परंतु गेलीं १००० वर्षें फ्रान्समध्यें पॅरिसनें जसें सर्वतोपरि वर्चस्व गाजविलें आहे, तसें इतर कोठल्याच राजधानीनें गाजविलेलें आढळत नाहीं. फ्रान्समध्यें याशिवाय लिऑन्त, मार्सेल्स (हें तर प्राचीन काळापासूनचें बंदर आहे) ऑर्लीन्स, बोर्डो आणि बुलोन हींही शहरें महत्त्वाला चढलीं.

जर्मनीमध्येंही इटलीप्रमाणेंच, परंतु तेराव्या आणि चौदाव्या शतकांमध्यें विशेष प्रमाणांत, स्वतंत्र शहरांची खास वाढ झालेली आढळून येते. या शहरांचीही लोकसंख्या जशी वाढली आणि त्यांची सत्ता आणि संपत्ति जसजशी वाढली, तसतसें

त्यांचें धैर्य वाढून त्यांनीं मोठमोठ्या सरदारांशीं झगडण्यास सुरुवात केली. बादशहाच्या मनांतून आपल्या सरदारांना वांकवावयाचें होतें. त्यामुळें तोही या शहरांना मधून मधून पाठिंबा देई. आपलें संरक्षण करण्यासाठीं म्हणून तेथील लोकांनीं मोठमोठे व्यापारी संघ आणि संघटना प्रस्थापित केल्या. कधीं कधीं या व्यापारी संस्था सरदारांशीं किंवा आपल्यासारख्याच प्रतिस्पर्धी व्यापारी संघांशीं लढांयाही करीत. जर्मनींत वाढीला लागलेल्या या शहरांमधीलच हॅम्बर्ग, ब्रेमेन, कोलोन, फ्रँकफोर्ट, म्युनिक, डॅन्झीग, नुरेंबर्ग, आणि ब्रेस्लॉ हीं शहरें होत.

नेदरलंड्समध्यें (याच प्रदेशाला हल्लीं हॉलंड आणि बेल्जम असें म्हणतात) अँटवर्प, ब्रूजेस, घेंट हीं शहरें वाढलीं. हींही व्यापारींच शहरें. त्यांचा व्यापारधंदा एकसारखा वाढतच होता. इंग्लंडमध्यें अर्थात् या वेळींही लंडन हें शहर झालें होतें; परंतु यूरपांतील कोणत्याही मोठ्या शहराशीं आकार, व्यापार किंवा संपत्ति या बाबतींत त्या काळीं तें बरोबरी करूं शकत नव्हतें. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज हीं दोन शहरें त्या वेळीं विद्याभ्यासाचीं केंद्रें म्हणून महत्त्वाला चढत होतीं. यूरप खंडांत पूर्वेकडे व्हिएन्ना हें फार प्राचीन काळापासूनचें मोठें शहर होतें. आणि रशियामध्यें मॉस्को, कीव्ह आणि नोव्होगोरोड हीं शहरें होतीं.

या नव्या शहरांत किंवा त्यांच्यापैकीं बहुतेकांत आणि जुन्या साम्राज्यशाहीच्या वैभवाचीं शहरें यांच्यामध्यें मोठा फरक आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. यूरपांतील हीं शहरें वाढलीं आणि महत्त्वाला चढलीं. याला कारण कोणी राजा किंवा बादशहा नव्हता; तर त्या शहराच्या ताब्यांत जो व्यापारधंदा होता त्यामुळें त्यांना महत्त्व आलेलें होतें. अर्थातच त्यांची शक्ति त्यांच्यांतील व्यापारी वर्गामध्यें होती, सरदार-दरकदरामध्यें नव्हे. हीं शहरें व्यापारी लोकांचीं शहरें होतीं. तेव्हां या शहरांचा उदय होणें याचाच अर्थ धनिकवर्गाचा उदय होणें हा आहे. पुढें आपणांस आढळून येणार आहे, कीं या धनिकवर्गाची सत्ता पुढें पुढें इतकी वाढत गेली, कीं अखेरीस त्यांनीं राजांशीं व सरदारांशीं सामना देऊन विजय मिळविला व त्यांच्या हातची सत्ता हिसकावून आपल्या हातीं घेतली. अर्थात् आतां ज्या काळाचा आपण विचार करतों आहों, त्या काळानंतर पुष्कळच वर्षांनीं घडून आलेली ही हकीकत आहे.

नुकतेंच मीं म्हटलें, कीं शहरें आणि सुधारणा हीं बहुतेक एकमेकांच्या संगतीनेंच अस्तित्वांत राहतात. शहरांच्या वाढीबरोबरच ज्ञानाची वाढ होते आणि स्वातंत्र्याची प्रवृत्तीही वाढते. खेडेगांवी वातावरणांत राहणारे लोक असंघटित आणि दूर दूर राहत असतात आणि पुष्कळसे अंधश्रद्धेनें मारलेले असतात. त्यांचें सारें जीवन पंचमहाभूतांवर, सृष्टींतील शक्तींच्या अनुकूलतेवर अवलंबून असतें. त्यांना अतिशय श्रम करावे लागतात; विश्रांतीची फारच थोडी जोड त्यांना मिळते आणि आपापल्या मालक लोकांचा हुकूम न पाळण्याची त्यांची छाती असत नाहीं. शहरामध्यें पुष्कळ मोठी संख्या एकत्रित राहूं लागते; अधिक सुधारलेलें जीवन घालविण्याची त्यांना संधि मिळते;

विद्याभ्यास करण्याची, चर्चा करण्याची, टीका करण्याची आणि स्वतंत्र विचार करण्याचीही त्यांना संधि मिळते.

त्यामुळें सरंजामदार, सरदार यांच्या हातीं असलेली राजकीय सत्ता आणि धर्मपीठांच्या हातीं असलेली धार्मिक किंवा आध्यात्मिक सत्ता या दोहोंच्याही कचाट्यांतून स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ति शहरांत बळावत जाते. श्रद्धेचें युग ऱ्हास पावूं लागतें आणि हें कां, तें कसें, असें प्रश्नांचें युग सुरू होतें. पोपचा किंवा धर्मपीठाचा अधिकार नेहमींच आंधळेपणानें आतां मानला जात नाहीं. दुसरा फ्रेडरिक हा पोपशीं कसा वागला हें आपण पाहिलेंच आहे. हीच बेपर्वाईची प्रवृत्ति पुढें पुढें वाढत गेलेली आपल्याला आढळेल.

बाराव्या शतकापासून पुढें ज्ञानार्जनाचेंही पुनरुज्जीवन झालें. यूरपांतील सर्व विद्वानांची लॅटिन हीच एक सामान्य भाषा होती. आणि ज्ञान मिळवूं इच्छिणारे लोक इकडून तिकडे असे पुष्कळ विश्वविद्यालयांतून प्रवास करीत असत. इटलीचा महान् श्रेष्ठ कवि डांटे अलिघेरी याचा जन्म याच काळांत १२६५ मध्यें झाला. इटलीचा दुसरा एक श्रेष्ठ कवि पेट्रार्क हा १३०४ मध्यें जन्मला. त्यानंतर कांहीं काळानें श्रेष्ठ इंग्लिश कवींपैकीं अगदीं पहिला कवि चॉसर हा उदयाला आला.

परंतु विद्येच्या पुनरुज्जीवनापेक्षांही किती तरी जास्त लक्षांत ठेवण्यासारखी या काळची गोष्ट म्हणजे, पुढें यूरप खंडामध्यें अतिशयच प्रचंड वाढलेली जी शास्त्रीय संशोधनाची प्रवृत्ति तिचींही अगदीं सूक्ष्म बीजें याच काळांत उद्भूत झालीं ही होय. मीं सांगितलेलें आठवतच असेल तुला, कीं आरबी लोकांच्या ठिकाणीं ही वृत्ति असून तिच्या अनुसारानेंच त्यांचा व्यवहार कांहीं प्रमाणांत होत असे. मन कोणत्याही पूर्वग्रहाच्या अधीन जाऊं न देतां प्रयोग करण्याची आणि नवीन सत्यें शोधून काढण्याची प्रवृत्ति यूरप खंडांत मध्ययुगीन काळांत उदयास येऊन अस्तित्वांत राहणें हें फार बिकट काम होतें. धर्मपीठाला तर अशा प्रवृत्तीला क्षणभर थारा मिळूं देण्याची इच्छा नव्हती. परंतु धर्मपीठाच्या विरोधाला न जुमानतांच ही प्रवृत्ति यूरपांत हळूहळू रुजून डोकें वर काढूं लागली. यूरपमध्यें अशी प्रवृत्ति ज्यांच्या ठिकाणीं अगदीं प्रथम उद्भूत झालेली आढळते, त्यांमध्यें रोजर बेकन हा एक इंग्रज मनुष्य होता. तेराव्या शतकांत तो ऑक्स्फर्ड येथें राहत असे.

अफगाण लोक हिंदुस्थानवर स्वारी करतात

२३ जून, १९३२

काल तुला पत्र लिहिण्यामध्यें अडथळा उत्पन्न झाला. पत्र लिहावयाला मी बसलों होतों; येथील हा तुरुंग आणि सभोंवतींचें वातावरण पार विसरून मी तात्काळ विचाराच्या वेगाबरोबर मध्ययुगीन युगांत जाऊन दाखल झालों होतों. परंतु गेलों त्यापेक्षांही अधिक वेगानें मी आजच्या जगांत खेंचला गेलों, आणि आपण तुरुंगांत आहों या गोष्टीचें मला थोडेंसें बोंचक रीतीनें स्मरण झालें. तुझी आई आणि दिद्दाजी (आजी) यांना माझी भेट एक महिनाभर घेतां येणार नाहीं, असा वरून हुकूम आला आहे असें मला सांगण्यांत आलें. कां? कोणीं कांहीं सांगितलें नाहीं. कैद्याला कांहीं सांगण्याची जरुरी काय? येत्या भेटीच्या दिवसाची वाट पाहत आज दहा दिवस त्या दोघी डेहराडूनला येऊन राहिल्या आहेत. आतां इतके दिवस थांबून सगळें व्यर्थ होऊन त्यांना परत जावें लागणार. इतक्या सौजन्यानें आम्हांला वागविलें जात असतें! ठीक, ठीक; कांहीं फिकीर नाहीं. आमच्या अंगीकारिलेल्या क्रामामधलाच हाही एक सोसावा लागणारा प्रकार आहे; शिवाय, तुरुंग म्हटला म्हणजे कोठेंही गेलें आणि कोणीही मनुष्य असला तरी तो तुरुंगच, हें विसरतां उपयोगाचें नाहीं.

भूतकाळांतून वर्तमानकाळांत इतक्या आडदांडपणानें परत आणलें गेल्यानंतर पुन्हां लगेच वर्तमानकाळ सोडून भूतकाळामध्यें जाणें मला शक्य झालें नाहीं. पण कालची एक रात्रीची झोंप झाल्यावर आज आतां मला जरा बरें वाटतें आहे. म्हणून आज पुन्हा पत्र लिहावयाला बसलों आहें.

आतां आपण हिंदुस्थानकडे परत येऊं या. फार वेळ आपण दुसरीकडे फिरत राहिलों. तिकडे यूरपची मध्ययुगीन अज्ञानांधकारांतून व सुधारणेच्या अभावांतून बाहेर कसें पडावें यासाठीं ज्या काळीं धडपड चालली होती, ज्या काळीं तेथें सर्वसामान्य जनता सरंजामशाहीच्या अवजड ओझ्याखालीं चुरडून गेल्यामुळें जिकडे तिकडे बंडाळी आणि अव्यवस्थित राज्यकारभार माजून राहिला होता, पोप आणि बादशहा यांच्यामध्यें झगडा चालू होता आणि यूरपमधील निरनिराळ्या देशांच्या मर्यादा व स्वरूपें निश्चित होत होतीं, आणि ख्रिस्ती धर्मयुद्धांच्या द्वारा ख्रिस्ती धर्म आणि इस्लामधर्म यांच्यांमध्यें वर्चस्वाबद्दल झगडा चालू होता, अशा त्या काळीं आपल्या इकडे काय काय घडामोडी चालू होत्या?

मध्ययुगाच्या पहिल्या काळांतील हिंदुस्थानच्या परिस्थितीचें ओझरतें दर्शन एकदां आपण घेतलें आहे. गझनीचा सुलतान महमूद हा वायव्य दिशेकडून उत्तर हिंदुस्थानच्या सुसंपन्न भूमीवर स्वाऱ्या करून येत होता आणि लूटमार व नासधूस

करीत होता हें आपण पाहिलें आहे. महमुदाच्या या स्वाऱ्या पुष्कळच नुकसानकारक जरी असल्या, तरी त्यापासून हिंदुस्थानांत विशेष महत्त्वाचा किंवा कायम टिकणारा असा कांहीं बदल घडून आला नाहीं. या स्वाऱ्यांमुळें देशाला, विशेषतः उत्तरेकडील भागाला चागलाच मोठा धक्का बसला आणि कितीएक सुंदर धार्मिक स्थानें व साधु-संतांचीं समाधिस्थानें महमुदानें नष्ट करून टाकलीं. परंतु गझनीच्या साम्राज्यांत फक्त सिंध आणि पंजाबचा कांहीं थोडासा भाग एवढाच प्रदेश काय तो गेली. या धक्क्यांतून उत्तर हिंदुस्थान लौकरच चांगला सांवरून स्थिरस्थावर झाला; दक्षिण हिंदुस्थानला तर या धक्क्याचा स्पर्शसुद्धां झाला नव्हता; तसाच बंगाललाही. महमुदाच्या नंतर सुमारें १५० वर्षें हिंदुस्थानांत मुसलमानाचा राज्यविस्तारही झाला नाहीं किंवा धर्मविस्तारही झाला नाहीं.

त्यानंतर मग बाराव्या शतकाच्या अखेरीला (इ. स. ११८६ च्या सुमारास) पुन्हां वायव्येकडून स्वारीची लाट आली. अफगणिस्तानांत एक अफगाण सरदार बलिष्ठ होऊन त्यानें गझनी जिंकली व गझनीच्या साम्राज्याचा नाश केला. या सरदाराचें नांव शहाबुद्दीन घुरी. (घुरी हें अफगाणिस्तानातील एक लहानसें शहर आहे.) हा शहाबुद्दिन लाहोर येथें येऊन त्यानें तें शहर काबीज केलें आणि तेथून पुढें तो दिल्लीवर चालून आला. त्या वेळीं दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण* होता. त्याच्या नेतृत्वाखालीं उत्तर हिंदुस्थानांतील इतरही पुष्कळ राजेरजवाडे जमा झाले. हे सर्व जण मिळून शहाबुद्दिनशीं लढले आणि त्याचा त्यांनीं संपूर्ण पराभव केला. परंतु हा जय फार काळ टिकला नाहीं. शहाबुद्दीन पुन्हां पुढच्या वर्षीं आणखी मोठें सैन्य घेऊन आला आणि या वेळीं पृथ्वीराजाचा पराभव करून त्यानें त्याचा वध केला.

हिंदुस्थानांत पृथ्वीराज आजही एक लोकप्रिय विभूति गणली जात असून त्याच्याबद्दल समाजांत अनेक प्रकारचीं गाणीं आणि गोष्टी प्रचलित आहेत. कनोजचा राजा जयचंद याची कन्या त्यानें पळवून नेली याबद्दलची त्याची गोष्ट त्यामध्यें सर्वांत अधिक प्रसिद्ध आहे. पण ही राजकन्या पळाविल्याचें प्रायश्चित्त पृथ्वीराजाला फारच जबरदस्त मिळालें. त्याच्या पायीं त्याला आपल्या कित्येक अत्यंत शूर अनुयायांचे प्राण गमवावे लागले आणि एका प्रबळ राजाचें शत्रुत्व त्यानें संपादन केलें. आपसांतील विरोध आणि आपसांतील यादवी यांचीं बीजें त्यामुळें रुजलीं आणि त्यामुळेंच परकी स्वारी करणारांचें येथें चांगलेंच फावलें.

अशा रीतीनें इ. स. ११९२ मध्यें शहाबुद्दीनचा हिंदुस्थानांतील पहिला मोठा विजय घडून आला; त्याच विजयांतून पुढें हिंदुस्थानात मुसलमानांच्या सत्तेची स्थापना झाली. स्वारी करणारे लोक हळूहळू पूर्वेकडे आणि दाक्षिणेकडे पसरूं लागले.

(* चव्हाण हा मराठींतील उच्चार आहे. उत्तरेकडे याचा उच्चार चौहान असा असून या घराण्याचा मूळ संस्थापक राजा चाहमान याच्या नांवावरून ग्रंथांतरीं घराण्याचें नांव चाहमान असेंही सांपडतें.)

आणखी सुमारें दीडशें वर्षें गेल्यावर (इ. स. १३४० च्या सुमारास) मुसलमानांची सत्ता दक्षिणेंत बहुतेक सर्व प्रदेशावर पसरली होती. त्यानंतर मात्र त्यांची दक्षिणेकडील सत्ता संपुष्टांत येत गेली. कांहीं मुसलमानी आणि कांहीं हिंदू अशीं नवीं स्वतंत्र राज्यें तिकडे निर्माण झालीं; त्यांमध्यें विजयनगरचें राज्य हें विशेष उल्लेख करण्यासारखें आहे. यापुढें सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत मुसलमानांची सत्ता थोडीशी संकोच पावली आणि मग पुढें अकबराची कारकीर्द आली तेव्हां मात्र पुन्हां सोळाव्या शतकाच्या मध्याला मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानांत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्वत्र पसरली.

मुसलमानांच्या हिंदुस्थानांत येण्यापासून पुष्कळ निरनिराळे परिणाम झाले. एक लक्षांत ठेव, कीं हे स्वारी करणारे लोक अफगाण होते; ते कांहीं आरबी लोक, इराणी लोक, किंवा पश्चिम आशियांतील सुसंस्कृत आणि उच्च सुधारणायुक्त असे मुसलमान नव्हते. सुधारणेच्या दृष्टीनें पाहतां हे अफगाण लोक हिंदी लोकांपेक्षां मागासलेले होते. पण त्यांच्यांत उत्साहाचें वारें भरलेलें होतें; आणि तत्कालीन हिंदुस्थानांतल्यापेक्षां त्यांच्यामध्यें जिवंतपणा अधिक होता. हिंदुस्थानचें गाडें जुन्या चाकोरींत फारच रुतून गेल्यासारखें झालें होतें. हिंदुस्थानांत प्रगति होणें अशक्य झालें होतें, कांहींही बदल होणें अशक्य झालें होतें. जुन्या परंपरेला व व्यवहाराला पक्कें चिकटून राहावयाचें, त्यामध्यें कसलीही सुधारणा करण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं, अशी प्रवृत्ति येथें दृढ झालेली होती. लढाईच्या तंत्रामध्यें सुद्धां हिंदुस्थान देश मागासलेला होता. अफगाण लोक येथल्या लोकांपेक्षां किती तरी पटीनें अधिक सुसंघटित होते. त्यामुळें हिंदी लोकांमध्यें शौर्य आणि त्याग असूनही प्राचीन हिंदुस्थानला या नव्या मुसलमान स्वारी करणारांपुढें हार खावी लागली.

पहिली गोष्ट म्हणजे हे नवे आलेले मुसलमान लोक अतिशयच क्रूर, कजाग आणि उग्र होते. ते अशा रुक्ष देशांतून आले होते, कीं त्या ठिकाणीं मृदुतेला फारशी किंमतच नव्हती. त्यांतच भरीला आणखी हें, कीं हे लोक त्यांनीं नवीनच जिंकलेल्या देशांत राहत होते; त्यांच्या सभोंवतीं सगळीकडे शत्रूंचें कडें असून हे शत्रू केव्हां बंड करून उठतील याचा नेम नव्हता. ही बंडाची भीति त्यांच्यापुढें एकसारखी खडी असली पाहिजे; आणि भीतीमुळें मनुष्याच्या ठिकाणीं पुष्कळदां क्रौर्य आणि भयानकंपणा उत्पन्न होत असतो. त्यामुळें लोकांना भयभीत करण्यासाठीं हिंदुस्थानांत या वेळीं अनेक कत्तली करण्यांत आल्या. यामध्यें मुसलमानांनीं हिंदूंना ते हिंदू आहेत एवढ्यासाठीं मारण्याचा प्रश्न नव्हता; तर परकी विजेत्यांनीं जिंकलेल्या लोकांचें तेज, प्रतिकारशक्ति मोडून काढण्याचा हा प्रश्न होता. या क्रूरपणाच्या कृत्यांचें खापर नेहमीं धर्मावर फोडण्यांत येत असतें; पण तसें करणें बरोबर नाहीं. कधीं कधीं धर्माचा उपयोग एक सबब म्हणून केलाही गेला असेल. परंतु खरें मुळांतील कारण राजकीय किंवा सामाजिक स्वरूपाचेंच नेहमीं असलें पाहिजे. मध्य आशियांतील जे हे लोक हिंदुस्थानांत स्वारी करून येऊन स्थिर झाले ते आपल्या मायदेशामध्येंही, आणि

त्यांनीं मुसलमानधर्माचा स्वीकार करण्याच्या आधींपासूनच किती तरी काळापासून असेच राक्षसी आणि क्रूरपणानें वागणारे लोक होते. नवीन देश जिंकून घेतल्यानंतर तो आपल्या कबजांत ठेवण्याचा एकच मार्ग त्यांना ठाऊक होता; तो म्हणजे लोकांना भयभीत करून टाकण्याचा.

परंतु हळूहळू हिंदुस्थाननें या भयानक लढवय्यांनाही मऊ करून सुधारणेच्या मार्गावर आणलें. आपण कोणी परकी स्वारी करून आलेले लोक नसून हिंदी लोकच आहों असें त्यांना वाटूं लागलें. या देशांतील स्त्रियांशीं त्यांचीं लग्नें होऊं लागलीं, आणि स्वारी करून आलेले आणि ज्यांच्यावर स्वारी झाली ते, यांच्यामधील अंतर हळूहळू कमी होत गेलें.

गझनीच्या महमुदाइतका °प्रचंड नासधूस आणि लूटमार करणारा दुसरा कोणी उत्तर हिंदुस्थानच्या तरी माहितींत नाहीं ना ? मूर्तिपूजकांच्या विरुद्ध इस्लाम-धर्मीयाचा तो तर एक मोठाच पुरस्कर्ता वीर समजला जात असतो. पण अशा या महमूद गझनीच्या पदरीं तिलक नांवाच्या हिंदु सेनापतीच्या हाताखालीं एक हिंदू सैनिकांचें पथक होतें हें ऐकून तुला केवढें मोठें नवल वाटेल. तिलक आणि त्याचें सैन्य यांना त्यानें आपल्या बरोबर गझनीस °नेलें आणि त्यांचा त्यानें तेथील बंडखोर मुसलमानांचें बंड दडपून टाकण्यासाठीं उपयोग केला. यावरून तुझें तुलाच दिसेल, कीं महमुदाचा एकमेव उद्देश राज्य जिंकणें हा होता. तो हिंदुस्थानांत आला तेव्हां येथील मूर्तिपूजकांना आपल्या मुसलमान सैनिकांच्या हातून मारण्याची त्याची तयारी होती. आणि आपल्या हिंदू सैनिकांच्या हातून आपल्या मुसलमान प्रजेलाही मारण्याची त्याची तितकीच तयारी होती.

इस्लामनें हिंदुस्थानला चांगलाच हादरा दिला. सर्वस्वीं प्रगतिशून्य होऊं लागलेल्या येथील समाजांत त्यामुळें एक प्रकारचा नवीन जोम आणि प्रगतीची प्रवृत्ति निर्माण झाली. हिंदी कलेंत एक प्रकारचा रोगटपणा येऊन तिला उतरती कळा लागली होती; त्याच त्याच गोष्टींच्या पुनरावृत्तीमुळें आणि उगीच बारीक तपशिलावरच सगळा भर दिला जाऊं लागल्यामुळें हिंदी कलेमध्यें एक प्रकारचा निस्तेजपणा येऊं लागला होता. इस्लामच्या आगमनामुळें उत्तर हिंदुस्थानांत हें सर्व बदलून गेलें आणि नवीन प्रकारची, जोमदार, सामर्थ्य व उत्साह यांनीं नटलेली अशी कला येथें उदय पावली; हिला हिंदु-मुसलमानी कला असें नांव देतां येईल. प्राचीन हिंदुस्थानांतील पद्धतींत वाढलेले मोठमोठे शिल्पकार व बांधकाम करणारे जे कारागीर लोक होते त्यांना मुसलमानांनीं आपल्याबरोबर आणलेल्या नव्या कल्पनांपासून नवीन स्फूर्ति मिळूं लागली. मुसलमानांच्या धर्मांतील आणि जीवनविषयक भूमिकेंतील जो अत्यंत साधेपणा, त्याचा तत्कालीन हिंदी शिल्पपद्धतीवर जरूर परिणाम झाला आणि तिच्यामध्यें रचनेचा साधेपणा व भव्यता यांची जोड निर्माण झाली.

मुसलमानांच्या स्वारीचा अगदीं पहिला परिणाम म्हणजे उत्तरेंतून पुष्कळसे लोक दक्षिणेंत निघून जाऊं लागले हा. महमुदाच्या स्वाऱ्या आणि कत्तली यांच्यानंतर उत्तर हिंदुस्थानातील लोकांच्या मनात इस्लामधर्मांशीं रानटी क्रौर्य आणि नासधूस याची कायमची सांगड बसून गेली होती. त्यामुळें पुन्हां जेव्हां नवीन स्वारी आली आणि तिला थांबविणें अशक्य होऊं लागलें त्या वेळीं कसबी कारागीर आणि विद्वान् यांचे मोठमोठे समूह दक्षिण हिंदुस्थानांत निघून गेले. यामुळें दक्षिणेकडे आर्य-संस्कृतीला फार मोठा बहर आला. तिच्यामध्यें मोठेंच चैतन्य निर्माण झालें.

दक्षिण हिंदुस्थानाबद्दल यापूर्वी मीं तुला बरेंच सांगितलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांत पश्चिमेला आणि मध्यभागांत म्हणजे महाराष्ट्राच्या प्रदेशांत सहाव्या शतकाच्या मध्यापासून पुढें दोनशें वर्षेंपर्यंत चालुक्यांची सत्ता प्रभावी होती. त्या वेळचा या घराण्यांतील राजा दुसरा पुलकेशी याची ह्युएन चँगनें भेट घेतली होती. चालुक्यांनंतर राष्ट्रकूट आले. त्यांनीं चालुक्यांचा पराभव केला आणि दक्षिणेंत त्यानंतर पुढचीं दोनशें वर्षें, आठव्या शतकापासून जवळजवळ दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत, त्यांनीं प्रभुत्व गाजविलें. या राष्ट्रकूट राजाचे सिंधमधील आरबी राज्यकर्त्यांशीं अत्यंत स्नेहाचे संबंध होते; आणि पुष्कळ आरबी व्यापारी व प्रवासी त्यांचे तिकडे येत असत. अशा एका व्यापाऱ्यानें आपल्या इकडील प्रवासाचा वृत्तांत लिहून ठेवलेला आहे. तो म्हणतो, त्या काळचा (नववें शतक) राष्ट्रकूट घराण्यांतील राजा हा तत्कालीन जगांतील चार सर्वश्रेष्ठ राजांपैकीं एक होता. त्याच्या मताप्रमाणें हे बाकीचे तीन राजे म्हणजे बगदादचा खलिफा, चीनचा बादशहा आणि रूमचा (म्हणजे कॉन्स्टान्टिनोपलचा) बादशहा हे होते. हें मत मोठें लक्षांत घेण्यासारखें आहे. कारण त्यावरून त्या काळीं आशिया खंडांत लोकांची कोणती समजूत प्रचलित होती याची आपल्याला कल्पना मिळते. या वेळीं बगदादच्या खलिफाची सत्ता आणि वैभव हीं अगदीं शिखराला पोंचलेलीं होतीं. अशा त्या खलिफाच्या साम्राज्याशीं राष्ट्रकूटांच्या राज्याची हा आरबी प्रवासी बरोबरी मानतो याचा अर्थ महाराष्ट्राचें हें राज्य फारच सामर्थ्यवान् आणि जोमदार असलें पाहिजे.

या राष्ट्रकूटांची जागा दहाव्या शतकांत (इ. स. ९७३ मध्यें) पुन्हां एकदां चालुक्यानीं घेतली आणि त्यानंतर पुन्हां आणखी दोनशें वर्षांहून अधिक काळपर्यंत (इ. स. ११९० पर्यंत) त्यांच्या हातीं सत्ता राहिली. या चालुक्यांपैकीं एका राजाबद्दल एक मोठें दीर्घ काव्य लिहिलेलें आहे. त्यांत त्याचा स्वीकार त्याच्या पत्नीनें जाहीर स्वयंवराच्या प्रसंगीं केला असें लिहिलेलें आहे. आर्यांची ही जुनी परंपरा इतक्या दीर्घकाळपर्यंत अशा रीतीनें चालू होती हें पाहून कौतुक वाटतें.

या प्रदेशाच्या पलीकडे दक्षिणेला आणि पश्चिमेला आपल्या देशांतील तामीळ देश होता. या ठिकाणीं तिसऱ्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत सुमारें सहाशें वर्षें पल्लव राजांचें राज्य होतें; आणि सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत (सहाव्या शतकाच्या मध्यापासून पुढें) साऱ्या दक्षिणेंत यांचेंच आधिराज्य होतें. मॅलेशियामध्यें व बाकीच्या

पूर्वेकडील इतर बेटांमध्ये वसाहती वसविण्यासाठीं या पल्लवांनींच स्वाऱ्या केल्या हें तुझ्या लक्षांत असेल. पल्लव राज्याची राजधानी कांची म्हणजेच हल्लींचें कांजीवरम् शहर येथें होती. त्या वेळीं तर हें शहर फार सुंदर होतेंच, पण आतांसुद्धां उत्कृष्ट विचारपूर्वक आंखलेल्या नगररचनेच्या दृष्टीनें तें शहर मोठें पाहण्यासारखें आहे.

आक्रमणशील चोलांनीं दहाव्या शतकाच्या सुरुवातीला या पल्लवाची जागा घेतली. राजराज आणि राजेंद्र यांच्या चोल साम्राज्याबद्दलही मीं तुला सांगितलेलें आहे. यांनीं मोठमोठीं आरमारें बांधून सिलोन, ब्रह्मदेश, बंगाल हे प्रदेश जिंकण्याचा उपक्रम केला. यांच्याही राज्यांत लोकनियुक्त ग्रामपंचायतींची पद्धति अस्तित्वात होती, ही माहिती मात्र विशेषच लक्षांत घेण्यासारखी आहे. या व्यवस्थेंत खालपासून वरपर्यंत चढत चढत जाणाऱ्या संस्थांचें सुसूत्र जाळें होतें. अगदीं तळाशीं ग्रामसंघ असत; ते आपापल्या विभागांतील हरतऱ्हेचीं कामें करण्यासाठीं पोटमंडळें निवडीत असत. तसेंच हे ग्रामसंघ जिल्हासंघही निवडीत असत. अशा अनेक जिल्ह्यांचा मिळून एक प्रांत होई. ही ग्रामपंचायतींची व्यवस्था म्हणजे प्राचीन आर्य समाजव्यवस्थेचा जणुं कणाच होती. त्यामुळें माझ्या या पत्रांमधून तिच्या वर्णनावर मी पुनः पुनः फार भर देत आलों आहें.

अफगाण लोकांची उत्तर हिंदुस्थानांत स्वारी झाली त्या काळीं दक्षिण हिंदुस्थानांत चोलांचें प्रभुत्व होतें. परंतु त्यानंतर लौकरच त्यांना उतरती कळा लागली आणि त्यांचेंच एक मांडलिक असें लहान राज्य त्यांच्यापासून स्वतंत्र होऊन त्याची सत्ता वाढूं लागली. हें म्हणजे पांड्यांचें राज्य. मदुरा ही त्यांची राजधानी असून कायळ हें त्यांच्या राज्याचें समुद्रकांठचें बंदर होतें. व्हेनिस येथील प्रसिद्ध प्रवासी मार्को पोलो याच्याबद्दल पुढें मी तुला थोडेंबहुत सांगणार आहें. हा मार्को पोलो इ. स. १२८८ व १२९३ सालीं असा दोनदा कायळ बंदरांत येऊन गेला होता. त्यानें त्या शहराचें वर्णन एक भव्य व महान् शहर असें केलें असून "तेथें अरबस्तान व चीन येथपासून भरलेलीं जहाजें येत असत व हें बंदर व्यापारधंद्यानें नुसतें गजबजून गेलेलें असे" असें म्हटलें आहे. मार्को स्वतःही तेथें चीनमधून जहाजामधूनच आला होता.

मार्कोनें आणखी असेंही लिहिलें आहे : "कोळ्याच्या जाळ्यासारखें दिसणारें" अत्यंत तलम कापड (मसलीन) हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर तयार होत असे. तसेंच रुद्रमणी देवी नांवाची एक स्त्रीही मद्रासच्या उत्तरेकडील पूर्व किनाऱ्यालगतच्या जो तेलगू प्रांत त्याची राणी होती. या राणीची कारकीर्द चाळीस वर्षें चालू असून मार्कोनें तिची फार स्तुति केलेली आहे.

मार्कोकडूनच आपणांला आणखी एक लक्षांत घेण्यासारखी माहिती अशी मिळते, कीं दक्षिण हिंदुस्थानमध्यें अरबस्तानांतून आणि इराणमधून समुद्रमार्गें असंख्य घोड्यांची आयात होत असे. घोड्यांची निपज होण्याला दक्षिण हिंदुस्थानची

हवा अनुकूल नाहीं. हिंदुस्थानवर स्वारी करून आलेले मुसलमान अधिक चांगले लढवय्ये ठरत यांचें एक कारण त्यांच्यापाशीं जास्त चांगल्या दर्जाचे घोडे असत असें सांगण्यांत येतें. आशियांतील घोड्यांची उत्कृष्ट निपज होणारा प्रदेश त्यांच्या ताब्यांत होता.

अशा रीतीनें चोल घराण्याचा ऱ्हास झाल्यावर तेराव्या शतकांत पांड्यांचें राज्य हेंच तामीळ सत्तेचें प्रमुख केंद्र होतें. चौदाव्या शतकाच्या सुरुवातीलाच (इ. स. १३१०) मुसलमानी स्वारीच्या पाचरीचें टोंक दक्षिणेंत जाऊन भिडलें. ही पाचर पांड्यांच्या राज्यांत शिरली आणि पांड्यांच्या राज्याचा फारच जलद नाश झाला.

हें जें या पत्रांत दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासाचें निरीक्षण मीं आतांपर्यंत केलें, त्यांत मागें सांगितलेल्याच गोष्टी मीं पुन्हां सांगितल्या असण्याचा संभव आहे. परंतु हा विषय जरा गुंतागुंतीचा असून पुष्कळ लोक हे पल्लव, चालुक्य, चोल आणि इतर वंश यांच्यामध्यें पुष्कळदां मोठी गल्लत करीत असतात. परंतु साकल्यानें जर तूं या सर्व इतिहासाचा विचार करशील तर स्थूल असा एक एक सलग पट त्यासंबंधीं तुला डोळ्यांपुढें उभा करतां येईल. तुला आठवतच असेल, कीं दक्षिणच्या टोंकाचा एक लहानसा तुकडा सोडला तर अशोकाचें आखिल हिंदुस्थानवर व अफगाणिस्तान आणि मध्य आशियाचा कांहीं भाग एवढ्या प्रदेशावर राज्य होतें. त्याच्यानंतर दक्षिणेंत आंध्रांचें राज्य उदयास आलें. हें राज्य साऱ्या दक्षिण हिंदुस्थानभर पसरलेलें असून सुमारें चारशें वर्षें टिकून राहिलें; याच सुमारास उत्तरेमध्यें सरहद्द विभागांत कुशानांचें स्वतंत्र साम्राज्य होतें. तेलगू प्रांतांतील या आंध्रांचा जसजसा ऱ्हास झाला, तसतशी तामीळ प्रांतांतील पल्लवांची सत्ता पूर्व किनारा आणि दक्षिणेंतील भाग इकडे उदयास आली आणि फार काळपर्यंत त्यांचा अम्मल या भागावर राहिला. या पल्लवांनींच मॅलेशियांत वसाहती केल्या. सहाशें वर्षें त्यांचें राज्य चालल्यानंतर त्यांची जागा चोलांनीं घेतली. त्यांनीं आपल्या आरमाराच्या बळावर दूरदूरचे देश जिंकले आणि समुद्रावर लांब लांब स्वाऱ्या केल्या. तीनशें वर्षांनंतर रंगभूमीवरून ते मागें पडले आणि पांड्य राज्याची सद्दी चालू झाली; त्यांचें मदुरा शहर हें विद्या व कला यांचें केंद्र बनलें आणि त्यांचें कायळ हें बंदर लांबलांबच्या देशांशीं संबंध राखणारें असें मोठें श्रेष्ठ व व्यापारानें गजबजलेलें बंदर झालें.

ही झाली दक्षिण आणि पूर्व भागांची हकीकत. पश्चिमेला महाराष्ट्र प्रदेशांत प्रथम चालुक्यांचें राज्य होतें; त्यांच्या पाठीमागून राष्ट्रकूटांचें; आणि त्यानंतर पुन्हां एकदां चालुक्यांचें.

हीं सगळीं नुसतीं नांवें मात्र मी तुला सांगतों आहें. परंतु इतर जरी कांहीं माहिती नसली तरी सुद्धां हीं राज्यें केवढा दीर्घकाळ राज्य चालवीत राहिलीं आणि सुधारणेच्या केवढ्या उच्च पायरीला पोंचलीं या गोष्टी जरूर लक्षांत घे. त्यांच्यामध्यें आंगचीच अशी कांहीं विशेष शक्ति होती. त्यामुळें यूरपांतील कोणत्याही राज्यापेक्षां

अधिक शांतता आणि दृढता त्यांच्या ठिकाणीं आढळून आली. परंतु पुढें पुढें तेथील समाजपद्धति बदलत्या काळाच्या दृष्टीनें निरुपयोगी झाली आणि तिच्यांतील दृढता संपून गेली. मुसलमानांचीं सैन्यें १४ व्या शतकांत दक्षिणेकडे वळल्यावर तीं लौकरच कोलमडून पडलेली आपणांस दिसेल.

६६

दिल्ली येथील गुलाम राजे

२४ जून, १९३२

गझनीचा सुलतान महमूद याच्याबद्दल ज्याप्रमाणें मी तुझ्याजवळ थोडेंफार बोललों, त्याचप्रमाणें महमुदाच्या सांगण्यावरून फारशी भाषेंत शहानामा नांवाचा ग्रंथ लिहिणारा फिर्दौसी कवि त्याच्याबद्दलही मी तुझ्यार्शी बोललों आहें. परंतु महमुदाबरोबर त्याच्या काळचा आणखी एक प्रख्यात पुरुष पंजाबमध्यें आला होता. त्याच्याबद्दल अजून मीं तुला कांहीं सांगितलेलें नाहीं. त्याचें नांव अल्बेरुणी असें असून तो मोठा विद्वान् आणि बहुश्रुत माणूस होता. तत्कालीन धर्मवेड्या आणि क्रूर लढवय्यापेक्षां हा फार वेगळ्या प्रकारचा गृहस्थ होता. त्याला अगदीं नवीन असलेल्या या देशाची आणि त्यामधील लोकांची चांगली माहिती करून घेण्यासाठीं त्यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. हिंदी लोकांची तात्त्विक भूमिका समजून घेण्याची त्याला इतकी तीव्र तळमळ होती, कीं त्यासाठीं तो संस्कृत शिकला आणि हिंदूंचे बहुतेक प्रमुख ग्रंथ त्यानें मूळांत स्वतः वाचले. त्यानें भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, येथें त्या शास्त्रांचें आणि कलांचें जें शिक्षण मिळे त्याचेंही त्यानें निरीक्षण केलें. भगवद्गीता या ग्रंथावर त्याची फारच भक्ति जडली. दाक्षिणेंत तो चोलांच्या राज्यांत गेला, तेव्हां तेथील पाणीपुरवठ्यासाठीं बांधण्यांत आलेले पाटबंधारे पाहून त्याला मोठाच अचंबा वाटला. आज आपल्यास उपलब्ध असलेल्या प्राचीन काळच्या प्रवासवर्णनामध्यें त्यानें आपल्या हिंदुस्थानांतील प्रवासाचें लिहिलेलें वर्णन हा एक फार श्रेष्ठ प्रकारचा ग्रंथ आहे. आजूबाजूला नासधूस, कत्तली आणि धार्मिक कडवेपणा यांची नुसती राड माजून राहिली असतांना, तिच्यामध्यें हा दीर्घ प्रयत्न करणारा, आपल्या सभोंवतीं काय चाललेलें आहे याचें सूक्ष्म निरीक्षण करणारा, अध्ययनांत रममाण होणारा, आणि सत्य कशामध्यें आहे हें शोधून काढण्याचा प्रयत्न करणारा स्थिरप्रकृति विद्वान् गृहस्थ फारच निराळा आणि उठून दिसतो.

पृथ्वीराजाचा पराभव करणाऱ्या अफगाण वंशाच्या शहाबुद्दिनाच्यानंतर गुलाम राजे या नांवानें प्रसिद्ध असलेल्या सुलतानांची एक परंपरा दिल्ली येथें नांदली. यांच्या-

पैकीं पहिला राजा कुतुबुद्दीन हा होता. हा शहाबुद्दिनाच्या पदरीं एक गुलाम होता; परंतु गुलामांना सुद्धां त्या काळीं मोठ्या पदावर चढतां येणें शक्य असल्यामुळें त्यानें दिल्लीचा सुलतान होण्यापर्यंत मजल गाठली. त्याच्यामागून आलेले कांहीं राजे हे सुद्धां स्वतः मुळांत गुलाम होते. त्यामुळें या घराण्याला गुलाम घराणें असें म्हणतात. हेही सगळे चांगलेच क्रूर होते; आणि त्याच्या कारकीर्दीत एकाच वेळीं जिकडे तिकडे नवे नवे प्रांत जिंकणें, इमारती आणि ग्रंथालयें यांचा नाश करणें आणि लोकाना भयभीत करून टाकणें या प्रकारांचा त्यांनीं धुमाकूळ चालविला होता. पण त्यांना स्वतःला इमारती बाधण्याची हौस होती; इमारतीमध्यें आकाराच्या भव्यपणाकडे त्यांचें अधिक लक्ष होतें. दिल्लीजवळचा कुतुबमिनार नांवाचा प्रचंड मनोरा तुझ्या चांगला माहितीचा आहे. तो बांधण्याची सुरुवात या कुतुबुद्दिनानेंच केली. त्याच्यामागून गादीवर आलेला इल्तुन्मिश (अल्तमष) यानें हें बांधकाम पुरें केलें आणि त्याच्याच शेजारीं कांहीं सुंदर कमानी बांधल्या. आजही त्या तेथें अस्तित्वांत आहेत. या इमारतींना लागणारा बहुतेक सर्व माल प्राचीन हिंदी इमारतींमधील, विशेषतः मंदिरांमधील घेतलेला होता. त्या बांधणारे शिल्पज्ञ आणि कारागीर हे सर्वच हिंदी होते; परंतु मागें मीं म्हटल्याप्रमाणें मुसलमानांनीं आपल्याबरोबर आणलेल्या नवीन कल्पनांचा त्याच्यावर फार परिणाम झालेला होता.

महमुदाच्या वेळेपासून हिंदुस्थानवर स्वारी करून परत जाणारा प्रत्येक गृहस्थ आपल्याबरोबर पुष्कळच हिंदी कारागीर आणि शिल्पज्ञ यांचे समूह नेत असे. त्यामुळें हिंदी शिल्पकला आणि वास्तुशास्त्र यांचाही परिणाम मध्य आशियापर्यंत होत राहिला.

अफगाण लोकांनीं बिहार आणि बंगाल हे प्रांत अतिशयच लीलेनें जिंकले. अफगाण लोक हे जात्याच अतिशय साहसी होते; आणि बिहार-बंगालचें संरक्षण करणारांवर त्यानीं अगदींच अचानक हल्ला केला; अशा अचाट साहसाला पुष्कळदां यश येत असतें. अमेरिकेंतील कोर्टेस आणि पिझारो यांचे विजय जितके आश्चर्यकारक, तितकाच अफगाणांचा हा विजयही एक मोठा आश्चर्यकारक चमत्कार आहे.

या इल्तुन्मिशच्या कारकीर्दीतच (इ. स. १२११ ते १२२६) हिंदुस्थानच्या सरहद्दीवर एक महान् उत्पातकारक काळाकुट्ट ढग डोकें वर काढूं लागला होता. चेंगीजखानाच्या निशाणाखालीं जमा झालेल्या मोंगल लोकांचें तें आगामी संकट होतें. आपल्यापुढें पळणाऱ्या शत्रूचा पाठलाग करीत चेंगीजखान थेट सिंधुनदापर्यंत आला होता. पण तेथें तो थांबला. त्याच्या तडाख्यांतून हिंदुस्थान देश वांचला. त्यानंतर सुमारें दोनशें वर्षांनंतर मग त्याच्याच जातीचा आणखी एक लुटारू तैमूरलंग हा मात्र हिंदुस्थानात आला आणि येथें त्यानें पुष्कळ लूटमार आणि नासधूस केली. परंतु चेंगीजखान स्वतः जरी हिंदुस्थानमध्यें आला नाहीं, तरी मोंगल लोकांनीं तेव्हांपासून वारंवार हिंदुस्थानांत दरोडे घालण्याचा क्रम चालू केला आणि थेट लाहोरपर्यंत ते येत-जात राहिले. लोकांना तर त्यांनीं भयभीत केलेंच; परंतु खुद्द दिल्लीच्या सुलतानांनासुद्धां

त्यांच्यामुळें चिंता उत्पन्न झाली; म्हणून कित्येकदां लांच देऊन सुलतान त्यांना मागें परतवीत असत. या मोंगलांपैकीं हजारों लोक पंजाबमध्येंच घरदारही करून राहूं लागले.

गुलाम घराण्यांतील सुलतान रेझिया (रझिया) नांवाची एक स्त्री राज्य करणारी निघाली. सुलतान इल्तुन्मिश याची ती मुलगी. ती मोठी कर्तबगार स्त्री असावी आणि शूर लढवय्यी असें दिसतें. परंतु तिच्या राज्यांतील क्रूर अफगाण सरदार आणि त्यांच्यापेक्षांही जास्त क्रूर असे पंजाबमध्यें धाडी घालणारे मोंगल लोक यांच्या कचाट्यांत तिची कारकीर्द मोठी कष्टाची गेली.

इ. स. १२९० मध्यें गुलाम घराण्याचा शेवट झाला. त्यांच्यामागून अल्लाउद्दीन खिलजी हा दिल्लीचा राजा झाला. यानें गादी मिळविली ती केवढ्या साध्या आणि मृदु उपायानें; आपल्या चुलत्याचा - तोच त्याचा सासराही होता - त्यानें फक्त वध केला इतकेंच! या आपल्या सत्कार्यांची सांगता - त्यानें जे जे कोणी आपल्याशीं एकनिष्ठ नाहींत असा त्याला संशय आला त्या सर्व मुसलमान सरदारांचा वध करून - केली. मोंगल लोकांनीं कट केल्याचा संशय आल्यावरून आपल्या राज्यांतील ऐकूण एक मोंगल माणसाला ठार करण्याचा त्यानें हुकूम दिला; अशासाठीं, कीं "या पृथ्वीच्या पाठीवर या लोकांचें एवढेंसुद्धां बीज शिल्लक राहतां कामा नये." अशा रीतीनें त्यांच्यापैकीं सुमारें वीस ते तीस हजार लोक (ते सारे अर्थातच स्वतः बिचारे निरपराध असूनही) ठार केले गेले.

मला वाटतें, एकसारखे हे जे कत्तलींचे उल्लेख येतात ते कांहीं तुझ्या मनाला सुखकारक वाटत नसतील. तसें पाहिलें तर सार्वत्रिक इतिहासाच्या विशाल दृष्टीनें पाहतां त्यांचें फारसें महत्त्वही नाहीं. तथापि, उत्तर हिंदुस्थानांतील या काळांतील अवस्था शांततेची किंवा सुधारणेची अजीबात कशी नव्हती हें दाखविण्याच्या दृष्टीनें या कत्तलींच्या उल्लेखांचा उपयोग आहे. सुधारणा नाहींशी होऊन एक प्रकारें रानटीपणाकडेच कांहींशी उलटी उडी या प्रदेशांत त्या वेळीं घेतलेली दिसते. इस्लामधर्माबरोबर एक पक्षीं हिंदुस्थानमध्यें थोडीशी प्रगतीची लाट आली, तर या मुसलमानी अफगाणांच्याबरोबर येथें रानटीपणाचा प्रवेश झाला. पुष्कळ लोक या दोन्ही गोष्टी एकच असें समजतात. पण तसें न करतां या दोन गोष्टी परस्परांपासून भिन्न आहेत हें आपण ओळखलें पाहिजे.

आपल्या पूर्वीच्या इतरांप्रमाणेंच अल्लाउद्दीन हाही जात्या धर्माच्या बाबतींत अगदीं अनुदार होता - कडवा होता. परंतु या सुमारास मध्य आशियांतून येऊन हिंदुस्थानांत राज्य करूं लागलेल्या या लोकांच्या दृष्टिकोनांत कांहींसा फरक पडत चालला होता असें दिसतें. आतां हिंदुस्थान देश हीच आपली मायभूमि आहे, आपलें घर आहे असें त्यांना वाटण्यास सुरुवात झाली होती. या ठिकाणीं ते आतां कोणी परके अशी अवस्था राहिली नव्हती. अल्लाउद्दिनानें स्वतः एका हिंदु स्त्रीशीं लग्न केलें होतें; तसेंच त्याच्या मुलानेंही.

अल्लाउद्दिनाच्या कारकीर्दीत राज्यकारभाराला थोडेंफार व्यवास्थितपणाचें आणि शिस्तीचें वळण लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. सैन्याच्या हालचालीकरितां दळण-वळणाचे मार्ग नीट बंदोबस्तांत ठेवण्याची तर विशेष काळजी घेण्यात येऊं लागली; अल्लाउद्दिनाचें आपल्या सैन्याची तंदुरुस्ती राखण्याकडे विशेषच लक्ष असे. त्यानें आपल्या सैन्याचें बळ फारच वाढविलें आणि त्याच्या जोरावर गुजरात व दक्षिण हिंदुस्थानचा बराचसा भाग जिंकून घेतला. त्याच्या सेनापतीनें दक्षिणेंतून परत येतांना प्रचंड संपत्ति आपल्याबरोबर आणली. असें सांगतात, कीं त्यानें बरोबर आणलेल्या संपत्तींत ५०,०००मण सोनें, मोतीं आणि जवाहीर यांचा प्रचंड सांठा, २०,००० घोडे आणि ३१२ हत्ती होते.

अद्भुतरम्यता आणि धीरोदात्तता यांचें माहेरघर जें चितोड शहर, त्याच्यामध्यें शौर्याला या काळींही कांहीं वाण नव्हती; परंतु तेथील सर्व व्यवहारांत आतां जुनाटपणा आला असून त्याची युद्धाची पद्धतीही आतां नव्या काळच्या दृष्टीनें जुनी आणि म्हणून निकामी झाली होती. अल्लाउद्दिनाच्या कुशल सैन्यानें या चितोडला चांगलाच दणका दिला. इ. स. १३०३ मध्यें चितोड शहराची लूट करण्यांत आली. पण अशी ही लूट होऊन चितोडचा पाडाव होण्यापूर्वी किल्ल्यांतील सर्व स्त्रीपुरुषांनीं आपल्या पूर्वीच्या रूढीला अनुसरून जोहाराचा भयंकर प्रकार केला. ही रूढि अशी आहे, कीं जेव्हां पराभव होण्याची वेळ येईल आणि आतां सुटकेचा दुसरा कांहीं मार्ग नाहीं असा अगदीं अखेरचा, आणीबाणीचा संकटाचा क्षण प्राप्त होईल, त्या वेळीं सर्व पुरुषांनीं बाहेर पडून रणभूमीवर लढता लढतां मरून जाणें आणि स्त्रियांनीं चिता रचून त्यांमध्यें स्वतःला जाळून घेणें, हें शत्रूला शरण जाऊन त्याच्या तावडींत सांपडण्यापेक्षां अधिक श्रेयस्कर. अर्थात् हा प्रकार स्त्रियांच्या दृष्टीनें पाहतां तर फारच भयंकर होता. त्यापेक्षां या स्त्रियाही स्वतः तरवार हातांत घेऊन रणागणांत गेल्या असत्या आणि लढून मेल्या असत्या तर अधिक बरें झालें असतें. परंतु तें कसेंही झालें तरी, त्या काळीं लढाईंतील विजय म्हणजे पराजितांच्या कपाळीं गुलामी आणि अव-हेलना याच गोष्टी यावयाच्या, असा निश्चित प्रकार असल्यामुळें त्यापेक्षां मरण हें अधिक श्रेयस्कर वाटे हें निःसंशय.

दरम्यान एकीकडे या देशांतील लोकांना – हिंदूंना – हळूहळू मुसलमान करून घेण्यांत येत होतें. परंतु अशा धर्मांतराची प्रगति म्हणावी अशी वेगाची नव्हती. कितीकांनीं धर्मांतर इस्लामधर्म त्यांना पटला म्हणून केलें; कितीकांनीं धर्मांतर भीतीमुळें केलें; तर कितीकांनीं विजयी पक्षाच्या बाजूला राहणें बरें असें स्वाभाविकपणेंच त्यांना वाटलें म्हणून धर्मांतर केलें. परंतु धर्मांतराचें अगदीं प्रमुख कारण हें आर्थिक होतें. जे इस्लामधर्माचे नसत अशा लोकांना एक विशिष्ट कर, डोईपट्टी द्यावी लागे. याला जिझिया म्हणत. गरीब लोकांना हें कराचें ओझें फारच अवजड होई. या करापासून सुटका व्हावी एवढ्याच बुद्धीनें पुष्कळसे लोक धर्मांतर करीत. वरिष्ठ वर्गांमध्यें

दरबारची मर्जी संपादन करावी आणि मोठ्या अमलदारीच्या जागा मिळवाव्या हा प्रबळ हेतु धर्मांतराच्या बुडाशीं असे. अल्लाउद्दिनाचा एक श्रेष्ठ सेनापति मलिक काफर, ज्यानें दक्षिण हिंदुस्थान जिंकला, तो मूळचा हिंदु असून धर्मांतर करून मुसलमान झालेला होता.

दिल्लीच्यां आणखी एका सुलतानाबद्दल तुला सांगितलेंच पाहिजे. हा एक अत्यंत लोकविलक्षण मनुष्य होता. त्याचें नांव महमद बिन तुघलघ. हा अत्यंत विद्वान् असून फारशी आणि आरबी या दोन्ही भाषांत मोठा प्रवीण होता. त्यानें तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र यांचें अध्ययन केलें होतें; ग्रीक तत्त्वज्ञानाचाही त्यानें अभ्यास केलेला होता. गणितशास्त्र, भौतिकशास्त्रें आणि वैद्यकशास्त्रें यांमध्येंही त्याची थोडीथोडी गति होती. तो मोठा शूर असून आपल्या काळीं एक विद्वत्तेचा अपूर्व आश्चर्यकारक मुकुटमणि म्हणून तो चमकत होता. आणि हें सगळें अगदीं खरें असून-सुद्धां हे मुकुटमणिबहादर एखाद्या सैतानासारखे क्रूर असून खरोखर फार डोकें फिरलेले गृहस्थ असावे असें वाटतें. त्यानें गादी मिळविली ती खुद्द आपल्या बापाचा वध करून. इराण आणि चीन देश जिंकून घ्यावे अशी कांहींशी त्याची अफाट कल्पना व योजना होती. अर्थात् तिचा स्वाभाविकपणें सर्व फज्जाच उडाला. परंतु त्याचा सगळ्यांत सुप्रसिद्ध पराक्रम म्हणजे स्वतःचीच राजधानी दिल्ली शहर हें नष्ट करून टाकण्याचा त्यानें केलेला निश्चय हा होय. कारण काय, तर त्याच्या धोरणाविरुद्ध म्हणे या शहरांतील कांहीं लोकांनीं, निनांवी पत्रकें काढून टीका करण्याचें साहस केलें. म्हणून त्यानें राजधानी दिल्लीहून उठवून ती दक्षिणेंत देवगिरी येथें (हल्लीं हें गांव दक्षिण हैद्राबाद संस्थानांत आहे) नेण्याचा हुकूम सोडला. या गांवाला त्यानें दौलताबाद असें नवें नांव दिलें. घरमालकांना कांहीं थोडीशी नुकसान-भरपाई देण्याचें ठरविण्यांत आलें होतें तेवढी घेऊन तीन दिवसांत प्रत्येकानें दिल्ली शहर सोडून गेलें पाहिजे असा त्याचा हुकूम होता.

त्याप्रमाणें बहुतेक लोकांनीं दिल्ली शहर सोडलें. कांहीं लोक लपून शहरांतच राहिले. ते जेव्हां सांपडले तेव्हां त्यांना अत्यंत क्रूर शिक्षा देण्यांत आल्या. या लोकांत एक आंधळा होता आणि एक जण अर्धांगानें पीडिलेला होता. पण तेसुद्धां शिक्षेंतून सुटले नाहींत. दिल्लीहून दौलताबाद येथें जायला त्या लोकांना चाळीस दिवसांचा प्रवास करावा लागला. एवढ्या या दीर्घ प्रवासांत या लोकांचे किती भयंकर हाल झाले असतील आणि वाटेंतच कितीकांनीं राम म्हटला असेल याची कोणालाही सहज कल्पना करतां येईल.

बरें पण, मग त्या दिल्ली शहराचें इकडे काय झालें? यानंतर दोन वर्षांनीं महमद बिन तुघलघानें दिल्लीमध्यें पुन्हां लोकवस्ती करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं या शहराची अवस्था प्रत्यक्ष पाहिलेल्या एकानें लिहिली आहे, कीं त्यापूर्वी त्यानें या शहराचें "अगदीं संपूर्ण निर्जन रान" करून टाकलें होतें. एखाद्या बागेचें रान काय

अगदीं तावडतोब करणें शक्य आहे! परंतु पुन्हा या रानाची बाग बनविणें हें कांहीं सोपें काम नाहीं. आफ्रिकेंतील मूर जातीचा इब्न बटूटा या नांवाचा एक प्रवासी सुलतान महमदाबरोबर होता. त्याच्याबरोबर परत येऊन त्यानें दिल्ली शहर पाहिलें त्या वेळच्या वर्णनांत तो लिहितो, "सर्व विश्वामध्यें अत्यंत मोठ्या शहरांपैकीं हें एक शहर आहे. आम्हीं या शहरांत प्रवेश केला तेव्हां त्याची जी अवस्था होती तिचें हें वर्णन वर केलें. शहर सगळें उजाड मोकळें होतें; मूठभर लोक सोडले तर त्यामध्यें कोणी राहत नव्हते." दुसरा एक गृहस्थ आठ किंवा दहा मैलपर्यंत पसरलेलें असें हें शहर होतें असें वर्णन करून लिहितो, "सर्व कांहीं नष्ट करून टाकण्यांत आलें होतें. नाश इतका संपूर्ण करण्यात आला होता, कीं शहरातील इमारतींत, राजवाड्यात, किंवा शहराच्या उपनगरांतही एखादें कुत्रें किंवा मांजरसुद्धां शिल्लक राहिलेलें नव्हतें."

हा वेडा गृहस्थ सुलतान म्हणून २५ वर्षें, थेट इ. स. १३५१ पर्यंत, अम्मल गाजवीत होता. आपल्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणचा किती दुष्टपणा, किती क्रूरपणा, किती नालायकी लोक सहन करूं शकतात हें पाहिलें म्हणजे भयंकर अचंबा वाटतो. पण महमद बिन तुघलघाची प्रजा इतकी गुलामी वृत्तीची असूनसुद्धां अखेर साम्राज्याचा विनाश घडवून आणण्यांत त्याला यश मिळलेंच! त्याच्या वेड्या योजनेमुळें आणि अवजड करांमुळें साऱ्या देशाचा नाश झाला. जिकडेतिकडे अन्नाची टंचाई झाली आणि बंडें उद्भवलीं. प्रत्यक्ष त्याच्या हयातींतच १३४० पासून पुढच्या काळांत पुष्कळ प्रदेशांत अगदीं स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. बंगाल देश स्वतंत्र झाला. दक्षिणेंत तर पुष्कळच राज्यें उदयाला आलीं. त्यामध्यें प्रमुख म्हणजे विजयानगरचें हिंदु-राज्य होय. हें इ. स. १३१६ मध्यें उदयास आलें; आणि दहा वर्षांत दक्षिणेमध्यें ही एक महान् सत्ता होऊन गेली.

दिल्लीच्या शेजारींच तुला अजून तुघलघाबादचे कांहीं अवशेष पाहायला सांपडतील. या महमदाच्या बापानें बाधलेलें तें शहर होतें.

६७

चेंगीजखान आशिया आणि यूरप खंडांना हादरा देतो

२५ जून, १९३२

अलीकडच्या माझ्या कित्येक पत्रांमध्यें मीं मोंगल लोकांचा आणि त्यांनीं जगांत जो कहर उसळविला आणि विनाश केला त्याचा उल्लेख केला आहे. चीनमध्यें सुंग घराण्याचा वृत्तांत आपण पाहत होतों तो या मोंगल लोकांच्या आगमनाच्या काळाशींच आपण थांबविला. पश्चिम आशियात आपली-त्याची गाठ पडली आणि त्याच सुमारास

जुनें जग संपलें हें आपण पाहिलें. हिंदुस्थानात गुलाम राजे हे त्यांच्या कचाट्यांतून वांचले; तरी पण या देशांत कांहीं त्यांनीं कमी गोंधळ उडवून दिला असें नव्हे. मंगोलियामधील या भटक्या लोकांनीं साऱ्या आशिया खंडाला खालीं ग्लोळविलें असें म्हणावें लागतें. आणि एकट्या आशिया खंडालाच कां, अर्ध्या यूरप खंडाला पण. एकाएकीं उसळून वर येऊन सगळ्या जगाला भीतीनें आणि आश्चर्यानें चीत करून टाकणारे हे विलक्षण लोक होते तरी कोण, कुठले? त्यांच्या आधीं सिथियन, हूण, तुर्क आणि तार्तार, या सगळ्या मध्य आशियांतीलच लोकांनीं इतिहासात नांव घेण्यासारखा पराक्रम करून दाखविलेला होता. या काळींसुद्धां अजून त्यांच्यापैकीं कांहीं लोक श्रेष्ठ स्थितींत होते. सेल्जुक तुर्क पश्चिम आशियांत बलिष्ठ होते; तार्तार लोक उत्तर चीनमध्यें आणि इतर ठिकाणीं होते. परंतु या काळापर्यंत या मोंगल लोकांनीं फार करून कोठेंच कांहीं नांव घेण्याजोगा पराक्रम केलेला नव्हता. पश्चिम आशियांतील कोणाला त्यांच्याबद्दल विशेष म्हणण्यासारखी माहितीसुद्धां नसावी. मंगोलियामधील अगदींच बिनमहत्त्वाच्या अशा कांहीं टोळ्यांमधील हे लोक असून उत्तर चीन जिंकून घेणाऱ्या किन तार्तार लोकाच्या अमलाखालीं ते राहणारे होते.

कोणाच्या ध्यानींमनींही नव्हतें तोंच त्यांनीं सत्ता काबीज केली असें दिसून आलें. त्यांच्या सगळ्या विस्कळित टोळ्या एकत्र होऊन त्यांनीं आपला सगळ्यांचा मिळून एक पुढारी निवडला. तो म्हणजे बडा खान हा होय. त्याच्याशीं एकनिष्ठ राहून त्याचे हुकूम पाळण्याची त्यांनीं शपथ घेतली. या खानाच्या निशाणाखालीं त्यांनीं पेकिंगवर चाल केली आणि तेथील किन साम्राज्य नष्ट केलें. नंतर त्यानीं पश्चिमेकडे मोर्चा वळविला आणि वाटेंत भेटलीं तीं सगळीं मोठमोठीं राज्यें पार वाऱ्यावर विरवून टाकल्यासारखीं उधळून लावलीं. रशियांत जाऊन तो देशही त्यांनीं आपल्या कबजांत आणला. त्यानंतर त्यांनीं बगदाद आणि बगदादचें सर्व साम्राज्य धुळीस मिळविलें आणि थेट पोलंड व मध्य यूरप येथपर्यंत मजल गांठली. वाटेंत त्यांना प्रतिबंध करायला कोणी उभाच राहूं शकला नाहीं. केवळ योगायोग म्हणूनच हिंदुस्थान देश त्यांच्या तडाख्यांतून बचावला. एकाएकीं वर उसळून आलेल्या या ज्वालामुखीच्या योगानें यूरपांतील व आशियांतील लोक किती गोंधळून गेले असतील याची आपल्याला चांगली कल्पना करता येईल. त्यांच्या-पुढें तो एक भूकंपासारखा प्रचंड नैसर्गिक उत्पातच उभा राहिल्यासारखा झाला असेल; आणि अशा नैसर्गिक महान् आपत्तीपुढें मनुष्य बिचारा काय करणार, अशी त्यांची केविलवाणी अवस्था होऊन गेली असेल!

मंगोलियांतील हे लोक, त्यांच्यामधील स्त्री आणि पुरुष दोन्ही, शरीरानें चांगलेच दणकट होते; कष्ट करण्याची, हाल सोसण्याची त्यांना संवय होती. उत्तर आशियांतील विशाल माळावर तंबू ठोकून दिवस कंठावयाचे ही त्याची रोजची राहणी होती. परंतु त्याच्यामध्यें त्यांचा तो असामान्य आणि लोकविलक्षण नेता जर

उत्पन्न झाला नसता, तर या त्यांच्या शरीरशक्तीचा आणि काटकपणाच्या संवयीचा त्यांना फारसा कांहीं उपयोग झाला नसता. हा नेता म्हणजे इतिहासांत चेंगीजखान या नांवानें प्रसिद्ध असलेला गृहस्थ. (गेंघीझ, जेंघीझ, जेंगीझखान असे त्याच्या नांवाचे आणखी कितीक तऱ्हेचे लेख व उच्चार केले जातात.) यांचें मूळचें नांव टिमुचिन असें असून त्याचा जन्म इ. स. ११५५ मध्यें झाला. तो अगदीं लहान असतांना त्याचा बाप येसुगी – बगातूर हा मरण पावला. जातां जातां हें एक लक्षांत ठेव, कीं मोंगल सरदारांमध्यें "बगातूर" हें एक मोठेंच आवडतें नांव आहे. याचा अर्थ वीर असा असून उर्दूमधील बहादूर हा शब्द त्यापासूनच निघाला असावा.

दहा वर्षांचा कोंवळा असा हा पोरका मुलगा; त्याची वास्तपुस्तसुद्धां घ्यायला कोणी नाहीं; अशाही स्थितींत त्यानें हळूहळू धडपडत डोकें वर काढायची खटपट केली आणि अखेरीस त्याला यशही आलें. एक एक पायरी तो चढत जात असतां शेवटीं मोंगल लोकांची ती श्रेष्ठ सभा, त्यांची ती कुरुलताई, भरून तिच्यामध्यें त्याची बडा खान, कागान, म्हणजेच बादशहा म्हणून निवड करण्यांत आली. याच्या पूर्वीच कांहीं काळ त्याला चेंगीज हें नांव देण्यांत आलें होतें.

मोंगल लोकांचा गुप्त इतिहास या नांवाचा एक ग्रंथ तेराव्या शतकांत लिहिलेला असून चीनमध्यें तो चौदाव्या शतकांत प्रसिद्ध झाला. त्यांत या वरील निवडणुकीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:—

"आणि अशा रीतीनें कांबळ्यांच्या तंबूमध्यें राहणाऱ्या या लोकांच्या सर्व लहानमोठ्या पिढ्या एका सत्तेखालीं एकत्र येऊन राहूं लागल्यानंतर 'चित्तासंवत्' नांवाच्या वर्षीं ते सगळे जण ओनोन नदीच्या मुखाशीं जमले आणि नऊ पायांवरील आपलें पांढरें निशाण उभारून त्यांनीं चेंगीजला कागान ही पदवी बहाल केली."

प्रमुख खान अथवा कागान झाला त्या वेळीं चेंगीज हा एकावन्न वर्षांचा होता. आतां काहीं तो तसा तरुण वयाचा नव्हता. त्याच्या वयाच्या बहुतेक माणसांचें लक्ष शांतता आणि विश्रांति यांवर लागलेलें असतें. पण चेंगीजच्या मुलूखगिरीच्या आयुष्याची तर ही कोठें नुकती सुरुवात होती, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे; कारण जगांतील बहुतेक श्रेष्ठ विजेत्यांनीं देश जिंकण्याचें काम बऱ्याच लहान वयांत केलेलें आढळतें. त्यावरून आपल्याला हीही आणखी एक गोष्ट दिसून येईल, कीं चेंगीजखान या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सारें आशिया खंड पालथें घालून पलीकडे जो गेला, तो कांहीं केवळ तरुणपणच्या उत्साहाच्या भरांत नव्हे. त्या वेळीं तो चांगला सावध वृत्तीचा, विचारी, मध्यमवयाचा मनुष्य असून त्यानें केलेल्या प्रत्येक मोठ्या कृत्याच्या मागें विचार आणि तयारी या गोष्टी अवश्य आढळून येतात.

मोंगल लोक हे स्वभावतःच भटक्ये असून त्यांना शहरांचा आणि शहरी जीवनाचा तिटकारा होता. हे लोक भटक्ये होते याचा अर्थ ते रानटी असले पाहिजेत अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे. पण ही चुकीची समजूत आहे. या लोकांना

अर्थातच शहरी लोकांच्या बऱ्याचशा कला माहीत नव्हत्या हें खरें; परंतु त्यांच्यामध्येंही जीवनाची कांहीं एक विशिष्ट पद्धति त्यांनीं रचलेली असून तिच्यांतही विविध अंगोपागांनीं युक्त असें संघटनतंत्र होतें. रणांगणांत त्यांना जे विजय मिळाले ते केवळ त्यांच्या बाजूला सैन्यं जास्त होतें म्हणून नव्हे, तर त्यांच्यामध्यें शिस्त आणि संघटना होती म्हणून; आणि त्याहून सगळ्यांत प्रमुख कारण म्हणजे चेंगीजखानाचें अत्यंत कुशल नेतृत्व त्यांना लाधलेलें होतें, हें होय.. कारण चेंगीजखान हा निःसंशय सगळ्या इतिहासामध्यें युद्धशास्त्रांतील सर्वश्रेष्ठ प्रतिभावान् गृहस्थ आणि उत्कृष्टांतील उत्कृष्ट नेता होता. ॲलेक्झांडर किंवा सीझर हे त्याच्यापुढें क्षुद्र कीटकासारखे भासतात. चेंगीजखान हा स्वतः प्रत्यक्ष उत्कृष्ट सेनानायक तर होताच; परंतु शिवाय त्यानें आपले पुष्कळसे सेनापती स्वतः शिकवून तयार केले आणि त्यांना अत्यंत कुशल सेनानायक बनविले हा त्याचा आणखी विशेष होता. आपल्या मायदेशापासून हजारों मैल दूर असतांना, चोहों बाजूंनीं शत्रूंनीं वेढलेले असतांना, एवढेंच नव्हे, तर तो जेथें होता तेथील प्रजासुद्धां त्याच्याशीं विरोधी असतांना, अशा प्रतिकूल परिस्थितींत सुद्धां, आपल्याहून संख्येनें अधिक अशा शत्रूंशीं त्यानें शिकवून तयार केलेल्या या सेनापतींनीं यशस्वी लढाया केल्या.

चेंगीजखानानें आशिया आणि यूरप खंडें तुडवायला सुरुवात केली त्या वेळीं त्यांचा नकाशा कसा काय होता? मंगोलियाच्या पूर्वेला आणि दक्षिणेला असलेल्या चीन देशाचे या वेळीं दोन तुकडे झालेले होते. दक्षिणेला सुंग साम्राज्य असून तेथें दक्षिणेंतील सुंग राजांचा अम्मल होता. उत्तरेला किन अथवा सुवर्ण तार्तारांचें साम्राज्य असून पेकिंग येथें त्यांची राजधानी होती. त्यांनींच सुंग घराण्याला तेथून हांकलून लावलें होतें; पश्चिमेला गोबीच्या निर्जन मैदानाच्यावर व त्याच्यापलीकडे शिया किंवा तंगूत साम्राज्य होतें; हें मोंगलांसारख्याच भटक्या लोकांचें राज्य होतें. हिंदुस्थानांत इकडे गुलाम राजांचें राज्य दिल्ली येथें होतें हें आपण पाहिलेंच आहे. इराणमध्यें आणि मेसापोटेमियामध्यें थेट हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत ख्वाराजम किंवा खिवा याचें मोठें मुसलमानी राज्य असून समरकंद येथें त्याची राजधानी होती. त्याच्या पश्चिमेकडील प्रदेशांत सेल्जुक तुर्कांचें राज्य असून ईजिप्त व पॅलेस्टाइन या देशांत सलादिन सुलतानाचें राज्य होतें. बगदादच्या आसपास तेवढा खलिफाचा अम्मल होता, पण तोही सेल्जुक तुर्कांच्या अधिराज्याखालीं.

दुसऱ्या खिस्ती धर्मयुद्धाचा हा काळ आहे. या वेळीं पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा जगांतील आश्चर्य म्हणून प्रसिद्धीस आलेला, होहेनस्टाफेन घराण्यांतील दुसरा फ्रेडरिक हा होता. इंग्लंडमध्यें मॅग्ना चार्टाचा आणि त्यानंतरचा हा काळ होता. फ्रान्समध्यें नवव्या लुईचा अम्मल चालू होता. हाच लुई खिस्ती धर्मयुद्धांत गेला असतांना तुर्कांकडून कैद केला गेला आणि खंडणी देऊन त्याला सोडवून आणवावें लागलें. पूर्व यूरपांत रशियाचें राज्य या सुमारास दुभंगल्यावजा झालेलें होतें; उत्तरेस


चंगीझखान - "परमेश्वराचा कोरडा"
मंगोलिया
कोराकोरम
चीन
तिबेट
तुर्कस्तान
समरकंद
बुखारा
मुलतान
मुलुख

नोव्होगोरोड येथील राज्य आणि दक्षिणेस कीव्ह येथील राज्य. रशिया आणि पवित्र रोमन साम्राज्य यांच्या दरम्यान हंगेरी आणि पोलंड हे देश होते. कॉन्स्टान्टिनोपलच्या आसपास बायझांटाइन साम्राज्यही अस्तित्वात होतेंच.

चेंगीजखानानें आपल्या मुलूखगिरीसाठीं काळजीपूर्वक पूर्वतयारी केली. त्यानें आपल्या सैन्याला शिक्षण देऊन तयार केलें; सगळ्यात विशेष म्हणजे त्यानें आपले घोडेसुद्धा शिकवून तयार केले आणि राखीव घोड्यांची सुद्धा तजवीज करून ठेवली. कारण भटकणाऱ्या लोकांना घोड्यांइतकें महत्त्वाचें दुसरें काय आहे? ही तयारी झाल्यावर त्यानें पूर्वेकडे मोर्चा केला व उत्तरचीन आणि मंचुरिया यांमधील किन साम्राज्य जवळजवळ नष्ट केलें आणि पेकिंग शहर काबीज केलें. नंतर त्यानें कोरिया देश जिंकला. या वेळीं दक्षिणेतील सुंग राजांशीं त्याचे स्नेहाचे संबंध असावे असें दिसतें. किन राजांच्या विरुद्ध सुंग राजांनीं चेंगीजला मदत सुद्धां केली; त्यापुढें आपल्यावर पण पाळी येणार आहे हें त्या वेळीं त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. त्यानंतर त्यानें तंगूत राजांचेंही राज्य जिंकलें.

या विजयानंतर कांहीं काळ चेंगीजखानानें विश्रांति घेतली असावी व पश्चिमेकडे स्वारी करण्याची त्याला इच्छा नसावी असें दिसतें. ख्वाराजमच्या राजाशीं किंवा शहाशीं मैत्रीचेच संबंध ठेवण्याचा त्याचा उद्देश होता. परंतु तसें घडावयाचें नव्हतें. लॅटिन भाषेंत अशी एक म्हण आहे, कीं देवांच्या मनांतून ज्यांचा नाश करावयाचा असतो त्यांना आधीं ते वेडे करतात. (विनाशकाले विपरीत बुद्धिः) ख्वाराजमच्या शहानें आपला नाश करून घ्यायचा असा जणुं निश्चयच केला होता असें दिसतें; आणि ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं जरूर तें त्यानें सर्व केलें. त्याच्या एका प्रांताधिपानें मोंगल व्यापाऱ्यांची कत्तल केली. इतकें होऊनही चेंगीजखानाला शांतताच हवी होती. म्हणून त्यानें वकील पाठवून त्या प्रांताधिपाला शिक्षा व्हावी अशी मागणी केली. परंतु शहा होता मूर्ख; आपल्या मोठेपणाच्या गर्वाच्या भरांत त्यानें त्या वकिलाचा अपमान केला आणि त्याचा वध करविला. अर्थात् ही गोष्ट सहन करणें चेंगीजखानाच्या शक्तीच्या बाहेरचें होतें; तरीपण त्यानें उतावीळी केली नाहीं. काळजीपूर्वक सगळी तयारी त्यानें केली आणि मग आपलें प्रचंड सैन्य घेऊन त्यानें पश्चिमेकडे मोर्चा फिरविला.

इ. स. १२१९ मध्यें जेव्हां हा मोर्चा सुरू झाला तेव्हा आशियाचे आणि कांहीं अंशीं यूरपचे डोळे उघडले; आणि हें नवीन भयंकर संकट काय आहे, कित्येक शहरांना आणि लाखों लोकांना निर्दयपणें चुरडून टाकीत पुढें जाणारा हा प्रचंड रूळ कशा प्रकारचा आहे याची त्यांना जाणीव झाली. ख्वाराजमचें साम्राज्य अस्तित्वांतून नाहींसें झालें. प्रासादांनीं भरलेलें आणि दहा लाख लोकवस्तीनें गजबजलेलें तें महान् बुखारा शहर धुळीस मिळालें. समरकंद हें राजधानीचें शहर नष्ट करण्यात आलें; तेथें राहणाऱ्या दहा लाख लोकांपैकीं फक्त ५० हजार लोक मागें जिवंत राहिले. हिरात,

वल्ख आणखी दुसरीं पुष्कळ गजबजलेलीं शहरें नष्ट करण्यांत आलीं. लाखों लोक मारले गेले. शतकांनुशतकें मध्य आशियांत भरभराटीस आलेल्या सर्व कला आणि कारागिरी नाहींशी होऊन गेली; इराणमध्यें आणि मध्य आशियांत सुधारलेलें जीवन शिल्लक राहिलें नाहीं. जेथें जेथें चेंगीजखानें जाई, तेथें तेथें सगळें निर्जन रान होऊन जाई.

रव्वाराजमच्या शहाचा मुलगा जलालुद्दिन हा या महापुराच्या विरुद्ध मोठ्या शौर्यानें लढला. माघार घेत घेत तो थेट सिंधु नदीच्या कांठीं आला. तेथेंही समोरच्या सैन्याचा जोर अनिवार्य झाल्यामुळें घोड्यावरून त्यानें या प्रचंड नदींत एकदम ३० फूट लांब उडी मारली म्हणतात; आणि घोड्यासह पोहून तो पलीकडच्या तीराला गेंचला. इकडे दिल्लीच्या दरबारांत त्याला आसरा मिळाला. तेथपर्यंत त्याचा पाठलाग करण्यांत चेंगीजखानाला कांहीं विशेष अर्थ वाटला नाहीं.

सेल्जुक तुर्क आणि बगदाद यांचें नशीबच जोरावर होतें म्हणावयाचें; म्हणून त्यांना हात न लावतां चेंगीजखान उत्तरेंत राशियांत चालून गेला. कीव्ह येथील ग्रँट डयूकचा पराभव करून त्यानें त्याला कैद केलें. तेथून शिया किंवा तंगूत लोकांचें बंड झालें होतें तें मोडून काढण्यासाठीं तो पूर्वेकडे परतला.

चेंगीजखान इ. स. १२२७ मध्यें त्याच्या ७२ व्या वर्षाच्या अखेरीस मरण पावला. पश्चिमेस काळ्या समुद्रापासून तों इकडे पॅसिफिक महासागरापर्यंत त्याचें साम्राज्य पसरलेलें असून त्याच्या मृत्यूच्या वेळींही तें चांगलें जोमदार आणि वाढतें होतें. त्याची राजधानी मात्र अद्यापि मंगोलियामधील काराकोरम या छोट्याशा शहरींच होती. तो जरी भटक्या जातीमधील होता, तरी त्याच्या ठिकाणीं संघटना-कौशल्य फार उत्तम होतें; आपल्या साहाय्यार्थ कर्तबगार मंत्री नेमण्याइतकें शहाणपण आणि चातुर्य त्याच्यापाशीं होतें. इतक्या जलद गतीनें संपादलेलें असूनही त्याचें साम्राज्य तो मरतांक्षणीं कांहीं विलयाला गेलें नाहीं.

इराणी आणि आरबी इतिहासकारांच्या दृष्टीनें चेंगीजखान हा निव्वळ एक सैतान होता. त्याला ते "परमेश्वराचा चाबूक" असें म्हणत. त्याचें त्यांनीं फार निर्दय मनुष्य अशा प्रकारचें चित्र रंगविलें आहे. तो क्रूर आणि निर्दय होता यांत मुळींच शंका नाहीं; परंतु त्याच्या काळच्या इतर पुष्कळशा राज्यकर्त्यांहून कांहीं या बाबतींत तो फारसा वेगळा नव्हता. हिंदुस्थानांत लहानशा प्रमाणावर अफगाण राजे अशाच प्रकारचे होते. इ. स. ११५० मध्यें अफगाण लोकांनीं गझनी शहर काबीज केलें त्या वेळीं आपल्या पूर्वीच्या कांहीं वांशिक तंट्याचा सूड घेण्यासाठीं त्या शहराची लूट करून तें त्यांनीं जाळून टाकलें. सात दिवसपर्यंत "एकसारखी शहरांत लूट, नासधूस आणि कत्तल चालू होती. जो म्हणून पुरुष सांपडेल त्याला ठार करण्यांत येई आणि बायकांना व मुलांना कैद करण्यात येई. ज्यांना जगांत कोठें तुलना नव्हती असे महमुदी राजांचे (म्हणजे महमुदाच्या वंशजांचे)

सर्व राजवाडे आणि मोठमोठीं बांधकामें नष्ट करून टाकण्यांत आलीं." असें हें मुसलमानांचें आपल्या मुसलमान बांधवाशींच वर्तन होतें. यामध्यें किंवा अफगाण राजांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत जे प्रकार घडले त्यांमध्यें, किंवा चेंगीजखानाच्या कारकीर्दींत इराणांत किंवा मध्य आशियांत झालेल्या विनाशामध्यें काळें-गोरें असें निवडण्यासारखें कांहीं नाहीं. आपला वकील शहाकडून मारला गेल्यामुळें चेंगीजखान ख्वाराजमच्या राज्यावर फारच संतापला होता. त्याच्या दृष्टीनें हा रक्ताचा सूड रक्तानें घेण्याचा मामला होता. चेंगीजखानानें दुसरीकडेही पुष्कळ नासधूस केली; परंतु मध्य आशियांतील या प्रदेशांत केली इतकी कांहीं ती मोठी म्हणतां येणार नाहीं.

शहरांचा नाश करण्याच्या पाठीमागें चेंगीजखानाचा आणखी एक उद्देश होता. त्याची प्रवृत्तीच भटक्याची होती. शहरें आणि नगरें यांचा त्याला तिटकारा होता. बिगरशेतीच्या माळावर किंवा प्रचंड मैदानावर राहणें त्याला प्रिय होतें. एकदां तर चीनमधील सर्वच्या सर्व शहरें नष्ट करून टाकलीं तर बरें होईल, असें त्याच्या मनानें घेतलें होतें. परंतु सुदैवानें तो विचार त्यानें सोडून दिला. सुधारलेली राहणी आणि भटकें जीवन यांचा संगम करावा अशी त्याची कल्पना होती. परंतु हें तेव्हां शक्य झालें नाहीं आणि केव्हांच शक्य होणारेंही नाहीं.

चेंगीजखानाच्या नांवावरून तुझी कदाचित् समजूत झाली असेल, कीं तो मुसलमान होता. परंतु तशी गोष्ट नाहीं. मोंगल लोकांमधील हें एक नाव आहे एवढेंच. चेंगीजखान हा धर्माच्या बाबतींत फार उदार वृत्तीचा मनुष्य होता. त्याचा जो कांहीं धर्म म्हणून होता त्याला शमावाद उर्फ शामाई धर्म (शाम-श्याम म्हणजे निळें आकाश) असें नांव असे. त्याच्यामध्यें अनंत नील आकाशाची पूजा ही मूलभूत गोष्ट होती. चीनमधील ताओपंथीय साधूंशीं त्याचे पुष्कळ वादविवाद झाले, परंतु तो शमा धर्मालाच चिकटून राहिला; आणि कोणत्याही संकटांत असतांना तो आकाश-देवाचा सल्ला घेत असे.

या पत्रांत सुरुवातीला मीं लिहिलेलें तुझ्या लक्षांत आलें असेल, कीं चेंगीज-खानाची बडा खान म्हणून मोंगल लोकांच्या सभेंत निवडणूक झाली. अर्थात् ही सभा म्हणजे खरोखर लोकसभा नव्हती; तर केवळ सरंजामदारांची सभा होती; आणि स्वतः चेंगीजखानही एका टोळीचा सरंजामदार – जमीनदार नायक होता.

तो स्वतः निरक्षर होता, तसेच त्याचे सर्व अनुयायीही निरक्षर होते. पुष्कळ काळपर्यंत लिहिण्याची म्हणून कांहीं कला आहे ही सुद्धां गोष्ट बहुतेक त्याला माहीत नव्हती. इकडून तिकडे निरोप पाठवावयाचे ते सर्व तोंडी असत; ते बहुधा पद्यांत आणि दृष्टान्तांच्या किंवा म्हणींच्या स्वरूपांत रचलेले असत. एवढ्या मोठ्या प्रचंड साम्राज्याचा सारा कारभार तोंडी निरोपांच्या द्वारा कसा चालत असेल, याचा विचार मनांत आला म्हणजे मोठाच अचंबा वाटतो. पुढें मग लिहिणें म्हणून कांहीं एक

प्रकार आहे असें जेव्हां चेंगीजखानाला समजलें, तेव्हां ही कला फार उपयुक्त आणि मौल्यवान् आहे असें तावडतोब त्याच्या मनानें घेतलें आणि आपल्या मुलांनीं व प्रमुख अम्मलदारांनीं ती शिकावी असा त्यानें हुकूम केला. तसेंच प्राचीन मंगोलियन व्यवहाराचे नियम सगळे लिहून ठेवले पाहिजेत; त्याचप्रमाणें आपले सर्व हुकूम किंवा सूचना याही लिहून ठेवल्या पाहिजेत असाही त्यानें हुकूम केला. कल्पना अशी होती, कीं हे जे त्याचे व्यवहाराचे नियम, रूढींचा कायदा होता हा अगदीं कधींही न बदलणारा असा शाश्वत कायदा (धर्म) होता, आणि कोणींही तो मोडतां कामा नये. खुद्द बादशहावरसुद्धां या कायद्याचें बंधन होतें. आज हा "शाश्वत—कधींही न बदलणारा कायदा" अस्तित्वांत नाहीं; आजकालच्या मोंगल लोकांनासुद्धां त्याची कांहींच आठवण नाहीं किंवा त्यांच्या आजच्या व्यवहारांतही त्यापैकीं कोणतींच परंपरा चालू नाहीं.

प्रत्येक देशाचा आणि प्रत्येक धर्माचा असा एक प्राचीन रूढीचा अलिखित आणि लिखितही कायदा असतो. आणि त्या त्या देशांत बहुतेक अशीच समजूत असते, कीं हा अगदीं "न बदलणारा कायदा" असून तो नित्य, यावच्चंद्रदिवाकरौ चालू राहणार आहे. कित्येकदां हा कायदा म्हणजे एक प्रकारें परमेश्वराचा साक्षात्कार आहे असें मानलें जातें. आणि जें प्रत्यक्ष परमेश्वरानें मानवाला सांगितलें किंवा दिलें त्यांत बदल होईल किंवा तें क्षणभंगुर नाशवंत असेल, असें समजणें शक्य नाहीं. परंतु कायदे खरोखर प्रचलित परिस्थितीशीं जुळते असावे लागतात, आणि त्यांच्या साहाय्यानें आपल्याला आपली सुधारणा करतां यावी असा त्यांचा उद्देश असतो. मग जेव्हां परिस्थिति बदलेल, तेव्हां जुने कायदे परिस्थितीशीं जुळते कसे राहूं शकतील? बदललेल्या परिस्थितीबरोबर हे कायदेही बदलले पाहिजेत; नाहीं तर मग हे कायदे म्हणजे आपल्या गळ्याभोंवतींचा एक लोखंडी सांखळदंडच होऊन बसेल आणि जग पुढें कूच करीत असतां हा सांखळदंड बांधून आम्हांला मागें खेंचून ठेवील. कोणताही कायदा मनुष्याच्या ज्ञानावर आधारलेला असला पाहिजे; आणि जसें ज्ञान वाढत जाईल तशी त्या कायद्याचीही वाढ झाली पाहिजे.

चेंगीजखानाबद्दल मीं तुला कदाचित् वाजवी होती त्यापेक्षां थोडी अधिक माहिती किंवा अधिक तपशील सांगितले आहेत असें म्हणतां येईल. परंतु कांहीं म्हणा मला त्या माणसाचें मोठेंच कौतुक वाटतें. किती विचित्र गोष्ट आहे नव्हे ही, कीं या भयंकर, क्रूर आणि अत्याचारी अशा एका भटक्या टोळीच्या सरंजामशाही नायकानें माझ्यासारख्या शांतताप्रिय, अहिंसावादी, शहरांत राहणाऱ्या आणि सरंजामशाहींतील एकूण एक गोष्टींचा तिटकारा करणाऱ्या एका मृदुवृत्तीच्या माणसाचें मन मोहून टाकावें!

मोंगल लोक सर्व जगावर प्रभुत्व मिळवितात

२६ जून, १९३२

चेंगीजखानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा ओघताई (ओघ्तै) हा कागान म्हणजे बडा खान झाला. चेंगीजखान आणि त्या काळचे मोंगल लोक यांच्या मानानें पाहतां हा दयाळू आणि शांततापिय वृत्तीचा मनुष्य होता. तो नेहमीं म्हणत असे, " आमचा कागान चेंगीज यानें आमची बादशाही गादी मोठ्या श्रयासानें स्थापन केली. आतां लोकांनां कांहीं काळ शांततेचा आणि सुखाचा जावा आणि त्यांच्यावरील अवघड ओझीं कमी व्हावीं असें करण्याची वेळ आलेली आहे. " पाहा, त्याचा सगळा विचार कसा आपलें सरंजामशाहीप्रभुत्व आणि आपली टोळी यांच्यापुरताच मर्यादित आहे.

परंतु मोंगलांच्या मुलूखगिरीचा काळ अद्यापि संपलेला नव्हता ; अजून त्यांच्यांतील उत्साह उरूळून बाहेर येतच होता. त्यांचा एक अत्यंत मोठा सेनापति साबुताई (साबुतै) याच्या नेतृत्वाखालीं त्या लोकांनीं यूरपवर पुन्हां एक स्वारी केली. शत्रूच्या प्रदेशांतील सर्व भेद काढून आणण्यासाठीं हेर आणि आपले आघाडीचे कार्यकर्ते गुप्तपणें पाठवून त्यानें आपली सगळी पूर्वतयारी मोठ्या सावधपणानें केली होती ; त्या त्या देशावर चालून जाण्यापूर्वी तेथील राजकीय आणि लष्करी परिस्थितीचें यथातथ्य ज्ञान त्यानें करून घेतलेलें होतें. रणांगणावर तर तो युद्धशास्त्रामध्यें अत्यंत श्रेष्ठ मुरब्बी असा सेनानी होता ; त्याच्या मानानें यूरपीय राष्ट्रांतील सेनापती म्हणजे युद्धकलेंतील ओनामा शिकूं लागलेलीं नुसतीं पोरें होतीं. आग्नेयीकडे बगदाद आणि सेल्जुक तुर्क यांना धक्का न लावतां साबुताई थेट राशियावर चालून गेला. सहा वर्षें त्याची ही स्वारी पुढें पुढें कूच करीतच होती. या दरम्यान त्यानें मॉस्को, कीव्ह, पोलंड, हंगेरी, क्रॅकौ या प्रांतांत लूटमार करून तेथें संपूर्ण नाश केला. इ. स. १२४१ मध्यें एका पोलिश आणि जर्मन सैन्याचा मध्य यूरपांतील खालच्या सायलेशिया प्रांतामध्यें लिबनीझ येथें संपूर्ण उच्छेद करण्यांत आला, त्या क्षणीं साऱ्या यूरप खंडाची अखेरची घटका भरली असें वाटूं लागलें. मोंगल लोकांना अटकाव करूं शकेल, असा कोणीच शिल्लक राहिलेला दिसेना. दुसऱ्या फ्रेडरिकला त्या वेळीं जगांतील आश्चर्यें म्हणत असत. परंतु मंगोलिआमधून आलेल्या या खऱ्या आश्चर्यांच्या पुढें तो बिचारा अगदींच फिक्का पडला असेल. यूरपांतील सर्व राजेमहाराजे यांची अगदींच फें फें उडाली होती. अशा वेळीं एकाएकीं त्यांच्यावरील हें संकट टळलें.

इकडे ओघताई मरण पावल्यामुळें त्याच्या पाठीमागून गादी कोणाला मिळावयाची याच्याबद्दल थोडीशी मानगड उपास्थित झाली होती. त्यामुळें यूरपांतील मोंगल सैन्यें त्यांचा तेथें पराभव झाला नव्हता तरी परत फिरलीं आणि इ. स. १२४२

मध्यें आपल्या मायभूमीकडे निघून आलीं. यूरप खंडाचा गेलेला श्वास जणुं पुन्हां परत आला.

दरम्यान इकडे चीनमध्यें मोंगल लोक लांबपर्यंत पसरले. उत्तरेकडील किन राजांचा तर त्यांनीं संपूर्ण नाश केला होताच; तसाच दक्षिणेंतील सुंग राजांचाही केला. १२५२ मध्यें मंगू खान हा कागान – प्रमुख खान – झाला, त्यानें कुबलाई खान याला चीनचा गव्हर्नर – प्रांताधिप – नेमलें. मंगूच्या काराकोरम येथील दरबारामध्यें आशिया आणि यूरप खंडांतील लोकांचा मोठाच मेळावा जमा होत असे. तरी पण भटक्ये लोकांच्या रूढीप्रमाणें अजूनही कागान हा तंबूंतच राहत असे. परंतु आतां हे तंबू मोठे भरदार झालेले होते; दोन खंडांतून लुटून आणलेल्या संपत्तीनें ते गडगंज भरलेले आणि शोभायमान् झाले होते. आतां तेथें व्यापारी लोक आपला माल खपाविण्यासाठीं येऊं लागले; यांत मुसलमान व्यापाऱ्यांचाच भरणा अधिक असे. त्यांना असें आढळून आलें, कीं मोंगल लोकांत आतां चांगलेंच भक्कम गिऱ्हाईक निर्माण झालेलें आहे. जणुं साऱ्या जगावर स्वामित्व गाजविणाऱ्या त्या तंबूंच्या शहारांत आतां कारागीर येऊं लागले, फलज्योतिषी येऊं लागले, गणितशास्त्रज्ञ येऊं लागले, तसेंच तत्कालीन शास्त्रांच्या प्रयोगांशीं लुडबूड करणारे लोकही येऊं लागले; या प्रचंड मोंगल साम्राज्यामध्यें एक प्रकारची शांतता आणि सुव्यवस्था नांदूं लागली; आणि या खंडांतून त्या खंडांत जाण्यायेण्याचे उंटांच्या तांड्यांचे मार्ग आतां जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांनीं गजबजून गेले. यूरप आणि आशिया खंड यांचे परस्पर-संबंध अधिक दृढ होत गेले.

आणि मग काराकोरम येथें निरनिराळ्या धर्मांच्या लोकांमध्यें मोठी शर्यत चालू झाली. जग जिंकणाऱ्या या लोकांना खास आपल्या छापाच्या धर्माकडे वळवून घ्यावें असा ज्याचा त्याचा उद्देश होता. ज्या कोणत्या धर्माला या सर्व सामर्थ्यवान् लोकांना आपल्या बाजूकडे वळवितां येईल, तो धर्म बाकीच्या सर्व धर्मांवर पूर्ण मात करून सर्व जगांत अत्यंत बलिष्ठ धर्म होऊन बसेल हें स्पष्ट होतें. त्यामुळें पोपनें आपले प्रतिनिधी रोमहून येथें पाठविले; नेस्टोरियन ख्रिश्चन लोकही तेथें आले; मुसलमानही आले; त्याचप्रमाणें बुद्धधर्मीय लोकही आले. परंतु मोंगल लोकांना एखाद्या नव्या धर्माचा स्वीकार करण्याची मुळींच घाई सुटलेली नव्हती. इतके ते मुळीं फारसे धर्माच्या आहारीं गेलेले लोकच नव्हते. असें दिसतें, कीं एकदां ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करावा या कल्पनेच्या नादीं कागान थोडासा लागला होता; परंतु त्या धर्मांतील पोपचा जो सत्तेबद्दलचा दावा होता तो त्याला सहन झाला नाहीं. अखेरीस मोंगल ज्या ज्या देशांत जाऊन वसाहत करून स्थिर झाले, त्या त्या देशांतील धर्मांत ते असेच सामील झाले. चीन आणि मंगोलिया यांमध्यें त्यांच्यापैकीं बहुतेक लोक बुद्धधर्मी झाले; मध्य आशियांत ते मुसलमान झाले; आणि रशिया आणि हंगेरीमध्यें कांहीं जण ख्रिस्ती झाले.

रोम येथील पोपच्या व्हॅटिकन राजवाड्यांतील ग्रंथालयामध्यें बडे खां कागान मंगू यानें पोपला लिहिलेलें एक अस्सल पत्र अद्यापिही अस्तित्वांत आहे. तें आरबी भाषेंत

आहे. ओघताईच्या मृत्यूनंतर नव्या बड्या खानाकडे पोपनें आपला प्रतिनिधि पाठवून तूं यूरपवर पुन्हां स्वारी करतां कामा नये असें त्याला बजाविलें असावें असें दिसतें. कारण खानानें असें उत्तर दिलें आहे, कीं आम्हीं यूरपवर स्वारी केली याचें कारण यूरपांतील लोक आमच्याशीं चांगल्या रीतीनें वागत नाहींत हें आहे.

मंगूच्या कारकीर्दीत आणखी एक मुलूखगिरीची आणि नासधुशीची लाट उसळली. मंगूचा भाऊ हुलगू हा इराणचा प्रांताधिप होता. बगदादच्या खलिफांच्या कोणत्या तरी कृत्यानें चिडून जाऊन त्यानें त्याला संदेश पाठवून खलिफा आपलीं वचनें पाळीत नाहीं याबद्दल खलिफाची त्यानें निर्भर्त्सना केली आणि यापुढें जर खलिफा नीट वागणार नाहीं, तर त्याच्यावर साम्राज्य गमाविण्याची पाळी येईल असें त्याला बजाविलें. खलिफा हा फारसा शहाणा मनुष्य नव्हता; अनुभवानेंही त्याचे डोळे उघडत नव्हते. त्यानें उलट उपमर्दकारक उत्तर पाठविलें आणि मोंगलांच्या वकिलांचा बगदाद शहरांत लोकांच्या जमावानें अपमान केला. त्यामुळें हुलगूचें मोंगल रक्त सळसळून गेलें. रागाच्या भरांत तो बगदादवर चालून गेला आणि चाळीस दिवसांच्या वेढ्यानंतर त्यानें तें शहर जिंकून घेतलें. आपल्या अरोबेयन नाइटस्मधील त्या शहराच्या वैभवाचा अशा रीतीनें अंत झाला आणि ५०० वर्षें चाललेल्या साम्राज्याच्या अमदानींत तेथें जमा झालेली सर्व अगणित संपत्ति तेथून नाहींशी झाली. खलिफा, त्याचे मुलगे, त्याचे जवळचे नातेवाईक या सर्वांना ठार करण्यांत आलें. कित्येक आठवडेपर्यंत सर्वसामान्य लोकांची कत्तल चालूच होती; त्यांच्या रक्तानें तैग्रीस नदीचें पाणी कित्येक मैलपर्यंत लाल होऊन गेलें. या कत्तलींत पंधरा लक्ष लोक प्राणांस मुकले असें म्हणतात. तेथील सर्व कारागिरीचे आणि वाङ्मयाचे संग्रह आणि ग्रंथालयें पार नष्ट करून टाकण्यांत आलीं. बगदाद शहर संपूर्णपणें धुळीस मिळविण्यांत आलें. पश्चिम आशियांतील एक हजार वर्षांचें तें प्राचीन पाटबंधाऱ्याचें कामसुद्धां हुलगूनें नष्ट करून टाकलें.

अलेप्पो, इडेस्सा या आणि इतर पुष्कळ शहरांवर हाच प्रसंग ओढवला आणि साऱ्या पाश्चिम आशियावर संकटाच्या अंधकाराची कृष्ण छाया पसरली. त्या काळचा एक इतिहासकार म्हणतो कीं, "हा शास्त्रें आणि सद्गुण यांच्या दुष्काळाचा – नापिकीचा – काळ होता. मोंगलांचें एक सैन्य पॅलेस्टाइनमध्यें गेलें होतें. तेथें मात्र त्याचा ईजिप्तचा सुलतान बायबर्स यानें पराभव केला. या सुलतानाच्या पदरीं बंदूकवाल्या म्हणजे अग्नियुक्त हत्याराच्या सैनिकांचें एक पथक होतें; त्यावरून त्याला बंदूकदार असें गमतीचें आडनांव मिळालें होतें. या सुमारास आतां आपण या असल्या आगवाल्या हत्यारांच्या काळांत प्रवेश करतों. चिनी लोकांना फार पूर्वीपासून बंदुकीच्या दारूची माहिती होती. त्यांच्याचकडून बहुधा मोंगल लोक ही कला शिकले असावे; या आगवाल्या हत्यारांच्या बळावर त्यांना एवढाले विजय मिळवितां आले असावेत. या मोंगल लोकांच्याकरवींच यूरपमध्यें आगवाल्या हत्यारांचा प्रवेश झाला.

इ. स. १२५८ मध्यें बगदादचा नाश झाल्यावर आब्बासी साम्राज्य जें काय उरलें सुरलें होतें तें अखेरचें नष्ट झालें. त्याबरोबरच पश्चिम आशियामध्यें आरबी लोकांची जी एक विशिष्ट संस्कृति व सुधारणा होती तिचाही अंत झाला. लांब तिकडे स्पेनमध्यें ग्रॅनाडाच्या राज्यांत आरबी सुधारणेच्या परंपरेचा एक धागा अद्यापि चालू होता. त्याचाही अखेरचा नाश होईपर्यंत यापुढें अजून दोनशें वर्षें जायचीं होतीं. खुद्द अरबस्तानचें महत्त्व मात्र झपाट्यानें कमी होत गेलें आणि तेव्हांपासून त्या देशांतील लोकांनीं इतिहासांत कोणतीही महत्त्वाची कामगिरी केलेली नाहीं. पुढें हा देश व तेथील लोक उस्मानी तुर्कांच्या साम्राज्यांत सामील झाले. १९१४-१८ च्या महायुद्धांत इंग्रजांच्या उठावणीवरून आणि त्यांच्या साहाय्यानें आरबी लोकांनीं तुर्कांविरुद्ध बंड केलें आणि तेव्हांपासून अरबस्तान हा एक थोडाफार स्वतंत्रसा देश झालां आहे.

बगदादचा नाश झाल्यावर दोन वर्षें कोणी खलिफाच नव्हता. नंतर ईजिप्तचा सुलतान बायबर्स यानें शेवटच्या आब्बासी खलिफाच्या एका नातेवाइकाला खलिफा म्हणून नेमलें. परंतु हा खलिफा फक्त धर्मप्रमुख होता; त्याच्या हातीं राजकीय सत्ता कसलीही नव्हती. त्यानंतर तीनशें वर्षांनीं त्या परंपरेंतील शेवटच्या खलिफाच्या हातून तुर्की सुलतानांनाच खलिफा ही पदवी प्राप्त झाली. अलीकडे कांहीं वर्षांपूर्वीच मुस्तफा कमालपाशानें तुर्कस्तानांतून सुलतान आणि खलिफा या दोहोंचीही इतिश्री केली. तेथपर्यंत तुर्कस्तानचे सुलतान हेच मुसलमानांचे खलिफाही असत.

परंतु हो, कथेचें अनुसंधान सोडून मी हा दुसरीकडेच भटकत चाललों. मंगू खान हा इ. स. १२३९ मध्यें मरण पावला. मृत्यूपूर्वी त्यानें तिबेट देश जिंकला होता. त्याच्या मागून चीनचा प्रांताधिप कुब्लाईखान हा बडा खान – कागान – झाला. कुब्लाईखान आतांपर्यंत फार वर्षें चीनमध्यें राहत आला होता; त्यामुळें त्याचें मन त्या देशांत रमलें होतें. म्हणून आपली राजधानी काराकोरम येथून उचलून त्यानें पेकिंग येथें नेली आणि त्या शहराचें नांव बदलून **खानबालीक** – खानांचें शहर – असें त्याला नवें नांव दिलें. चीनच्या स्थानिक कारभारांतच कुब्लाईखानाचें मन इतकें रमून गेलें, कीं त्यामुळें त्याचें आपल्या साम्राज्याकडे दुर्लक्ष झालें व हळूहळू जागोजागचे मोंगल प्रांताधिप स्वतंत्र झाले.

सर्व चीन देश जिंकून घेण्याचें काम कुब्लाईखानानें पूर्ण केलें. परंतु जुन्या मोंगल लोकांच्या स्वाऱ्यांपेक्षा त्याच्या स्वाऱ्या फार निराळ्या स्वरूपाच्या होत्या. त्यामध्यें क्रूरपणा फारच कमी प्रमाणावर होता आणि नासधूसही फारच कमी होती. चीन देशानें कुब्लाईखानाला पुष्कळ नरम करून सुधारलें होतें. चिनी लोकही त्याच्याशीं गोड वागूं लागले होते; आणि त्याला आपल्यापैकीं एक असें मानूं लागले होते. इतका कीं त्यानें प्रत्यक्ष एक चिनी सनातन्यांना–धार्मिक लोकांना–मान्य असा आपला राजवंश चीनमध्यें चालू केला; तो म्हणजे युआन राजवंश. कुब्लाईखानानें

टांगकिंग (टांकिन), अनाम (वैतनाम) आणि ब्रह्मदेश हे प्रदेश आपल्या चीनच्या साम्राज्यांत सामील करून घेतले. जपान आणि मॅलेशिया हेही जिंकण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु मोंगल लोकांना दर्यावर्दीपणाची संवय नव्हती यामुळें या प्रयत्नांत त्याला यश आलें नाहीं.

मंगूखानाच्या कारकीर्दीमध्यें त्याच्या दरबारांत फ्रान्सचा राजा नववा लुई याच्याकडून एका मजेदार राजकारणासाठीं एकदां वकील लोक आले होते. लुईची सूचना अशी होती, कीं मोंगल लोक आणि यूरपांतील ख्रिस्ती राज्यसत्ता यांच्यामध्यें मुसलमानांच्या विरुद्ध मैत्रीचा करार असावा. धर्मयुद्धामध्यें लुई जेव्हां कैद झाला होता, त्या वेळीं मुसलमानांच्या हातून त्या बिचाऱ्यावर फारच दुर्धर प्रसंग ओढवला होता. म्हणून तो हा तह करूं पाहत होता. परंतु मोंगल लोकांची असले तह करण्याकडे प्रवृत्ति नव्हती; त्याचप्रमाणें कोणाही लोकांवर केवळ ते अमुक एका धर्माचे आहेत एवढ्याचसाठीं हल्ला करण्याचीही त्यांची प्रवृत्ति नव्हती.

यूरपमधील असल्या क्षुल्लक राजेरजवाड्यांशीं त्यांनीं काय म्हणून अशा तऱ्हेचा तह करावा? आणि कोणाविरुद्ध? पाश्चिम यूरपमधील राज्यांच्या काय किंवा मुसलमानी राज्यांच्या काय, लढाऊ प्रवृत्तीचें त्यांना मुळींच भय वाटत नव्हतें. त्यांच्या कचाट्यांतून पश्चिम यूरप खंड बचावलें तें केवळ योगायोगानें. सेल्जुक तुर्कांनीं तर त्यांच्यापुढें मान वांकवून त्यांना खंडणीही देण्यास सुरवात केली होती. मोंगल सैन्याचा पराभव असा आजपर्यंत काय तो ईजिप्तच्या सुलतानानें केला होता; परंतु त्यांनीं तसाच खास मनापासून प्रयत्न केला असता, तर त्यांनीं ईजिप्तच्या सुलतानालाही वांकविलें असतें यांत बिलकुल संशय नाहीं. आशिया आणि यूरप खंडाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मोंगल लोकांचें साम्राज्य पसरलेलें होतें. मोंगल लोकांनीं जे हे नानाविध देश जिंकले, त्यांच्याशीं तुलना करण्याजोगे विजय आजपर्यंत कोणीं इतिहासांत मिळविलेले नव्हते. कोणाचेंही एवढें प्रचंड साम्राज्य झालेलें नव्हतें. मोंगल लोक म्हणजे त्या काळीं साऱ्या जगाचे स्वामी असेच कोणालाही भासले असतील. हिंदुस्थान देश त्यांच्या साम्राज्यांतून स्वतंत्र होता तो केवळ मोंगल लोक त्या बाजूला फिरकले नव्हते एवढ्याचमुळें. यूरपचा हिंदुस्थानाच्याच आकाराचा पश्चिमेकडील तुकडाही या साम्राज्याच्या बाहेर होता. पण हे सगळे प्रदेश मोंगल लोकांच्या कृपेमुळेंच फक्त असे स्वतंत्र होते; आणि त्यांना गिळंकृत करून टाकण्याचें त्यांनीं मनांत आणलें नाहीं, तोंवरच त्यांच्या स्वतंत्रपणाची कथा चालावयाची होती. तेराव्या शतकांत असेंच कोणालाही वाटण्याजोगी मोंगलांची सद्दी व शक्ति होती.

परंतु मोंगल लोकांची ही प्रचंड उत्साहशक्ति हळूहळू कमी होत गेलीसें दिसतें. देश जिंकीत जाण्याची त्यांची स्फूर्ति मावळत गेली. एक गोष्ट तूं लक्षांत ठेवली पाहिजे, कीं त्या काळीं लोकांची हालचाल पायीं किंवा फार तर घोड्यावरून होत असल्यामुळें फारच हळूहळू होत असे. दळणावळणाचीं याहून वेगाचीं साधनें त्या काळीं

नव्हतीं. मंगोलियांतील आपल्या मायभूमींतून निघून यूरपांतील आपल्या साम्राज्याच्या पाश्चिम सरहद्दीपर्यंत पोंचावयाला त्यांच्या सैन्याला एक वर्षाचा प्रवास करावा लागे. आपल्याच साम्राज्यांतून हा एवढा प्रचंड अवघड प्रवास करावयाचा, त्यामुळें वाटेंत लूटमार करण्याचीही मुळींच संधि नसावयाची; इतकी कांहीं त्यांची देश जिंकण्याची प्रवृत्ति तीव्र नव्हती, कीं यांनीं असा बिगरलुटीचा हा प्रवास करण्यास तयार व्हावें. शिवाय, लढाईमध्यें आणि लूटमारीमध्यें एकसारखें आतांपर्यंत जयच येत गेल्यामुळें मोंगल लोकांजवळ भलीमक्कम लूट सांठली होती. त्यांच्यापैकीं पुष्कळांजवळ गुलाम-सुद्धां जमा झालेले असावेत. त्यामुळें जरा थंडावून ते आतां शांतपणाच्या आणि बिनदगदगीच्या राहणीकडे झुकूं लागले होते. मनुष्याला एकदां हवें असेल तें सगळें पोटभर मिळालें, म्हणजे मग तो शांतता आणि सुव्यवस्था यांचा फार मोठा भक्त बनतो.

एवढ्या ह्या प्रचंड मोंगल साम्राज्याचा कारभार करणें हें मोठेंच बिकट काम असलें पाहिजे. तेव्हां या साम्राज्याचे फुटून भाग पडायला सुरुवात झाली यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कुब्लाईखान हा १२९२ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर कोणीही बडा खां कागान झाला नाहीं. आणि मोंगलांच्या साम्राज्याचे पांच मोठे विभाग झाले ते असे :—

(१) चीनचें साम्राज्य; यांतच मंगोलिया, मांचूरिया आणि तिबेट यांचा समावेश होता. साम्राज्याचा हा प्रमुख विभाग असून कुब्लाईखानानें प्रस्थापित केलेल्या युआन राजवंशाचें तेथें राज्य होतें;

(२) तिकडे दूर पश्चिमेला रशिया, पोलंड व हंगेरीमध्यें मोंगलांच्या सोनेरी सेनेचें राज्य होतें. मोंगलांना तिकडे **सोनेरी सेना** (Golden Horde) म्हणत असत;

(३) इराण, मेसापोटेमिया, आणि मध्य आशियाचा कांहीं भाग या ठिकाणीं इल्खानाचें साम्राज्य होतें. हुलगूखानानें हें साम्राज्य स्थापन केलें होतें आणि त्यालाच सेल्जुक तुर्क खंडणी देत असत;

(४) मध्य आशियांत तिबेटच्या उत्तरेला वृहत् तुर्कस्तान या नांवानें प्रसिद्ध असलेला प्रदेश होता; तेथें झगताई शाखेचें राज्य होतें; आणि

(५) मंगोलिया आणि सोनेरी टोळीचें राज्य यांच्या दरम्यान मोंगल लोकांचें सायबेरियांतील एक साम्राज्य होतें तें पांचवें.

अशा रीतीनें त्या महान् मोंगल साम्राज्याचे जरी विभाग पडले असले, तरी त्यांपैकीं प्रत्येक विभाग म्हणजे एकेक बलिष्ठ साम्राज्यच होतें.

६९

महान् प्रवासी मार्को पोलो

२७ जून, १९३२

मोंगलांच्या बडे खानाच्या – कागानच्या काराकोरम येथील दरबाराबद्दल, म्हणजे त्या दरबारांत मोंगल लोकांची कीर्ति आणि त्यांच्या विजयाचें तेज यांविषयीं आकर्षण वाटून व्यापारी, कारागीर, विद्वान् लोक, धर्मप्रचारक यांचे तांडेच्या तांडे कसे जमा होत असत याविषयीं, मीं तुला सांगितलें आहे. अशा लोकांनीं आपल्या दरबारीं यावें या गोष्टीला मोंगल लोक उत्तेजन देत असत, हेंही अशी मंडळी तेथें जमण्याचें एक कारण होतें. हे मोंगल लोक म्हणजे विलक्षण लोक होते. कांहीं बाबतींत ते अतिशय चतुर आणि हुषार होते, तर कांहीं बाबतींत अगदींच पोरकट होते. त्यांचा तो क्रूरपणा आणि अत्याचारीपणा इतका जरी अंगावर शहारे आणण्याजोगा होता, तरी त्यांच्यांतही एक प्रकारचा थोडा पोरकटपणाचा अंश होता. मला वाटतें, कीं त्यांच्यामधील या पोरकटपणामुळेंच हे भयंकर योद्धेही एवढे आकर्षक भासतात. कितीएक शतकांनंतर या मंगोलियनांपैकीं – आपण हिंदुस्थानांत त्यांना मोंगल म्हणतों – एकानें हिंदुस्थान देश जिंकला. त्याचें नांव बाबर. याची आई चेंगीजखानाच्या घराण्यांतील होती. हिंदुस्थान जिंकून झाल्यावरही त्याला काबूल येथील आणि त्याच्या उत्तरेकडील प्रदेशांमधील थंडगार हवा, फुलें, बागा, कलिंगडें यांच्याबद्दल मनांत नेहमीं हळहळ वाटत राहिली. हा मोठा गोड स्वभावाचा मनुष्य होता; आणि त्यानें ज्या आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत, त्यावरून आजच्या घटकेलासुद्धां तो एक मोठा मोहक आणि भला माणूस होता अशीच वाचणाराची भावना होते.

तेव्हां मी सांगत काय होतों, कीं परदेशांतून आपल्या दरबारांत भेटीला लोक यावेत या गोष्टीला हे मंगोलियन – मोंगल – लोक उत्तेजन देत असत. नवीन ज्ञान पैदा करावें अशी इच्छा त्यांना होती आणि या परदेशस्थ पाहुण्यांकडून पुष्कळ गोष्टी शिकून घ्याव्या असा त्यांचा उद्देश असे. मागें मीं सांगितलेलें आठवतच असेल तुला, कीं चेंगीजखानला लिहिणें म्हणून कांहीं प्रकार आहे ही गोष्ट समजतांक्षणींच या कलेचें खरें मर्म त्याच्या लक्षांत आलें आणि ती कला शिकण्याबद्दल आपल्या अम्मलदारांना त्यानें हुकूम केला. त्यांची बुद्धि नवीन संस्कार करून घेण्याला समर्थ होती, त्यांच्या मेंदूचीं दारें खुलीं होतीं. दुसऱ्यापासून शिकण्याला त्यांची तयारी होती. कुब्लाईखान पेकिंगमध्यें स्थिरस्थावर जेव्हां झाला आणि एक महान् प्रतिष्ठित चिनी बादशहा असें त्याला स्थान प्राप्त झालें, त्यानंतर परकी देशांतील प्रवाशांना आपल्या दरबारीं येण्याबद्दल त्यानें फार प्रोत्साहन दिलें. त्यामध्यें त्याच्याकडे व्हेनिस येथील दोन व्यापारी लांबचा प्रवास करून आले. निकोलो पोलो, आणि मॅफिओ पोलो

असे हे दोघे भाऊ होते. व्यापारधंद्याच्या शोधार्थ ते थेट बुखारापर्यंत येऊन पोंचले होते. तेथें इराणमध्यें हुलगू राजाकडे कुब्लाईखानानें पाठवलेले कांहीं वकील त्यांना भेटले. त्यांनीं त्यांचें मन आपल्या तांड्याला मिळण्यासाठीं वळविलें आणि अशा रीतीनें त्या वकिलांबरोबर पेकिंग येथील बडे खानाच्या दरबारीं ते येऊन पोंचले.

कुब्लाईखानानें निकोलो आणि मॅफिओ यांचें फार चांगलें स्वागत केलें; आणि त्यांनीं त्याला यूरप खंड, ख्रिस्तीधर्म व पोप यांबद्दल माहिती सांगितली. ही माहिती ऐकून कुब्लाईखानाच्या मनावर फार परिणाम झाला आणि त्याच्या मनाचा कल ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्याकडे झुकला. या पोलोबंधूंना कुब्लाईखानानें इ. स. १२६९ मध्यें यूरपमध्यें परत पाठविलें व त्यांच्याबरोबर पोपला एक संदेश पाठाविला. त्यानें पोपला अशी विनंति केली, कीं बुद्धिमान्, सातीं कलांचें (विद्यांचें) ज्ञान असणारे आणि ज्यांना ख्रिस्ती धर्माचें समर्थन करण्याची शक्ति आहे असे शंभर शहाणे लोक आपल्याकडे पाठवावे. परंतु पोलोबंधू जेव्हां यूरपमध्यें परत आले, तेव्हां यूरप खंडाची आणि पोपची अवस्था कठिण झाल्याचें त्यांना आढळून आलें. त्यामुळें अशीं शंभर विद्वान् माणसेंच मिळणें अशक्य झालें. दोन वर्षें वाट पाहून मग दोन ख्रिस्ती फ्रायर्स – भिक्षू – बरोबर घेऊन ते परत पेकिंगला आले. येतेवेळेस त्यांनीं आपल्याबरोबर निकोलोचा मुलगा तरुण मार्को यालाही आणलें होतें, ही गोष्ट आपल्याला सगळ्यांत जास्त महत्त्वाची आहे.

हे तिघे पोलो या प्रचंड प्रवासाला निघाल्यानंतर त्यांनीं जमिनीच्या रस्त्यानें सारें आशिया खंड या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ओलांडलें. केवढा प्रचंड आणि अवघड प्रवास होता तो सारा! आजसुद्धां हे पोलो ज्या मार्गानें आले त्या मार्गानें प्रवास करावयाचा म्हटलें, तर जवळजवळ एक वर्षाचा काळ लागेल. प्रथम ते पॅलेस्टाइनमधून आर्मीनियांत गेले; तेथून मेसापोटेमियांतून इराणच्या आखातांत गेले. त्या ठिकाणीं त्यांना कांहीं हिंदी व्यापारी भेटले. त्यानंतर इराण ओलांडून ते बाल्ख प्रांतांत गेले, तेथून पर्वत ओलांडून पलीकडे काशगडला पोंचले; मग खोतान येथें आणि नंतर लोपनोर उर्फ चंचल तलावाशीं पोंचले. त्यानंतर पुन्हां तें निर्जन नापीक मैदान; तें ओलांडून मग ते चीनच्या पिकाऊ रानांत आणि तेथून पेकिंगला पोंचले. त्यांच्याजवळ या सर्व प्रवासामध्यें बिनहरकत चालणारा एक सदर परवाना होता; खुद्द बडे खानानें – कागाननें दिलेली हुकमाची सोन्याची चीप त्यांच्याजवळ होती.

प्राचीन रोमच्या साम्राज्याच्या काळीं सीरिया आणि चीन यांच्यामध्यें उंटांच्या तांड्यांचा हाच मार्ग होता. स्वीडनमधील संशोधक आणि प्रवासी स्वेन हेडिन यानें गोबीच्या मैदानांतून अलीकडे जो प्रवास केला त्याबद्दलचें वर्णन मीं नुकतेंच वाचलें. पेकिंग येथून निघून तो पश्चिम दिशेनें चालूं लागला; मैदान ओलांडून तो लोपनोर तलावाशीं आला, तेथून खोतानला गेला आणि तेथून मग पुढें चालूं लागला. प्रवासांत त्याच्याजवळ सर्व प्रकारची आधुनिक साधनसामग्री होती; आणि तरीसुद्धां त्याच्या

या स्वारींत त्याला पुष्कळ अडचणी आणि यातना सोसाव्या लागल्या. पोलो त्रिवर्गांनीं ७०० वर्षांपूर्वीं आणि ह्युएन चँगनें १३०० वर्षांपूर्वीं या मार्गानें प्रवास केला, त्या वेळीं केवढें भयंकर स्वरूप असेल त्या प्रवासाचें. स्वेन हेडिननें एक मौजेचा शोध लावला आहे. त्याला असें आढळून आलें आहे, कीं लोपनोरच्या तलावाची जागाच बदलली आहे. पुष्कळ काळापूर्वी, चवथ्या शतकांत, या तलावांत येऊन वाहणाऱ्या तारीन नदीचा प्रवाह बदलला आणि ताबडतोब वालुकामय मैदानांतील वाळूनें, नदीनें सोडलेला पहिला मार्ग भरून गेला. त्यामुळें तेथील त्या प्राचीन लौलान शहराचा बाहेरच्या जगाशीं अजीबात संबंध तुटून गेला, आणि तेथील रहिवाशांना एकाकी होऊन नाशाप्रत जावें लागलें. नदीचा प्रवाह बदलल्यामुळें अर्थातच तलावाचेंही स्थान बदललें; त्याबरोबर जुन्या उंटांच्या तांड्यांचा आणि व्यापाराचा मार्गही बदलला. स्वेन हेडिनला असें आढळून आलें कीं, अगदीं अलीकडे, कांहीं थोड्याच वर्षांपूर्वीं, तारीन नदीचा ओघ पुन्हां एकवार बदलला आहे आणि पूर्वीच्या ओघाच्या जागीं गेला आहे. त्याच्या पाठोपाठ तलावाचेंही स्थान पहिल्या ठिकाणीं गेलें आहे. पुन्हां आतां तारीन नदी पहिल्याप्रमाणें, पण आतां मोडून पडलेल्या लौलान शहराच्या बाजूनें वाहूं लागली असून आतां पुन्हां तो पूर्वीचा, १६०० वर्षें नांवा-पुरता पडून राहिलेला जुना तांड्यांचा मार्ग प्रचारांत येण्याचा संभव आहे. तारीन नदी आणि लोपनोरचा तलाव यांच्या या हिंडतीची ही एवढी हकीकत जी मीं तुला सांगितली आहे, ती पाण्याचे मार्ग बदलून किती मोठ्या अंतरावर जातात व त्यामुळें इतिहासाच्या ओघावरही कसा परिणाम होतो याची तुला थोडीशी कल्पना यावी, या हेतूनें. आपण पाहिलें आहे, कीं त्या प्राचीन काळीं मध्य आशियाचा प्रदेश लोकवस्तीनें नुसता गजबजलेला होता; त्यांतील लोकांच्या लाटांवर लाटा पश्चिमेकडे आणि दक्षिणे-कडे जाऊन प्रदेश काबीज करीत होत्या. आज पाहावें तर तेथें सगळें वैराण रान आहे; उगीच कोठें तुरळक लोकवस्ती आणि थोडींशीं गांवें आढळतात. संभव असा आहे, कीं त्या प्राचीन काळीं या प्रांतांत हल्लींपेक्षां पाणी फार विपुल होतें आणि त्या-मुळें तेथें पुष्कळ लोकवस्तीचें पोषण होण्यासारखें होतें. पुढें हवा अधिकाधिक रुक्ष होत गेली आणि पाणीही कमी झालें; त्यामुळें लोकवस्तीही कमी होत जाऊन अखेरीस जवळजवळ नाहींशी झाली.

त्या काळच्या या लांबलांबच्या प्रवासांत एक फायद्याची गोष्ट होती. माणसाला त्यामध्यें एक किंवा अनेक नवीन भाषा शिकण्याला वेळ मिळे. त्रिवर्ग पोलोंना व्हेनिसहून पेकिंगपर्यंत पोंचण्यास साडेतीन वर्षें लागलीं; या दीर्घ अवधींत मार्कोनें मंगोलियन भाषेवर प्रभुत्व मिळविलें आणि चिनी भाषेवरही पण त्याच वेळीं त्यानें प्रभुत्व मिळविलें असावें असें दिसतें. कुब्लाईखानाची मार्कोवर फारच मर्जी बसली आणि मार्कोनें त्याच्या दरबारीं १० वर्षें नोकरी केली. खाननें त्याला प्रांताधिप करून चीनच्या निरनिराळ्या प्रदेशांत दरबारी कामगिरीवर पाठविलें. तरी पण मार्को आणि

त्याचा पिता यांना मायभूमीची फार ओढ लागली होती आणि व्हेनिसला जावें असें त्यांच्या फार मनांत होतें. तथापि, त्यासाठीं खानाची परवानगी मिळविणें इतकें सोपें काम नव्हतें. पण शेवटीं एकदां त्यांना परत जाण्याची संधि मिळाली. इराणमधील इल्खान साम्राज्याचा मोंगलवंशीय राजा हा कुब्लाईखानाचा चुलतभाऊ होता. त्याची बायको वारली. त्याच्या मनांतून लग्न करावयाचें होतें. परंतु आपल्या जातीच्या बाहेरच्या कोणा स्त्रीशीं लग्न करणार नाहीं असें त्याच्या बायकोनें त्याच्याकडून वचन घेतलेलें होतें. म्हणून आरगाननें (हें त्याचें नांव होतें) पेकिंग येथें कुब्लाईखानाकडे वकील पाठवून आपल्या जमातीपैकीं योग्य अशी स्त्री आपल्याकडे पाठवून देण्याबद्दल विनंति केली.

कुब्लाईखानानें एका तरुण मंगोलियन राजकुमारीची निवड केली; आणि तिच्याबरोबरच्या स्वारीमध्यें त्यानें त्रिवर्ग पोलोंचा समावेश केला. कारण ते प्रवासांत फार अनुभवी होते. चीनच्या दक्षिणेंतून जलमार्गानें ते प्रथम सुमात्रांत गेले 'आणि तेथें त्यांनीं कांहीं काळ मुक्काम केला. त्या वेळीं सुमात्रा बेटांत श्रीविजयाचें बुद्धधर्मीय साम्राज्य चालू होतें, पण आतां त्याचा संकोच होऊं लागला होता. सुमात्राहून ही मंडळी दक्षिण हिंदुस्थानांत गेली. दक्षिण हिंदुस्थानांतील पांड्यांच्या राज्यामधील कायळ या बंदराला मार्को पोलोनें भेट दिली होती हें मीं तुला मागेंच सांगितलें आहे. ती राजकुमारी, मार्को आणि त्यांच्याबरोबरचा परिवार यांनीं हिंदुस्थानांत बराच लांब मुक्काम केला. त्यांना पुढें जाण्याची विशेषशी घाई नव्हतीसें दिसतें; त्यामुळें त्यांना इराणला पोंचण्यास दोन वर्षांचा अवधि लागला. दरम्यान वधूची वाट पाहत बसलेले नवरदेवच मरण पावले. बाकी त्यानें वाटही पुष्कळच पाहिली म्हणा! शिवाय तो मेला यांत विशेष वाईट असें काहींच झालें नाहीं म्हटलें तरी चालेल. कारण त्या तरुण राजकुमारीचें मग अरगानच्या मुलाशीं लग्न झालें; आणि तोसुद्धां तिच्याहून बऱ्याच अधिक वयाचा होता.

त्रिवर्ग पोलो राजकन्येला तेथेंच सोडून कॉन्स्टान्टिनोपलच्या मार्गानें आपल्या मायदेशास परत गेले. ते व्हेनिस सोडून आले त्यानंतर चोवीस वर्षांनीं इ. स. १२९५ मध्यें ते पुन्हां व्हेनिसला पोंचले. त्यांना तेथें कोणीं ओळखलेंसुद्धां नाहीं. असें म्हणतात, कीं आपल्या जुन्या इष्टमित्रांवर आणि इतरही मंडळीवर आपल्या मोठेपणाचा परिणाम करण्यासाठीं म्हणून त्यांनीं एक मेजवानी दिली; आणि मेजवानी ऐन रंगांत आली असतांना आपले मळकट, गबाळे आणि रूंभरू कपडे त्यांनीं कापून उकलले. त्याबरोबर त्यांमधून हिरे, पांचू, लाल वगैरे प्रकारच्या मौल्यवान् रत्नांची नुसती धार लागून त्यांची भली मोठी रास झाली. तेव्हां पाहुणे मंडळी चकित होऊन गेली. इतकें होऊनसुद्धां चीन आणि हिंदुस्थानमधील आपल्या पराक्रमाबद्दल व धाडसी अनुभवांबद्दल पोलो मंडळी ज्या हकिगती सांगत त्यांवर फारसा कांहीं कोणाचा विश्वास बसत नसे. मार्को, त्याचा बाप, आणि चुलता हे वृथा अतिशयोक्ति करतात

असेंच त्या लोकांना वाटे. त्यांना आपल्या छोट्याशा व्हेनिसच्या लोकसत्ताक राज्याची तेवढी माहिती होती; त्यामुळें चीन आणि आशिया खंडांतील इतर देश यांच्या आकारांची आणि संपत्तीची त्यांना कल्पनासुद्धां करतां येईना.

तीन वर्षांनंतर इ. स. १२९८ मध्यें व्हेनिसनें जिनोआ शहराशीं युद्ध सुरू केलें. हीं दोन्ही राज्यें दर्यावर्दी राज्यें असून त्या दोहोंत फार स्पर्धा होती. त्यामुळें त्यांच्यांत फार मोठें आरमारी युद्ध झालें. त्यांत व्हेनिसच्या लोकांचा पराभव झाला आणि त्यांच्यापैकीं हजारों जणांना जिनोआच्या लोकांनीं कैद केलें. या कैद्यांमध्यें आपला मित्र मार्को पोलो हा होता. जिनोआ येथें तुरुंगांत बसून त्यानें आपल्या सर्व प्रवासाचें वृत्त लिहिलें; अथवा खरें म्हणजे तोंडानें सांगून लिहविलें. अशा रीतीनें 'मार्को पोलोचे प्रवास' हा ग्रंथ अस्तित्वांत आला.. तेव्हां, चांगलीं चांगलीं कामें करण्याला तुरुंग ही केवढी उपयोगी जागा आहे म्हणावयाची!

आपल्या प्रवास-वृत्तांतामध्यें मार्को पोलोनें विशेषतः चीन देश आणि त्यामध्यें त्यानें केलेले अनेक प्रवास यांचें वर्णन केलेलें आहे. त्याशिवाय कांहीं अंशीं सयाम, जांवा, सुमात्रा, सिलोन, दक्षिण हिंदुस्थान यांचेंही त्यानें वर्णन केलें आहे. त्यानें चीन देशाच्या मोठमोठ्या बंदरांचें वर्णन केलें आहे. या बंदरांमध्यें पौर्वात्य प्रदेशातील सर्व देशांतून येणाऱ्या जहाजांची नेहमीं गर्दी असे; त्यांतलीं कित्येक इतकीं मोठीं असत, कीं त्यावर ३०० ते ४०० पर्यंत खलाशी असत. चीन देशाचें वर्णन तो एक ऐश्वर्य-संपन्न आणि वैभवशाली फुललेला देश असें करतो; त्यामध्यें अनेक शहरें आणि नगरें होतीं; रेशमी काण्ड, जरीचें कापड आणि नाना तऱ्हेचे रेशमी तलम कपडे (टाफेटा) तेथें तयार होत असत; तेथें सुंदर द्राक्षांचे मळे आणि मनोहर पिकांची शेती आणि बागा असत; एकूण एक रस्त्यावर "प्रवाशांसाठीं अत्युत्कृष्ट धर्मशाळा" (उतारगृहें) असत. साम्राज्याचे संदेश व टपाल पोंचविण्यासाठीं खास जासुदांची एक प्रकारची व्यवस्था होती असें त्यानें म्हटलें आहे. जागोजाग घोडे बदलून हे संदेश किंवा टपाल चोवीस तासांत ४०० मैल इतक्या वेगानें जाऊं शकत असे. हा वेग खरोखरच फारच समाधानकारक म्हटला पाहिजे. त्यानें असेंही आपल्याला सांगितलें आहे, कीं चीनमधील लोक जमिनींतून काळे दगड खणून काढीत आणि लांकडांच्याऐवजीं या दगडांचा जळणासाठीं उपयोग करीत. याचा स्वच्छ अर्थ असा आहे, कीं ते लोक दगडी कोळशाच्या खाणी चालवीत असत आणि दगडी कोळसा जळणासाठीं वापरीत असत. कुब्लाईखानानें कागदी नाणेंही प्रचलित केलें होतें. म्हणजे काय तर आज करतात त्याप्रमाणें त्यानें कागदाच्या नोटा काढून त्याबद्दल सोनें देण्याची जिम्मेदारी पत्करली होती. ही मोठीच लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे; कारण त्यावरून आधुनिक काळच्याप्रमाणें व्यवहारांत पतीचा उपयोग करण्याची पद्धति त्यानें अंगीकारलेली होती असें दिसून येतें. चीनमध्यें प्रेस्टर जॉन नांवाच्या एका राज्यकर्त्याच्या अमलाखालीं एक ख्रिस्ती वसाहत होती हें मार्को पोलोनें लिहिलेलें पाहून यूरपांतील

लोकांना मोठा अचंबा वाटून तेथें खळबळही उडाली. मंगोलियामध्येंही काहीं नेस्टेरियन ख्रिस्ती बहुधा असावेत असें वाटतें.

जपान, ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान यांच्यासंबंधानेंही मार्कोनें लिहिलें आहे. त्यांत कांहीं गोष्टी त्यानें स्वतः पाहिलेल्या लिहिल्या आहेत, तर कांहीं ऐकलेल्या अशा लिहिल्या आहेत. मार्को पोलोचा हा प्रवासवृत्तांत त्या काळीं जसा मोठा मनोरंजक आणि अप्रतिम ग्रंथ वाटला तसाच तो आजही वाटतो. यूरपांतील लोक त्या वेळीं आपल्या एवढ्याशा बंदिस्त प्रदेशांत राहत होते; आणि आपसांमध्यें त्यांचीं क्षुद्र भांडणें चालू होतीं; मार्को पोलोच्या ग्रंथानें अशा त्या लोकांचे डोळे चांगलेच उघडले. त्यावरून त्यांना अखिल जगाच्या विशालत्वाची, संपत्तीची आणि जगांतील अनेक चमत्कृतींची यथार्थ कल्पना आली. त्यामुळें त्यांची कल्पनाशक्ति उसळूं लागली, त्यांच्यांतील साहसी वृत्तीला उत्थान मिळालें आणि त्यांच्यांतील द्रव्यलोभालाही चालना मिळाली. म्हणून मग त्यांचें लक्ष दर्यावर्दीपणाकडे अधिक लागलें. यूरप खंड आतां वाढीला लागलेलें होतें. त्यांतील नव संस्कृतीला स्वतःच्या पायानें चालतां येऊं लागलें होतें आणि मध्ययुगीन बंधनांतून सुटण्याची त्यांची धडपड सुरू झाली होती. प्रौढपणांत प्रवेश करूं पाहणाऱ्या युवकाप्रमाणें ते उत्साहानें भरून गेले होते. दर्यावर्दीपणाकडची ही जोराची प्रवृत्ति, संपत्ती व साहस यांच्यामागें लागण्याची धडपड यामुळेंच पुढें यूरपीय लोक अमेरिकेंत जाऊन पोंचले; ते केप ऑफ गुडहोपला वळसा घालून पॅसिफिकमधून हिंदुस्थानांत गेले, चीनमध्यें गेले, आणि जपानमध्यें गेले. समुद्र हा जगाचा राजमार्ग होऊन गेला, आणि या खंडापासून त्या खंडापर्यंत वाहणारे उंटांच्या तांड्यांचे मार्ग कमी महत्त्वाचे होऊन गेले.

मार्को पोलो गेल्यानंतर बडा खान कुब्लाई हा लवकरच मरण पावला. चीनमध्यें त्यानें जो युआन राजवंश स्थापन केला होता तो त्याच्या पाठीमागें फार काळ टिकला नाहीं. मोंगल लोकांची सत्ता झपाट्यानें ऱ्हास पावली आणि चिनी राष्ट्रीय लोकांची या परकी सत्तेविरुद्ध एक लाट उसळली. साठ वर्षांच्या आंत दक्षिण चीनमधून मोंगल लोकांना हांकलून लावण्यांत आलें आणि एक चिनी गृहस्थ नानकिंगचा बादशहा म्हणून प्रस्थापित झाला. त्यानंतर आणखी बारा वर्षांत इ. स. १३६८मध्यें युआन राजवंशाचा अखेरचा पाडाव झाला. आणि मोंगल लोकांना चीनच्या प्रचंड भिंतीच्या पलीकडे पिटाळून लावण्यांत आलें. आतां दुसरा एक मोठा चिनी राजवंश, तैमिंग या नांवाचा, रंगभूमीवर प्रवेश करतो. या राजवंशाचा अम्मल चीनमध्यें फार दीर्घ काळपर्यंत, जवळजवळ तीनशें वर्षें चालू राहिला; हा काळ चांगला राज्यकारभार, भरभराट आणि सुसंस्कृतपणा यासाठीं प्रसिद्ध समजला जातो. या काळांत परकी देश जिंकण्याचे किंवा साम्राज्यशाही पराक्रम करण्याचे मुळींच प्रयत्न झाले नाहींत.

चीनमधील मोंगल साम्राज्य मोडून पडल्याचा परिणाम यूरप आणि चीन यामधील संबंध तुटण्यामध्यें झाला. जमिनीवरील मार्ग या सुमारास सुरक्षित राहिलेले नव्हते आणि जलमार्ग अजून तितके चांगले प्रचारांत आले नव्हते.

रोमन धर्मपीठ लढाऊ बाणा स्वीकारतें

२८ जून, १९३२

चीनमध्यें शंभर विद्वान् लोक पाठविण्याबद्दल कुब्लाईखानानें पोपला निरोप पाठविलेला होता हें मीं तुला सांगितलेलें आहे. परंतु पोपला तसें कांहीं करतां आलें नाहीं. पोपची परिस्थिति त्या वेळीं फार कठिण होती. तुला आठवत असेल, कीं हा काळ म्हणजे दुसरा फ्रेडरिक बादशहा याच्या मृत्यूनंतरचा, ज्या वेळीं कोणी बादशहाच नव्हता असा इ. स. १२५० ते १२७३ पर्यंतचा काळ होय. मध्य यूरपची अवस्था त्या वेळीं फारच भयंकर होती; सगळीकडे बंडाळी माजलेली होती; दरोडेखोर लढवय्ये लोक जिकडे तिकडे लूटमार करीत होते. पुढें १२७३ मध्यें हॅप्सबर्ग घराण्यांतील रुडॉल्फ हा बादशहा झाला. परंतु त्यामुळें परिस्थिति फारशी कांहींच सुधारली नाहीं. इटली देश साम्राज्यांतून नाहींसा व्हायचा तो झालाच.

यूरपमध्यें राजकीय बंडाळीच माजून राहिली होती असें नव्हे; तर रोमन धर्मपीठाच्या दृष्टीनें पाहतां धार्मिक बंडाळीचीही सुरुवात या वेळेला होऊं लागली होती असें म्हणतां येईल. लोक आतां पहिल्याइतके धर्मपीठाच्या आज्ञा सरळ सुतासारखे मानीत नाहींसे झाले होते. ते आतां हें कां, तें कसें, असे प्रश्न विचारूं लागले होते; त्यांना आतां शंका सुचूं लागल्या होत्या. आणि धार्मिक बाबतींत शंका ही फार धोक्याची गोष्ट आहे. आपण यापूर्वीच पाहिलें आहे, कीं प्रत्यक्ष दुसरा फ्रेडरिक बादशहा हा चार-चौघां शेजाऱ्यांशीं वागावें इतक्या बेफिकीर रीतीनें पोपशीं वागूं लागला होता आणि पोपनें बहिष्कार पुकारला तरी त्याची त्याला क्षिति वाटत नव्हती. त्यानें पोपशीं लेखी वाद सुद्धां सुरू करण्याला कमी केलें नाहीं; आणि या वादांत पोपला कांहीं म्हणावें असें यशही आलें नाहीं. यूरपांत त्या वेळीं दुसऱ्या फ्रेडरिकप्रमाणें दुसरे आणखी पुष्कळ शंकित लोक असले पाहिजेत. दुसरे आणखी असे पुष्कळ लोक होते, कीं ज्यांना अशा कांहीं शंका नव्हत्या किंवा धर्मपीठाच्या अथवा पोपच्या अधिकाराबद्दल अगर मागणीबद्दल त्यांचा विरोध नव्हता; परंतु धर्मपीठाच्या मोठमोठ्या अधिकारी मंडळींत जो अनाचार आणि जी चैन माजली होती, तिचा मात्र त्यांना फार तिटकारा वाटत होता.

इकडे ख्रिस्ती धर्मयुद्धांमधील जोर मावळत जाऊन एक प्रकारचा अपेशाचाच कलंक त्यापासून पदरांत पडण्याचा प्रसंग आला होता. या युद्धाची सुरुवात केवढ्या मोठ्या उत्साहानें केली गेली होती; त्यांतून केवढ्या गोष्टी मिळविण्याची आशा राखलेली होती; परंतु त्यांपैकीं कोणतीच गोष्ट या युद्धांतून प्राप्त झाली नाहीं; अशा प्रकारच्या अपयशामुळें नेमका उलटा परिणाम घडत असतो. अशा रीतीनें धर्मपीठा-

विषयीं संपूर्णपणें समाधान व विश्वास मनांत न राहिल्यामुळें दुसरीकडून कुठून कांहीं आशेचा किंवा समाधानाचा किरण मिळतो का, हें पाहण्याची हळूहळू आणि अस्पष्टपणें लोकांची प्रवृत्ति होऊं लागली. परंतु या गोष्टीचा प्रतिकार धर्मपीठानें जबरदस्तीच्या मार्गानें केला; आणि लोकांना भयभीत करून, धाकदपटशा दाखवून, त्यांच्या मनावर धर्मपीठाची पकड कायम ठेवावयाची असे प्रकार त्यानें करण्यास सुरुवात केली. परंतु माणसाचें मन हें एक मोठें विचित्र प्रकरण आहे आणि याच्यापुढें पाशवी शक्तीचें हत्यार हें अगदींच दुबळें शस्त्र आहे, हें ते धर्मपीठाचे लोक विसरले. तेव्हां कोणाही व्यक्तीच्या किंवा गटाच्या अंतःकरणांतील सदसद्विवेकबुद्धीमध्यें उत्पन्न होणारी संशयाची हालचाल मुळांत दाबून टाकण्याची खटपट धर्मपीठानें सुरू केली; लोकांच्या मनांतील शंकांचें समाधान करण्यासाठीं तर्कशास्त्र किंवा बुद्धिवाद यांचा त्यांनीं अवलंब केला नाहीं; तर त्यासाठीं त्यांनीं दंडा आणि सूळ हे उपाय अमलांत आणले.

आतां आपण ज्या काळाबद्दल बोलतों आहों त्याच्या आधीं किती तरी वर्षें, इ. स. ११५५ मध्येंच, धर्मपीठाच्या कोपाचा प्रसाद इटलीमधील ब्रेशिया गांवांतील आर्नोल्ड नांवाच्या एका लोकप्रिय आणि तळमळीच्या धर्मोपदेशकाला सोसावा लागला. त्याला पकडून फांशीं देण्यांत आलें; नंतर त्याचा देह जाळून त्याची राख टायबर नदींत फेकून देण्यांत आली; हेतु असा, कीं ती रांखसुद्धां त्याचें स्मरण म्हणून कोणीं जवळ बाळगूं नये. शेवटपर्यंत आर्नोल्डची दृढता आणि शांति मात्र बिलकूल ढळली नाहीं.

पोप मंडळी एवढ्यावरच थांबली नाहींत. धार्मिक मतांच्या बाबतींत ज्यांचा पोपच्या पंथापेक्षां थोडासा कांहीं फरक होता, किंवा जे पाद्री लोकांच्या वर्तनाविषयीं फार टीका करीत असत, असे कांहीं खिस्ती पोटपंथ किंवा कांहीं गट यांना सबंधच्या सबंध धर्मांतून बहिष्कृत करण्यापर्यंत त्यांनीं मजल गांठली. या अशा मंडळीविरुद्ध जणुं कांहीं प्रत्यक्ष धर्मयुद्धच पुकारण्यांत आलें आणि त्यांच्याविरुद्ध एकूण एक प्रकारचे क्रूरपणाचे आणि भयभीत करणारे जुलमी उपाय योजण्यांत आले. फ्रान्सच्या दक्षिणेंतील टुलूझ अॅल्बीज्वा उर्फ अॅल्बिजेन्सी पंथ आणि वाल्डो नांवाच्या मनुष्याच्या अनुयायांचा वाल्डेन्सी पंथ या लोकांना अशा रीतीनें छळण्यांत आलें.

या सुमाराला किंवा याच्या थोड्या पुढच्या काळांत खिस्ती धर्माच्या एकूण इतिहासांत ज्याच्याकडे सगळ्यांत मन जास्त वेधतें असा एक मनुष्य होऊन गेला. असीसी येथील फ्रॉन्सिस नांवाचा हा गृहस्थ. मूळचा हा चांगला श्रीमंत होता. त्यानें आपल्या संपत्तीचा त्याग केला; गरिबीनें राहण्याचें व्रत घेतलें आणि आजारी व गरीब लोक यांच्या सेवेसाठीं तो जगांत भ्रमण करूं लागला. जगांत स्वाभाविकच महारोग्यांचे सगळ्यांत अधिक हाल होतात आणि त्यांची कोणी काळजीही घेत नाहींत; म्हणून त्यानें प्रमुखतः त्यांच्या सेवेला आपलें जीवन वाहिलें. त्यानें एक पंथ स्थापन केला; त्याला सेंट फ्रान्सिसचा पंथ असें नांव आहे; बुद्धधर्मांतील संघासारखा हा एक पंथ होता. फ्रॉन्सिस

जागोजाग हिंडे आणि धर्मोपदेश करी; आणि स्वतःची राहणी खिस्तासारखी असावी असा सतत प्रयत्न करी. पुष्कळच लोक त्याच्याकडे येऊं लागले आणि त्यांतून बरेचसे त्याचे शिष्यही होऊं लागंले. खिस्ती धर्मयुद्धें चालू होतीं त्या वेळीं तो ईजिप्त आणि पॅलेस्टाइन या देशांमध्येंही जाऊन आला होता. परंतु त्या देशांतही फ्रॅन्सिस हा खिस्ती असून सुद्धां, या मृदु आणि आदरणीय व्यक्तीला मुसलमानांनींही आदरानें वागविलें आणि त्याच्या कामांत कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा अडथळा उत्पन्न केला नाहीं. इ. स. ११८१ पासून १२२६ पर्यंत हां त्याच्या आयुष्याचा एकंदर काळ. तो मेल्यानंतर त्याचा पंथ आणि खिस्ती धर्मपीठाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यामध्यें झगडा उत्पन्न झाला. त्यांच्या पंथाच्या गरिबी राहणीवर जो एवढा विशेष कटाक्ष होता तो धर्मपीठाला फारसा रुचला नसावा. बहुतेक खिस्ती धर्मांचेंच हें प्राथमिक अवस्थेंत असतां-वेळचें एक तत्त्व होतें; परंतु आतां वय वाढल्यावर खिस्ती धर्मपीठाच्या अंगाला तें. होईनासें झालें होतें. या प्रकरणांत इ. सन १३१८ मध्यें फ्रॅन्सिसच्या पंथाच्या चार अनुयायांना मार्सेल्स येथें जाळण्यांत आलें.

नुकताच कांहीं वर्षांपूर्वी असीसी या छोट्या शहरीं सेंट फ्रॅन्सिसच्या सन्मानार्थ एक मोठा उत्सव करण्यांत आला होता. याच वेळीं हा उत्सव कां करण्यांत आला होता हें मला आठवत नाहीं. बहुतेक त्याची ती सप्तशतसांवत्सरिक पुण्यतिथि असावी.

फ्रॅन्सिसच्या पंथाप्रमाणें, परंतु प्रवृत्तीनें या पंथाहून अगदीं निराळा असा दुसरा एक पंथ खिस्ती धर्मपीठामध्यें निर्माण झाला. सेंट डॉमिनिक नांवाच्या स्पॅनिश साधूनें हा पंथ स्थापन केला म्हणून त्याला डॉमिनिकन पंथ असें म्हणतात. हा पंथ लढाऊ आक्रमक वृत्तीचा आणि धार्मिक श्रद्धेंत सनातन (कर्मठ) परंपरेचा होता. त्यांच्या मताप्रमाणें धर्मश्रद्धेच्या रक्षणाच्या दृष्टीनें बाकी इतर गोष्टी अगदीं दुय्यम प्रतीच्या मानून चाललें पाहिजे असें होतें. आणि लोकांचें मन वळवून जर त्यांना या तत्त्वाचें आचरण करायला लावतां आलें नाहीं, तर जबरदस्तीनेंही तसें करण्यास हरकत नाहीं असा त्यांचा सिद्धांत होता.

इ. स. १२३३ मध्यें इतिहासांत इन्क्विझिशन या नांवानें ओळखली जाणारी धार्मिक न्यायदानाची संस्था निर्माण करून खिस्ती धर्मपीठानें अगदीं अधिकृतपणें आणि पद्धतशीरपणें धार्मिक जुलुमाच्या राज्याला सुरुवात केली. इन्क्विझिशन हें एक प्रकारचें कोर्ट–न्याय देणारें मंडळ–होतें. त्यामध्यें लोकांचीं धार्मिक मतें सनातन खिस्ती धर्मपीठाशीं कितपत जुळतीं आहेत याची चौकशी करण्यांत येई; आणि हीं मतें जर ठराविक कसोटीशीं जुळतीं नाहींत असें आढळून आलें, तर या कोर्टा-कडून शिक्षा फर्माविण्यांत येई. नेहमींची शिक्षा म्हणजे जाळून वध करणें ही असे. हेरेटिक म्हणजे धर्मविरोधी किंवा पाखंडी लोकांना शोधून काढण्यासाठीं शिकारी-सारखा कसून प्रयत्न करण्यांत येत असे. अशा रीतीनें शेंकडों लोकांना सुळाला बांधून

जाळण्यांत आलें. पण या जाळून मारण्यापेक्षांही अधिक भयंकर प्रकार म्हणजे आपल्या मताचा इन्कार करावा म्हणून लोकांचा जो छळ करण्यांत येई तो होता. कित्येक गरीब बिचाऱ्या दुर्दैवी स्त्रियांवर त्या चेटकी आहेत असा आरोप ठेवून त्यांना जाळून टाकण्यांत आलें. तथापि हा प्रकार सगळीकडेच, आणि त्यांतही इंग्लंड व स्कॉटलंड यामध्यें विशेषतः लोकांच्या जमावाकडून होत असे; इन्क्विझिशनच्या हुकुमावरून नव्हे.

पोपनें एक धर्माज्ञा काढून प्रत्येक व्यक्तीनें हेराचें काम केलें पाहिजे, अधर्मी, पाखंडी, माणसाबद्दल आपल्याला कळेल ती माहिती धर्मपीठाला पुरविण्याचें कार्य केलें पाहिजे असें फर्माविलें. रसायनशास्त्राच्या प्रयोगाला पोपनें मनाई केली; ही सैतानाची कला आहे असें त्यानें ठरविलें. एवढा हा सगळा जुल्लूम आणि अत्यांचार जो चालला होता, तो खरोखर अगदीं प्रामाणिक बुद्धीनें चाललेला होता. अशा रीतीनें सुळाला बांधून मनुष्याला जाळण्यामुळें आपण त्या मनुष्याच्या आत्म्याला आणि इतर लोकांच्या आत्म्याला पतनापासून बचावीत आहोंत, अशी त्या लोकांची अगदीं खरी श्रद्धा होती. धर्माला वाहिलेल्या लोकांनीं असाच नेहमीं इतरांवर वरबसेपणा केलेला, आणि आपलीं मतें दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादलेलीं आढळून येतात; आणि असें करतांना प्रत्येक वेळीं आपण मोठीच लोकसेवा करीत आहों अशीच त्यांची श्रद्धा असते. देवाच्या नांवानें त्यांनीं लोकांचा वध केलेला आढळतो, अगदीं खून केलेला आढळतो; आणि 'अमर आत्म्या'ला वांचविण्याची भाषा करीत मर्त्य अशा देहाची मात्र राख करावयाला त्यांनीं केव्हां मागेंपुढें केलेलें आढळणार नाहीं. धर्माचा इतिहास एकंदरीनें वाईटच आहे. परंतु अगदीं राक्षसी, निर्दय क्रूरपणाच्या बाबतींत या इन्क्विझिशनवर ताण करूं शकेल, असें या असल्या वाईट इतिहासांत सुद्धां दुसरें कांहीं दाखवितां येणार नाहीं. आणि त्यांतही अत्यंत अचंबा करण्यासारखी गोष्ट ही, कीं या क्रूरपणाला जबाबदार असणाऱ्या मंडळीपैकीं बहुतेक सर्व लोकांनीं असा क्रूरपणा कोणत्याही प्रकारचा वैयक्तिक फायदा करून घेण्यासाठीं म्हणून नव्हे, तर आपण एक सत्कृत्य करीत आहों अशा अगदीं दृढ श्रद्धेनें केला!

साऱ्या यूरपभर पोप लोक हें असें जुलमाचें राज्य एकीकडे अनिर्बंधपणें सुरू करीत होते; पण त्याच वेळीं इकडे राजे-महाराजांचाही स्वामी अशी जी पोपच्या प्रभुत्वाची अवस्था होती, ती मात्र घसरत चालली होती; कोणा बादशहाला धर्मांतून बहिष्कृत करण्याचे, किंवा त्या भीतीनें आपल्यापुढें वांकविण्याचे त्यांचे दिवस आतां संपले होते. पवित्र रोमन साम्राज्यावर जेव्हा काठिण काळांची छाया पडली आणि त्या साम्राज्याला जेव्हां बादशहाच नाहींसा झाला अथवा तेथील बादशहा जेव्हां रोमशीं संबंध ठेवीतनासे झाले, त्या वेळीं फ्रान्सच्या राजानें पोपांशीं गडबड करण्याला सुरुवात केली. इ. स. १३०३ मध्यें पोपच्या कांहीं एका कृत्यामुळें या राजाला कोप आलेला होता. म्हणून त्यानें एक मनुष्य पोपकडे पाठविला आणि या माणसानें पोपच्या राजवाड्यांतील त्याच्या शयनागारांत जबरदस्तीनें शिरून

. . .

पोपच्चा त्याच्या तोंडावर अपमान केला. पण या अपमानास्पद वागणुकीबद्दल कोणत्याही देशांत नापसंती व्यक्त करण्यांत आली नाहीं. कोठें हा प्रकार आणि कोठें कॅनोसा येथें एका बादशहाला अनवाणी यावें लागलें होतें हा प्रकार ; तुलना करून पाहा !

यानंतर कांहीं वर्षांनीं इ. स. १३०९ मध्यें एक फ्रेंच मनुष्य पोप झाला व त्यानें फ्रान्समध्यें ॲव्हिग्नान येथें आपलें निवासस्थान केलें. या ठिकाणीं १३७७ सालापर्यंत पोपांची वसती होती ; आणि येथें त्यांच्यावर फ्रेंच राजांचें वर्चस्व असे. त्याच्या पुढच्या वर्षीं १३७८ मध्यें कार्डिनल्सच्या संघांत (कॉलेजमध्यें) फूट झाली. या फुटीला (Great Scism) महान् फूट असें म्हणतात. कार्डिनल्सच्या दोन्ही बाजूंनीं दोन पोपांची निवड केली. एक पोप रोम येथें राहूं लागला व रोमचा बादशहा आणि उत्तर यूरपमधील बहुतेक देश यांनीं त्याला मान्यता दिली. दुसऱ्या पोपला अँटिपोप, पोप-विरोधक, असें म्हणूं लागले. हा ॲव्हिग्नॉन येथें राहूं लागला व फ्रान्सचा राजा आणि त्याचे कांहीं मांडलिक यांचा त्याला पाठिंबा मिळाला. असा हा प्रकार चाळीस वर्षें चालला. था दरम्यान पोप आणि पोपविरोधक एकमेकांना शिव्याशाप देत होते, आणि एकमेकांना धर्मबाह्य ठरवीत होते. १४१७ मध्यें या दोन पक्षांत तडजोड झाली आणि दोन्ही पक्षांनीं नवीन निवडलेला एकच पोप रोममध्यें राहूं लागला. परंतु दोन पोपामधील या ओंगळ तंट्याचा यूरपमधील लोकांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला असला पाहिजे.

स्वतःला पृथ्वीवरील देवाचे प्रतिनिधी (Vicar), देवाचे अवतार म्हणविणारे हे लोकच जेव्हां अशा रीतीनें वर्तन करूं लागले, तेव्हां त्यांच्या पवित्रपणाबद्दल आणि सद्बुद्धीबद्दल लोकांच्या मनांत शंका उत्पन्न झालीच असली पाहिजे. अशा रीतीनें या भांडणामुळें धार्मिक सत्तेचे हुकूम आंधळेपणानें पाळण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीला आळा बसण्यास फार मोठी मदत झाली. परंतु लोकांना या बाबतींत अजून पुष्कळच मोठे धक्के बसायला हवे होते.

ख्रिस्ती धर्मपीठावर अगदीं निर्भयपणें आणि आनिर्बंधपणें टीका करण्याला सुरुवात विक्लिफ नांवाच्या एका इंग्रज मनुष्यानें केली. हा स्वतः एक धर्मोपदेशक असून ऑक्स्फर्ड विद्यापीठांत प्राध्यापक होता. बायबलचा पहिला इंग्रजी भाषांतर-कार म्हणून हा विख्यात आहे. जिवंतपणीं रोमच्या धर्मपीठाच्या कोपांतून तो कसाबसा बचावला ; परंतु त्याच्या मृत्यूनंतर एकतीस वर्षांनीं चर्च कौन्सिलनें त्याचीं हाडें उकरून काढून तीं जाळून टाकण्याचा हुकूम दिला. आणि हा हुकूम प्रत्यक्ष अमलांतही आला !

अशा रीतीनें विक्लिफचीं हाडें अपवित्र ठरवून जाळून टाकण्यांत आलीं खरीं, परंतु त्याच्या मतांची कांहीं इतकी सहज गळचेपी करतां आली नाहीं ; त्या मतांचा प्रसार वाढतच गेला. हीं मतें दूरवर बोहेमियापर्यंत म्हणजे आज ज्याला झेकोस्लोव्हाकिया म्हणतात त्या देशापर्यंत पोंचलीं आणि जॉन हस नांवाच्या गृहस्थाच्या मनांत त्यांचें

ठाणें बसलें. हाच गृहस्थ पुढें प्राग येथील विश्वविद्यालयाचा प्रमुख झाला. त्याच्या या मतासाठीं पोपनें त्याला धर्मांतून बहिष्कृत म्हणून जाहीर केलें. परंतु त्याच्या राहत्या छोट्या गांवीं त्याचें कोणी कांहीं वांकडें करूं शकत नव्हतें; कारण तेथें तो फार लोकप्रिय होता. म्हणून पोपच्या लोकांनीं त्याला कपट करून फशीं पाडलें. स्वित्झर्लंडमध्यें कॉन्स्टन्स येथें चर्च कौन्सिलची एक बैठक भरावयाची होती. त्या बैठकीसाठीं त्याला आमंत्रण देण्यांत आलें. आणि त्याच्या तेथें जाऊन येण्यापर्यंतच्या दरम्यानच्या सुरक्षिततेची हमी प्रत्यक्ष बादशहानें घेतली. तो तेथें गेला. त्याला आपली चूक कबूल करण्याबद्दल तेथें सांगण्यांत आलें. स्वतःच्या मनाचें समाधान झालेलें नसतांना तसें करण्याचें त्यानें नाकारलें. आणि मग हमी दिलेली असूनही तिची फिकीर न करतां त्याला जिवंत जाळण्यांत आलें. इ. स. १४१५ मधील ही गोष्ट. हुस हा फार धैर्यवान् गृहस्थ होता. स्वतःला जी गोष्ट असत्य वाटते तिला मान्यता देण्याऐवजीं त्यानें इतकें हें दुःखकारक मरण पत्करलें. मतस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य यासाठीं हुतात्मा म्हणून त्यानें आपले प्राण दिले. झेक लोकांचा तो एक विभूतिमान् वीर पुरुष असून आजही झेकोस्लोव्हाकियांत त्याचें स्मरण लोक मोठ्या आदरानें करतात.

हुतात्मा जॉन हसचा प्राणयज्ञ कांहीं व्यर्थ गेला नाहीं. त्याच्या बोहेमियांतील अनुयायांमध्यें बंडाची आग पेटविणारी ती ठिणगीच ठरली. पोपनें त्या लोकांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारलें. धर्मयुद्ध पुकारणें हें अगदींच बिनखर्ची स्वस्त कार्य होतें आणि त्याचा फायदा व्यावयास टपलेले वाटेल तेवढे बदमाष आणि पुंड लोकही होतेच. एच्. जी. वेल्सनेंच आपल्याला सांगितलें आहे, कीं या धर्मयुद्धांतील वीरांनीं आपल्या लोकांवर "अत्यंत भयंकर असे अंगावर शहारे आणणारे अत्याचार केले." परंतु हसपंथीय लोकांचें सैन्य जेव्हां आपलें रणगीत गात या वीरांवर चालून आलें, तेव्हां ते सारे ख्रिस्ती धर्मवीर वाऱ्यावर उडून गेले. आलेल्या मार्गानें ते वेगानें निघून गेले. गरीब बिचाऱ्या निरपराध खेडेगांवच्या लोकांची लूटमार करण्याचा प्रसंग होता, तोंपर्यंत त्या वीरांच्या ठिकाणीं मोठें लष्करी तेज स्फुरत होतें; परंतु शिस्तीचें सैन्य समोर येतांक्षणींच त्यांनीं पळ काढला.

अशा रीतीनें एकतंत्री, जुलमी आणि कर्मठ, आग्रही धर्माविरुद्ध हल्ले आणि बंडें सुरू होऊन तीं साऱ्या यूरप खंडभर प्रसरलीं; त्यामुळें यूरप खंडांत वेगवेगळे लष्करी तट पडले आणि त्यांतून ख्रिस्ती धर्माचे कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट असे दोन पंथ पडून ख्रिस्तधर्मीयांत फूट झाली.

७१

जोहुकुमी अमलाविरुद्ध झगडा

३० जून, १९३२

मला वाटतें यूरपांतील या ज्या धार्मिक झगड्यांच्या हकीकती मीं लिहिल्या आहेत, त्या तुला थोड्याशा कंटाळवाण्या वाटतील. पण या हकिकती महत्त्वाच्या आहेत. कारण आधुनिक युगातील यूरप खंड कसें बनत गेलें हें त्यावरून समजून येतें. यूरप खंडाचें संपूर्ण ज्ञान होण्याला आपल्याला त्यांचा उपयोग होतो. चौदाव्या शतकांत आणि त्यानंतर जो धर्मस्वातंत्र्यासाठीं यूरपमध्यें झगडा वाढत गेलेला आपणांस आढळतो आणि राजकीय स्वातंत्र्यासाठीं झगडा जो याच्या पाठोपाठच झालेला आपणास दिसून येणार आहे, ते हे दोन्ही झगडे खरोखर एकाच प्रकारच्या झगड्याचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. सत्ताधीश आणि त्यांचा जोहुकमी अम्मल – अधिकारी आणि सर्वाधिकारशाही यांच्याविरुद्ध हा झगडा होय. पवित्र रोमन साम्राज्य काय किंवा पोपचें धर्मपीठ काय, दोन्ही एकतंत्री सत्तेचींच निरनिराळीं रूपें असून मनुष्यांमधील तेज, स्वत्व, चुरडून टाकण्याचा त्या दोहोंचा प्रयत्न होता. बादशहा हे दैवी अधिकारामुळेंच बादशहा झालेले; पोपच्या बाबतींत तर बादशहांपेक्षांही ही गोष्ट अधिकच खरी; कोणालाही या गोष्टीबद्दल शंका घेण्याचा अधिकार नाहीं, किंवा वरून झालेला हुकूम अमान्य करण्याचाही कोणाला अधिकार नाहीं, अशी त्यांची भूमिका होती. आज्ञापालन हा या तत्त्वज्ञानाप्रमाणें फार मोठा सद्गुण. कोणींही स्वतंत्र विचाराचा आश्रय करणें, धर्मतत्त्वाबद्दल स्वतःचा म्हणून कांहीं निश्चय करणें हें सुद्धां पाप समजलें जाई. त्यामुळें एका बाजूला आंधळें आज्ञापालन आणि दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्य यांच्यामधील हा अगदीं उघड खडा विरोध किंवा तंटा होता. यूरपमध्यें विचार-स्वातंत्र्यासाठीं कित्येक शतकें एक झगडा चालू राहिला; तसाच पुढें राजकीय स्वातंत्र्यासाठींही. यशापयाचें पारडें पुष्कळ वेळां खालींवर हेलकावे खातां खातां आणि पुष्कळच हाल व यातना सोसल्यानंतर थोड्याफार प्रमाणांत या झगड्यांत यश प्राप्त झालें. परंतु, झालें; आपल्याला यश मिळालें अशी कोठें लोक थोडीशी आपापली पाठ थोपटताहेत तोंच सगळ्यांना आढळून आलें, कीं नाहीं, तसें समजण्यांत आपली चूक होत आहे. लोकांना दिसून आलें, कीं खरें स्वातंत्र्य हें आर्थिक स्वातंत्र्याशिवाय, जोंपर्यंत दारिद्र्य शिल्लक आहे तोंपर्यंत, अस्तित्वांत येऊंच शकत नाहीं. भुकेनें मरणाऱ्या माणसाला तूं स्वतंत्र मनुष्य आहेस म्हणून सांगणें म्हणजे त्याची थट्टा करण्यासारखें आहे. तेव्हां पहिल्या झगड्यानंतरची पुढची पायरी म्हणजे आर्थिक स्वातंत्र्यार्थ झगडण्याची पाळी आली आहे आणि हा झगडा साऱ्या जगभर चालू आहे. एकाच देशांत मात्र सामान्यतः लोकांनीं आर्थिक स्वातंत्र्य मिळविलेलें आहे, असें म्हटलें

पाहिजे ; हा देश म्हणजे रशिया अथवा जास्त बिनचूक बोलावयाचें तर सोव्हिएट यूनियन हा होय.

हिंदुस्थानिमध्यें असा विचारस्वातंत्र्यासाठीं केव्हांच झगडा झालेला आढळत नाहीं. कारण अगदीं पूर्वीच्या काळापासून विचारस्वातंत्र्याचा हक्क हिंदुस्थानांत कधीं नाकारण्यांत आल्याचेंच दिसंत नाहीं. कोणालाही कोणत्याही गोष्टीवर किंवा विचारावर श्रद्धा ठेवण्याली सवड असे ; कोणावर कसलीही सक्ती नव्हती. या देशामध्यें तर्कशास्त्र, बुद्धिवाद आणि चर्चा यांच्या साह्यानें लोकांचें मतपरिवर्तन करण्याची पद्धति होती; दंडाच्या किंवा सुळाच्या साह्यानें नव्हे. अधूनमधून केव्हां केव्हां सक्तीचा किंवा जुलुमाचा अवलंब करण्यांत आला असेल, हें अर्थातच मान्य केलें पाहिजे ; परंतु प्राचीन आर्यांच्या तत्त्वज्ञानांतच विचारस्वातंत्र्याचा अधिकार मान्य करण्यांत आला आहे. मात्र या स्वातंत्र्याचा परिणाम सर्वस्वीं चांगला झाला नाहीं हें विचित्र वाटलें, तरी खरें आहे. तत्त्वतः स्वातंत्र्याबद्दल खात्री असल्यामुळेंच लोक या स्वातंत्र्याबद्दल तितके जागरूक राहिले नाहींत, आणि हळूहळू अवनत स्थितीस पोंचलेल्या धर्मामध्यें जें कर्मकांड, संस्कार, उत्सव आणि लोकभ्रम निर्माण होत असतात, त्यां सर्वांच्या सांपळ्यांत ते कमीजास्त प्रमाणांत अडकले गेले. त्यांच्यामध्यें अशा प्रकारची एक धार्मिक विचार-प्रणाली निर्माण झाली कीं त्यामुळें प्रगतिप्रत्यावर ते फारच मागें खेंचले गेले आणि धार्मिक सत्तेचें गुलामीपण त्यांच्या अंगीं उत्पन्न झालें. या देशांत ही धार्मिक सत्ता एखाद्या पोपच्या किंवा अशा दुसऱ्या कोणा एका व्यक्तीच्या ठिकाणींच नव्हती, तर "वेदादि पवित्र धर्मग्रंथ" परंपरा आणि रूढि यांची ती सत्ता होती. त्यामुळें तोंडानें जरी आम्ही विचारस्वातंत्र्याच्या बाता मारीत असलों आणि आमच्या देशांत तें आहे म्हणून स्वतःची मोठी फुशारकी मारीत असलों, तरी खरोखर त्या स्वातंत्र्यापासून आम्ही फार दूर होतों आणि आमचे प्राचीन धर्मग्रंथ आणि रूढि यांनीं आमच्या मनावर ठसविलेल्या कल्पनांच्या आम्ही पुरे आहारीं गेलेले होतों. अधिकारी आणि अधिकार-शाही यांचाच आमच्यावर अम्मल बसला असून त्यांच्याच कबजांत आमची बुद्धीही गेली होती. आपल्या शरीराला क्वचित् एखादे वेळीं बांधणाऱ्या शृंखला या तर वाईट खऱ्याच, परंतु अशा या बुद्धीला कायम जखडून टाकणाऱ्या कल्पनांच्या आणि दुर्ग्रहांच्या शृंखला या त्याहून फारच वाईट. आमच्या आम्हींच या शृंखला निर्माण करीत असतों, आणि पुष्कळदां आपल्याला याबद्दल चांगली जाणीव असूनही त्या शृंखलांची आपल्यावरील भयंकर पकड ढिली होत नाहीं.

मुसलमान लोक जेव्हां हिंदुस्थानमध्यें स्वारी करणारे विजेते म्हणून आले, तेव्हां या देशांत धर्माच्या बाबतींत सक्तीचा भाग थोडासा निर्माण झाला. तेव्हांचा जो झगडा होता तो खरोखर जित आणि जेते यांच्यामधील राजकीय झगडा होता; परंतु त्याच्या-वर एक प्रकारचा धार्मिकतेचा रंग चढलेला होता; आणि केव्हां केव्हां धार्मिक जुलूम घडूनही आलेला आहे. परंतु इस्लामधर्माचा पाठिंबा अशा प्रकारच्या जुलुमाला होता

असें समजणें मात्र चुकीचें आहे. इ. स. १६१० मध्यें उरल्या सुरल्या आरबी लोकांना स्पेनमधून हांकलून लावण्यांत आलें; त्या वेळीं त्या लोकांबरोबर गेलेल्या एका स्पॅनिश मुसलमानानें दिलेल्या व्याख्यानाचा एक मोठा लक्ष देण्याजोगा अहवाल आपल्याला उपलब्ध आहे. इन्क्विझिशनच्या कोर्टाचा निषेध करून तो म्हणतो, "आमच्या विजयी पूर्वजांनीं स्पेनमधून ख्रिश्चन धर्माचा उच्छेद करण्याचा प्रयत्न तशी त्यांच्या अंगीं शक्ति असूनही केव्हां तरी केला आहे काय? तुमच्या पूर्वजांना जरी शृंखला घालाव्या लागत होत्या, तरी त्याही स्थितींत त्यांना आपलीं सर्व धर्मकृत्यें करण्याला त्यांनीं सवलत ठेवली नव्हती काय? जबरदस्तीनें धर्मांतर करविल्याचीं कांहीं उदाहरणें असलीं, तरी तीं इतकीं क्वचित् घडलेलीं आहेत कीं त्यांचा उल्लेख सुद्धां करण्याचें कारण नाहीं. ज्या कोणी माणसांनीं असें करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या दृष्टीसमोर परमेश्वर आणि पैगंबर याची भीति नव्हती, आणि तसें करतांना हे लोक इस्लामधर्माच्या सर्व पवित्र आज्ञांच्या आणि नियमांच्या अगदीं पूर्ण विरुद्ध आचरण करीत होते; धर्मलंडपणा केल्याखेरीज ज्याला मुसलमान हें सामान्य विशेषण आपल्याला लावून घ्यावयाचें असेल, अशा कोणालाही असें वर्तन करता येणें शक्य नाहीं. कोणत्याही प्रकारें तुमच्या अत्यंत निंद्य अशा इन्क्विझिशनसारखें केवळ धर्मश्रद्धेच्या बाबतींतील मतभेदासाठीं असें एखादें रक्तपिपासू न्यायमंडळ तुम्हांला आमच्या लोकांत कधींच निर्माण करतां येणार नाहीं. ज्यांना आमच्या धर्माचा स्वीकार करण्याची इच्छा होईल, त्याला आमच्या धर्मांत घेण्यासाठीं आमचे हात सदैव अर्थातच सिद्ध आहेत; पण आमच्या पवित्र कुराणाप्रमाणें कोणाच्याही सदसद्विवेक बुद्धीवर जुलूम करण्याची आम्हांला मुभा नाहीं."

तात्पर्य काय, कीं धार्मिक उदारपणा आणि विचारस्वातंत्र्य या ज्या आमच्या प्राचीन भारतीय जीवनांतील विशेष लक्षांत घेण्यासारख्या गोष्टी त्या कांहीं प्रमाणांत आमच्या हातून निसटून नाहींशा झाल्या, तर तिकडे यूरपांतील लोकांनीं जगाच्या प्रगतीच्या शर्यतींत आम्हांला गांठून पुष्कळ पुढें प्रगति केली; आणि पुष्कळशा झगड्यानंतर हीं तत्त्वें त्यांनीं आपल्या स्वतःच्या जीवनांत प्रस्थापित केलीं. आज कधीं कधीं हिंदुस्थानांतच धार्मिक झगडे निर्माण होत असतात; येथेंच हिंदू आणि मुसलमान एकमेकांशीं लढतात आणि एकमेकांचे जीव घेतात. हें खरें, कीं असें हें कांहीं ठिकाणींच आणि अगदींच क्वचित् प्रसंगीं घडून येतें; आणि बहुतेक काळ आम्ही लोक शांततेंत आणि मैत्रींतच घालवीत असतों; कारण आमचे खरे हितसंबंध अगदीं एकच आहेत. धर्माच्या नांवानें कोणाही हिंदूनें मुसलमान बांधवाशीं किंवा मुसलमानानें हिंदु बाधवाशीं लढणें ही लज्जास्पद गोष्ट आहे. आपण हा प्रकार बंद करणें आवश्यक आहे आणि जरूर आम्ही तो बंद करूंच. परंतु धर्माच्या सोंगाखालीं रूढि, परंपरा आणि अंधश्रद्धा यांच्या कोडबोळ्यानें व्यापलेल्या ज्या विचारप्रणालीच्या शृंखलेनें आम्ही बांधले गेलों आहों, त्यांतून आम्हीं सुटणें ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे.

धार्मिक उदारतेच्या बाबतींत त्याप्रमाणेंच राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतींतही सुरुवातीला हिंदुस्थाननें चांगली आघाडी मारली होती. आमच्याकडील स्वतंत्र ग्राम-राज्यांची तुला आठवण असेलच; तसेंच पहिल्या पहिल्या काळीं राजाची सत्ता मर्यादित असल्याबद्दलची इकडे कशी कल्पना होती हेंही तुझ्या ध्यानांत असेल. यूरपांतील राजांच्याप्रमाणें राजांचे कसलेही दैवी अधिकार या देशांत अस्तित्वांत नव्हते. आमची सर्व समाजरचना ही ग्रामीण स्वातंत्र्यावर आधारलेली असल्यामुळें राजा कोण आहे याबद्दल लोकाना फिकीर नसे. त्यांची स्थानिक स्वतंत्रता जोंपर्यंत सुरक्षित होती, तोंपर्यंत वर कोणाचा अधिकार चालू आहे याची काळजी करण्याचें त्या लोकांना काय कारण होतें? परंतु ही अगदीं धोक्याची आणि मूर्खपणाची कल्पना होती. हळूहळू वरच्या या अधिकाऱ्यांनीं आपलें सामर्थ्य वाढविलें आणि खेडेगांवाच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलें. लौकरच आमच्या येथें सर्वस्वीं एकतंत्री राजांचा काळ निर्माण झाला आणि खेडेगांवचें स्वराज्यही राहिलें नाहीं; आणि वरपासून खालपर्यंत स्वातंत्र्याची छटासुद्धां कोठें राहिली नाहीं.

७२

मध्ययुगाचा अंत

१ जुलै, १९३२

तेराव्या शतकापासून पंधराव्या शतकाच्या दरम्यानच्या काळांतील यूरप खंडाकडे आपण पुन्हां एकदां नजर टाकूं या. या काळात त्या खंडामध्यें प्रचंड बंडाळी आणि अत्याचार यांचें साम्राज्य माजलें होतें. हिंदुस्थानांतील परिस्थिति पण बरीचशी वाईटच होती; तथापि यूरप खंडाशीं तुलना करतां हिंदुस्थानांत शांतताच होती असेंच बहुतेक कोणालाही म्हणतां येईल.

मंगोलियन लोकांनीं आपल्याबरोबर बंदुकीची दारू यूरप खंडांत नेली आणि तेव्हांपासून या काळांत तेथें आगपेंकी हत्यारें वापरण्यास सुरवात झाली. आपल्या बंडखोर दुय्यम सरदारांना चिरडून टाकण्यासाठीं राजेलोकांनीं या हत्यारांचा उपयोग करण्यास सुरुवात केली. त्या कामीं शहरामध्यें निर्माण झालेल्या नवीन व्यापारी-वर्गांनीं राजे लोकांना मदत केली. या सरदार लोकांना आपापसांमध्यें आपल्या कांहीं खासगी कारणासाठीं लढाया करण्याची संवय असे. त्यामुळें त्यांची शक्ति तर कमी होत गेलीच, परंतु त्याच्या आसपासच्या खेडेगांवांनाही त्यामुळें फार यातना सोसाव्या लागूं लागल्या. राजाची जशी शक्ति वाढत गेली, तसतशा सरदारांमधील या

लढाया त्यानें बंद करून टाकल्या. कांहीं ठिकाणीं तर राजपदासाठीं स्पर्धा करणाऱ्या दोन गटांमध्येंच आपसात यादवीही झाली. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें यॉर्कचें घराणें आणि लँकेशायरचें घराणें अशा दोन घराण्यांमध्यें हा झगडा झाला. त्यांपैकीं प्रत्येक पक्षानें गुलाबाचें फूल आपल्या पक्षाचें चिन्ह म्हणून धारण केलें होतें. एका पक्षानें पांढऱ्या गुलाबाचें, तर दुसऱ्या पक्षानें तांबड्या गुलाबाचें. म्हणून त्यांच्यामधील युद्धांना 'गुलाबांचीं युद्धें' असें नांव मिळालेलें आहे. या आपसांतील यादवीमध्यें पुष्कळच मांडलिक सरदार मारले गेले. खिस्ती धर्मयुद्धांमध्येंही आणखी असेच पुष्कळ सरदार मेले. अशामुळें हळूहळू या सरंजामदार सरदारांची सत्ता नियंत्रित झाली. त्यांचा अनियंत्रित कारभार बंद झाला. परंतु त्याचा अर्थ सत्ता या सरदारांच्या हातून लोकांच्या हातीं आली असा मात्र नव्हे. त्यामुळें सत्ता अधिक वाढली ती राजाची. सरदारांतील खासगी लढाया बंद झाल्यामुळें जी काय थोडी परिस्थिति सुधारली तेवढी सोडली, तर लोकांची स्थिति आहे तीच राहिली. राजा मात्र जास्त जास्त सर्वसत्ताधीश आणि एकतंत्री राज्यकर्ता होत गेला. राजा आणि नवीन व्यापारीवर्ग यांच्यामधील झगडा अजूनपर्यंत सुरू झाला नव्हता. तो या पुढच्या काळांत व्हावयाचा होता.

युद्धें आणि कत्तली याच्यापेक्षांही इ. स. १३४८ मध्यें यूरप खंडांत उद्भवलेला महान् साथीचा रोग – प्लेग – हा फारच जास्त भयंकर होता. रशिया आणि आशिया मायनरपासून तो थेट इंग्लंडपर्यंत साऱ्या यूरप खंडावर या रोगाची सांथ पसरली होती. एवढेंच नव्हे, तर ईजिप्त, उत्तर आफ्रिका, मध्य आशिया या प्रदेशांपर्यंत जाऊन मग ती पश्चिमेकडे पसरली. इंग्लंडमधील सुमारें एक-तृतीयांश लोकसंख्या या रोगांत मरण पावली. चीन आणि इतर देशांतही मृत्युसंख्या अशीच डोळे फिरविण्याइतकी प्रचंड होती. आश्चर्याची गोष्ट मात्र ही, कीं हिंदुस्थानांत ही सांथ पसरली नाहीं.

या भयंकर संकटामुळें लोकसंख्या फारच रोडावली आणि जमिनीची लागवड करण्याला पुरेशीं माणसें पुष्कळ ठिकाणीं शिल्लक राहिलीं नाहींत. मनुष्यसंख्याच कमी झाल्यामुळें मजुरांच्या वेतनामध्यें पूर्वीच्या अगदींच दैन्यवाण्या दरांच्या मानानें पुष्कळच वाढ होऊं लागणें स्वाभाविक होतें. परंतु कायदेमंडळें पडलीं जमीनमालक आणि संपत्तिमान् लोकांच्या हातांत. त्यामुळें त्यांनीं लोकांनीं पूर्वीच्याच त्या क्षुद्र दैन्यवाण्या मजुरीच्या दरांत काम केलें पाहिजे, अधिक मजुरी मागतां उपयोगी नाहीं, अशा प्रकारचे कायदे केले. पिळणूक आणि दारिद्र्याचें ओझें असह्य झाल्यामुळें शेतकऱ्यांनीं आणि गरीब लोकांनीं बंडें केलीं. सर्व पश्चिम यूरप खंडभर एकामागून एक ही अशीं शेतकऱ्यांचीं बंडें उद्भवलीं. फ्रान्स देशामध्यें इ. स. १३५८ मध्यें अशी ही उठावणी झाली तिला जॅकेरी हें नांव आहे. इंग्लंडमध्यें वॅट टायलरचें बंड होऊन त्यांत इ. स. १३८१ मध्यें प्रत्यक्ष इंग्लंडच्या राजाच्या डोळ्यांसमोर वॅट टायलर मारला गेला. हीं बंडें दडपून टाकतांना कित्येक वेळां फार क्रूर रीतीनें जुलूम करण्यांत आला. परंतु आतां समतेच्या नव्या कल्पना हळूहळू पसरूं लागल्या होत्या. दुसरे लोक

श्रीमंत असतांना आणि प्रत्येक गोष्टीची त्याच्याजवळ विपुलता असतांना आम्हींच तेवढें दरिद्री कां असावें आणि उपाशीपोटीं कां राहावें, असे प्रश्न लोक आपल्याशींच विचारूं लागले. कांहीं लोकांनीं सरंजामदार-जमीनमालक असावें आणि कांहींनीं भूदास असावें असा फरक कां असावा? कांहीं लोकांजवळ चांगले भरदार सुंदर सुंदर कपडे कां असावे आणि इतरांना लाज झांकण्यापुरेशीं फाटकीं लक्तरें सुद्धां कां नसावींत? सरंजामदारशाहीचा सगळा डोलारा सत्तेपुढें मान वांकवावयाची या कल्पनेवर आधारलेला होता. ती जुन्या काळची कल्पनाच आतां मोडकळीला आली. त्यामुळें शेतकऱ्यांनीं पुन्हां पुन्हां बंडाची उठावणी केली. परंतु ते दुर्बल आणि असंघटित असल्यामुळें त्यांचा पराभव होई. तथापि, पुन्हां संधि सांपडतांच आणखी नवी उठावणी ते करीत.

इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें या काळांत जवळजवळ एकसारखें युद्धच सुरू होतें. चौदाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापासून तों पंधराव्या शतकापर्यंत त्यांच्यामध्यें ज्याला 'शंभर वर्षांचें युद्ध' म्हणून म्हणतात तें चालू होतें. फ्रान्सच्या पूर्वेला बर्गंडीचें राज्य होतें. येथील राजा नांवापुरता फ्रान्सच्या राजाचा मांडलिक असला, तरी हें राज्य मोठें शक्तिमान् राज्य होतें. बर्गंडीचा राजा हा "मोठा त्रासदायक आणि बंडखोर माडलिक होता; त्यामुळें त्याच्याशीं इंग्लंडनें फ्रान्सविरुद्ध कट केला; तसाच इतरही देशांबरोबर इंग्लंडनें कट केला होता. अशा रीतीनें कांहीं काळपर्यंत फ्रान्सला विरोधी राज्यांकडून चोहोंकडून कोंडल्यासारखेंच झालें होतें. फ्रान्सचा पश्चिमेकडील बराचसा भाग पुष्कळ काळापासून इंग्रजांच्याच कबजांत होता. आतां तर इंग्लंडच्या राजानें आपल्याला फ्रान्सचा राजा असेंही म्हणविण्यास सुरुवात केली. फ्रान्सच्या दुर्दशेची आतां अगदीं कमाल अवस्था होऊन गेलेली होती; आशेला कांहींही जागा राहिलेली नव्हती; अशा वेळीं एका शेतकऱ्याच्या मुलीच्या रूपानें फ्रान्समध्यें आशा आणि विजय यांचा अवतार झाला. ऑलिन्सची कुमारी जीन द आर्क (हिलाच इंग्रजींत जोन ऑफ आर्क म्हणतात; फ्रेंचमध्यें या नांवाचे वेगळे उच्चार आहेत. त्यांत एक झांडार्क असा आहे.) हिच्यासंबंधीं तुला थोडीशी माहिती आधींच आहे. तुझी तर ती एक पूज्य विभूति आहे. तेजोहीन झालेल्या, निराश झालेल्या आपल्या लोकांच्या मनांत तिनें विश्वास उत्पन्न केला आणि त्यांना एक महान् प्रयत्न करण्यास उद्युक्त केलें; आणि तिच्या नेतृत्वाखालीं फ्रेंच लोकांनीं इंग्रजांना आपल्या देशांतून हांकलून लावलें. पण या सगळ्याचें बक्षीस तिला काय मिळालें? तर इन्क्विझिशनच्या न्यायमंदिरांत तिची चौकशी होऊन सुळावर जाण्याची शिक्षा तिला मिळाली! इंग्रज लोकांनीं तिला कैद केलें, धर्मपीठाकडून तिला मृत्यूची शिक्षा देवविली आणि इ. स. १३४० मध्यें रूएन येथील बाजारपेठेंत त्यांनीं तिला जिवंत जाळलें. यानंतर पुष्कळ वर्षांनीं रोमन धर्मपीठानें तिला मृत्यूची शिक्षा देणारा ठराव रद्द करून झालेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न केला; आणि पुढें पुष्कळच दीर्घ काळानंतर त्या धर्मपीठानें तिला संतपदावर चढविलें.

जीन ही 'फ्रान्स देश' असा शब्दप्रयोग करूं लागली; परक्यापासून आपल्या पितृभूमीचें संरक्षण करण्याची भाषा ती बोलूं लागली. ही सगळीच नवीन प्रकारची भाषा होती. लोकांच्या मनात त्या काळीं सरंजामशाहीच्या कल्पना इतक्या भरून राहिलेल्या होत्या, कीं राष्ट्रीयत्वाच्या विचाराला त्या मनांत थाराच नव्हता. जीनच्या भाषेचें त्यांना मोठेंच आश्चर्य वाटलें; ती काय बोलते हेंच त्यांना नीटसें कळेना. जीन द आर्कच्या काळापासून राष्ट्रीयत्वाची अंधुक सुरुवात झालेली आपणांस आढळते.

इंग्लिश लोकांना आपल्या देशांतून काढून लावल्यानंतर फ्रान्सच्या राजानें बर्गंडीच्या राजाकडे लक्ष वळविलें. या राजापासून त्याला फारच त्रास झालेला होता. या सामर्थ्यवान् मांडलिकाला अखेरीस फ्रान्सच्या राजानें आपल्यापुढें नमायला लावलें आणि बर्गंडी देश इ. स. १४८३ मध्यें फ्रान्सच्याच राज्यांत समाविष्ट करून टाकण्यांत आला. या वेळेपासून फ्रेंच राजा चांगलाच समर्थ होतो. या सुमारास त्यानें आपल्या सरंजामदारांपैकीं कांहींना पार नष्ट करून टाकलें होतें. कांहींना आपल्या कबजांत आणलें होतें. बर्गंडीच्या राज्याचा समावेश फ्रान्समध्यें झाल्यावेळेपासून फ्रान्स आणि जर्मनी हे देश समोरासमोर येऊन त्यांच्या सरहद्दी एकमेकांना भिडल्या. परंतु फ्रान्समध्यें एका मध्यवर्ती राजसत्तेच्या ठिकाणीं सर्व सामर्थ्य एकवटलेलें होतें आणि तो देश चांगलाच प्रबळ झालेला होता, तर जर्मनी अगदींच दुर्बळ होता आणि अनेक देशांमध्यें विभागून गेलेला होता.

याच सुमारास इंग्लंड हें स्कॉटलंड देश जिंकण्याचाही प्रयत्न करीत होतें. हाही झगडा पुष्कळ काळपर्यंत चालू होता. त्या दरम्यान स्कॉटलंड कधीं फ्रान्सच्या बाजूला जाई, तर कधीं इंग्लंडच्या बाजूला राही. इ. स. १३१४ मध्यें स्कॉट लोकांनीं रॉबर्ट ब्रूसच्या नेतृत्वाखालीं इंग्रजांचा बॅनाकर्बन येथें पराभव केला.

याच्या पूर्वीच बाराव्या शतकापासून इंग्रजानीं आयर्लंड देश जिंकून घेण्याचा प्रयत्न सुरू केला होता. म्हणजे आज या गोष्टीला सातशें वर्षें होऊन गेलीं. तेव्हांपासून आयर्लंड देशांत वारंवार युद्धें, बंडें, अत्याचार, जुलूम आणि भयाण कृत्यें यांचें साम्राज्य चालू होतें. हा देश लहानसा खरा; परंतु परकी वर्चस्वापुढें वांकण्याला त्या देशानें कधींही मान्यता दिली नाहीं आणि आम्ही असे कधींही वांकणार नाहीं हें पुकारून सांगण्यासाठीं दर पिढीला तेथील लोकांनीं बंडामागून बंडाची उठावणी केली.

तेराव्या शतकामध्यें यूरप खंडांतील आणखी एका छोट्या राष्ट्रानें, स्वित्झर्लंडनें, आपला स्वातंत्र्याचा अधिकार जोरानें सांगण्यास सुरुवात केली. हा देश पवित्र रोमन साम्राज्याचा एक भाग असून ऑस्ट्रियाचा त्याच्यावर अम्मल होता. विल्यम टेल आणि त्याचा मुलगा यांची गोष्ट तूं वाचलेली असशीलच; पण ती गोष्ट बहुधा खरी नसावी. तथापि स्विस शेतकऱ्यांनीं या महान् साम्राज्याविरुद्ध बंड केलें आणि त्यांच्या सत्तेपुढें वांकण्याचें नाकारलें ही गोष्ट विल्यम टेलच्या गोष्टीपेक्षांही अधिक रोमांचकारी आणि अद्भुत आहे. या प्रांतांतील तीन जिल्ह्यांनीं प्रथम बंडाचें निशाण उभारून

सन १२९१ मध्यें "चिरंतन संघ" अशा नांवाची एक संघटना त्यांनीं सुरू केली. हळूहळू इतरही जिल्हे त्यांना मिळाले आणि इ. स. १४९९ मध्यें स्वित्झर्लंडचें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें. भिन्न भिन्न स्वतंत्र जिल्ह्यांचें अथवा प्रांतांचें हें एक संघ-राज्य होतें. त्याला स्विस कान्फेडरेशन असें म्हणतात. ऑगस्टच्या पाहिल्या तारखेला स्वित्झर्लंडमध्यें पर्वताच्या माथ्यावर जागोजाग होळ्या पेटविलेल्या अर्पण पाहिल्या त्या आठवतात का तुला? स्विस लोकांचा हा राष्ट्रीय सणाचा दिवस आहे; त्यांच्या क्रांतीच्या सुरुवातीचा हा वर्षदिन आहे; क्रांतीच्या काळांत होळी पेटविणें हें ऑस्ट्रियन राजाविरुद्ध बंड करून उठल्याचें एक लक्षण समजलें जात होतें.

या वेळीं इकडे पूर्व यूरपमध्यें कॉन्स्टान्टिनोपलची काय हालहवाल होती! लॅटिन वंशाच्या ख्रिस्ती धर्मवीरांनीं हें शहर १२०४ मध्यें ग्रीकांपासून काबीज केलें होतें हें तुला आठवत असेल. इ. स. १२६१ मध्यें ग्रीकांनीं या लोकांना हांकलून देऊन पुन्हां पूर्वेकडील रोमन साम्राज्य स्थापन केलें. परंतु त्यांच्यावर दुसरेंच आणि पहिल्याहूनही मोठें संकट येऊं घातलेलें होतें.

मंगोलियन लोक जेव्हां आशिया खंडांतून पुढें पुढें चालून येऊं लागले तेव्हां त्यांच्या-पुढें पन्नास हजार उस्मानी तुर्क लोक नुसते पळत सुटले होते. हे तुर्क लोक सेल्जुक तुर्कांहून निराळे लोक होत. उस्मान या नांवाचा कोणी एक मनुष्य आपला मूळपुरुष किंवा वंशप्रस्थापक होता असें हे लोक मानीत असत. म्हणून यांना उस्मान अलीचे तुर्क असें म्हणत असत. या उस्मानी तुर्कांनीं पश्चिम आशियामध्यें सेल्जुक तुर्कांच्या राज्यांत आश्रय घेतला. सेल्जुक तुर्कांची शक्ति जसजशी क्षीण होत गेली तसतशी उस्मानी तुर्कांची सत्ता वाढत गेली असें दिसतें. ते पुढें पुढें वाढत आणि पसरत चालले. यांच्यापूर्वीच्या पुष्कळशा टोळ्यांनीं केलें होतें त्याप्रमाणें त्यांनीं कॉन्स्टांटिनोपलवर हल्ला केला नाहीं; तर त्या राज्याला वळसा घालून हे लोक इ. स. १३५३ मध्यें यूरप खंडावर चालून आले. तेथें ते झपाट्यानें प्रसार पावले; बल्गेरिया आणि सार्व्हिया या देशांचा त्यांनीं पाडाव केला आणि ॲड्रिआनोपल येथें त्यांनीं आपली राजधानी स्थापन केली. अशा रीतीनें कॉन्स्टान्टिनोपलच्या दोन्ही बाजूंना यूरप खंडांत आणि आशिया खंडांत उस्मानी तुर्कांचें साम्राज्य वाढत चाललें. त्या राज्याला त्यांनीं जणुं चोहोंकडून वेढा घातला; तरी पण तें या तुर्कांच्या साम्राज्याच्या बाहेरच राहिलें. परंतु एक हजार वर्षांपासून चालत आलेल्या त्या महान् रोमन साम्राज्याचा संकोच होत होत तें आतां फक्त जवळ-जवळ कॉन्स्टान्टिनोपल शहरांतच काय तें समाविष्ट होऊन राहिलें. त्याबाहेर या राज्याचा प्रांत बहुतेक राहिला नाहीं. अशा रीतीनें हे तुर्की लोक पूर्वेकडील रोमन साम्राज्याचे एकामागून एक भाग गिळंकृत करीत चालले होते तरीही तुर्कांचा सुलतान आणि रोमन बादशहा यांचे परस्परांशीं फार स्नेहाचे संबंध होते आणि त्यांच्या घराण्यांत परस्परात लग्नसंबंधही होत होते. शेवटीं १४५३ मध्यें कॉन्स्टान्टिनोपल शहरही तुर्कांच्या हातीं पडलें. यापुढें आपण तुर्क म्हणजे फक्त उस्मानी तुर्क असें समजूनच

बोलत जाऊं. सेल्जुक तुर्कांचा आतां यापुढच्या घडामोडींत कोठेंच काहीं भाग उरलेला नाहीं.

कॉन्स्टान्टिनोपल शहर पडणार हें जरी पुष्कळ दिवसांपासून ठरलेलें दिसत होतें, तरी प्रत्यक्ष त्याचा पाडाव झाला तेव्हां सर्व यूरप खंडाला हादरा बसला. हें शहर पडलें याचा अर्थ हजार वर्षें चाललेलें पूर्व यूरपांतील प्राचीन ग्रीक साम्राज्य अखेरचें नष्ट झालें; त्याचा अर्थ यूरप खंडावर मुसलमानांची एक नवी स्वारी सुरू झाली. तुर्क लोक पुढें पुढें पसरतच गेले, आणि केव्हां केव्हां तर आतां हे सर्व यूरप खंड ग्रासून टाकणार अशी वेळ आल्याचें भासूं लागलें. परंतु अखेरीस व्हिएन्नाच्या प्रवेश-द्वाराशीं त्याच्या पुढें सरकण्याला पायबंद घालण्यांत आला.

सहाव्या शतकामध्यें बादशहा जस्टिनियन यानें जें सेंट सोफायाचें महान् मंदिर (कॅथीड्रल) बांधलेलें होतें त्याची आतां मशीद बनविण्यांत आली; तिला आया सुफिया असें नांव देण्यांत आलें. तुर्कांनीं या मंदिरांतील संपत्तीची थोडीफार लूटही केली. त्यामुळें यूरपमध्यें फारच असंतोष निर्माण झाला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तसें पाहिलें तर तुर्की सुलतान हे आद्य (सनातन) ग्रीक धर्मपीठाशीं खरोखरच फार उदारपणानें वागले. सुलतान दुसरा महमद यानें तर आपण स्वतः ग्रीक धर्मपीठाचे पाठिराखे आहों असें जाहीर केलें. त्यानंतरचा 'शानदार सुलेमान' या नांवानें प्रसिद्ध असलेला सुलतान तर आपण पूर्वेकडील साम्राज्याच्या बादशहाचाच प्रतिनिधि आहों असें मानीत असे. आणि स्वतःला सीझर ही पदवीही त्यानें घेतली होती. प्राचीन परंपरेचा प्रभाव हा असा असतो.

या उस्मानी तुर्कांचें आगमन कॉन्स्टान्टिनोपल येथील ग्रीक लोकांना विशेषसें नकोसें वाटलेलें दिसत नाहीं. जुनें साम्राज्य मोडून पडणार ही त्यांची खात्री झालेली होती. अशा स्थितींत पोप आणि पश्चिमेकडील ख्रिस्ती लोक यांच्यापेक्षां त्यांना हे तुर्क बरे वाटले. इ. स. १४५३ मध्यें कॉन्स्टान्टिनोपलचा अखेरचा वेढा चालू असतांना बायझांटियन राज्याचा एक सरदार म्हणाला सुद्धां, कीं "पोपच्या मुगुटापेक्षां पैगंबराचा शिरताज बरा."

या तुर्कांनीं जानिसेरी (जान्निसार) नावाचें एक विलक्षण लष्करी पथक प्रस्थापित केलें होतें. ख्रिस्ती लोकांकडून त्यांनीं खास खंडणी म्हणून लहान लहान ख्रिस्ती मुलें घेतलीं, आणि त्यांना एका खास पद्धतीचें शिक्षण दिलें. आईबापांपासून मुलांची अशा रीतीनें ताटातूट करणें हें निर्दयपणाचें तर खरेंच; परंतु त्यांत या मुलांचा कांहीं अंशीं फायदाही झाला. कारण त्यांना चांगलें शिक्षण मिळालें आणि त्यांच्यांमधून एक प्रकारची लष्करी एकतंत्री सत्ता निर्माण झाली. हें जानिसारींचें पथक म्हणजे उस्मानी सुलतानांचा एक मजबूत आधारस्तंभच होऊन गेलें. जानिसारी हा शब्द जान (आयुष्य) व निसार (त्याग) या दोन शब्दांपासून निघालेला असून त्याचा अर्थ आपल्या जीवाचाही त्याग करणारा असा आहे.

अशाच रीतीनें तुर्कांच्या या जानिसारींच्यासारखेंच मॅमेल्यूक नांवाचें पथक ईजिप्तमध्यें स्थापन झालें होतें. हें पुढें फारच सामर्थ्यवान् झालें आणि शेवटीं त्यांच्यांतूनच ईजिप्तचे सुलतान निघूं लागले.

उस्मानी सुलतान लोकांनीं कॉन्स्टान्टिनोपलच्या राज्याबरोबरच तेथील त्यांच्या पूर्वींच्या बायझांटाइन बादशहांच्यामधील विलास आणि दुराचारयुक्त राहणी यांचाही वारसा आपल्याकडे घेतला असें दिसून येतें. बायझंटाइन साम्राज्यशाहीच्या सर्व हीन परंपरेंत. ते गुरफटून गेले आणि हळूहळू त्यांची सर्व सत्ता निःसत्त्व बनत गेली. परंतु कांहीं काळ मात्र ते फारच प्रबळ होते आणि सर्व ख्रिस्ती यूरपीय देश त्यांच्यापुढें भीतीनें लटपटत होते. त्यांनीं ईजिप्त देशही जिंकला आणि तेथें अब्बासी घराण्याच्या एका शाखेकडे जें तेथील खलिफाचें पद होतें तें, त्या वेळच्या दुर्बळ आणि सत्ता-विहीन खलिफाकडून त्यांनीं आपल्याकडे घेतलें. त्या वेळेपासून पुढें उस्मानी सुलतानच अगदीं अलीकडे कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत स्वतःला खलिफा म्हणवीत होते. मुस्तफा कमालपाशानें आतां शेवटीं सुलतानशाही आणि खलिफाशाही दोहोंनाही मूठमाती दिली.

कॉन्स्टान्टिनोपलच्या पाडावाचा दिवस हा इतिहासामध्यें फार महत्त्वाचा दिवस आहे. एक युग त्या दिवशीं संपलें आणि दुसरें युग सुरू झालें असें समजतात. या दिवशीं मध्ययुगाचा अंत झाला. एक हजार वर्षांच्या अज्ञानांधकाराच्या युगाचा अंत झाला आणि यूरप खंडांत एक प्रकारची चपल गति निर्माण झाली, नवीन चैतन्य आणि शक्ति दिसून येऊं लागलीं. याच वेळीं ज्ञानाच्या आणि कलेच्या पुनरुज्जीवनाच्या काळास – यूरपीय इतिहासांतील रेनेसान्सच्या काळाला – सुरुवात झाली. मोठ्या थोरल्या झोंपेनंतर लोक आतां जागे झालेतसें दिसतें; जागे झाल्यावर लोकांची नजर कितीएक शतकांच्या मागें प्राचीन ग्रीसकडे, ज्या वेळीं ग्रीसचा अत्यंत वैभवाचा काळ होता त्या काळाकडे वळली आणि त्यांतून त्यांना स्फूर्ति मिळाली. धर्मपीठानें पुष्ट केलेल्या जीवनविषयक निराशमय आणि भीतिप्रद भूमिकेबद्दल आणि मानवी स्वत्वाला, तेजाला जखडून टाकणाऱ्या शृंखलांबद्दल लोकांच्या मनांत एक प्रकारचें जणुं बंडच उसळल्यासारखें झालें. प्राचीन ग्रीकांचें सौंदर्य-प्रेम आतां पुन्हां उद्भूत होतें आणि चित्रकला, मूर्ति तयार करण्याची कला (शिल्पकला) आणि इमारतींचें बांधकाम यांना यूरप खंडांत त्या सौंदर्यप्रेमामुळें केवढा तरी बहर येतो.

हें सर्व कांहीं कॉन्स्टान्टिनोपल पडल्यामुळेंच एकदम घडून आलें असें अर्थातच नव्हे. असें समजणें म्हणजे निव्वळ वेडगळपणाचें होईल. तुर्क लोकांनीं तें शहर काबीज केल्यामुळें या सर्व सामाजिक बदलाची गति थोडीशी वाढण्याला मदत मात्र झाली; कारण हें शहर तुर्कांनीं घेतल्याचा परिणाम म्हणजे तेथील पुष्कळसे विद्वान् आणि शिकले सवरलेले लोक तें शहर सोडून पश्चिम यूरप खंडांत जाऊन राहिले हा झाला.

त्यांनीं आपल्याबरोबर इटलीमध्यें ग्रीक वाङ्मयाची संपत्ति आणली; आणि तीही अशा वेळीं, कीं जेव्हां पश्चिम यूरपांतील लोकांना या नवीन ज्ञानाची योग्य समजूत करून घेण्याबद्दल विशेष उत्सुकता उत्पन्न झालेली होती. या अर्थानें पाहतां कॉन्स्टान्टिनोपलच्या पाडावानें ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाची लाट जरा जोरानें सुरू करण्याला थोडीशी मदत झाली, असें म्हणतां येतें.

पण यूरप खंडांत जो महान् बदल घडून आला त्याचें हें एक अगदींच बारकेंसें कारण आहे. प्राचीन ग्रीक वाङ्मय आणि तत्त्वज्ञान हीं कांहीं मध्ययुगीन इटलीला किंवा पाश्चिम यूरपला अगदींच नवीं म्हणजे अपरिचित होतीं असें नव्हे. विश्वविद्यालयांमधून त्या काळांत सुद्धां यांचा अभ्यास होत होता आणि विद्वान् लोकांना त्यांचें चांगलें ज्ञान होतें. परंतु हें ज्ञान अगदींच थोड्या लोकांपुरतें मर्यादित होतें; आणि जीवनाबद्दलच्या प्रचलित दृष्टीशीं तें जुळतें नसल्यामुळें त्याचा विशेषसा प्रसार होत नव्हता, परंतु लोकांच्या मनांत ज्या शंका यायला सुरवात झाली होती त्यामुळें जीवनाबद्दलच्या नवीनच दृष्टिकोनासाठीं जमीन हळूहळू तयार होत आली होती. आहे त्या परिस्थितीबद्दल लोक असंतुष्ट होते आणि त्याहून अधिक समाधानकारक असें नवीन कांहीं तरी शोधून काढण्याची लोकांची खटपट चालू होती. अशा तऱ्हेनें कांहीं अंशीं शंका, कांहीं अंशीं नवीन कांहीं तरी सापडणार अशा प्रकारची उत्कंठा, अशा अवस्थेंत असतांना त्यांच्या बुद्धीला ग्रीक लोकांचा हा ख्रिस्ती धर्माचा संपर्क नसलेल्या प्राचीन ख्रिस्तपूर्व तत्त्वज्ञानाचा ठेवा सांपडला आणि त्यांनीं त्या वाङ्मयाचें अगदीं आकंठ पान केलें. त्याचा त्यांनीं खोल अभ्यास केला व त्यांत ते रंगून गेले. आपण शोधीत होतों तींच नेमकी वस्तु ही सांपडली असें त्यांना झालें आणि या शोधामुळें त्यांच्यामध्यें उत्साहाचें वारें संचारलें.

ज्ञान व कला यांच्या पुनरुज्जीवनाचें युग प्रथम इटलीमध्यें सुरू झालें. त्यानंतर तें फ्रान्समध्यें उद्भूत झालें. नंतर इंग्लंडमध्यें आणि मग इतर ठिकाणीं. त्या लोकांना नुसता ग्रीक वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा पुनः लाभ झाला एवढाच याचा अर्थ नव्हता; त्याहून याचा फार मोठा आणि फार श्रेष्ठ अर्थ होता. यूरपच्या वरून दिसणाऱ्या जीवनभूमीच्या खालीं आंतमध्यें जी कांहीं क्रिया आज पुष्कळ कालपर्यंत चालू होती त्या क्रियेचें तें प्रत्यक्ष उत्थान आणि आविष्करण होतें. यूरपीय समाजाच्या अंतर्भागीं जी पुष्कळ काळपर्यंत मोठी खळबळ माजून राहिलेली होती त्या खळबळीला हें असें दृश्य स्वरूप आलेलें होतें. ही खळबळ यूरपच्या जीवितांत अनेक स्वरूपांत बाहेर पडणार होती. ज्ञान आणि कला यांचें पुनरुज्जीवन हें त्यांतील फक्त एक स्वरूप आहे.


६६३९